सत्यार्थप्रकाश—पूर्वार्धः

हें

पुस्तक

श्रीयुत श्रीदास विद्यार्थी

यांनी

महाराष्ट्रभाषेंत लिहिलें

तें

श्रीयुत शिवकर बापूजी तळपदे

यांनीं

शुद्ध करून

शामराव कृष्ण आणि मंडळी, ठाकुरद्वार, मुंबई

यांनी

" तत्त्वविवेचक " छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

किंमत एक रुपया.

ओ३म्

सत्यार्थप्रकाश–पूर्वार्धः ।

अनुक्रमणिका.

प्रथमसमुल्लास.

पृ. १—२२

(१) ईश्वरनामव्याख्या, (पृ. १) परमेश्वरप्रार्थना, ओंकाराचा अर्थ, (पृ. २) विराट्, अग्नि आदि शब्द केव्हां परमेश्वराचे बोधक होतात व केव्हां भौतिक पदार्थांचे वाचक होतात यांची प्रकरणानुसार व्यवस्था. (पृ. ३) परमेश्वराची निरनिराळ्या नांवांनी केलेली वेदांतील स्तुति. (पृ. ४) "ओम्–खं–ब्रह्म" चा अर्थ; "अक्षर व स्वराट्" यांचा अर्थ. (पृ. ५) "कालाग्निः, दिव्यः, सुपर्णः, गरुत्मान, मातरिश्वा, भूमिः, प्राणः, (पृ. ६) विराट्, अग्निः विश्वः (पृ. ७) हिरण्यगर्भः, वायुः, ईश्वरः, आदित्यः, प्राज्ञः (पृ. ८) मित्रम्, (पृ. ९) वरुणः, अर्यमा, इन्द्रः, बृहस्पतिः, विष्णुः, उरुक्रमः" या शब्दांचे अर्थ. (पृ. १०) परमेश्वर प्रार्थनेचा अर्थ. (पृ. ११) "आत्मा, परमात्मा, परमेश्वरः, देवः, (पृ. १२) जगदीश्वरः पृथिवी, जलम्, आकाशः, वसुः, रुद्रः, (पृ. १३) चन्द्रः, मंगलः, बुधः, शुक्रः, शनैश्चरः, राहुः, केतुः, (पृ. १४) यज्ञः, होता, बन्धुः, पिता, पितामहः, प्रपितामहः, माता, आचार्यः, गुरुः, (पृ. १५) अजः, ब्रह्मा, सत्यम्, ज्ञानम्, अनन्तम्, ब्रह्म, अनादिः, आनन्दः, सत्, चित्, (पृ. १६) नित्यः, शुद्धः, बुद्धः, मुक्तः, निराकारः, निरञ्जनः, गणेशः, विश्वेश्वरः, कूटस्थः" या शब्दांचे अर्थ. (पृ. १७) परमेश्वराचीं तीनहि लिंगांतील नावें, "शक्तिः. श्रीः, लक्ष्मीः, सरस्वती, सर्वशक्तिमान्, न्यायकारी, (पृ. १८) दयालुः, अद्वैतम्, निर्गुणः, सगुणः, अंतर्यामी, धर्मराजः, (पृ. १९) यमः, भगवान्, मनुः, पुरुषः, विश्वम्भरः, कालः, शेषः आप्तः, शंकरः, महादेवः, (पृ. २०) प्रियः, स्वयम्भूः, कविः" या शब्दांचे अर्थ.

(२) मंगलाचरण (पृ. २०)
मंगलाचरण कां करावें व कसें करावें, पौराणिक मंगलाचरणांचा वि
(पृ. २१) वैदिकमंगलाचरण, (पृ. २२) हरिः ओ३म्, ओ३म्, अ

द्वितीयसमुल्लास.

पृ. २३—३३

(१) आईबापांचीं कर्तव्यें (पृ. २३)
भाग्यवान् पुत्र, धन्यकुल, श्रेष्ठमाता, भक्ष्य व अभक्ष्य ५
ऋतुदानाला योग्य रात्री कोणत्या ?, स्त्रीपुरुषांचें प्रसन्नचित्त, (पृ. २५
स्त्रीप्रसूतीनंतर करण्याची व्यवस्था, दाई व गाई, स्त्रीपुरुषांच्या ब्रह्मचर्याशीं
पुत्रांच्या दीर्घायुत्वाचा संबन्ध.
(२) मुलांचेंप्राथमिक शिक्षण (पृ. २५)
वर्णोच्चाराकडे लक्ष्य पुरवणें, सदाचरण व उच्चमनोवृत्ति मुलांत उत्पन्न करणें.
(३) भूतप्रेत (पृ. २६)
पंचाक्षरीबुवांचें प्रस्थ कसें माजतें व त्यांतील सत्यासत्यतेचा विचार.
(४) फलज्योतिष. (पृ. २७)
जोशीबुवांची पद्धति व लोकांचा भोळेपणा.
(५) मन्त्रतन्त्र (पृ. २९)
मान्त्रिक लोक व त्यांना बळी पडणारे अशिक्षित लोक.
(६) वीर्यरक्षण (पृ. ३०)
(७) शिक्षा (पृ. ३१)
मुलांच्या हितासाठीं कशी शिक्षा करावी ? नियमित वेळीं काम करण्याची
संवय, कृतघ्नता, (पृ. ३२) दुसऱ्याचा सन्मान करणें, थोरांच्या सद्गुणांचेंच
अनुकरण करावें, (पृ. ३३) मनानें विचार करून जें उत्तम ठरेल तें
धैर्यानें करणें, मुलांना सुशिक्षण देणें हें आईबापांचें मुख्य कर्तव्य.

तृतीयसमुल्लास.

(पृ. ३४—७८)

(१) विद्या हेंच खरें भूषण (पृ. ३४)
दागदागिने व विद्या यांची तुलना, स्त्रीपुरुषांना विद्या हवी,
आचार्यकुल, (पृ. ३५) ब्रह्मचर्य, पाठशाला कोठें स्थापाव्या ?,
(२) गायत्रीमन्त्र (पृ. ३५)

(पृ. ३६) गायत्रीमन्त्राचा अर्थ, (पृ. ३७) शरीरशुद्धि, प्राणायामाचें फल,

(३) प्राणायामाचा विधि (पृ. ३७)

(पृ. ३८) आचमन, मार्जन, (पृ. ३९) अघमर्षण, गायत्रीमन्त्राचा जप.

(४) देवयज्ञ (पृ. ३९)

हवनकुण्ड, समिधा, (पृ. ४०) प्रोक्षणीपात्र, प्रणीतापात्र, आज्यस्थाली, चमस, हवनमन्त्र.

(५) होमाचें फल (पृ. ४०)

वायुशुद्धि, रोगनिवारण, आरोग्य, दुःखनिवृत्ति,

(६) उपनयनसंस्कार (पृ. ४२)

(७) ब्रह्मचर्याची मर्यादा (पृ० ४३)

(८) विवाहाचा काल (पृ० ४५)

(९) यम व नियम (पृ. ४६)

(१०) गुरूचा उपदेश (पृ. ५०)

सत्यभाषण, निन्द्याचरणाचा त्याग, दान व परोपकार यांची योग्यता व आवश्यकता, (पृ. ५२) सदाचाराचें श्रेष्ठत्व, नास्तिकाचें लक्षण, धर्माचें चतुर्विधलक्षण, धर्मग्रहणाला योग्य मनुष्य.

(११) चारहि वर्णांना शिक्षणाची आवश्यकता. (पृष्ठ. ५३)

(१२) पंचविधप्रमाणपरीक्षा (पृ. ५४)

(१३) अष्टविधप्रमाणांची व्याख्या (पृ. ५४)

(१) प्रत्यक्ष, (२) अनुमान, पूर्ववत्, शेषवत् व सामान्यतः दृष्ट अनुमान, (३) उपमान, (४) शब्दप्रमाणें. (५) ऐतिह्य, (६) अर्थापत्ति, (७) संभव व (८) अभाव.

(१४) षट्तत्वांचें ज्ञान (पृ. ५८)

(१) द्रव्यतत्व, पृथिवी, आप, तेज, वायु, आकाश, काल, दिशा, आत्मा व मन यांची लक्षणें व त्यांचे गुण. (२) गुणतत्व. चव्वीस गुण. (३) कर्मतत्व. पांच तत्वांचीं पांच कर्में. (४) सामान्यतत्व, (५) विशेषतत्व व (६) समवायतत्व.

(१५) कार्यकारणसंबन्ध (पृ. ६३)

परिमाण, सत्ता, अभावाचे पांच प्रकार. (पृ. ६४) प्रागभाव, प्रध्वंसाभाव, अन्योन्याभाव, अत्यन्ताभाव व संसर्गाभाव.

(१६) विद्या व अविद्या. (पृ. ६४)

(१७) नित्यत्व व अनित्यत्व (पृ. ६४)
समवायसंबन्ध, संयोगसंबन्ध, एकार्थसमवायसंबन्ध व विरोधसंबन्ध, व्याप्ति, वस्तुसिद्धि.
(१८) अध्ययन व अध्यापन (पृ. ६६)
शिक्षा, व्याकरण शिकविण्याची रीती, धातुपाठ, (पृ. ६८) निघण्टु, निरुक्त, (पृ. ६९) छन्द, मनुस्मृति, रामायण, महाभारत, षड्दर्शनें, दशोपनिषद्.चारवेद व चारब्राह्मण ग्रन्थ. अर्थज्ञानाशिवाय वेद पाठ केला तर त्याचा उपयोग नाहीं.
(१९) ग्रन्थप्रामाण्य. (पृ. ७१)
आदरणीय ग्रन्थ व त्याज्य ग्रन्थ. (पृ. ७३) ब्राह्मण, कल्प, गाथा, नाराशंसी, इतिहास, पुराण, पुराणांतील विधानांची सत्यासत्यता. षड्दर्शनांतील विरोधाचें निराकरण.
(२०) विघ्नें. (पृ. ७४)
(२१) वेदाध्ययनाचा अधिकार (पृ. ७५)
ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, अन्त्यज, दास, नोकर, स्त्रिया यांना अध्ययनाचा अधिकार आहे कीं नाहीं याचा विचार (पृ. ७८) विद्यादानाचें महत्व.

चतुर्थसमुल्लास.

पृ. ७९—१३०
(१) समावर्तनसंस्कार (पृ. ७९)
(२) विवाह ,, (पृ. ७९)
असपिण्डांत विवाह होण्याची आवश्यकता. (पृ. ८०) दूर देशांतील वधूवरांचा संबन्ध व्हावा. (पृ. ८१) कोणत्या कन्यांशीं विवाह करूं नये.
(३) विवाहाचा समय कोणता? (पृ. ८२)
स्त्रीपुरुषांनी ब्रह्मचर्य पाळल्यानंतर विवाह करावा. बालविवाहाबद्दल शास्त्रार्थ, (पृ. ८३) प्रौढविवाहाला वैद्यशास्त्राची सम्मति, (पृ. ८४) ऋतु प्राप्त झाल्यानंतरहि तीन वर्षेपर्यंत अविवाहित राहण्यास मनूची सम्मति. विवाह वधूवरांच्या सम्मतीनें व्हावा. (पृ. ८७) ब्रह्मचर्यानेंच सर्व प्रकारें उन्नति होते. श्रीमंतांनी व गरीबांनी तें पाळलें पाहिजे.
(४) वर्णव्यवस्था. (पृ. ८७)
गुणकर्मानुसार वर्णव्यवस्था असण्याबद्दल धर्मशास्त्राचे आधार.

(५) ब्राह्मणाचे गुण, कर्मे व स्वभाव, (पृ. ९१)
(६) क्षत्रियाचे ,, ,, ,, (पृ. ९२)
(७) वैश्याचे ,, ,, ,, (पृ. ९३)
(८) शूद्राचे ,, ,, ,, (पृ. ९३)
(९) विवाहाचे प्रकार व त्यांचीं लक्षणें. (पृ. ९४)
(१) ब्राह्म, (२) दैव, (३) आर्ष, (४) प्राजापत्य, (५) आसुर, (६) गान्धर्व, (७) राक्षस, (८) पैशाच. विवाहाचे आठ प्रकार (पृ.९५) गुरुकुलांत राहणाऱ्या वधूवराचा विवाह करण्याची रीति. (पृ. ९६) गर्भाधान, गर्भधारणानंतर स्त्रीपुरुषांनी व्रतस्थ राहणें, बाळंतपण, पुंसवन, सीमन्तोन्नयन, नालछेदन, हवन, नामकरण (पृ. ९७) ऋतुकालीं स्त्रीगमन.
(१०) स्त्रियांची घरामध्यें योग्यता (पृ. ९७)
स्त्रियांशीं घरांतील पुरुषांचें वर्तन कसें असावें, (पृ. ९९) सर्वदेशांतून स्त्रिया. विद्या, धन व कलाकौशल्य आणावें. अप्रिय पण पथ्यकारक भाषण (पृ. १००) स्तुति व निन्दा.
(११) पंचमहायज्ञ (पृ. १००)
(१२) ब्रह्मयज्ञ व देवयज्ञ (पृ. १०१)
(१३) पितृयज्ञ—(१४) देवतर्पण (पृ. १०२)
(१५) ऋषितर्पण—(१६) पितृतर्पण (पृ. १०३)
(१७) वैश्वदेव (पृ. १०४)
(१८) अतिथियज्ञ (पृ. १०६)
(१९) पंचमहायज्ञांचें फल (पृ. १०७)
(२०) सामान्यनियम (पृ. १०७)
प्रातःकाळीं उठणें, धर्माचरण व अधर्माचरण (पृ. १०८) वैदिकधर्माचें अवलम्बन. (पृ. १०९) कोणाशीं वादविवाद करूं नये व कोणाशीं करावा
(२१) दान कोणास देऊं नये? (पृ. १०९)
सत्पात्र व कुपात्र यांचा विचार व दान देण्याचें महत्व.
(२२) पाखंडी कोण? (पृ. १०९)
(२३) धर्माची आवश्यकता. (पृ. ११०)
(२४) सुखदुःखलक्षण (पृ. ११२)
(२५) अध्यापक कसे असावे? (पृ. ११३)
(२६) मूर्खांचीं लक्षणें (पृ. ११४)

(२७) विद्यार्थ्यांचें लक्षण (पृ. ११४)
(२८) पूर्ण विद्वान् होण्याचा उपाय (पृ. ११५)
(२९) स्त्रिया बिघडण्याचें कारण (पृ. ११६)
(३०) पुनर्विवाह व नियोग (पृ. ११६)
अक्षतयोनि स्त्रीचा पुनर्विवाह. अन्य पुनर्विवाहाचा निषेध. नियोग (पृ.११८) पुनर्विवाह व नियोग यांतील भेद. आमरणान्त ब्रह्मचर्य राखण्याचें श्रेष्ठत्व. संततीची संख्या. (पृ. १२१) जितेन्द्रियता. (पृ. १२२) एकपत्नी व एक पतिव्रत. नियोगाबद्दल वैदिक आधार. (पृ. १२६) वेश्यागमन व परस्त्री-गमन यांचा निषेध. वीर्यरक्षण. (पृ. १२७) आपल्या वीर्यापासून सुपुत्र व सुवीर उत्पन्न करावा. (पृ. १२९) गृहस्थाश्रमाचें श्रेष्ठत्व. (पृ. १३०) गृहस्थाश्रम ब्रह्मचर्य पाळणारांसाठींच आहे.

पञ्चमसमुल्लास.

पृ. १३१—१४४

(१) वानप्रस्थविधि. (पृ. १३१)
(२) संन्यासविधि (पृ. १३३)
(३) विशेषधर्म (पृ. १३६)
(४) धर्माचीं दहा लक्षणें (पृ. १३८)
(५) संन्यास धर्म (पृ. १३९)
(पृ. १४३) अविवाहित कोणी रहावें, (१४४) विद्वत्व व नृपत्व यांची तुलना.

षष्ठसमुल्लास.

पृ. १४५—१८८

(१) राजधर्म (पृ. १४५)
तीन सभांची रचना, (पृ. १४६) अनियन्त्रित राजा प्रजेला घातक. शूर राजा. राष्ट्राची उन्नति करणें हें राजाचें कर्तव्य.

(२) सभापतीचे गुण (पृ. १४८)
(३) खरा राजा कोण (पृ. १४८)
दण्ड, शिक्षा, दण्ड देण्यानें प्रजेचें रक्षण कसें होतें? (पृ. १५०) अधिकारी विद्वानच असावे. दशावरा परिषद्, त्र्यवरा परिषद्, विद्वानांची परिषद्, अडाण्यांच्या मेळ्याला सभा म्हणत नाहींत.

(४) राजपुरुषांला अवश्य लागणारे गुण (पृ. १५१)
(५) दुर्व्यसनांचा परिणाम (पृ. १५२)
(६) काममूलकव्यसनें (पृ. १५२)
(७) क्रोधमूलकव्यसनें (पृ. १५३)
(८) मन्त्री व राजसभेचे सभासद कसे असावे. (पृ. १५४)
(९) दूताचें लक्षण (पृ. १५५)
(१०) अधिकारव्यवस्था (पृ. १५६)
(११) राज्यरक्षणाचे उपाय (पृ. १५६)
(१२) दुर्ग कसा असावा (पृ. १५७)
(१३) राज्यव्यवस्थेचे सामान्यनियम (पृ. १५८)
(१४) युद्धव्यवस्था (पृ. १५८)
(१५) पुरुषार्थाची पराकाष्ठा (पृ. १६०)
(१६) दक्षता. (पृ. १६१)
(१७) राष्ट्राची स्वस्थता व राज्यक्रान्तीचीं कारणें (पृ. १६२)
(१८) राष्ट्राचें रक्षण कसें करावें (पृ. १६२)
(१९) करग्रहण. (पृ. १६५)
(२०) राजाची दिनचर्या (पृ. १६६)
(२१) सन्धि व विग्रह (पृ. १६७)
(२२) संक्षिप्त राजनीति (पृ. १७०)
(२३) लढाईची तयारी कशी करावी (पृ. १७०)
(२४) शत्रु, मित्र व उदासीन (पृ. १७४)
(२५) दुपारचा कार्यक्रम (पृ. १७५)
(२६) करांचें प्रमाण (पृ. १७५)
(२७) न्यायव्यवस्था (पृ. १७६)
(२८) साक्षी कसे असावे ? (पृ. १७९)
(२९) अपराध्यास दण्ड (पृ. १८२)
(३०) व्यभिचाऱ्याला शिक्षा (पृ. १८५)
(३१) जकात. (पृ. १८६)
(३२) तपासणी. (पृ. १८७)

सप्तमसमुल्लास.

पृ. १८९—२२६

(१) देवता व परमेश्वर (पृ. १८९)
तेहेतीस देवता (पृ. १९०) परमेश्वराचें व्यापकत्व.
(२) ईश्वराचें अस्तित्व (पृ. १९२)
(३) ईश्वराची स्तुति (पृ. १९५)
सगुणस्तुति व निर्गुणस्तुति.
(४) प्रार्थना (पृ. १९६)
(५) उपासना (पृ. २०१)
(६) परमेश्वराच्या गुणांचें वर्णन (पृ. २०२)
(७) अवतार (पृ. २०५)
(८) जीवाची स्वतन्त्रता (पृ. २०७)
(९) द्वैत व अद्वैतवाद (पृ. २१०)
(१०) परमेश्वराचें सगुणत्व व निर्गुणत्व (पृ. २१९)
(११) वेदांची उत्पत्ति व त्यांचें नित्यत्व (पृ. २२०)

अष्टमसमुल्लास.

पृ. २२७—२५९

(१) सृष्टीची उत्पत्तिस्थितिप्रलयवर्णन (पृ० २२७).
सृष्टीच्या पूर्वीचें तमःस्वरूप. (पृ. २२८) हिरण्यगर्भ. (पृ. २२९) प्रकृति, जीव व परमेश्वर (पृ. २३०) प्रकृतीचे तीन भेद, सत्व, रज व तम हे तीन गुण. (पृ. २३१) अद्वैतवाद. (पृ. २३२) जगताचीं तीन कारणें. निमित्तकारण, उपादानकारण व साधारणकारण. (पृ. २३३) गौडपादाचार्याचें मत. (पृ. २३५) सृष्टि कां उत्पन्न केली ! (पृ. २३६) निराकार ईश्वरच सृष्टिकर्ता आहे. (पृ. २३७) शून्यवादाचें खंडन, (पृ. २३८) अभाववाद, ईश्वरवादाचें खंडन. (पृ. २३९) अनिमित्तवाद व नित्यवाद यांचें खंडन. (पृ. २४०) भूतनित्यवाद व पृथक्वाद यांचें खंडन. (पृ. २४४) षड्दर्शनांचा एकविषय. (पृ. २४७) सृष्टीच्या प्रारंभींची माणसें. सृष्टि उत्पन्न केव्हां झाली ? (पृ. २४८) मनुष्य कोठें उत्पन्न झाले ? त्रिविष्टप, मेरु. (पृ. २५१) दस्यु व आर्य. आर्यावर्तीची मर्यादा. देव व असुर, (पृ. २५४) पृथिवीला आधार. शेष, कूर्म, बैल.

(पृ. २५५) आकर्षण. (पृ. २५८) इतर गोलांवर प्राण्यांची वस्ती. (पृ. २५९) वेद.

नवमसमुल्लास.

पृ. २६०—२८६

(१) **अविद्येचें लक्षण** (पृ. २६०)

(२) **बन्धमोक्षाची नित्यनैमित्तिकता** (पृ. २६१)

चिदाभास (पृ. २६३) अध्यारोप (पृ. २६४) अद्वैतवाद.

(३) **मुक्ति व बन्ध** (पृ. २६५)

मुक्तींमध्यें जीवाला सुख कसें होतें ! (पृ. २६६) जीवाची शक्ति.

(४) **मुक्तींतून पुनरावृत्ति** (पृ. २६८)

मुक्तीचें साधन (पृ. २७३) वैराग्य (पृ. २७४) षट् संपत्ति (पृ. २७६) वाममार्गी लोकांच्या मुक्तीच्या कल्पना. चार प्रकारच्या मुक्ति.

(५) **पुनर्जन्म** (पृ. २७७)

मृत्यु (पृ. २८०), यमलोक, मुक्तींमध्यें परमेश्वराचा आधार, (पृ. २८१) स्वर्ग व नरक.

(६) **पाप व शिक्षा** (पृ. २८२)

(७) **सत्व, रज व तम** (पृ. २८२)

(८) **त्रिविधगति** (पृ. २८४)

(९) **साधनांतील तत्व** (पृ. २८६)

दशमसमुल्लास.

२८७-३०६

(१) **आचार व अनाचार** (पृ. २८७)

आचार व अनाचार यांची व्याख्या, स्वराधर्म, कामात्मता व निष्कामत्व सङ्कल्प, कर्माकडे प्रवृत्ति होण्याचें कारण. (पृ. २८८) धर्माचें आधार, आत्मतुष्टि, श्रौत व स्मार्तधर्म, नास्तिकाची व्याख्या.

(२) **धर्माचें लक्षण** (पृ. २८८)

(पृ. २८९) संस्कार, केशान्तसंस्कार, मुंडन, शिखा,

(३) **आत्मसंयमन** (पृ. २८९)

शरीराला घोडे जोडलेल्या रथाची उपमा, विषयासक्तिपासून दोष कसे कमी होतील (पृ.२९०) विप्रदुष्ट; जितेन्द्रिय; उपदेश; मान्यता वादविणारीं स्थानें

(४) **थोरपणा** (पृ० २९०)
(पृ. २९१) शरीराचें वृद्धत्व व ज्ञानानें मोठेपणा, शक्तीचा थोरपणा, धनाचा मोठेपणा, पांढरे केश, कल्याणाचा उपदेश, धर्मवृद्धि.

(५) **स्वच्छता.** (पृ. २९१)
आरोग्य व पुरुषार्थ करण्याचें सामर्थ्य.

(६) **वडिलांशीं करावयाचें कर्तव्य** (पृ. २९२)

(७) **परदेशगमन** (पृ. २९२)
व्यासांचें अमेरिकेंत गमन. (पृ. २९३) शुक्राचें मिथिला नगरींत आगमन, **मेरुवर्ष, हरिवर्ष** (युरोप), **हूण, चीन, गांधार** (कंदाहार) मद्र (इराण) पाताल (अमेरिका) इत्यादि, देशान्तरीं जाण्यानें उन्नति; (पृ. २९४) वेश्यागमन, मांसभक्षकांशीं संघटण वर्ज्य; व्यापार, राज्य वगैरेची उन्नति, स्पृष्टास्पृष्टतेचा बखेडा, मांसदिपदार्थभक्षण वर्ज्य करणें.

(८) **स्पर्शास्पर्श** (पृ. २९५)
निर्लेप, कच्ची व पक्की रोटी, स्वतः अन्न शिजविणें, (पृ. २९६) शूद्रांच्या हातचें खाणें, त्यांच्याकडून स्वयम्पाक करविणें (पृ. २९७) साक्षात् व परम्परेनें स्पर्शास्पर्श, दोघांत भांडण व तिसऱ्याचा लाभ, दुही, आर्यावर्ताचें दुःख.

(९) **भक्ष्याभक्ष्य** (पृ. २९७)
(पृ. २९८) मांस व मधु वर्ज्य, गाई म्हशींपासून लाभ व त्यांना मारल्यापासून तोटे (पृ. २९९) हिंस्र पशू.

(१०) **उच्छिष्टान्नभक्षणनिषेध.** (पृ. ३००)

(११) **अभक्ष्य अन्न.** (पृ. ३०१)

(१२) **गाईचें शेण.** (पृ. ३०२)

(१३) **चौका.** (पृ. ३०२)
(पृ. ३०३—३०४) उत्तरार्धाचें स्वरूप व पूर्वार्धाची समाप्ति.

ओ३म्.

भाषान्तरकर्त्याचे दोन शब्द.

आपल्या या आर्यवर्त देशांत ऋषी, मुनी, तत्ववेत्ते व योगीराज वगैरे उच्चतम श्रेणींतील लोक फार प्राचीनकाळीं अनेक होऊन गेले. त्यांनी जसा अध्यात्मविद्येचा परिपूर्ण शोध लावून जीवात्म्याला आत्यंतिक सुखाचा लाभ खात्रीनें करून देणारा अद्वितीय **धर्ममार्ग** खुला करून ठेवला, त्याचप्रमाणें वैद्यक, ज्योतिष, पदार्थविज्ञान वगैरे शास्त्रांमध्येंहि पारंगतता मिळवून ऐहिक सुखोपभोगाचे मार्गहि सरळ व निर्धोस्त करून ठेवले आहेत. अनेक ऋषीमहर्षींच्या अतिसूक्ष्म विचारपरंपरेमुळें व निःसीम योगसाधनाच्या तेजामुळें जीं जीं त्यांनी सूत्रबद्धविधानें केलीं आहेत, तीं याच काळांत नव्हे तर सर्व काळांमध्यें विचारी माणसांला ग्राह्य झाल्याशिवाय राहणार नाहींत; कारण तीं सर्व तत्वें त्रिकालाबाधित आहेत. ते ऋषीमहर्षी त्रिकालाबाधित सूक्ष्म, सर्वगामी, प्रगमनशील, सुखपर्यवसायी व सत्यतत्वांचा अनुभव करणारे असल्यामुळें त्यांच्या अंतस्फूर्तीनें जीं विधानें त्यांच्या उपदेशद्वारा जगामध्यें प्रगट झालीं तीं असत्य व एककालिक कशीं असणार ? वेदाध्ययनानें पवित्र झालेल्या बुद्धींतून, समाधिनैरन्तर्यामुळें शुद्ध झालेल्या आत्म्याच्या प्रेरणेनें, सत्यनिष्ठेमुळें पुनीत झालेल्या मनोवृत्तीच्या द्वारें सात्विक आहारविहारांमुळें सन्मार्गगामी झालेल्या इंद्रियांच्या साहाय्यानें जे विचार प्रगट झाले ते अशुद्ध व एकदेशीय असे कधींहि असूं शकणार नाहींत. ज्यांचा स्वार्थ अजीबात सुटला आहे, विषयवासनांचें फारखत ज्यांचें झालें आहे, लोकसंग्रहाचा स्वभाव ज्यांच्या आंगांत भिनला आहे, जनतेची सर्व प्रकारची उन्नती करणें हेंच काम ज्यांचें अवशिष्ट राहिलें आहे, मनुष्यधर्माची ओळख ज्यांना पूर्णपणें होऊन चुकली आहे, प्रेय मार्ग सोडून जे श्रेय मार्गावर चालूं लागलेले आहेत, त्यांनी सर्व लोक सन्मार्गावर चालावे म्हणून जे जे उपदेश वेळोवेळीं केले आहेत ते याच देशांतील नव्हे तर सर्व देशांतील लोकांना सर्वदा ग्राह्य मानावेच लागतील. या शरीररूपी यज्ञशालेमध्यें माता, पिता व गुरू यांच्या योगानें आत्मज्ञानाग्नि पेटवून व तो शुद्ध वैदिक तत्वज्ञानेन्धनानें वाढवून त्या प्रज्वलित अग्नीमध्यें मन आदि सर्व इंद्रियरूपी ऋत्विजांकडून त्यांच्या त्यांच्या विषयरूपी हविर्द्रव्यांचें ज्यानें हवन करविलें आहे व जनतेच्या उद्धारार्थ आपल्या सर्वस्वाची पूर्णाहुती देण्यास जो तयार झाला आहे त्याच्या तोंडून पक्षपातीभाषण किंवा अविचाराचा उच्चार कां निघेल ? थोडें खोटें बोलून त्याला काय मिळवावयाचें आहे ? जेथें आत्मयज्ञ झाला तेथें लपंडावाला कोण विचारितो ? अशा शुद्ध पुरुषांच्या प्रसादानें लोकांत

प्रसार झालेला हा वैदिकधर्म असल्यामुळें तो पूर्वीप्रमाणें आज किंवा उद्यां सर्व श्रेष्ठ पुरुषांच्या अंतःकरणांत जाऊन वसणारच आहे यांत शंका नाहीं.

पण ज्याप्रमाणें सूर्यावर किंचित् काळपर्यंत अभ्रें येऊन त्याचा प्रकाश पडेनासा होतो त्याप्रमाणेंच या उज्वल **वैदिक धर्मावर** शाक्तादिमतांचें झांकण पडलेलें होतें व त्यामुळें लाल चिमणींतून आंतील स्वच्छ दिव्याची ज्योतहि जशी लाल दिसते त्याप्रमाणें या शाक्तादिकांच्या भयंकर आवरणांमुळें प्रत्येक अंतरात्म्याला उज्वल करणारा वैदिकधर्मसुद्धां फारच भेसुर व चमत्कारिक वाटत होता.

नानातऱ्हेच्या भयंकर चालीरीतींनी व विसंगत आचरणांनी या धर्माची अशी भेसळ झालेली होती कीं त्यांत खरें काय व खोटें काय हें पाहणारांची नेहमीं धांदल उडत असे. परकीलोकांनी आपल्या चालीरीतींकडे पाहून हसावें, पौराणिक वाङ्मयाचा विसंगतपणा दाखवून हिणवावें व यज्ञांतील होणाऱ्या पशूंच्या कत्तलीकडे बोट दाखवून आपणांस निरुत्तर करावें असा प्रकार पांचपंचवीस वर्षांपर्यंत चाललेला होता. कोणालाहि सनातनधर्मीयाला विचारलें कीं, तुमच्या धर्माचीं तत्वें काय? तर त्याच्या जवळ उत्तर नसे. तो तरी काय सांगेल? कारण एका पुराणाच्या विरुद्ध मजकूर दुसऱ्या पुराणांत आहे, मग हें खरें कीं तें खरें असें मोठमोठ्या पंडितांला होऊन जात असे. सूत्रग्रन्थ,स्मृतिग्रन्थ, पुराणग्रन्थ व तन्त्रादिग्रन्थ यांचा मेळ घालण्याची अनेक विद्वानांनी खटपट केली पण ती कोणाच्याहि हातून झाली नाहीं; होईल तरी कशी? कारण जर मुळांत पूर्ण भेद आहे तर मग टीकाकार त्याचें एकीकरण कसें करूं शकेल! हें तर अगदीं उघड आहे.

मोठें झाड दिसलें कीं त्याची षोडशोपचार पूजा करावी, रस्त्यांत एखादा चांगला दगड दिसला कीं त्यावर शेंदूर फांसून त्याच्या पुढें नाक घांसून त्याला गाऱ्हाणें करावें रामकृष्णादि जे प्राचीनकाळीं लोकोद्धार करणारे सामर्थ्यवान् पुरुष झाले होते त्यांच्या मनःकल्पित मूर्ती करून त्यांच्या पुढें धूप, दीप, नैवेद्य ठेवून आपणास कृतार्थ मानावें; म्हसोबा, दगडोबा, काली, चामुंडा, रडकाई, आंमाई, इत्यादि मनःकल्पित नांवें रचून कोणी पोटाची खळगी भरण्यासाठीं तर कोणी प्रतिष्ठा मिरविण्यासाठीं उपास्यें (!) उत्पन्न करण्यांत शेखी मारावी; आज कोणी देवीच्या तुष्टीसाठीं बकरें मारतो तर उद्यां कोणी समंधासाठीं रेडा मारतो, परवां कोणी देवावर कोंबडे ओंवाळतो तर तेरवां तिसरा दारूचा नैवेद्य व मांसाचा उपहार दगडाच्या मूर्तीपुढें ठेवून आपणास कृतकृत्य समजतो! अशा तऱ्हेनें खऱ्या परमेश्वरोपासनेकडे अप्रवृत्ति व धर्मपराङ्मुखता वाढून ढोंग व अज्ञान माजत चाललें.

नुसतें प्राचीन थोर थोर विभूतींचे जनतेच्या मनांत उच्चतम विचार उत्पन्न करण्यासाठीं मूर्तीदर्शनच जोंपर्यंत होतें तोंपर्यंत ठीक होतें; पण तें जाऊन त्यांच्या देवळां-

मध्यें कुटाळांचें अडे इतकेंच नव्हे तर मूर्तीच्या व विभूतींच्या नांवाखालीं दुराचार व अनाचार जेव्हां सुरू झाले तेव्हां त्या त्या पंथांतील लोकांसहि या धर्माचा वीट आला व खरा धर्म कोणता याचा विचार करण्याकडे उदार अंतःकरणांची प्रवृत्ति होऊं लागली.

या अज्ञान काळामध्यें जर आपण या धर्मस्थानांचा विचार करूं लागलों तर आपणास अज्ञानाशिवाय तेथें काय आढळणार आहे बरें? उत्तर हिंदुस्थानांत आपण जाऊन जर पाहिलें तर दुपारीं कृष्ण निजला आहे म्हणून देऊळ बंद असलेलें आपणास आढळेल, कोठें लांकडाच्या व दगडाच्या मूर्तीला वायका वाहिल्या आहेत असें आपण पाहाल तर कित्येक ठिकाणीं त्या मूर्तीसाठीं जोडे, वाहणा, गादी, गिरद्या, छपरपलंग व उत्तम पांघरुणें, घोडे, पालख्या वगैरे मनुष्योपभोगाचीं साधनें आपणास आढळतील. विचारी माणसाच्या मनांत साहजिकच प्रश्न उत्पन्न होतो कीं, "या देवळांत दगडाची मूर्ती आहे व ती दुपारीं निजते म्हणजे काय? तिला वायका व गाद्या पलंग कशाला? व जोडे, छत्र्या व घोडे कशाला? हा काय चमत्कार आहे? काय दगडाची मूर्ति या सर्व साधनांपासून सुख मिळवूं शकते!" हे प्रश्न मनांत येत आहेत तोंच जर आपण शिखांजवळ पाहूं लागलों तर ते आपल्या धर्मपुस्तकावर गंधफुलें वाहून त्याला नरम गादीवर ठेवून त्याच्यापुढें गव्हांचा सांजा किंवा मोहनभोग ठेवून ते हात जोडून गात असलेले आपणास आढळतील. हिंदूंच्या देवळांत माणसासारखी कृष्णाची मूर्ति तरी होती, पण येथें यांचें उपास्य *ग्रन्थसाहेब असून त्याला निजावयाला गादी, टेंकावयाला लोड; भोजनाला सांजा व ऐकावयाला मधुर गाणें पाहिजे!!! विचारा अंतीं असें आढळेल कीं ज्याप्रमाणें दगडाच्या मूर्तीला गाद्यातक्यांची व फराळाची जरूरी नाहीं त्याचप्रमाणें ग्रंथालाहि जरूरी नाहीं पण अज्ञानी मेंदूमध्यें याचा प्रकाश पडणार कसा? जे लोक दगडाला, लांकडाला व कागदाला फराळ पाहिजे असें समजतात त्यांची खरोखर किती आत्मिक अवनति झालेली आहे, याची कल्पना वाचकांनींच करावी.

याप्रमाणें उपासनेची स्थिति झाली, आतां जपजाप्याची अवहेलना काय वर्णावी! बुद्ध लोक चक्रावर मंत्र खोदून, तें चक्र एका लांकडावर वसवून तें फिरवितात व अशा चक्रफिरविण्यानें आपण मुक्त होऊं असें समजतात, पण आपण येथें ब्राम्हण भाड्यानें लाऊन त्यांनी केलेल्या जपापासून पुण्य उद्भवतें व तें त्यांना पैसे दिले असतां आपणांस मिळून आपण निर्दोष होतों असें मानणारे लोक आहेत. जप करणें हा व्यापार आहे असें समजतात, व हजार किंवा लक्ष जप करण्याचे

* शीख लोक आपल्या धर्मग्रंथाला ग्रंथसाहेब असें म्हणतात.

दर ठरविलेले आहेत ! "**जपः तदर्थभावनम्**" जप म्हणजे त्या मंत्राच्या अर्थाची भावना मनांत अचल ठेवणें हा योगदर्शनांतील अर्थ पूर्ण नाहींसा होऊन जप भाड्यानें करविणें हें जसें हिंदुमध्यें आज दिसत आहे तसेंच व तितकेंच गर्हणीय बुद्ध लोक प्रार्थनाचक्रें फिरवून आपणांस पुण्य मिळेल असें समजतात हें आहे.

अशा प्रकारें सर्व बाजूंनी धार्मिक अवनति झाली, खरें काय व खोटें काय याची कोणास ओळख नाहींशी झाली, खोट्याचा व ढोंगाचा बडेजाव व सत्याची अवहेलना राजरोस होऊं लागली त्यामुळें एकंदर जनतेची स्थिति फारच भयंकर झालेली होती. ब्राह्मण-ज्यांचा अधिकार आंगच्या ज्ञानतेजामुळें व बुद्धिवैभवामुळें सर्व दुनियेंत गाजावयाचा ते–दोन पैशांच्या दक्षणेसाठीं शूद्रांचे किंवा हीन वर्णाचेहि उमरठे झिजवूं लागले; त्यांनी आपला निःपक्षपाती उपदेश सोडून दिल्यामुळें, जसा मेंदू बिघडल्यामुळें सर्व शरीराची हानी होते त्याचप्रमाणें, त्यांच्या बिघडण्यानें सर्व राष्ट्राची हानी झाली. क्षत्रिय दुर्व्यसनी, विषयलोलुप व लोभी झाल्यामुळें निर्वीर्य झाले व त्यांच्या कपाळीं कुत्र्यांप्रमाणें लांगूल चालन करून अर्धें पोट भरण्यासाठीं भाकरीचा तुकडा मिळविण्याची पाळी आली. वैश्य दरिद्री बनले व जेथें या तीन वर्णांची अवनति झाली तेथें शूद्र व दस्यू यांची काय स्थिति वर्णावी !! अशा रीतीनें अधर्माचा पगडा भयंकर बसला व तो पृथिवीच्या हृदयस्थानीं असलेल्या आर्यावर्तावर बसला असल्यामुळें, हृदय बिघडल्यानंतर जसें सर्व शरीर रक्तविकारामुळें व्यथित होतें, त्याचप्रमाणें आर्यावर्तामध्यें धर्माची अवनति झाल्यामुळें इतर देशहि धर्मभ्रष्ट झाले व सर्व पृथिवीवर अशांति पसरली आहे.

एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः ॥
स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्व मानवाः ॥ मनु.

या देशांतून धर्मज्ञान बाहेर गेलें तर तेथें धर्म काय व अधर्म काय हें तेथील लोकांस समजतें, अशा स्थितींत जर हाच देश अधर्मांत गुंतला असेल तर तो दुसऱ्यांला काय सोडवणार ? अशा रीतीनें आर्यावर्ताच्या अज्ञानामुळें एकंदर पृथिवीवर अस्वस्थता उत्पन्न झाली. सर्व लोकांचीं मनें या अवस्थेची चिकित्सा आपआपल्यापरी करीत होते पण कोणालाहि या रोगाचें निदान समजलें नव्हतें. हा रोग सामान्य नव्हे, याला तसाच जगचिंतामणी परमेश्वराची गांठ घेतलेला धन्वंतरी पाहिजे होता.

अगाध तपोबल, वेदज्ञानपरिप्लुत विचारसरणी, दार्शनिक सूक्ष्मबुद्धि, ब्रह्मचर्य, सद्गुरुसेवन व सद्धर्मप्रचारेच्छा इतक्या गोष्टी तरी निदान ज्या पुरुषांत असतील तोच सध्यां अधर्माचा पाडाव करून धर्माच्या राज्याला सुरुवात करील असे मधून मधून

शब्द ऐकूं येत असत, इतक्यांत महान् तपोनिष्ठ व समाधिसुखाचा अनुभव घेतलेल्या **विरजानंद** नामक मथुरानिवासी सिद्धपुरुषाकडे केवळ वेदाध्ययनाच्या व आजन्म ब्रह्मचर्य पाळण्याच्या जबरदस्त अंतःस्फुरित लालसेनें एक **बालक**, आपल्या घरच्या धनाची व सर्व संसारिक ऐष आरामाची पर्वा न करतां व्यक्तिला व समाजाला निरंतर सुखाचा लाभ कसा होईल, त्या मार्गाचीं साधनें वैदिक तेजानें शोधण्यासाठीं वरील सिद्ध पुरुषांच्या आश्रमांत आला व आपल्या अंतरात्म्याला वैदिक ज्ञानाग्नीनें उज्वल करूं लागला.

योग्य कालानें अध्ययन संपलें व योगाचीं सोपानें चढून शाब्दिक ज्ञानाचा अनुभव हा साधारण **बालक** आपल्या आत्म्यानें घेऊं लागला; तेव्हां **विरजानंद** स्वामींनी सांगितलें कीं "**वा शिष्या! आतां तुझें अध्ययन संपलें, आमची गुरु दक्षिणा टाक व आपल्याला जो इष्ट मार्ग असेल त्या मार्गानें जा**" याप्रमाणें गुरूच्या तोंडचे शब्द ऐकून व आपणाजवळ गुरुदक्षिणा देण्यास त्यांनी दिलेल्या ज्ञानाच्या मोबदल्याचें कांहीं नाहीं असें पाहून तो ब्रह्मचर्यानें तेजस्वी दिसणारा बालक गहिंवरला व हात जोडून गुरूला म्हणाला कीं "**हे परमगुरो! आपण मला वैदिकज्ञान देऊन पुनीत केलेंत, याच्या मोबदला मी आपणांस काय देऊं? तथापि आपल्या उपदेशानें पवित्र झालेलें माझें मन व ब्रह्मचर्यानें पुनीत झालेलें माझें शरीर व वैदिकज्ञानानें पवित्र झालेली माझी बुद्धि हीं सर्व आपणास अर्पण करतों व आपल्या आज्ञेनें लोकांमध्यें वाढलेल्या अधर्माचा नाश करून वैदिकधर्माची पुनः प्रस्थापना करण्याच्या कामीं या सर्वांचा उपयोग करतों**" हे शब्द ऐकल्याबरोबर त्या सिद्ध पुरुषाला समाधान वाटलें जें आपल्या मनांत आहे तेंच करण्याची प्रतिज्ञा त्यानें केली आहे हें पाहून त्यांना फार समाधान झालें व निरोप देतेवेळीं त्यांनी सांगितलें कीं, हिमालयामध्यें कांहीं दिवस वास्तव्य करून तेथें योगसाधनांची चांगली सिद्धी झाल्यानंतर केलेल्या प्रतिज्ञेप्रमाणें वागलें असतां माझी गुरुदक्षिणा मला मिळाली असें होईल इत्यादिप्रकारें भाषण करून त्यांना निरोप दिला.

याप्रमाण समाधिनिर्धूत बुद्धि होऊन आत्मसाक्षात्कार करून घेतल्यानंतर जे **विरजानंदशिष्य** तपोबलानें अधर्माचें खंडन व शुद्ध वैदिकधर्माचें मंडन करीत निघाले तेच **स्वामी दयानंद सरस्वती** होत. यांनी सर्व आर्यावर्तातील धर्माच्या अवनतीचें उत्तम परीक्षण करून त्यामध्यें **वैदिकधर्माची** पुनः प्रस्तावना केली. तसेंच ऋग्वेद व यजुर्वेद यांवर भाष्य करून **श्रौतधर्म** म्हणजे काय तें लोकांला दाखविलें व ऋग्वेदभाष्य सुरू करण्याच्या पूर्वी वैदिकधर्माचें स्वरूप काय

आहे हें सूत्ररूपानें दाखविण्यासाठीं प्रस्तावनारूप लिहिलेला **ऋग्वेदादिभाष्य भूमिका** नामक ग्रंथ संस्कृतमध्यें लिहिला. त्याचें मराठी भाषांतर "**वैदिक धर्मस्वरूप**" नामक पुस्तक रूपानें आम्ही प्रसिद्ध केलें, त्याच्या संबंधानें लोकांमध्यें बरीच प्रीति उत्पन्न झाली असें वाटल्यामुळें, व **श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड सेनाखासखेल समशेर बहादुर** यांची स्वामी नित्यानन्दजी यांचेद्वारें मराठी भाषान्तर व्हावें अशी इच्छा प्रदर्शित झाल्यामुळें, "**सत्यार्थप्रकाश**" नामक त्यांनी लिहिलेल्या हिंदी पुस्तकाचें हें भाषान्तर लिहिलें आहे. याचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग आहेत. त्यांपैकीं पूर्वार्धांचें हें पुस्तक आहे, यामध्यें वेदांतील धर्म कसा आहे हें दाखविलें आहे. क्वचित् ठिकाणीं मतमतांतरांचें जरी यांत खंडन आलेलें आहे तथापि या पूर्वार्धाचा खंडना हा विषय नसून शुद्ध **धर्म** काय आहे तें दाखवणें हाच याचा उद्देश आहे व तो यांत पूर्णपणें दाखविला आहे. जे गृहस्थ या ग्रंथाचें मननपूर्वक वाचन करतील त्यांना वैदिकधर्माची उत्तम रीतीनें माहिती होईल. यांत तिळप्राय शंका नाहीं.

निव्वळ गप्पा कोणत्या, धर्मभोळेपणा कोणता व खरा धर्म कोणता हें समजण्यास या पुस्तकासारखें थोडक्यांत लिहिलेलें दुसरें पुस्तक मिळणार नाहीं असें वाटल्यावरून या हिंदी ग्रंथाचें शुद्ध मराठी भाषेंत भाषांतर करून वाचकांपुढें ठेवलें आहे. जे वाचतील त्यांच्या मनावर इष्टपरिणाम घडतीलच यांत कांहीं शंका नाहीं.

श्रीदास विद्यार्थी.

ओ३म्.

सच्चिदानन्देश्वराय नमो नमः ॥

सत्यार्थप्रकाश-

भूमिका.

ज्या वेळीं मी हा "**सत्यार्थप्रकाश**" नामक ग्रन्थ प्रथमतः लिहिला, तेव्हां व त्याच्या पूर्वी मला संस्कृतभाषेंतच बोलण्याची व पठनपाठनाच्या वेळींहि संस्कृतच बोलण्याची सवय असल्यामुळें व माझी जन्मभाषा गुजराथी असल्यामुळें, व मला या हिंदीभाषेचें ज्ञान नसल्यामुळें त्या ग्रंथाची भाषा अशुद्ध झाली होती. आतां ही (हिंदी) भाषा बोलण्याचा व लिहिण्याचा अभ्यास झाला असल्यामुळें हा ग्रन्थ व्याकरणदृष्ट्या शुद्ध करून पुनः छापला आहे. कोठें कोठें शब्द व वाक्यरचना यांमध्यें बराच फेरबदल झाला आहे, कारण तसें केल्याशिवाय गत्यन्तर नव्हतें; तसा फरक केल्याशिवाय भाषेच्या अशुद्धि सुधारणें अशक्य झालें असतें. या ग्रन्थांत वाक्यरचनेमध्यें जरी भेद केला आहे तथापि मूळच्या भावार्थामध्यें कोणत्याहि तऱ्हेची हानी झाली नाहीं, परंतु कित्येक ठिकाणीं अर्थाचा खुलासा जास्तच झाला आहे. जेथें जेथें— पहिल्या आवृत्तींत चुका होत्या तेथें या आवृत्तींत सुधारणा केली आहे.

ह्या ग्रन्थाचे १४ समुल्लास अर्थात् विभाग केले आहेत. त्यांपैकीं दहा समुल्लास पूर्वार्धांत आले असून पुढचे चार समुल्लास उत्तरार्धामध्यें आले आहेत. शेवटचे दोन समुल्लास व स्वासिद्धान्त कांहीं कारणामुळें प्रथमावृत्तीमध्यें छापतां आले नव्हते ते यांत छापले आहेत.

(१) **प्रथमसमुल्लास**—ईश्वराच्या ओंकारादि नावांची व्याख्या.

(२) **द्वितीयसमुल्लास**—मुलांचें शिक्षण.

(३) **तृतीयसमुल्लास**—ब्रह्मचर्य, पठनपाठनव्यवस्था, सत्यासत्यग्रंथांचीं नांवें व ते शिकण्याची रीति.

(४) **चतुर्थसमुल्लास**—विवाह व गृहस्थाश्रमव्यवहार.

(५) **पञ्चमसमुल्लास**—वानप्रस्थ संन्यासाश्रमाचे विधि.

(६) **षष्ठसमुल्लास**—राजधर्म.

(७) **सप्तमसमुल्लास**—वेद व ईश्वर या संबंधाचा विषय.

(८) **अष्टमसमुल्लास**—जगताची उत्पत्ति, स्थिति व प्रलय.

(९) **नवमसमुल्लास**—विद्या, अविद्या, बंध व मोक्ष यांची व्याख्या.

(१०) **दशमसमुल्लास**—आचार, अनाचार, भक्ष्य व अभक्ष्य.

(११) **एकादशसमुल्लास**—आर्यावर्त्तीय मतमतान्तरांचें खंडन मंडन.
(१२) **द्वादशसमुल्लास**—चार्वाक, बौद्ध, व जैन मतांचें परीक्षण.
(१३) **त्रयोदशसमुल्लास**—ख्रिस्तीयमतपरीक्षण.
(१४) **चतुर्दशसमुल्लास**—मुसलमानीमताचें परीक्षण.

चतुर्दशसमुल्लासाच्या अंतीं सनातन आर्यांच्या सनातन वेदविहितमताची विशेष व्याख्या लिहिली आहे, जी मला पूर्णपणें संमत आहे.

हा ग्रन्थ लिहिण्याचा माझा मुख्य उद्देश हाच आहे कीं सत्य अर्थांचा प्रकाश करावा, अर्थात् जें खरें आहे त्याला सत्य व जें खोटें आहे त्याला असत्य ठरवणें हा माझा मुख्य उद्देश आहे व यालाच मी सत्य अर्थाचा प्रकाश समजत आहें. जो सत्याच्या ठिकाणीं असत्य व असत्याच्या ठिकाणीं सत्य बोलेल त्याला सत्यनिष्ठ असें म्हणतां येणार नाहीं; पण जो जसें असेल तसेंच लिहील, बोलेल व मानील त्यालाच सत्यनिष्ठ म्हणतां येईल. जो मनुष्य पक्षपाती असतो तो आपल्या असत्यमताला सत्य भासवितो व प्रतिपक्ष्याच्या सत्यमतालाहि असत्य भासविण्यास प्रवृत्त होतो; म्हणून त्याला सत्य मताची प्राप्ति होऊं शकत नाहीं; याकरितां विद्वान् आप्तपुरुषांचें हें मुख्य काम आहे कीं त्यांनी उपदेश व लेख यांच्या द्वारें सर्व मनुष्यांपुढें सत्यासत्याचा निर्णय मांडावा. त्यावरून नंतर ते आपलें हिताहित पाहून सत्याचें ग्रहण व असत्याचा त्याग करून सदोदित आनंदाचा उपभोग घेतील. मनुष्याचा आत्मा सत्यासत्याला जाणणारा आहे. परंतु आपल्या स्वार्थासाठीं तो हठ, दुराग्रह, व अविद्यादिदोष यांच्यामुळें सत्याला सोडून असत्याच्या बाजूला झुकतो; पण या ग्रंथामध्यें अशी गोष्ट आणली नाहीं व कोणाचें मन दुखवण्याचा किंवा कोणाची हानी करण्याचाहि प्रयत्न केलेला नाहीं. सत्योपदेशावांचून दुसऱ्या कोणत्याहि मार्गानें मनुष्यांची उन्नति होणार नाहीं; म्हणून ज्याच्या योगानें मनुष्यजातीची उन्नति व उपकार होईल त्या सत्यासत्याचा निर्णय करून मनुष्यांनी सत्याचें ग्रहण व असत्याचा परित्याग करावा; एवढ्यासाठीं हा ग्रन्थ आहे.

या ग्रन्थामध्यें जर कोठें अशुद्धि, लिहिण्याच्या किंवा छापण्याच्या दोषांमुळें झाली असेल, तर ती कळतांक्षणींच सत्य असत्यास त्याप्रमाणें तावडतोब शुद्ध करण्याचा प्रयत्न केला जाईल; पण जर कोणी पक्षपातानें खंडनमंडन करण्याची खटपट करील तर त्याच्याकडे मात्र लक्ष्य दिलें जाणार नाहीं. हां जर कोणी मनुष्यमात्रांच्या हितार्थ कांहीं सुधारणा करावयासाठीं सुचवील तर त्या खऱ्या असल्यास त्यांचाहि संग्रह केला जाईल. प्रत्येक मतमतांतरामध्येंहि बरेच विद्वान् पुरुष आजकाल असलेले दिसतात; तर ते पक्षपात सोडून सर्वतन्त्रसिद्धांतांचें–अर्थात् ज्या ज्या गोष्टी सर्वांला अनुकूल व सत्य आहेत, त्यांचें–ग्रहण व ज्या विरुद्ध असून असत्य आहेत

त्यांचा त्याग करून परस्परांमध्यें प्रीतिपूर्वक वर्तन करतील तर जगतांचें पूर्ण हित होईल; कारण विद्वानांमध्यें विरोध असल्यानें अविद्वानांतहि विरोध वाढतो व त्यामुळें अनेक दुःखें वाढतात व सुखें कमी होत जातात. स्वार्थी लोकांना प्रिय असणाऱ्या या हानीमुळेंच सर्व लोक दुःखसागरामध्यें बुडत चालले आहेत! जेव्हां जेव्हां हितावर दृष्टि ठेवून कोणी मनुष्य उच्चतम काम करण्यास प्रवृत्त होतो तेव्हां हेच स्वार्थीलोक त्याचा विरोध करून त्याला अनेक प्रकारें विघ्न करूं लागतात. पणः—

सत्यमेव जयते नानृतम् ।
सत्येन पन्था विततो देवयानः ॥

सर्वदा सत्याचा विजय होऊन असत्याचा पराजय होत असतो, व सत्याच्याच योगानें विद्वानांचा मार्ग विस्तृत होत असतो, या वचनावर दृढ निश्चय ठेवून आप्त लोक परोपकारापासून व सत्य अर्थांचा प्रकाश करण्यापासून परावृत्त होत नाहींत. पहा—

यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम् ॥ गीता ॥

हा सिद्धान्त अचल आहे. विद्यावृद्धि व धर्मप्राप्ति यांचीं जीं कामें असतात तीं प्रथमतः विषतुल्य भासतात पण शेवटीं अमृतासारखीं होतात. या सर्व गोष्टी चित्तांत ठेवूनच मी हा ग्रन्थ लिहिला आहे.

श्रोत्यांनी व वाचकांनी या ग्रन्थाकडे प्रेमपूर्वक पाहून या ग्रन्थांतील सत्यभाव जाणून उचित वाटेल तें करावें. या ग्रन्थामध्यें असा प्रकार ठेवला आहे कीं, ज्या ज्या गोष्टी सर्व मतांमध्यें सत्य आहेत, त्या त्या सर्वांला अविरोधी असल्यामुळें त्याचा स्वीकार करून ज्या ज्या मतमतांतरांतील मिथ्या गोष्टी आहेत त्यांचें खंडन केलें आहे. सर्व मतमतांतरांतील गुप्त व प्रकट वाईट गोष्टीहि यांत दाखविण्याचें व त्या सर्व विद्वान् व अविद्वान् यांच्यापुढें मांडण्याचें कारण इतकेंच कीं, सर्वांनी त्यावर विचार करून सर्वांनी प्रेमानें सत्याचेंच ग्रहण करून सत्यमतावलम्बी बनावें. जरी मी आर्यावर्त देशांत उत्पन्न झालों आहें व येथेंच राहत आहें तथापि या ग्रन्थांत जसें या देशांतील मतमतांतराचा पक्षपात सोडून त्यांतील सत्यासत्याचा प्रकाश केला आहे, त्याचप्रमाणें दुसऱ्या देशांतील मतांचेंहि परीक्षण करून त्याच्याशीं तसेंच निःपक्षपाती वर्तन मी ठेवीत आहें. जसा मी स्वदेशीय मनुष्यांशीं मनुष्योन्नति विषयासंबंधानें वर्ताव करतों, त्याचप्रमाणें विदेशीयांशींहि वर्ताव ठेवतों व तसाच सर्व सज्जनांनीहि ठेवला पाहिजे. कारण जर मीहि कोणत्यातरी एकाच मताचा पक्षपाती झालों असतों तर आजकालच्या स्वमताची स्तुति व मंडन करून त्याचा प्रसार करणाऱ्या व दुसऱ्या मतांची

हानी, निंदा व बंदी करण्यांत तत्पर होणाऱ्या लोकांप्रमाणेंच मीहि एक बनलों असतों, पण असें करणें मनुष्यपणाच्या बाहेरचें आहे. कारण पशु बलवान् झाले तर निर्बलांला दुःख देऊं लागतात तसें करणें मनुष्यांला योग्य नाहीं. जर मनुष्यहि तसेंच करूं लागले. तर ते मनुष्यस्वभावयुक्त नसून पशुच होत. जो बलवान् होऊन निर्बलांचें रक्षण करतो त्यालाच मनुष्य म्हणतां येईल; पण जो स्वार्थी होऊन दुसऱ्याची हानी करण्यांत तत्पर होतो तो पशूंचा थोरला भाऊ आहे असें समजावें.

या पुस्तकांत आर्यावर्तीयांच्या मतांविषयीं अकराव्या समुल्लासापर्यंत लिहिलें आहे. या समुल्लासांमध्यें जें सत्य मत प्रकाशित केलें आहे तें वेदानुकूल असल्यामुळें मला पूर्णपणें ग्राह्य आहे व नवीन पुराणतन्त्रादि ग्रन्थांचें खंडन केलें आहे तें माझ्यामतें त्यक्तव्य आहे. बाराव्या समुल्लासामध्यें चार्वाकाच्या मतांचें परीक्षण केलें आहे. यद्यपि हें मत सध्यां प्रायः लुप्त झाल्यासारखें आहे; तथापि याचा बौद्ध व जैन या मतांशीं निकट संबंध असल्यामुळें व तो निरीश्वरवादाचा प्रवर्तक असल्यामुळें व पक्का नास्तिक असल्यामुळें, त्याच्या मतांला प्रतिबंध करणें आवश्यक आहे; जर असत्य गोष्टींला प्रतिबंध केला नाहीं तर त्यांचा जगांत प्रसार होऊन त्या मोठ्या अनर्थाला कारणीभूत होत असतात. म्हणूनच चार्वाक व तसेंच बौद्ध व जैन यांच्या मतांचें परीक्षण या समुल्लासामध्यें केलें आहे. चार्वाकाशीं या इतर बौद्ध व जैन मतांचा कांहीं बाबतींत विरोध आहे व कांहींमध्यें मेळ आहे व जैनहि बहुत अंशांमध्यें चार्वाक व बौद्ध यांच्यांशीं ऐकमत्य ठेवतात, पण कांहीं गोष्टींत त्यांचा परस्पर भेद आहे; म्हणून जैन ही मिश्रशाखा आहे असें मानलें आहे. हे यांचे सर्व भेद बाराव्या समुल्लासामध्यें दाखविले आहेत. त्यांच्यांतील सर्व भेद व साम्य त्याच समुल्लासामध्यें पहावें व जैनमताविषयींहि तेथेंच पहावें. बौद्धांच्या दीपवंशादि प्राचीन ग्रंथांतील, बौद्धमतसंग्रह, सर्वदर्शनसंग्रह या ग्रंथांतील जीं मतें आहेत त्यांतूनच परीक्षणार्थ या पुस्तकांत उतारे घेतले आहेत. व जैनाच्या ज्या पुस्तकांतून उतारे घेतले आहेत त्यांपैकीं चार मुख्य आहेत. (१) आवश्यकसूत्र, (२) विशेष आवश्यकसूत्र, (३) दशवैकालिकसूत्र, (४) पाक्षिकसूत्र. हे मूल **चार सूत्र ग्रन्थ** होत. यांचीं **अकरा अङ्गें** आहेत. (१) आचाराङ्गसूत्र, (२) सुयंडाङ्गसूत्र, (३) थाणाङ्गसूत्र, (४) समवायाङ्गसूत्र, (५) भगवतीसूत्र, (६) ज्ञाताधर्मकथासूत्र, (७) उपासकदशासूत्र, (८) अंतगडदशासूत्र, (९) अनुत्तरोववाईसूत्र, (१०) निपाकसूत्र व (११) प्रश्नव्याकरणसूत्र. **बारा उपाङ्गें** आहेत तीं हीं; (१) उपवाईसूत्र, (२) रावप्सेनीसूत्र, (३) जीवाभिगमसूत्र, (४) पन्नगणासूत्र, (५) जम्बुद्वीपपन्नतिसूत्र, (६) चन्दपन्नतिसूत्र, (७) सूरपन्नतिसूत्र, (८) निरयावलीसूत्र, (९) कप्पियासूत्र, (१०) कपवडीसयासूत्र

(११) पूप्पियासूत्र, व (१२) पप्यचूलियासूत्र. **कल्पसूत्रें** पांच आहेतः— (१) उत्तराध्ययनसूत्र, (२) निशीथसूत्र, (३) कल्पसूत्र, (४) व्यवहारसूत्र, (५) जीतकल्पसूत्र. **छेद** सहा आहेतः— (१) महानिशीथबृहद्वाचनासूत्र (२) महानिशीथलघुवाचनासूत्र, (३) मध्यमवाचनासूत्र. (४) पिंड-निरुक्तिसूत्र, (५) औघनिरुक्तिसूत्र, (६) पर्यूषणासूत्र. **पयन्नसूत्रें** दहा आहेतः— (१) चतुःस्मरणसूत्र, (२) पंचखाणसूत्र, (३) तदुलवै-यालिकसूत्र, (४) भक्तिपरिज्ञानसूत्र, (५) महाप्रत्याख्यानसूत्र, (६) चंदाविजयसूत्र, (७) गणीविजयसूत्र, (८) मरणसमाधिसूत्र, (९) देवेन्द्रस्तनसूत्र, (१०) संसारसूत्र. हे लोक या ग्रन्थांप्रमाणेंच नन्दीसूत्र व योगोद्धारसूत्र हेहि ग्रंथ प्रमाण मानतात. यांच्या ग्रन्थांचीं पंचअङ्गें (१) सर्व ग्रन्थांच्या टीका, (२) निरुक्ति, (३) चरणी, (४) भाष्य व (५) मूलग्रन्थ हीं होत. यांमधील ढूंढिया अवयवांला (अङ्गांला) मानीत नाहींत. यांशिवायहि असे आणखी पुष्कळग्रन्थ आहेत कीं, ज्याला जैन लोक प्रमाण समजतात. या यांच्या मतावर विशेष विचार बाराव्या समुल्लासांत केलेला आहे. जैनांच्या ग्रन्थांमध्यें पुनरुक्तीचे दोष लाखों आहेत व या लोकांचा असा एक विलक्षण स्वभाव आहे कीं यांचाच ग्रन्थ जर अन्यमतावलम्बी पुरुषाजवळ असला किंवा तोच छापलेला असला तर यांच्यांतील कांहीं कांहीं लोक त्याला अप्रमाण मानतात हा त्यांचा समज खोटा आहे कारण कोणी मानतात व कोणी नाहीं. एवढ्यानेंच तो ग्रन्थ जैन मताचा नाहीं असें होत नाहीं. हां. ज्या ग्रन्थाला कधींहि कोणी जैनी माणसानें प्रमाण मानलें नाहीं त्याला अग्राह्य मानतां येईल. पण असा कोणताहि ग्रन्थ नाहीं कीं, ज्याला कोणताहि जैन मानीत नाहीं म्हणून जो मनुष्य जो ग्रन्थ मानीत असेल त्या ग्रन्थांतील विषयाचें खंडन मंडन त्यामाणसासाठींच आहे असें समजावें. कित्येक पुरुष असे आहेत कीं ' ते कांहीं ग्रन्थाला प्रमाण समजतात पण सभेमध्यें किंवा वादविवादाच्या वेळीं भिन्न मत देतात! हें ठीक नाहीं. जैनी लोक आपल्या ग्रन्थांला अगदीं गुप्त ठेवतात कोणा दुसऱ्या मतस्थ माणसाला दाखवीतहि नाहींत!! देत नाहींत, ऐकवीत नाहींत व शिकवीतहि नाहींत! याचें कारण इतकेंच कीं, त्यांमध्यें अशा असंभवनीय गोष्टी भरलेल्या आहेत कीं, त्यांचें उत्तर कोणीहि जैन देऊं शकत नाहीं. असल्य गोष्टींला सोडणें हेंच उत्तर आहे.

तेराव्या समुल्लासामध्यें ख्रिस्तीयन लोकांचें मत लिहिलें आहे. हे लोक बायबलाला आपलें धर्मपुस्तक मानतात. याचें विशेष परीक्षण तेराव्या समुल्लासामध्यें पहा. १४ व्या समुल्लासामध्यें मुसलमानांच्या मताचें परीक्षण केलें आहे. हे लोक कुराणाला आपलें धर्मपुस्तक समजतात. यांचें विशेष निरीक्षण चवदाव्या समुल्लासामध्यें पहावें. या पुस्तकाच्या शेवटीं वैदिक मत दिलेलें आहे. याप्रमाणें या ग्रन्थाची

व्यवस्था आहे. जो कोणी मुद्दाम निरोध करण्यासाठींच या ग्रन्थाकडे पाहील त्याला या ग्रन्थापासून विशेष लाभ होणार नाहीं; कारण (१) **आकाङ्क्षा**, (२) **योग्यता**, (३) **आसत्ति** व (४) **तात्पर्य** या चार कारणांनी वाक्यार्थाचा बोध होत असतो. जेव्हां या चारहि गोष्टींवर ध्यान देऊन कोणी मनुष्य ग्रन्थावलोकन करतो तेव्हांच त्याला त्याचा यथायोग्य अभिप्राय. विदित होत असतो. पहा—(१) **आकाङ्क्षा**-कोणत्या विषयावर वक्त्याची व वाक्यांतील पदांची परस्पर काय आकाङ्क्षा आहे तें पाहणें, (२) **योग्यता**-ज्याच्यापासून जें होऊं शकतें ती योग्यता. जसें पाण्यापासून सिंचन होऊं शकतें (तसें ज्ञान्यापासून उत्तम ग्रन्थ बनूं शकतात. (३) **आसत्ति**-ज्या शब्दाशीं ज्या पदाचा संबंध असेल त्याच्याशींच तें पद लिहिणें किंवा बोलणें. (४) **तात्पर्य**—ज्या कारणासाठीं वक्त्यानें शब्दोच्चारण किंवा लेखन केलें असेल त्याच्याशींच त्याच्या शब्दांचा व लेखाचा संबन्ध जोडणें.

पुष्कळ हट्टी व दुराग्रही लोक असे असतात कीं ते वक्त्याच्या अभिप्रायाच्या विरुद्धच कल्पना करीत असतात. विशेषतः मताभिमानी लोक हट्टी असतात, कारण स्वमताच्या अभिमानानें त्यांची बुद्धि अंधकारांत नष्ट झालेली असते. यासाठीं ज्याप्रमाणें मी पुराणें, जैनांचे ग्रन्थ, बायबल, पुराण वगैरे ग्रन्थाला प्रथमतःच वाईट दृष्टीनें पाहून त्यांचा अव्हेर केला नाहीं, तर त्यांतील गुणांचें ग्रहण करून दोषांचा त्याग केला व सर्व मनुष्य जातीच्या उद्धारासाठीं मी प्रयत्न करीत आहें, त्याचप्रमाणें सर्वांनी करावा हें उत्तम.

या मतांतील थोडथोड्या दोषांचाच प्रकाश येथें केलेला आहे. त्यावरून सत्यासत्याचा निर्णय करून असत्याचा त्याग व सत्याचें ग्रहण करण्यास सूज्ञांनी योग्य व्हावें. मनुष्यांला भ्रमांत पाडून, त्यांची बुद्धि भ्रष्ट करून, एकमेकांत शत्रुत्व उत्पन्न करून, मनुष्यांत दुही उत्पन्न करणें हें विद्वानांचें काम नव्हे. जरी हा ग्रंथ पाहून अविद्वानांच्या मनांत अन्यथा विचार येतील, तथापि बुद्धिमान् लोक याचा यथायोग्य अभिप्राय जाणतील, एवढ्यानें मी माझे परिश्रम सफल झाले असें समजून हे प्रयत्न सर्व सज्जनांच्या पुढें ठेवीत आहें. यांना पाहून व लोकांला दाखवून माझ्या श्रमांचें सार्थक्य करावें. याचप्रमाणें पक्षपात सोडून सत्य अर्थाचा प्रकाश करणें हें जसें माझें तसेंच तें इतर महाशयांचेंहि मुख्य कर्तव्य आहे. सर्वात्मा सर्वांतर्यामी सच्चिदानंद परमात्मा आपल्या कृपादृष्टीनें या आशयाला विस्तृत व चिरस्थायी करो.

॥ अल्मतिविस्तरेण बुद्धिमद्वरशिरोमणिषु ॥

॥ इति भूमिका ॥

स्थान, महाराणाजींचें उदयपूर. भाद्रपद शुक्लपक्ष संवत् १९३६

(स्वामी) दयानन्द सरस्वती.

ओ३म्.

सच्चिदानन्देश्वराय नमो नमः।

ईश्वरनामव्याख्या.

ओ३म् । शन्नो मित्रः शंवरुणः शन्नो भवत्वर्यमा ॥ शन्न इन्द्रो बृहस्पतिः शन्नो विष्णुरुरुक्रमः ॥ नमो ब्रह्मणे नमस्ते वायो त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्मासि ॥ त्वामेव प्रत्यक्षं ब्रह्म वदिष्यामि ॥ ऋतं वदिष्यामि ॥ सत्यं वदिष्यामि ॥ तन्मामवतु तद्वक्तारमवतु ॥ अवतु मामवतु वक्तारम् ॥ ओ३म् शान्तिः शान्तिः शान्तिः ॥ १ ॥ तैत्तिरी०प्र०अ०१ ॥

(ओ३म्) हा ओम् शब्द परमेश्वराचा वाचक आहे. परमेश्वराच्या इतर नांवांपेक्षां हें नांव सर्वांत उत्तम आहे कारण, ओं कारांतील " अ-उ-म् " या तीन अक्षरांपासूनच परमेश्वराच्या इतर पुष्कळ नांवांचा बोध होतो. अकारापासून **विराट्, अग्नि, विश्व** यांचा, उकारापासून **हिरण्यगर्भ, वायु, तैजस** यांचा व मकारापासून **ईश्वर, आदित्य** व **प्राज्ञ** यांचा बोध होतो. प्रकरणानुसार हीं सर्व नांवें परमेश्वराचींच आहेत असें वेदादि सत्यशास्त्रांमध्यें प्रतिपादन केलेलें आहे. (**पूर्वपक्ष्याचा प्रश्न**) हीं वरील नांवें परमेश्वराशिवाय इतर पदार्थांचीं वाचक आहेत कीं नाहींत? ब्रह्मांड, पृथिवीवगैरे भूतें, इंद्रादिक देवता व वैद्यशास्त्रांत सुंठवगैरे पदार्थ यांनांहि हे शब्दच वापरण्यांत येतात कीं नाहीं? (**सिद्धांत्याचें उत्तर**) होय, पण ते आणखीं परमेश्वराचेहि वाचक आहेत. (**प्र.**) केवळ देवांचेंच ग्रहण या नांवांनीं कां करूं नये? (**उ.**) तुम्ही म्हणतां तसें ग्रहण करण्यास काय प्रमाण आहे? (**प्र.**) देव प्रसिद्ध आहेत

व ते उत्तमहि आहेत म्हणून आह्मी विराट् वगैरे शब्दांनीं त्यांचेंच ग्रहण करतों. असें करणें चूक आहे काय ? (उ०) परमेश्वरहि प्रसिद्ध आहे व सर्वोत्तमहि तोच आहे, मग हीं नांवें त्याचींच आहेत असें कां मानीत नाहीं ? परमेश्वर अप्रसिद्ध नाहीं व त्याहून दुसरा कोणी उत्तमहि नाहीं; अर्थात् तोच सर्वांहून श्रेष्ठ आहे म्हणून तुमचें म्हणणें बरोबर नाहीं. तुमचें म्हणणें स्वीकारल्यास पुष्कळ दोष उत्पन्न होतात. पहा– **"उपस्थितं परित्यज्यानुपस्थितं याचत इति बाधितन्यायः"** तयार असलेलें भोजन टाकून जो तयार नसलेल्याची इच्छा करतो किंवा तत्प्रीत्यर्थ श्रम करतो त्याला कोणीहि सूज्ञ असें म्हणणार नाहीं. त्याचप्रमाणें **विराटा**दिक नांवांच्या योगानें प्रसिद्ध व प्रमाणसिद्ध परमेश्वर व ब्रह्मांडादिक पदार्थ यांचें ग्रहण न करतां, अनुपस्थित व असंभव अशा अन्य कल्पित देवांचें ग्रहण करणें हेंहि वरच्या प्रमाणेंच जाणावें. **विराटा**दिक शब्दांनीं परमेश्वरव्यतिरिक्त अन्य देवांचें ग्रहण करण्याला कोणतेंहि प्रमाण किंवा युक्तिहि नाहीं. जर तुम्ही असें म्हणाल कीं, प्रकरणानुसार वरील शब्दांचे अर्थ केले पाहिजेत. तर तें आह्माला मान्य आहे. " हे भृत्य! त्वं सैंधवमानय " असें जर कोणी मनुष्यानें आपल्या नोकरास सांगितलें तर त्याचा अर्थ नोकरानें प्रकरणानुकूलच केला पाहिजे. कारण " हे नोकरा ! तूं सैंधव घेऊन ये " अशी जी धन्याची आज्ञा झाली आहे, ती कोणत्या वेळीं झाली आहे याचा त्यानें विचार केला पाहिजे. सैंधव शब्दाचे " मीठ व घोडा " असे दोन अर्थ आहेत, त्यांपैकीं कोणता घ्यावयाचा याचा विचार पूर्वापर संबंध पाहूनच झाला पाहिजे. धनी जेवीत असतां, सैंधव शब्दाचा मीठ असा अर्थ समजावयाचा व बाहेर हिंडावयाला जात असतां, घोडा असा त्याचा अर्थ घ्यावयाचा. इत्यादि प्रकाराप्रमाणें जर तो नोकर अर्थ समजला नाहीं, तर त्याला व्यवहार समजत नाहीं म्हणून त्याचा धनी त्याला नोकरीवर ठेवणार नाहीं. यांचें तात्पर्य इतकेंच कीं, जरी शब्दांचे अर्थ अनेक असले तरी त्यांचा अर्थ पूर्वापर संबंध पाहून जो योग्य असेल तोच घेतला पाहिजे. ही गोष्ट सर्वांनीं मान्य करण्यासारखी आहे. वरील मंत्राचा अर्थ करण्यास लागणारीं प्रमाणें:—

ओ३म् खं ब्रह्म ॥ १ ॥ यजु० ४०।१७ ॥ ओमित्येतदक्षरमुद्गीथमुपासीत ॥ २ ॥ छान्दोग्य० १ ॥ ओमित्येतदक्षरमिदꣳ सर्वं तस्योपव्याख्यानम् ॥३॥ माण्डूक्य ०१॥ सर्वे वेदा यत्पदमामनन्ति तपाꣳसि सर्वाणि च यद्वदन्ति । यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति तत्ते पदं संग्रहेण

ब्रवीम्योमित्येतत् ॥ ४ ॥ कठोपनि०।२।१९ ॥ प्रशासितारं सर्वेषामणीयांसमणोरपि ॥ रुक्माभं स्वप्नधीगम्यं विद्यात्तं पुरुषं परम् ॥ ५ ॥ एतमेके वदन्त्यग्निमनुमन्ये प्रजापतिम् ॥ इन्द्रमेके परे प्राणमपरे ब्रह्म शाश्वतम् ॥६ ॥ मनु अ० १२ श्लो० १२२।१२३ ॥ स ब्रह्मा स विष्णुः स रुद्रम् स शिवम्सोऽक्षरम् स परमम् स्वराट् ॥ स इन्द्रम् स कालाग्निम् स चन्द्रमाः ॥ ७ ॥ कैवल्योपनिषद् ॥

इन्द्रं मित्रं वरुणमग्निमाहुरथो दिव्यस्स सुपर्णो गुरुत्मान् ॥ एकं सद्विप्रा बहुधा वदन्त्यग्निं यमं मातरिश्वानमाहुः ॥ ८ ॥ ऋ० मं० १।२२।१६४।४६ ॥ भूरसि भूमिरस्यदितिरसि विश्वधाया विश्वस्य भुवनस्य धर्त्री ॥ पृथिवीं यच्छ पृथिवीं दृꣳह पृथिवीं मा हिꣳसीः ९ ॥ यजु० १३।१८ ॥

१ २ ३ १२ २२ ३ २ ३ २ ३ १२
इन्द्रो महना रोदसी पप्रथच्छव इन्द्रः सूर्यमरोचयत् ॥
१ २ ३ २ ३ १२ ३ १ २ ३ २ ३ १ २
इन्द्रेह विश्वा भुवनानि येमिरे इन्द्रेस्वानास इन्दवः ॥१०॥
सामवेद ७ प्र० ३ अ०८ सू० १६ अ०२ स०३ सू०मं०२॥

प्राणाय नमो यस्य सर्वमिदं वशे ॥ यो भूतः सर्वस्येश्वरो यस्मिन्सर्वं प्रतिष्ठितम् ॥ ११ ॥ अथर्व० ११।२।४।१॥

ओंकारादिक नामें परमेश्वराचीं वाचक आहेत हें दाखविण्यासाठीं हे वरील आधार दिलेले आहेत. परमेश्वराला जीं नांवें वेदांमध्यें दिलीं गेलीं आहेत, तीं सर्व अन्वर्थक आहेत. कोणा मनुष्याचें नांव धनपति असूनहि तो दरिद्री असतो, तसा प्रकार परमेश्वराच्या नांवांसंबंधानें नाहीं. परमेश्वराचीं सर्व नामें त्याचे गुण दाखवितात. कांहीं नामें त्याचे गुण दाखवितात, कांहीं त्याचीं कर्मे दाखवितात व कांहीं त्याचा स्वभाव दाखवितात, म्हणून त्याच्या नामांचे " गौणिक, कार्मिक व स्वाभाविक असे तीन भेद आहेत. पहा " **ओम्-खं-ब्रह्म** " हीं तीन नांवें परमेश्वराचे तीन गुण दाखवितात. " **अवति इति ओम्** " " रक्षण करणारा तो ओम् " जाणावा. " **आकाशमिव व्यापकत्वात् खम्** " " आकाशाप्रमाणें सर्वव्यापक तो आहे म्हणून त्याला खं असें नांव आहे. " " **सर्वेभ्यो बृहत्वात् ब्रह्म** " सर्वांहून तो थोर आहे म्हणून त्याला ब्रह्म असें म्हणतात. " याप्रमाणें हीं तीन नांवें परमेश्वराचीं वाचक आहेत. ॥ १ ॥ (ओम्) हें ज्याचें नांव आहे व जो (अक्षरम्) कधींहि नाश पावत नाहीं त्या परमेश्वराचीच सर्वांनीं (उपासीत) उपासना करणें योग्य आहे. ॥ २ ॥ (ओम् इत्येतत्) सर्व वेदादि सच्छास्त्रांमध्यें परमेश्वराचें प्रधान व निजनाम " ओम् " हेंच सांगितलेलें आहे, बाकीचीं सर्व नांवें गौणिक आहेत. ॥ ३ ॥ (सर्वे वेदा०) सर्व वेद ज्याचें वर्णन करीत आहेत, (तपांसि सर्वा०) धर्मानुष्ठानरूपी तप हें ज्याच्यासाठीं आहे व (यद् इच्छन्तो०) ज्याच्या प्राप्तीसाठीं ब्रह्मचर्याचें पालन करतात, त्या परमेश्वराचें नांव " ओम् " हें आहे. ॥ ४ ॥ (प्रशासि०) जो सर्वांनां शिक्षा देणारा व सूक्ष्माहून सूक्ष्म असल्यामुळें ज्याचें ज्ञान समाधींतील प्रज्ञेनेंच होतें त्यालाच परमपुरुष असें म्हणतात ॥५॥ स्वप्रकाश असल्यामुळें "अग्नि," विज्ञानस्वरूप असल्यामुळें "मनु," सर्वांचें पालन करणारा व परम ऐश्वर्यवान् असल्यामुळें "इन्द्र" सर्वांच्या जीवनाला आधारभूत असल्यामुळें " प्राण " व निरंतर सर्वव्यापक असल्यामुळें " ब्रह्म " अशीं नांवें त्या परमेश्वरालाच आहेत. ॥ ६ ॥ (स ब्रह्मा०) तो सर्व जग उत्पन्न करतो म्हणून त्याला " ब्रह्मा," सर्वत्र व्यापून राहतो म्हणून " विष्णु " दुष्टांनां दण्ड करून रडावयास लावतो म्हणून "रुद्र," तो मंगलमय व कल्याणकर्ता आहे म्हणून " शिव," असें त्यालाच म्हणतात. (**यः सर्वम् अश्नुते न क्षरति न विनश्यति तदक्षरम्**) परमेश्वर सर्वत्र व्यापक आहे व तो अविनाशी आहे म्हणून त्याला " अक्षर " असें म्हणतात. (**यः स्वयं राजते स स्वराट्**) तो स्वतः प्रकाशस्वरूप आहे म्हणून त्याला " स्वराट् " असें म्हणतात. (**योऽग्निरिव कालः कलयिता प्रल-**

---

(१) अगि-ज्ञानगतिप्राप्तिषु । (२) मन-विज्ञाने । (३) इदि-परमैश्वर्ये । या धातूंवरून हे शब्द झालेले आहेत.

यकर्ता स कालाग्निरीश्वरः) तो प्रलय कालीं सर्वांचा प्रलय करतो, कालाचाहि काल तो आहे म्हणून त्याला "कालाग्नि" असें म्हणतात. ॥ ७ ॥ (इन्द्रं मित्रं०) जें अद्वितीय सत्य ब्रह्म आहे त्याला इंद्रादिक सर्व नांवें दिलेलीं आहेत. (द्युषु शुद्धेषु पदार्थेषु भवो दिव्यः) प्रकृत्यादि दिव्य पदार्थांत व्याप्त आहे म्हणून "दिव्यः", (शोभनानि पर्णानि पालनानि पूर्णानि कर्माणि वा यस्य सः) उत्तम प्रकारें पालन करतो व उत्तम कर्में करतो म्हणून "सुपर्णः," (यः गुर्वात्मा स गरुत्मान्) तो स्वरूपतः महान् आहे म्हणून त्याला "गरुत्मान्" व (मातरिश्वा वायुरिव बलवान्) वायूप्रमाणें अत्यंत बलिष्ठ असल्यामुळें त्याला "मातरिश्वा" असें म्हणतात. हीं नांवें परमेश्वराचे पृथक् पृथक् गुण दाखविणारीं आहेत. (इतर नामांचा अर्थ पुढें दिला जाईल.) ॥ ८ ॥ (भूमिरसि०) (भवन्ति भूतानि यस्यां सा भूमिः) परमेश्वरामध्यें सर्व भूतें-प्राणिमात्र-उत्पन्न होतात म्हणून त्याला "भूमि" असें म्हणतात. (या मंत्रांतील शेष नामांचा अर्थ पुढें केला जाईल. ॥ ९ ॥ (इन्द्रो महना) या मंत्रांत "इन्द्र" हा परमेश्वराचा वाचक शब्द आहे. ॥१०॥ (प्राणाय०) ज्याप्रमाणें शरीर प्राणाच्या स्वाधीन असतें त्याचप्रमाणें परमेश्वराच्या आधिन हें विश्व आहे. म्हणून त्याला प्राण असें म्हणतात. ॥ ११ ॥ इत्यादि प्रमाणांवरून अग्नि इत्यादि शब्द परमेश्वराचे वाचक आहेत असें स्पष्ट दिसेल. व्याकरण, निरुक्त, ब्राह्मण, सूत्रग्रंथ इत्यादि ऋषिमुनिप्रणीत ग्रंथांमध्यें "ओम्, अग्नि" आदिक शब्द परमेश्वराचे वाचक लिहिलेले आहेत म्हणून त्यांचा तसाच अर्थ घेणें सर्वांनां योग्य आहे. "ओम्" हें नांव केवळ परमात्म्याचेंच आहे व "अग्नि, विराट्" वगैरे नांवें प्रकरणानुसार परमेश्वराचीं वाचक होतात एवढाच कायतो भेद आहे. म्हणून ज्या ठिकाणीं "सर्वज्ञ, व्यापक, शुद्ध, सनातन, सृष्टिकर्ता" इत्यादि विशेषणें लाविलीं असतील व त्याची स्तुति, प्रार्थना व उपासना करावी म्हणून सांगितलें असेल त्याठिकाणीं अग्न्यादिक शब्दांनीं परमेश्वर असा अर्थ समजावा व ज्या ठिकाणीं--

ततो विराडजायत विराजो अधिपूरुषः ॥३॥
श्रोत्राद्वायुश्च प्राणश्च मुखादग्निरजायत ॥२॥
तेन देवा अयजन्त ॥ ३ ॥
पश्चाद्भूमिमथो पुरः ॥४॥ यजु. अ० ३१ ॥

तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः संभूतः ॥ आकाशाद्वायुः ॥ वायोरग्निः ॥ अग्नेरापः ॥ अद्भ्यःपृथिवी ॥ पृथिव्या ओषधयः ॥ओषधिभ्योऽन्नम् ॥ अन्नाद्रेतः ॥ रेतसः पुरुषः ॥ सवा एष पुरुषोऽन्नरसमयः ॥ ५ ॥

तैत्तिरी० उप० ब्रह्मा० व० अ० १

या प्रकारच्या वचनांमध्यें " विराट्, पुरुष, देव, आकाश, वायु, अग्नि, जल, भूमि, " वगैरे नांवें लौकिक पदार्थांचीं आहेत असें समजावें. ज्या ठिकाणीं " उत्पत्ति, स्थिति, प्रळय, जडत्व, अल्पज्ञता, दृश्य " वगैरे प्रकारचे शब्द योजले असतील तेथें ईश्वराचें ग्रहण होत नाहीं कारण, उत्पत्तिवगैरे शब्द परमेश्वराला–तो अजन्म असल्यानें–लागूं शकत नाहींत; म्हणून अशा तऱ्हेचें वर्णन जेथें असेल तेथें तेथें " विराट् " वगैरे शब्दांनीं लौकिक विश्वांतील पदार्थांचें ग्रहण केलें पाहिजे. तसेंच ज्या ठिकाणीं सर्वज्ञत्वादि विशेषणें लाविलीं असतील तेथें परमेश्वराचें ग्रहण करावें व जेथें इच्छा, द्वेष, प्रयत्न, सुख, दुःख, इत्यादि गुण व अल्पज्ञत्व यांचें वर्णन असेल तेथें जीवाचें ग्रहण करावें. परमेश्वर **अज** असल्यामुळें त्याला जन्मादिक विशेषणें लागूं शकत नाहींत, म्हणून जन्ममरणाचा संबंध असेल तेथें जीव किंवा सृष्टींतील इतर पदार्थ यांचा बोध व्यावा. ही व्यवस्था सर्वांनीं ध्यानांत ठेविली पाहिजे. आतां "**विराट्**" वगैरे नांवांनीं परमेश्वराचें ग्रहण कसें होतें तें पुढें दिलें आहे. ओंकाराचे " विराट् " वगैरे अर्थ पूर्वी दिले आहेत, त्यांचा अर्थ पुढें दिल्याप्रमाणें आहे. (राजृदीप्तौ) या धातूला " वि " हा उपसर्ग लाऊन त्याहून (क्विप्) हा प्रत्यय केला असतां "विराट्" हा शब्द सिद्ध होतो.(**यो विविधं चराचरं जगद्राजयति प्रकाशयति स विराट्** ।) परमेश्वर अनंत प्रकारच्या जगताला प्रकाशित करतो म्हणून त्याला " विराट् " असें म्हणतात. (अञ्चु–गतिपूजनयोः । अग, आगि, इण गत्यर्थाः) या धातूंवरून " अग्नि " शब्द सिद्ध होतो. गत्यर्थक धातूंचे " ज्ञान, गमन व प्राप्ति " असे तीन अर्थ प्रसिद्ध आहेत. म्हणून (**यो अञ्चति अच्यते अगति अङ्गति एति सोऽग्निः**) जो ज्ञानस्वरूप व सर्वज्ञ आहे व जो जाणण्यास व पूजा–सत्कार करण्यास योग्य आहे, अशा परमेश्वराला " अग्नि " असें म्हणतात. (विश–प्रवेशने) या धातूंवरून " विश्व" हा शब्द सिद्ध होतो. (**विशन्ति प्रविष्टानि सर्वाण्याकाशादीनि भूतानि यस्मिन् योवा आकाशादिषु सर्वेषु भूतेषु प्रविष्टः**

स विश्वः ईश्वरः) ईश्वरामध्यें आकाशादिक सर्व भूतें आहेत व तो आकाशादि-भूतांत भरलेला आहे म्हणून त्याला " विश्व " असें म्हणतात. हे अर्थ ओंकारांतिल 'अ'काराचे झाले. आतां 'उ'काराचे अर्थ करावयाचे. " **ज्योतिर्वै हिरण्यं तेजो वै हिरण्यमिति ऐतरेये शतपथे च ब्राह्मणे ।" (यो हिरण्यानां सूर्यादीनां तेजसां गर्भ उत्पत्तिनिमित्तमधिकरणं स हिरण्यगर्भः**) ज्याच्यामध्यें सूर्यादिक तेजोगोल उत्पन्न होऊन राहतात व जो सूर्यादि तेजोगोलांचें उत्पत्ति व निवास-स्थान आहे, त्या परमेश्वराला " हिरण्यगर्भ " असें म्हणतात. पहा–

हिरण्यगर्भः समवर्त्तताग्रे भूतस्य जातः पतिरेक आसीत् ॥ स दाधार पृथिवीं द्यामुतेमां कस्मै देवाय हविषा विधेम॥

यजु० १३ । ४ ॥

अशा स्थळीं " हिरण्यगर्भ " शब्द परमेश्वराचा वाचक आहे. असो. (वा–गतिगन्धनयोः) या धातूवरून " वायु " शब्द सिद्ध झाला आहे. (गन्धनं हिंसनम् । **यो वाति चराचरं जगद्धरति बलिनां बलिष्ठः स वायुः**) तो चराचर जगताचें धारण, पोषण व प्रलय करतो व तो बलवानांहूनहि बलिष्ठ आहे म्हणून परमेश्वराला " वायु " हें नांव आहे. (तिज–निशाने) या धातूवरून " तेजः " हा शब्द झाला आहे व त्यावरून तद्धित प्रत्यय करून " तैजस " हा शब्द सिद्ध होतो. तो स्वतः स्वयंप्रकाश आहे व तो सूर्यादि लोकांनां प्रकाशित करतो म्हणून त्या परमेश्वराला " तैजस " हें नांव आहे. इत्यादि अर्थ 'उ'कारानें दाखविले जातात. (ईश–ऐश्वर्ये) या धातूवरून " ईश्वर " शब्द बनला आहे. (**यः ईष्टे सर्वैश्वर्यवान् वर्तते स ईश्वरः**) ज्याचें ज्ञान सत्य आहे व जो अनंत ऐश्वर्यानें युक्त आहे, त्या परमात्म्याला " ईश्वर " असें म्हणतात. (दो–अवखण्डने) या धातू-वरून " अदिति " शब्द साधला जातो व यावरून तद्धित प्रत्यय केला असतां, " आदित्य " शब्द सिद्ध होतो. (**न विद्यते विनाशः यस्य सोऽयमदितिः । अदितिरेव आदित्यः**) ज्याचा कधींहि नाश होत नाहीं, त्या परमेश्वराला " आदित्य " असें म्हणतात. (ज्ञाअवबोधने) प्र उपसर्गपूर्वक ज्ञा धातूवरून " प्रज्ञ " हा शब्द होतो व त्यावरून तद्धित प्रत्यय केला असतां " प्राज्ञ " हा शब्द साधतो. (**यः प्रकृष्टतया चराचरस्य जगतो व्यवहारं जानाति स प्रज्ञः । प्रज्ञ**

एव प्राज्ञः) ईश्वर सर्वज्ञतापूर्वक निर्भ्रीतवृत्तीनें सर्व चराचराच्या व्यवहाराला जाणतो म्हणून त्याला " प्राज्ञ " असें म्हणतात. हे अर्थ 'म'काराचे आहेत. याप्रमाणें हे ओंकारापासून होणारे अर्थ आहेत. ज्याप्रमाणें प्रत्येकीं ओंकाराच्या एकएक मात्रेचे या ठिकाणीं तीन तीन अर्थ दाखविले, त्याच प्रमाणें अन्य नामेंहि ओंकारापासूनच झालेलीं आहेत. (शन्नो मित्रः शं व०) या मंत्रांत आलेलीं मित्रादिक नामेंहि परमेश्वराचींच वाचक आहेत. या मंत्रांत स्तुति-प्रार्थना-उपासना सांगितली आहे. म्हणून परमेश्वर हाच अर्थ या ठिकाणीं इष्ट आहे. स्तुति, प्रार्थना ही श्रेष्ठाची करावयाची असते. जो गुण, कर्म, स्वभाव व सत्य व्यवहार यांत अधिक असेल तोच श्रेष्ठ होय. या गुणांनीं युक्त असणाऱ्या सर्व श्रेष्ठांमध्येंहि जो श्रेष्ठ आहे त्याला परमेश्वर असें म्हणतात. परमेश्वराशीं समान कोणी झाला नाहीं, सध्यां नाहीं व पुढेंहि कोणी होऊं शकत नाहीं. ज्याअर्थी त्याच्याशीं तुल्य कोणीहि नाहीं त्याअर्थी त्याहून श्रेष्ठ कोण असूं शकणार? परमेश्वरामध्यें जसे सत्य, न्याय, दया, सर्वशक्तिमत्व, सर्वज्ञत्व वगैरे गुण आहेत तसे दुसऱ्या कोणत्याहि जड पदार्थांमध्यें किंवा जीवांमध्यें नाहींत. जो पदार्थ सत्य व नित्य असतो त्यांतील गुणहि सत्य व नित्य असतात; म्हणून परमेश्वरांतील गुण सत्य व नित्य आहेत. याकरितां सर्व मनुष्यांनीं त्या परमेश्वराचीच उपासना करावी. पूर्वीच्या विद्वान् मुनींनीं, साधारण माणसांनीं व दैत्यदानवादिक माणसांनीं-अर्थात् सर्वांनीं-ब्रह्मा, विष्णु, महादेव या नांवांनीं त्या एका जगन्नियन्त्याचीच उपासना केली होती व दुसऱ्या कोणाचीहि केली नव्हती म्हणून त्यांच्या प्रमाणें सर्वांनीं करणें योग्य आहे. याचा विशेष विचार पुढें " मुक्ति व उपासना " या प्रकरणांत केला जाईल.

(प्रश्न) मित्रादिक शब्दांच्या योगानें, स्नेही किंवा इंद्रसूर्यादिक देवता यांचें ग्रहण केलें जातें, तसें येथें कां करूं नये? (उत्तर) याठिकाणीं त्यांचें ग्रहण करतां नये कारण, जो मनुष्य एकाचा मित्र असतो तोच दुसऱ्याचा शत्रु व तिसऱ्याशीं उदासीन असतो. म्हणून मनुष्यांमध्यें पूर्ण मित्रत्व संभवत नाहीं. मित्रशब्दांतील पूर्ण अर्थ परमेश्वरामध्येंच लागतो. परमेश्वर सर्वांचा मित्र आहे. तो कोणाचा शत्रु नाहीं व कोणाशीं उदासीनहि नाहीं. गौण अर्थानें मित्रवगैरे शब्द मनुष्यांनां लागूं शकतात पण पूर्णार्थी ते परमेश्वराचेच वाचक आहेत. (त्रिमिदा स्नेहने) या धातूला औणादिक (क्त्र) प्रत्यय लावला असतां " मित्र " शब्द सिद्ध होतो (**मेद्यति स्निह्यति स्निह्यते वा तत् मित्रम्**) ईश्वर सर्वांहून जास्त स्नेह करणारा व सर्वांनीं प्रीति करण्यास योग्य आहे म्हणून त्याला " मित्र " असें म्हणतात. (वृञ्-वरणें, वर-ईप्सायाम्) या धातूनां औणादिक " उनन् " प्रत्यय लावला असतां, " वरुण " हा शब्द सिद्ध होतो.

(**यः सर्वान् शिष्टान् मुमुक्षून् धर्मात्मनो वृणोति अथवा यः शिष्टैः मुमुक्षुभिर्धर्मात्मभिर्व्रियते वर्ध्यते वा स वरुणः परमेश्वरः**) परमेश्वर शिष्ट, मुमुक्षु व धर्मात्मे यांनां आपला आधार देतो किंवा सर्व शिष्ट, मुमुक्षु व धर्मात्मे हे त्यालाच वरतात–श्रेष्ठ मानतात म्हणून त्यालाच " वरुण " असें म्हणतात. (**वरुणो नाम वरः श्रेष्ठः**) श्रेष्ठत्व दाखविणारा वरुण हा शब्द आहे. परमेश्वर सर्वात श्रेष्ठ आहे म्हणून त्याला " वरुण " असें म्हणतात. (ऋ–गतिप्रापणयोः) या धातूला " यत् " प्रत्यय लाऊन " अर्य्य " हा शब्द साधला जातो " अर्य्य " शब्दापुढें (माङ्–माने) या धातूवरून (कनिन्) प्रत्यय केला म्हणजे " अर्य्यमा " हा शब्द सिद्ध होतो. (**यो आर्यान् स्वामिनो न्यायाधीशान् मिमीते मान्यान् करोति सोऽर्यमा**) ज्याला सत्याप्रिय व न्यायकारी मनुष्य आवडतात व जो दुराचारी माणसांनां यथायोग्य शासन करतो, अशा सत्यनियमकर्त्या परमेश्वराला " अर्य्यमा " असें म्हणतात. (**इदि-परमैश्वर्ये**) या धातूवरून " रन् " प्रत्यय केला असतां, " इन्द्र " शब्द सिद्ध होतो. (**यः इन्दति परमैश्वर्यवान् भवति स इन्द्रः**) परमात्मा अखील ऐश्वर्यानें युक्त आहे म्हणून त्याला " इन्द्र " असें म्हणतात. " बृहत् " शब्दपूर्वक (पा–रक्षणे) या धातूवरून (डति) प्रत्यय करून व बृहत् शब्दांतील 'त'काराचा लोप व सुडागम झाल्यानें " बृहस्पति " शब्द होतो. (**यो बृहतामाकाशादीनां पतिः स्वामी पालयिता स बृहस्पतिः**) जो महान् ब्रह्मांडाचा व आकाशादिक भूतांचा स्वामी व रक्षक आहे त्या परमात्म्याला–" बृहस्पति " असें म्हणतात.

(विष्लृ-व्याप्तौ) या धातूला (नु) हा प्रत्यय लावला असतां "विष्णु" हा शब्द होतो. (**वेवेष्टि व्याप्नोति चराचरं जगत् स विष्णुः**) चराचर जगतामध्यें व्यापक असल्यामुळें परमेश्वराला " विष्णु " असें म्हणतात. (**उरुः महान् क्रमः पराक्रमः यस्य स उरुक्रमः परमेश्वरः**) अनंत आश्चर्यकारक महान् कृत्यें करणारा असल्यामुळें परमेश्वराला " उरुक्रम " असें नांव पडलें आहे. हे अर्थ लक्ष्यांत घेतले असतां " शंनो मित्रः " या पहिल्या मंत्राचा अर्थ पुढें दिल्याप्रमाणें होतोः– " परमेश्वर (उरुक्रमः) महा पराक्रमयुक्त (मित्रः) सर्वांचा सखा आहे, तो (शम्) सुख देणारा होवो. तो (वरुणः) सर्वोत्तम, (शम्) सुखस्वरूप, (अर्य्यमा) न्यायाधीश, (शम्) सुखप्रचारक, (इन्द्रः) सकल ऐश्वर्यवान्, (शम्) मंगल व ऐश्वर्य यांनां देणारा, (बृहस्पतिः) सर्वांचा अधिष्ठाता, (शम्) विद्याप्रद, (विष्णुः) सर्वांत व्यापून असणारा असा आहे; तो (नः) आह्मांला (शम्) सुखदायक (भवतु) होवो.

(वायो ते ब्रह्मणे नमोस्तु) जो सर्वात श्रेष्ठ, सर्वांहून थोर व अनन्त बलयुक्त परमात्मा आहे त्याला आमचा नमस्कार असो. (बृह् बृहि–वृद्धौ) या धातूंवरून " ब्रह्म " शब्द सिद्ध झाला आहे. परमात्मा सर्वांहून थोर असल्यामुळें त्याला " ब्रह्म " असें म्हणतात. " हे परमेश्वरा ! (त्वम्ऐव) तूंच खरोखर (प्रत्यक्षम्) प्रत्यक्ष (ब्रह्म असि) ब्रह्म आहेस. (त्वाम् एव) तुलाच मी प्रत्यक्ष (ब्रह्म वदिष्यामि) ब्रह्म मानतों व तसेंच तूं ब्रह्म आहेस असें बोलेन कारण, तूंच सर्व जगतामध्यें व्याप्त आहेस व सर्वांनां त्यामुळें प्राप्त झालेला आहेस. (ऋतं वदिष्यामि) जी तुझी वेदांमध्यें यथार्थ आज्ञा आहे, तिचा मी सर्वांनां उपदेश करीन व त्याप्रमाणें मी वागेन. (सत्यं वदिष्यामि) मी खरें बोलेन, सत्य मानीन व सत्य असेल तेंच करीन. (तत् माम् अवतु) म्हणून माझें रक्षण कर. (तत् वक्तारम् अवतु) सत्यनिष्ठ व सत्यवक्ता यांचें रक्षण कर. ज्याच्या योगानें माझी बुद्धि तुझ्या वेदाज्ञेमध्यें स्थिर होईल व त्याच्या विरुद्ध कधींहि न जाईल असें कर कारण, तुझी आज्ञा आहे कीं, वेदप्रणीत हाच खरा धर्म व तद्विरुद्ध सर्व अधर्म आहे. (**अवतु माम् अवतु वक्तारम्**) हे ईश्वरा! त्या अधर्मापासून मी दूर होऊन धर्मामध्येंच सदैव मी स्थिर राहीन अशा प्रकारें माझें तूं रक्षण कर. [या ठिकाणीं " अवतु० " या वाक्याची द्विरुक्ति केली आहे, ती दृढीकरणासाठीं होय. " त्वं ग्रामं गच्छ गच्छ " या वाक्यांत " गच्छ " क्रियापदाची द्विरुक्ति गमनक्रिया सत्वर करण्याविषयींचा बोध करते. त्याचप्रमाणें " अवतु० " या वाक्याची द्विरुक्ति शीघ्रता व आवश्यकता यांचा बोध करीत आहे असें समजावें.] (ओम् शान्तिः शान्तिः शान्तिः) याठिकाणीं "शान्ति" शब्दाचा त्रिवार उच्चार करण्याचें कारण, तीन प्रकारच्या दुःखांचें निवारण व्हावें हें आहे. आध्यात्मिक, आधिभौतिक आधिदैविक असें तीन प्रकारचें दुःख आहे. जें अविद्या, द्वेष, प्रीति, मूर्खता, ज्वरादि, पीडा यांच्यापासून दुःख होतें तें आध्यात्मिक दुःख होय; जें शत्रु, व्याघ्र, सर्प, इत्यादिकांपासून होतें तें आधिभौतिक दुःख व जें अतिवृष्टि, अनावृष्टि, अतिशीत, अतिउष्ण, मानसीक व इंद्रियसंबंधीं अशांति यांपासून होतें तें अधिदैविक होय. " या तीन प्रकारच्या दुःखांपासून आह्मांला दूर करून कल्याणकारककर्मामध्यें आमची सदैव योजना कर कारण, हे ईश्वरा! तूं कल्याणस्वरूप आहेस मुमुक्षूंनां आनंद देणारा तूंच आहेस. म्हणून तूं सर्वांच्या अंतःकरणांत प्रकाशित होऊन, सर्व लोक अधर्माला टांकून धर्माप्रमाणें आचरण करितील व त्यायोगें आनंदाचे भागी होतील असें कर "

सूर्य्य आत्मा जगतस्तस्थुषश्च ॥ यजु०

" परमेश्वर स्थावर जंगमात्मक सर्व सृष्टीचा आत्मा आहे. तो स्वतः प्रकाशस्वरूप असल्यामुळें व तो सर्वांनां प्रकाश देत असल्यामुळें त्याला " सूर्य " असें म्हणतात.

(अत–सातत्यगमने) या धातूवरून " आत्मा " शब्द सिद्ध होतो. **(योऽतति व्याप्नोति स आत्मा)** जो सर्व जीवादिक जगतामध्यें व्याप-लेला आहे त्याला " आत्मा " असें म्हणतात. **(परमश्चासौ आत्मा च य आत्मभ्यो जीवेभ्यः सूक्ष्मेभ्यः परमोऽतिसूक्ष्मः स परमात्मा)** जो जीवादिकांपेक्षां उत्कृष्ट व जीव, प्रकृति व आकाश यांहून अतिसूक्ष्म व सर्वांतर्यामि आहे, त्या ईश्वराला " परमात्मा " असें म्हणतात. " ईश्वर " म्हणजे सामर्थ्यवान् व **(य ईश्वरेषु समर्थेषु परमः श्रेष्ठः सपरमेश्वरः)** जो सर्व सामर्थ्यवानांमध्येंहि श्रेष्ठ, ज्याच्याशीं कोणाचीहि तुलना होऊं शकत नाहीं, तो " परमेश्वर " होय. (षुञ्–अभिषवे; षूङ् प्राणिगर्भविमोचने) या धातूंवरून " सविता " हा शब्द सिद्ध होतो. (अभिषवः प्राणिगर्भविमोचनं चोत्पादनम्) **यश्चराचरं जगत् सुनोति सूते वोत्पादयति स सविता परमेश्वरः)** सर्व जगाची उत्पत्ति करतो म्हणून परमेश्वराला " सविता " असें नांव आहे. (दिवु–क्रीडा –विजिगीषा–व्यवहार–द्युति–स्तुति–मोद–मद–स्वप्न–कान्ति–गतिषु) या धातूवरून " देव " शब्द होतो. याचे दहा अर्थ आहेत. (क्रीडा) ज्याची क्रीडा हें जगत् आहे, (विजिगीषा) धर्माचा विजय व्हावा असें इच्छिणारा, (व्यवहार) सर्वांनां व्यवहा-रांचीं साधनें देणारा, (द्युति) स्वयंप्रकाश व दुसऱ्यानां प्रकाश देणारा, (स्तुति) प्रशंसा करण्यास योग्य, (मोद) आनंदमय व दुसऱ्यांस सुख देणारा, (मद) मदोन्म-त्तांचें ताडन करणारा, (स्वप्न) सर्वांच्या विश्रांतीसाठीं रात्री व प्रलय करणारा, (कान्ति) सर्वांनीं त्याच्या प्राप्तीची इच्छा करण्यास योग्य, (गति) ज्ञानस्वरूप असा तो परमे-श्वर आहे, म्हणून त्याला " देव " असें म्हणतात. देव शब्दाचे हे अर्थ आहेत. किंवा (यो दीव्यति क्रीडति स देवः) जो आपल्या स्वस्वरूपाच्या आनंदानेंच क्रीडा करतो, किंवा लीलेनें सहज जगत् उत्पन्न करतो व जो सर्व क्रीडांचा आधार आहे, (विजिगीषते स देवः) जो सर्वांनां जिंकणारा व जो स्वतः अजिंक्य, (व्यवहारयति स देवः) जो न्याय व अन्यायादिक व्यवहारांनां जाणतो व जो उपदेष्टा आहे, (यश्चराचरं जगद्योतयति) जो सर्वांचा प्रकाशक, (यःस्तूयते स देवः) जो सर्वांनीं प्रशंसा करण्यास योग्य, (यो मोदयति स देवः) जो स्वतः आनंदस्वरूप व दुसऱ्याला आनंद देणारा, ज्याला दुःखाचा लेशहि नाहीं, (यो माद्यति स देवः) जो सदा हर्षित, शोकरहित व दुसऱ्यांस दुःखरहित व आनंदयुक्त करणारा, (यः स्वापयति स देवः) जो प्रलयकालीं सर्व जीवांनां विश्रांतिरूप निद्रा देतो, (यः काम्यते, कामयते वा स देवः) ज्याची कामना सत्य असते व ज्याच्या प्राप्तीची शिष्ट लोक इच्छा करतात, (यो गच्छति गम्यते वा स देवः) जो सर्वत्र व्याप्त व सर्वांनीं

प्राप्त करून घेण्यास योग्य आहे त्या परमेश्वराला " देव " हें नांव आहे. (कुवि–आच्छादने) या धातूवरून " कुवेर " शब्द सिद्ध होतो. (**यः सर्वं कुम्वाति स्वव्याप्त्याच्छादयति स कुवेरो जगदीश्वरः**) आपल्या व्याप्तीच्या योगानें सर्व जग व्यापतो म्हणून परमेश्वराला " कुवेर " असें नांव आहे. (प्रथ–विस्तारे) या धातूवरून " पृथिवी " शब्द होतो. (**यः प्रथते सर्वं जगत् विस्तृणाति स पृथिवी**) सर्व जगाचा विस्तार करतो म्हणून ईश्वराला " पृथिवी " असें म्हणतात. (जल–घातने) यां धातूवरून " जल " शब्द सिद्ध होतो. (**जलति घातयति दुष्टान्, सङ्घातयति अव्यक्तपरमाण्वादीन् तद्ब्रह्म जलम्**) दुष्टांनां शासन करतो व परमाणूंचें एकीकरण करतो म्हणून परमेश्वराला " जल " असें म्हणतात. (काशृ–दीप्तौ) या धातूवरून " आकाश " शब्द सिद्ध होतो. (**यः सर्वतः सर्वं जगत् प्रकाशयति स आकाशः**) जगताला सर्व बाजूंनीं प्रकाशित करतो म्हणून परमेश्वराला " आकाश " असें नांव आहे. (अद–भक्षणे) या धातूवरून " अन्न " शब्द सिद्ध होतो.

अद्यतेऽत्ति च भूतानि तस्मादन्नं तदुच्यते ॥ १ ॥अहमन्नमहमन्नमहमन्नम् । अहमन्नादोऽहमन्नादोऽहमन्नादः ॥ २ ॥
तैत्तिरी० २।१०॥

अत्ता चराचरग्रहणात् ॥ वेदान्तदर्शन १।२।९॥

परमेश्वर सर्वांनां आपल्या आंत ठेवतो, सर्वांनीं त्याचें ग्रहण करण्यास योग्य आहे व तो सर्व जगाचें ग्रहण करतो म्हणून त्याला "अन्न, अन्नाद, अत्ता" हीं नांवें आहेत. [या वरील वाक्यांत अन्नादिकशब्दांचा त्रिवार पाठ केला आहे तो आदरार्थ आहे] ज्याप्रमाणें फळांत किडे उत्पन्न होतात, कांहीं दिवस तेथें जगतात व नंतर तेथेंच नाश पावतात त्याचप्रमाणें परमेश्वराच्या आधारानें सृष्टि होऊन नाश पावते. असो. (वस–निवासे) या धातूवरून "वसु" हा शब्द सिद्ध झाला आहे. (**वसन्ति भूतानि यास्मिन् अथवा यः सर्वेषु भूतेषु वसति स वसुरीश्वरः**) परमेश्वरामध्यें आकाशादि सर्व भूतें राहतात व तो सर्वांमध्यें व्यापून राहतो म्हणून त्याला "वसु" हें नांव आहे. (रुदिर्–अश्रुविमोचने) या धातूवरून "णिच्" प्रत्यय होऊन "रुद्र" हा शब्द सिद्ध होतो. (**यो रोदयति अन्यायकारिणो जनान् स रुद्रः**) दुराचारी मनुष्यांनां शिक्षा करून त्यांस रडावयास लावतो म्हणून ईश्वराला "रुद्र" असें म्हणतात.

यन्मनसा ध्यायति तद्वाचा वदति यद्वाचा वदति तत्कर्मणा करोति यत्कर्मणा करोति तदभिसंपद्यते ॥ यजु० ब्राह्मण.

" जीव मानानें ज्याचें ध्यान करतो, तें वाणीनें बोलतो, जसें वाणीनें बोलतो तसें कर्म करतो, जसें कर्म करतो तसें फल प्राप्त होतें. " ज्याप्रमाणें काम करतो त्याप्रमाणें त्याला फल प्राप्त होणें हाच ईश्वराचा नियम आहे. दुष्ट कर्म करणाऱ्या जीवाला, ईश्वराच्या न्यायरूपी व्यवस्थेनें दुःखरूपी फल प्राप्त होतें, तो त्यामुळें रडतो व याप्रमाणें परमेश्वर त्याला रडवितो म्हणून त्याला " रुद्र " असें म्हणतात.

आपो नारा इति प्रोक्ता नारा वै नरसूनवः ॥ ता यदस्यायनं पूर्वं तेन नारायणः स्मृतः ॥ मनु० १। १०॥

प्रकृति, जल व जीव यांनां " नारा " असें म्हणतात त्यांत परमेश्वराचें " अयन " अर्थात् " व्यापून राहणें आहे म्हणून त्याला " नारायण " असें म्हणतात. (चदि आह्लादे) या धातूवरून " चन्द्र " शब्द झाला आहे. (**यश्चन्दति चन्दयति स चन्द्रः**) स्वस्तः आनंदस्वरूप व सर्वांनां आनंद देणारा परमेश्वर आहे म्हणून त्याला " चन्द्र " असें म्हणतात. (मगि–गत्यर्थः) या धातूवरून " मङ्गल " शब्द बनला आहे. (**यो मङ्गति मङ्गयति वा स मङ्गलः**) स्वतः मंगलस्वरूप व दुसऱ्यांनां मंगल देणारा म्हणून ईश्वराला " मंगल " असें म्हणतात. (बुध–अवगमने) या धातूवरून " बुध " हा शब्द झाला आहे. (**यो बुध्यते बोधयति वा स बुधः**) स्वतः बोधस्वरूप असून दुसऱ्यांनां बोध करणारा म्हणून ईश्वराला " बुध " असें म्हणतात- " बृहस्पति " शब्दाचा अर्थ पूर्वी दिला आहे. (शुचिर्–पूतिभावे) या धातूवरून "शुक्र" शब्द झाला आहे. (**यः शुच्यति शोचयति वा स शुक्रः**) तो स्वतः अत्यंत पवित्र आहे व दुसऱ्यांला पवित्र करतो म्हणून ईश्वराला "शुक्र" असें म्हणतात. (**चरगतिभक्षणयोः**) शनैस् अव्ययउपपद चर धातूहून अच् प्रत्यय करून "शनैश्चर"शब्द होतो (**य शनैश्चरति स शनैश्चरः**) सर्वत्र सहजस्थितीनें प्राप्त असलेला व धैर्यवान् असल्यामुळें त्याला "शनैश्चर" असें म्हणतात. (रह–त्यागे) या धातूवरून " राहु " शब्द साधला जातो. (**यो रहति परित्यजति दुष्टान् राहयति व्याजयति वा स राहुः**) तो एक रूप, त्यामध्यें दुसरा पदार्थ नाहीं, तो दुष्टांचा त्याग करतो व दुसऱ्यांनां दुष्टांच्या त्रासांतून सोडवितो म्हणून त्या ईश्वराला " राहु " असें म्हणतात. (कित–निवासे रोगापनयने च) या धातूवरून " केतु " शब्द सिद्ध होतो. (**यः केतयति चिकित्सति वा स केतुरीश्वरः**) तो सर्वांचें निवासस्थान व सर्वांनां-मुमुक्षूंनां–रोगांपासून व दुःखांपासून मुक्त करतो म्हणून त्या ईश्वराला

"केतु" असें म्हणतात. (यज=देवपूजा-सङ्गतिकरण-दानेषु) या धातूवरून "यज्ञ" शब्द सिद्ध होतो. (यज्ञो वै विष्णुः) असें ब्राह्मणग्रंथांत म्हटलें आहे. **(यो यजति विद्वद्भिरिज्यते वा स यज्ञः)** जो सर्व जगांतील पदार्थांनां संयुक्त करतो व जो सर्व ब्रह्मापासून सर्व ऋषि, मुनि, विद्वान् वगैरे सर्वांनां पूज्य आहे व सदैव पूज्यच असणार त्या परमेश्वराला "यज्ञ" हें नांव आहे. तो सर्वत्र व्यापक आहे म्हणूनहि त्याला यज्ञ असें म्हणतात. (हुदानादानयोः, आदाने चेत्येके) या धातूवरून "होता" शब्द सिद्ध होतो. **(यो जुहोति स होता)** जीवांनां देण्यास योग्य असे पदार्थ त्यांस देतो व ग्रहणकरण्यास योग्य पदार्थांचें ग्रहण करतो. म्हणून ईश्वराला "होता" असें म्हणतात. (बन्ध-बन्धने) या धातूवरून "बन्धु" शब्द झाला आहे. **(यः स्वस्मिन् चराचरं जगत् बध्नाति बन्धुवद् धर्मात्मनां सुखाय सहायो वा वर्तते स बन्धु)** ईश्वरानें आपणामध्यें सर्व लोकलोकान्तरांना नियमांनीं बांधून टाकलें आहे कीं, ज्याच्या योगानें ते ते लोक आपआपल्या परिधीचें व नियमांचें उल्लंघन करूं शकत नाहींत व जो भावाप्रमाणें सर्वांना सुख देणारा आहे म्हणून त्याला "बंधु" असें म्हणतात. (पा-रक्षणे) या धातूवरून "पिता" हा शब्द सिद्ध होतो. **(यः पातिसर्वान् स पिता)** ज्याप्रमाणें बाप आपल्या संतानांची उन्नति इच्छितो व त्यांचें संरक्षण करतो त्याचप्रमाणें परमेश्वर सर्व जीवांची उन्नति चाहतो व त्यांचें रक्षण करतो, म्हणून त्याला "पिता" असें म्हणतात. **(यः पितृणां पिता स पितामहः)** तो पालकांचाहि पालक आहे म्हणून "पितामह" हें नांव ईश्वराला दिलेलें आहे. **(यः पितामहानां पिता स प्रपितामहः)** ईश्वर पितामहांचाहि पिता आहे म्हणून त्याला "प्रपितामह" असें म्हणतात. **(यो मिमीते मानयति सर्वान् जीवान् समाता)** ज्याप्रमाणें आई आपल्या मुलाचें सुख चाहते त्याच्या उन्नतीची इच्छा करते त्याचप्रमाणें सर्वजीवांची ईश्वर उन्नति इच्छितो म्हणून त्याला "माता" असें म्हणतात. "आङ्" उपसर्गपूर्वक (चर-गतिभक्षणयोः) या धातूवरून "आचार्य" शब्द सिद्ध होतो. **(य आचारं ग्राहयति सर्वा विद्या वा बोधयति स आचार्य ईश्वरः)** लोकांनां सदाचारसंपन्न करणारा व सद्विद्याप्राप्तीचा हेतु ईश्वर असल्यामुळें त्याला "आचार्य" असें म्हणतात. (गृ-शब्दे) या धातूवरून "गुरु" शब्द झाला आहे. **(जो धर्म्यान् शब्दान् गृणाति उप दिशति स गुरुः)**

स पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात् ॥ योग. समा० २६ ॥

परमेश्वर सत्यधर्मप्रतिपादक, सर्व विद्यायुक्त वेदांचा उपदेश करणारा, सृष्टीच्या प्रारंभीं अग्नि, वायु, आदित्य, अंगिरा व ब्रह्मादि गुरूंचाहि गुरु व तो सदैव अविनाशी

आहे म्हणून त्याला "गुरु" हें नांव आहे. (अज–गतिक्षेपणयोः) (जनी–प्रादुर्भावे) यावरून "अज" हा शब्द सिद्ध होतो. **यो अजति सृष्टिं प्रति सर्वान् प्रकृत्यादीन् पदार्थान् प्रक्षिपति जानाति वा कदाचिन्न जायते सोऽजः**) परमेश्वर प्रकृत्यादि पदार्थांनां यथायोग्य रीतीनें मिळवून सृष्टि करतो, जीवांचा शरीरांशीं संबंध करतो व स्वतः कधींहि ज·मास येत नाहीं, म्हणून त्याला "अज" असें म्हणतात. (बृहि–बृद्धौ) या धातूवरून ब्रह्मा शब्द सिद्ध होतो. **(यो अखिलं जगत् निर्माणेन बृंहति वर्धयति स ब्रह्मा)** परमेश्वर संपूर्ण जगत् रचून त्याला वाढवितो म्हणून त्याला "ब्रह्मा" असें म्हणतात. **(सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म)** हें तैत्तिरीयोपनिषदाचें वचन आहे. यामध्यें "सत्य, ज्ञान, अनंत व ब्रह्म" असे चार शब्द ईश्वरवाचक आहेत. याचा अर्थ पुढें दिला आहे. **(सन्तीति सन्तः तेषु सत्सु साधु तत्सत्यम्)** ज्या पदार्थांनां अस्तित्व आहे ते पदार्थ "सत्" होत, त्या सर्वांत उत्तम पदार्थ परमेश्वर आहे म्हणून त्याला "सत्य" असें म्हणतात. (**यज्जानाति चराचरं जगत् तज्ज्ञानम्**) परमेश्वर सर्व चराचर जगाला जाणतो म्हणून त्यालाच "ज्ञान" असें म्हणतात. (**न विद्येतेऽन्तोऽवधिर्मर्यादा यस्य तदनन्तम्**) परमेश्वराला आकार नसल्यामुळें तो एवढ्या परिमाणाचा आहे असें म्हणतां येत नाहीं म्हणून त्याला "अनंत" असें म्हणतात. **(सर्वेभ्यो बृहत्त्वाद्ब्रह्म**) परमेश्वर सर्वांहून मोठा असल्यामुळें त्याला "ब्रह्म" असें म्हणतात. "आङ्" उपसर्गपूर्वक (डुदाञ्-दाने) या धातूवरून "आदि" शब्द सिद्ध होतो. त्याला "नञ्" हा निषेध लावला असतां "अनादि" असें रूप बनतें. **(यस्मात्पूर्वं नास्ति परंचास्ति स आदिरुच्यते ! न विद्यते आदिः कारणं यस्य सोऽनादिरीश्वरः**) ज्याच्या पूर्वी कांहीं नसतें पण पुढें असतें त्याला आदि असें म्हणतात. परमेश्वराला "आदि" (कारण) कांहीं नसल्यामुळें त्याला "अनादि" असें म्हणतात. "आङ्" उपसर्गपूर्वक (टुनदि-समृद्धौ) या धातूवरून "आनन्द" शब्द झाला आहे. **(आनन्दन्ति सर्वे मुक्ता यस्मिन् यद्वा यःसर्वान् जीवानानन्दयति स आनन्दः**) ईश्वराच्या सान्निध्यानें मुक्त जीव आनंदित होतात किंवा तो सर्व धर्मात्म्यांनां आनंद देतो म्हणून त्याला "आनंद" असें म्हणतात. (अस-भुवि) या धातूवरून "सत्" शब्द सिद्ध होतो. **(यदस्ति त्रिषु कालेषु न बाध्यते तत्सद्ब्रह्म**) परमेश्वर भूत, भविष्य व वर्तमान या तीनहि कालांमध्यें अबाधित एक सारखा असतो म्हणून त्याला "सत्" असें म्हणतात. (चिती-संज्ञाने) या धातूवरून "चित्" हा शब्द झाला आहे. **(यश्चेतति चेतयति संज्ञापयति सर्वान् सज्ज्ञानान् योगिनस्तच्चित्परंब्रह्म**) परमेश्वर स्वतः चैतन्यस्वरूप आहे व तो

जीवांनां चैतन्य देतो म्हणून त्याला " चित् " हें नांव आहे. हे तीनहि शब्द मिळून " सच्चिदानन्द " हें परमेश्वराचें नांव होतें. (**यो ध्रुवोऽचलोऽविनाशी स नित्यः**) परमेश्वर ध्रुव, अविनाशी व अचल असल्यामुळें त्याला " नित्य " असें म्हणतात. (शुन्ध-शुद्धौ) या धातूवरून " शुद्ध " हा शब्द होतो (**यः शुन्धति सर्वान् शोधयति वा स ईश्वरः**) ईश्वर स्वतः पवित्र व अशुद्धीहून दूर आहे व तो दुसऱ्यांस पवित्र करतो म्हणून त्याला " शुद्ध " असें म्हणतात. (बुध-अवगमने) या धातूवरून क्त प्रत्यय केला असतां " बुद्ध " शब्द सिद्ध होतो. (**यो बुद्धवान् सदैव ज्ञातास्ति सजगदीश्वरः**) परमात्मा सदैव सर्व जाणतो म्हणून त्याला " बुद्ध " असें म्हणतात. (मुच्लृ-मोचने) या धातूवरून " मुक्त " हा शब्द होतो. (**यः मुञ्चति मोचयति वा मुमुक्षून् स मुक्तो जगदीश्वरः**) परमेश्वर सदैव क्लेशांपासून दूर असतो व तो सर्व मुमुक्षूंचे क्लेश दूर करतो म्हणून त्याला " मुक्त " असें म्हणतात. म्हणूनच त्याला " नित्य-शुद्ध-बुद्ध-मुक्त-स्वभाव " असें म्हणतात. " निर् व आङ् " उपसर्गपूर्वक (डुकृञ्-करणे) या धातूवरून " निराकार " शब्द झाला आहे. (**निर्गत आकारात् स निराकारः**) परमेश्वराला आकार नाहीं व तो कधींहि शरीर धारण करीत नाहीं, म्हणून त्याला " निराकार " असें म्हणतात. (अञ्जू-व्यक्तिम्रक्षणकान्तिगतिषु) या धातूवरून " अञ्जन " शब्द सिद्ध झाला आहे. याला " निर् " हा उपसर्ग लावला असतां " निरञ्जन " हा शब्द सिद्ध होतो. (**अञ्जनं व्यक्तिर्म्रक्षणं कुकाम इन्द्रियैः प्राप्तिश्चेत्यस्माद्यो निर्गतः पृथग्भूतः स निरञ्जनः**) परमेश्वर हा आवृत्ति, व्यक्तता, म्लेच्छाचार, दुष्टकामना व इंद्रियांचे विषय यांहून पृथक् आहे म्हणून त्याला " निरंजन " असें म्हणतात. (गण-सङ्ख्याने) या धातूवरून " गण " शब्द होतो. याच्या पुढें " ईश " किंवा " पति " शब्द लावला म्हणजे " गणेश " किंवा " गणपति " हे शब्द सिद्ध होतात. (**ये प्रकृत्यादयो जडा जीवाश्च गण्यन्ते संख्यायन्ते तेषामीशः स्वामी पतिः पालको वा**) परमेश्वर सर्व प्रकृत्यादिक पदार्थांचा व जीवांचा पालक व स्वामी आहे म्हणून त्याला " गणपति " किंवा " गणेश " असें म्हणतात. (**यो विश्वमीष्टे स विश्वेश्वरः**) ईश्वर सर्व संसाराचा अधिष्ठाता असल्यामुळें त्याला " विश्वेश्वर " असें म्हणतात. (**यः कूटेऽनेकविधव्यवहारे स्वस्वरूपेणैव तिष्ठति स कूटस्थ परमेश्वरः**) ईश्वर सर्व व्यवहारामध्यें व्याप्त व सर्व व्यवहारांचा आधार आहे तथापि कोणताहि व्यवहार चालला असतां त्याच्या स्वस्वरूपांत बदल होत नाहीं, म्हणून त्याला " कूटस्थ " असें म्हणतात. पूर्वी " देव " शब्दाचे अर्थ दिले आहेत, तेच " देवी " शब्दाचे जाणावे.

परमेश्वराचीं नांवें तीनहि लिंगांमध्यें आहेत. " ब्रह्म " (नपुंसकलिंगी), " चितिः " (स्त्रीलिंगी) व " ईश्वरः " (पुल्लिंगी). ज्यावेळीं " ईश्वर " शब्दाचें विशेषण असतें, तेव्हां " देवः " असें व जेव्हां " चिति "चें विशेषण असतें, तेव्हां " देवी " असें रूप होतें. तात्पर्य कोणत्याहि लिंगीं शब्द असला तरी तो ईश्वराचाच वाचक होतो. (शक्लृ–शक्तौ) या धातूवरून " शक्ति " शब्द होतो. (**यः सर्वं जगत् कर्तुं शक्नोति स शक्तिः**) सर्व जग बनविण्याचें त्याला सामर्थ्य आहे म्हणून त्याला " शक्ति " असें म्हणतात. (श्रिञ्सेवायाम्) या धातूवरून " श्री " शब्द झाला आहे (**यः श्रियते सेव्यते सर्वेण जगता विद्वद्भिर्योगिभिश्च स श्रीरीश्वरः**) परमेश्वराचें सेवन सर्व जग, योगी व विद्वान् हे सर्व करतात म्हणून त्याला " श्रीः " असें म्हणतात.—(लक्ष–दर्शनाङ्कनयोः) या धातूवरून लक्ष्मी शब्द सिद्ध होतो. (**यो लक्षयति पश्यत्यङ्कते चिन्हयति चराचरं जगत् अथवा वेदैरात्मयोगिभिश्च यो लक्ष्यते स लक्ष्मीः सर्वप्रियेश्वरः**) परमेश्वर सर्व चराचराला पाहतो व दृश्यजगत–अर्थात् शरीरांतील नेत्र, नासिकावगैरे, झाडाचीं पानें, फुलें, फळें, मूळेंवगैरे व पृथिवी, जल, कृष्ण–रक्त–श्वेत–मृत्तिका, पाषाण, चंद्रसूर्यआदिकरून सर्व–बनवितो व तो वेदादिशास्त्रांनीं, योगी, मुनि व आप्त यांनीं लक्ष्य–(ज्ञेय–जाणण्यास योग्य) असा मानला आहे म्हणून त्याला " लक्ष्मी " हें नांव आहे. (सृ–गतौ) या धातूवरून " सरस् " शब्द झाला आहे व त्याला " मतुप् व ङीप् " हे प्रत्यय लाविले असतां " सरस्वती " शब्द बनतो. (**सरो विविधं ज्ञानं विद्यते यस्यां चितौ सा सरस्वती**) परमेश्वराला विविधविज्ञान–अर्थात् शब्द, अर्थ, संबंध, प्रयोजन यांचें ज्ञान–यथावत् होत असल्यामुळें त्यालाच " सरस्वती " असें म्हणतात. (**सर्वाः शक्तयो विद्यन्ते यस्मिन् स सर्वशक्तिमानीश्वरः**) जो आपलें कार्य करावयाचें असतां कोणाचेंहि साहाय्य घेत नाहीं, ज्याला कोणाच्याहि सामर्थ्याची गरज नाहीं, आपल्याच सामर्थ्यानें जो आपलीं सर्व जगत्संबंधीं कार्यें सहज आयासावांचून करतो, इतकें ज्याचें अगाध सामर्थ्य आहे त्या सर्वेश्वराला " सर्वशक्तिमान् " असें म्हणतात (णीञ्–प्रापणे) या धातूवरून " न्याय " हा शब्द होतो (**प्रमाणैरर्थपरीक्षणं न्यायः**) असें गौतमाचें न्यायदर्शनांत सूत्र आहे व त्यावर (**पक्षपातरहित्याचरणं न्यायः**) असें वात्स्यायनमुनिकृत भाष्य आहे. " जो प्रत्यक्षादिप्रमाणांनीं सिद्ध झाला आहे व जो पक्षपातरहित धर्माचरणानुकूल आहे त्याला न्याय असें म्हणतात." (**न्यायं कर्तुं शीलमस्य स न्यायकारीश्वरः**) परमेश्वराचा स्वभावच पक्षपातरहित धर्म–न्याय–करण्याचा असल्यामुळें त्याला " न्यायकारी " असें म्हणतात (दय–दानगतिरक्षणहिंसादा-

नेषु) या धातूवरून " दया " शब्द साधला जातो. (**दयते ददाति जानाति गच्छति रक्षति हिनस्ति यया सा दया; बह्वी दया विद्यते यस्य स दयालुः परमेश्वरः**) परमेश्वर अभय देणारा, सत्यासत्यविद्यांचा, सत्य-अध्यात्मिक ब्रह्मविद्या व असत्य-पदार्थविद्या ह्यांचा ज्ञाता, सज्जनांचें रक्षण करून दुष्टांनां शासन करणारा आहे, म्हणून त्याला " दयालु " असें नांव आहे. (**द्वयोर्भावो द्वितं द्वाभ्यामितं द्वितं वा सैव तदेव वा द्वैतम्, न विद्यते द्वैतं द्वितीयेश्वरभावो यस्मिंस्तदद्वैतम्**) अर्थात् (सजातीय-विजातीय-स्वगत -भेदशून्यं ब्रह्म) दोन पदार्थांचें अस्तित्व असणें याला " द्वैत " असें म्हणतात. तें परमेश्वरामध्यें नाहीं म्हणून त्याला " अद्वैत " असें म्हणतात. त्याचप्रमाणें सजातीय भेद एका मनुष्याचा दुसऱ्या मनुष्याशीं दिसणारा, विजातीय भेद मनुष्याचा वृक्षपाषाणादिकांशीं व स्वगतभेद शरीरांतील डोळे, कान, नाकवगैरे हे तीन प्रकारचे भेद परमेश्वरामध्यें नाहींत- अर्थात् सजातीय किंवा विजातीय ईश्वराचें अस्तित्व नसून त्यामध्यें स्वगतभेद-तत्वांतरहि-मुळींच नाहीं-तो एकरस आहे म्हणून त्याला "अद्वैत"असें म्हणतात. (**गण्यन्ते ये ते गुणाः वा यैर्गणयन्ति ते गुणाः । यो गुणेभ्यो निर्गतः स निर्गुण ईश्वरः**) यालाच **अशब्दमस्पर्शमरूपमव्ययम्** इत्यादि विशेषणें उपनिषदांमध्यें दिलेलीं आहेत. परमेश्वर हा सत्व, रज, तम, रूप, रस, स्पर्श, गंध इत्यादि जडाचे गुण व अविद्या, अस्मिता, राग, द्वेष, अविद्यादि क्लेशवगैरे जीवांच्या गुणांहूनहि पृथक् आहे. हे गुण त्याच्यांत नाहींत म्हणून त्याला " निर्गुण " असें म्हणतात. (**यो गुणैः सह वर्तते स सगुणः**) परमेश्वर हा सर्वज्ञत्व, आनंदमयत्व, शुद्धता सर्वशक्तिमत्व इत्यादि गुणांनीं युक्त आहे म्हणून त्यालाच " सगुण " असें म्हणतात. ज्याप्रमाणें पृथिवींत गंध हा गुण असल्यामुळें ती सगुण आहे व इच्छावगैरे गुण नसल्यामुळें निर्गुण आहे; त्याचप्रमाणें परमेश्वरहि प्रकृति व जीव यांच्या गुणांनीं विरहित असल्यामुळें " निर्गुण " व सर्वज्ञत्वादि गुण त्यामध्यें स्वभावतः असल्यामुळें तोच " सगुण " आहे. असा कोणताहि पदार्थ नाहीं कीं जो सगुणता व निर्गुणता यांहून पृथक् असूं शकेल. जडामध्यें चैतन्याचे गुण नाहींत या दृष्टीनें जड निर्गुण आहे पण जडाचे नैसर्गिक गुण जडांत असतात म्हणून तें सगुणहि आहे. तसेंच जीवामध्यें जडाचे गुण नसल्यामुळें तो निर्गुण व त्यामध्यें नैसर्गिक इच्छा द्वेषादिक गुण असल्यामुळें तोच सगुण आहे. याचप्रमाणें परमेश्वराविषयीं जाणावें. (**अन्तर्यन्तुं नियन्तुं शीलं यस्य सोऽयमन्तर्यामी**) परमेश्वर प्राणी व अप्राणीरूप जगतांत व्यापून त्याचें नियमन करतो म्हणून त्याला " अन्तर्यामी " असें म्हणतात. (**यो धर्मे राजते स धर्मराजः**) परमेश्वर अधर्माहून रहित व धर्मामध्येंच असून

धर्माचा प्रकाश करणारा आहे म्हणून त्याला "धर्मराज" असें म्हणतात. (यमु –उपरमे) या धातूवरून "यम" शब्द सिद्ध होतो. (**यः सर्वान् प्राणिनो नियच्छति स यमः**) तो सर्व प्राण्यांनां कर्मफल देतो व तो सर्व अन्यायांहून पृथक् राहतो म्हणून त्या ईश्वराला "यम" असें म्हणतात (भज–सेवायाम्) या धातूवरून "भग" हा शब्द होतो व त्यावरून "मतुप्" प्रत्यय केला म्हणजे "भगवान्" शब्द सिद्ध होतो. (**भगः सकलैश्वर्यं सेवनं वा विद्यते यस्य स भगवान्**) परमेश्वर सकल ऐश्वर्यानें युक्त व भजन–सेवन–करण्यास योग्य आहे म्हणून त्यालाच "भगवान्" असें म्हणतात. (मन–ज्ञाने) या धातूवरून "मनु" शब्द झाला आहे. (**यो मन्यते स मनुः**) परमेश्वर विज्ञानशील व मान देण्यास योग्य आहे म्हणून त्याला "मनु" असें म्हणतात. (पॄ–पालनपूरणयोः) या धातूवरून "पुरुष" शब्द होतो. **यः स्वव्याप्त्या चराचरं जगत्पृणाति पूरयति वा स पुरुषः**) परमेश्वर सर्व जगतांत पूर्ण भरला आहे म्हणून त्यास "पुरुष" असें म्हणतात. (डुभृञ्–धारणपोषणयोः) या धातूचें "भर" असें रूप होतें. त्याच्यापूर्वी "विश्व" शब्द लावला असतां "विश्वंभर" हा शब्द सिद्ध होतो. (**यो विश्वं बिभर्ति धरति पुष्णाति वा स विश्वंभरो जगदीश्वरः**) परमेश्वर जगाचें धारण व पोषण करतो म्हणून त्याला "विश्वंभर" असें म्हणतात. (कल–सङ्ख्याने) या धातूवरून "काल" शब्द झाला आहे. (**कलयति सङ्ख्याति सर्वान्पदार्थान् स कालः**) परमेश्वर सर्व पदार्थ व जीव यांची संख्या जाणतो म्हणून त्यास "काल" असें म्हणतात. (शिष्लृ–विशेषणे) या धातूवरून "शेष" शब्द सिद्ध झाला आहे. (**यः शिष्यते स शेषः**) परमेश्वर उत्पत्ति व प्रलय यांहून शेष अर्थात् यांत न येणारा असल्यामुळें त्याला "शेष" असें म्हणतात (आपॢ–व्याप्तौ) या धातूवरून "आप्त" हा शब्द सिद्ध होतो. (**यः सर्वान्धर्मात्मन आप्नोति वा सर्वैर्धर्मात्मभिराप्यते छलादिरहितः स आप्तः**) परमेश्वर सत्योपदेशक, सर्व विद्यायुक्त, धर्मात्म्यांनां प्राप्त होणारा, धर्मात्म्यांनीं प्राप्त करून घेण्यास योग्य, छल कपटादि दोषरहित आहे म्हणून त्याला "आप्त" असें म्हणतात. "शं" पूर्वक (डुकृञ्–करणे) या धातूवरून "शंकर" शब्द झाला आहे. (**यः शं कल्याणं सुखं करोति स शङ्करः**) परमेश्वर कल्याणकारक व सुखदाता आहे म्हणून त्याला "शंकर" असें म्हणतात. "महत्" शब्दापुढें "देव" शब्दाचा योग केला असतां "महादेव" हा शब्द सिद्ध होतो. (**यो महतां देवः स महादेवः**) परमेश्वर हा देवांचा देव, विद्वानांमध्येंहि उत्तम विद्वान्. सूर्यादि प्रकाशमान् पदार्थांनांहि प्रकाश देणारा आहे, म्हणून त्याला "महादेव" असें

म्हणतात. (प्रीञ्–तर्पणे कान्तौ च) या धातूवरून "प्रिय" शब्द सिद्ध होतो. **(यः प्रीणाति प्रीयते वा स प्रियः)** परमेश्वर सर्व शिष्ट, धर्मात्मे व मुमुक्षु यांना आनंद देणारा व सर्वांनीं दर्शनाची इच्छा करण्यास योग्य असा असल्यामुळें त्याला "प्रिय" असें म्हणतात. "स्वयं" शब्दपूर्वक (भू–सत्तायाम्) या धातूवरून "स्वयम्भू" शब्द सिद्ध होतो. **(यः स्वयं भवति स स्वयम्भूरीश्वरः)** जो स्वतः आहेच कधींहि उत्पन्न झाला नाहीं तो "स्वयंभू" परमेश्वर होय. (कु–शब्दे) या धातूवरून "कवि" शब्द झाला आहे. **(यः कौति शब्दयति सर्वा विद्याः स कविरीश्वरः)** परमेश्वर वेदद्वारा सर्व विद्यांचा उपदेश करतो म्हणून त्याला "कवि" असें नांव आहे. (शिवु–कल्याणे) या धातूवरून "शिव" हा शब्द झाला आहे. ["बहुलमेतन्निदर्शनम्" ॥ या वचनप्रामाण्यावरून "शिव" हा धातू मानण्यांत येतो]. परमेश्वर कल्याणस्वरूप व कल्याण करणारा असल्यामुळें त्याला "शिव" असें म्हणतात.

हीं शंभर नामें परमेश्वराचीं आहेत. वास्तविक परमेश्वराचीं असंख्य नामें आहेत. त्याचे गुण अनंत असल्यामुळें त्यांवरून पडलेलीं त्याचीं नांवेंहि अनंत आहेत. त्याच्या गुणकर्मस्वभावावरून त्याचीं अनंत नामें होतात. त्यांतील अंशमात्र नामें येथें दिलीं आहेत. वेदादि सच्छास्त्रांमध्यें परमेश्वराच्या असंख्य गुणांचें वर्णन आहे, त्यांच्या अध्ययनानें त्याच्या अनंत गुणांचा व नामांचा बोध होईल व अन्य पदार्थांचें पूर्ण ज्ञानहि त्याला होईल. या प्रकाराच्या वेदाध्ययनापासून दुहेरी लाभ आहे.

मंगलाचरण.

(प्रश्न) अन्य ग्रंथकार ज्याप्रकारचें आदि, मध्य व अंत यांमध्यें मंगलाचरण करतात त्याप्रकारचें तुम्ही या ग्रंथांत कां केलें नाहीं ? (उत्तर) वैदिक आर्षग्रंथाची शैली श्रेष्ठ मानणारांना तसें करणें योग्य नव्हे कारण, जो आदि, मध्य व अंत या तीन ठिकाणींच मात्र मंगलाचरण करील त्याचा या तीन ठिकाणांशिवाय असलेला इतर लेख अमंगल असेल. वास्तविक (मङ्गलाचरण **शिष्टाचारात् फलदर्शनाच्छ्रुतितश्चेति** ॥ साङ्ख्य ५।१) जी पक्षपातरहित, सत्य व वेदोक्त ईश्वराज्ञा आहे तिचें सदैव आचरण करणें हेंच **"मङ्गलाचरण"** होय. ग्रंथाच्या आरंभापासून शेवटपर्यंत सत्य आचाराचें कथन करणें हेंच मंगलाचरण आहे व तेंच या ग्रंथामध्यें केलेलें आहे. कांहीं ठिकाणीं मंगलशब्द व कांहीं ठिकाणीं अमंगल लिहिणें हें योग्य नव्हे. पहा महर्षीलोक काय लिहितात तें:–

यान्यनवद्यानि कर्माणि तानि सेवितव्यानि नो इतराणि ॥

–तैत्ति० उ० ७।११ ॥

"हे लोकहो! जीं वेदप्रतिपादित अनिंदनीय व धर्मयुक्त कृत्यें असतील तींच तुम्ही आचरावींत, वेदविरुद्ध अधर्मयुक्त कृत्यांचें कधींहि आचरण करूं नये" आधुनिक ग्रंथांमध्यें "श्रीगणेशाय नमः" "सीतारामाभ्यां नमः" "राधाकृष्णाभ्यां नमः" "श्रीगुरुचरणारविन्दाभ्यां नमः" "हनुमते नमः" "दुर्गायै नमः"—"बटुकाय नमः" "भैरवाय नमः" "शिवाय नमः" "सरस्वत्यै नमः" "नारायणाय नमः" इत्यादि प्रकारें मंगलाचरण म्हणून केलें जातें. याप्रमाणें लिहिणें हें वेदादि सच्छास्त्रांप्रमाणें विरुद्ध आहे म्हणून बुद्धिवान् लोक तें अग्राह्य असें समजतात; कारण वेद व ऋषिप्रणित ग्रंथ यांमध्यें असें मंगलाचरण कोठेंहि पहाण्यांत येत नाहीं. आर्षग्रंथांच्या आरंभीं "ओ३म्" किंवा "अथ" हे शब्द येतात. पहाः—

"अथ शब्दानुशासनम्"। अथेत्ययं शब्दोऽधिकारार्थः प्रयुज्यते ॥ —व्याकरणमहाभाष्ये ।

"अथातो धर्मजिज्ञासा"। अथेत्यानन्तर्ये वेदाध्ययनानन्तरम्॥ —पूर्वमीमांसायाम् ।

"अथातो धर्मं व्याख्यास्यामः"। अथेति धर्मकथनानन्तरम् धर्मलक्षणं विशेषेण व्याख्यास्यामः॥ वैशेषिकदर्शने ॥ "अथ योगानुशासनम्" । अथेत्ययमधिकारार्थः । योगशास्त्रे । "अथ त्रिविधदुःखात्यन्तनिवृत्तिरत्यन्तपुरुषार्थः" ॥ सांसारिकविषयभोगानन्तरं त्रिविधदुःखात्यन्तनिवृत्यर्थः प्रयत्नः कर्त्तव्यः ।—साङ्ख्यशास्त्रे । "अथातो ब्रह्मजिज्ञासा" । वेदान्तसूत्रे ।

"ओमित्येतदक्षरमुद्गीथमुपासीत ।" छान्दोग्योपनिषदि । "ओमित्येतदक्षरमिदꣳ सर्वं तस्योपव्याख्यानम् । " माण्डूक्ये ।

हीं ज्या त्या शास्त्रांतील आरंभींचीं वचनें आहेत. त्यांवरून उघड दिसेल कीं, ऋषिमुनिलोक ग्रंथारंभीं "ओम्" किंवा "अथ" या शब्दांचा प्रयोग करीत. याचप्रमाणें सर्व इतर आर्षग्रंथांची पद्धत आहे. "अग्नि, इषे, अग्न, ये त्रिषप्ता

परियन्ति" या शब्दांनींच चारहि वेदांचा प्रारंभ झाला आहे. त्यांच्या आरंभीं "श्रीगणेशाय नमः" इत्यादि शब्द नाहींत. त्याचप्रमाणें "हरिः ओ३म्" हें लिहिणेंहि आधुनिक व पौराणिक, तांत्रिक लोकांनीं उपस्थित केलें आहे. त्यांच्यापासून लोकांनीं ही मंगलाचरणाची मिथ्या कल्पना घेतली आहे. ऋषिमुनींचा खरा प्रकार वर दिलाच आहे. अर्थात् "ओ३म्" किंवा "अथ" हे शब्द ग्रंथप्रारंभीं लिहिले पाहिजेत. याप्रमाणें ईश्वराविषयीं या प्रथम समुल्लासामध्यें किंचिन्मात्र दिग्दर्शन केलें आहे.

इति सुभाषाविभूषितईश्वरनामविषये प्रथमः समुल्लासः संपूर्णः ।

अथ द्वितीयसमुल्लासः

"अथ शिक्षां प्रवक्ष्यामः ।"

"मातृमान् पितृमानाचार्यवान् पुरुषो वेद ।"

—शतपथब्राह्मण.

(१) आईबापांचीं कर्त्तव्यें.

ज्याला माता, पिता व गुरु हे तीनहि शिक्षक उत्तम मिळतात, तो मनुष्य विद्वान् होतो. असा पुरुष ज्या कुलांत उत्पन्न होतो, तें कुल धन्य होय! ज्याचे मातापिता धार्मिक व विद्वान् असतात तो पुत्र महाभाग्यवान्! जसें आईकडून मुलाला शिक्षण मिळतें व त्याला वळण लागतें तसें दुसऱ्या कोणाकडूनहि लागत नाहीं. आपल्या संतानाचें हित करावें अशा हेतूनें जसें मातेच्या अंतःकरणांत प्रेम असतें, तसें दुसऱ्या कोणाच्याहि असूं शकत नाहीं. (**"मातृमान्" प्रशस्ता धार्मिकी माता विद्यते यस्य स मातृमान्**) म्हणून "मातृमान्" असें पद वरील ब्राह्मणवचनांत घातलें आहे. "ज्याला धर्म जाणणारी व मुलाचें हित जाणणारी माता असते तोच मातृमान्" होय. जी आई गर्भधारणापासून मुलाची विद्या पुरी होईपर्यंत त्याला उत्तम उपदेश करते ती खरोखर धन्य होय!

आईबापांनीं गर्भधारणाच्या पूर्वी, गर्भ राहिला असतां व नंतर मादक द्रव्यें, मद्य, दुर्गंधयुक्त, रूक्ष व बुद्धिनाशक पदार्थ खाऊं नयेत शान्ति, आरोग्य, बल, बुद्धि, पराक्रम व सुशीलता इत्यादि सद्गुण अंगीं आणून, तूप, दूध व मिष्ट अन्नपान इत्यादि श्रेष्ठ पदार्थांचें सेवन करावें. याच्या योगानें रज व वीर्य दोषरहित व अत्युत्तम गुणयुक्त होऊन त्यापासून होणारी प्रजाहि सुदृढ व पराक्रमी होईल. ऋतुकालींच स्त्रीसमागम करावा. रजोदर्शनाच्या पांचव्या दिवसापासून सोळाव्या दिवसापर्यंत-हे बारादिवस-ऋतुदान देण्यास योग्य आहेत. या बारा दिवसांत अकरावी व तेरावी रात्री वर्ज्य समजाव्या. शिल्लक दहा रात्री राहिल्या. या ऋतुदानाला योग्य आहेत. रजोदर्शनापासून सोळाव्या रात्रीच्या पुढें स्त्रीसमागम करूं नये. पुनः रजोदर्शन होऊन पूर्वोक्त ऋतुदानाचा समय आल्यानंतर अथवा गर्भस्थितीनंतर एक वर्षानें समागम करावा. दोघांच्याहि शरीरांमध्यें आरोग्यता, प्रसन्नता, आनंदित वृत्ति या असतील व कोणीहि कोणत्याहि प्रकारें शोकांत नसेल अशा वेळींच समागम व्हावा. चरक-सुश्रुतामध्यें ज्याप्रमाणें भोजनाच्छादनाचा प्रकार सांगितला आहे व मनुस्मृतीमध्यें ज्याप्रमाणें स्त्रीपुरुषांची प्रसन्नता राखण्याची

रीति सांगितली आहे; त्याप्रमाणें वागावें. गर्भधारण झाल्यावर भोजनाच्छादनाची व्यवस्था फारच सावधगिरीनें ठेविली पाहिजे. नंतर एक वर्षपर्यंत स्त्रीपुरुषांनीं समागम करूं नये. बुद्धि, बल, रूप, आरोग्य, पराक्रम, शान्ति इत्यादि गुण वाढविणाऱ्या द्रव्यांचेंच स्त्रीनें, गर्भवती असेपर्यंत सेवन करावें.

गर्भिणी स्त्री बाळंत झाल्यावर बालकाला उत्तम सुगंधियुक्त पाण्यानें स्नान घालून, नालच्छेदन वगैरे करून, तेथें उत्तम सुगंधियुक्त घृतादि पदार्थांचें हवन करावें. [बालकाच्या जन्मसमयीं "जातकर्मसंस्कार" करावयाचा असतो. हा वेदोक्त संस्कार आहे. यांत करावयाचे हवनादि प्रकार गृह्यसूत्रांतील संस्कारविधींत सांगितले आहेत त्याप्रमाणें करावेत.] स्त्रियेच्याहि स्नान, पान, भोजनाच्छादनाविषयीं उत्तम व्यवस्था करावी, कीं ज्याच्या योगानें बालक व स्त्री यांच्या शरीरांत आरोग्यता व पुष्टि क्रमशः येत जाईल. आईला किंवा दाईला असे पदार्थ खावयास घालावे कीं, ज्याच्या योगानें त्यांचें दूध बालकाला हितकारक होऊन त्याच्या अंगांत उत्तम गुण उत्पन्न होतील. आईनें सहा दिवसपर्यंत आपलें दूध मुलाला पाजावें व नंतर दाईचें पाजावें; पण दाईच्या खाण्यापिण्याची व्यवस्था आईबापांनीं करावी. जर कोणाला दाई ठेवण्यास सामर्थ्य नसेल तर त्यांणीं गाईचें किंवा शेळीचें उत्तम दूध-त्यांत बुद्धि, पराक्रम व आरोग्य वाढविणाऱ्या वनस्पतींचें शुद्ध जलांत भिजवून काढलेलें सत्व समभाग पाण्यांत किंवा तसेंच मिसळून तें दूध-मुलास पाजावें. संतानोत्पत्तीनंतर बालकाला व आईला रमणीय, उदात्त, भव्य व शुद्ध हवेच्या ठिकाणीं नेऊन ठेवावें व त्यांच्या सन्निध उत्तम, रमणीय, सुगंधित व आरोग्य वाढविणारे पदार्थ ठेवावे. जो प्रदेश उत्तम वायूनें युक्त व आरोग्यकारक असेल त्याच प्रदेशांत फिरावयास जावें. तात्पर्य, दोघांचें आरोग्य राहण्यास आवश्यक असतील ते यथाशास्त्र उपचार करावे. जेथें दाई, गाय, बकरी मिळणें शक्य नसेल तेथें देशकालपरत्वें योग्य असेल तें करावें. बाळंतपणामुळें प्रसूता स्त्री निर्बल होते म्हणून तिनें आपलें दूध बालकाला पाजूं नये. निर्बलता गेल्यावर पाजण्याचा निषेध नाहीं. स्तनांच्या छिद्रांवर अशा औषधींचा लेप लावावा कीं ज्याच्या योगानें दुग्धस्राव बंद होईल, अशा करण्यापासून एक महिन्याच्या आंत ती स्त्री पुनः पूर्ववत् युवती होते. याप्रमाणें एक वर्षाचा काल जाईपर्यंत पुरुषानेंहि ब्रह्मचर्य धारण करून, यथोचित अन्न सेवन करून वीर्याचा निग्रह करून ठेवावा. याप्रमाणें वागणाऱ्या स्त्रीपुरुषांपासून उत्पन्न होणारीं बालकें दीर्घायु, बलवान्, पराक्रमी होतील यांत मुळींच शंका नाहीं. स्त्री व पुरुष दोघेहि आपआपल्या वागण्याच्या ब्रह्मचर्यादि नियमांप्रमाणें वागल्यास जीं जीं मुलें होतील तीं तीं सर्व उत्तमच होतील.

(२) मुलांचें प्राथमिक शिक्षण.

बालकांनां आईनें असें उत्तम शिक्षण द्यावें कीं, तें सभ्यपणानें वागून कोणत्याहि अंगानें कुचेष्टा करणार नाहीं. ज्या वेळीं मूल बोलूं लागेल त्यावेळीं आईनें त्याचे वर्णोच्चार स्पष्ट व शुद्ध होतील असें करावें. मुलाची जिव्हा कोमल होऊन त्यांतून सर्व वर्ण स्थान, प्रयत्न, ह्रस्व, दीर्घ, प्लुत अक्षरांचा करावयाचा तसा उच्चार निघेल असें करावें. जसें, "प" हें अक्षर ओष्ठ स्थानांतून उच्चारलें जातें व त्याचा स्पृष्ट प्रयत्न आहे म्हणून तें उच्चारावयाचें असतांना दोनहि ओंठ मिळविले पाहिजेत. या सर्वांकडे नीट लक्ष्य देऊन त्याची वाणी मधुर, गंभीर व सुंदर होईल व स्वर, अक्षर, मात्रा, वाक्य, संहिता, अवसान यांचा सहज नीट उच्चार होईल असें त्यास शिकवावें. ज्यावेळीं त्याला साधारण बोलतां येऊं लागेल व त्याला बरें वाईट समजूं लागेल, तेव्हां त्याला लहान, थोर, मान्य, माता, पिता, राजा, विद्वान् यांच्याशीं कसें भाषण करावें, गोड कसें बोलावें, त्यांच्याशीं कसें वर्तन करावें, त्यांच्यांजवळ कसें बसावें याविषयीं शिक्षण द्यावें. याच्या योगानें त्याच्याकडून कधींहि योग्य प्रसंगीं अयोग्य व्यवहार होणार नाहीं. तसेंच त्याला असें शिक्षण द्यावें कीं, ज्याच्या योगानें तो जितेंद्रिय, विद्याप्रिय व सत्संगतीची इच्छा करणारा होऊन सदाचरणी बनेल. व्यर्थ क्रीडा, रोदन, हास्य, लढाई, हर्ष, शोक, लोलुपता, ईर्ष्या, द्वेषवगैरे दुर्गुण उत्पन्न होतील असें वर्तन मुलांशीं करूं नये; तसें उपस्थ इंद्रियाला स्पर्श करण्यापासून किंवा त्याला घर्षण करण्यानें वीर्यक्षीणता व नपुंसकत्व उत्पन्न होतें व हस्तही दुर्गंधयुक्त होतो म्हणून त्या इंद्रियाला स्पर्श करूं देऊं नये. ज्या आचरणानें, सत्यप्रियता, शौर्य, धैर्य, प्रसन्नता वगैरे गुण उत्पन्न होतील असें मुलांशीं आचरण ठेवावें व त्यांनां शिक्षणहि द्यावें. मुलें पांच वर्षांच्या वयाचीं झालीं म्हणजे त्यांना देवनागरी अक्षरें शिकविण्यास आरंभ करावा. इच्छा असल्यास अन्य भाषेच्या अक्षरांचीहि ओळख करून द्यावी. नंतर ज्यांमध्यें विद्या, धर्म, परमेश्वर, माता, पिता, आचार्य, विद्वान्, अतिथि, राजा, प्रजा, कुटुंब, बंधु, भगिनी, नोकरचाकरवगैरे लोकांशीं कसें वागावें हें सांगितलें असेल, असे मंत्र, श्लोक, सूत्र, गद्य, पद्यवगैरे त्यांच्याकडून हलके हलके अर्थासह पाठ करवून घ्यावे. या शिक्षणाच्या योगानें मुलें लबाड मनुष्यांच्या फसवणुकीला फसलीं जाणार नाहींत. तसेंच त्यांनां विद्या व धर्म यांच्या विरुद्ध जे जे भ्रांतिजालांत पाडणारे व्यवहार आहेत त्यांतून आपणास कसें दूर ठेवावें याचाहि प्रसंगविशेषीं उपदेश करावा, त्याच्यायोगानें तीं मुलें पुढें भूतप्रेतादि करणाऱ्यांच्या मिथ्या वाग्जालानें फसलीं जाणार नाहींत.

(३) भूत प्रेत.

गुरोः प्रेतस्य शिष्यस्तु पितृमेधं समाचरन् ॥
***प्रेतहारैः समं तत्र दशरात्रेण शुध्यति ॥ मनु० ५।६५ ॥**

मृत शरीराला "प्रेत" असें म्हणतात. "जेव्हां गुरूचा प्राणान्त होतो, तेव्हां त्याच्या प्रेताला (मृतशरीराला) जो शिष्य इतरांबरोबर उचलून नेतो, तो दहा रात्रींनीं शुद्ध होतो." ज्यावेळीं शरीर अग्नीनें जळून जातें, तेव्हां त्याला "भूत" असें म्हणतात. "भूत" आहे; म्हणजे सध्यां नाहीं इतकेंच. ब्रह्मयापासून आजपर्यंत झालेल्या सर्व विद्वानांचें मतहि असेंच आहे. पण जन्मापासून होत असलेले कुसंस्कार, कुसंग यांच्यायोगानें मुलांची साशंक मनोवृत्ति होऊन तीं भूत, प्रेत, पिशाच, शाकिनी, डाकिनी इत्यादि कल्पित शंकारूप भयापासून भयभीत व दुःखित होतात. हे लहानपणचे संस्कार मग जाण्यास कठीण पडतात म्हणून तसले कुसंस्कार व भयजनक वर्तन त्यांच्याशीं करूं नये. मुलें धीट, शूर व सत्यप्रिय निपजतील असेंच वळण त्यांस लावावें. ज्यावेळीं कोणी मनुष्य मरतो तेव्हां त्याचा जीव पापपुण्याच्या अनुरोधानें सुखदुःख भोगण्यासाठीं परमेश्वराच्या न्यायी व्यवस्थेनें दुसऱ्या शरीरांत प्रवेश करतो-दुसरा जन्म धारण करतो. या अविनाशी परमेश्वराच्या न्यायी व्यवस्थेचा कोणी तरी नाश करूं शकेल काय? मग दुसऱ्या शरीरांत गेलेला जीव येथें येऊन त्रास कसा देईल? पण याचा विचार न करतां अज्ञानी लोक; वैद्यशास्त्र, मानसशास्त्र, शारीरशास्त्र, प्राणविद्या, स्थूल व सूक्ष्म भूतविद्या व पदार्थविद्या यांचें त्यांस ज्ञान नसल्यामुळें, सन्निपातादिक ज्वर व उन्मादादिक मानसिक विकार यांनांच भूतप्रेत समजून योग्य उपचार न करतां; धूर्त, पाखंडी, महामूर्ख, अनाचारी, स्वार्थी, ढोंगी, कपटी अशा नीच मनोवृत्तींच्या माणसांच्या व मंत्र तंत्र करण्याचा आव घालणाऱ्या भंगी, चांभार, शूद्र, म्लेच्छ इत्यादि धर्महीन व नीच मनुष्यांच्या तावडींत सांपडतात, त्यांच्या लबाडीच्या बोलण्यास फसतात व उच्छिष्ट भोजन, दोराधागा, यंत्रमंत्रतंत्र इत्यादि करीत फिरतात! या मूर्खपणाच्या आचरणानें द्रव्याचा नाश, संतानाची दुर्दशा, रोगाची वाढ होऊन सर्वतोपरी त्यांनां दुःख होतें. मग ते "दैव" म्हणतात! जेव्हां डोळे असून आंधळे झालेले लोक दुर्बुद्धि, स्वार्थी, व पापी लोकांच्या भ्रमजालांत सांपडतात तेव्हां अंध होऊन त्या मंत्र्याला म्हणतात "महाराज! या मुलाला काय झालें आहे हो?" तेव्हां तो ढोंगी म्हणतो कीं, "पहा हो! याच्या शरीरांत भूतसंचार झालेला आहे. वेळींच उपाय केला तर

*हा श्लोक येथें फक्त 'प्रेत" शब्दाच्या अर्थासाठीं घेतला आहे.

बरें नाहींतर हें जबरदस्त पिशाच याचे प्राणहि हरण करील. अमूक वस्तु व अमूक पैसे द्याल तर मीहि यावरचा मांत्रिक उपचार करीन व पिशाचाला दूर करीन." हें ऐकून ते अंध लोक म्हणतात कीं, "महाराज! काय पाहिजे तें घ्या पण ही भूतबाधा बंद करा व याला आराम वाटे असें करा." अशीं बोलणीं ऐकल्यावर तर मग त्या ढोंगी लोकांची चैनच होते मग ते "ही अमूक सामुग्री, इतकी दक्षिणा, ही भेट" इत्यादि ठरावीक पदार्थांची मागणी करतात व झांज, ढोल, मृदंगवगैरे वाजवून मोठा कल्होळ करतात. मग इतक्यांत त्यांचाच कोणी तरी साथीदार नाचूं लागतो व तोंडानें म्हणतो कीं, "मी याचा प्राणहि घेईन" हें ऐकल्याबरोबर ते लोक धावरून त्या नीच लोकांच्या पायां पडतात व त्याची प्रार्थना करतात कीं, "तुला काय पाहिजे तें घे पण याच्या प्राणाला धक्का लाऊं नको" हें ऐकून तो ढोंगी म्हणतो कीं, "मी हनुमान् आहें. मला मिठाई, तेल, सिंदूर, सवा मण रोट व लाल लंगोट इतकें द्या" किंवा "मी (देव, भैरव किंवा) पिशाच आहें, मला कोंबड्या वीस, दारूचे शिसे पांच, पांच बकरे, मिठाई एक मण व अमूक वस्त्रें इतकें द्या." हें त्या नाचणाराचें भाषण ऐकून "तुला पाहिजे तें घे" असें जवळचे लोक म्हणतात. तेव्हां तो आणखी थोडासा नाचून आपलें काम झालें, असें मनांत समजून उगी राहतो. यावेळीं कोणी हुषार मनुष्य जर असेल व तो जर त्यास चांगला खरपूस मार देईल तर सर्व भूतें खेतें एकदम नाहींशीं होतील कारण, हा सर्व खेळ पैसे उपटण्यासाठीं असतो, म्हणून असल्या मांत्रिक ढोंगी लोकांच्या नादीं कोणी लागूं नये. आपल्या मुलांस असें शिक्षण द्यावें कीं, ज्याच्या योगानें तीं या लोकांनां फसणार नाहींत.

(४) फलज्योतिष.

रोगी किंवा दुःखित मनुष्याचे नातलग जसे भूतांविषयींच्या अज्ञानानें फसतात, तद्वत ते जोतिर्विद्याभासी व ग्रहरूप ज्योतिष्यांच्याहि नादीं लागून फसतात. ते अशा लोकांकडे जाऊन म्हणतात कीं, "महाराज! याला काय होतें आहे तें पहा" तेव्हां तो स्वतः ग्रहरूपी जोशी म्हणतो कीं, "अहो याच्यावर तर सूर्यादि क्रूर ग्रहांची दृष्टि अनिष्ट झालेली आहे. यावद्दल तुम्हांला शांति, पाठ, पूजा, दानवगैरे केलें पाहिजे. तरच त्या ग्रहाची शांति होऊन याला बरें वाटेल. नाहींतर कदाचित् मृत्यूचाहि संभव आहे." (प्रश्न) तुम्ही फलज्योतिष खोटें असें समजतां काय? (उत्तर) होय. पहा पृथिवीप्रमाणें सूर्यादिक नऊहि ग्रह जड आहेत, चेतन नाहींत. त्यांची आपआपल्यापरी प्रकाश देणें, शितोष्णता देणें, आकर्षण करणें, भरती ओहोटी करणें वगैरे कामें आहेत. ते चेतन पदार्थाप्रमाणें क्रोधित किंवा शांत होऊन दुःख किंवा सुख देतील हें संभवत नाहीं. (प्र०) या संसारांत राजापासून रंकापर्यंत

सर्व लोक सुखी व दुःखी होत आहेत ते ग्रहपीडेपासून नव्हे कीं काय? (उ०) नाहीं. तें त्यांचें दुःख ग्रहांच्या योगानें होत नसून पूर्व पापपुण्यांच्या योगानेंच होत असतें. (प्र०) तर मग ज्योतिषशास्त्र खोटें कीं काय? (उ०) नाहीं. अंक, बीज व रेखागणित (भूगोल, खगोलविद्या) हा जो गणिताचा भाग आहे तेंच खरें ज्योतिष व तें सर्व खरें आहे. पण त्याशिवाय जीं ग्रहफलें देण्याची लीला माजविली आहे ती सर्व खोटी आहे. (प्र०) मग ह्या जन्मपत्रिकावगैरे सर्व खोट्याच कीं काय? (उ०) होय. त्यांनां जन्मपत्रिका न म्हणतां शोकपत्रिका म्हटल्या पाहिजेत. मुलाचा जन्म होतो तेव्हां आनंद होतो पण जेव्हां जोशीबुवा जन्मपत्रिका घेऊन येतात व वाचतात तेव्हांपासून काळजीला सुरुवात होते. धनाढ्य पुरुषाची जन्मपत्रिका करावयाची असली म्हणजे चक्रें, वेलबुट्टयावगैरे बरीच शोभा करून तयार करतात व निर्धनाची साधारणपणेंच तयार केली जाते. जेव्हां जन्मपत्रिका जोशीबुवा घेऊन येतात, तेव्हां घरचीं सर्व मनुष्यें आतुरतेनें विचारतात कीं, "काय जोशीबुवा! पत्रिका तर चांगली आहे ना?" जोशी म्हणतो "अहो! जें आहे तें मी आपणास वाचून दाखवितों. पहा! याचे जन्मग्रह तर फारच उत्तम आहेत. मित्रग्रहहि फार चांगले पडले आहेत. हा धनाढ्य व प्रतिष्ठावान् होऊन बसेल, तेथें आपलें तेज पाडील असा सुलक्षणी निपजेल" इतकें ऐकल्यावर आईबापांनां आनंद होतो व तीं म्हणतात. "वाः जोशीबुवा! फार चांगलें!" धूर्त जोशीबुवांची पक्की खात्री असते कीं, अशा बोलण्यानें आपला कार्यभाग होणार नाहीं, म्हणून तो लगेच म्हणतो. सर्व ग्रह चांगले आहेत खरे, पण याला आठव्यावर्षीं एक कुयोग आहे. त्यावेळीं क्रूर ग्रहांचा योग असल्यामुळें कदाचित मृत्युहि होण्याचा संभव आहे" हें ऐकून त्याच्या आईबापाचा पुत्रजन्मापासून झालेला आनंद नष्ट होऊन तीं शोकाकुल होतात व म्हणतात "जोशीबुवा! याला कांहीं उपाय आहे कीं नाहीं?" जोशी म्हणतो–"हो हो, हीं हीं दानें करावीं, या मंत्रांचा जप करावा व अमुक ब्राह्मणभोजनें करावीं म्हणजे नवग्रहशांति होऊन अपमृत्यूची बाधा बहुधा टळेल." या लोकांच्या शब्दांवर विश्वास ठेवून ते सांगतील त्याप्रमाणें अज्ञानी लोक करतात. गुण आला तर जोशीबुवा म्हणतात कीं, "पहा, मंत्र, ब्राह्मण व देवता यांची शक्ति कशी आहे ती मंत्रसामर्थ्यानें तुझ्या मुलाचे प्राण वाचले इ०" पण जर गुण आला नाहीं तर म्हणतात कीं, "आम्ही पुष्कळ यत्न केला व तुम्हीहि पुष्कळ दानधर्म केला, पण परमेश्वरसत्तेपुढें कोणाचें चालणार आहे? आम्ही तरी काय करावें, त्याचें कर्मच तसें होतें, इ०" या ठिकाणीं अशी व्यवस्था झाली पाहिजे कीं, मंत्रतंत्रानें व्हावयाचें तें कार्य जर झालें नाहीं तर मांत्रिकाकडून दुप्पट, तिप्पट पैसे परत घेतां यावे व जर तो वाचला तरीहि त्याजकडून ते पैसे परत घेतलेच पाहिजेत कारण, "परमेश्वराच्या नियमानुसार व

आपल्या कर्मानुसार तो बरा झाला" यांत जोशानें काय केलें? अवगुण झाला तर मात्र जोशानें म्हणावें कीं, "त्याचें कर्मच तसें होतें, ईश्वरी नियम तोडण्यास कोण समर्थ आहे?" मग बरा झाला असतां आईबापांनीं कां न सांगावें कीं, "अहो जोशीबुवा! हा आपल्या कर्मानुसार व परमेश्वराच्या नियमानुसार बाचला त्यांत तुम्ही काय केलें?" त्याचप्रमाणें कांहीं लोक गुरु बनून लोकांकडून दानें* करवून अनेक पदार्थ उपटतात. त्यांसहि याच प्रकारचीं उत्तरें दिलीं पाहिजेत. वास्तविक या कृत्यांचा व धर्माचा कांहीं संबंध नाहीं.

(५) मंत्रतंत्र.

मंत्रतंत्र व शीतलादिक देवता यांसंबंधानेंहि लोकांनीं अशींच ढोंगें माजविलीं आहेत. कोणी सांगतात कीं, "आम्ही मंत्र जपून दोरा बांधला कीं, त्या मंत्रसामर्थ्यानें, त्या देवतेच्या प्रतापानें किंवा पीराच्या प्रतापानें कोणतेंहि विघ्न उत्पन्न होणार नाहीं." या लोकांनां असें विचारलें पाहिजे कीं, "तुम्ही परमेश्वराचे नियम, मृत्यूची वळ व कर्मफलहीं बदलूं शकतां कीं काय? तुम्ही हा प्रकार करूनहि कितीतरी मुलें मेलीं आहेत व तुमच्या घरचे लोकहि मेले आहेत, त्यांनां कां नाहीं तुम्ही बाचविलेंत? तुमच्या घरच्या लोकांचे प्राण तुमच्या हातून बाचविणें होत नाहीं, मग तुम्ही इतरांनां काय बाचविणार? स्वतः तुम्ही तरी मृत्यूपासून सुटाल असें तुम्हाला वाटतें काय? असें विचारलें म्हणजे ते धूर्त समजतात कीं, या ठिकाणीं आमची डाळ शिजणार नाहीं. या प्रकारचीं हीं दुराचरणें लोकांनीं सोडून दिलीं पाहिजेत व इतर धार्मिक, विद्वान्, निष्कपटी, परोपकारी लोक ज्याप्रमाणें लोकांचें हित करतात त्याप्रमाणें करण्यास लागलें पाहिजे. वरील प्रकारचे मंत्रतंत्रादिक मिथ्या व्यवहार टाकून, धार्मिक वृत्तीनें राहून देशाहित करणें, निष्कपटतापूर्वक विद्या शिकविणें, उत्तम

---

* लुब्धैर्वित्तपरैर्ब्रह्मन् नास्तिकैः सम्प्रवर्तितम्
वेदवादानविज्ञाय सत्याभासमिवानृतम् ॥ ६ ॥
इदंदेयमिदंदेयमिति चायं प्रशस्यते ॥
अतस्तैन्यं प्रभवति विकर्माणि च जाजले ॥ ७ ॥ भारत शां. अ. २६४.

हें दान द्यावें तें दान करणें चांगलें असें जें लिहिलें आहे, तें लोभी, पैसा मिळविण्यासाठीं धडपडणारे, नास्तिक, वेदार्थ न जाणणारे अशा लोकांनींच खोटें लिहिलें आहे. तें खरें नाहीं परद्रव्यापहार करण्याची ही संभावित शैली आहे. अशीं दानें सत्कर्मांत न गणितां कुकर्मांत गणिलीं पाहिजेत. या महाभारतकार व्यासजींच्या वाणीचा जर कोणी विचार करील तर जनतेला आळशी बनऊन देशाच्या हानिला कारण असलेल्या या दानलीलेचें अनिष्ट स्वरूप दिसून येईल. हा खुळसट दानप्रकार सोडून जर लोक राष्ट्रीय उन्नतीकडे त्याचा सदुपयोग करूं लागले तर भारतराष्ट्रोन्नति होणार नाहीं काय!

विद्वानांनां साहाय्य करणें व ज्याप्रमाणें ते लोकोपकार करतात त्याप्रमाणें आपण करणें या गोष्टी सदैव केल्या पाहिजेत. जे लोक रसायन (किमया), मारण, मोहन, उच्चाटन, वशीकरण करतात, त्यांनां महा नीच समजावें. या प्रकारचा उपदेश लहानपणींच मुलांनां केला पाहिजे, म्हणजे त्याच्या योगानें तीं मुलें पुढें तशा भ्रमजालांत फसणार नाहींत व त्या योगानें दुःखहि भोगणार नाहींत. त्याचप्रमाणें त्यांनां असें शिक्षण द्यावें कीं, ज्याच्या योगानें त्यांनां वीर्यरक्षणानें आनंद व वीर्यनाशानें दुःखप्राप्ति होते हें समजेल. यायोगें अर्थातच ते पूर्ववयांत पूर्ण ब्रह्मचारी राहतील.

(६) वीर्यरक्षण.

ज्याच्या शरीरांत वीर्य सुरक्षित राहिलेलें असतें तो निरोगी, बुद्धिवान्, बलिष्ठ पराक्रमी, उत्साही असल्यामुळें सदैव सुखी असतो, वीर्यरक्षण करावयाचें असेल तर स्त्रियादि विषयांविषयीं गोष्टी, विषयी लोकांची संगति, विषयांचें ध्यान, स्त्रियांनां कुदृष्टीनें पाहणें, एकान्तांत राहणें, स्त्रियांशीं वारंवार भाषण करणें व स्पर्शादि करणें इत्यादि कृत्यें सोडलीं पाहिजेत. ज्याला पूर्ण ब्रह्मचर्य पाळावयाचें असेल, त्याणें हीं वरील दुष्कृत्यें टाकून द्यावीं व उत्तम गुरूच्या सन्निध अध्ययन करून पूर्ण विद्या प्राप्त करून घ्यावी. ज्याचें शरीर निर्वीर्य-वीर्यक्षीण-असतें व ज्याला प्रमेहादिक विकार असतात तो महाकुलक्षणी, दुर्बल, निस्तेज, निर्बुद्ध, निरुत्साही, साहस करण्यास असमर्थ, धैर्यहीन, पराक्रम करण्यास असमर्थ व नपूंसक होतो. जर तुम्ही वयाच्या पहिल्या भागांत ब्रह्मचर्यानें वीर्यरक्षण, सुशिक्षण व उत्तम विद्येची प्राप्ति केली नाहीं, तर पुनः या जन्मांत तुम्हांला असा अमूल्य समय मिळणार नाहीं. जोंपर्यंत आह्मी गृहकर्में करणारे लोक जीवंत आहों तोंपर्यंत तुम्ही (मुलांनीं) विद्येचें ग्रहण करून शारीरिक शक्ति वाढविली पाहिजे. या प्रकारचा बोध आईबापांनीं मुलांनां करावा, त्याचप्रमाणें अन्यहि उपयुक्त उपदेश करावा व त्यांच्याकडून योग्य आचरण करऊन घ्यावें; म्हणूनच वरील वाक्यांत "मातृमान् पितृमान्" अशीं पदें घातलीं आहेत. अर्थात् पांच वर्षापर्यंत बालकाला मातेनें शिक्षण द्यावें, सहाव्या वर्षापासून आठ वर्षें होईपर्यंत बापानें शिकवावें व नंतर उपनयन करून ज्या ठिकाणीं पूर्ण विद्वान् शिक्षक आहेत, अशा "**आचार्यकुलां**"मध्यें त्याला पाठवून तेथेंच विद्याभ्यास पूर्ण होईपर्यंत त्याला ठेवावा. तसेंच ज्याठिकाणीं विदुषी स्त्रिया शिक्षकिणी आहेत, त्या ठिकाणीं मुलींनां पाठवून त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था तेथें करावी. शूद्र वर्णाच्या मुलांनां उपनयन केल्यावांचून "**गुरुकुलां**"त विद्याभ्यासासाठीं पाठवावें. विद्यार्थी पुढें विद्वान्, सभ्य व सुशिक्षित व्हावे म्हणून त्यांनां योग्य प्रसंगीं ताडणहि केलेंच पाहिजे: पहा—

(७) शिक्षा.

सामृतैः पाणिभिर्घ्नन्ति गुरवो न विषोक्षितैः ॥
लालनाश्रयिणो दोषास्ताडनाश्रयिणो गुणाः ॥

अ० ८।१।८ ॥ व्या. म. भाष्य.

"माता, पिता, आचार्य जे आपल्या मुलांनां मारतात, ते त्यांचें हित व्हावें म्हणून ताडण करीत असल्यामुळें ते अमृतेंच पाजतात असें समजावें. पण जे फाजील लाड करतात ते विष पाजतात असें जाणावें कारण, लालनापासून दोष व ताडणापासून गुण उत्पन्न होतात." म्हणून शिष्यांनींहि ताडणानें प्रसन्न व लालनानें अप्रसन्न व्हावें कारण, सध्यां होत असलेल्या शिक्षेपासून आपलाच पुढें नफा आहे. परंतु आई, बाप व अध्यापक यांनीं ईर्ष्या, द्वेष, क्रौर्य यांनां वश होऊन शिष्यांनां किंवा मुलांनां कधींहि ताडन करूं नये; वरून भय दाखवून आंतून कृपादृष्टि ठेवावी. ज्याप्रमाणें अन्य प्रमादांसाठीं, त्याचप्रमाणें चोरी, चहाडी, जारकर्म, आळस, प्रमाद, मादक द्रव्यांचें सेवन, मिथ्याभाषण, हिंसा, क्रूरता, ईर्ष्या, द्वेष मोह इत्यादि दोष नाहींसे व्हावे, म्हणून ही शिक्षा करून त्यांच्याकडून सत्याचारांचें ग्रहण करवावें कारण, ज्यानें ज्या पुरुषाच्या समक्ष चौर्यादिक कृत्यें केलीं आहेत त्याची त्याच्यापुढें कधींहि अब्रू राहणार नाहीं. असत्य प्रतिज्ञा करणाराची जशी हानि होते तशी दुसऱ्या कोणाचीहि नाहीं; म्हणून ज्याच्याशीं जशी प्रतिज्ञा केली असेल तसेंच वर्तन त्याच्याशीं करावें. जर कोणी कोणाला सांगितलें, कीं "मी तुला अमूक ठिकाणीं अमूक वेळीं भेटेन किंवा अमूक वस्तु अमूक वेळीं देईन." तर ही प्रतिज्ञा जशीच्या तशीच त्यानें पुरी केली पाहिजे. नाहींतर त्याच्या भाषणावर कोणीहि विश्वास ठेवणार नाहीं; म्हणून सत्यप्रतिज्ञ व सत्यभाषणी सर्वांनीं व्हावें. सर्वांनीं अभिमान सोडून वागावें. आंत एक असणें, बाहेर एक भासविणें व त्यामुळें दुसऱ्याला फसवून, त्याच्या हानीची काळजी मुळींच न करतां आपल्या स्वार्थावहलच काळजी करणें याला छल किंवा कपट असें म्हणतात. या करण्यापासून स्वतःलाहि त्रास होतो मग दुसऱ्याला किती होत असेल? म्हणून असलें कपटी आचरण कोणी करूं नये. दुसऱ्यानें केलेल्या उपकारांनां न मानतां ते विसरणें याला कृतघ्नता असें म्हणतात. हाहि फार मोठा दुर्गुण आहे म्हणून तो सर्वांनीं सोडावा. क्रोधादिक दोष सोडून देऊन शांत व मधुर भाषण सर्वांनीं करावें व तेंहि मित असावें. उगीच बडबडत बसूं नये. जितकें बोललें पाहिजे त्याहि

---

(१) वाजवीपेक्षां फाजील व क्रूरतेनें शिष्यांनां मारणाऱ्या गुरूचें तें क्रूरपणाचें कृत्य योग्य आहे, असा याचा अर्थ नव्हे. प्रसंगीं योग्य शिक्षा केली असतां फायदा होतो हाच वरील श्लोकाचा मतार्थ आहे.

पेक्षां थोडें कमी भाषण करावें. थोरांनां मान द्यावा, ते आले असतां, त्यांनां मान देण्यासाठीं उठून, "**नमस्ते**" करून म्हणजे मी आपला सत्कार करतों असें म्हणून त्यांनां उत्तम आसन द्यावें. आपण उच्च आसनावर बसून त्यांनां खालीं बसावयास लावूं नये. सभेमध्यें अशा ठिकाणीं बसावें कीं, जेवढी योग्यता असेल व जिथून आपणास कोणी घालवून देणार नाहीं. कोणाशीं विरोध करूं नये. संपन्न बनून गुणांचा स्वीकार व दोषांचा त्याग सदैव करावा. नेहेमीं सज्जनांचा संग करून दुर्जनापासून दूर रहावें. माता, पिता व आचार्य यांची तन, मन धन इत्यादि उत्तम पदार्थांनीं प्रीतिपूर्वक सेवा करावी.

यान्यस्माकꣳ सुचरितानि तानि त्वयोपास्यानि नो इतराणि ॥

—तै—प्र० ७।११।

याचा अभिप्राय असा आहे कीं, आई, बाप व गुरु यांणीं आपल्या मुलांनां व शिष्यांनां सदैव उत्तम उपदेश करावा व असें सांगावें कीं, " हे मुलांनो! आमच्या आचरणांत जें जें उत्तम धर्माचरण असेल त्याचेंच तुम्ही अनुकरण करा, पण आमच्यांत जें जें दुराचरण असेल तें तें तुम्ही टाकून द्या." जें सत्य असेल त्याचा सदैव स्वीकार करून दुसऱ्यांमध्यें त्याचा प्रकाश करा. कोणीहि पाखंडी व दुराचारी मनुष्यावर कधींहि विश्वास ठेवूं नये; माता, पिता व आचार्य जें उत्तम कर्म करण्यास आज्ञा करतील तें उत्तम प्रकारें पुरें करावें. आईबापांनीं जीं जीं उपदेशपर वाक्यें, सूत्रें व जे जे उपदेशपर वेदमंत्र, श्लोकवगैरे पाठ करून घेतले असतील त्याचें शिक्षकांनीं पुनः त्यांस स्मरण करून द्यावें व ज्याप्रमाणें "प्रथम समुल्लास" मध्यें परमेश्वरविषयक व्याख्यान केलें आहे, त्याचप्रमाणें परमात्मस्वरूप मानून त्याचीच उपासना करावी. ज्याच्या योगानें आरोग्य, बुद्धि, बल व विद्या हीं वाढतील, त्याचप्रमाणें भोजन, आच्छादन व व्यवहार करावे. जेवढी भूक लागली असेल त्याहून थोडें कमी खावें. मद्यमांस व धूम्रपानादिक व्यसनें यांचें सेवन कधींहि करूं नये. पाण्याची खोली माहीत नसेल तेथें पोहण्याचा प्रयत्न करूं नये कारण, जलचर प्राणी व अन्यपदार्थ यांच्यापासून तेथें दुःख प्राप्त होण्याचा संभव असतो. चांगलें पोहतां येत नसेल तर बुडून मरण्याचेंहि भय असतें. म्हणून " नाविज्ञाते जलाशये " इत्यादि मनुवचनांत अविज्ञात जलाशयामध्यें प्रविष्ट होऊन स्नानादिक करूं नयेत असें सांगितलें आहे. तसेंच—

दृष्टिपूतं न्यसेत्पादं वस्त्रपूतं जलं पिबेत् ॥
सत्यपूतां वदेद्वाचं मनःपूतं समाचरेत् ॥

मनु० ६।४६ ॥

"उंच सखल जमीन पाहून चालावें, वस्त्रानें गाळून पाणी प्यावें, सत्यानें पवित्र असलेलेंच भाषण बोलावें व मनानें विचार करून जें उत्तम ठरेल तें करावें."

माता शत्रुः पिता वैरी येन बालो न पाठितः ॥
न शोभते सभामध्ये हंसमध्ये बको यथा ॥

चाणक्यनीति. अ. २।११ ॥

ज्यांणीं आपल्या मुलाला योग्य शिक्षण दिलें नाहीं, ते आईबाप त्या मुलांचे शत्रु होत. ते अशिक्षित विद्वानांच्या सभेमध्यें शोभत नाहींत. ज्याप्रमाणें हंसांमध्यें बगळा शोभत नाहीं त्याप्रमाणें विद्वानांमध्यें अविद्वानांची स्थिति होते." म्हणून आईबापाचें हें अवश्य कर्तव्य, परमधार्मिक व कीर्ति वाढविणारें काम आहे कीं, त्यांणीं आपल्या संतानाला तन, मन, धन यांच्यायोगानें विद्या, धर्म व सभ्यता यांचें उत्तम शिक्षण द्यावें. याप्रमाणें बालशिक्षणांविषयीं थोडक्यांत लिहिलें आहे, यावरून सूज्ञांनीं जाणावें.

इति सुभाषाविभूषिते बालशिक्षाविषये द्वितीयः समुल्लासः संपूर्णः ॥ २ ॥

अथ तृतीयसमुल्लासः ।

अथाऽध्ययनाध्यापनविधिं व्याख्यास्यामः ।

(१) विद्या हेंच खरें भूषण.

आतां ह्या तिसऱ्या समुल्लासामध्यें पठणपाठनाचा प्रकार सांगावयाचा आहे आपल्या मुलांवाळांनां उत्तम विद्या, सुशिक्षा, सद्गुण, सत्कर्म व सत्स्वभावरूप आभरणांनीं भूषित करणें हें माता, पिता, आचार्य व संबंधी यांचें मुख्य कर्तव्य आहे. सुवर्ण, चांदी, माणीक, मोतीवगैरे प्रकारचे दागिने घातल्यानें मनुष्याचा आत्मा सुभूषित कधींहि होऊं शकत नाहीं असलीं-सुवर्णादिक-आभरणें घातल्यानें वृथा देहाभिमान, विषयासक्ति, चोरादिकांपासून मृत्यूचें भयवगैरे अनिष्ट फलें प्राप्त होतात दागिने अंगावर असल्यामुळें पुष्कळ मुलें दुष्टांच्या हातांनीं मरण पावलीं आहेत, अशीं उदाहरणें अनेक आहेत. पहा—

विद्याविलासमनसो धृतशीलशिक्षाः सत्यव्रता रहितमानमलापहाराः ॥ संसारदुःखदलनेन सुभूषिता ये धन्या नरा विहितकर्मपरोपकाराः ॥१॥

"ज्या पुरुषाचें मन विद्येच्या विलासामध्यें तत्पर असतें, उत्तम शील व स्वभाव यांनीं युक्त, सत्यभाषणादि नियम पालन करणारे, अभिमान व अपवित्रता हीं ज्यांच्याजवळ नाहींत दुसऱ्यांच्या मलीनतेचाहि नाश करणारे, सत्योपदेश व विद्यादान करून अन्य जनांचीं दुःखें नाहींशीं करणारे, परोपकार व विद्या यांनीं सुभूषित आणि वेदविहित कर्में करून दुसऱ्यांस साहाय्य करणारे जे मनुष्य (किंवा ज्या स्त्रिया) असतील ते सर्व धन्य होत." याप्रमाणें विद्येचें महत्त्व आहे, म्हणून आठ वर्षांनंतर मुलांनां किंवा मुलींनां शिक्षणासाठीं पाठशाळेंत अवश्य पाठवून द्यावें. जे पुरुष किंवा ज्या स्त्रिया दुर्वर्तन करणाऱ्या असतील, त्यांच्याकडून कधींहि मुलांनां शिक्षण देऊं नये. जे विद्वान् व धार्मिक असतील त्यांच्याचकडून शिक्षण देण्यांत यावें. द्विजांनीं आपल्या मुलांचें यथातथ्य उपनयन (यज्ञोपवीत) संस्कार करून (व कन्यांनां यथायोग्य संस्कार करून) "**आचार्यकुलां**" मध्यें पाठवून द्यावें. ह्या पाठशाला एकान्तजागीं (शहरापासून दूर) असाव्या. मुलांच्या व मुलींच्या शाळेमध्यें अंतर निदान दोन कोसांचें तरी असावें. मुलांच्या पाठशालेमध्यें पुरुष शिकविण्यासाठीं व इतर कामें कर-

ण्यासाठीं असावे व कन्यांच्या पाठशालेमध्यें तीं कामें करण्यासाठीं स्त्रिया असाव्या. स्त्रियांच्या पाठशालेमध्यें पांच वर्षांचेहि मुलानें व मुलांच्या पाठशालेंत पांच वर्षांच्याहि मुलीनें जाऊं नये अशी व्यवस्था केलेली असावी. अर्थात् दोघेंहि जोंपर्यंत ब्रह्मचर्यावस्थेंत आहेत तोंपर्यंत दर्शन, स्पर्शन, एकान्तसेवन, भाषण. विषयकथा, परस्परक्रीडा, विषयांचें ध्यान व संग या आठ प्रकारच्या मैथूनांपासून त्यांणीं दूर असलें पाहिजे; तसेच अध्यापक लोकांनींहि त्या दुष्ट आचरणापासून त्यांस दूर ठेवावें. याच्या योगानें ते उत्तम विद्वान्. सुशिक्षित, सुशील, सुस्वभावी शारीरिक व आत्मिक बलानें युक्त होऊन, ते नेहेमीं आनंदाला वाढविणारे होतील नगरापासून किंवा गांवापासून चार कोस दूर पाठशाला असावी. त्याठिकाणीं वस्त्र, पात्र, खाणेंपिणें, आसन, शयन हीं सर्वांनां–अर्थात् राजकुमार, राजकुमारी किंवा दरिद्री लोकांचीं मुलें या सर्वांनां–सारखीं दिलीं जावीं. सर्वांनीं, घराकडची चैन सोडून तपश्चर्येप्रमाणें तेथें राहून, ब्रह्मचर्य पालन केलें पाहिजे. आईबाप व मुलें यांची परस्पर भेट ब्रह्मचर्य संपेपर्यंत होऊं देऊं नये व एकमेकांचा एकमेकांशीं पत्रव्यवहारहि ठेवण्याची मनाई असावी कारण, त्यापासून गृहसंबंधी चिंता विद्यार्थ्याच्या मनामध्यें उत्पन्न होऊन विद्या शिकण्यांत विघ्नें उत्पन्न होण्याचा संभव आहे विद्यार्थ्यांनां विद्या वाढविण्याचींच एक चिंता असावी. ज्यावेळीं मुलें फिरावयास जातील तेव्हां त्यांच्या बरोबर अध्यापकानें असावें, म्हणजे तीं कोणत्याहि प्रकारची कुचेष्टा व आलस्यादि प्रमाद करूं शकणार नाहींत.

कन्यानां संप्रदानंच कुमाराणां च रक्षणम् ॥

मनु० अ० ७।१५२॥

याचा अभिप्राय असा आहे कीं, "राजनियम व जातिनियम असा झाला पाहिजे कीं, लोकांनीं आपल्या मुलांनां व मुलींनां पांचव्या वर्षापासून तों आठव्या वर्षापर्यंत अवश्य पाठशाळेंत पाठविलेंच पाहिजे. जे न पाठवितील ते दंडनीय होतील" प्रथमतः मुलांचा यज्ञोपवीतसंस्कार घरीं होऊन दुसरा पाठशालेमध्यें किंवा आचार्यकुलामध्यें व्हावा. माता, पिता किंवा आचार्य यांनीं आपल्या मुलांनां व मुलींनां अर्थासह गायत्री मंत्राचा उपदेश करावा:—

(२) गायत्रीमंत्र.

ओ३म् । भूर्भुवः स्वः । तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ॥ धियो यो नः प्रचोदयात् ॥ यजु० ३६।३॥

"(ओ३म्) या शब्दाचा अर्थ प्रथमसमुल्लासामध्यें केला आहे. तो तेथें पहावा.

आतां तीन महाव्याहृतींचे अर्थ संक्षेपानें येथें देतों. **(भूरिति वै प्राणः। यः प्राणयति चराचरं जगत् स भूः स्वयंभूरीश्वरः)** परमेश्वर सर्व जगाच्या जीवनाला आधार आहे, स्वयंभू व प्राणाहूनहि प्रिय आहे म्हणून त्याला प्राण किंवा "भू" असें म्हणतात. **(भुवरित्यपानः। यः सर्वं दुःखमपानयति सोऽपानः)** परमेश्वर स्वतः दुःखरहित आहे व जे जीव त्याचा आश्रय करतात, त्यांचींहि दुःखें तो नाहींशीं करतो म्हणून त्यालाच अपान किंवा "भुव" असें नांव आहे **(स्वरिति व्यानः। योविविधं जगत् व्याप्नोति व्यानयति स व्यानः)**–परमेश्वर सर्वत्र व्याप्त व सर्वांचें धारण करणारा आहे म्हणून त्याला व्यान किंवा " स्वः " असें म्हणतात. हीं वरील तीनहि वचनें तैत्तिरीय आरण्यक प्रपा ०७।५ मध्यें आहेत] **(सवितुः। यः सुनोत्युत्पादयति सर्वं जगत् स सविता तस्य)** जो सर्व जगाचा उत्पन्न करणारा व सर्वांनां ऐश्वर्य देणारा आहे, तो " सविता " समजावा. **(देवस्य। यो दीव्यति दीव्यते वा स देवः)** सर्व सुखें प्राप्त करून देणाऱ्या व ज्याच्या प्राप्तीची इच्छा सर्व करीत आहेत, अशा परमात्म्याचें **(वरेण्यम्। वर्तुमर्हम्)** स्वीकार करण्यास योग्य असें अति श्रेष्ठ **(भर्गः शुद्धस्वरूपम्)** शुद्ध स्वरूप अथवा सर्वांनां पवित्र करणारें चेतन-ब्रह्मस्वरूप जें आहे, **(तत्)** त्याचें आह्मी **(धीमहि धरेमहि)** धारण करतों कारण, **(यः जगदीश्वरः)** तो जगदुत्पादक परमात्मा **(नः)** आमच्या **(धियः)** बुद्धीला **(प्रचोदयात् प्रेरयेत्)** प्रेरणा करतो. अर्थात् त्यानें आह्मांला वाईट कर्मापासून दूर करून आह्मांला सत्कर्मांमध्यें प्रवृत्त करावें. तात्पर्य "**(हे परमेश्वर! हे सच्चिदानन्दस्वरूप! हे नित्य-शुद्ध बुद्ध-मुक्तस्वभाव! हे अज निरञ्जन! निर्विकार! हे सर्वान्तर्यामिन्! हे सर्वाधार जगत्पते! सकलजगदुत्पादक! हे अनादे विश्वम्भर! सर्वव्यापिन्! हे करुणामृतवारिधे! सवितुः देवस्य तव यत् ओम् भूर्भुवःस्वः वरेण्यं भर्गोऽस्ति तद्वयं धीमहि दधीमहि धरेमहि ध्यायेम वा कस्मै प्रयोजनायेत्यत्राह। हे भगवन्! यः सविता देवः परमेश्वरो भगवान् अस्माकं धियः प्रचोदयात् स एवास्माकं पूज्य उपासनीय इष्टदेवो भवतु नातोऽन्यं भवत्तुल्यंभवतोऽधिकं च कंचित् कदाचित् मन्यामहे.)**" हे मनुष्य हो! जो सर्व समर्थांमध्यें समर्थ, सच्चिदानंदानन्तस्वरूप, नित्य शुद्ध, नित्य बुद्ध, नित्य मुक्त आहे व जो कृपासागर, योग्य न्याय करणारा, जन्ममरणादि क्लेशरहित, आकाररहित, सर्वज्ञ, सर्वांचा धर्मपिता, सर्वांनां उत्पन्न करणारा अन्नादिकांनीं सर्वांचें पोषण करणारा, सकल ऐश्वर्ययुक्त, जगत्कर्ता, शुद्धस्वरूप, प्राप्ति करून घेण्यास योग्य असा जो शुद्ध चेतनस्वरूप परमात्मा आहे—त्याचींच आह्मी धारणा किंवा ध्यान करितों;

कारण, तो परमात्मा आमच्या आत्म्यांमध्यें व बुद्धीमध्येंहि व्यापक असल्यामुळें आह्मांला अधर्मयक्त मार्ग व दुराचार यांपासून दूर करून सयुक्त श्रेष्ठ मार्गामधून जाण्याविषयीं प्रेरणा करील. या परमात्म्याशिवाय दुसऱ्या कोणत्याहि पदार्थाचें ध्यान करण्यांत आह्मी कधींहि लागतां नये कारण, त्याच्याशीं तुल्यहि दुसरा कोणी नाहीं व त्याहून मोठाहि दुसरा कोणी नाहीं. तोच सर्वांतर्यामि परमात्मा आमचा पिता, राजा, न्यायाधीश व सर्व सुखें प्राप्त करून देणारा आहे.''

याप्रमाणें अर्थासह गायत्रीमंत्राचा उपदेश करावा व स्नान, आचमन, प्राणायाम, मार्जनादि क्रियारूप असलेलें संध्योपासनहि त्याला शिकवावें. प्रातःकाळीं स्नान करावें, स्नानापासून बाह्य अवयवांची शुद्धि व त्यामुळें आरोग्य प्राप्त होतें. पहा—

अद्भिर्गात्राणि शुध्यन्ति मनः सत्येन शुध्यति ॥
विद्यातपोभ्यां भूतात्मा बुद्धिर्ज्ञानेन शुध्यति ॥ १०९ ॥

मनु० अ० ५

पाण्यानें शरीराच्या बाहेरील अवयवांची शुद्धि होते, सत्याचरणानें मन निर्मळ होतें, विद्या व तप-अर्थात् सर्व प्रकारचे कष्ट सहन करून धर्माचरण केल्यानें जीवात्मा शुद्ध होतो व पृथिवीपासून परमेश्वरापर्यंत असलेल्या सर्व पदार्थांच्या ज्ञानानें बुद्धि शुद्ध होते.'' म्हणून शरीरशुद्धीसाठीं स्नान प्रथम करणें आवश्यक आहे. प्राणायामापासून पुढें लिहिलेला लाभ होतो—

योगाङ्गानुष्ठानादशुद्धिक्षये ज्ञानदीप्तिराविवेकख्यातेः ॥

योगदर्शन. साधन० २८

मनुष्य जसा जसा प्राणायाम करतो त्या त्याप्रमाणें त्याच्या अशुद्धींचा नाश होऊन, त्याच्यामध्यें ज्ञानाचा प्रकाश पडूं लागतो व मुक्ति प्राप्त होईपर्यंत आत्मज्ञान प्रतिक्षणीं वाढत जातें.'' तसेंच—

दह्यन्ते ध्मायमानानां धातूनां हि यथा मलाः ॥
तथेन्द्रियाणां दह्यन्ते दोषाः प्राणस्य निग्रहात् ॥ मनु. ६।७१ ॥

'' ज्याप्रमाणें अग्नीमध्यें तापवून सुवर्णादिक धातूंचे मल नाहींसे होतात त्याच प्रमाणें प्राणायामाच्या योगानें इंद्रियांतील दोष नाहींसें होऊन तीं निर्मल होतात.

(३) प्राणायामाचा विधि.

प्रच्छर्दनविधारणाभ्यां वा प्राणस्य ॥ योगद० समाधि० ३४ ॥

ज्याप्रमाणें वमनसमयीं कोठ्यांतून अन्न, जलवगैरे जोरानें बाहेर पडतें, त्याचप्रमाणें प्राणवायूला बाहेर फेंकणें व यथाशक्ति बाहेरच स्थिर करणें, ही प्राणायामाची एक रीत आहे. याप्रमाणें ज्यावेळीं प्राणवायूला बाहेर रेचक करावयाचा असेल तेव्हां मूलेंद्रियाला वर आकर्षित करावें लागतें तेव्हांच वायु बाहेर स्थिर होतो. याप्रमाणें रेचक करून प्राणवायु बाहेरच स्थिर केला म्हणजे जीव थोड्याच वेळांत घाबरा होऊं लागतो, असें होण्यापूर्वीच हळू हळू प्राणवायूला पुनः आंत घ्यावा व पुनः पूर्ववत् रेचक करावा आपल्या सामर्थ्याप्रमाणें हे प्राणायाम करावे. प्राणायाम करतांना मनांत "ओ३म्" काराचा जप करावा. याप्रमाणें केल्यानें आत्मा व मन यांची पवित्रता होऊन स्थिरता होते. यालाच "बाह्यविषय" प्राणायाम असें म्हणतात. दुसरा "अभ्यंतर" प्राणायाम यांत प्राणवायूचें आंतच स्थिरीकरण–कुंभक-होईल तितका करावयाचा असतो. तिसरा "स्तंभवृत्ति." एकाच वेळीं आंतला आंत बाहेरचा बाहेर प्राणवायु स्थिर करणें हा होय. चौथा "बाह्याभ्यन्तरापेक्षी" अर्थात् जेव्हां प्राणवायु आंतून बाहेर निघूं लागेल तेव्हां त्याला बाहेर जाऊं न देतां बाहेरून प्राणवायु आंत घेणें व ज्यावेळीं प्राणवायु बाहेरून आंत येऊं लागेल तेव्हां त्याला आंत येऊं न देतां, आंतून बाहेरच्या वायूला धक्का देऊन रोखून धरणें. याप्रमाणें परस्पर विरुद्ध क्रिया केल्या असतां, प्राण आपल्या वश होतो व त्यायोगें मन व इंद्रियेंहि आपल्या स्वाधीन होतात. प्राणायामाच्या योगानें बल व पुरुषार्थ वाढून बुद्धि तीव्र व सूक्ष्म होते; त्यायोगें अति कठीण विषयाचेंहि सहज ज्ञान होऊं शकतें प्राणायामाच्या योगानें शरीरांत वीर्य वाढून तें स्थिर होतें व बल बुद्धि, पराक्रम व जितेन्द्रियता हे गुण अंगीं येऊन अनेक शास्त्रांचें थोडक्या अवधींत अध्ययन करतां येऊन, केलेलें अध्ययन विसरलें जात नाहीं. स्त्रियांनींहि याप्रमाणें प्राणायामादि योगांचा अभ्यास करावा. या शिक्षणाप्रमाणेंच भोजन, आच्छादन, बसणें, उठणें, चालणें, लहानमोठे व्यवहार योग्य रीतीनें करणें इत्यादि व्यावहारिक शिक्षणहि विद्यार्थ्यांस द्यावें. संध्योपासनाला ब्रह्मयज्ञ असेंहि म्हणतात. त्यामध्यें "**आचमन**" विधि आहे, तो असा. तळहातावर पाणी घेऊन त्याच्या मूल व मध्य प्रदेशांत ओंठ लावून तें कंठाच्या खालीं हृदयापर्यंत पोंचेल अशा बेतानें पिणें. हें पाणी हृदयापर्यंत पोंचेल या बेतानेंच घेतलेलें असावें. जास्तहि घेऊं नये व कमीहि घेऊं नये. आचमनाच्या योगानें कंठस्थ कफ व पित्त यांची थोडीशी निवृत्ति होते. नंतर "**मार्जन**" विधि सांगितला आहे. मार्जन करावयाचें असतां, मध्यमा व अनामिका या बोटांनीं पाणी घेऊन नेत्रादि अवयवांवर शिंतोडे पडतील अशा बेतानें फेंकावें. मार्जनाच्या योगानें आळस नाहींसा होतो. पाणी नसेल तर हे विधि करूं नयेत पण संध्या करावी. हे विधि विद्यार्थ्यांनां शिकवून झाले म्हणजे मग

"समंत्रक प्राणायाम, मनसा परिक्रमण, उपस्थान," हीं शिकवून नंतर परमेश्वराची "स्तुति, प्रार्थना व उपासना" ह्यांची रीति शिकवावी. नंतर "**अघमर्षण**" शिकवावें. अघमर्षण म्हणजे पापनाशन-पाप करण्याची इच्छाहि न करणें. हें संध्योपासन एकान्त स्थलीं एकाग्रचित्त करून दररोज करावें.

अपां समीपे नियतो नैत्यकं विधिमास्थितः ॥
सावित्रीमप्यधीयीत गत्वारण्यं समाहितः ॥ मनु० २।१०४ ॥

" अरण्यांत एकान्त प्रदेशांत जाऊन, जलाशयाजवळ बसून सावधान चित्तानें नित्यकर्म करून गायत्रीमंत्राचें अर्थज्ञानपूर्वक उच्चारण करावें " व त्याप्रमाणें आपली वर्तणूक ठेवावी. गायत्रीमंत्राचें अध्ययन करणें व जप मनानें करणें अत्यंत उत्तम आहे असें जाणावें.

(४) देवयज्ञ.

पंचमहायज्ञांपैकीं संध्योपासन किंवा ब्रह्मयज्ञ हा पहिला असून "देवयज्ञ" हा दुसरा यज्ञ आहे. हे दोनहि यज्ञ, सकाळीं व संध्याकाळीं दिवस व रात्रीच्यावेळीं, केलेच पाहिजेत. या संधीसमयीं निदान एक घण्टाभर (एकतासपर्यंत) तरी परमेश्वराचें ध्यान एकाग्र अंतःकरणानें करावें. ज्याप्रमाणें योगी लोक समाधिस्थ होऊन परमात्मध्यान करतात, त्याचप्रमाणें संध्योपासनहि एकाग्रचित्तानेंच केलें पाहिजे. अग्निहोत्रालाच देवयज्ञ असें म्हणतात. तो सूर्योदयानंतर सकाळीं व सूर्यास्तापूर्वी संध्याकाळीं करावा. अग्निहोत्रासाठीं एक धातूचें किंवा मातीचें "अग्निकुंड" असावें व त्याच्या



तोंडाची लांबीरुंदी १२ किंवा १६ अंगुळें असून त्याच्या तळाची लांबीरुंदी ३ किंवा ४ अंगुळें असावी. हें कुंड चौरस असावें. त्याचप्रमाणें वेदी करावयाची असेल तर तीहि तोंडाच्या आकाराच्या चतुर्थांश तळाचा आकार, याप्रमाणांत असावी. हवनासाठीं चंदन, पलाश, आम्र, खदिर, रुई वगैरे श्रेष्ठ लांकडांच्या समिधा वेदीच्या व कुंडाच्या प्रमाणानें लहान मोठ्या असाव्या. कुंडांमध्यें पूर्वोक्त समिधा कांहीं घालून मध्यें अग्नि स्थापन करावा व त्यावर पुनः समिधा ठेवाव्या.

एक प्रोक्षणीपात्र, एक प्रणीतापात्र, एक आज्यस्थाली व एक चमस इतकीं पात्रें





ध्यावीं. आज्यपात्र हें तूप ठेवण्यासाठीं सोईचें भांडें आहे. चमस हा सोनें, चांदी किंवा लांकूड यांपैकीं कशाचाहि असला तरी हरकत नाहीं. असो, याप्रमाणें यज्ञाचीं उपकरणें घेऊन प्रणीता व प्रोक्षणीपात्रांत पाणी घालावें व आज्यस्थलीमध्यें तूप घालावें. तूप तापवून पातळ करावें. प्रणीतादि पात्रांतून हात वगैरे धुण्यासाठीं पाणी घेण्यास सोईचें होईल अशा बेतानें तीं पात्रें मांडावीं. नंतर तें तूप-सन्निध ठेवून पुढील मंत्रांनीं हवन करावें.

ओम् भूरग्नये प्राणाय स्वाहा। भुवर्वायवेऽपानाय स्वाहा। स्वरादित्याय व्यानाय स्वाहा । भूर्भुवःस्वरग्निवाय्वादित्येभ्यः प्राणापानव्यानेभ्यः स्वाहा ॥

इत्यादि अग्निहोत्राच्या मंत्रांनीं एक एक आहुति देऊन अधिक आहुति देणें असेल तर—

विश्वानि देव सवितर्दुरितानि परासुव ॥ यद्भद्रं तन्न आसुव ॥ यजु० अ० ३० । ३ ॥

या मंत्रानें किंवा पूर्वी लिहिलेल्या "तत्सवितु०" या सावित्री मंत्रानें व्याह्या. "ओम्" "भूः" "प्राणः" वगैरे परमेश्वराच्या नांवांचे अर्थ पूर्वी दिलेले आहेतच. ज्या मंत्रानें हवन केलें जातें त्याच्या शेवटीं "स्वाहा" हा शब्द म्हटला पाहिजे. "स्वाहा" शब्दाचा अर्थ "(सु+आह) आत्म्यामध्यें जसें सत्यज्ञान असेल तसेंच बोलावें व परमेश्वरानें जगतामध्यें प्राण्यांच्या सुखासाठीं जसे अनंत उपकार केले आहेत तसे मनुष्यानेंहि करावे." असा आहे.

(५) होमाचें फल.

(**प्रश्न**) होमापासून काय उपकार होतो? (**उत्तर**) सर्व लोकांस हें माहित आहे कीं, विघडलेल्या दुर्गंधयुक्त वायु व जल यांच्यायोगानें रोग उत्पन्न होतात व

त्यांच्यायोगानें मनुष्यांनां दुःख होतें; म्हणून सुगंधयुक्त वायु व जल यांच्यायोगानें आरोग्य वाढून रोगानिवृत्ति होते व त्यामुळें सुखप्राप्ति होते. (**प्रश्न**) चंदन उगाळून चहूंकडे लावावें व तूपवगैरे पदार्थ मनुष्यांनां खाण्यासाठीं द्यावे म्हणजेहि आपण म्हणतां ते उपकार होतील. मग ते सर्व पदार्थ अग्नींत जालून कां व्यर्थ घालवितां? (**उत्तर**) जर तुम्हांला पदार्थविद्येची माहिती असती तर तुम्ही असें कधींहि म्हटलें नसतें वास्तविक पाहतां कोणत्याहि द्रव्याचा अभाव होत नाहीं. पहा ज्या ठिकाणीं हवन होत असतें त्या ठिकाणाहून दूर स्थळीं असणाऱ्या मनुष्यालाहि त्या त्या हवनीय द्रव्यांचा वास येतो, त्याच प्रमाणें एके ठिकाणीं असणाऱ्या दुर्गंधाचाहि येतो. या एका गोष्टीवरून समजा कीं, हवन करण्यासाठीं अग्नींत घातलेला पदार्थ सूक्ष्म होऊन वायूंत मिसळतो व आसपासच्या सर्व प्रदेशांतील हवा स्वच्छ करून तेथील रोगोत्पादक दुर्गंधाची निवृत्ति करतो. (**प्र०**) जर असें असेल तर केशर, कस्तुरी, अत्तर, सुगंधित फुलें घरांत ठेवावीं म्हणजे वायु सुगंधित होऊन सुखकारक होईल. (**उ०**) पहा. नुसत्या सुगंधामध्यें भेदकशक्ति नसल्यामुळें, घरांतील बिघडलेली व दुर्गंधित हवा बाहेर घालवून त्याठिकाणीं स्वच्छ व सुगंधित हवा आणणें, हें काम त्याच्याकडून होऊं शकत नाहीं. ही भेदकशक्ति अग्नीमध्यें आहे. अग्नीच्या योगानें घरांतील किंवा प्रदेशांतील बिघडलेला वायु पृथक्करणापासून हलका होतो व तो वर जातो व तेथील प्रदेशीं दुसऱ्या ठिकाणचा स्वच्छ वायु येतो. त्या योगानें तेथील आरोग्य वाढतें व रोगराई कमी होते. (**प्र०**) असें असल्यास हवनाच्या वेळीं मंत्र म्हणण्याचें काय प्रयोजन आहे ? (**उ०**) हवनमंत्रामध्यें होमापासून काय काय लाभ* होतात तें सांगितलेलें असतें. पुनः पुन्हां मंत्र म्हटल्यामुळें ते कंठस्थ होतात व वेदांचें पठनपाठन व रक्षणहि होण्यास साहाय्य होतें. याप्रकारें मंत्र म्हटल्यानें लाभ आहेत. (**प्र०**) होम केला नाहीं तर पाप होतें काय ? (**उ०**) होय. कारण मनुष्याच्या शरीरापासून अनेक प्रकारचा रोगोत्पादक दुर्गंध उत्पन्न होतो व त्यामुळें प्रत्यहीं हवा व पाणी हें बिघडत असतें, याकारणानें अनेक प्रकारचे रोग उत्पन्न होऊन प्राणिमात्राला दुःखें भोगावीं लागतात. हें सर्व पाप मनुष्यालाच लागतें.

---

* होमाच्या बाह्य कर्मापासून स्थूलदृष्ट्या होणारा हवाशुद्धिवगैरेचा लाभ सर्वांस समजण्यासारखा आहे परंतु बाह्य कर्मांबरोबर जें अन्तरङ्ग कर्म करावयाचें असतें, तें त्या त्या मंत्रांचा अर्थ समजल्यानेंच करूं लागतें. म्हणून अग्निहोत्रापासून अश्वमेधापर्यंत कोणत्याहि प्रकारचा होम करणें असेल, तेव्हां त्या कर्मांत येणाऱ्या मंत्रांचें प्रथम अर्थज्ञान करून घेऊन मग तें करावें. या योगानें बाह्य अग्नीच्या स्थूल अग्निबरोबर अभ्यन्तर ज्ञानाग्नि प्रज्वलित होऊन दृष्टान्तात्मक बाह्य कर्मांबरोबर अभ्यन्तर सत्कर्में कशीं करावयाचीं असतात, याचा बोध होईल.

हें पाप नाहींसें करण्यासाठीं जितका वायु आपणाकडून बिघडत असेल तितका किंवा त्याहून जास्त स्वच्छ करणें व त्या ठिकाणीं सुगंधाचा फैलाव करणें हें मनुष्याचें अवश्य कर्तव्य आहे. हें सर्व प्रत्यहीं हवन केल्यानें सहज होतें. आतां कोणी म्हणेल कीं, एकालाच ते ते पदार्थ खावयास दिले तर तो लाभ होईल कीं नाहीं ? नाहीं. कारण त्यापासून त्या एकाच व्यक्तीला लाभ होईल, पण हवन केल्यानें त्याचा सुपरिणाम हवेंत राहत असल्यामुळें लाखों लोकांनां लाभ होऊं शकतो. घृतादि पदार्थ खाऊं नयेत असें आमचें म्हणणें नाहीं. शरीरामध्यें बल उत्पन्न करण्यासाठीं ते अवश्य खाल्लेच पाहिजेत; तसेंच होम करण्यापासून आरोग्य वाढतें म्हणून तेहि केलेच पाहिजेत. (प्र०) प्रत्येक मनुष्यानें किती आहुति द्याव्या व प्रत्येक आहुतीचें प्रमाण काय काय असावें ? (उ०) प्रत्येक मनुष्यानें एक वेळ निदान सोळा तरी आहुति दिल्या पाहिजेत व प्रत्येक आहुतीमध्यें सहा मासे वजन तूप तरी निदान असलें पाहिजे. यापेक्षां जास्त केलें तर फारच चांगलें. म्हणूनच पूर्वकालीन आर्यवरशिरोमणिमहाशय, ऋषिमहर्षि, राजेमहाराजे लोक स्वतः मोठमोठे होम करून दुसऱ्याकडूनहि करवीत असत. जोंपर्यंत या हवनांचा क्रम अबाधित चालत होता तोंपर्यंत या आर्यावर्त देशांत रोग नव्हते व सर्व लोक सुखी होते. जर पुनः होमहवनें सुरू होतील तर तसेंच आरोग्य पुन्हांहि प्राप्त होईल यांत शंका नाहीं. असो. याप्रमाणें हे दोन यज्ञ आहेत. पहिला "ब्रह्मयज्ञ" यांत विद्या शिकणें व शिकविणें, संध्योपासन, ईश्वराची स्तुति, प्रार्थना व उपासना करणें यांचा अंतर्भाव होतो. दुसरा "देवयज्ञ" यांत अग्निहोत्रापासून अश्वमेधापर्यंत सर्व यज्ञ व विद्वानांची सेवा, संगति व परोपकार यांचा अंतर्भाव होतो. पण ब्रह्मचर्यामध्यें केवळ ब्रह्मयज्ञ व अग्निहोत्र हींच कर्में करावयाचीं असतात.

(६) उपनयनसंस्कार.

ब्राह्मणस्त्रयाणां वर्णानामुपनयनं कर्तुमर्हति । राजन्यो द्वयोश्च । वैश्यो वैश्यस्येवेति । शूद्रमपि कुलगुणसंपन्नं मन्त्रवर्जमनुपनीतमध्यापयेदित्येके ॥ सुश्रुत सूत्रस्थान अ. २॥

" ब्राह्मणानें ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णांचें, क्षत्रियानें क्षत्रिय व वैश्य यांचें व वैश्यानें फक्त वैश्याचें उपनयन करावें व त्यांनां अध्ययन शिकवावें. तसेंच जो कुलगुणसंपन्न शूद्र असेल, त्याचें उपनयन न करतां, त्याला वेदमंत्रांशिवाय इतर शास्त्रें शिकवावींत. असें अनेक आचार्यांचें मत आहे " पांचव्या किंवा आठव्या वर्षीं मुलांनां व मुलींनां त्यांच्या शाळेंत पाठवून द्यावें. पाठशालेमध्यें पुढें दिल्याप्रमाणें अध्ययनाचा क्रम असावा.

(७) ब्रह्मचर्याची मर्यादा.

षट्त्रिंशदाब्दिकं चर्यं गुरौ त्रैवेदिकं व्रतम् ॥
तदर्धिकं पादिकं वा ग्रहणान्तिकमेव वा ॥ मनु० ३।१॥

"गुरुकुलामध्यें राहून सांगोपांग तीनहि वेदांचें अध्ययन करावें. प्रत्येक वेदाच्या अध्ययनाला बारा वर्षें याप्रमाणें तीनहि वेदांच्या अध्ययनाला छत्तीस वर्षें लागतात. उपनयन आठव्या वर्षीं झालें असल्यास तीन वेदांचें अध्ययन संपेपर्यंत (३६+८) चवेचाळीस वर्षांचें वय होतें, त्याचप्रमाणें हें पूर्ण ब्रह्मचर्य पाळलें जाणें शक्य नसल्यास अठरा वर्षांचें अर्धें ब्रह्मचर्य पालन करावें. हें संपेपर्यंत (१८+८) सव्वीस वर्षांचें वय होतें. किंवा नऊ वर्षांचें ब्रह्मचर्य तरी निदान धारण करावें. अथवा विद्या समाप्त होईपर्यंत ब्रह्मचर्य धारण करावें."

पुरुषो वाव यज्ञस्तस्य यानि चतुर्विꣳशतिवर्षाणि तत्प्रातः सवनं चतुर्विꣳशत्यक्षरा गायत्री गायत्रं प्रातः सवनं तदस्य वसवोऽन्वायत्ताः प्राणा वाव वसवः एते हीदꣳसर्वं वासयन्ति ॥ १ ॥ तं चेदेतस्मिन्वयसि किञ्चिदुपतपेत् स ब्रूयात् प्राणा वसव इदं मे प्रातः सवनं माध्यन्दिन ꣳसवनमनुसंतनुतेति माहं प्राणानां वसूनां मध्ये यज्ञो विलोप्सीयेत्युद्धैव तत इत्यगदोह भवति ॥ २ ॥ अथ यानि चतुश्चत्वारि ꣳशद्वर्षाणि तन्माध्यन्दिन ꣳसवनं चतुश्चत्वारि ꣳशदक्षरा त्रिष्टुप् त्रैष्टुभं माध्यन्दिन ꣳसवनं तदस्य रुद्रा अन्वायत्ताः प्राणा वाव रुद्रा एते हीद ꣳसर्वं रोदयन्ति ॥ ३ ॥ तं चेदस्मिन्वयसि किंचिदुपतपेत् स ब्रूयात्प्राणा रुद्रा इदं मे माध्यं दिन ꣳसवनं तृतीयसवनमनुसंतनुतेति माहं प्राणानां रुद्राणां मध्ये यज्ञो विलोप्सीयेत्युद्धैव तत एत्यगदो ह भवति ॥ ४ ॥ अथ यान्यष्टाचत्वारि ꣳशद्व-

र्षाणि तृतीयꣳसवनमष्टाचत्वारि ꣳशदक्षरा जगती जागतं तृतीयसवनं तदस्यादित्या अन्वायत्ताः प्राणा वा वादित्या एते हीद ꣳसर्वमाददते ॥ ५ ॥ तं चेदेतस्मिन्वयसि किंचिदुपतपेत् स ब्रूयात् प्राणा आदित्या इदं मे तृतीयसवनमायुरनुसंतनुतेति माहं प्राणानामादित्यानां मध्ये यज्ञो विलोप्सीयेत्युद्धैव तत एत्यगदो हैव भवति ॥ ६ ॥ छन्दोग्य उप० प्रपा० ३ खं० १६ ।

ब्रह्मचर्य तीन प्रकारचें आहे, कनिष्ठ, मध्यम व उत्तम. चोवीस वर्षाचें हें कनिष्ठ ब्रह्मचर्य होय. जो पुरुष चोवीस वर्षेपर्यंत जितेंद्रिय राहून, विषयलंपटतावगैरे कुविचार व दुराचरणें न करतां सदाचरणानें राहून वेदादि विद्यांचें व सुशिक्षणाचें ग्रहण करतो, त्याच्या अन्नरसमय शरीरामध्यें वीर्य स्थिर राहिल्यानें तें बलवान् होतें, प्राण बलवान् होतात व शरीरांत असणारा जीवात्मा–जो शुभगुणयुक्त असल्यामुळें सत्काराई, यजनीय आहे व ज्याला " यज्ञ " असें म्हणतात–तोहि सुसंस्कृत होतो किंवा शुभगुणयुक्त होतो. या प्रथम वयामध्यें जो आचार्य ब्रह्मचाऱ्याला विद्यारूपी तपानें तापवितो-शुद्ध करतो, त्याणें त्याला तसाच उत्तम उपदेश करावा. ब्रह्मचाऱ्यानें मनांत असा निश्चय करावा कीं, जर मी या प्रथम वयामध्यें नियमांप्रमाणें ब्रह्मचर्याचें पालन केलें, तर माझें शरीर व आत्मा आरोग्ययुक्त व बलवान् होऊन, माझ्यामध्यें शुभगुण उत्पन्न होतील व माझे प्राणहि शुभगुणयुक्त व बलवान् होतील. हे मनुष्यहो ! तुम्हींहि याप्रमाणें आपलीं सुखें वाढवा. मी जर ब्रह्मचर्याचा चोवीस वर्षेपर्यंत लोप केला नाहीं, चोवीस वर्षें ब्रह्मचर्य पाळून मग गृहस्थाश्रम स्वीकारला तर मी निरोगी राहून माझें आयुष्यहि ७० किंवा ८० वर्षेपर्यंत होईल. मध्यम ब्रह्मचर्य हें आहे कीं, चवेचाळीस वर्षेपर्यंत ब्रह्मचारी राहून वेदाभ्यास व विद्याध्ययन करणें. या ब्रह्मचर्याच्या सामर्थ्यानें त्याचे प्राण, इंद्रियें, अंतःकरण व आत्माहि आपापल्या शक्तीनें बलवान् होऊन, तो मध्यम ब्रह्मचारी दुष्टांनां रडविणारा व सज्जनांचें पालन करणारा होतो. शिष्यानें असें समजावें कीं, "जर मी या प्रथम वयामध्यें आपल्या सांगण्याप्रमाणें ब्रह्मचर्यरूपी तप करीन तर रुद्ररूपी प्राणयुक्त माझें मध्यम ब्रह्मचर्य पूर्ण होईल." हे ब्रह्मचारी लोकहो ! ज्याप्रमाणें ब्रह्मचर्याचा लोप न करतां यज्ञस्वरूप होऊन, आचार्यकुलामध्यें विद्याध्ययन करून व सत्कर्में करून मी बलवान् व रोगरहित झालों आहें, त्याचप्रमाणें तुम्हींहि ब्रह्मचर्य धारण करून रहा." उत्तम ब्रह्मचर्य अठेचाळीस वर्षाचें आहे. ज्याप्रमाणें

४८ अक्षरांचें जगतीवृत्त असतें तसेंच हें अडेचाळीस वर्षांचें ब्रह्मचर्य आहे. जो याचें पालन करतो त्याचे प्राण त्याच्या स्वाधीन होऊन, तो सर्व विद्या जाणणारा होऊं शकतो. आचार्य, माता व पिता यांणीं आपल्या मुलांनां प्रथम वयामध्यें, त्याणीं विद्वान् व सद्गुणी व्हावें म्हणून, गुरुकुलांत पाठवून त्यांच्याकडून ब्रह्मचर्य व अध्ययनरूपी तप करून त्यांनां तपस्वी बनवावें व त्यानां त्याविषयींच उपदेश करावा कीं, ज्याच्या योगानें ते अखंडित उत्तम ब्रह्मचर्याचें पालन करून पूर्णायुषी-अर्थात् चारशें वर्षें-पर्यंत जगणारे-होतील. जे या पूर्ण ब्रह्मचर्याचें नियमपूर्वक पालन करतात, मध्यें केव्हांहि लोप करीत नाहींत, त्यानां कधींहि रोगबिगरे होत नाहींत, अर्थात् ते सदैव उत्साही राहून धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांनां प्राप्त करून घेतात.

(८) विवाहाचा काल.

चतस्रोऽवस्थाः शरीरस्य वृद्धिर्यौवनं संपूर्णता किंचित् परिहाणिश्चेति । आषोडशाद्वृद्धिः । आपञ्चविंशतेर्यौवनम् । आचत्वारिंशतः संपूर्णता । ततः किंचित्परिहाणिश्चेति ॥ पञ्चविंशे ततो वर्षे पुमान् नारी तु षोडशे ॥ समत्वागतवीर्यौ तौ जानीयात्कुशलो भिषक् ॥

सुश्रुत-सूत्रस्था०९३॥

या शरीराच्या चार अवस्था आहेत. (१) सोळा वर्षांपासून पंचवीस वर्षांपर्यंत सप्त धातूंची वृद्धि होते, म्हणून या पहिल्या अवस्थेला "वृद्धि" असें म्हणतात. (२) पंचवीस वर्षांपासून पुढें "यौवन" अवस्था येते. (३) तिसरी "संपूर्णता" अवस्था होय. ही पंचवीसाव्या वर्षापासून चाळीसाव्या वर्षापर्यंत असते. या मुदतींत सर्व शरीरांतील सप्त धातूंची पूर्णता,-पुष्टि-होते म्हणून हिला 'संपूर्णता" असें म्हणतात. (४) चवथी अवस्था "किंचित्परिहाणि" ही आहे. चाळीस वर्षेपर्यंत सर्व शरीर उत्तम रीतीनें पुष्ट झा यानंतर शरीरांत जे धातु बनतात ते स्थिर राहत नाहींत, स्वप्न, प्रस्वेदादिकांच्या द्वारानें बाहेर पडतात म्हणून या अवस्थेला "परिहाणि" असें म्हणतात. चाळीसाव्या वर्षी सर्व शरीर वाढून पूर्ण अवस्थेला प्राप्त होतें; म्हणून विवाह करण्यास हें वय उत्तम आहे. अडेचाळीसाव्या वर्षी विवाह करणें हें सर्वोत्तम होय. (**प्रश्न**) हा ब्रह्मचर्याचा नियम स्त्री व पुरुष या दोघांनांहि तुल्य आहे काय ? (**उत्तर**) नाहीं. पुरुषानें २५ वर्षेपर्यंत ब्रह्मचर्य पालन केलें तर स्त्रीनें १६ वर्षेपर्यंत, पुरुष तीस वर्षे पर्यंत ब्रह्मचारी राहिला तर स्त्रीनें १७ वर्षेपर्यंत, पुरुष ३६ वर्षेपर्यंत राहिला तर स्त्रीनें

१८ वर्षेपर्यंत, पुरुष ४० वर्षेपर्यंत राहिला तर स्त्रीनें २० वर्षेपर्यंत, पुरुष ४४ वर्षेपर्यंत राहिला तर स्त्रीनें २२ वर्षेपर्यंत व पुरुष ४८ वर्षेपर्यंत राहिला तर स्त्रीनें २४ वर्षेपर्यंत रहावें. ज्या स्त्रीपुरुषांनां विवाह करावयाचा असेल त्यांनीं, ४८ वर्षापुढें पुरुषानें व २४ वर्षापुढें स्त्रीनें ब्रह्मचर्यव्रत धरूं नये, विवाह करावा; पण ज्यांनां आजन्म ब्रह्मचारी रहावयाचें असेल त्यांनीं ब्रह्मचर्यव्रतानेंच रहावें. असें आजन्म अविवाहित राहणें हें पूर्णविद्वान्, जितेंद्रिय, निर्दोष, सदाचरणी व योगी स्त्रीपुरुषांचेंच काम आहे कारण, कामविकाराला ताब्यांत ठेवून जितेंद्रियता कायम ठेवणें हें फार कठीण आहे.

(९) यम व नियम.

ऋतंच स्वाध्याय प्रवचने च । सत्यं च स्वाध्यायप्रवचने च ॥ तपश्च स्वाध्यायप्रवचने च । दमश्च स्वाध्याय प्रवचने च ॥ शमश्च स्वाध्यायप्रवचने च । अग्नयश्च स्वाध्यायप्रवचने च ॥ अग्निहोत्रं च स्वाध्यायप्रवचने च । अतिथयश्च स्वाध्यायप्रवचने च ॥ मानुषं च स्वाध्याय प्रवचने च । प्रजा च स्वाध्यायप्रवचने च ॥ प्रजनश्च स्वाध्यायप्रवचने च । प्रजातिश्च स्वाध्यायप्रवचने च ॥ —तैत्तिरीयोपनिषद् प्रपा० ७।९ ॥

हे पठनपाठन करणारांचे नियम आहेत. (ऋतं०) यथार्थ आचरणपूर्वक शिकावें व शिकवावें, (सत्यं०) सत्याचारपूर्वक सत्य विद्या शिकाव्या व शिकवाव्या, (तप०) धर्मानुष्ठानरूपी तप करून वेदादि शास्त्रें शिकावीं व शिकवावीं, (दमः०) बाह्य इंद्रियांनां वाईट कामें व दुराचरणें यांतून परावृत्त करून विद्या शिकावी व शिकवावी, (शम०) मनाला सर्व दोषांपासून दूर ठेवून शिकावें व शिकवावें, (अग्नय०) आहवनीय व विद्युत् वगैरे अग्नींला जाणून शिकावें व शिकवावें, (अग्निहोत्रं०) अग्निहोत्र करून पठनपाठन करावें, (अतिथय०) अतिथींचा सत्कार करून, (प्रजा०) संतान व राज्यांतिल प्रजा यांचें पालन करून, (मानुषं०) मनुष्यसंबंधीं सर्व व्यवहार करून, (प्रजन०) वीर्याचें रक्षण व त्याची वृद्धि करून, (प्रजाति०) आपले पुत्र व शिष्य यांचें पालन करून शिकावें व शिकवावें.

यमान् सेवेत सततं न नित्यं नियमान् बुधः ॥
यमान्पतत्यकुर्वाणो नियमान् केवलान् भजन् ॥ २०४ ॥
मनु० अ० ४

तत्राहिंसासत्यास्तेयब्रह्मचर्यापरिग्रहा यमाः ॥ ३० ॥
शौचसन्तोषतपःस्वाध्यायेश्वरप्रणिधानानि नियमाः ३२
—योगदर्शने साधनपादे.

(१) (अहिंसा) वैरत्याग, (२) (सत्य) सत्य मानणें, सत्य बोलणें व सत्य आचरण करणें, (३) (अस्तेय) कायावाचामनेंकरून चोरी न करणें, (४) (ब्रह्मचर्य) उपस्थ इंद्रियाचा संयम, (५) (अपरिग्रह) अत्यंत लोलुपता सोडून स्वत्वाभिमानरहित होणें, हे पांच " **यम** " आहेत यांचें सेवन मनुष्यमात्रानें सदैव करावें. तसेंच (१) [शौच] स्नानादिकांनीं होणारी पवित्रता, (२) [संतोष] निरुद्योगी गुणाचा अवलंब करून प्रसन्न राहणें हा संतोष नव्हे, तर जितका पुरुषार्थ होणें शक्य असेल तितका करून, हानि किंवा लाभ यांत शोक किंवा हर्ष न मानणें व मनाचा समतोलपणा ठेवणें हा संतोष होय, (३) [तप] धर्मानुष्ठान करण्यांत कष्ट झाले तरी ते सहन करणें, (४) [स्वाध्याय] अध्ययन, अध्यापन, (५) [ईश्वरप्रणिधान] ईश्वराच्या भक्तीमध्यें आत्म्याला अर्पण करणें हे पांच " नियम " आहेत. यांचेंहि सेवन केलें पाहिजे. वरील यमांचें सेवन न करितां फक्त या नियमांचेंच सेवन करूं नये. दोहोंचेंहि सारख्याप्रमाणानें सेवन करावें. जो यम सोडून नियमांचेंच पालन करतो त्याची उन्नति होत नाहीं, इतकेंच नव्हे तर त्याची संसारामध्यें अधोगति होते:—

कामात्मता न प्रशस्ता न चैवेहास्त्यकामता ॥
काम्यो हि वेदाधिगमः कर्मयोगश्च वैदिकः ॥ मनु० २।२ ॥

" अत्यंत कामातुरता किंवा अगदीं निष्कामता कोणालाहि लाभदायक होणार नाहीं कारण, जर कामना नसेल तर वेदांचें ज्ञान व वैदिक कर्में कोणीहि करणार नाहीं."

स्वाध्यायेन व्रतैर्होमैस्त्रैविद्येनेज्यया सुतैः ॥
महायज्ञैश्च यज्ञैश्च ब्राह्मीयं क्रियते तनुः ॥ मनु० २।२८ ॥

" (स्वाध्यायेन) सकल वेदांचें अध्ययन व अध्यापन, (व्रत) ब्रह्मचर्य सत्यभाषणादि नियम, (होम) अग्निहोत्र, सत्याचें ग्रहण व असत्याचा त्याग, सत्यविद्यांचें दान (त्रैविद्येन) वेदांतील ज्ञान कर्म व उपासना, (इज्यया) पक्षांतील इष्टी, (सुतैः) सुसंतानोत्पत्ति, (महायज्ञैः) ब्रह्मयज्ञ, देवयज्ञ, पितृयज्ञ, भूतयज्ञ व नृयज्ञ हे पंचमहायज्ञ,

(यज्ञैः) अग्निष्टोम व शिल्पविद्याविज्ञानादि यज्ञ या सर्व साधनांच्या योगानें (ब्राह्मीयं-तनुः) ब्रह्मप्राप्तीला सानुकूल असें मनुष्यशरीर तयार (क्रियते) केलें जातें."

इन्द्रियाणां विचरतां विषयेष्वपहारिषु ॥
संयमे यत्नमातिष्ठेत् विद्वान् यन्तेव वाजिनाम् ॥

मनु० २।८८ ॥

"ज्याप्रमाणें उत्तम सारथि घोड्याला आपल्या ताब्यांत ठेवतो, त्याप्रमाणें विद्वानानें मन व आत्मा यांनां नीच कामांमध्यें घेऊन जाणाऱ्या विषयांत आपलीं इंद्रियें लागत आहेत, असें पाहतांच त्यांचा त्वरित निग्रह करण्याचा प्रयत्न करावा." कारण—

इन्द्रियाणां प्रसङ्गेन दोषमृच्छत्यसंशयम् ॥
सन्नियम्य तु तान्येव ततः सिद्धिं नियच्छति ॥

मनु० २।९३ ॥

वेदास्त्यागश्च यज्ञाश्च नियमाश्च तपांसि च ॥
न विप्रदुष्टभावस्य सिद्धिं गच्छन्ति कर्हिचित् ॥

मनु० २।९७ ॥

"ज्यावेळीं जीवात्मा इंद्रियांच्या आधीन होतो तेव्हां त्याला फार दोष लागतात व जेव्हां तो इंद्रियें आपल्या ताब्यांत ठेवतो तेव्हां त्याला सिद्धि प्राप्त होतात." 'दुराचारी व अजितेन्द्रिय पुरुषांनीं वेदाध्ययन, दान, यज्ञ, नियम, तप व अन्य कृत्यें जरी केलीं तरी त्यांनां त्यांपासून मिळणारी सिद्धि प्राप्त होत नाहीं."

वेदोपकरणे चैव स्वाध्याये चैव नैत्यिके ॥
नानुरोधोऽस्त्यनध्याये होममन्त्रेषु चैव हि ॥ १०५ ॥
नैत्यके नास्त्यनध्यायो ब्रह्मसत्रं हि तत्स्मृतम् ॥
ब्रह्माहुतिहुतं पुण्यमनध्यायवषट्कृतम् ॥ १०६ ॥

मनु० अ० २

वेदांचें व वेदांगांचें अध्ययन व अध्यापन संध्योपासनादि पंचमहायज्ञ, होमहवन या कृत्यांनां कधींहि अनध्याय-प्रतिबंध नाहीं कारण, नित्यकर्में करण्यास कधींहि अनध्याय नसतो. श्वासोच्छ्वास जसे सदासर्वदा चालू असतात त्याचप्रमाणें नित्यकर्मेंहि

केलींच पाहिजेत; कोणत्याहि दिवशीं तीं सोडतां नये. जसें सदोदित अग्निहोत्रादिक कृत्यें केल्यानें पुण्य मिळतें, त्याचप्रमाणें असत्य भाषणवगैरे दोष केल्यानें सदैव पाप लागतें. म्हणून वाईट कर्माला सदैव अनध्याय व चांगल्या कर्माला सदैव स्वाध्याय आहे, असें समजावें अर्थात् सत्कर्में सदैव करीत रहावें.

अभिवादनशीलस्य नित्यं वृद्धोपसेविनः ॥
चत्वारि तस्य वर्धन्ते आयुर्विद्यायशोबलम् ॥

मनु० २।१२१ ॥

"जो सदा नम्र, सुशील, विद्वान् व वृद्ध यांची सेवा करणारा असतो, त्याचें आयुष्य, विद्या, कीर्ति व बल हीं वाढतात व जो वरील प्रकारचें आचरण करीत नाहीं, त्याला वरील आयुष्यादिक चार फलेंहि मिळत नाहींत."

अहिंसयैव भूतानां कार्यं श्रेयोनुशासनम् ॥
वाक्चैव मधुरा श्लक्ष्णा प्रयोज्या धर्ममिच्छता ॥१५९॥
यस्य वाङ्मनसी शुद्धे सम्यग्गुप्ते च सर्वदा ॥
स वै सर्वमवाप्नोति वेदान्तोपगतं फलम् ॥ १६० ॥

मनु० अ० २ ॥

"विद्वान् व विद्यार्थी यांनीं वैरभाव व हिंसाबुद्धि सोडून सर्व मनुष्यांनां कल्याणकारक मार्गाचा उपदेश करावा. उपदेश करणारानें सदैव मधुर व सुशीलतायुक्त वाणीनें बोलावें. धर्माची उन्नति करण्याची इच्छा धरून सदैव सत्याप्रमाणें आचरण ठेवून सत्याचाच उपदेश करावा. ज्या मनुष्याची वाणी व मन शुद्ध व सुरक्षित असतात, त्यालाच वेदान्तानें–अर्थात् वेदांच्या सिद्धांतानें–सांगितलेलें फल प्राप्त होतें."

संमानाद्ब्राह्मणो नित्यमुद्विजेत विषादिव ॥
अमृतस्येव चाकाङ्क्षेदवमानस्य सर्वदा ॥

मनु० २।१६२ ॥

"जो विषाप्रमाणें प्रतिष्ठेला भितो व अपमानाला अमृताप्रमाणें मानतो तोच ब्राह्मण वेद व परमेश्वर यांनां जाणूं शकतो."

अनेन क्रमयोगेन संस्कृतात्मा द्विजः शनैः ॥ गुरौ वसन्संचिनुयाद् ब्रह्माधिगमिकं तपः ॥ १६४ ॥ योऽ-

नधीत्य द्विजो वेदमन्यत्र कुरुते श्रमम् ॥ स जीवन्नेव शूद्रत्वमाशु गच्छति सान्वयः ॥ १६८ ॥ मनु० अ० २ ॥

"याप्रमाणें उपनयनादि करून द्विज ब्रह्मचारी कुमार व ब्रह्मचारिणी कुमारिका यांनीं हलके हलके वेदाच्या अर्थज्ञानरूपी तपाला वाढवावें." "जो वेद न शिकतां अन्यत्र श्रम करतो, तो आपल्या पुत्रपौत्रांसह शूद्रत्वाला प्राप्त होतो."

वर्जयेन्मधु मांसं च गन्धं माल्यं रसान् स्त्रियः ॥ शुक्तानि यानि सर्वाणि प्राणिनां चैव हिंसनम् ॥ १७७ ॥ अभ्यङ्गमञ्जनं चाक्ष्णोरुपानच्छत्रधारणम् ॥ कामं क्रोधं च लोभं च नर्तनं गीतवादनम् ॥ १७८ ॥ द्यूतं च जनवादं च परिवादं तथाऽनृतम् ॥ स्त्रीणां च प्रेक्षणालम्भमुपघातं परस्य च ॥ १७९ ॥ एकः शयीत सर्वत्र न रेतः स्कन्दयेत्क्वचित् ॥ कामाद्धि स्कन्दयन् रेतो हिनस्ति व्रतमात्मनः ॥ १८० ॥ मनु० अ० २ ॥

"मद्य, मांस, गंध, माला, रस यांचें सेवन, स्त्रीपुरुषांचा संग, आंबट, तिखट पदार्थ, प्राण्यांची हिंसा, अंगांचें मर्दन, उपस्थेंद्रियाला स्पर्श करणें, डोळ्यांत अंजन घालणें, उपानत् व छत्री यांचा उपयोग करणें, काम, क्रोध, लोभ, मोह, भय, शोक, ईर्ष्या, द्वेष यांचा अवलंब करणें, नाचणें, गाणें व बाजावगैरे वाजविणें, द्यूत खेळणें, वाईट गोष्टी, निंदा, मिथ्याभाषण, स्त्रियांनां पाहणें व सान्निध्य करणें व इतर हानिकारक कुमार्ग यांचा ब्रह्मचारी व ब्रह्मचारिणी यांनीं सदैव त्याग करावा. वरील गोष्टी कधींहि त्याणीं करूं नयेत, सर्वत्र एकटें निजावें, वीर्यस्खलन कधींहि करूं नये. जो कामनापूर्वक वीर्याचें स्खलन करतो त्याचें ब्रह्मचर्य भ्रष्ट झालें असें समजावें."

(१०) गुरुचा उपदेश.

वेदमनूच्याचार्योऽन्तेवासिनमनुशास्ति । सत्यं वद । धर्मं चर । स्वाध्यायान्मा प्रमदः । आचार्याय प्रियं धनमाहृत्य प्रजातन्तुं मा व्यवच्छेत्सीः । सत्यान्न प्रमदितव्यम् । धर्मान्न प्रमदितव्यम् । कुशलान्न प्रमदितव्यम् । भूत्यै न प्रमदितव्यम् ॥ स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम् ॥ १ ॥

देवपितृकार्याभ्यां न प्रमदितव्यम् । मातृदेवो भव । पितृदेवो भव । आचार्यदेवो भव । अतिथिदेवो भव । यान्यनवद्यानि कर्माणि तानि सेवितव्यानि नो इतराणि ॥ २ ॥ यान्यस्माक ँ सुचरितानि तानि त्वयोपास्यानि नो इतराणि । ये के चास्मच्छ्रेया ँ सो ब्राह्मणाः । तेषां त्वयाऽसनेन प्रश्वसितव्यम् । श्रद्धया देयम् । अश्रद्धया देयम् । श्रिया देयम् । ह्रिया देयम् । भिया देयम् । संविदा देयम् । अथ यदि ते कर्मविचिकित्सा वा वृत्तविचिकित्सा वा स्यात् ॥ ३ ॥ ये तत्र ब्राह्मणाः सम्मर्शिनो युक्ता अयुक्ताः अलूक्षा धर्मकामास्स्युर्यथा ते तत्र वर्तेरन् । तथा तत्र वर्तेथाः । एष आदेशः एष उपदेशः एषा वेदोपनिषद् । एतदनुशासनम् । एवमुपासितव्यम् । एवमुचैतदुपास्यम् ॥ ४ ॥

तैत्तिरीय० प्रपा० ७ अनु० ११ कं० १।२।३।४ ॥

"आचार्यानें आपल्या शिष्यांनां असा उपदेश करावा कीं, तूं खरें बोल, धर्माचरण कर, प्रमादरहित होऊन व ब्रह्मचर्याच्या नियमांचें पालन करून सर्व विद्यांचें अध्ययन कर, विद्याग्रहण झाल्यावर आचार्याला इष्ट धन दिल्यावर विवाह करून संतानोत्पत्ति कर. चुकीनेंहि कधीं खोटें बोलूं नको, धर्माचाहि प्रमादानें त्याग करूं नको, प्रमाद करून आरोग्य व चतुराई यांचा त्याग करूं नको, उत्तम ऐश्वर्याची वृद्धि होत असतां चुकीनेंहि हानि करून घेऊं नको, प्रमाद करून अध्ययन व अध्यापन यांत विघ्न आणूं नको, विद्वान् व मातापिता, यांची सेवा करण्यांत प्रमाद करूं नको, मातापिता, विद्वान् व अतिथि यांचा सत्कार कर, जीं सत्यभाषणादिक अनिंदित कर्में असतील तींच कर व मिथ्याभाषणादिक निंदित कर्में कधींहि करूं नको. आमचीं जीं कांहीं धर्मयुक्त आचरणें असतील त्यांचा तुम्ही अंगिकार करा व आमचीं जीं काहीं पापाचरणें असतील तीं सोडून द्या. जो कोणी आमच्यामध्यें उत्तम विद्वान् ब्राह्मण असेल त्याच्या जवळ जाऊन तुम्हीं बसा व त्याच्यावरच विश्वास ठेवा श्रद्धेनें द्यावें, अश्रद्धेनें द्यावें, शोभेसाठीं द्यावें, लज्जेनें द्यावें, भयानें द्यावें किंवा प्रतिज्ञेचें उल्लंघन होऊं नये म्हणून

द्यावें. ज्यावेळीं तुम्हांला कर्म, शील, उपासना व ज्ञान इत्यादिकांविषयीं संशय उत्पन्न होईल, त्यावेळीं तेथें जे योगी, आर्द्रचित्त धर्मात्मे, पक्षपातरहित, विचारशील लोक असतील व ते जसे वागत असतील व सांगत असतील त्याप्रमाणें तुम्ही वागा. हीच आमची आज्ञा, हाच आमचा उपदेश व हींच वेदांतील उपनिषद् आहे. हेंच तुम्हांला उत्तम शिक्षण आहे व याच प्रमाणें तुम्हीं आपलें वर्तन ठेवावें, म्हणजे तुमचें कल्याण होईल."

अकामस्य क्रिया काचिद् दृश्यते नेह कर्हिचित् ॥ यद्यद्धि कुरुते किंचित्तत्तत्कामस्य चेष्टितम् ॥ मनु० २।४॥

" जें जें कांहीं मनुष्य करतो तें तें कांहींतरी प्रेरक इच्छेवांचून करीत नाहीं, कारण निष्काम पुरुषाचे नेत्रहि संकोच व विकास पाऊं शकणार नाहींत मग त्याकडून काम होणें तर फारच कठीण."

आचारः प्रथमोधर्मः श्रुत्युक्तः स्मार्त एव च ॥
तस्मादस्मिन्सदा युक्तो नित्यं स्यादात्ममान् द्विजः ॥१०८॥
आचाराद्धि च्युतो विप्रो न वेदफलमश्नुते ॥
आचारेण तु संयुक्तः संपूर्णफलभाग्भवेत् ॥ १०९ ॥

मनु० अ० १

" वेद व वेदानुकूल स्मृतिग्रंथ यांत सांगितलेला जो आचार तोच खरा धर्म होय. (हेंच श्रवण, मनन, अध्ययन, अध्यापन, यांचें फल आहे) अशा वेदप्रणित धर्माचें आचरण सर्वांनीं सर्वदा करावें. जो मनुष्य सदाचार सोडतो त्याला वेदप्रणित धर्मापासून मिळणारें सुखमय फल मिळत नाहीं; पण जो सदाचार संपन्न असतो त्याला तें संपूर्ण फल मिळतें."

योऽवमन्येत ते मूले हेतुशास्त्राश्रयाद्द्विजः ॥
स साधुभिर्बहिष्कार्यो नास्तिको वेदनिन्दकः ॥ ११ ॥
वेदः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः ॥
एतच्चतुर्विधं प्राहुः साक्षाद्धर्मस्य लक्षणम् ॥१२॥ मनु०अ० २

" जो मनुष्य वेद व वेदानुकूल आप्तपुरुष प्रणित शास्त्रें यांचें प्रमाण मानीत नाहीं, त्यांचा अपमान करतो, तो वेदनिंदक असल्यामुळें नास्तिक आहे असें समजावें. त्याला जातींतून, पंक्तींतून किंवा देशांतून साधु-सदाचरणीपुरुषांनीं बाहेर घाल-

वावा." "वेद, वेदानुकूल आप्तपुरुषप्रणीत मनुस्मृत्यादिक शास्त्रें, सदाचार-सत्पुरुषांचा आचार, जो सनातन वेदद्वारा परमेश्वरप्रणित कर्माचरणरूप आचार तो-सदाचार, आपल्या आत्म्याला जें प्रिय अर्थात् सत्यभाषणादिक, हीं चार धर्माचीं लक्षणें आहेत, अर्थात् या चार लक्षणांनीं धर्माविषयीं निश्चय होऊं शकतो." पक्षपातरहित, न्यायानुसार, असत्याला सोडून व सत्याला अनुलक्षून जो आचार असेल तोच धर्म जाणावा. व याच्या उलट अर्थात् पक्षपातयुक्त, न्यायरहित, सत्याला सोडून व असत्याप्रमाणें जें आचरण असेल, तो अधर्म असें जाणावें.

अर्थकामेष्वसक्तानां धर्मज्ञानं विधीयते ॥
धर्मं जिज्ञासमानानां प्रमाणं परमं श्रुतिः॥ मनु० २।१३ ॥

"जो पुरुष द्रव्य व विषय यांत फसलेला नसतो, त्यालाच धर्मांचें ज्ञान प्राप्त होतें. ज्यांना धर्म जाणावयाचा असेल त्यांनीं वेदाच्या द्वारानें धर्म जाणावा, कारण वेदांमध्येंच धर्म व अधर्म यांचा योग्य निश्चय केलेला आहे."

(११) चारहिवर्णांनां शिक्षणाची आवश्यकता.

या प्रमाणें गुरूनें आपल्या शिष्यांला उपदेश करावा. ज्याप्रमाणें ब्राह्मणांना विद्येची आवश्यकता आहे त्याचप्रमाणें राजेलोक, इतर क्षत्रिय, वैश्य व उत्तम शूद्र यांना आहेच ह्मणून त्यांनांहि विद्याभ्यास करूं द्यावा. केवळ ब्राह्मणांनींच विद्याभ्यास केला व इतरांनीं न केला तर राज्यरक्षण, धनसमृद्धि वगैरे इतर वर्णांचीं कामें त्यांस करतां येणार नाहींत व त्यामुळें विद्या व धर्म हीं वाढणार नाहींत. ब्राह्मण तर अध्ययन, अध्यापन करून क्षत्रियादिकांकडून उपजीविका मिळवून असतात. जीविके साठीं क्षत्रियादिकांच्या आज्ञेप्रमाणें ते सध्यां वागत आहेत व दिवसानुदिवस पाखंडी बनत आहेत. जर क्षत्रियादिक सज्ञान व यथावत्परीक्षक असतील तर ब्राह्मणांलाहि उत्तम विद्याभ्यास करून, विद्वान् व सदाचरणी बनून रहावेंच लागेल, कारण इतर सज्ञान जातीपुढें त्यांचें पाखंड मग चालणार नाहीं. पण जर क्षत्रियादिक अविद्वान् असले तर हे ब्राम्हण मन मानेल तसें त्यांना समजावून सांगतील व तसें त्यांच्याकडून करवून घेतील. (हीं उदाहरणें प्रत्यक्ष आहेत.) ह्मणून ब्राह्मणांला जर आपल्या कल्याणाची इच्छा असेल तर त्यांणीं स्वतः व क्षत्रियादिकांकडून वेदाभ्यास व शास्त्राभ्यास करविणें अवश्य आहे; कारण क्षत्रियादिकच विद्या, धर्म, राज्य, लक्ष्मी इत्यादिकांची वृद्धि करणारे आहेत. त्यांना कधींहि भिक्षावृत्तिहि करतां नये व पक्षपातयुक्त व्यवहारहि करतां नये. ज्यावेळीं सर्व वर्ण सुशिक्षित होतील तेव्हां कोणाचाहि पाखंडयुक्त मिथ्याव्यवहार चालूं शकणार नाहीं. यावरून उघड ठरतें कीं क्षत्रिय, वैश्य व शूद्र यानां उपदेश करून सुनियमांनीं चालावयास लावणारे संन्यासी व ब्राह्मण

होत व तसेंच ब्राह्मण, संन्यासी वगैरेनां सुनियमांप्रमाणें वर्तन ठेवण्यास लावणारे क्षत्रियादिक होत. म्हणून सर्व वर्णांच्या स्त्रीपुरुषांनीं अवश्य विद्या शिकून धर्माचा प्रसार केलाच पाहिजे. जें जें शिकावयाचें व शिकवावयाचें असेल तें नीट परीक्षा करून शिकावें किंवा शिकवावें. परीक्षा पांच प्रकारांनीं होत असते.

(१२) पंचविध परीक्षा.

(१) वेद व ईश्वराचे गुण-कर्म-स्वभाव यांनां जें अनुकूल असेल तें सत्य व त्याच्या विरुद्ध जें असेल तें असत्य समजावें.

(२) सृष्टिक्रमाच्या अनुकूल जें असेल तें सत्य व त्याच्या विरुद्ध सर्व असत्य, जसें "आईबापांशिवाय मुलगा झाला" असें कोणीं सांगितलें तर तें असत्य आहे असें समजावें. याचप्रमाणें इतर बाबतींत जाणावें.

(३) धार्मिक, विद्वान्, सत्यवादी व निष्कपटी आप्त पुरुषांच्या उपदेशाला अनुकूल जें असेल तें सत्य व प्रतिकूल असेल तें असत्य समजावें.

(४) आपल्या आत्म्याला पवित्रता व विद्या ह्यांस अनुकूल जें प्रिय असेल-अर्थात् दुसऱ्यानें आपणाशीं जसें वागावें असें वाटत असेल तसें आपण दुसऱ्याशीं वागावें. आपल्याला जसें सुख दुःख होतें तसेंच तें इतरांनांहि होतें व त्यापासून आपणास जसें बरें वाईट वाटतें तसेंच इतरांसहि वाटतें अशा आत्मप्रिय बुद्धीनें जें योग्य तें खरें व अयोग्य तें असत्य होय.

(५) प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शब्द, ऐतिह्य, अर्थापत्ति, संभव व अभाव या आठ प्रमाणांनीं जें ठरेल तें सत्य व इतर असत्य आहे असें समजावें.

अष्टविध प्रमाणांची व्याख्या.

इन्द्रियार्थसन्निकर्षोत्पन्नं ज्ञानमव्यपदेश्यमव्यभिचारि व्यवसायात्मकं प्रत्यक्षम् ॥ न्यायदर्शन १।१।१४॥

(१) "**प्रत्यक्ष प्रमाण**"—श्रोत्र, त्वचा, नेत्र, जिव्हा व नासिका या ज्ञानेन्द्रियांचा शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध या विषयांशीं अव्यवहित-अर्थात् आवरण रहित संबंध होऊन व तत्कालींच इन्द्रियांचा मनाशीं व मनाचा आत्म्याशीं संबंध होऊन जें ज्ञान प्राप्त होतें तें "**प्रत्यक्ष**" ज्ञान होय, पण तें व्यपदेश्य म्ह० संज्ञासंज्ञीच्या संबंधानें उत्पन्न होणारें नसावें. जसें:—कोणी एकानें दुसऱ्याला सांगितलें कीं, "पाणी घेऊन ये." त्याणें त्याप्रमाणें पाणी आणून पुढें ठेवलें व म्हणाला कीं, "हें पाणी आहे" या आणलेल्या पाण्याचे ठिकाणीं "पाणी" ही अक्षरयुक्त संज्ञा

पाणी मागविणारा व आणणारा पहात नसून ज्या पदार्थांची पाणी ही संज्ञा आहे तेंच प्रत्यक्ष आहे. अशा केवळ संज्ञेशिवाय द्रव्यापासून प्रत्यक्ष होणाऱ्या ज्ञानाला "प्रत्यक्ष" असें म्हणतात. शब्दांपासून जें ज्ञान उत्पन्न होतें त्याचा शब्द प्रमाणांत अंतर्भाव होतो. (अव्यभिचारि) जसें कोणी रात्रीच्या वेळीं पुढें दिसलेल्या खांबालाच मनुष्य असें जाणलें पण दिवसा-उजेडल्या नंतर तो मनुष्य नव्हे खांब आहे असें समजलें, या प्रकारच्या विनाशी ज्ञानाला "व्यभिचारी" ज्ञान असें म्हणतात. प्रत्यक्ष ज्ञान असें नसतें म्हणून त्याला "अव्यभिचारि" असें म्हणतात. (व्यवसायात्मकम्) कोणी नदीच्या वाळूच्या ठिकाणीं, दुरून बरोबर न समजल्यामुळें धोतरें आहेत अशी कल्पना करून म्हणतो कीं, "तीं पहा धोतरें वाळत घातलीं आहेत." तसेंच "हा देवदत्त उभा आहे कीं यज्ञदत्त" अशा तऱ्हेचें अनिश्चयात्मक ज्ञान हें प्रत्यक्ष नव्हे, तर ज्यामध्यें व्यपदेश, व्यभिचार यांतील दोष नसून जें अव्यपदेश्य, अव्यभिचारी व निश्चयात्मक ज्ञान असेल त्यालाच "**प्रत्यक्ष**" असें म्हणतात.

अथ तत्पूर्वकं त्रिविधमनुमानं पूर्ववच्छेषवत्सामान्यतो दृष्टं च ॥ न्यायद० १।१।५॥

(२) "**अनुमान प्रमाण**"—प्रत्यक्षपूर्वक अप्रत्यक्षाचें ज्ञान होणें याचें नांव "अनुमान." जोपदार्थ पूर्णपणें किंवा त्याच्या कांहीं अंश रूपानें पूर्वी कोणत्याहि स्थलीं किंवा कोणत्याहि कालीं प्रत्यक्ष पाहिला असेल, त्यापैकीं एखादा देश किंवा अवयव प्रत्यक्ष पाहिला असतां दुसऱ्या अदृष्ट अवयवाचें जें ज्ञान होतें तें"**अनुमान**" होय. जसें:—पुत्र पाहून बाप असला पाहिजे, पर्वतावर धूर पाहून अग्नि असला पाहिजे, व मनुष्याला होत असलेलें दुःख पाहून पूर्वजन्म असला पाहिजे असें म्हणणें हें अनुमान समजावें. याचे तीन भेद आहेत (१) "**पूर्ववत्**"-कारणाला पाहून जेथें कार्याचें अनुमान होतें तें पूर्ववत् अनुमान होय. जसें—मेघ पाहून वृष्टी होईल, विवाहित स्त्रीपुरुषें पाहून संतती होईल, शिकत असलेला विद्यार्थी पाहून तो विद्वान् होईल वगैरे. (२) "**शेषवत्**"-कार्याला पाहून कारणाचें ज्ञान होतें तें. जसें:—नदीचें पाणी वाढलेलें पाहून वर वृष्टि झाली असावी, पुत्राला पाहून बाप असला पाहिजे, सृष्टीला पाहून तिचें अनादिकारण व कर्ता ईश्वर असला पाहिजे, पापपुण्यांवरून सुख दुःखाचें ज्ञान इत्यादि उदाहरणें शेषवत् अनुमानाचीं आहेत —(३) "**सामान्यतो दृष्ट**"-दोहोंमध्यें कार्यकारणभाव नसून साधर्म्य मात्र असतें तें "सामान्यतो दृष्ट" अनुमान होय. जसें—चालल्याशिवाय स्थलांतर होऊं शकत नाहीं, स्थलान्तर झालेलें पाहून गमनाचें अनुमान करणें हें सामान्यतो दृष्ट अनुमान जाणावें. (**अनु अर्थात् प्रत्यक्षस्य पश्चात्-मीयते ज्ञायते येन तदनुमानम्**) जें प्रत्यक्ष

ज्ञानापासून उत्पन्न होतें तें अनुमान होय. धुराचें ज्ञान प्रत्यक्ष झालें तर अप्रत्यक्ष अग्नीचें अनुमान होईल. जर धूरच दिसला नाहीं तर अनुमान तरी कसलें होणार. अर्थात् अनुमानाला प्रत्यक्षाची आवश्यकता आहे.

प्रसिद्धसाधर्म्यात्साध्यसाधनमुपमानम् ॥ न्यायद० १।१।६॥

(३) "**उपमान प्रमाण**"—प्रसिद्ध प्रत्यक्ष पदार्थाच्या साधर्म्यानें साध्य-सिद्ध करावयाच्या-पदार्थाच्या ज्ञानाची सिद्धि करण्यास जें साधन होतें तें "उपमान" होय. (**उपमीयते येन तदुपमानम्**) "ज्याणें उपमा दिली जाते तें उपमान." जसें-कोणी आपल्या चाकराला सांगितलें कीं, "तूं विष्णुमित्राला बोलाऊन आण" तेव्हां तो म्हणतो, "मला तो माहीत नाहीं." तेव्हां त्याला समजावें म्हणून धनी म्हणतो "जसा हा यज्ञदत्त आहे तसाच अगदीं विष्णुमित्रहि आहे." या ठिकाणीं विष्णुमित्राला यज्ञदत्ताची उपमा दिली. त्याचप्रमाणें "गाईप्रमाणेंच नीलगाय असते." याठिकाणीं प्रत्यक्ष असलेल्या गाईतील साधर्म्यानें साध्य नीलगाईचें ज्ञान करून दिलें, त्यामुळें जंगलामध्यें गाईसारखाच पशू पाहून ही नीलगाय असली पाहिजे असा निश्चय करतां येईल, हें उपमेनें दाखवलेल्या ज्ञानाचेंच फल आहे.

आप्तोपदेशः शब्दः ॥ न्यायद० १।१।७॥

(४) "**शब्द प्रमाण**"—पूर्ण विद्वान्, धार्मिक, परोपकारी, सत्यवादी, पुरुषार्थी, जितेंद्रिय व ज्याणें आत्म्यामध्यें स्वतः अनुभव घेतला आहे व तें हितकारक आहे अशाबद्दल खात्री झाली आहे अशाच ज्ञानाचा लोककल्याणार्थ उपदेश करणारा तो "आप्त" होय. आप्त पुरुषाला पृथिवीपासून परमेश्वरापर्यंत असणाऱ्या सर्व पदार्थांचें ज्ञान यथावत् झालेलें असतें. म्हणून अशा पुरुषांचे उपदेश प्रमाण मानावेत. तसेंच परमेश्वर हा पूर्ण आप्तपुरुष आहे. त्याणें उपदेश केलेला वेदहि प्रमाण मानावा.

न चतुष्टम् ऐतिह्यार्थापत्तिसंभवाभावप्रामाण्यात् ॥

न्यायद० २।२।१॥

(५) "**ऐतिह्य प्रमाण**"—(इति ह) "असें खरोखर झालें" किंवा "असें त्याणें केलें" याप्रमाणें असले जे जीवनवृत्तान्त ते या प्रमाणांत अंतर्भूत होतात. "ऐतिह्य" म्हणजे "इतिहास"

(६) "**अर्थापत्ति प्रमाण**"—(**अर्थादापद्यते सार्थापत्तिः**) कोणी झटलें कीं "मेघ असले तर वृष्टि होईल, कारण असलें तरच कार्य होईल" तर या झणण्यावरून "मेघाशिवाय वर्षाव होणार नाहीं व कारणाशिवाय कार्य होणार नाहीं" हा जो अर्थ निघतो त्याला "अर्थापत्ति" असें झणतात.

(७) "**संभव प्रमाण**"—(**संभवति यस्मिन् स संभवः**) जें सृष्टिक्रमाप्रमाणें संभवतें तें. कोणी सांगितलें कीं "मातापित्यावांचून संतानोत्पत्ति झाली," "मेलेल्यांस जिवंत केलें, डोंगर उचलले" "दगड तरंगले, चंद्राचे तुकडे केले" "सर्वव्यापक परमेश्वराचा अवतार झाला" "मनुष्याला शिंग फुटलें, वंध्येला मुलगा झाला" तर या सर्व गोष्टि सृष्टिक्रमाविरुद्ध असल्यामुळें असंभवनीय आहेत. त्या प्रमाण मानूं नयेत. जी गोष्ट संभवनीय असेल तीच मानावी.

(८) "**अभाव प्रमाण**"—(**न भवति यस्मिन् स अभावः**) विद्यमान नसणें यांचें नांव "अभाव" होय. कोणी कोणाला सांगितलें कीं "हत्ती घेऊन ये" तर तो त्या ठिकाणीं हत्तीचा अभाव पाहून जेथें हत्ती असेल तेथून तो घेऊन येतो. याप्रमाणें हीं आठ प्रमाणें आहेत. कोणी शब्दप्रमाणांत ऐतिह्यप्रमाणाचा व अनुमानामध्यें अर्थापत्ति, संभव व अभाव यांचा अंतर्भाव करतात, त्यांच्या मतें मुख्य चारच प्रमाणें आहेत. या प्रमाणांनीं सत्यासत्यतेविषयीं मनुष्यांनीं निर्णय करावा व सत्याचें ग्रहण करून असत्याचा त्याग करावा.

(१४) षट् तत्वांचें ज्ञान.

धर्मविशेषप्रसूतात् द्रव्यगुणकर्मसामान्यविशेषसमवायानां पदार्थानां साधर्म्यवैधर्म्याभ्यां तत्त्वज्ञानान्निःश्रेयसम् ॥

—वैशेषिक दर्शन. १ । १ । ४ ॥

"जो मनुष्य धर्मानुष्ठानानें पवित्र होऊन "साधर्म्य" व "वैधर्म्य" यांच्या योगानें द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष व समवाय या सहा तत्वांला जाणतो-अर्थात त्यांचें स्वरूपज्ञान प्राप्त करून घेतो—तेव्हां त्याला "निःश्रेयस" अर्थात मोक्ष प्राप्त होतो. साधर्म्य म्हणजे समानधर्म. जलामध्यें व पृथिवीमध्यें "जडत्व" हें साधर्म्य आहे. पण पृथिवीमध्यें "कठोरपणा" व जलामध्यें "कोमलपणा" हें वैधर्म्य आहे. "वैधर्म्य" म्हणजे "विरुद्ध धर्म" असणें. या सहा तत्वांचें स्पष्टीकरण पुढें दिलें आहे:—

क्रियागुणवत् समवायिकारणमिति द्रव्यलक्षणम् ॥

वैशेषिक. १।१।१५ ॥

पृथिव्यापस्तेजोवायुराकाशं कालो दिगात्मा मन इति द्रव्याणि ॥ वैशेषिक. १।१।५ ॥

(१) "**द्रव्यतत्वम्**"—(**क्रियाश्च गुणाश्च विद्यन्ते यस्मिन् तत् क्रिया गुणवत्**) ज्यामध्यें क्रिया व गुण असतात, अथवा ज्यांत केवल गुण असतात त्यांना "द्रव्य" असें म्हणावें. "पृथिवी, जल, तेज, वायु, मन व आत्मा" हीं सहा द्रव्यें क्रिया व गुण यांनीं युक्त आहेत व "आकाश, काल व दिशा" हीं तीन द्रव्यें क्रियारहित व गुणयुक्त आहेत. (**समवेतुं शीलं यस्य तत् समवायि। प्राग्वृत्तित्वं कारणं समवायिच तत् कारणंच समवायिकारणम्, लक्ष्यते येन तल्लक्षणम्**) तसेंच ज्याचा परस्पर मिळण्याचा स्वभाव असेल, तें समवायि व कार्याचें जें पूर्वकालीं कारण असेल त्याला समवायिकारण असें म्हणतात. हीं दोनहि द्रव्याचीं लक्षणें आहेत. "ज्याच्या योगानें लक्ष्य जाणलें जातें तें लक्षण." या नऊ द्रव्यांचीं लक्षणें पुढें दिलीं आहेत:—

रूपरसगन्धस्पर्शवती पृथिवी ॥ वैशेषिक २।१।१।

व्यवस्थितःपृथिव्यां गन्धः ॥ वैशे० २।२।२।

"रूप, रस, गंध व स्पर्श हे गुण जीमध्यें आहेत ती पृथिवी होय." पृथिवीमध्यें जलापासून रस, अग्नीपासून रूप व वायूपासून स्पर्श असे तीन द्रव्यांपासून तीन गुण आलेले आहेत. "पृथिवीमध्यें गंध हा गुण स्वाभाविक आहे." त्याचप्रमाणें जलामध्यें रस, अग्नीमध्यें रूप, वायूमध्यें स्पर्श व आकाशांत शब्द हे स्वाभाविक गुण आहेत.

रूपरसस्पर्शवत्यापो द्रवाःस्निग्धाः ॥ वैशे० २।१।२॥

अप्सु शीतता ॥ वैशे० २।२।५॥

"रूप, रस व स्पर्श हे गुण ज्यांत आहेत व जें द्रवीभूत व स्निग्ध आहे तें "जल" होय." जलाचा स्वाभाविक गुण रस हा आहे. रूप व स्पर्श हे अग्नि व वायूच्या योगानें आले आहेत. "जलामध्यें शीतता हा गुण स्वाभाविक आहे."

तेजो रूपस्पर्शवत् ॥ वैशे० २।१।३॥

स्पर्शवान् वायुः ॥ वैशे०।२१।४॥

"रूप व स्पर्श हे गुण ज्यांत आहेत त्याला तेज असें म्हणतात." तेजामध्यें रूप हा स्वाभाविक गुण असून, स्पर्श हा वायूच्या योगानें नैमित्तिक गुण आलेला आहे. "ज्याचा गुण स्पर्श आहे त्याला वायु असें म्हणतात." पण यामध्येंहि उष्णता व शीतता हे नैमित्तिक गुण तेज व जल या तत्वांपासून उत्पन्न होतात.

त आकाशे न विद्यन्ते ॥ वैशे० २।१।६॥
निष्क्रमणं प्रवेशनमित्याकाशस्य लिङ्गम् ॥ वैशे०२।१।२०॥
कार्यान्तराप्रादुर्भावाच्च शब्दःस्पर्शवतामगुणः॥ वैशे०२।१।२९

" रूप, रस, गंध व स्पर्श हे चार गुण आकाशांत नाहींत." आकाशाचा शब्द हा स्वाभाविक गुण आहे. " ज्याच्या योगानें प्रवेश व बाहेर येणें (निष्क्रमण) होतें त्याला आकाश असें म्हणतात." तसेंच " स्पर्शगुणानें युक्त असणाऱ्या पृथिवी आदिक कार्यामध्यें प्रगट होत नाहीं म्हणून पृथिवीआदिकांचा तो गुण नव्हे." शब्द ह आकाशाचा गुण आहे.

अपरस्मिन्नपरं युगपच्चिरं क्षिप्रमिति काललिङ्गानि॥
वैशे० २।२।६॥
नित्येष्वभावादनित्येषु भावात्कारणे कालाख्येति ॥
वैशे० २।२।९॥

" ज्यामध्यें अपर, पर, (युगपत्) एकवार, (चिरम्) फार वेळ, (क्षिप्रम्) शीघ्र इत्यादि प्रयोग होतात त्याला " काल" असें म्हणतात." " काल हा नित्य पदार्थांमध्यें असत नाहीं व अनित्य पदार्थांच्या कारणामध्यें असतो म्हणून त्याला काल ही संज्ञा लावतात.

इत इदमिति यतस्तद् दिश्यं लिङ्गम् ॥ वैशे० २।२।१०॥
आदित्यसंयोगाद् भूतपूर्वाद् भविष्यतो भूताच्च प्राची ॥
वैशे०२।२।१४॥
एतेन दिगन्तरालानि व्याख्यातानि ॥ वैशे०२।२।१६॥

"ज्यामध्यें वर, खालीं, येथून तेथें, पूर्व, दक्षिण, पश्चिम, उत्तर इत्यादि व्यवहार होतात तिला " दिशा " असें म्हणतात." "ज्या दिशेला प्रथम आदित्याचें दर्शन झालें, सध्या होत आहे व पुढें होईल त्या दिशेला पूर्व असें म्हणतात." ज्या दिशेला सूर्यास्त होतो ती पश्चिम दिशा समजावी. पूर्व दिशेला तोंड करून उभें राहिलें असतां समोरची पूर्व, पाठीमागची पश्चिम, उजव्या हाताची दक्षिण व डाव्या हाताची उत्तर दिशा जाणावी. " यावरून इतर दिशा जाणाव्या." पूर्व व दक्षिण यांमध्यें आग्नेयी, दक्षिण व पश्चिम यांमध्यें नैर्ऋत्य, पश्चिम व उत्तर यांत वायव्य, उत्तर व पूर्व यांत ऐशानी याप्रमाणें उपदिशा आहेत.

इच्छाद्वेषप्रयत्नसुखदुःखज्ञानान्यात्मनो लिङ्गमिति ॥
न्यायद १।१०॥

ज्याच्यामध्यें (इच्छा) प्रीति, (द्वेष) वैर, (प्रयत्न) पुरुषार्थ, सुख, दुःख व ज्ञान हे गुण आहेत त्याला जीवात्मा असें म्हणतात. तसेंच—

प्राणापाननिमेषोन्मेषजीवनमनोगतीन्द्रियान्तर्विकाराः सुखदुःखेच्छाद्वेषप्रयत्नाश्चात्मनोलिङ्गानि ॥ वैशे० ३।२।४॥

(प्राण) बाहेरचा वायु आंत घेणें, (अपान) आंतला वायु बाहेर फेंकणें, (निमेष) डोळे मिटणें, (उन्मेष) डोळे उघडणें, (जीवन) प्राणधारण करणें, (मनः) मनन, विचार करणें, (गति) यथेच्छ गमन करणें, (इन्द्रिय) इंद्रियांनीं विषयांचें ग्रहण करणें, (अन्तर्विकाराः) क्षुधा, तृषा, ज्वर, पीडा इत्यादि विकार होणें, तसेंच सुख, दुःख, इच्छा, द्वेष व प्रयत्न हे गुण ज्याच्यामुळें होतात तो आत्मा होय. असें कणाद महर्षि म्हणतात.

युगपज्ज्ञानानुत्पत्तिर्मनसो लिङ्गम् ॥ न्याय. १।१।१६॥

" एकाच वेळीं अनेक पदार्थांचें ज्ञान उत्पन्न न होणें हें मनाचें लक्षण आहे." ज्याच्या योगानें एकाच कालीं दोन पदार्थांचें ज्ञान होत नाहीं त्याला मन असें म्हणतात. याप्रमाणें नऊ द्रव्यांचें वर्णन झालें, आतां गुणांचें वर्णन पुढें दिलें आहे.

रूपरसगन्धस्पर्शाःसङ्ख्याः परिमाणानि पृथक्त्वं संयोग-विभागौ परत्वापरत्वे बुद्धयः सुखदुःखे इच्छाद्वेषौ प्रयत्नाश्चगुणाः ॥ वैशे० १।१।६॥

(२) " **गुण**—" रूप, रस, गंध, स्पर्श, संख्या, परिमाण, पृथकत्व, संयोग, विभाग, परत्व, अपरत्व, बुद्धि, सुख, दुःख, इच्छा, द्वेष, प्रयत्न, (व सूत्रांतील " च " कारामुळें समावेश केलेले) गुरूत्व , द्रवत्व, स्नेह, संस्कार, धर्म, अधर्म व शब्द हे चोवीस गुण आहेत.

द्रव्याश्रय्यगुणवान् संयोगविभागेष्वकारणमनपेक्ष इति गुणलक्षणम् ॥ वैशे० १।१।१६॥

" जो द्रव्याच्या आश्रयानें असतो, ज्याला अन्य गुणांचा आश्रय नसतो, संयोग व विभाग यांना जो कारणीभूत नसतो व जो दुसऱ्या कशाची अपेक्षा करीत नाहीं त्याला " **गुण** " असें म्हणतात. गुण चोवीस आहेत. ते वर दिलेले आहेत.

(श्रोत्रोपलब्धिर्बुद्धिनिर्ग्राह्यःप्रयोगेणाभिज्वलित आकाशदेशःशब्दः । महाभाष्ये)"जो श्रोत्रेंद्रियाला समजतो, बुद्धीनें ज्याचें ग्रहण होतें, जो प्रयोगानें प्रकाशित होतो व आकाश हें ज्याचें स्थान आहे त्याला शब्द असें म्हणतात." अशी पतंजलि महामुनींनीं शब्दाची व्याख्या दिली आहे. नेत्रांनीं ज्याचें ग्रहण होतें तें रूप; जिव्हेनें ज्या मिष्टान्नादिकांचें ग्रहण होतें तो रस; नाकानें ज्याचें ग्रहण होतें तो गंध; त्वचेनें ज्याचें ग्रहण होतें तो स्पर्श; जिच्या योगानें एक, दोन इत्यादि गणना होते ती संख्या; ज्यानें हलकेपणाचा किंवा वजनदारपणाचा बोध होतो तें परिमाण; एक दुसऱ्यापासून भिन्न होणें हें पृथक्त्व; एक दुसऱ्याशीं मिळणें हा संयोग; मिसळुन बनलेल्याचे अनेक तुकडे होणें हा विभाग; पर म्हणजे पलिकडे; अपर म्ह० अलीकडे; सत् व असत् यांचा जिच्या योगानें निश्चय होतो ती बुद्धि; सुख म्ह० आनंद; क्लेश म्ह० दुःख; इच्छा किंवा राग म्ह० प्रीति; द्वेष म्ह० विरोध; तसेंच (प्रयत्न) अनेक प्रकारचा बलयुक्त पुरुषार्थ; (गुरुत्व) भारीपणा; (द्रवत्व) पातळपणा; (स्नेह) प्रीति, चिकणपणा; (संस्कार) दुसऱ्याच्या योगानें वासना होणें; (धर्म) न्यायाचरण, कठिनत्व वगैरे; (अधर्म) धर्माच्या विरुद्ध, याप्रमाणें हे चोविस गुण व त्यांचे अर्थ आहेत.

एकद्रव्यमगुणं संयोगविभागेष्वनपेक्षकारणमिति कर्मलक्षणम् ॥ १७ ॥ उत्क्षेपणमवक्षेपणमाकुञ्चनं प्रसारणं गमनमिति कर्माणि ॥ ७ ॥ वैशे० अ० १ आ० १ ॥

(३) " **कर्म**"—(**एकद्रव्यमाश्रयो यस्य तदेकद्रव्यं । न विद्यते गुणोयस्मिन् तदगुणं । संयोगेषु विभागेषुच अपेक्षारहितं कारणं तत्कर्मलक्षणम्**) अथवा (**यत्क्रियते तत्कर्म । लक्ष्यते येन तत् लक्षणं । कर्मणो लक्षणं कर्मलक्षणम्**) जें द्रव्याच्या आश्रयानें असतें, ज्यामध्यें गुण नसतात, संयोग व विभाग होण्यामध्यें जें अपेक्षारहित कारण असतें त्याला " **कर्म** " असें म्हणतात, हीं कर्में पांच आहेत. (१) [उत्क्षेपणम्] वर फेंकणें, (२) [अवक्षेपणम्] खालीं लोटणें, (३) [आकुञ्चनम्] संकुचित होणें, (४) [प्रसारणम्] विस्तार होणें व ५) [गमनम्] येणें, जाणें, फिरणें हीं पांच कर्में आहेत. (पृथिवीचें अवक्षेपण, जलाचें आकुंचन, तेजाचें उत्क्षेपण, वायूचें प्रसारण व आकाशाचें गमन याप्रमाणें पंच भूतांचीं पांच कर्में जाणावींत.)

द्रव्यगुणकर्मणां द्रव्यं कारणं सामान्यम् ॥ १८ ॥ द्रव्याणां द्रव्यं कार्यं सामान्यम् ॥ २३ ॥ वैशे० १।१॥

(४) "**सामान्य**"—"जें द्रव्य, गुण व कर्म या कार्याचें कारण द्रव्य आहे तें सामान्य होय." "जें द्रव्यांपासून झालेलें कार्य द्रव्य आहे तें कार्यत्व या दृष्टीनें सर्व कार्यांमध्यें सामान्य आहे."

द्रव्यत्वं गुणत्वं कर्मत्वं च सामान्यानि विशेषाश्च ॥

वैशेषि० १।२।९ ॥

सामान्यं विशेष इति बुद्ध्यपेक्षम् ॥ वैशे० १।२।३॥

(५) "**विशेष**"—द्रव्यांमध्यें द्रव्यपणा, गुणांमध्यें गुणपणा व कर्मांमध्यें कर्मपणा सामान्य आहे ; द्रव्यांमध्यें द्रव्यत्व सामान्य आहे पण गुणत्व व कर्मत्व यांच्याहून द्रव्यत्व विशेष आहे. याप्रमाणेंच सर्वत्र जाणावें. "सामान्य व विशेष हें बुद्धीच्या अपेक्षेनें सिद्ध होतें." जसें-मनुष्यांमध्यें मनुष्यत्व सामान्य आहे पण पशुत्वाहून तें विशेष आहे. तसेंच स्त्रियामध्यें व पुरुषांमध्यें स्त्रीत्व व पुरुषत्व हें सामान्य आहे, पण ब्राह्मणत्व, क्षत्रियत्व, वैश्यत्व व शूद्रत्व हें विशेष आहे. ब्राह्मणव्यक्तींमध्यें ब्राह्मणत्व सामान्य आहे पण तें क्षत्रियादिकांहून विशेष आहे. याप्रमाणें सर्व जाणावें.

इहेदमिति यतः कार्यकारणयोः स समवायः ॥

वैशे. ७।२।२६॥

(६) "**समवाय**"—अवयवांमध्यें अवयवी, कार्यांमध्यें क्रिया, क्रियावान् गुणगुणी, जातिव्यक्ती, कार्यकारण, अवयवावयवी, यांचा नित्य संबंध असतो म्हणून त्याला "समवाय" असें म्हणतात. जो दुसऱ्या द्रव्यांचा परस्परसंबंध होतो त्याला संयोग असें म्हणतात. संयोगसंबंध हा अनित्य असून समवायिसंबंध हा नित्य असतो.

द्रव्यगुणयोः सजातीयारम्भकत्वं साधर्म्यम् ॥

वैशेषिक १।१।९ ॥

"द्रव्य व गुण यांपासून समानजातीय कार्याचा आरंभ होणें" याला "साधर्म्य" असें म्हणतात. जसें पृथिवीमध्यें जडत्वधर्म, व घटादि स्वसदृश कार्योत्पादकत्व धर्म आहे त्याचप्रमाणें, जलामध्येंहि जडत्व व हिम (बर्फ) वगैरे स्वसदृशकार्योत्पादकत्व आहे; म्हणून पृथिवी व जल यांचें परस्पर साधर्म्य आहे. "**द्रव्यगुणयोर्विजातीयारम्भकत्वं वैधर्म्यम्** ।" जेथें द्रव्य व गुण यांपासून विजातीय धर्म व कार्य उत्पन्न होतें त्याला "वैधर्म्य" असें म्हणतात. जसें पृथिवीमध्यें कठिनत्व, शुष्कत्व व गंधवत्व हे धर्म जलाच्या धर्मांशीं विरुद्ध आहेत व जलाचें द्रव्यत्व, कोमलत्व व रसगुणयुक्तत्व

हे गुण पृथिवीतत्वाच्या विरुद्ध आहेत म्हणून या बाबतींत या दोन द्रव्यांमध्यें **वैधर्म्य** आहे. याप्रमाणें इतर तत्वांविषयीं जाणावें.

(१५) कार्यकारणसंबंध

कारणभावात्कार्यभावः ॥ वैशे. ४।१॥ ३ ॥
नतु कार्याभावात्कारणाभावः ॥ वै. १।२।२॥

"कारण असलें तरच त्यापासून कार्याची उत्पत्ति होईल." पण "कार्याचा अभाव असला तर कारणाचा अभाव असलाच पाहिजे असें नाहीं." कार्याशिवायहि कारण असूं शकेल.

कारणाभावात्कार्याभावः ॥ वै० १।२।१॥
कारणगुणपूर्वकः कार्यगुणो दृष्टः ॥ वैशे० २।१।२४॥

"कारण नसलें तर कार्य कधींहि होणार नाहीं." "कारणामध्यें जसे गुण असतात तसेच कार्यामध्यें येतात." परिमाण दोन प्रकारचें आहे—

अणुमहदिति तस्मिन्विशेषभावाद्विशेषाभावाच्च ॥ वै०७।१।११॥

(अणु) सूक्ष्म व (महत्) मोठें असें दोन प्रकारचें "**परिमाण**" आहे. जसें लिक्षेहून त्रसरेणु लहान व द्व्यणुकापेक्षां तो मोठा आहे, तसेंच पर्वत पृथिवीपेक्षां लहान व झाडांपेक्षां मोठा आहे.

सदिति यतो द्रव्यगुणकर्मसु सा सत्ता ॥ वै० १।२।७॥

"द्रव्य, गुण, कर्म, यांचें वर्तमानत्व–आस्तित्व–यालाच सत्ता असें म्हणतात." "द्रव्य आहे, कर्म आहे, गुण आहे," याप्रमाणें वर्तमानकाल वाचक शब्दाचा अन्वय सर्वांशीं असतो. त्यालाच सत्ता असें म्हणतात. "**सत्ता**" म्ह० "आस्तित्व–आहेपणा."

भावोऽनुवृत्तेरेव हेतुत्वात्सामान्यमेव ॥ वैशे० १।२।४॥

"सत्तारूप भाव–अर्थात आस्तित्व–सर्वांशीं युक्त असल्यामुळें त्याला (अस्तित्वाला) महा सामान्य असें म्हणतात." हें भावरूप द्रव्यांविषयीं झालें. अभावाचे प्रकार पांच आहेतः—

क्रियागुणव्यपदेशाभावात्प्रागसत् ॥ १ ॥ सदसत् ॥ २ ॥
सच्चासत् ॥ ४ ॥ यच्चान्यदसदतस्तदसत् ॥ ५ ॥ नास्ति घटो गेहे इति सतो घटस्य गेहसंसर्गप्रतिषेधः ॥ १० ॥
वैशेषि० ९।१॥

"क्रिया व गुण यांचें विशेष निमित्त होण्यापूर्वी कार्य असत नाहीं." जसें घट किंवा वस्त्र हीं उत्पत्तिपूर्वी नसतात. याला "**प्रागभाव**" असें म्हणतात. ॥ १ ॥ "जें होऊन नाश पावतें," जसें घट उत्पन्न होऊन नाश पावतो, याला "**प्रध्वंसाभाव**" असें म्हणतात. ॥ २ ॥ "जें असुन नसतें." जसें "अगौरश्वोऽनश्वो गौः" हा घोडा गाय नव्हे व ही गाय घोडा नव्हे अर्थात गाईमध्यें घोडेपणाचा अभाव व घोड्यामध्यें गायपणाचा अभाव याला "**अन्योन्याभाव**" असें म्हणतात. ॥ ४ ॥ जो पूर्वीच्या तीनहि अभावांहून अन्य अभाव आहे त्याला "**अत्यन्ताभाव**" असें म्हणतात. जसें नरशृंग, खपुष्प, वंध्यापुत्र वगैरे. हे पदार्थ असूं शकतच नाहींत म्हणून त्यांना अत्यंताभाव असें म्हणतात. ॥ ५ ॥ "घरांत घट नाहीं अर्थात घराशीं घड्याचा सध्यां संबंध नाहीं." अर्थात घट अन्यत्र असेल पण तो घरांत नाहीं. याला "**संसर्गाभाव**" असें म्हणतात. याप्रमाणे हे पांच प्रकारचे अभाव आहेत.

(१६) विद्या व अविद्या.

इन्द्रियदोषात्संस्कारदोषाच्चाविद्या ॥ १० ॥
तद्दुष्टज्ञानम् ॥ वैशे० ९।२ ॥ ११ ॥

"इंद्रियें व संस्कार यांच्या दोषांपासून अविद्या उत्पन्न होते." "जें दुष्ट–अर्थात विपरीत ज्ञान असतें, त्यालाहि अविद्या असें म्हणतात."

अदुष्टं विद्या ॥ वै० ९।२ ॥ १२ ॥

"जें अदुष्ट–अर्थात यथार्थ ज्ञान असतें त्याला विद्या असें म्हणतात."

(१७) नित्यत्व व अनित्यत्व

पृथिव्यादिरूपरसगन्धस्पर्शा द्रव्यानित्यत्वादनित्याश्च॥२॥
एतेन नित्येषु नित्यत्वमुक्तम् ॥ वैशे० ७।१॥ ३ ॥

"पृथिवी, जल वगैरे कार्यपदार्थ व त्यांचे गंध, रस, रूप, स्पर्श हे गुण अनित्य आहेत; कारण तीं तीं द्रव्यें च अनित्य असल्यामुळें त्यांचे गुणहि अनित्य आहेत." पण "जे कारणरूप पृथिव्यादि नित्य पदार्थ आहेत त्यांचे गंधादिक गुणहि नित्यच आहेत." कारणरूप पंचमहाभूतें व कार्यरूप पंचमहाभूतें असे भूतांमध्यें दोन भेद आहेत.

सदकारणवन्नित्यम् ॥ वैशे० ४।१।१॥

"ज्याला अस्तित्व आहे पण जें कशापासूनहि उत्पन्न झालें नाहीं–अर्थात ज्याला कारण नाहीं तें **नित्य** आहे असें समजावें." अर्थात "**सत्कारणवदनित्यम्**"

"ज्याला अस्तित्व आहे पण जें दुसऱ्या कशापासून उत्पन्न झालें आहे, तें सकारण असल्यामुळें **अनित्य** जाणावें."

अस्येदं कार्यं कारणं संयोगि विरोधि समवायि चेति-लैङ्गिकम् ॥ वै० ९।२।१॥

याचें हें कार्य किंवा कारण आहे. इत्यादि "**लिङ्गलिङ्गी**" संबंध चार प्रकारचा आहे. (१) समवायि, (२) संयोगि (३) *एकार्थसमवायि व (४) विरोधि संबंध. आकाश परिमाणगुणयुक्त आहे हा समवायिसंबंध; शरीर त्वचायुक्त आहे हा संयोगिसंबंध; एका अर्थामध्यें दोहोंचें अस्तित्व असणें याला एकार्थसमवायिसंबंध असें म्हणतात. जसें कार्यरूप स्पर्श कार्याचें लिंग अर्थात कार्याला जाणणारा असतो. तसेंच विरोधिसंबंध–झालेल्या वृष्टीचें चिन्ह होणाऱ्या वृष्टीच्या चिन्हांशीं विरोधि असतें. याप्रमाणें चार प्रकारचे लिंगलिंगीसंबंध जाणावे.

नियतधर्मसाहित्यमुभयोरेकतरस्य वा व्याप्तिः ॥ २९ ॥
निजशक्त्युद्भवमित्याचार्याः ॥ ३१ ॥
आधेयशक्तियोग इति पञ्चशिखः॥३२॥ साङ्ख्यदर्शन अ०५॥

जें सिद्ध करावयाचें तें साध्य व ज्याच्यायोगानें सिद्ध केलें जातें तें साधन होय. साध्य व साधन या दोहोंमध्यें किंवा एकामध्यें जें नियत धर्मांचें साहचर्य असतें त्याला "**व्याप्ति**" असें म्हणतात. जसें धुराशीं अग्नीचें साहचर्य. जेथें धूर असतो तेथें अग्नि असतो ॥ २९ ॥ तसेंच व्याप्य जो धूर, तो स्वतःच्या निजशक्तीनें उत्पन्न होत असतो. अर्थात जेव्हां धूर अन्यस्थलीं जातो तेव्हां तो अग्नीच्या संयोगाशिवायहि राहूं शकतो. याचें नांव "**व्याप्ति**" असें आचार्य म्हणतात. अग्नीच्या छेदन व भेदन या सामर्थ्यानें जलादि पदार्थांपासून धूम उत्पन्न होतो. ॥ ३१ ॥ पंचाशिखाचार्य आधेय शक्तीच्या योगाला "**व्याप्ति**" असें म्हणतात. जसें मूलप्रकृतीची महत्तत्वामध्यें व्याप्ति, बुद्धीमध्यें व्यापकताधर्म यांचें नांव व्याप्ति होय. शक्तिमान् आधाररूप व शक्ति आधेयरूप यांचा संबंध तीच व्याप्ति असें समजावें.

इत्यादि शास्त्रांच्या प्रमाणांनीं परीक्षा करून शिकावें व शिकवावें. नाहींतर हवा तो ग्रंथ शिकविल्यानें विद्यार्थ्यांना सत्यासत्यतेचा विचार करतां येणार नाहीं; म्हणून जो ग्रंथ शिकवावयाचा असेल त्याची पूर्वोक्त ग्रंथांच्या प्रमाणांनीं परीक्षा करून जर तो उत्तम ठरला तरच तो विद्यार्थ्यांस शिकवावा. या प्रमाणांच्या कसोटीस जो उतरला नसेल तो कधींहि शिकवूं नये; कारण "**लक्षणप्रमाणाभ्यां वस्तुसिद्धिः**" "गंधगुण-

* एकार्थ समवायी कारणान्तरेषु दृढत्वात् वै० ॥ १०।१।६

युक्त जी आहे ती पृथिवी" इत्यादि प्रकारचीं लक्षणें व प्रत्यक्ष, अनुमान, शब्द वगैरे प्रमाणें यांच्या योगानेंच यथार्थ विचार होऊन सत्यासत्याचा व सत्यपदार्थांचा निर्णय होतो. लक्षणें व प्रमाणें यांशिवाय तो होणें शक्य नाहीं. म्हणून अशा रीतीनें परीक्षित व योग्य अशा ग्रंथांचेंच अध्ययन विद्यार्थ्यांकडून करवावें. म्हणजे त्यांना बहुत लाभ होईल.

(१८) अध्ययन व अध्यापन.

अध्ययन व अध्यापनाचा प्रकार पुढें लिहिल्याप्रमाणें असावा. प्रथमतः पाणिनिमुनिकृत " **शिक्षा** " माता, पिता किंवा आचार्य यांनीं शिकवावी. या ग्रंथामध्यें अक्षरांचें स्थान, प्रयत्न व करण वगैरे विषयीं सूत्ररूपानें व्याख्यान आहे. जसें " प " या अक्षराचें ओष्ठ्यस्थान, स्पृष्टप्रयत्न व प्राण व जिव्हा यांची क्रिया हें करण आहे. याच प्रमाणें इतर वर्णाविषयीं समजावें. याप्रमाणें विद्यार्थ्यांना सर्व अक्षरांचा उच्चार कसा करावयाचा तें शिकवून पाणिनीयशिक्षेंतील सर्व सूत्रांचा अर्थ व उपयोग यांचें सविवरण स्पष्टीकरण शिकवावें. नंतर व्याकरण शिकवावें. पाणिनीय " **अष्टाध्यायीसूत्रपाठ** " हें सर्वोत्कृष्ट व्याकरण आहे. हें शिकाविण्याची रीति—प्रथम सूत्रें पाठ करवून घ्यावींत व मग अर्थ सांगावा " **वृद्धिरादैच्** " हें प्रथमसूत्र आहे. यामध्यें (वृद्धिः + आत् + ऐच् किंवा आदैच्) अशीं पदें आहेत. त्यांचा समास (आश्च ऐच्च आदैच्) असा आहे व अर्थ (आदैचां वृद्धिसंज्ञा क्रियते) " आ, ऐ, औ यांना वृद्धि अशी संज्ञा आहे. " या सूत्रामध्यें " आत् " या पदामध्यें आकाराच्या पुढें " त् " या व्यंजनाचा उपयोग केला आहे त्याचें कारण ह्रस्व किंवा प्लुत आकाराचें ग्रहण होऊं नये हें आहे. याला आधार " **तपरस्तत्कालस्य** " हें सूत्र आहे. याचा अर्थ– (तः परो यस्मात् स तपरस्तादपि परः तपरः) " त् आहे पुढें ज्याच्या तो तपर किंवा त्कारच्या पुढें जो असतो तो तपर समजावा, या प्रमाणें जो तपर असतो तो त्या उच्चारलेल्याचाच बोधक होतो." " आदैच् " यामध्यें " आकाराच्या पुढें तकार आहे व तकाराच्या पुढें ऐच् आहे म्हणून आ व ऐ, औ हीं तपर अक्षरें जाणावीं " या तपर करणापासून " आ, ऐ, औ " यांचाच बोध होतो व " अ, आ ३ " वगैरेचा बोध होत नाहीं. "अ, आ इ" यांना ह्रस्व दीर्घ व प्लुत अशा स्वतंत्र संज्ञा आहेत. या सूत्रानें " आ, ऐ, औ," या तीन स्वरांना "**वृद्धि**" ही संज्ञा केली आहे. इ० उदाहरण " भागः " या शब्दांत " भज् " धातु आहे. त्यावरून " घञ् " प्रत्यय केला आहे. " घञ् " प्रत्ययामध्यें " घ्, ञ " हे इत्संज्ञक आहेत म्हणून त्यांचा लोप होतो, व शिल्लक " अ " हा प्रत्यय राहातो "भज्+ अ" अशी स्थिति झाल्यानंतर भकारांतील अकाराला वृद्धि होते व ज्काराच्या ठिकाणीं ग्कार होतो. व " भाग्+अ " मिळून " भाग " असा शब्द सिद्ध होतो.

त्याचप्रमाणें " अध्यायः हा शब्द " अधि " उपसर्गपूर्वक " इङ् " धातु वरून ऱ्हस्वान्त असल्यामुळें " घञ् " प्रत्यय होऊन, " इ " काराच्या ठिकाणीं " ऐ " अशी वृद्धि होऊन " अधि + ऐ + अ अशी स्थिति झाल्यावर ऐकाराच्या ठिकाणीं आय् असा आदेश होऊन " अध्याय " हा शब्द सिद्ध झाला आहे. तसेंच " नायकः " हा शब्द " नीञ् " धातु दीर्घान्त असल्यामुळें " ण्वुल् " प्रत्यय पुढें आला असतां " ई " काराच्या ठिकाणीं " ऐ " अशी वृद्धि होऊन " वु " च्या ठिकाणीं अक असा आदेश होऊन " नै + अक " अशी स्थिति होऊन " नायक " असें रूप झालें. " स्तु " या धातूवरून " ण्वुल् " प्रत्यय होऊन धात्वंतींच्या उकाराला " औ " अशी वृद्धि होऊन " स्तौ + अक " अशी स्थिति झाल्यावर " स्तावकः " असें पद बनलें. तसेंच " कृञ् " धातूवरून " ण्वुल् " प्रत्यय करून, " ण्, ल् " या प्रत्ययस्थ इतांचा लोप केल्यानंतर शेष राहिलेल्या " वु " प्रत्ययाला " अक " असा आदेश झाल्यावर, धात्वंतींच्या ऋकाराला " आर " अशी वृद्धि होऊन (कार् + अक) " कारकः " हें रूप सिद्ध झालें. याप्रमाणें सूत्रार्थ शिकवित असतांना त्यांचें प्रयोजन व उदाहरणेंहि तेथच्या तेथें दाखवून सूत्र समजावून द्यावें. सूंत्रांचा मागचा पुढचा संबंधहि वेळच्या वेळीं सांगावा. व रूपें कशीं होतात तें, तीं सिद्ध करावयाच्या वेळींच, लिहून दाखवावीं. जसें—" भज् + घञ् + सु " अशी स्थिति प्रथमतः होती. प्रत्ययांतील " घ् ञ् " या इतांचा लोप झाल्यावर " भज् + अ + सु " अशी स्थिति झाली. भ या अक्षरांतील अकाराची " आ " ही वृद्धि व जकाराच्या ठिकाणीं ग्कार होऊन " भाग् + अ + सु " अशी स्थिति झाली. त्यांचा मिलाफ केला असतां " भाग + सु " असें झाल्यावर सुमधील उकाराला इत्संज्ञा व त्याचा लोप केल्यावर शेष राहिलेल्या सकाराच्या ठिकाणीं " रु " होऊन " भाग + रु " असें झाल्यावर रुमधील उकाराला इत्संज्ञा व लोप केल्यावर शेष राहिलेल्या रेफाच्या ठिकाणीं (:) विसर्जनीय होऊन (भागः) हें रूप सिद्ध झालें. ज्या ज्या सूत्रानें जें जें कार्य करावयाचें असेल तें तें करतेवेळीं तें तें सूत्र उच्चारून व तें तें कार्य लिहून वेळच्यावेळीं विद्यार्थ्यास शिकवावें. असें केलें असतां विषय सुगम होऊन तो त्यांस शीघ्र समजतो. अशाप्रकारें अष्टाध्यायी, धातुपाठ हीं अर्थासह झाल्यावर दश लकारांचीं रूपेंहि उत्तमरीतीनें करवून घ्यावीं. नंतर उत्सर्ग-सूत्रें-अर्थात् सामान्य सूत्रें-शिकवून त्यांचीं अपवादसूत्रें स्पष्टीकरणासह शिकवावीं. जसें " **कर्मण्यण्** " हें उत्सर्गसूत्र आहे, याचा अर्थ " कर्म उपपद असतां धातूंवरून अण् प्रत्यय होतो " जसें कुंभ हें कर्म उपपद असतां कृधातूवरून अण् प्रत्यय होऊन " कुम्भकारः " हें रूप सिद्ध झालें. याला अपवादसूत्र " **आतोऽनुप-**

सर्गे कः" " उपसर्गभिन्न कर्म उपपद असतांना आकारान्त धातूवरून क प्रत्यय होतो. " "**कर्मण्यण्**" या सूत्रानें सर्व धातूंवरून अण् प्रत्यय प्राप्त झाला होता पण त्याला वरील सूत्रानें तो आकारान्त धातूवरून होत नाहीं असें सांगितलें. आकारान्तावरून " क " होतो व इतर धातूंवरून " अण् " होतो असें झालें. याप्रमाणें उत्सर्ग व अपवादसूत्रांची व्यवस्था सांगावी. चक्रवर्तीराज्याच्या राज्यांत ज्याप्रमाणें मांडलिकराजे असतात पण मांडलिकांच्या राज्यांत चक्रवर्ती नसतात त्याचप्रमाणें उत्सर्गसूत्रांमध्यें अपवादसूत्रें प्रवृत्त होतात पण अपवादसूत्रांच्या विषयांत उत्सर्गसूत्रें प्रवृत्त होत नाहींत. या प्रकारच्या सूत्रव्यवस्थेनें पाणिनिमुनीनें सहस्र श्लोकांमध्यें अखिल शब्द, अर्थ व संबंध यांची व्यवस्था उत्तमप्रकारें प्रतिपादन केलेली आहे. अष्टाध्यायी झाल्यानंतर धातुपाठ शिकवून झाला म्हणजे मग उणादिगण शिकवावा व तो शिकवितानां सुबन्ताचा विषय उत्तम रीतीनें शिकवून पाणिनीय अष्टाध्यायीतील शंका, समाधान, वार्तिक, कारिका, परिभाषा वगैरेविषयींची घटना शिकवून अष्टाध्यायीची दुसरी आवृत्ति पुरी करावी. याप्रमाणें अष्टाध्यायी शिकून झाल्यावर महाभाष्य शिकवावें. जर गुरु व विद्यार्थी हे दोघेहि बुद्धिमान्, पुरुषार्थी, निष्कपटी, विद्याव्यासंगी व सतत परिश्रम करणारे असले तर दीड वर्षांत पूर्वी सांगितल्याप्रमाणें अष्टाध्यायी शिकून दीड वर्षांत महाभाष्य शिकतां येतें. या प्रमाणें तीन वर्षांत उत्तम वैय्याकरणी होऊन लौकिक व वैदिक शब्दांचें व्याकरण उत्तम रीतीनें समजल्यामुळें अन्य शास्त्रांमध्येंहि त्यांची शीघ्र गति होऊं शकते. एकदां व्याकरण चांगलें समजलें म्हणजे इतर शास्त्रें समजण्यास फार कठीण जात नाहींत व व्याकरण जसें वर सांगितलेल्या आर्ष पद्धतीनें लवकर व उत्तम समजतें तसें तें सारस्वत, चंद्रिका, कौमुदी, मनोरमा इत्यादि कुग्रंथ (अनार्ष ग्रन्थ) पन्नास वर्षें शिकल्यानेंहि समजणार नाहीं. कारण महर्षींनीं महान् विषयाचें आकलन जसें सहज व सोप्या रीतीनें केलें आहे तसें तें सामान्यमनुष्यकृत कल्पित ग्रंथांमध्यें कोठून असणार ? महर्षिप्रणित ग्रंथांमध्यें ही खुबी असते कीं सहज व थोडक्यांत, शिकणारास थोड्या परिश्रमानें पुष्कळ विषय समजेल अशा बेतानें, विषयरचना केलेली असते; म्हणून तेच ग्रंथ त्या पद्धतीनें शिकल्यास सत्वर ज्ञान होतें; पण आधुनिक ग्रंथांमध्यें विषयप्रतिपादनाची पद्धति व लिहिण्याची तऱ्हा मुद्दाम बिकट केल्यामुळें, डोंगर पोखरून कवडीचा लाभ व्हावा त्याप्रमाणें, पुष्कळ परिश्रम करून स्वल्पविषयाचें ज्ञान होतें. समुद्रांत एक बुडी मारून जशीं शंभर मोत्यें मिळावींत तसा लाभ आर्षग्रंथांच्या आर्षपद्धतीनें शिकण्यापासून होतो, हें लक्ष्यांत ठेवून तेच ग्रंथ शिकविण्याकडे शिकविणारांनीं लक्ष्य द्यावें. असो.

व्याकरण शिकून झाल्यावर यास्काचार्यकृत " **निघण्टु** " " **निरुक्त** " दोनहि

ग्रंथ सहा किंवा आठ महिन्यांत अर्थासह शिकवावे. अन्य अमरकोशादिक ग्रंथांमध्यें वर्षेच्या वर्षे घालविण्याचें कांहीं कारण नाहीं. नंतर पिंगलाचार्यकृत "**छन्द-ग्रन्थ**" अर्थासह चार महिन्यांत शिकवावा या ग्रंथाच्या अध्ययनानें वैदिक व लौकिक छंदांचें ज्ञान होऊन नवीन पद्यरचना कशी करावी तेंहि सहज समजेल. वृत्तरत्नाकरासारखे ग्रंथ पढविण्यांत कालक्षेप मुळींच करूं नये. नंतर "**मनुस्मृति, वाल्मिकीरामायण, महाभारत**" किंवा "उद्योगपर्वान्तर्गत **विदुरनीति**" सारखे-ज्यांच्यापासून विद्यार्थ्यांना नीतीचा बोध होऊन ते दुष्ट व्यसनां पासून दूर रहातील असे ग्रंथ शिकवावे. हे पद्यग्रंथ काव्य शिकविण्याच्या पद्धतीनें शिकवावे. पदच्छेद, पदार्थोक्ति, अन्वय, विशेष्य विशेषण संबंध व भावार्थ इत्यादि प्रकारें मागील ग्रंथ एकवर्षांत सहज शिकून होतील. नंतर पूर्वमीमांसा, वैशेषिक, न्याय, योग, सांख्य व वेदान्त हीं दर्शनें-शक्य असल्यास ऋषिप्रणित भाष्यांसह व न जुळल्यास उत्तम विद्वानांनीं सूत्रांच्या आशयाला धरून केलेल्या सरळ व्याख्येसह—शिकवावींत. वेदान्तदर्शन—(उत्तरमीमांसा)-पढण्यापूर्वी ईश, केन, कठ, प्रश्न, मुण्डक, मांडूक्य, ऐतरेय, तैत्तिरीय, छान्दोग्य व बृहदारण्यक हीं दहा उपनिषदें शिकवावीं. हीं उपनिषदें व सूत्रवृत्तीसह षट् दर्शनें शिकण्यास दोन वर्षे पुरे आहेत. नंतर सहा वर्षांमध्यें ऋग्वेद, यजुर्वेद सामवेद, अथर्ववेद हे चार वेद व त्यांचीं ऐतरेय, शतपथ, साम व गोपथ हीं ब्राह्मणें स्वर, शब्द, अर्थ, संबंध व क्रिया यांसह शिकवावीं. म्हणजे अशा रीतीनें जो शिकून तयार होईल तो खरा दशग्रंथी होईल. वेद अर्थासहच शिकले पाहिजेत याविषयीं प्रमाणें—

स्थाणुरयं भारहारः किलाभूदधीत्य वेदं न विजानाति योऽर्थम् ॥ योऽर्थज्ञ इत्सकलं भद्रमश्नुते नाकमेति ज्ञानविधूतपाप्मा ॥

निरुक्त० १। १८॥

(यः) जो मनुष्य (वेदम्) वेद नुसते (अधीत्य) पाठकरतो व (अर्थम्) त्यांचा अर्थ (न विजानाति) जाणत नाहीं, तो खरोखर (भारहारः) भार उचलणारा (स्थाणुः) खांब आहे असें जाणावें. ज्याप्रमाणें एखादा खांब किंवा पशु भार उचलणारा असतो त्याचप्रमाणें तो मनुष्यहि भारवाहक आहे असें जाणावें. पण जो (अर्थज्ञः) वेदांचा अर्थ जाणतो त्याला (सकलम्) सर्व प्रकारचें (भद्रम्) कल्याण (अश्नुते) प्राप्त होतें. त्याचीं पापें ज्ञानानें साफ धुवून

नाहींशी होतात व तो (नाकम् एति) मोक्षरूपी सर्वानंदाला देहपातानंतर प्राप्त होतो. तसेंच—

उतत्वः पश्यन्न ददर्श वाचमुत त्वः शृण्वन्
न शृणोत्येनाम् ॥ उतो त्वस्मै तन्वं १
विसस्रे जायेव पत्य उशती सुवासाः ॥

ऋ० मं० १०।७१।४ ॥

जो अविद्वान् मनुष्य (पश्यन् न ददर्श) पहात असूनहि आंधळा, व (शृण्वन् न शृणोति.) ऐकत असतांहि जो बहिरा व बोलतां येत असूनहि जो मुका आहे अर्थात वेद शिकूनहि अर्थ न समजल्यामुळें ज्याला ते न शिकल्याप्रमाणें झाले आहेत त्याचें जिणें व्यर्थ होय. अविद्वान् लोक वेदांच्या अर्थापासून लाभ करून घेऊं शकत नाहींत. पण जे अर्थ जाणणारे विद्वान् असतात त्यांना, जशी एखादी उत्तम वस्त्र नेसलेली सुंदर स्त्री पतीची इच्छा धरून, पतीला सुख देते, तद्वत विद्या विद्वानांला आपल्या स्वरूपाचा प्रकाश करून सुख देते. तसेंच—

ऋचो अक्षरे परमे व्योमन् यस्मिन् देवा
अधिविश्वे निषेदुः ॥ यस्तन्न वेद किमृचा
करिष्यति य इत्तद्विदुस्त इमे समासते ॥

ऋ० मं० १ । १६४ । ३९ ॥

(यस्मिन्) ज्या (व्योमन्) सर्वव्यापक (परमे) परमात्म्यामध्यें सर्व विश्व–सूर्य-चंद्रादिक सर्व लोक लोकांतरें–आहेत व त्या (अक्षरे) अविनाशी परमेश्वरामध्येंच (ऋचः) सर्व वेदांचें तात्पर्य आहे. असें असतां जो (तत् न वेद) मनुष्य परमेश्वराला जाणत नाहीं त्याला त्या (ऋचा किं करिष्यति) वेदपठनाचा काय उपयोग? पण जे (तत् विदुः) अर्थज्ञानपूर्वक वेद शिकून परमेश्वराला जाणतात त्यांनाच खऱ्या आनंदाची प्राप्ति होते.

या वरील आधारांवरून नुसत्या वेदपाठाचा कांहीं उपयोग नाहीं हें ध्यानीं येईल. वेदांचें अर्थासह अध्ययन करून, धर्माचरणपूर्वक योगाभ्यास करून, ब्रह्मज्ञान प्राप्त करून आनंदमय परमेश्वरामध्यें स्थित व्हावें. तात्पर्य या सर्व सुखप्राप्तीला अर्थासहित केलेल्या वेदाध्ययनाची आवश्यकता आहे. म्हणून वेदांचें अर्थज्ञानपूर्वक अध्ययन

करावें. वेदांचें अध्ययन झाल्यावर आयुर्वेद-अर्थात चरक, सुश्रुत वगैरे ऋषिमुनि-प्रणित वैद्यशास्त्रग्रंथांचे अर्थ, क्रिया, शस्त्र, छेदन, भेदन, लेप, चिकित्सा, निदान, औषध, पथ्य, शारीर, देश, काल व वस्तुगुणपरीक्षण यांसह शिकावें. या आयुर्वेदाच्या अध्ययनाला चार वर्षें पुरेत. नंतर धनुर्वेदाचें अध्ययन करावें. धनुर्वेदामध्यें राजसंबंधीं सर्व विद्या आहेत. यांत दोन भेद आहेत. एक राजासंबंधीं व दुसरा प्रजेसंबंधीं. तसेंच यांत सैन्याची रचना, शस्त्रास्त्रविद्या, व्यूहरचना, सैन्याची कवाईत, युद्धकरण्याची पद्धति वगैरे सर्वांचा समावेश होतो. या सर्व विद्या योग्य रीतीनें शिकाव्या. तसेंच प्रजापालन, न्याय करणें, प्रजावृद्धि-दुष्टांना दंड करून सुष्टांचा प्रतिपाल करणें वगैरे प्रजेच्या हिताचे सर्व व्यवहार शिकवावे. याचें अध्ययन करण्यास दोन वर्षें पुरे. नंतर गांधर्ववेदाला आरंभ करावा. यांत गानविद्येचा समावेश होतो. स्वर, राग, रागिणी, समय, ताल, ग्राम, तान, वादित्र, नृत्य, गीत इत्यादि सर्व योग्य रीतीनें शिकून तयार व्हावें. गानविद्येमध्यें नारदसंहिता नामक आर्यग्रंथ आहे त्याचें अध्ययन करावें व सामवेदाचें तालसुरांत गायन करतां येईल इतकी तयारी करावी. पण वेश्या, भडवे व विषयासक्तींत मग्न असणारे पुरुष यांचा संग किंवा त्यांच्याप्रमाणें गर्दभवत् व्यर्थ आलाप काढूं नयेत. गायन सशास्त्रपद्धतीनें शिकावें. नंतर अर्थवेदाच्या अध्ययनाला आरंभ करावा. यामध्यें शिल्पविद्या, पदार्थगुणविज्ञान, क्रियाकौशलादिकांनीं नानाविधपदार्थ निर्माण करणें वगैरेचा समावेश होतो. पृथिवीपासून आकाशापर्यंत सर्व पदार्थविद्या यांत समाविष्ट होते. तिचें पद्धतशीर अध्ययन करावें. अर्थवेदाचें अध्ययन करून तदनुसार उद्योग केल्यास ऐश्वर्य वाढतें, म्हणून त्याचें परिशीलन चांगलें करावें. नंतर दोन वर्षामध्यें सूर्यसिद्धांतादिक ज्योतिष ग्रंथ, बीजगणित, अंकगणित, भूगोल, खगोलविद्या, भूगर्भविद्या योग्य रीतीनें शिकाव्या. नंतर हस्तक्रिया व यंत्ररचना यांविषयीं शक्य तेवढें ज्ञान मिळवावें. पण जे ग्रह, नक्षत्र, जन्मपत्र, राशि, मुहूर्त वगैरे फलविधायक ग्रंथ आहेत, ते सर्व मिथ्या असल्यामुळें त्यांचें अध्ययन मुळींच करूं नये व ते शिकवूंहि नयेत. अशा रीतीनें शिकण्याचा व शिकविण्याचा प्रयत्न केल्यास वीस किंवा एकवीस वर्षें अध्ययन करून उत्तम विद्वान् व सुशिक्षित मनुष्य होऊन, तो कृतकृत्य होत्साता आनंदानें राहील. या पद्धतीनें जितकी विद्या वीस किंवा एकवीस वर्षांत येऊं शकते तेवढी अन्य पद्धतीनें अन्य पुस्तकें शिकवून शंभर वर्षामध्येंहि येणार नाहीं.

(१९) ग्रन्थप्रामाण्य.

ऋषिलोक, महान् विद्वान्, शास्त्रज्ञ व धर्मात्मे असल्यामुळें त्यांनीं केलेले ग्रंथहि तसेच सद्विचारानें ओतप्रोत भरलेले असतात, म्हणून त्यांचेंच अध्ययन व अध्यापन

करावें. पण जे लोक अल्पज्ञ, थोडेंसें शास्त्र शिकलेले, पक्षपातसहित असतात अर्थात ज्यांच्यांत ऋषियोग्यता नसते त्यांचे ग्रंथहि अल्पगुणयुक्तच असल्यामुळें ते शिकवूं नयेत.

पूर्वमीमांसेवर व्यासमुनिकृत व्याख्या, वैशेषिकदर्शनावर गौतममुनिकृत भाष्य, न्यायसूत्रांवर वात्स्यायनभाष्य, योगदर्शनावर व्यासभाष्य, कपिलमुनिकृत सांख्यदर्शनावर भागुरिमुनिकृत भाष्य, व्यासमुनिकृत वेदान्तसूत्रांवर वात्स्यायनमुनिकृत भाष्य अथवा बौधायनमुनिकृत भाष्यवृत्ति यांसहित वरील सहाहि दर्शनें शिकावींत व शिकवावींत. कल्पग्रंथाचाहि अंगांत समावेश होतो. ऋग्, यजुः साम व अथर्ववेद हे जसे ईश्वरप्रणीत ग्रंथ आहेत, तसे ऐतरेय, शतपथ, साम, गोपथ, हीं चार ब्राह्मणें; शिक्षा, कल्प, व्याकरण, निघण्टु, निरुक्त, छन्द, ज्योतिष हीं वेदांचीं सहा अंगें; पूर्वमीमांसादि सहा उपांगें; आयुर्वेद, धनुर्वेद, गान्धर्ववेद व अर्थवेद हे चार उपवेद हे सर्व ऋषिमुनिप्रणित ग्रंथ आहेत. यांमध्यें जें जें वेदाविरुद्ध असेल तें तें सर्व त्याज्य समजावें; कारण ईशप्रणित वेद निर्भ्रांत व स्वतः प्रमाण आहेत व ब्राह्मणादि सर्व ग्रंथ परतःप्रमाण आहेत-अर्थात यांचें प्रमाण वेदाधीन आहे. वेदांविषयीं जास्त विस्तारपूर्वक "**वैदिक धर्मस्वरूप**" नामक ग्रंथांत लिहिलें आहे तें तेथें पहावें, व या ग्रंथामध्येंहि पुढें लिहिण्यांत येईल.

आतां येथें अनार्ष असल्यामुळें अल्पलाभ देणारे परित्यागार्ह कोणते कोणते ग्रंथ आहेत त्यांचा संक्षेपानें निर्देश करतों. हे पुढील ग्रंथ त्या त्या शास्त्रांत भ्रमजाल माजवणारे ग्रंथ आहेत असें समजावें. (१) **व्याकरणां**मध्यें कातंत्र, सारस्वत, चन्द्रिका, मुग्धबोध, कौमुदी, शेखर, मनोरमा इ० (२) **कोशां**मध्यें अमरकोश वगैरे. (३) छन्दोग्रंथांमध्यें वृत्तरत्नाकरादिक, (४) **शिक्षा**ग्रंथांमध्यें "अथ शिक्षां प्रवक्ष्यामि पाणिनीयं मतं यथा" इत्यादि अपाणिनीय शिक्षा. (५) **ज्योतिष**ग्रंथांमध्यें शीघ्रबोध, मुहूर्तचिंतामणि इ०, (६) **काव्यां**मध्यें नायकाभेद, कुवलयानंद, रघुवंश, माघ, किरातार्जुनीयादिक, (७) **मीमांसा** ग्रंथांमध्यें धर्मसिंधु, व्रतार्क इ० (८) **वैशेषिकां**मध्यें तर्कसंग्रह वगैरे. (९) **न्याया**मध्यें जगदीशी वगैरे. (१०) **योगा**मध्यें हठयोगप्रदीपिकादिक. (११) **सांख्य**ग्रंथामध्यें सांख्यतत्वकौमुदि वगैरे. (१२) **वेदान्ता**मध्यें योगवासिष्ठ, पंचदशी इ० (१३) **वैद्यका**मध्यें शार्ङ्गधरादिक. (१४) **स्मृति**ग्रंथांमध्यें मनुस्मृतींतील प्रक्षिप्त श्लोक व अन्य स्मृतिग्रंथ. (१५) सर्व तंत्रग्रंथ. (१६) सर्व पुराणें. (१७) सर्व उपपुराणें. (१८) तुलसीदासकृत भाषारामायण, रुक्मिणीमंगलादि भाषाग्रंथ, हे सर्व कपोलकल्पित मिथ्याग्रंथ आहेत. (**प्रश्न**) या वरील ग्रंथांत थोडेंहि सत्य नाहीं काय? (**उत्तर**) आहे. पण त्या स्वल्पसत्याबरोबर असत्याचा भाग त्यांत अतिशय आहे म्हणून विषयुक्त अन्नाप्रमाणें ते सर्व ग्रंथ त्याज्य होत. (**प्र०**) तर तुम्ही पुराणें

व इतिहास यांना मानीत नाहीं काय ? (उ०) आम्ही सत्याला मानतों व मिथ्याला मानीत नाहीं. (प्र०) सत्य कोणतें व मिथ्य कोणतें ? (उत्तर) " ब्राह्मणानिकल्पान्गाथानाराशंसीरितिहासपुराणानीति । " हें गृह्यसूत्रांतील वचन आहे. पूर्वी ऐतरेय, शतपथ इ० ब्राह्मणग्रंथ सांगितले आहेत त्यांनांच इतिहास, पुराण, कल्प, गाथा व नाराशंसी हीं पांच नांवें आहेत. श्रीमद्भागवतादि ग्रंथांला पुराण हें नांव नाहीं. (प्र०) वरील त्याज्य ग्रंथांमध्यें जो जो सत्याचा अंश आहे त्याचें तुम्ही कां ग्रहण करीत नाहीं ? (उ०) जें जें सत्य या भागवतादि ग्रंथांत आहे तें वेदादि सत्यशास्त्रांतील आहे व जें असत्य आहे तें त्यांचें स्वतःचें आहे. आम्ही वेदांला प्रमाण मानतों तेव्हां आम्ही सर्व सत्याला मानतोंच, मग या असत्यकथायुक्त ग्रंथांतून सत्य हुडकण्याची काय गरज आहे ? जर कोणी हे असत्य ग्रंथ शोधूं लागेल तर त्याच्या मनावर त्यांतील असत्याचा डाग लागल्याशिवाय राहणार नाहीं. " **असत्य मिश्रं सत्यं दूरतस्त्याज्यम्** " असत्य मिश्रित सत्यहि सोडलेंच पाहिजे, कारण त्यापासून कोणताहि लाभ नाहीं. (प्र०) बरें जर पुराणें असत्य आहेत तर तुम्ही कोणते ग्रंथ सत्य मानतां ? तुमचें मत काय ? (उ०) आम्ही वेदांला प्रमाण मानतों. वेदांमध्यें जें करावयाचा विधि व ज्याचा निषेध सांगितला आहे तें आम्ही मानतों. ज्या अर्थी वेद आम्हाला मान्य आहेत त्या अर्थी वेद हेंच आमचें मत आहे. वेदच प्रमाण मानून सर्वांनीं ऐक्य मतानें राहिलें पाहिजे. (प्र०) अहो जसा सत्यासत्याविषयीं अन्य ग्रंथांमध्यें विरोध आहे त्याचप्रमाणें तो सहा दर्शनांमध्येंहि आहे. पहा–मीमांसा कर्मापासून, वैशेषिक कालापासून, न्याय परमाणुपासून, योग पुरुषार्थापासून, सांख्य प्रकृतीपासून व वेदान्त ब्रह्मापासून सृष्टीची उत्पत्ति मानतात. हा विरोध नव्हे काय ? (उ०) पहा–सांख्य किंवा वेदान्त या दोन शास्त्रांशिवाय इतर चार शास्त्रांत स्पष्टपणें सृष्टीची उत्पत्ति सांगितलीच नाहीं व जो तुम्ही विरोध दाखविला तो मुळींच विरोध नव्हे ; कारण विरोध व अविरोध यांचें तुम्हांस ज्ञान नाहीं असें वाटतें. आम्ही तुम्हांला विचारतों कीं " विरोध एका विषयांत होतो कीं भिन्न भिन्न विषयांत ? " (प्र०) एका विषयांत अनेकांचें परस्पर विरुद्ध कथन असलें तर त्यास विरोध असें म्हणतात. वरील सहाहि दर्शनांत सृष्टि हा एकच विषय आहे व त्यांत परस्पर विरोध आहे. नाहीं बरें ? (उ०) पहा–विद्या जरी एक आहे तथापि व्याकरण, वैद्यक, ज्योतिष इत्यादि भिन्न भिन्न अवयवीभूत विषयांचें भिन्नभिन्न ग्रंथांमध्यें निरनिराळें प्रतिपादन आहे. म्हणून त्याला विरोध असें म्हणतां येणार नाहीं. सृष्टिविद्येविषयीं भिन्नभिन्न सहा अवयवांचें भिन्नभिन्न सहा शास्त्रांनीं प्रतिपादन केलें असल्यामुळें त्यांत परस्पर विरोध मुळींच नाहीं. पहा एक घट बनवावयाचा असतां त्याला (१) कर्म, (२) समय (काल) (३) माति, (४) (विचारसंयोग-

वियोगादि) पुरुषार्थ, (५) प्रकृतीचे गुण, (६) कुंभार, याप्रमाणें सहा कारणें लागतातच. याचप्रमाणें सृष्टीच्या **कर्म** या कारणाविषयीं मीमांसेमध्यें, **काला**विषयीं वैशेषिकामध्यें, उपादानकारण प्रकृति–**परमाणूं**–विषयीं न्यायदर्शनामध्यें, **पुरुषार्था**-विषयीं योगामध्यें, **तत्वां**च्या परिगणनाविषयीं सांख्यामध्यें व निमित्तकारण **परमेश्व**-राविषयीं वेदान्त दर्शनामध्यें विस्तारानें सांगितलें आहे. यांमध्यें विरोध मुळींच नाहीं. ज्याप्रमाणें वैद्यशास्त्रामध्यें निदान, चिकित्सा, औषधदान, पथ्य वगैरे भिन्न भिन्न प्रकरणें लिहिलेलीं असतात, पण सर्वांचा सिद्धांत रोगनिवारण हाच एक असतो, त्याचप्रमाणें वरील षट्दर्शनांमध्यें जगताच्या एका एका कारणाची व्याख्या केलेली आहे; त्यामुळें त्यांत परस्पर विरोध कोठेंहि नाहीं. याविषयीं जास्त "सृष्टिप्रकरणांत" पुढें लिहूं.

(२०) विघ्नें.

पुढें लिहिल्याप्रमाणें अध्ययनामध्यें विघ्नें येतात, तीं सोडून द्यावीं व नेटानें अभ्यास करावा. (१) दुष्ट विषयी लोकांची संगति, (२) मद्यपान, वेश्यागमन, परस्त्रीगमन वगैरे व्यसनें, (३) पुरुषाचा पंचवीस वर्षांपूर्वी व स्त्रीचा सोळावर्षांपूर्वी विवाह होणें, (४) ब्रह्मचर्याचें पालन न होणें, (५) राजा, माता, पिता व विद्वान् यांचें वेदादि शास्त्रांच्या प्रचारामध्यें प्रेम नसणें, (६) अति भोजन, अति जागरण इ० (७) शिकण्या शिकवण्याच्या अथवा परीक्षा देण्याघेण्याच्या वेळीं आळस, कपट वगैरे करणें, (८) विद्येपासूनच उत्कृष्ट लाभ होतो असें न मानणें, (९) ब्रह्मचर्यानें बल, बुद्धि, पराक्रम, आरोग्य, राज्य, धन वगैरे मिळतात असें न मानणें, (१०) सर्व व्यापक ईश्वराला उपास्यदेव न मानतां ईश्वराचे ठिकाणीं अन्य पाषाणादि जड मूर्तींचें दर्शन व पूजन यांत कालक्षेप करणें, (११) माता, पिता, अतिथि, आचार्य व विद्वान् याच खऱ्या पूज्य मूर्ति आहेत असें मानून त्यांची सेवा व सत्संग न करणें, (१२) वर्णाश्रमधर्म सोडून ऊर्ध्वपुंड्र, त्रिपुंड्र, तिलक, कंठी, मालाधारण, एकादशी, त्रयोदशी इत्यादि व्रतें करणें, (१३) काशी आदिक तीर्थांच्या स्नानानें व राम, कृष्ण, नारायण, शिव, भगवती, गणेश इत्यादि नामोच्चारणानें पापें दूर होतात असें मानणें, (१४) पाखंडी लोकांवर विश्वास ठेवून विद्या शिकण्यांत अश्रद्धालु होणें, (१५) विद्या, धर्म, योगाभ्यास व परमेश्वरोपासना यांनीं मुक्ति होते असें न मानतां, भागवतादिक भ्रामक ग्रंथांतील गोष्टि ऐकून मुक्ति होते असें मानणें, (१६) लोभानें धनप्राप्तीच्या पाठीमागें लागणें व विद्येमध्यें प्रीति न ठेवणें, (१७) इकडे तिकडे व्यर्थ फिरून कालक्षेप करणें इत्यादि मिथ्या व्यवहारांमध्यें फसून, लोक ब्रह्मचर्यापासून व विद्येपासून होणाऱ्या लाभांला मुकतात व त्यामुळें रोगी व मूर्ख होतात. म्हणून या विघ्नांपासून दूर रहावें व विद्या शिकावी.

(२१) वेदाध्ययनाचा अधिकार.

सध्यांचे सांप्रदायी व कांहीं स्वार्थी ब्राह्मण अज्ञानामुळें असें समजतात कीं, क्षत्रियादिक लोकांनीं विद्याव्यासंग करूं नये. जर त्यांणीं सत्संग व विद्याव्यासंग केला तर आमचें भ्रमजाल चालणार नाहीं व ते लोक आमचा अपमान करूं लागतील, ह्मणून त्यांणीं वेदादिकांचें अध्ययन करूंच नये. अशा रीतीनें हे लोक क्षत्रियादिकांला अज्ञानांत ठेवून त्यांच्या तन, मन व धन यांचा नाश करतात. हें त्यांस उचित नाहीं. म्हणून राजानें व प्रजेनें अशा लोकांचें न ऐकतां आपलीं मुलें विद्वान् होतील असें करण्यास तन, मन व धन या साधनांनीं झटावें. (**प्रश्न**) काय स्त्री व शूद्र यांस वेद पढण्याचा अधिकार आहे? जर यांणीं वेद पढावयाचे तर मग आम्ही काय करावें? "**स्त्रीशूद्रौ नाधीयाताम्**" असे अनेक निषेध आहेत कीं ज्याच्या योगानें स्त्री व शूद्र यांस वेदाचा अधिकार नाहीं असें ठरतें, त्याची वाट काय? (**उत्तर**) सर्व स्त्रीपुरुषांना–मनुष्यमात्राला–वेद शिकण्याचा अधिकार आहे तुम्ही वर दिलेलें वाक्य श्रुतीमध्यें नाहीं म्हणून तें प्रमाण नाहीं. यजुर्वेदामध्यें सर्व मनुष्यांनीं वेद शिकावे म्हणून ते निर्माण केले आहेत असें लिहिलें आहे. पहा–

यथेमां वाचं कल्याणीमावदानि जनेभ्यः।
ब्रह्मराजन्याभ्याः शूद्राय चार्याय च स्वाय
चारणाय ॥ यजु० २६।२॥

परमेश्वर म्हणत आहे कीं (यथा) ज्याप्रमाणें मी (जनेभ्यः) सर्व मनुष्यांसाठीं (इमाम्) या (कल्याणीम्) संसार व मुक्ति यांतील सुखें प्राप्त करून देणारी (वाचम्) ऋग्वेदादि चारहि वेदरूपी वाणी आहे, तिचा (आवदानि) सर्वांस उपदेश केला त्याचप्रमाणें तुम्हीहि करावा. [या ठिकाणीं कोणी असा **प्रश्न** विचारील कीं स्मृतिग्रंथांमध्यें ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णांतील लोकांस वेदाचा अधिकार आहे असें सांगितलें पण शूद्रादिकांला कोठें आहे?] **उत्तरः**–परमेश्वर स्वतः म्हणतो कीं, मी (ब्रह्मराजन्याभ्याम्) ब्राह्मण, क्षत्रिय, (अर्याय) वैश्य, (शूद्राय) शूद्र, (स्वाय) भृत्य, स्त्री इत्यादिक व (अरणाय) अतिशूद्रादिक यांच्यासाठीं–या सर्वांसाठीं–वेदांचा प्रकाश केला आहे. म्हणून सर्वांनीं वेदांचें अध्ययन व अध्यापन करून आपलें ज्ञान वाढवावें. त्याचप्रमाणें वेदमंत्रार्थांचें श्रवण, मननहि सर्वांनीं करावें. सर्वांनीं चांगल्याचें ग्रहण व वाईटाचा त्याग करून, दुःखापासून मुक्त होऊन आनंदीत व्हावें. आतां सांगा बरें परमेश्वराचा उपदेश आम्ही मानावा कीं तुमचें

मत? परमेश्वराचाच उपदेश अवश्य मानला पाहिजे. जर वेदांतील परमेश्वराचा उपदेश कोणी मानला नाहीं तर त्याला नास्तिक असें म्हणावें, "**नास्तिको वेदनिन्दकः**" वेदांची निंदा करणारा, व त्यांना प्रमाण न मानणारा नास्तिक आहे असें समजावें. परमेश्वर शूद्रांचें हित व्हावें असें इच्छित नाहीं काय? परमेश्वर पक्षपाती आहे काय कीं तो द्विजानींच वेद शिकावे व शूद्रांनीं शिकूं नये असें म्हणेल? परमेश्वराचा अभिप्राय शूद्रांनीं शिकूं नये असा जर असता तर शूद्रांना त्याणें वागिन्द्रिय, कान वगैरे अवयव कशाला दिले असते? परमेश्वरानें ज्या प्रमाणें पृथिवी, जल, अग्नि, वायु, चंद्र, सूर्य, अन्न वगैरे पदार्थ सर्वांसाठीं केले आहेत त्याचप्रमाणें त्यानें वेद हेहि सर्वासाठींच प्रसिद्ध केले आहेत. ज्या कोणत्या ग्रंथांत "शूद्रांनीं वेद म्हणूं नये" असा निषेध केला असेल, तेथें त्याचा असा अभिप्राय समजावयाचा कीं, "शिकलें व शिकविलें असतां ज्याला कांहींच ज्ञान होत नाहीं अशा निर्बुद्ध शूद्राला शिकविणें व्यर्थ आहे म्हणून त्यांनां ते शिकवूं नयेत." पण ज्यांना ज्ञानग्रहणशक्ति आहे अशा स्त्रीशूद्रांना न शिकविणें ही न शिकविणाऱ्यांची मूर्खता, स्वार्थपरायणता व निर्बुद्धता आहे असें समजावें. पहा—

ब्रह्मचर्येण कन्या युवानं विन्दते पतिम्॥

अथर्व० ११।२४।३।१८॥

"(कन्या) कुमारिका (ब्रह्मचर्येण) ब्रह्मचर्य सेवन करून व वेदादि शास्त्रें शिकून, पूर्ण विदुषी होऊन, सुशिक्षित बनून आपल्या युवावस्थेमध्यें स्वसदृश विद्वान् (युवानम्) व पूर्ण युवावस्थेला प्राप्त झालेल्या (पतिम्) पतीला (विन्दते) मिळवते, प्राप्त होते. तात्पर्य ब्रह्मचर्यसेवन करून, पूर्ण विद्या व सुशिक्षा यांना प्राप्त करून घेऊन विदुषी कुमारिका स्वसदृश पूर्ण ब्रह्मचर्य धारण केलेल्या व विद्वान् पतीशीं विवाह करतात. अर्थात ज्याप्रमाणें मुलांना ब्रह्मचर्य व विद्याध्ययन यांची आवश्यकता आहे त्याचप्रमाणें कुमारिकांनांहि आहे. (**प्रश्न**) स्त्रियांनींहि वेद शिकावे? (**उत्तर**) अवश्य शिकावे. पहा—

इमं मन्त्रं पत्नी पठेत्। (श्रौतसूत्रम्)

"स्त्रीनें यज्ञामध्यें हा मंत्र म्हणावा" असें श्रौतसूत्रांत लिहिलेलें आहे. जर वेदादि शास्त्रांचा अभ्यास तिणें केला नसेल तर यज्ञामध्यें तिला स्वरसहित मंत्रांचें उच्चारण कसें करतां येईल? पूर्वी वेदादि शास्त्रांचा अभ्यास करून **गार्गी** वगैरे स्त्रिया महान् विदुषी झाल्या होत्या असा शतपथ ब्राह्मणांत स्पष्ट उल्लेख केलेला आहे. शिवाय पुरुष विद्वान् व स्त्री अविदुषी किंवा स्त्री विदुषी व पुरुष अविद्वान् असला तर त्या स्त्री-

पुरुषांमध्यें नित्य देवासुरसंग्राम होऊन त्या घरांत कशाचें सुख होणार आहे? स्त्रिया सुशिक्षित नसल्या तर कन्यापाठशालांमध्यें अध्यापिकांच्या जागीं कोणाची योजना करणार? म्हणून स्त्रियांना अवश्य सुशिक्षण दिलें पाहिजे. त्याचप्रमाणें राज्यप्रबंध, न्यायाधीशत्वादि राजकार्यें सुशिक्षित पुरुष असल्याशिवाय होणार नाहींत म्हणून पुरुषहि सुशिक्षित असले पाहिजेत. गृहस्थाश्रमांतील कार्यें पति स्त्रीशीं व स्त्री पतीशीं जर प्रसन्न असलीं तरच निर्विघ्न पार पडतील, नाहीं तर नाहीं. घरांतील सर्व कामांची व्यवस्था बायकांकडेच असते, तेव्हां त्या सुशिक्षित नसल्या तर तींहि व्यवस्था नीट राहणार नाहीं. यासाठीं स्त्रीपुरुष सर्व सुशिक्षित असलेच पाहिजेत.

या आर्यावर्तांतील प्राचीन स्त्रिया (धनुर्वेदांत)–युद्धविद्येमध्येंहि निष्णात होत्या. कैकेयीसारख्या स्त्रिया राजा दशरथाबरोबर समरभूमीमध्यें जाऊन सहाय्य करीत असत. ब्राह्मणांच्या व क्षत्रियांच्या स्त्रियांना सर्व विद्या आल्या पाहिजेत, वैश्यांच्या स्त्रियांना सर्व व्यवहारविद्या व शूद्रस्त्रियांना पाकादिक सेवाविद्या अवश्य आल्या पाहिजेत. ज्याप्रमाणें पुरुषांना व्याकरण, न्याय, धर्म व इतर व्यवहारविद्या आल्याच पाहिजेत, त्याचप्रमाणें स्त्रियांनाहि व्याकरण, धर्म, वैद्यक, गणित, शिल्पविद्या, पाकविद्या इत्यादि अवश्य आल्याच पाहिजेत. कारण या विद्यांवांचून सत्यासत्यनिर्णय, पतीच्या अनुकूल वर्तन, यथायोग्य संतानांची काळजी व व्यवस्था करणें, त्यांचें योग्य पालनपोषण करणें, घरांतील सर्व कार्यें यथायोग्य करणें, घरांतील सामान्य औषधोपचार करणें, ऋतुमानपरत्वें यथायोग्य अन्नपान करणें किंवा करविणें, वैद्यशास्त्राच्या ज्ञानावांचून घरांतील माणसांचें आरोग्य राखणें व त्यांस आनंदित ठेवणें, शिल्पविद्येवांचून घरांतील टापटीप, वस्त्रादिक आभरणें करणें किंवा करविणें, गणितज्ञानावांचून हिशोब ठेवणें, किंवा दुसऱ्यास सांगणें, व वेदादिशास्त्रांच्या ज्ञानावांचून धर्म जाणून त्याचप्रमाणें आचरण करणें व अधर्माच्या बाजूलाहि न जाणें या गोष्टि घरामध्यें स्त्रियांना करतां येणार नाहींत. त्याचप्रमाणें पुरुषहि शास्त्राध्ययनांवांचून उत्तम व्यवहार करूं शकणार नाहींत. म्हणून सर्वांनीं आपल्या मुलांना व मुलींना ब्रह्मचर्य पाळावयास लावावें व त्यांना सुशिक्षित करावें; ब्रह्मचर्य, सुशिक्षण व विद्या यांच्यायोगानें त्यांच्या शरीर, बुद्धि व आत्मा यांमध्यें बल उत्पन्न करावें. असें करणारीं जीं आईबापें असतील तींच धन्य होत. मुलांना असें शिक्षण द्यावें कीं ज्या योगानें तीं माता, पिता, पति, सासु, श्वशुर, स्त्री, राजा, प्रजा, नातलग, शेजारी, इष्टमित्र व सन्तान यांच्याशीं धर्माप्रमाणें योग्य रीतीनें वागतील. विद्या हा अविनाशी कोश आहे. जितका याचा व्यय करावा तितका तो वाढतो. अन्य खजिने खर्च केल्यानें संपतात व त्यांना चोरांची व वारसांची भीति असते; पण विद्या ही दान केल्यानें वाढते व

चोर व वारसी यांपासून तिला मुळींच भीति नाहीं. या विद्यारूपी धनाची वाढ व रक्षण करणारा जसा राजा आहे त्याचप्रमाणें प्रजाहि आहेः–

कन्यानां संप्रदानं च कुमाराणांच रक्षणम् ॥ मनु.७।९२॥

कुमार व कुमारिका यांना पूर्वोक्त समयापासून ब्रह्मचर्य पाळावयास लावणें व त्यांना विद्वान् करणें हें राजाचें कर्तव्य आहे. ही राजाज्ञा जो मोडील त्या माता-पित्यांना राजानें दंड करणें योग्य आहे. आठ वर्षांनंतर, मुलगा किंवा मुलगी, यांना घरीं ठेवूं नये. त्यांना *आचार्यकुलामध्यें पाठवून द्यावें, तेथेंच त्यांचा समावर्तन-संस्काराचा समय होईपर्यंत ठेवावें व तोंपर्यंत कोणाचा विवाहहि करूं नये. हें सर्व लोकांनीं करावें किंवा राजानें करवावें.

सर्वेषामेव दानानां ब्रह्मदानं विशिष्यते ॥
वार्यन्नगोमहीवासस्तिलकाञ्चनसर्पिषाम् ॥ मनु० ४।२२३ ॥

"जल, अन्न, गाय, पृथिवी, वस्त्र, तिल, सुवर्ण व घृत इत्यादि सर्व इतर दानांपेक्षां (वेद) विद्यादानाचें श्रेष्ठत्व अतिशय आहे." म्हणून शक्य तेवढा प्रयत्न, तन, मन व धन यांच्या सहाय्यानें, विद्यावृद्धीसाठीं करावा. ज्या देशांत ब्रह्मचर्य, विद्यादान व वेदोक्त कर्म यांचा प्रचार होतो तो देश सौभाग्ययुक्त होतो. या प्रकरणांत ब्रह्मचर्या विषयीं संक्षेपानें वर्णन दिलें आहे. पुढें चवथ्या समुल्लासामध्यें समावर्तन व गृहस्थाश्रम यांविषयीं लिहिण्यांत येईल.

इति सुभाषाविभूषितो बालशिक्षाविषयः तृतीयः
समुल्लासः सम्पूर्णः ॥ ३ ॥

---

* राजा परधर्मी असल्यामुळें जर गुरुकुलें स्थापन करण्याचें काम त्याचेकडून होत नाहीं तर लोकसमूहानें आपल्यांत व्यवस्थितपणें संघशक्ति तयार करून विद्यावृद्धिकरितां ठिकठिकाणीं गुरुकुलें स्थापन करण्याचा निर्बन्ध करावा.

अथ चतुर्थसमुल्लासः

———:o:———

अथ समावर्तन-विवाह-गृहाश्रमविधिं वक्ष्यामः ॥

समावर्तन

वेदानधीत्य वेदौ वा वेदं वापि यथाक्रमम् ॥ अविप्लुतब्रह्मचर्यो गृहस्थाश्रममाविशेत् ॥ मनु० ३।२॥

ब्रह्मचर्यामध्यें गुरुकुलांत राहून, आचार्याच्या अनुकूल वर्तन करून, चार, तीन, दोन किंवा एक वेदाचें सांगोपांग अध्ययन करून, जो पूर्ण ब्रह्मचारी राहिला असेल अर्थात ज्याचें ब्रह्मचर्य भ्रष्ट झालें नसेल त्याच पुरुषानें (किंवा त्याच स्त्रीनें) गृहस्थाश्रमामध्यें प्रवेश करावा.

तं प्रतीतं स्वधर्मेण ब्रह्मदायहरं पितुः ॥ स्रग्विणं तल्प आसीनमर्हयेत् प्रथमं गवा ॥ मनु० ३।३॥

स्वधर्मानें युक्त असणारा, (ब्रह्मदायहरम्) ज्याणें पिता किंवा गुरु यांच्यापासून विद्या ग्रहण केली आहे असा, व जो माला धारण करून आपल्या पलंगावर बसलेला आहे, अशा शिष्याचा सत्कार, पिता, आचार्य इत्यादि लोकांनीं गोप्रदान करून करावा. त्याचप्रमाणें उक्त लक्षणांनीं युक्त असणाऱ्या विद्यार्थिनीचाहि तिच्या पित्यानें गोप्रदान करून सत्कार करावा.

विवाह.

गुरुणानुमतः स्नात्वा समावृत्तो यथाविधि ॥ उद्वहेत द्विजो भार्यां सवर्णां लक्षणान्विताम् ॥ मनु०३।४ ॥

गुरूची आज्ञा घेऊन, व्रतस्नान करून, गुरुकुलांतून घरीं यावें व ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या द्विजांनीं आपल्या वर्णानुकूल सुंदर लक्षणांनीं युक्त असणाऱ्या कन्येशीं विवाह करावा.

असपिण्डा च या मातुरसगोत्रा च या पितुः ॥ सा प्रशस्ता द्विजातीनां दारकर्मणि मैथुने ॥ मनु०३।५ ॥

जी कन्या मातेच्या सहा पिढ्यांमध्यें येत नसेल, अर्थात जी मातेशीं सपिंड नसेल व जी पित्याच्या गोत्रांतील नसेल, त्या कन्येशीं द्विजांनीं विवाह करावा. याचें कारणः—

परोक्षप्रिया इव हि देवाःप्रत्यक्षद्विषः ॥ शतपथ० ॥

विद्वांनांला परोक्ष वस्तु विशेष प्रिय असते. हा नियम सार्वत्रिक आहे. मनुष्यमात्राची जशी परोक्षपदार्थावर प्रीति असते त्याप्रमाणें प्रत्यक्ष पदार्थावर नसते. ज्या गोष्टीचे गुण आपण ऐकलेले असतील ती प्रत्यक्ष व्हावी असें वारंवार वाटत असतें; पण जी वस्तु जवळ असते तिच्या संबंधानें मनामध्यें तितकी उत्कंठा नसते. सपिंडांत व स्वगोत्रांत न येणाऱ्या कन्येशीं विवाह केल्यानें पुढील लाभ होतातः—

(१) जीं बालकें बाल्यावस्थेपासून एकत्र राहिलेलीं असतात, जवळ राहिल्यामुळें ज्यांच्यांत लहानपणापासून एकमेकांविषयीं प्रेम किंवा द्वेष राहिलेले आहेत, ज्यांमध्यें खेळ, भांडणें किंवा बाल्यावस्थेंत विपरीत आचरण झालेलें आहे व ज्यांनीं एकमेकांस उघडें नागवें पाहिलेलें असतें त्या स्त्रीपुरुषांमध्यें विवाह झाला तर त्यांच्यांत परस्पर प्रेम उत्पन्न होत नाहीं. पण तींच जर दूरचीं असलीं तर त्यांच्यांत परस्पर प्रेम उत्पन्न होऊं शकतें. (२) ज्याप्रमाणें पाण्यांत पाणी मिसळल्यानें कांहीं विशेष गुण उत्पन्न होत नाहीं, त्याचप्रमाणें सपिंड व सगोत्रांत विवाह केल्यानें संततीमध्यें विशेष गुण उत्पन्न होत नाहींत. (जर असपिंड व असगोत्रांतील कन्येशीं विवाह केला तर क्षेत्राचा-रजवीर्याचा-बदल झाल्यामुळें संतति सशक्त व विशेष बुद्धिमान् होते.) (३) ज्याप्रमाणें दुधामध्यें मिश्री आदिक औषधी मिसळल्यानें फार उत्तम गुण त्या मिश्रण'त उत्पन्न होतात त्याचप्रमाणें भिन्न कुल व भिन्न गोत्रांतील मुलीशीं विवाह केल्यानें फार लाभ होतात. (४) ज्याप्रमाणें एक देशांत असलेला रोगी दुसऱ्या देशांत व दुसऱ्या हवेंत गेल्यावर चांगला निरोगी होतो त्याचप्रमाणें दूरदेशस्थांचा अन्यगोत्रोत्पन्नांशीं विवाह केल्यानें उत्तम लाभ होतो. (५) विवाहित स्त्रीपुरुषांचीं घरें जवळ असल्यानें भांडण, तंटे, विरोध व दुःखें एकमेकांत होण्याचा संभव जास्त आहे, तसा दूर असणारांमध्यें नाहीं. त्याचप्रमाणें दूर देशीं असणाऱ्या संबंधी लोकांमध्यें प्रेमहि वाढत्या प्रमाणावर असतें तसें जवळ असणाऱ्यांमध्यें नसतें. (६) दूर देशांतील मुलीशीं विवाह केल्यानें त्या देशांतील लोकांशीं संबंध जडतो व त्यामुळें त्या देशांतील वर्तमान समजतें व तद्देशीय पदार्थहि प्राप्त होतात. जवळच्या लोकांशीं संबंध झाल्यानें हा लाभ होत नाहीं. मुलीला "**दुहिता**" असें म्हणतात तें यासाठींच होयः—

दुहिता दुर्हिता दूरे हिता दोग्धेर्वा ॥ निरु०।३।४ ॥

"कन्येचा दूर देशांतील वराशीं विवाह झाल्यानें फार हित होतें म्हणून तिला दुहिता असें म्हणतात" (७) घर जवळ असलें तर कन्या बापाच्या घरीं वारंवार येईल व प्रत्येक खेपेस बापाच्या घरांतील कांहीं तरी पदार्थ घेऊन जाईल, अशा अनेक

प्रकारांनीं बापाला दारिद्र्य येण्याचा जास्त संभव आहे, म्हणून विवाह दूर देशस्थांशीं झालेला चांगला. (८) स्त्रीचें माहेर जवळ असल्यानें तिला आपल्या माहेरच्या मांणसांवद्दल जास्त घमेंड होईल व पतीच्या घरीं थोडेसें कांहीं निमित्त झालें कीं, तेथें भांडण करून ती माहेरीं चालती होईल. सासरच्यांची परवा करणार नाहीं यामुळें व आणखी अनेक कारणांनीं दोनहि कुलांमध्यें वितुष्ट येण्याचा संभव फार आहे. म्हणून दूरदेशांतील मुलीशीं व त्याप्रमाणें असपिंड व असगोत्र अशा मुलीशींच विवाह करावा. तसेंच—

महान्त्यपि समृद्धानि गोऽजाविधनधान्यतः ॥ स्त्री सम्बन्धे दशैतानि कुलानि परिवर्जयेत् ॥ मनु० ३।६ ॥

धन, धान्य, गाई, बकरीं, हत्ती, घोडे इत्यादि पदार्थांच्या योगानें कुलें कितीहि श्रीमंत असलीं तथापि खालीं लिहिलेल्या दहा कुलांशीं विवाहसंबंध करूं नये:—

हीनक्रियं निष्पुरुषं निश्छन्दो रोमशार्शसम् ॥ क्षय्यामयाव्य-पस्मारिश्वित्रकुष्ठिकुलानि च ॥ मनु० ३।७ ॥

सदाचारहीन, ज्यांत सत्पुरुष नाहींत, वेदाध्ययनरहित, ज्याच्या शरीरावर केश फार आहेत, ज्याच्या कुलांत क्षय, दमा, आमरोग, अपस्मार, श्वेतकुष्ठ, गलितकुष्ठ हे रोग असतील, त्याच्या कुलांतील कन्येशीं किंवा वराशीं विवाह करूं नये. कारण अशा कुलांतील कन्या किंवा वर यांशीं विवाह करण्यानें ते ते रोग स्वकुलांत उत्पन्न होतात म्हणून नेहमीं उत्तम कुलांतील कन्या किंवा पुत्र यांशींच विवाह करावा तसेंच—

नोद्वहेत्कपिलां कन्यां नाधिकाङ्गीं न रोगिणीम् ॥ ना-लोमिकां नातिलोमां न वाचाटां न पिङ्गलाम् ॥ मनु० ३।८॥

रंगानें पिवळी, पुरुषापेक्षां अधिक लठ्ठ, उंच किंवा बलिष्ठ, रोगी, केशरहित किंवा सर्व शरीरावर जिच्या केंश आहेत अशी, बडबडणारी वाचाळ व पिंगट डोळ्यांची अशा स्त्रीशीं विवाह करूं नये. तसेंच—

नर्क्षवृक्षनदीनाम्नीं नान्त्यपर्वतनामिकाम् ॥ न पक्ष्यहि-प्रेष्यनाम्नीं न च भीषणनामिकाम् ॥ मनु० ३।९ ॥

रोहिणीदेवी, रेवतीबाई इत्यादि नक्षत्रांचीं नांवें; तुळसी, गुलाबी, चंपा वगैरे वृक्षांचीं नांवें; गंगा, यमुना वगैरे नद्यांचीं नांवें; चांडाली इत्यादि अंत्य वर्णांचीं नांवें; हिमालय, पार्वती, विंध्या वगैरे पर्वतांचीं नांवें; मैना, कोकिला वगैरे पक्ष्यांचीं नांवें;

नागुबाई, भुजंगी इत्यादि सर्पांचीं नांवें; दासांचीं नांवें; चण्डिका, काली, इत्यादि भीतिदायक नांवें ज्यांना असतील, अशा कन्यांशीं विवाह करूं नये. तसेंच—

अव्यङ्गाङ्गीं सौम्यनाम्नीं हंसवारणगामिनीम् ॥ तनुलोमकेशदशनां मृद्वङ्गीमुद्वहेत्स्त्रियम् ॥ मनु० ३।१०॥

जिचे सर्व अवयव सप्रमाण व सरळ आहेत, नांव चांगलें सुंदर आहे, जिची चाल चालणूक हंस व हत्तीप्रमाणें आहे, लोम, केश व दांत हे जिचे सूक्ष्म आहेत, व जिचें अंग कोमल आहे अशा कन्येशीं विवाह करावा.

विवाहाचा समय कोणता ?

सोळाव्या वर्षापासून चोवीस वर्षापर्यंत कन्येचें लग्न करावें व पंचवीसाव्या वर्षापासून अठ्ठेचाळीसाव्या वर्षापर्यंत पुरुषाचें लग्न करावें. चोवीस वर्षाच्या स्त्रीनें अठ्ठेचाळीस वर्षाच्या पुरुषाशीं विवाह करणें उत्तम; अठरा वर्षाच्या स्त्रीनें पस्तीस वर्षाच्या पुरुषाशीं विवाह करणें मध्यम व सोळा वर्षाच्या स्त्रीनें पंचवीस वर्षाच्या पुरुषाशीं विवाह करणें कनिष्ठ होय. (यापेक्षां कमी वयांत विवाह करणें हीनतर आहे असें समजावें.) ज्या देशांत याप्रमाणें श्रेष्ठ प्रौढ विवाह होतात व विद्याभ्यास आणि ब्रह्मचर्य यांविषयीं जास्त प्रेम रहातें त्या देशांतील मनुष्यें सुखी असतात. ज्या देशांतील लोक ब्रह्मचर्य पाळीत नाहींत, विद्याभ्यास करीत नाहींत व बाल्यावस्थेंत विवाह करतात तो देश दुःखामध्यें बुडून जातो; कारण ब्रह्मचर्य व विद्याभ्यास यावरच लोकांचीं सर्व सुखें अवलंबून आहेत. (**प्रश्न**) अहो आपण वयाची इयत्ता फार वाढवली ! पाराशरीप्रमाणें मुलीचा विवाह आठव्या वर्षीं करावा लागतो. पहा—

अष्टवर्षा भवेद् गौरी नववर्षा च रोहिणी ॥
दशवर्षा भवेत्कन्या तत ऊर्ध्वं रजस्वला ॥ १ ॥

माता चैव पिता तस्या ज्येष्ठो भ्राता तथैव च ॥
त्रयस्ते नरकं यान्ति दृष्ट्वा कन्यां रजस्वलाम् ॥ २ ॥

हे श्लोक पाराशरी व शीघ्रबोध इत्यादि ग्रंथांत आहेत. यांचा अर्थ—"मुलीला आठव्या वर्षीं गौरी, नवव्या वर्षीं रोहिणी, दहाव्या वर्षीं कन्या व यापुढें रास्वला असें म्हणतात. दहाव्या वर्षापर्यंत जे आईबाप मुलीचें लग्न करीत नाहींत व दहा वर्षानंतर अविवाहित स्थितींत तिला पाहतात ते नरकांत जातात." या श्लोकांच्या आधारानें विवाहकाल तर अगदीं बालपणींच येतो, मग तुम्ही म्हणतां तें खरें कशावरून ?

(उत्तर) अहो तुम्ही म्हणतां त्याप्रमाणेंच आणखींहि दोन श्लोक आहेत ते आधीं पहाः—

ब्रह्मोवाच=एकक्षणा भवेद्गौरी द्विक्षणेयन्तु रोहिणी ॥
त्रिक्षणा सा भवेत्कन्या ह्यत ऊर्ध्वं रजस्वला ॥ १ ॥
मातापिता तथा भ्राता मातुलो भगिनी स्वका ॥
सर्वे ते नरकं यान्ति दृष्ट्वा कन्यां रजस्वलाम् ॥ २ ॥

हें सद्योनिर्मित ब्रह्मपुराणांतर्गत वचन आहे. परमाणूला स्वतःच्या आंसाभोंवतीं फिरण्यास जेवढा वेळ लागतो त्याला क्षण असें म्हणतात. "मुलगी जन्मल्याबरोबर पहिल्या क्षणीं गौरी, दुसऱ्या क्षणीं रोहिणी, तिसऱ्या क्षणीं कन्या व यापुढें रजस्वला होते. तीन क्षणांनंतर जे आई, बाप, भाऊ, मामा, बहीण, या मुलीला अविवाहित स्थितींत पाहतात ते नरकांत जातात." या श्लोकांवरून तर विवाहकाल जन्मल्याबरोबरच प्राप्त झाला. हे श्लोक खरे कीं तुमचे खरे! (प्रश्न) तुमचे श्लोक प्रमाण नाहींत, आम्ही दिलेलेच प्रमाणभूत आहेत. (उत्तर) कां प्रमाण नाहींत? जर ब्रह्मदेवानें सांगितलेले श्लोक प्रमाण नाहींत तर तुमचेहि प्रमाण नाहींत. (प्रश्न) काय, पराशरीचे व काशिनाथशास्त्री बुवांचे श्लोक तुम्ही प्रमाण मानीत नाहीं? (उत्तर) तुम्ही ब्रह्मदेवाच्या श्लोकांना प्रमाण मानीत नाहीं व पाराशरी त्यापेक्षां जास्त प्रमाण मानतां! ज्या अर्थी तुम्ही ब्रह्माचे श्लोक प्रमाण मानीत नाहीं त्या अर्थी आम्ही पराशरीचेहि प्रमाण मानीत नाहीं. (प्रश्न) तुमचे श्लोक असंभवनीय असल्याकारणानें प्रमाण मानतां येत नाहींत. जन्मतांच जरी विवाहाची तयारी केली तथापि हजारों क्षण व्यतीत होणार. चार क्षणांमध्येंच विवाह व्हावा कसा? व तसा विवाह करण्यापासून लाभ तरी काय? (उत्तर) जर आमचे श्लोक असंभवनीय आहेत तर तुमचेहि तसेच आहेत. दहावर्षांपूर्वी विवाह करून तरी लाभ काय? पहा सोळा वर्षांनंतर स्त्रीच्या गर्भाशयाची वाढ पुरी होते व शरीर बलयुक्त होतें, त्याचप्रमाणें पुरुषाचें चौवीस वर्षांनंतर शरीर वाढून पूर्ण होतें व वीर्य परिपक्व व बलिष्ट होतें. आठव्या वर्षी कन्येच्या ठिकाणीं संतानोत्पत्ति होणें असंभव आहे. धन्वंतरीनें सुश्रुतांत म्हटलें आहे कीं,—

ऊनषोडशवर्षायामप्राप्तः पञ्चविंशतिम् ॥
यद्याधत्ते पुमान् गर्भं कुक्षिस्थः स विपद्यते ॥ सुश्रुते ॥
शारीर अ. १०।४७॥

" जर सोळा वर्षांहून कमी वयाच्या स्त्रीच्या ठिकाणीं, पंचवीस वर्षांहून कमी वयाच्या पुरुषाकडून गर्भ राहिला तर तो पतन पावतो." व जर तो जगला तर अगदींच रोगी व अशक्त असा होतो. या वैद्यक वचनावरून उघड होतें कीं, लहाणपणीं विवाह होणें इष्ट नाहीं. याचप्रमाणें अकालीं अकराव्या वर्षीं मुलीला रजस्वला मानणें हें ज्याप्रमाणें अप्रयोजक आहे त्याचप्रमाणें सर्वीला सरसकट गौरी व रोहिणी अशीं नांवें देणें हेंहि फार अयोग्य आहे. महादेवाच्या स्त्रीला गौरी व वसुदेवाच्या स्त्रीला रोहिणी अशीं नांवें आहेत. पौराणिक लोक यांना आपल्या माता असें समजत असूनहि प्रत्येक मुलीला त्यांचीं नांवें देऊन त्यांच्याशीं विवाह करणें कसें बरें धार्मिक होईल? जर हीं नांवें शारीरिक गुणांवरून आहेत म्हणावें तर एखाद्या काळ्या मुलीला "गौरी" असें कसें म्हणतां येईल? हे सर्व श्लोक आपमतलबी लोकांनीं रचलेले आहेत. ज्याप्रमाणें आम्ही पूर्वी दिलेले श्लोक ब्रह्माच्या नांवावर लादले आहेत, त्याचप्रमाणें तुमचेहि श्लोक कोणी पराशराच्या नांवावर लादले आहेत यांत शंका नाहीं. कारण—

त्रीणि वर्षाण्युदीक्षेत कुमार्यृतुमती सती ॥
ऊर्ध्वं तु कालादेतस्माद् विन्देत सदृशं पतिम् ॥मनु०९।९०॥

" कन्या ऋतुमती झाल्यानंतर तिला योग्य पति मिळावा म्हणून तीन वर्षेपर्यंत योग्य वराचा शोध करून नंतर (तिच्या योग्य पतीशीं) तिचा विवाह करून द्यावा." प्रतिमासाला एक वेळ याप्रमाणें तीन वर्षांतील छत्तीस महिन्यांमध्यें छत्तीस वेळ रजोदर्शन झाल्यावर कन्या विवाह करण्यास योग्य होते. तसेंच—

काममामरणात्तिष्ठेद् गृहे कन्यर्तुमत्यपि ॥
न चैवैनां प्रयच्छेत्तु गुणहीनाय कर्हिचित् ॥ मनु ९।८९ ॥

" पाहिजे तर मुलांमुलींनीं घरीं मरेपर्यंत अविवाहित राहावें, पण कांहीं झालें तरी गुणकर्मस्वभाव यांणीं विरुद्ध व अयोग्य असणाऱ्या मुलामुलीशीं केव्हांहि विवाह करूं नये." यावरून इतकें ठरलें कीं बालपणीं विवाह करूं नये व अयोग्य स्त्री पुरुषांमध्यें विवाह होऊं नये.

(प्रश्न) विवाह करणें मातापित्यांच्या आधीन असावें कीं, वधूवरांच्या आधीन असावें ? (उत्तर) विवाह करणें वधूवरांच्या स्वाधीन असणें चांगलें. मातापित्यांच्या मनांत जर आपल्या मुलामुलींचा विवाह करावयाचें असेल तर त्यांच्या सल्यानें करावा, पण त्यांच्यावर जुलूम करूं नये. वधूवरांमध्यें प्रेम वृद्धिंगत झालें पाहिजे. तें कधींहि जबरीनें होणार नाहीं. वधूवरें जर अप्रसन्न असलीं तर संतानहि

अशक्त उत्पन्न होतें. विवाहामध्यें वधूवरांचा संबंध मुख्य आहे तसा मातापित्यांचा नाहीं. जर त्यांमध्यें प्रसन्नता असली तरच तीं सुखी होतील, नाहींतर त्यांच्या दुःखास पारावार नाहींसा होईल. पहा—

सन्तुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैव च ॥ यस्मिन्नेव कुले नित्यं कल्याणं तत्र वै ध्रुवम् ॥ मनु० ३।६० ॥

ज्याकुलांमधील स्त्री व पुरुष सदोदित प्रसन्न असतात, त्या कुलामध्यें आनंद, लक्ष्मी व कीर्ति हीं सदैव निवास करतात. व ज्याठिकाणीं स्त्रीपुरुषांमध्यें कलह वास करतो, त्या कुलामध्यें दुःख, दारिद्र्य व निंदा यांचें वास्तव्य असतें. यासाठीं पूर्वापार चालत असलेली स्वयंवर पद्धतीच अमलांत आणणें उत्तम होय. जेव्हां स्त्रीपुरुष विवाह करूं इच्छितील, तेव्हां त्यांणीं विद्या, विनय, शील, रूप, आयु, बल, कुल शरीर यांचें यथायोग्य प्रमाण पाहून विवाह करावा. या वरील गुणामध्यें वधूवरांची परीक्षा करून त्यांचा विवाह होणें उत्तम. विजोड वधूवरांमध्यें विवाह होण्यापासून कांहींएक फायदा नाहीं; त्याचप्रमाणें बालपणीं विवाह करणेंहि घातकच आहे. पहा—

युवाः सुवासाः परिवीत आगात् स उ श्रेयान् भवति जायमानः ॥ तं धीरासः कवय उन्नयन्ति स्वाध्यो३ मनसा देवयन्तः ॥ १ ॥ ऋ० मं० ३।८।४ ॥

आधेनवो धुनयन्तामशिश्वीः शबर्दुघाः शशया अप्रदुग्धाः ॥ नव्या नव्या युवतयो भवन्तीर्महद् देवानामसुरत्वमेकम् ॥ २ ॥ ऋ० मं० ३।५५।१६ ॥

पूर्वीरहं शरदः शश्रमाणा दोषावस्तोरुषसो जरयन्तीः ॥ मिनाति श्रियं जरिमा तनूनामप्यू नु पत्नीर्वृषणो जगम्युः ॥ ३ ॥ ऋ० मं० १।१७९।१ ॥

जो पुरुष (परिवीतः) यज्ञोपवीत धारण केलेला, पूर्ण ब्रह्मचर्य सेवन करून उत्तम विद्या शिकलेला (सुवासाः) सुंदर शरीर व सुंदर वस्त्र धारण करणारा व ब्रह्मचर्यानें युक्त असा (युवा) तरुण, जेव्हां विद्या पूर्णपणें ग्रहण करून, गृहस्थाश्रमामध्यें (आगात्) येतो, (स ऊ) तोच खरोखर या दुसऱ्या विद्येचे ठिकाणीं झालेल्या जन्मामध्यें (जायमानः) प्रसिद्ध होऊन (श्रेयान्) मंगलयुक्त (भवति) होतो, त्याचें कल्याण होतें. (स्वाध्यः) उत्तम ध्यानानें युक्त असणाऱ्या (मनसा) विज्ञानाच्या योगानें (देवयन्तः) विद्यावृद्धीची कामना धारण करणारे (धीरासः) धैर्यवान् (कवयः) विद्वान् लोक (तम्) त्या पुरुषाला (उन्नयन्ति) उन्नतीनें युक्त समजून मान देतात, त्याची प्रतिष्ठा वाढवितात; पण जो पुरुष ब्रह्मचर्य धारण करीत नाहीं, उत्तम विद्या व सुशिक्षण यांचें ग्रहण करीत नाहीं व बाळपणीं विवाह करतो, त्या स्त्रीपुरुषांचा नाश होतो व विद्वानांमध्यें त्यांना मान मिळत नाहीं. ॥ १ ॥

(अप्रदुग्धाः) कधींहि न दोहन केलेल्या (धेनवः) गाईप्रमाणें ज्या स्त्रिया पूर्ण ब्रह्मचारिणी व (अशिश्वीः) बाल्यावस्थेला सोडून तारुण्यप्राप्तझालेल्या, (शवर्दुघाः) सर्व प्रकारच्या उत्तम व्यवहारांला जाणणाऱ्या व सांगणाऱ्या (शशयाः) कौमार्याचें उल्लंघन करणाऱ्या (नव्या नव्याः) नवीन नवीन शिक्षण व अवस्था ज्यांना प्राप्त झालेल्या आहेत अशा (भवन्तीः) असणाऱ्या (युवतयः) पूर्ण युवावस्थेमध्यें असणाऱ्या, स्त्रिया (देवानाम्) ब्रह्मचर्य व उत्तम नियम यांचें पालन करून विद्वान् बनलेल्या पुरुषांपासून (एकम्) एका (महत्) महान् (असुरत्वम्) प्रज्ञाशास्त्रांच्या उत्तम शिक्षेला प्राप्त होऊन, तरुण पतींला प्राप्त होतात व (आधुनयन्ताम्) त्यांपासून गर्भाला धारण करतात. चुकूनसुद्धां स्त्रियांनीं बालपणीं मनानेंहि पुरुषाचें ध्यान करूं नये. (मग पुरुषांशीं बालपणीं शरीरसंबंध ठेवूं नये हें निराळें सांगणें नको) असें केल्यानेंच इहपरलोकीं सुख प्राप्त होतें. बालविवाहाच्या योगानें जितकें नुकसान पुरुषाचें होतें त्यापेक्षां स्त्रियांचें नुकसान फार होतें. (म्हणून नेहेमीं प्रौढविवाह करावा.) ॥ २ ॥

ज्याप्रमाणें (नु) शीघ्र (शश्रमाणाः) अत्यंत श्रम करणारे–पुरुषार्थ करणारे– (वृषणः) वीर्यसिंचन करण्यास समर्थ असणारे पूर्ण युवावस्थेमध्यें असणारे पुरुष (पत्नीः) मनोहर दिसणाऱ्या व यौवनामध्यें असणाऱ्या स्त्रियांना (जगम्युः) प्राप्त होऊन, पूर्ण शंभर वर्षे किंवा याहिपेक्षां जास्त आयुष्याचा आनंदानें उपभोग घेऊन पुत्रपौत्रादिकांसह सुखानें राहतात, त्याचप्रमाणें इतर स्त्रीपुरुषांनींहि सदोदित रहावें. तसेंच ज्याप्रमाणें (पूर्वीः) पूर्वी व हल्लीं असणारे (शरदः) शरद् ऋतु व (उषसः) प्रभातकालच्या वेला (जरयन्तीः) वृद्धावस्थेला प्राप्त करितात

नाहिसेंहि करितात (दोषा) रात्री व (वस्तोः) दिवस हे (तनूनाम्) शरीरांच्या (श्रियम्) शोभेचा (जरिमा) अतीशय वृद्धि व बल यांना प्राप्त करवितात किंवा शरीरशोभेला दूर करितात त्याचप्रमाणें (अहम्) मी स्त्री किंवा पुरूष (उ) चांगल्याप्रकारें कोणत्या कालीं कोणत्या अवस्थेंत कशा स्त्रीबरोबर विवाह करावा म्हणजे वृद्धि होते नाहींतर क्षय होतो याच्या (अपि) निश्चयानें ब्रह्मचर्याचें पालन करून, उत्तम विद्या व सुशिक्षा यांना प्राप्त करून घेऊन, शरीर व आत्मा यांचें बल वाढवून, तारुण्य प्राप्त झाल्यावरच विवाह करीन तर याच्या योगानें आम्हांला जरूर सुख मिळेल. जर आम्ही याच्या विरुद्ध वागलों व विवाह केला तर तें आचरण वेदाच्या विरुद्ध असल्यामुळें आम्हांला दुःखदायकच होईल. ॥ ३ ॥

याप्रमाणें जोंपर्यंत सर्व ऋषिमुनी, राजेमहाराजे व इतर आर्यलोक हे सर्व, ब्रह्मचर्य पालन करून विद्या पूर्णपणें शिकून, यौवनदशेमध्येंच विवाह करीत होते, तोंपर्यंत हा देश उन्नतावस्थेमध्यें होता; पण जेव्हांपासून ब्रह्मचर्याकडे दुर्लक्ष, विद्येचा अभाव व पराधीन अशा बाल्यावस्थेमध्येंच आईबाप लहान अर्भकांचा विवाह करूं लागले तेव्हांपासून या आर्यावर्तदेशाला अवनति लागलेली दिसते. म्हणून सर्व सज्जनांनीं हे बालविवाहादिक दुष्ट आचार सोडून, पूर्वीप्रमाणेंच प्रौढपणीं स्वयंवर करण्याची पद्धत सुरू करावी. विवाह सवर्ण कन्येशीं व्हावा व वर्णव्यवस्था गुण, कर्म, व स्वभाव यांच्यावरून ठरवावी. (**प्रश्न**) ब्राह्मण मातापित्यांपासून मुलगा होतो तोहि ब्राह्मणच होतो हें आम्ही जाणतों ; पण तुम्ही म्हणतां कीं गुणकर्मावरून वर्ण ठरवावे. हें कसें ? एका वर्णाच्या स्त्रीपुरुषांपासून अन्य वर्णाची उत्पत्ति होते कीं काय ? अन्य वर्णाच्या आईबापांपासून कधींतरी ब्राह्मण उत्पन्न होईल काय ? (**उत्तर**) होय, होतात. पूर्वीहि पुष्कळ झाले आहेत, सध्यां होत आहेत व पुढेंहि होतील. छांदोग्य उपनिषदामध्यें अज्ञातकुल जाबाल, क्षत्रिय कुलांत उत्पन्न झालेला विश्वामित्र व चांडाल कुलांत उत्पन्न झालेला मातंग ऋषि हे सर्व ब्राह्मण झाले. सध्यांहि तुमच्यांत जे उत्तम, विद्या, स्वभाव व आचरण यांनीं युक्त असतील ते ब्राह्मणच होत व जे मूर्ख दुराचारी असतील ते शूद्र होत. व याचप्रमाणें भविष्यकालींहि ज्ञानी लोक मानणार. (**प्रश्न**) जें शरीर ज्या वर्णाच्या रजवीर्यापासून उत्पन्न झालें आहे तें बदलून तेथें दुसरा वर्ण कसा वरें उत्पन्न होईल ? (**उ०**) रजवीर्याच्या योगानें ब्राह्मणशरीर होत नाहीं. पहा—

वर्णव्यवस्था.

स्वाध्यायेन जपैर्होमैस्त्रैविद्येनेज्यया सुतैः ॥
महायज्ञैश्च यज्ञैश्च ब्राह्मीयं क्रियते तनुः ॥ मनु० २।२८ ॥

(स्वाध्यायेन) अध्ययन व अध्यापन यांच्या योगानें (जपैः) विचार करणें व करविणें, नानाप्रकारचे होम करणें, संपूर्ण वेद शब्द, अर्थ, संबंध व स्वरोच्चारसहित

शिकणें व शिकविणें, (इज्यया) पौर्णमासेष्टि वगैरे करणें (सुतैः) पूर्वोक्त विधिपूर्वक संतानोत्पत्ति करणें, (महायज्ञैःच) ब्रह्मयज्ञ, देवयज्ञ, पितृयज्ञ, वैश्वदेव व अतिथियज्ञ करणें (यज्ञैःच) अग्निष्टोमादि यज्ञ, विद्वानांचा सत्कार, संगति, सत्यभाषण, परोपकार करणें, संपूर्ण शिल्पविद्या शिकणें, व शिकविणें व दुष्टाचार सोडून श्रेष्ठाचाराप्रमाणें वर्तन करणें. ह्या आचारांच्या योगानें (इयम्) हें (तनुः) शरीर (ब्राह्मी) ब्राह्मणवर्णाचें (क्रियते) केलें जातें. हें मनूचें मत आहे व तें तुम्हाला मान्य आहे, असें असतांहि तुम्ही केवळ रजवीर्याच्या योगानेंच वर्णव्यवस्था कां मानतां ? गुणकर्मस्वभावानुसार वर्ण मानणें हीच ऋषीपरंपरेनें आलेली व्यवस्था आहे. (प्र०) काय तुम्ही परंपरेचेंहि खंडन करणार ? (उ०) नाहीं. आर्षपरंपरा आम्ही मानतों पण तुमची कल्पित व उलटी व्यवस्था मानीत नाहीं. (प्र०) आमची उलटी व तुमची सरळ व्यवस्था आहे याला प्रमाण काय ? (उ०) आमचें मत सृष्टीच्या प्रारंभापासून चालत आलेल्या वैदिक परंपरेप्रमाणें आहे व तुमचें पांच सात पिढ्यांत कोणी उपस्थित केलें आहे. यावरून तुमचें उलट व आमचें मत सरळ आहे असें ठरतें. जर आईबापांप्रमाणेंच संतान उत्पन्न होत असतें, तर सज्जनाला दुर्जनपुत्र, दुर्जनाच्या पोटीं सज्जनाची उत्पत्ति अशा तऱ्हेची स्थिति केव्हांहि दिसली नसती. ही स्थिति प्रत्यक्ष पहात असूनहि तुम्हीं भ्रमांत पडत आहांत हें आश्चर्य आहे. पहा मनूनें काय म्हटलें आहे—

येनास्य पितरो याता येन याताः पितामहाः ॥
तेन यायात्सतां मार्गं तेन गच्छन्न रिष्यते ॥ मनु० ४।१७८ ॥

ज्या मार्गानें आईबाप, आजेपणजे गेले असतील त्या मार्गानें मुलानें जावें, मात्र तो (सताम्) सज्जनांचा मार्ग असला पाहिजे. सज्जन वाडवडील ज्या मार्गानें गेले असतील त्या मार्गानें जावें, त्यांचें आचरण जर वाईट असेल तर त्याचा अवलंब करूं नये. धर्मात्मे व सज्जन यांच्याप्रमाणें आचरण केलें असतां कधींहि दुःख प्राप्त होत नाहीं. हें सर्व जाणतात. त्याचप्रमाणें वेदामध्यें सांगितलेला तेवढाच धर्म सनातन असून, वेदाज्ञेच्या विरुद्ध असलेला धर्म कधींहि सनातन होऊं शकत नाहीं. हेंहि सर्व प्रसिद्ध आहे. जे लोक या धर्माला मानीत नसतील त्यांणीं आपला पिता दरिद्री असला तर दारिद्र्यांतच राहून मिळालेली संपत्ति खुशाल फेंकून द्यावी. ज्याप्रमाणें पिता दरिद्री, आंधळा व कुकर्मी असला तर मुलानेंहि दरिद्री, अंध व कुकर्मी झालें पाहिजे असें नाहीं तद्वतच वर्ण व्यवस्थे संबंधानें आहे. ज्या पुरुषांमध्यें जे उत्तम गुण असतील त्या गुणांची वाढ करून घेऊन दुष्ट गुणांचा त्याग करणें हें सर्वांस

योग्य आहे. जे कोणी रजवीर्याच्या आधारानें वर्णव्यवस्था मानीत असतील त्यांना असा प्रश्न विचारावा कीं, "जो आपला वैदिक धर्म सोडून ख्रिस्ती किंवा मुसलमान होतो, त्याचें धर्मांतर झाल्यावरहि पूर्ववर्ण कायम राहतो कीं नाहीं?" धर्मान्तर केल्यावरोबर रजवीर्याचें शरीर बदलत नाहीं. असें असतां हीं वैदिक कर्में सोडल्यामुळें त्याच्या ठिकाणीं पूर्व ब्राह्मणादि वर्णांचा लोप झाला असें सर्व मानतात. यावरून हें सिद्ध होतें कीं, उत्तम गुणकर्मांच्या योगानेंच ब्राह्मणादि वर्ण मानले जातात व नीच गुणकर्मांच्या योगानेंच शूद्रवर्ण मानला जातो. अर्थात नीच कुलांत उत्पन्न झाला तरीहि जर तो उत्तम गुण-कर्म-स्वभाव यांनीं युक्त असेल तर त्याला ब्राह्मण समजावें व उत्तम कुलांत उत्पन्न होऊन जो हीन कर्में करतो त्याची नीच वर्णांत गणना करावी. (प्र०)

ब्राह्मणोऽस्य मुखमासीद् बाहू राजन्यः कृतः ॥ ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्या ५ शूद्रो अजायत ॥ यजु० ३१।११ ॥

"परमेश्वराच्या तोंडापासून ब्राह्मण, बाहूंपासून क्षत्रिय, ऊरूंपासून वैश्य व पायांपासून शूद्र उत्पन्न झाले" याप्रमाणें वेदांत म्हटले आहे. ज्याप्रमाणें मुख बाहु होत नाहींत व बाहु मुख होऊं शकत नाहीं त्याचप्रमाणें ब्राह्मणाचे क्षत्रिय होऊं शकत नाहींत व क्षत्रियांचे ब्राह्मणहि होऊं शकत नाहींत, असें असतांहि तुम्ही गुणकर्मावरून वर्ण कसे मानतां ? (उ०) यावरील "**ब्राह्मणोस्य**" या मंत्राचा तुम्ही केलेला अर्थ बरोबर नाहीं कारण त्या मंत्रात "**पुरुष**" या शब्दाची पूर्व मंत्रांतून अनुवृत्ति आहे. "**पुरुष**" शब्दाचा अर्थ "सर्वव्यापक, निराकार, परमेश्वर" असा आहे. निराकाराला मुखादि अवयव असूं शकत नाहींत व ज्याला मुखादि अवयव आहेत तो "**पुरुष**" अर्थात सर्वव्यापक असूं शकणार नाहीं. (**यः पुरि जगति शेते सर्वं व्याप्नोति सः पुरुषः**) परमेश्वर सर्वव्यापक असल्यामुळेंच त्याला "**पुरुष**" असें म्हणतात व तो निराकार असल्यामुळेंच सर्वत्र व्याप्त आहे. साकार वस्तु सर्वव्यापक होऊं शकत नाहीं. अर्थात साकार-पदार्थ सर्वव्यापक, सर्वशक्तिमान्, जगताचा उत्पादक, धारक व प्रलयकर्ता, जीवांच्या पापपुण्याची व्यवस्था करणारा, सर्वज्ञ, अजन्मा, मृत्युरहित असा होऊंशकत नाहीं. हीं विशेषणें निराकार परमेश्वरालाच लागूं शकतात. म्हणून वरील मंत्राचा अर्थ पुढें लिहिल्याप्रमाणें होतो-(**अस्य**) या सर्वव्यापक परमेश्वराच्या सृष्टीमध्यें मुखाप्रमाणें जो सर्वांत मुख्य व उत्तम गुणयुक्त असेल तो (ब्राह्मणः) ब्राह्मण होय. (बाहुः । **बाहुवै बलं बाहुर्वै वीर्यम्** । शतपथे.) बल व वीर्य यांना बाहु असें म्हणतात. या

बल व वीर्य यांमध्यें जो अधिक असतो तो (राजन्यः) क्षत्रिय समजावा. (ऊरू) कंबरेच्या खालचा भाग व जानूच्या वरचा भाग याला ऊरु असें म्हणतात. ऊरूंच्या बलानें जो सर्व देशदेशांतरीं व्यापारासाठीं जातो व तेथें उत्तम व्यापार करून परत येतो त्याला (वैश्यः) वैश्य असें म्हणतात. व जो (पद्भ्याम्) पाया प्रमाणें नीच असा (बुद्धिहीन)–अर्थात मूर्खत्वादि गुणांनीं युक्त बुद्धिरहित केवल श्रम करणारा असतो त्याला शूद्र असें म्हणतात. शतपथादिब्राह्मणग्रंथांमध्यें या मंत्राचा असाच अर्थ केला आहे. पहा—

यस्मादेते मुख्यास्तस्मान्मुखतो ह्यसृज्यन्त । इत्यादि ॥

" ज्या अर्थी हे मुख्य आहेत त्या अर्थी ते मुखापासून उत्पन्न झाले असें म्हटलें आहे. " व हें म्हणणें सयुक्तिकहि आहे. ज्याप्रमाणें सर्व अवयवांमध्यें मुख हें श्रेष्ठ आहे त्याचप्रमाणें मनुष्यांमध्यें जो पूर्ण विद्वान् व उत्तम गुणकर्मस्वभावानें युक्त असतो त्याला ब्राह्मण असें म्हणतात. परमेश्वर निराकार असल्यामुळें त्याच्या मुखापासून ब्राह्मण उत्पन्न झाले हें म्हणणें सर्वथा असंभवनीय आहे. हें वंध्यास्त्रीला पुत्र झाला असें म्हणण्याप्रमाणें निर्मूल आहे. जर मुखापासून ब्राह्मणाची उत्पत्ति झाली असती तर मुखाप्रमाणेंच गोलगोल ब्राह्मणाचें शरीर असतें, कारण उपादान कारणाचे गुण कार्यामध्यें येतात. याचप्रमाणें क्षत्रियांचें शरीर बाहूंप्रमाणें, वैश्यांचें उरूंप्रमाणें व शूद्रांचें पायांप्रमाणें असलें पाहिजे होतें. पण असें असलेलें दिसत नाहीं. बरें जे मुखापासून उत्पन्न झाले होते त्यांची ब्राह्मण ही संज्ञा आहे असें जे कोणी म्हणत असतील त्यांनां सांगावें कीं, " ज्या अर्थी तुम्ही गर्भाशयांतून उत्पन्न होतआहांत व मुखापासून नाहीं त्या अर्थी तुम्ही ब्राह्मण नव्हे." असो. वरील मंत्राचा जो आम्ही अर्थ केला त्याचप्रमाणें शतपथांतहि आहे व त्याच आधारावरून मनूमध्येंहि पुढचा श्लोक आलेला आहेः—

शूद्रो ब्राह्मणतामेति ब्राह्मणश्चैति शूद्रताम् ॥
क्षत्रियाज्जातमेवन्तु विद्याद्वैश्यात्तथैव च ॥ मनु. १०।६५॥

शूद्र कुलांत उत्पन्न होऊनहि ज्यांच्या आंगीं ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांच्याप्रमाणें गुण, कर्म व स्वभाव असतील ते ब्राह्मण, क्षत्रिय किंवा वैश्य आहेत असें समजावें. त्याचप्रमाणें जो ब्राह्मण, क्षत्रिय किंवा वैश्याच्या कुलांत उत्पन्न होऊन त्याच्या वर्णाप्रमाणें गुणकर्मस्वभावानें युक्त नसेल व शूद्राचे गुणकर्मस्वभाव त्याच्या अंगीं असतील तर त्याला शूद्र असें समजावें. त्याचप्रमाणें क्षत्रिय व वैश्यकुलांत उत्पन्न झालेल्या संबंधानें समजावें. अर्थात् या कुलांत उत्पन्न झालेलेहि अन्य गुणकर्मानें युक्त

असले तर अन्य वर्णाला प्राप्त होतात. अर्थात् ज्या मनुष्याच्या अंगीं जे गुण-कर्म-स्वभाव असतील त्याप्रमाणें त्याचा वर्ण समजावा. तसेंच—

धर्मचर्यया जघन्यो वर्णः पूर्वं पूर्वं वर्णमापद्यते जातिपरिवृत्तौ ॥ १ ॥ अधर्मचर्यया पूर्वो वर्णो जघन्यं जघन्यं वर्णमापद्यते जातिपरिवृत्तौ ॥ २ ॥ आप. ध. सू.

" धर्माप्रमाणें आचरण करून निकृष्ट वर्णांत उत्पन्न झालेला मनुष्य उच्च वर्णांत जाऊं शकतो व अधर्माचरणानें उत्तम वर्णांतील मनुष्य हीन वर्णाचा होतो." ज्याप्रमाणें गुणकर्मस्वभावानें युक्त असणाऱ्या पुरुषांचे ते ते वर्ण समजावयाचे त्याचप्रमाणे स्त्रियांचेंहि समजावे. असें झाल्यानें सर्व वर्ण आपआपल्या गुणकर्मस्वभावानें युक्त होऊन शुद्ध राहतील व ब्राह्मणांमध्यें क्षत्रिय, वैश्य व शूद्रांसारखे पुरुष दिसणार नाहींत व क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे वर्णाहि शुद्ध राहतील व त्यांच्यांत वर्णसंकर होणार नाहीं असे सर्व वर्ण शुद्ध असले म्हणजे कोणत्याहि वर्णाची निंदा होणार नाहीं व त्याचा अयोग्यपणाहि दिसणार नाहीं.

(**प्रश्न**) समजा कीं, एकाला एकच मुलगा किंवा मुलगी आहे व ती आपल्या म्हणण्याप्रमाणें गुणकर्मस्वभावानें अन्य वर्णांची ठरली तर तिचा अन्य वर्णांमध्यें प्रवेश होणार, मग या आईबापांची सेवा कोणी करावी ? व वंशच्छेद झाल्यासारखें होणार त्याची वाट काय ? (**उत्तर**) सेवाभंग किंवा वंशछेद होण्याची मुळींच भीति नाहीं, कारण विद्यासभा व राजसभा या दोन सभांच्या व्यवस्थेनें ज्यांना त्यांना आपल्या असवर्ण मुलांमुलींबद्दल स्ववर्णाला योग्य असे मुलगे किंवा अशा मुली मिळणार. या पूर्वोक्त दोन सभांच्या व्यवस्थेनें कांहींहि अव्यवस्था होणार नाहीं. गुणकर्मस्वभावावरून जो वर्ग ठरवावयाचा तो कन्यांचा सोळाव्या वर्षी व पुत्रांचा पंचवीसाव्या वर्षी परीक्षा करून निश्चय करावा. अशा प्रमाणें वर्ण निश्चय झाल्यावर ब्राह्मणाशीं ब्राह्मणीचा, क्षत्रियाशीं क्षत्रियेचा, वैश्याशीं वैश्येचा व शूद्राशीं शूद्रीचा विवाह करावा. असे सवर्ण विवाह झाले तरच स्त्रीपुरुषांमध्यें परस्पर प्रीति योग्य प्रकारें राहील. या चार वर्णांचीं कर्तव्यें व गुण पुढें दिल्याप्रमाणें आहेतः—

ब्राह्मणाचे गुण, कर्मे व स्वभाव.

अध्यापनमध्ययनं यजनं याजनं तथा ॥
दानं प्रतिग्रहश्चैव ब्राह्मणानामकल्पयत् ॥ मनु. १ ।८८॥
शमो दमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेव च ॥
ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥ गीता.१८।४२॥

" शिकणें, शिकविणें, यज्ञ करणें व करविणें, दान देणें व घेणें हीं सहा ब्राह्मणाचीं कर्में आहेत. " यांत " प्रतिग्रहः प्रत्यवरः । मनु." दान घेणें हें अत्यंत नीच कर्म आहे असें मनूनेंच पुढें सांगितलें आहे. तसेंच—(शमः) मनामध्यें वाईट कामाची इच्छा केव्हांहि न आणणें व त्याला दुराचरणामध्यें केव्हांहि प्रवृत्त न करणें, (दमः) श्रोत्रादि इंद्रियांला, अन्यायाचारापासून परावृत्त करून, धर्ममार्गानें चालविणें, (तपः) सदा ब्रह्मचारी व जितेंद्रिय होऊन धर्मानुष्ठान करणें, (शौचम्)—

अद्भिर्गात्राणि शुद्ध्यन्ति मनः सत्येन शुद्ध्यति ॥
विद्यातपोभ्यां भूतात्मा बुद्धिर्ज्ञानेन शुद्ध्यति ॥ मनु५।१०९॥

" पाण्यानें बाह्यशरीराची, सत्याचारानें मनाची, विद्या व धर्मानुष्ठान यांच्या योगानें जीवात्म्याची व ज्ञानानें बुद्धीची शुद्धता होते. " आंतील द्वेषप्रीति वगैरे मलांचा त्याग करणें, बाह्यशारीरिक मलांचा त्याग करणें, सत्यासत्याचा निश्चय करून सत्यग्रहण व असत्याचा त्याग करण्याचा निश्चय करणें, यांच्या योगानें सर्व ठिकाणची पवित्रता होते. (क्षान्तिः) निंदा, स्तुति, सुख, दुःख, शीतोष्ण, क्षुधा, तृषा, हानि, लाभ, मानापमान, हर्ष, शोक इत्यादिकांचा त्याग करणें व धर्मामध्यें दृढ निश्चय ठेवणें. (आर्जवम्) कोमलता, निरभिमानता, सरलता व सरळस्वभाव धरणें व कौटिल्यादि दोष सोडणें. (ज्ञानम्) वेदादि शास्त्रें सांगोपांग शिकून तीं दुसऱ्यांस शिकवण्याचें सामर्थ्य अंगीं आणणें, विवेक वाढविणें, सत्याचा निर्णय करतां येणें, जी वस्तु जशी असेल तशीच जाणणें व जाणली असेल तशीच सांगणें, जडाला जड मानणें व चेतनाला चेतन मानणें. (विज्ञानम्) पृथिवीपासून परमेश्वरापर्यंत असणाऱ्या सर्व पदार्थांला पूर्णपणें जाणून त्या सर्वांचा यथायोग्य उपयोग करणें. (आस्तिक्यम्) केव्हांहि वेद, ईश्वर, पूर्वजन्म, पुढचा जन्म, धर्म, विद्या, सत्संग, माता, पिता, आचार्य व अतिथि यांवर अविश्वास किंवा त्यांची निंदा न करतां, सेवा करण्यास योग्य जे आहेत त्यांची सेवा करणें. या प्रमाणें हे वन्य ब्राह्मणाचे गुण, कर्म व स्वभाव आहेत.

क्षत्रियाचे गुण, कर्म व स्वभाव.

प्रजानां रक्षणं दानमिज्याध्ययनमेव च ॥
विषयेष्वप्रसक्तिश्च क्षत्रियस्य समासतः॥ मनु. १।८९॥
शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ॥
दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥ गीता. १८।४३॥

न्यायानें प्रजेचें रक्षण करणें, पक्षपात सोडून श्रेष्ठांचा सत्कार व दुष्टांचा तिरस्कार करणें, सर्व प्रकारें सर्वांचें पालन करणें, (दानम्) विद्या, धर्मप्रवृत्ति व सत्यान्नसेवा

यांसाठीं धनादि पदार्थांचा व्यय करणें, (इज्या) अग्निहोत्रादि यज्ञ करणें, (अध्ययनम्) वेदादि शास्त्रें शिकणें, (विषयेषु अप्रसक्तिः) विषयांमध्यें न फसतां व जितेंद्रिय होऊन, सदोदित शरीर व आत्मा यांचें बल वाढविणें. ॥ (शौर्यम्) हजारों मनुष्यांशीं युद्ध करीत असतांहि भयभीत न होणें (तेजः) सदा तेजस्वी, दीनतारहित प्रगल्भतायुक्त राहणें, (धृतिः) धैर्य न खचवणें, (दाक्ष्यम्) राजा व प्रजा या संबंधाच्या कर्तव्यांमध्यें व सर्व शास्त्रांमध्यें अत्यंत चतुर असणें, (युद्धे अपलायनम्) युद्धामध्यें दृढतेनें निःशंक राहून, केव्हांहि पळून न जाणें, अर्थात पूर्ण विजय मिळेल अशा रीतीनें लढणें, पळण्यानें किंवा शत्रूला धोका देऊन, हुलकावणी दाखवून जर आपला जय होत असेल तर तसें करणें, (दानम्) दानशील असणें, (ईश्वरभावः) पक्षपातरहित होऊन सर्वी बरोबर यथायोग्य वर्तन करणें, विचार करून देणें, प्रतिज्ञा पुरी करणें, वचनभंग कधींहि न करणें. हे अकरा गुण, कर्म व स्वभाव क्षत्रियाचे आहेत.

वैश्याचे गुण, कर्म व स्वभाव.

पशूनां रक्षणं दानमिज्याध्ययनमेव च ॥
वणिक्पथं कुसीदं च वैश्यस्य कृषिमेव च ॥ मनु. १।९० ॥
कृषिगोरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ॥गीता. १८।४४॥

(पशुरक्षणम्) गाई बैल वगैरे पशूंचें पालन व वर्धन करणें, (दानम्) विद्या व धर्म यांची वृद्धि करण्यासाठीं धनादि पदार्थांचा व्यय करणें, (इज्या) अग्निहोत्रादि यज्ञ करणें, (अध्ययनम्) वेदादि शास्त्रांचें अध्ययन करणें (वणिक्यपम्) सर्व प्रकारचे व्यापार करणें, (कुशीदम्) व्याजबट्टा करणें, पण एका शेंकड्याला चार, सहा, आठ, बारा, सोळा, वीस, आणे यांपेक्षां अधीक व्याज न घेणें व मुद्दलाच्या दुप्पटीपेक्षां जास्त रक्कम शेंकडों वर्षांनींहि न घेणें (कृषिम्) शेती करणें, हे वैश्याचे गुण, कर्म व स्वभाव आहेत.

शूद्राचे गुण, कर्म व स्वभाव.

एकमेव तु शूद्रस्य प्रभुः कर्म समादिशत् ॥
एतेषामेव वर्णानां शुश्रूषामनसूयया ॥ मनु. १।९१ ॥
परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ॥गीता. १८।४४॥

शूद्रानें निंदा, ईर्ष्या, अभिमान आदिक दोष सोडून ब्राह्मण क्षत्रिय व वैश्य यांची सेवा योग्य प्रकारें करावी व तीवरच त्यानें आपला निर्वाह करावा. हें एकच शूद्राचें कर्म आहे व तदनुरूपच त्याच्या अंगीं गुण व स्वभाव असतात.

याप्रमाणें संक्षेपानें चारहि वर्णांचे गुण, कर्म व स्वभाव लिहिले आहेत. ज्या ज्या पुरुषामध्यें जे जे गुण दिसतील त्यात्यामानानें त्याचा वर्ण समजावा. अशा रीतीनें गुणकर्मावरून वर्णव्यवस्था पूर्वी प्रमाणें मानीतगेल्यास मनुष्य लवकरच उन्नतीनें युक्त होतील. कारण त्यापासून उत्तम वर्णाला भीति उत्पन्न होईल कीं, जर आपलीं मुलें मूर्ख निघालीं तर तीं शूद्रांत गणलीं जातील. व मुलांनांहि भीति वाटेल कीं जर आपण दुर्वर्तन केलें तर आमचा उत्तम वर्ण जाऊन आम्हांला हीनवर्ण प्राप्त होईल. व नीच वर्णांतील लोकांना उत्तम वर्णयुक्त होण्यास उत्साह येईल. विद्या व धर्म-प्रसार यांचें काम पूर्णपणें ब्राह्मणांकडे असावें, कारण ते विद्वान् व धार्मिक असल्यानें तीं कामें उत्तम रीतीनें चालवूं शकतात. क्षात्रियांकडे राज्याचा अधिकार पूर्णपणें असावा, कारण तेच युद्धादि विद्या जाणत असल्यानें राज्याचें रक्षण करूं शकतात. पशुपालनादि अधिकार वैश्यांजवळ असावे. कारण ते तें काम उत्तम प्रकारें करूं शकतात. शूद्र मूर्ख असल्यानें त्यांजकडून विद्येसंबंधीं जीं जीं करावयाचीं कामें असतात तीं तीं होऊं शकत नाहींत म्हणून त्यांला सेवा करण्याशिवाय दुसरें कोणतेंहि काम देणें उचित नाहीं. त्यांच्याकडून अंगमेहेनतीचें काम करवून घ्यावें. या प्रमाणें चारहि वर्णांला आपआपल्या कर्मांमध्यें प्रवृत्त करणें हें राजा व सभ्यजन यांचें काम आहे.

विवाहाचे प्रकार व त्यांचीं लक्षणें.

ब्राह्मो दैवस्तथैवार्षः प्राजापत्यस्तथाऽसुरः ॥
गान्धर्वो राक्षसश्चैव पैशाचश्चाष्टमोऽधमः ॥ मनु. ३।२१॥

विवाहाचे आठ प्रकार आहेत. ब्राह्म, दैव, आर्ष, प्राजापत्य, आसुर, गांधर्व, राक्षस, व पैशाच. या आठ प्रकारच्या विवहांची व्यवस्था अशी आहे:—(१) **ब्राह्म**—वधू व वर हीं दोनहि पूर्ण ब्रह्मचर्यानें, विद्वत्तेनें, धार्मिकतेनें व सुशीलतेनें युक्त असून, त्यांचा परस्पर प्रसन्नतापूर्वक जो विवाह होतो त्याला "ब्राह्म" असें म्हणतात. (२) **दैव**—विस्तृत यज्ञ करीत असतां ऋत्विजाचें काम करणाऱ्या विद्वानाला अलंकार-युक्त कन्या देणें याला "दैव" विवाह असें म्हणतात (३) **आर्ष**—वराकडून कांहीं घेऊन मुलीचा विवाह करणें हा "आर्ष" विवाह समजावा. (४) **प्राजापत्य**—केवळ धर्मवृद्धिसाठीं वधूवरांचा विवाह होणें हा "प्राजापत्य" होय. (५) **आसुर**—वर व कन्या यांना कांहीं देऊन जबरदस्तीनें त्यांचा विवाह होणें हा "आसुर" विवाह समजावा. (६) नियम व समय यांला सोडून कांहीं आकस्मिक कारणांनीं वर व कन्या यांचा इच्छापूर्वक संयोग होणें हा "**गांधर्व**" विवाह होय. (७) लढाई करून, बलात्कारानें चोरून किंवा कपटानें कन्येचें ग्रहण करून जो विवाह केला

जातो तो "**राक्षस**" विवाह होय. (८) निजलेल्या किंवा मद्य पिऊन गुंग झालेल्या कन्येला बलात्कारानें संयुक्त करणें हा "**पैशाच**" विवाह समजावा. यांमध्यें ब्राह्म विवाह सर्वोत्कृष्ट, दैव व प्राजापत्य मध्यम; आर्ष, आसुर व गांधर्व हे तीन निकृष्ट व राक्षस आणि पैशाच हे महाभ्रष्ट आहेत असें समजावें. विवाह होण्यापूर्वी कन्या व वर यांची एकांतांत गांठ पडूं देऊं नये, कारण यौवनावस्थेमध्यें अविवाहित स्त्रीपुरुष एकान्तात असणें फार दूषणावह आहे. पण जेव्हां वर व कन्या यांच्या विवाहाचा वेळ जवळ येईल अर्थात जेव्हां दोघांचाहि ब्रह्मचर्याश्रम व विद्याभ्यास संपण्यास सहा महिने किंवा एक वर्षाचा अवकाश असेल. तेव्हां कन्या व कुमार यांचें चित्र काढून कन्येचें चित्र व तिचें जीवनवृत्त कुमाराच्या अध्यापकाकडे पाठवावें व कुमारांचें चित्र व त्याचें जीवनवृत्त कन्येच्या अध्यापिकेकडे पाठवावें. ज्या कुमारांचें स्वरूप व ज्याचे जीवनवृत्तांतिल गुण ज्या कन्येशीं जुळतील तिच्याशीं त्याचा विवाह करण्याचें ठरवावें. व त्याप्रमाणें कन्या व कुमार यांना परस्परांचें चित्र व जीवनवृत्त दाखवावें व त्यांचें मत विचारावें. जर त्या दोघांच्याहि मनांत परस्पर विवाह करावयाचा असेल तर दोघांचा समावर्तन संस्कार एकवेळीं करावा. जर त्यांची इच्छा अध्यापकांच्या समक्ष विवाह करण्याची असेल तर तसें करावें किंवा आपल्या आईबापांच्या घरीं विवाह करणें असल्यास तसें करावें. अध्यापक, आईबाप व इतर भद्र पुरुष यांच्या समक्ष या विवाहेच्छु स्त्रीपुरुषांनीं एकमेकांस काय प्रश्न करावयाचे ते करावे, शास्त्रार्थ करावा किंवा कांहीं गुप्त गोष्ट विचारावयाची असेल तर लिहून विचारावी. जेव्हां अशा तऱ्हेनें परस्परांचें विवाह करण्याविषयीं प्रेम दृढ होईल, व विवाह करण्याचा निश्चय होईल तेव्हांपासून त्यांच्या खाण्यापिण्याचा उत्तम बंदोबस्त ठेवावा. पूर्वी ब्रह्मचर्याश्रमामध्यें असतांनां विद्याप्राप्तिरूपीं तप करून झालेल्या कष्टांच्या योगानें झालेलें क्षीण शरीर, चंद्राच्या कलेप्रमाणें थोडयाच दिवसांत वाढून पुष्ट होईल अशी खाण्यापिण्याची व्यवस्था असावी. नंतर ती कन्या रजस्वला होऊन शुद्ध झाल्यावर वेदी व मंडप रचून, त्या ठिकाणीं अनेक सुगंध्यादि द्रव्यांचा व घृतादिकांचा होम करून, त्या मंडपामध्यें अनेक विद्वान् स्त्री पुरुषांचा सत्कार करावा. नंतर जो दिवस ऋतुदान देण्यास योग्य असेल त्या दिवशीं *"संस्कारविधि" मध्यें लिहिल्याप्रमाणें सर्व कर्मे करून, मध्य रात्रीच्या समयीं किंवा रात्रीचे दहा वाजण्याच्या सुमारास, सर्वांसमक्ष पाणिग्रहणपूर्वक विवाहाचा विधि पुरा केल्यानंतर, अतिशय प्रसन्नतापूर्वक एकान्त सेवन करावें. वीर्यस्थापनाच्या विधिप्रमाणें पुरुषानें व वीर्याकर्षणाच्या विधिप्रमाणें स्त्रीनें आचरण करावें. ब्रह्मचर्यानें प्राप्तझालेल्या वीर्याचा व्यर्थ व्यय करूं नये. अशा पूर्ण ब्रह्मचर्यानें युक्त असणाऱ्या स्त्रीपुरुषांपासून जें संतान उत्पन्न होतें तें फारच उत्तम

* सोळा संस्कारांची व्यवस्था दाखविणारा ग्रंथ पुढें छापण्यांत येईल.

असतें. वीर्य गर्भाशयामध्यें स्खलन होण्याच्या वेळीं स्त्रीपुरुषांनीं अत्यंत प्रसन्न व सरळ राहावें. शरीरामध्यें तेढेपणा असूं नये. पुरुषानें आपलें शरीर ढिलें करावें व स्त्रीनें वीर्यप्राप्तीच्या समयीं अपान वायूला वर खेंचून, योनीचा वर संकोच करून, वीर्याचें वर आकर्षण करावें व त्याला गर्भाशयांत स्थिर करावें. नंतर दोघांनींहि शुद्ध पाण्याचें स्नान करावें. गर्भ धारण झाला कीं नाहीं हें चतुर स्त्री तेव्हांच जाणूं शकते, पण सामान्य स्त्रिया पुढच्या महिन्यांत रजोदर्शन न झाल्यावरून गर्भधारण झालें असें जाणतात. नंतर स्त्रीपुरुषांनीं, दूध गरम करून, त्यांत सुंठ, केशर, असगंध, इलायची, सालममिश्रि मिळवून, तें थंड झाल्यावर यथाभिरुचि पिऊन पृथक् शय्येवर शयन करावें. जेव्हां जेव्हां गर्भाधान केलें जाईल तेव्हां तेव्हां असें करणें योग्य आहे. एक महिन्यानंतर रजस्वला न झाल्यानें जेव्हां गर्भधारणा झाली अशी पक्की खातरी होईल तेव्हांपासून एक वर्षपर्यंत स्त्रीपुरुषांनीं समागम करूं नये. अशा रीतीनें ब्रह्मचारी राहिल्यानें दुसरें संतानहि उत्तम बलवान् उत्पन्न होईल, नाहींतर वीर्य फुकट घालवण्यानें दोघांचें आयुष्य कमी कमी होऊन संतानेंहि अशक्त होतात व सर्व रोगग्रस्त होतात. दोघांनीं भाषणें प्रेमयुक्त करावीं पण समागम वर्षपर्यंत करूं नये. पुरुषानें वीर्य रक्षण करावें व स्त्रीनें गर्भरक्षण करावें. भोजनाच्छादनांची अशी व्यवस्था करावी कीं ज्याच्या योगानें पुरुषाचे स्वप्नामध्येंहि वीर्यस्खलन होणार नाहीं व स्त्रीच्या गर्भामध्यें बालकाचें शरीर अत्युत्तम, लावण्ययुक्त, पुष्ट, बलवान्, पराक्रमयुक्त बनून दहाव्या महिन्यांत त्याचा जन्म होईल. चौथ्या महिन्यानंतर व विशेषतः आठव्या महिन्यानंतर गर्भाला फार जपलें पाहिजे. गर्भवती स्त्रीनें रेचक, रुक्ष, मादक व बलनाशक असले पदार्थ भक्षण करूं नयेत. दूध, तूप, उत्तम तांदूळ, गहूं, मूग, उडीद इत्यादि पदार्थ देशकालाचा विचार करून भक्षण करावे. गर्भाच्या चवथ्या महिन्यांत "पुंसवन" व आठव्या महिन्यांत "सीमन्तोन्नयन" हे संस्कार विधिप्रमाणें करावे. जेव्हां बालकाचा जन्म होईल तेव्हां त्याच्या व मातेच्या शरीराची जोपासना करणें फार अगत्याचें आहे स्त्री प्रसूत होण्यापूर्वीच तिच्या साठीं शुंठपाक किंवा सौभाग्य-शुंठिपाक तयार करून ठेवावा बाळंतिणीला किंचित् उष्ण व सुगंधयुक्त पाणी स्नानाला असावें व तशाच पाण्यानें बालकाला हि स्नान घालीत जावें. नंतर नालछेदन करावें. तें करण्यापूर्वी नाभीजवळ एक नरम सूत बांधून त्यापुढें चार अंगुलें सोडून बाकीचा भाग कापून टाकावा. नाभीपुढें ठेवलेल्या भागाला अशारीतीनें बांधावें कीं त्यायोगानें बालकाच्या शरीरांतील रक्ताचा एकहि बिंदु न वाहील. नंतर तें सूतिकागृह स्वच्छ करून त्या ठिकाणीं सुगंधियुक्त घृतादिकांचा होम करावा. नंतर बालकाच्या कानामध्यें "**वेदोसि**" "तुझें नांव वेद आहे" असें म्हणावें. नंतर तूप व मध एकत्र करून सुवर्णाच्या सळईनें बालकाच्या जिभेवर "**ओ३म्**" अशीं अक्षरें लिहावीं व त्या सळईनें मध व

तूप त्याच्या जिभेला लावावें व नंतर तें त्याच्या आईला द्यावें. मुलाला आईनें दूध पाजावें. जर आईला दूध नसेल तर कोणत्या तरी दुसऱ्या स्त्रीची चांगली परीक्षा करून तिचें दूध त्याला पाजावें. नंतर दुसऱ्या एका शुद्ध हवेच्या खोलीमध्यें सकाळीं व संध्याकाळीं सुगंधित तुपाचें हवन करावें व तेथें हवन होईपर्यंत मुलासह मातेला बसवावें. सहा दिवसपर्यंत तरी आईनें आपलें दूध मुलाला पाजवावें. स्त्रीनें आपणास हितकर व पुष्टिकारक असे पदार्थ भक्षण करावे, व योनिसंकोचनादि व्यवहार योग्य रीतीनें करावे. सहाव्या दिवशीं स्त्रीनें बाहेर हिंडावें व बालकासाठीं एक दाई ठेवावी. त्या दाईची खाण्यापिण्याची व्यवस्था नीट ठेवावी. तिनें बालकाचें पालनपोषण उत्तम करावें. बालकाच्या आईनें पूर्ण काळजी घ्यावी व त्याच्या पालनपोषणामध्यें अनुचित व्यवहार न होईल असें करावें. स्तनाच्या अग्रावर विशेष प्रकारच्या वनस्पतीचा लेप देऊन दुग्धाचा स्राव बंद करावा व आपली व बालकाची सर्व प्रकारें योग्य व्यवस्था राहील असें करावें. "संस्कारविधि" च्या रीतीप्रमाणें नामकरणसंस्कार करावा. नंतर जेव्हां स्त्री पुनः रजस्वला होऊन शुद्ध होईल तेव्हां पूर्वीप्रमाणें ऋतुदान करावें

ऋतुकालाभिगामी स्यात् स्वदारनिरतः सदा ॥
पर्ववर्जं व्रजेचैनां तद्व्रतो रतिकाम्यया ॥ मनु. ३।४५ ॥
निन्द्यास्वष्टासु चान्यासु स्त्रियो रात्रिषु वर्जयन् ॥
ब्रह्मचार्येव भवति यत्र तत्राश्रमे वसन् ॥ मनु. ३। ५० ॥

जो आपल्या स्त्रीशिवाय दुसऱ्या स्त्रीशीं संबंध ठेवित नाहीं, निषिद्ध रात्रींमध्यें स्त्रीपासून पृथक् राहतो व तिच्याशीं ऋतुकालींच गमन करतो तो गृहस्थ असला तरीहि ब्रह्मचारीच समजावा.

स्त्रियांची घरांमध्यें योग्यता.

सन्तुष्टो भार्यया भर्ता भर्त्राभार्या तथैव च ॥
यस्मिन्नेव कुले नित्यं कल्याणं तत्र वै ध्रुवम् ॥ ६० ॥
यदि हि स्त्री न रोचेत पुमांसं न प्रमोदयेत् ॥
अप्रमोदात्पुनः पुंसःप्रजनं न प्रवर्तते ॥ ६१ ॥
स्त्रियां तु रोचमानायां सर्वं तद्रोचते कुलम् ॥
तस्यां त्वरोचमानायां सर्वमेव न रोचते ॥ ६२ ॥

मनु. अ. ३

ज्या कुलामध्यें पत्नीच्या सहवासानें पति व पतीच्या सहवासानें पत्नी आनंदित होते त्या कुलामध्यें निरंतर सौभाग्य व ऐश्वर्य निवास करतें. जेथें कलह होत असतो तेथें दौर्भाग्य व दारिद्र्य वास करतें. जी स्त्री पतीशीं संतुष्ट नसते व पतीला संतुष्ट ठेवित नाहीं, तिच्या ठिकाणीं पति अप्रसन्न राहत असल्यामुळें त्याला काम उत्पन्न होत नाहीं. स्त्रिया प्रसन्न असतां सर्व कुल सुखमय होतें व स्त्रिया अप्रसन्न असतांनां सर्व कुल दुःखमय होतें.

पितृभिर्भ्रातृभिश्चैताः पतिभिर्देवरैस्तथा ॥
पूज्या भूषयितव्याश्च बहुकल्याणमीप्सुभिः ॥ ५५ ॥
यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ॥
यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ॥ ५६ ॥
शोचन्ति जामयो यत्र विनश्यत्याशु तत्कुलम् ॥
न शोचन्ति तु यत्रैता वर्द्धते तद्धि सर्वदा ॥ ५७ ॥
तस्मादेताः सदा पूज्या भूषणाच्छादनाशनैः ॥
भूतिकामैर्नरैर्नित्यं सत्कारेषूत्सवेषु च ॥५९॥ मनु. अ.३

ज्यांनां आपलें पुष्कळ कल्याण व्हावें असें वाटत असेल अशा, पिता, भ्राता, पति, व दीर यांनीं, स्त्रियांचा भूषणादिकांनीं सत्कार करावा. ज्या घरामध्यें स्त्रियांचा सत्कार होतो, त्या घरीं विद्यायुक्तपुरुष देव या संज्ञेला प्राप्त होऊन ते आनंदानें क्रीडा करतात. पण ज्या घरीं स्त्रियांचा सत्कार होत नाहीं तेथें केलेल्या सर्व क्रिया निष्फळ होतात. ज्या कुलांतील स्त्रिया शोकग्रस्त होतात त्या कुलाचा तत्काल नाश होतो. पण ज्या कुलांत स्त्रिया शोकग्रस्त होत नाहींत त्या कुलाची अभिवृद्धि होते. म्हणून ऐश्वर्याची इच्छा करणाऱ्या मनुष्यांनीं, भूषणें, वस्त्रें व भोजनादिक यांच्या योगानें, स्त्रियांचा सत्कार उत्सवसमयीं व प्रत्यहीं करावा.

पूजा करणें म्हणजे सत्कार करणें होय. जेव्हां दिवसां किंवा रात्रौ स्त्रीयांची किंवा स्त्रीपुरुषांची प्रथमतः गांठ पडेल किंवा ते पृथक् होतील तेव्हां एकमेकांस एकमेकांनीं "**नमस्ते**" (मीं आपला सत्कार करतों) असें म्हणावें. तसेंच—

सदा प्रहृष्टया भाव्यं गृहकार्येषु दक्षया ॥
सुसंस्कृतोपस्करया व्यये चामुक्त हस्तया ॥ मनु.५।१५०

घरामध्यें स्त्रीनें सदोदित प्रसन्न असावें, गृहकृत्यांमध्यें दक्ष असावें, सर्व कामें चातुर्यानें करावीं, सर्व पदार्थ उत्तम रीतीनें सुसंस्कृत करावेत, घर स्वच्छ ठेवावें, खर्च

करतेवेळीं फार उदार होऊं नये. अर्थात यथायोग्य खर्च करावा. सर्व पदार्थ व भक्ष्यभोज्यें अशीं शुद्ध व स्वादिष्ट बनवावीं कीं ज्यांच्या योगानें शरीरांत रोग उत्पन्न न होतां आत्मा व शरीर यांचें बल वाढेल. जो जो खर्च होईल त्याचा हिशोब सर्व गृहिणीनें ठेवावा व तो पतीला दाखवावा. घरांतील नोकर चाकर लोकांकडून यथायोग्य काम करून घ्यावें व घरांतील कोणत्याहि कामांत कमतरता न पडेल असें कर्तव्य करावें.

स्त्रियो रत्नान्यथो विद्या सत्यं शौचं सुभाषितम् ॥
विविधानि च रत्नानि समादेयानि सर्वतः ॥ मनु.२।२४०

उत्तम स्त्री, नानाप्रकारचीं रत्नें, विद्या, सत्य, पवित्रता, सुभाषित व सर्व प्रकारचीं शिल्पें सर्व देशांपासून व सर्व लोकांपासून ग्रहण करावीं.

सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयान् नब्रूयात्सत्यमप्रियम् ॥
प्रियं च नानृतं ब्रूयादेष धर्मः सनातनः ॥ १३८ ॥
भद्रं भद्रमिति ब्रूयाद् भद्रमित्येव वा वदेत् ॥
शुष्कवैरं विवादं च न कुर्यात्केनचित् सह ॥ १३९ ॥
मनु. अ. ४ ॥

प्रिय, सत्य व दुसऱ्याला हितकारक असेंच सदोदित बोलावें. अप्रिय असून जें सत्य असेल तें बोलूं नये. (काण्याला काणा म्हणून निंदूं नये.) खोटें व प्रिय असें भाषण कधींहि करूं नये. सदोदित भद्र अर्थात सर्वांला हितकारक असेल तेंच बोलावें. कोणाशींहि शुष्क वैर व शुष्क वादविवाद करूं नये. अपराधावांचून कोणाशींहि विरोध करूं नये. जें दुसऱ्याच्या हिताचें असेल पण त्याला ऐकण्यास वाईट वाटत असेल तें निर्भिडपणानें सांगावें:—

पुरुषा बहवो राजन् सततं प्रियवादिनः ॥
अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः ॥
भा. उद्योगपर्व विदुरनीति. ॥

"हे धृतराष्ट्रा! या संसारामध्यें दुसऱ्यास खूष करण्यासाठीं गोड बोलणारे लोक पुष्कळ आहेत. पण अप्रिय असून परिणामीं हितकारक असें भाषण करणारे व तें शांतपणानें ऐकणारे लोक फारच विरळा." सत्पुरुष जे असतात ते तोंडावर स्पष्टपणें

दुसऱ्याचे दोष सांगतात व आपले दोष शांतपणें ऐकत असतात. त्याचप्रमाणें दुसऱ्याच्या परोक्ष त्याचे गुण वाखाणीत असतात. पण दुष्ट लोकांची अशी रीति असते कीं, ते तोंडावर गोड बोलतात व मागून सारखी निंदा करीत असतात. जोंपर्यंत मनुष्याला आपले दोष दुसऱ्याकडून समजत नाहींत, तोंपर्यंत त्याच्यांत सुधारणा होणें शक्य नाहीं; म्हणून दोषाच्या आविष्करणाची आवश्यकता आहे, दोष दाखवतांना कधींहि कोणाची निंदा करूं नये. "**गुणेषु दोषारोपणमसूया।**" "**दोषेषु गुणारोपणमप्यसूया।**" "**गुणेषु गुणारोपणं दोषेषु दोषारोपणं च स्तुतिः।**" गुणांच्या ठिकाणीं दोषांचा आरोप करणें किंवा दोषांच्या ठिकाणीं गुणांचा आरोप करणें ही निंदा होय. असलेल्या गुणांचें कथन करणें व त्याचप्रमाणें असलेल्या दोषांचेंहि यथावत् कथन करणें ही स्तुति समजावी. अर्थात मिथ्याभाषणाला निंदा व सत्यभाषणाला स्तुति असें म्हणतात. तसेंच—

बुद्धिवृद्धिकराण्याशु धन्यानि च हितानिच ॥
नित्यं शास्त्राण्यवेक्षेत निगमांश्चैव वैदिकान् ॥ १९ ॥
यथा यथा हि पुरुषः शास्त्रं समधिगच्छति ॥
तथा तथा विजानाति विज्ञानं चास्य रोचते ॥ २० ॥
मनु. ४ ॥

बुद्धि, धन हित यांची वृद्धि करणारीं शास्त्रें व वेदादि पुस्तकें आहेत. म्हणून त्यांचें श्रवण व श्रावण प्रत्यहीं करावें. ब्रह्मचर्याश्रमामध्यें ज्यांचें पठण केलें असेल त्यांच्यावर पुनः पुनः विचार करून तीं लोकांला शिकवावीं. जसजसा मनुष्य शास्त्रामध्यें पारंगत होत जातो तसतसें त्याचें विज्ञान वाढत जातें व अध्ययनांत त्याची रुचि वाढत जाते.

पंच महायज्ञ.

ऋषियज्ञं देवयज्ञं भूतयज्ञं च सर्वदा ॥
नृयज्ञं पितृयज्ञं च यथाशक्ति न हापयेत् ॥ मनु. ४।२१॥
अध्यापनं ब्रह्मयज्ञः पितृयज्ञस्तु तर्पणम् ॥
होमो दैवो बलिर्भौतो नृयज्ञोऽतिथिपूजनम् ॥
मनु. ३।७०

स्वाध्यायेनार्चयेतर्षीन् होमैर्देवान् यथाविधि ॥
पितॄन् श्राद्धैश्चनृनन्नैर्भूतानि बलिकर्मणा ॥ मनु.३।८१

ऋषियज्ञ, देवयज्ञ, भूतयज्ञ, नृयज्ञ, व पितृयज्ञ हे पंचमहायज्ञ आहेत. अध्यापन हा ब्रह्मयज्ञ आहे. अध्ययन व अध्यापन यांच्या योगानें ऋषींची तृप्ति करावी. पितरांची तृप्तिकरणें हा पितृयज्ञ आहे. श्रद्धेनें पितरांची तृप्ति करणें हेंच श्राद्ध होय. होमानें देवयज्ञ होतो. अन्नदानानें नृयज्ञ होतो व बलिदानानें भूतयज्ञ होतो. यां पैकीं दोन यज्ञ पूर्वीच्या ब्रह्मचर्यप्रकरणामध्यें लिहिले आहेत. पहिल्यामध्यें वेदादि सत्यशास्त्रांचें अध्ययन व अध्यापन करणें, संध्योपासन व योगाभ्यास करणें यांचा समावेश होतो. दुसऱ्या देवयज्ञामध्यें विद्वानांचा सहवास, त्यांची सेवा करणें, पवित्रता धारण करणें, दिव्यगुण अंगीं आणणें, दान देणें, विद्येची वृद्धि करणें यांचा समावेश होतो. हे दोनहि यज्ञ दररोज सायंकालीं व प्रातःकालीं केले पाहिजेत. पहा—

ब्रह्मयज्ञ व देवयज्ञ.

सायंसायं गृहपतिर्नो अग्निः प्रातः प्रातः सौमनस्यदाता ॥ १ ॥ प्रातः प्रातर्गृहपतिर्नो अग्निः सायं सायं सौमनस्यं दाता ॥२॥

अथर्व. १९।७।३–४ ॥

तस्मादहोरात्रस्य संयोगे ब्राह्मणः सन्ध्यामुपासीत ॥
उद्यन्तमस्तं यान्तमादित्यमभिध्यायन् ॥ ३ ॥

षड्विंश ब्रा० ४।५ ॥

न तिष्ठति तु यः पूर्वां नोपास्ते यस्तु पश्चिमाम् ॥
सशूद्रवद्बहिष्कार्यः सर्वस्माद्द्विजकर्मणः ॥ मनु०अ.२।१०३

प्रत्येक संध्याकाळीं हवन केलेलें द्रव्य दुसऱ्या दिवशीं सकाळपर्यंत वायूला शुद्ध राखून हितकारक होतें त्याचप्रमाणें प्रत्येक सकाळीं अग्नींत हवन केलेलें द्रव्य सायंकाळपर्यंत वायूला शुद्ध राखून अरोग्यकारक होतें. म्हणून दिवस व रात्रि यांच्या संधीच्यावेळीं अर्थात सकाळीं व संध्याकाळीं परमेश्वराचें ध्यान व अग्निहोत्र अवश्यमेव करावें. अशाप्रकारें सकाळसंध्याकाळ जे संध्या व अग्निहोत्र करीत नाहींत त्यांना शूद्राप्रमाणें समजून, सर्व द्विजांच्या कर्मांतून बाहेर घालवावें.

(**प्रश्न**) त्रिकाल संध्या कां करूं नये? (**उत्तर**) संध्या दोनच आहेत तीन नाहींत. दिवस व रात्री यांची संधि सकाळीं व संध्याकाळीं होत असते. जो हें न मानतां दिवसाच्या मध्यसमयीं आणखी संध्या करतो त्यानें मध्य रात्रींहि कां करूं नये? व मध्यरात्रींहि जर करावयाची असेल तर प्रत्येक प्रहराला, प्रत्येक घटकेला व प्रत्येक पळाला कां संध्या करूं नये? अशा रीतीनें मध्यान्हसंध्या करावयाला कोणत्याहि शास्त्राचें प्रमाण नाहीं. म्हणून सर्व शास्त्रसंमत अशा दोनच वेळीं संध्या व अग्निहोत्र करणें हें चांगलें. तीनदां करूं नये. तीन कालांची जी शास्त्रकारांनीं गणना केली आहे ती भूत, भविष्य व वर्तमान अशी आहे. संध्योपासनेचे तीन काल कोणीहि मानलेले नाहींत.

पितृयज्ञ.

या पितृयज्ञामध्यें पितरांची सेवा करण्याचा अंतर्भाव होतो. "**पितर**" ही संज्ञा "देव, विद्वान्, ऋषि, शिक्षक, मातापिता, ज्ञानी, योगी व वृद्ध पुरुष" यांना लागू आहे. यांची सेवा करणें हाच पितृयज्ञ होय. पितृयज्ञामध्यें दोन भेद आहेत एक श्राद्ध व दुसरें तर्पण. "**श्रत्सत्यं दधाति यया क्रियया सा श्रद्धा श्रद्धया यत् क्रियते तत् श्राद्धम्।**" ज्या क्रियेच्या योगानें सत्याचें ग्रहण होतें तिला श्रद्धा असें म्हणतात. श्रद्धेनें जें केलें जातें तें श्राद्ध समजावें. तसेंच "**तृप्यन्ति तर्पयन्ति येन पितॄन् तत्तर्पणम्।**" ज्या कर्माच्या योगानें विद्यमान मातापितर प्रसन्न होतात किंवा प्रसन्न केले जातात त्याला तर्पण असें म्हणतात. हा दोनहि प्रकारचा पितृयज्ञ जीवंत पितरांसंबंधानेंच करावयाचा असतो मेलेल्यांसंबंधानें नाहीं.—

देवतर्पण.

ओम्ब्रह्मादयो देवास्तृप्यन्ताम्॥ ब्रह्मादिदेवपत्न्यस्तृप्यन्ताम्॥ ब्रह्मादिदेवसुतास्तृप्यन्ताम्॥ ब्रह्मादिदेवगणास्तृप्यन्ताम्॥

इति देवतर्पणम्।

"**विद्वा ꣳसो हि देवाः।**" विद्वानांला देव असें म्हणतात असें शतपथ ब्राह्मणांत सांगितलेलें आहे. जो चारहि वेदांचें सांगोपांग अध्ययन करतो त्याला "**ब्रह्मा**" असें म्हणतात. या ब्रह्मपदवीधरांपेक्षां जे कमी विद्वान् असतात त्यांना "**देव**" असें म्हणतात. त्याचप्रमाणें त्यांच्या विदुषी स्त्रियांना "ब्राह्मणी" "देवी" असें म्हणतात. यांच्याप्रमाणें जे यांचे पुत्र किंवा शिष्य असतील व जे यांचे गण असतील त्या सर्वांची सेवा करणें हेंच खरें श्राद्ध व तर्पण आहे.

ऋषितर्पण.

ओम् मरीच्यादय ऋषयस्तृप्यन्ताम् ॥ मरीच्याद्यृषिपत्न्य स्तृप्यन्ताम् ॥ मरीच्याद्यृषिसुतास्तृप्यन्ताम् ॥ मरीच्याद्यृषिगणास्तृप्यन्ताम् ॥ इति ऋषितर्पणम् ॥

ब्रह्म्याचे प्रपौत्र मरीचि होत. जे यांच्याप्रमाणें विद्वान् होतात व दुसऱ्यांला शिकवितात, त्यांची सेवा करावी. त्यांच्या प्रमाणें विद्वान् ज्या स्त्रिया असतात, ज्या कन्यांला शिकवितात त्यांची सेवा करावी. तसेंच त्यांचे विद्वान् पुत्र व सेवक यांचीहि सेवा व त्या सर्वांचा सत्कार करावा. हेंच खरें ऋषितर्पण आहे.

पितृतर्पण.

ओम् सोमसदः पितरस्तृप्यन्ताम् ॥ अग्निष्वात्ताः पितरस्तृप्यन्ताम् ॥ बर्हिषदः पितरस्तृप्यन्ताम् ॥ सोमपाः पितरस्तृप्यन्ताम् ॥ हविर्भुजः पितरस्तृप्यन्ताम् ॥ आज्यपाः पितरस्तृप्यन्ताम् ॥ सुकालिनः पितरस्तृप्यन्ताम् ॥ यमादिभ्योनमः यमादींस्तर्पयामि ॥ पित्रे स्वधा नमः–पितरं तर्पयामि ॥ पितामहाय स्वधा नमः–पितामहं तर्पयामि ॥ प्रपितामहाय स्वधा नमः–प्रपितामहं तर्पयामि ॥ मात्रे स्वधा नमः–मातरं तर्पयामि ॥ पितामह्यै स्वधा नमः पितामहीं तर्पयामि ॥ प्रपितामह्यै स्वधा नमः प्रपितामहीं तर्पयामि ॥ स्वपत्न्यै स्वधा नमः स्वपत्नीं तर्पयामि ॥ सम्बन्धिभ्यः स्वधा नमः सम्बन्धिनस्तर्पयामि ॥ सगोत्रेभ्यः स्वधा नमः सगोत्रांस्तर्पयामिः ॥ इति पितृतर्पणम् ॥

"**ये सोमे जगदीश्वरे पदार्थविद्यायांच सीदन्ति ते सोमसदः।**" जे परमात्म्यामध्यें लीन व पदार्थविद्येमध्यें निपुण असतात त्यांना सोमसद असें म्हणतात. "**यैरग्नेर्विद्युतो विद्या गृहीता ते अग्निष्वात्ताः।**" जे अग्नि व विद्युत् यां संबंधींच्या सर्व विद्यांमध्यें प्रवीण असतात ते अग्निष्वात्त समजावे. "**ये बर्हिषि उत्तमे व्यवहारे सीदन्ति ते बर्हिषदः।**" जे विद्यावृद्धिसारख्या उत्तम व्यव-

हारामध्यें स्थित होतात ते बर्हिषद होत. "**ये सोममैश्वर्यमोषधिरसं वा पान्ति पिबन्ति वा त सोमपाः।**" जे ऐश्वर्याचे रक्षक व सोमवल्ल्यादिक महौषधिरसांचें पान करून रोगरहित झालेले, तसेंच दुसऱ्यांच्या ऐश्वर्याचें रक्षण करणारे व दुसऱ्यांस औषधी देऊन दुसऱ्यांचे रोग नाहींसे करणारे ते सोमप होत. "**ये हविर्होतुमन्नुमर्हं भुञ्जते भोजयन्ति वा ते हविर्भुजः।**" मादक व हिंसायुक्त द्रव्यांला सोडून उत्तम पदार्थांचें भोजन करणारे व उत्तम पदार्थ दुसऱ्यांस खावयास देणारे ते हविर्भुज समजावे. "**य आज्यं ज्ञातुं प्राप्तुं वा योग्यं रक्षन्ति पिबन्ति ते आज्यपाः।**" जाणण्यास व प्राप्त करून घेण्यास योग्य अशा वस्तूंचें रक्षण जे करतात व जे घृतादि पदार्थ खातात त्यांना आज्यप असें म्हणतात. "**शोभनः कालो विद्यते येषान्ते सुकालिनः।**" धर्मकृत्यें करण्यास ज्यांना सदोदित उत्तम समय असतो त्यांस सुकालीन असें म्हणतात. "**ये दुष्टान् यच्छन्ति निगृह्णन्ति ते यमा न्यायाधीशाः।**" जे दुष्टांना शासन करतात व सज्जनांचें रक्षण करतात त्या न्यायाधिशांला यम असें म्हणतात. "**यः पाति स पिता।**" जो मुलांचें अन्नवस्त्रादिकांच्या योगानें सत्कारपूर्वक रक्षण व पालन करतो किंवा जो त्यांचा उत्पन्नकर्ता असतो त्याला पिता असें म्हणतात. "**पितुः पिता पितामहः। पितामहस्य पिता प्रपितामहः।**" पित्याच्या पित्याला पितामह व पितामहाच्या पित्याला प्रपितामह असें म्हणतात. "**या मानयति सा माता**" जी अन्नानें व सत्कारानें संतानाचें हित करते तिला माता असें म्हणतात. "**या पितुर्माता सा पितामही पितामहस्य माता प्रपितामही।**" बापाच्या मातेला पितामही व आजाच्या मातेला प्रपितामही असें म्हणतात. आपली स्त्री, बहीण, संबंधी जन, स्वगोत्रज व अन्य कोणी भद्रपुरुष किंवा वृद्ध पुरुष या सर्वांला अन्न, वस्त्र, सुंदर यान इत्यादि देऊन त्यांची तृप्ति उत्तम प्रकारें करावी. जें सदाचरण केलें असतां त्यांचा आत्मा तृप्त होईल व त्यांचें शरीर स्वस्थ होईल तें कृत्य प्रीतिपूर्वक त्यांच्या प्रीत्यर्थ करणें यालाच श्राद्ध व तर्पण असें म्हणतात.

वैश्वदेव.

जेव्हां भोजनासाठीं तयार करावयाचें अन्न सिद्ध होईल तेव्हां त्यांतून आंबट, खारट, असले पदार्थ बाजूला करून घृतयुक्त व मिष्ट अन्न घेऊन त्याचें हवन पुढील मंत्रांनीं करावें. हवन करण्यासाठीं चुलींतून अग्नि निराळा काढून घ्यावा. पहा—

वैश्वदेवस्य सिद्धस्य गृह्येऽग्नौ विधिपूर्वकम्॥ आभ्यः कुर्यादेवताभ्यो ब्राह्मणो होममन्वहम्॥ मनु० ३।८४॥

जें कांहीं पाकशाळेमध्यें भोजनासाठीं तयार केलेलें अन्न असेल, त्याचा दिव्य गुणांसाठीं, त्या पाकाग्नीमध्यें खालीं लिहिलेल्या मंत्रांनीं विधिपूर्वक नित्य होम करावाः—

*ओं अग्नये स्वाहा । सोमाय स्वाहा । अग्नीषोमाभ्यां स्वाहा । विश्वेभ्यो देवेभ्यः स्वाहा । धन्वन्तरये स्वाहा । कुहूवै स्वाहा । अनुमत्यै स्वाहा । प्रजापतये स्वाहा । सहद्यावापृथिवीभ्यां स्वाहा । स्विष्टकृते स्वाहा ॥

या प्रत्येक मंत्रानें एक एक आहुति प्रज्वलित अग्नीमध्यें सोडावी. नंतर स्थालीमध्यें किंवा भूमीवर पान ठेवून त्याच्यावर पूर्वदिशादि क्रमानुसार यथाक्रम या मंत्रानें भाग ठेवावे.

†ओं सानुगायेन्द्राय नमः । सानुगाय यमाय नमः । सानुगाय वरुणाय नमः । सानुगाय सोमाय नमः । मरुद्भ्यो नमः । अद्भ्यो नमः । वनस्पतिभ्यो नमः । श्रियै नमः । भद्रकाल्यै नमः । ब्रह्मपतये नमः । वास्तुपतये नमः । विश्वेभ्यो देवेभ्यो नमः । दिवाचरेभ्यो नमः । पितृभ्यो नमः । नक्तञ्चारिभ्यो नमः । सर्वात्मभूतये नमः ।

पानावर किंवा थाळ्यामध्यें ठेवलेल्या भागांला एकत्र करून जो अतिथि आला असेल त्याला ते भाग खावयास घालावे किंवा अग्नीमध्यें त्यांचें हवन करावें. यानंतर लवणान्न अर्थात् डाळ, भात, शाकभाजी, पोळी वगैरेचे सहा भाग जमिनीवर ठेवावे. पहा—

शुनां च पतितानां च श्वपचां पापरोगिणाम् ॥
वायसानां कृमीणां च शनकैर्निर्वपेद्भुवि ॥ मनु० ३।९२ ॥

---

* अग्नेः सोमस्य चैवादौ तयोश्चैव समस्तयोः ॥ विश्वेभ्यश्चैव देवेभ्यो धन्वन्तरय एव च ॥ ८५ ॥ कुहूवै चैवानुमत्यै च प्रजापतय एव च ॥ सहद्यावापृथिव्योश्च तथा स्विष्टकृतेन्ततः ॥ ८६ ॥ मनु० अ० ३

† एवं सम्यग्घविर्हुत्वा सर्वदिक्षु प्रदक्षिणम् ॥ इन्द्रान्तकाप्पतीन्दुभ्यः सानुगेभ्यो बलिंहरेत् ॥ ८७ ॥ मरुद्भय इति तुद्वारि क्षिपेदप्स्वद्भ्य इत्यपि ॥ वनस्पतिभ्य इत्येवं मुशलोलूखले हरेत् ॥ ८८ ॥ उच्छीर्षके श्रियै कुर्याद्भद्रकाल्यैच पादतः ॥ ब्रह्मवास्तोष्पतिभ्यांतु वास्तुमध्ये बलिं हरेत् ॥ ८९ ॥ विश्वेभ्यश्चैवदेवेभ्यो बलिमाकाश उत्क्षिपेत् ॥ दिवाचरेभ्यो भूतेभ्यो नक्तंचारिभ्य एव च ॥ ९० मनु० अ० ३ ॥

या प्रकारें " **श्वभ्यो नमः । पतितेभ्यो नमः ॥ श्वपग्भ्यो नमः । पापरोगिभ्यो नमः । वायसेभ्यो नमः । कृमिभ्यो नमः ॥** हे सहा भाग जमिनीवर ठेवावे व नंतर ते भाग जो कोणी दुःखी, बुभुक्षित, कुत्रा, कावळा वगैरे असेल त्याला द्यावे. या मंत्रांतील " **नमः** " या शब्दाचा अर्थ " **अन्न** " असा आहे. कुत्रे, पापी, चांडाल पापरोगी, कावळे, कृमी, मुंग्या वगैरेंला अन्न द्यावें असें स्मृतींमध्यें सांगितलें आहे. पाकशाळेमध्यें पूर्वोक्त पद्धतीनें हवन करण्यापासून पाकशाळेंतील वायु शुद्ध होतो व पाक करण्यापासून जी अज्ञान व अदृष्ट जीवांची हत्या होत असते तिच्याबद्दल त्यांच्यावर प्रत्युपकार होतो.

अतिथियज्ञ.

ज्याच्या येण्याची तिथि निश्चित झालेली नसते त्याला अतिथि असें म्हणतात. धार्मिक, सत्योपदेशक, सर्वांवर उपकार करण्यासाठीं देशदेशांतरीं फिरणारा, पूर्ण विद्वान्, परम योगी, संन्यासी असा जो पुरुष एकाएकीं गृहस्थाच्या घरीं येतो त्याला अतिथि असें म्हणतात. तो आल्याबरोबर त्याला पाद्य, अर्घ्य व आचमनीय (पाय धुण्यास, अंगस्पर्शास व पिण्यास पाणी) देऊन त्याला सत्कारपूर्वक आसनावर बसवावें व त्याचा अन्नदानानें सत्कार करावा. नंतर त्याला कुशल प्रश्न वगैरे विचारून तदनंतर त्याच्या उपदेशापासून ज्ञान व विज्ञान प्राप्त करून घ्यावें. याच्या योगानें धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांची प्राप्ति होते. तो ज्याप्रमाणें उपदेश करील त्याप्रमाणें आपल्या आचरणामध्यें बदल करावा. समयानुसार गृहस्थ व राजा हे देखील अतिथीप्रमाणें सत्कार करण्यास योग्य आहेत. परंतुः—

पाषण्डिनो विकर्मस्थान् बैडालव्रतिकाञ्छठान् ॥
हैतुकान् बकवृत्तींश्च वाङ्मात्रेणापि नार्चयेत् ॥

मनु० ॥४।३०॥

(पाषण्डी) वेदांची निंदा करणारे व वेदविरुद्ध आचरण करणारे, (विकर्मस्थ) वाईट कर्में व वेदविरुद्ध कर्में करणारे, मिथ्याभाषणादि दुर्गुणयुक्त, (बैडाल०) ज्याप्रमाणें उंदीर पकडण्यासाठीं मांजर लपून बसतें त्याप्रमाणें लपून छपून, हीन कृत्य करणारे, (शठ) हट्टी, दुराग्रही, अभिमानी, स्वतः ज्यांस समजत नाहीं व जे दुसऱ्यांचें ऐकत नाहींत, (हैतुक) कुतर्की, व्यर्थ बडबड करणारे, जसें आधुनिक वेदान्ति मी ब्रह्म आहे, जग मिथ्या आहे, शास्त्रें व ईश्वर हीं कल्पित आहेत. अशा प्रकारें गप्पा मारणारे, (बकवृत्ति) ज्याप्रमाणें बगळा एका पायावर उभा राहून डोळे झांकून ध्यानस्थ राहतो व मासा पुढें आल्याबरोबर गट्ट करतो, त्याचप्रमाणें जे स्वार्थासाठीं टपून बसलेले असतात, संन्यासी व बैरागी यांचा वेष घेऊन लोकांनां

नागवितात अशा प्रकारच्या सर्व दुष्ट लोकांचा केवळ वाणीनेंहि सत्कार करूं नये. कारण जर अशा दुष्टांचा सत्कार होऊं लागला तर अशा लोकांची संख्या वाढून ते सर्व दुनियेला अधर्मयुक्त व दुःखमय करून सोडतील. ते स्वतः तर अवनतीचें काम करीतच असतात पण जे त्यांच्या पाठीमागून जातात त्यांनाहि अवनतीमध्यें ते बुडवितात.

पंचमहायज्ञाचें फल.

ब्रह्मयज्ञाच्या योगानें विद्या, सुशिक्षण, धर्म, सभ्यता इत्यादि गुणांची वृद्धि होते. **अग्निहोत्रां**तील हवनानें वायु, वृष्टि व जल यांची शुद्धि होते व वृष्टीच्या द्वारें सर्व संसारभर सुख पसरतें. वायु शुद्ध झाल्यानें त्यामध्यें श्वासोच्छ्वास करणाऱ्या व स्तनपानादि सर्व व्यवहार करणाऱ्या सर्वांचें आरोग्य, बुद्धि, बल हीं व पराक्रम वाढतात; व त्यायोगें धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांचें अनुष्ठान पुरें होतें. याला देवयज्ञ असेंहि म्हणतात. यामध्यें वायूची शुद्धता हा मुख्य गुण आहे **पितृयज्ञा**मध्यें माता, पिता व ज्ञानी महात्मे यांची सेवा करावयाची असते. या सेवेच्या योगानें सेवकाचें ज्ञान वाढतें, सत्यासत्याचा विचार होतो. यामुळें तो असत्याचा त्याग करून सत्याचें ग्रहण करतो व सुखी होतो. त्याचप्रमाणें मातापिता व आचार्य यांनीं जे कष्ट मुलांसंबंधानें घेतलेले असतात, त्यांचें स्मरण ठेवून त्यांच्यावर प्रत्युपकार करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य होय. तेंहि केल्यासारखें होतें **बलिवैश्वदेवा**चें फल पूर्वी सांगितलेंच आहे. यांत कृमीकीटकांनाहि अन्न मिळतें व ते सुखी होतात. **अतिथियज्ञा**मध्यें धार्मिक उपदेशकाचा सत्कार केला जातो. जर उत्तम अतिथि नसतील तर मनुष्यांची उन्नतीहि होणार नाहीं. धार्मिक पुरुष जेव्हां सर्व देशभर फिरून सत्याचा उपदेश करितात तेव्हां सर्व पाखंडमतांचा नाश होतो, व सर्व गृहस्थांना सहज सत्य विज्ञान प्राप्त होतें. सर्व मनुष्यांमध्यें एक धर्म जागृत व स्थिर राहतो. अर्थात् अशा धार्मिक विद्वान् अतिथींशिवाय संदेहवृत्तीचा विनाश होत नाहीं. संशय दूर झाल्याशिवाय धर्मावर दृढ निश्चय होत नाहीं व निश्चयावांचून सुखहि प्राप्त होत नाहीं. अर्थात् अतिथियज्ञापासून परंपरेनें सर्व सुखी होतात.

सामान्य नियम.

ब्राह्मे मुहूर्ते बुध्येत धर्मार्थौ चानुचिन्तयेत् ॥
कायक्लेशांश्च तन्मूलान् वेदतत्वार्थमेव च ॥ मनु० ४।९२॥

रात्रीच्या चवथ्या प्रहरीं अर्थात चार घटका रात्र असतां उठावें, अवश्य कर्तव्यें केल्यानंतर धर्म व अर्थ यांसंबंधीं विचार करावा, शारीरिक रोगांचें निदान करावें, परमात्म्याचें ध्यान करावें. केव्हांहि अधर्माचें आचरण करूं नये.

नाधर्मश्चरितो लोके सद्यः फलति गौरिव ॥
शनैरावर्तमानस्तु कर्तुर्मूलानि कृन्तति ॥ मनु० ४।१७२ ॥

केलेला अधर्म दुःख दिल्याशिवाय राहत नाहीं. अधर्माचरण केल्याबरोबरच त्याचें फल मिळतें असें नाहीं. म्हणून अज्ञानी लोक अधर्म करण्यास भीत नाहींत. पण हें निश्चयानें जाणावें कीं, अधर्माचरण हें हळूहळू सुखांच्या मूलांचा नाश करीत असतें. याप्रमाणेः—

अधर्मेणैधते तावत्ततो भद्राणि पश्यति ॥
ततः सपत्नाञ्जयति समूलस्तु विनश्यति ॥ मनु० ४।१७४ ॥

अधर्म करणारा मनुष्य प्रथमतः धर्ममर्यादा सोडून, मिथ्याभाषण, कपट, पाखंड वगैरे करून, सर्वरक्षक अशा वेदांचें खंडन करून, विश्वासघात वगैरे नीच कर्में करून प्रथम वाढतो. नंतर त्याला धन, धान्य, ऐश्वर्य, खान, पान, वस्त्र, आभूषण, यान, स्थान, मान, प्रतिष्ठा वगैरे क्रमानें प्राप्त होतात. अन्याय करून सर्वांला पादाक्रांत करतो व शेवटीं अकल्पित संकटांनीं ग्रस्त होऊन स्वतः समूळ नाश पावतो. ज्याप्रमाणें मुळापासून कापलेला वृक्ष नाश पावतो तद्वत् तो अधार्मिक पुरुष नाश पावतो.

सत्यधर्मार्यवृत्तेषु शौचे चैवारमेत्सदा ॥
शिष्यांश्च शिष्याद्धर्मेण वाग्बाहूदरसंयतः ॥मनु४।१७९॥

सत्याचें ग्रहण व असत्याचा त्याग करावा, पक्षपातरहित होऊन वेदोक्त सत्यधर्माचें अवलंबन करावें, आर्यपुरुष कसें वर्तन ठेवतात तें जाणावें, स्वच्छता ठेवावी व हात, वाहू व पोट यांचा संयम करून—अर्थात् अन्याय न करतां–सर्व शिष्यांला उत्तम रीतीनें विद्या शिकवावी.

ऋत्विक् पुरोहिताचार्यैर्मातुलातिथिसंश्रितैः ॥
बालवृद्धातुरैर्वैद्यैर्ज्ञातिसम्बन्धि बान्धवैः ॥ १७९ ॥
मातापितृभ्यां यामीभिर्भ्रात्रा पुत्रेण भार्यया ॥
दुहित्रा दासवर्गेण विवादं न समाचरेत् ॥ १८० ॥
॥ मनु. अ. ४ ॥

(ऋत्विक्) यज्ञ करणारा, (पुरोहित) सदोदित उत्तम चालचलनाचें शिक्षण देणारा, (आचार्य) विद्या शिकविणारा, (मातुल) मामा, (अतिथि) ज्याची आगमनाची तिथि ठरलेली नसते, (संश्रित) आपले आश्रित, (बाल) बालक,

(वृद्ध) म्हातारे, (आतुर) रोगपीडित, (वैद्य) आयुर्वेदाला जाणणारा, (ज्ञाति) स्ववर्णस्थ व स्वगोत्रस्थ जन, (संबन्धि) श्वशुरादिक, (बान्धव) मित्र, (माता) आई, (पिता) बाप, (यामि) बहीण, (भ्राता) भाऊ (भार्या) स्त्री (दुहिता) मुलगी व (दास) सेवक यांच्याशीं वादविवाद करूं नये. अर्थात् यांच्याबरोबर तंटा, बखेडा, भांडण करूं नये.

दान कोणास देऊं नये ?

अतपास्त्वनधीयानः प्रतिग्रहरुचिर्द्विजः ॥
अम्भस्यश्मप्लवेनेव सह तेनैव मज्जति ॥ मनु० ४।१९० ॥

(अतपाः) ब्रह्मचर्य सत्यभाषणादि तप न करणारा (अनधीयानः) अध्ययन न करणारा, (प्रतिग्रहरुचिः) दुसऱ्यांकडून दान घेण्यांत अत्यंत तत्पर अर्थात नेहेमी दान घेणारा, असे जे तीन प्रकारचे लोक असतात ते, समुद्रांत दगडाच्या नौकेंतून तरून जाण्याची इच्छा करणाऱ्या मनुष्याप्रमाणें, स्वतःच्या दुष्कर्मासह दुःखसागरामध्यें बुडतात. हे तर स्वतः बुडतातच पण ते आपल्या बरोबर दान देणाऱ्यांलाहि बुडवितात ! पहा—

त्रिष्वप्येतेषु दत्तं हि विधिनाप्यर्जितं धनम् ॥
दातुर्भवत्यनर्थाय परत्रादातुरेव च ॥ मनु० ४ । १९३ ॥

धर्मानें प्राप्त केलेल्या द्रव्याचें दान जो पूर्वोक्त तीन प्रकारच्या पुरुषांना करतो, त्याचें तें दान, दात्याचा या जन्मीं नाश करतेंच पण दान घेणाऱ्याचा परजन्मींहि आणखीं नाश करितें. तसेंच—

यथा प्लवेनौपलेन निमज्जत्युदके तरन् ॥
तथा निमज्जतोऽधस्तादज्ञौ दातृप्रतीच्छकौ ॥४ मनु०४।१९४॥

ज्याप्रमाणें दगडाच्या नौकेंत बसणारा बुडतो त्याचप्राणें आज्ञानी दाता व अज्ञानी दान घेणारा हे दोघेहि अधोगतीला जातात.

पाखंडी कोण ?

धर्मध्वजी सदा लुब्धश्छाद्मिको लोकदम्भकः ॥
वैडालव्रतिको ज्ञेयो हिंस्रः सर्वाभिसन्धकः ॥ १९५ ॥
अधोदृष्टिर्नैष्कृतिकः स्वार्थसाधनतत्परः ॥
शठो मिथ्याविनीतश्च बकव्रतचरो द्विजः ॥ १९६ ॥
मनु० ॥ ४ ॥

(धर्मध्वजी) धर्म न आचरतां धर्माच्या नांवावर लोकांला ठकविणारा, (सदा लुब्धः) सर्वदा लोभी (छाद्मिकः) कपटी (लोकदम्भकः) संसारी सामान्य मनुष्यापुढें आपली बढाई मारणारा, ढोंगी, (हिंस्रः) प्राण्यांचा घात करणारा व इतरांशीं वैर धरणारा, (सर्वाभिसन्धकः) चांगल्या व वाईट अशा सर्व लोकांत मिसळणारा यालाच (बैडालव्रतिकः) मांजराप्रमाणें कपटी, धूर्त असें म्हणतात. हे सर्व पाखंडी होत; तसेंच (अधोदृष्टिः) कीर्तीसाठीं नजर खालीं लावणारा, (नैष्कृतिकः) कोणी त्याचा थोडासा अपराध केला तर त्याचा उलट प्राणहि घेण्याची इच्छा करणारा, (स्वार्थसाधन०) कपट, विश्वासघात किंवा अधर्म इत्यादि हवीं तीं दुष्कृत्यें करून आपला स्वार्थ साधणारा, (शठः) आपली गोष्ट खोटी असतांहि हट्ट न सोडणारा, (मिथ्या विनीतः) वरून आपण सुशील, संतुष्ट व साधु आहें असें दाखविणारा, याला (बकव्रतचरः) बगळ्याप्रमाणें फसवणारा असें म्हणतात. हीं पाखंडी लोकांचीं लक्षणें आहेत. या अशा पाखंडी लोकांवर विश्वास करूं नये व त्यांची सेवाहि करूं नये.

धर्माची आवश्यकता.

धर्मं शनैः संचिनुयाद्वल्मीकमिव पुत्तिकः ॥
परलोक सहाय्यार्थं सर्वभूतान्यपीडयन् ॥ २३८ ॥
नामुत्र हि सहाय्यार्थं पिता माता च तिष्ठतः ॥
न पुत्रदारं न ज्ञातिर्धर्मस्तमनुगच्छति ॥ २३९ ॥
एकः प्रजायते जन्तुरेक एव प्रलीयते ॥
एकोनु भुङ्क्ते सुकृतमेक एव च दुष्कृतम् ॥२४०॥मनु.४॥
एकः पापानि कुरुते फलं भुङ्क्ते महाजनः ॥
भोक्तारो विप्रमुच्यन्ते कर्ता दोषेण लिप्यते ॥
म. भार. उद्योगप. अ. ३२
मृतं शरीरमुत्सृज्य काष्ठलोष्ठसमं क्षितौ ॥
विमुखा बान्धवा यान्ति धर्मस्तमनुगच्छति ॥मनु.४।२४१

ज्याप्रमाणें हळू हळू प्रयत्न करून, मुंग्या वारूळ बनवितात, त्याचप्रमाणें स्त्रीपुरुषांनीं, प्रयत्न करून, कोणालाहि पीडा न देतां, परलोक अर्थात् परजन्मामध्यें सहाय्य व्हावें म्हणून, धर्माचा संचय करावा. कारण कीं, परलोकामध्यें माता, पिता, पुत्र, स्त्री व स्वज्ञातीचे लोक सहाय्य करूं शकत नाहींत. त्याला फक्त त्यावेळीं धर्मच

सहाय्य करूं शकतो. पहा एकटाच उत्पन्न होतो व एकटाच मरण पावतो; व एकटाच धर्माचें किंवा अधर्माचें अनुक्रमें सुख किंवा दुःख हें फल भोगतो. हेंहि ध्यानांत ठेवावें कीं, कुटुंबांतील एक मनुष्य पाप करून धन मिळवितो व त्याचा सर्व इतर लोक उपभोग घेतात. ते उपभोग घेणारे दोषाचे भागीदार होत नाहींत. पण जो अधर्म करणारा असतो त्यालाच दोषाचें फल भोगावें लागतें. जेव्हां कोणी मनुष्य मरतो तेव्हां त्याचें मातीच्या ढेंकळाप्रमाणें असणारें शरीर जमिनीवर फेंकून त्याचे बंधुवर्ग विमुख होऊन मागें फिरतात. तेव्हां त्याच्याबरोबर धर्मच एकटा जातो.

तस्माद्धर्मं सहाय्यार्थं नित्यं संचिनुयाच्छनैः ॥
धर्मेण हि सहाय्येन तमस्तरति दुस्तरम् ॥ २४२ ॥
धर्मप्रधानं पुरुषं तपसा हत किल्बिषम् ॥
परलोकं नयत्याशु भास्वन्तं स्वशरीरिणम् ॥ २४३ ॥
मनु० ४ ॥

यासाठीं परलोकीं अर्थात् परजन्मीं सहाय्य व सुख व्हावें म्हणून नित्य धर्माचा संचय करीत असावें. जीव धर्माच्याच सहाय्यानें दुस्तर दुःखसागरांतून सहज तरून जातो. जो पुरुष धर्मालाच प्रधान समजतो, ज्याचें धर्माच्या अनुष्ठानानें पाप दूर झालें आहे, त्याला त्यानें केलेला धर्म, (भास्वन्तम्) जो स्वयंप्रकाश आहे व (स्वशरीरिणम्) ज्याला आकाश हें शरीराप्रमाणें आहे अशा (पर-लोकम्) परमदर्शनीय परमात्म्याला शीघ्र प्राप्त करून देतो. म्हणून—

दृढकारी मृदुर्दान्तः क्रूराचारैरसंवसन् ॥
अहिंस्रो दमदानाभ्यां जयेत्स्वर्गं तथा व्रतः ॥ २४६ ॥
वाच्यर्था नियताः सर्वे वाङ्मूला वाग्विनिसृताः ॥
तान्तु यःस्तेनयेद्वाचं स सर्वस्तेयकृन्नरः ॥ २५६ ॥
आचाराल्लभते ह्यायुराचारादीप्सिताः प्रजाः ॥
आचाराद्धनमक्षय्यमाचारो हन्त्यलक्षणम् ॥ १५६ ॥
मनु० ४ ॥

जो पुरुष दृढ प्रयत्न करणारा, कोमल स्वभावयुक्त, जितेंद्रिय, हिंसक व दुराचरणी पुरुषांपासून दूर राहणारा, धर्मात्मा, मनाला स्वाधीन ठेवणारा व विद्यादान करणारा असतो त्याला सुख प्राप्त होतें. सर्व अर्थ व व्यवहार वाणीनें निश्चित होतात,

सर्वांचें मूल वाचाच आहे व तीपासूनच सर्व व्यवहार सिद्ध होतात. अशा सर्वार्थ-साधक वाणीची जो चोरी करतो, अर्थात खोटें बोलतो, तो सर्व पदार्थांची चोरी करतो असें समजावें. धर्मीप्रमाणें अर्थात् ब्रह्मचर्य, जितेंद्रियता इत्यादि नियमां-प्रमाणें वागलें असतां आयुष्य वाढतें, उत्तम संतति होते, अक्षय्य धन प्राप्त होतें व धर्माचरणानें सर्व दुष्ट लक्षणांचा नाश होतो. कारण—

दुराचारो हि पुरुषो लोके भवति निन्दितः ॥
दुःखभागी च सततं व्याधितोऽल्पायुरेव च ॥
मनु० ४।१५७ ॥

जो दुराचारी पुरुष असतो त्याची सदाचरणी लोकांत निंदा होते, तो नेहमीं व्याधिग्रस्त व दुःखित असतो व अल्पायु होतो. म्हणून असा प्रयत्न करावा कीं,—

सुखदुःखलक्षण.

यद्यत्परवशं कर्म तत्तद्यत्नेन वर्जयेत् ॥
यद्यदात्मवशं तु स्यात्तत्तत्सेवेत यत्नतः ॥ १५९ ॥
सर्वं परवशं दुःखं सर्वमात्मवशं सुखम् ॥
एतद्विद्यात्समासेन लक्षणं सुखदुःखयोः ॥१६०॥ मनु.४

जें पराधीन कर्म असेल तें सोडून द्यावें व जें कर्म स्वाधीन असेल तें प्रयत्नानें करावें. कारण कीं, जी जी परवशता आहे ती ती सर्व दुःखकारक आहे व जी जी स्वतंत्रता आहे ती ती सर्व सुखकारक आहे. हेंच सुख व दुःख यांचें लक्षण आहे.

पण कांहीं कर्तव्यें अशीं असतात कीं, जीं आधीनतेनेंच केलीं पाहिजेत तीं तशीं करावीं. उदाहरणार्थ स्त्रीपुरुषांची परस्पर कर्तव्यें. हीं एकमेकांवर अवलंबून आहेत व तीं त्या स्थितींत प्रत्येकानें केलींच पाहिजेत. दोघांचें परस्पर प्रिय व अनुकूल आचरण झालें पाहिजे. कोणींहि व्यभिचार किंवा विरोध कधींहि करतां नये. घरां-तील सर्व कार्यें पुरुषाच्या आज्ञेप्रमाणें स्त्रीनें पहावीं व पुरुषानें बाहेरचीं करावीं. जेव्हां दोघांतून एक व्यसनांत फसूं लागला असेल तेव्हां त्याला उपदेश करून मागें हटवणें, हें परस्परांचें कर्तव्य आहे. सर्वांनीं लक्ष्यांत ठेवावें कीं, विवाह झाल्यावरो-बरच स्त्रीचें पुरुषावर व पुरुषाचें स्त्रीवर स्वाधीनत्व झालें. यामुळें परस्पर हावभाव करणें, किंवा परस्परांपाशीं नखशिखाग्रापर्यंत जें कांहीं आहे त्यावर परस्परांची पूर्ण सत्ता असते. म्हणून पुरुषानेंहि आपल्या स्त्रीच्या विरुद्ध व तिला अप्रिय असलेलें परस्त्रीगमन किंवा वेश्यागमन व अशा सारखीं दुसरीं कोणतींहि कृत्यें करूं नयेत.

त्याचप्रमाणें स्त्रीनेंहि परपुरुषगमनादि कृत्यें करूं नयेत. स्त्रीपुरुषांनीं परस्परांवर नेहेमीं प्रसन्न रहावें. जे वर्णानें ब्राह्मण असतील त्यांनी मुलांना विद्या शिकवावी व ज्या त्यांच्या सुशिक्षित स्त्रिया असतील त्यांनीं मुलींनां शिकवावें. नानाप्रकारचे उपदेश व व्याख्यानें देऊन सर्व लोकांना सुशिक्षित करावें. स्त्रियांनीं आपल्या पतीला पूजनीय देव असें मानावें व पुरुषानें आपल्या स्त्रीला पूजनीय देवी असें मानावें. जोंपर्यंत कन्या व पुत्र गुरुकुलामध्यें राहतील तोंपर्यंत त्यानीं आपल्या अध्यापकांस आपल्या आईबापांच्या ठिकाणीं मानावें व अध्यापकांनीं आपल्या शिष्यांना आपल्या संतानांप्रमाणें मानावें.

अध्यापक कसे असावे ?

आत्मज्ञानं समारम्भास्तितिक्षा धर्मनित्यता ॥
यमर्था नापकर्षन्ति स वै पण्डित उच्यते ॥ १ ॥
निषेवते प्रशस्तानि निन्दितानि न सेवते ॥
अनास्तिकः श्रद्दधान एतत्पण्डित लक्षणम् ॥ २ ॥
क्षिप्रं विजानाति चिरं शृणोति विज्ञाय चार्थं भजते न कामात्॥
नासम्पृष्टो ह्युपयुङ्क्ते परार्थे तत्प्रज्ञानं प्रथमं पण्डितस्य ॥ ३ ॥
ना प्राप्यमभिवाञ्छन्ति नष्टं नेच्छन्ति शोचितुम ॥
आपत्सु च न मुह्यन्ति नराः पण्डितबुद्धयः ॥ ४ ॥
प्रवृत्तवाक् चित्रकथ ऊहवान् प्रतिभानवान् ॥
आशु ग्रन्थस्य वक्ता च यः स पण्डित उच्यते ॥ ५ ॥
श्रुतं प्रज्ञानुगं यस्य प्रज्ञा चैव श्रुतानुगा ॥
असम्भिन्नार्यमर्यादः पण्डिताख्यां लभेत सः ॥ ६ ॥

भार० उद्योगप० अ० ३२

ज्याला आत्मज्ञान झालें आहे, जो उद्योगी आहे, कधींही आळस करीत नाहीं, सुख, दुःख, हानि, लाभ, मानापमान, निंदा, स्तुति यांमध्यें हर्ष किंवा शोक करीत नाहीं, नेहेमी धर्मामध्यें स्थिर असतो, व ज्याचें मन विषयसंबंधीं पदार्थांनीं आकर्षित होत नाहीं, त्याला पंडित असें म्हणतात. जो सदोदित धर्मयुक्त कामें करतो, अधर्मयुक्त कृत्यांचा त्याग करतो, ईश्वर, वेद व सदाचार यांची निंदा करीत नाहीं, व ईश्वरावर अत्यंत श्रद्धा ठेवतो त्याला पंडित असें म्हणतात. ज्याला कठीण विषय लवकर सम-

असतो, जो पुष्कळ काळ पर्यंत शास्त्रांचें अध्ययन, श्रवण व विचार करतो, जें कांहीं ज्ञान प्राप्त झालें असेल त्याचा परोपकारार्थ व्यय करतो, कोणत्याहि कामास स्वार्थानें प्रेरित होत नाहीं, कोणी न विचारतां किंवा अयोग्य वेळीं दुसऱ्याच्या कार्यांत प्रविष्ट होत नाहीं, त्याला पंडित असें म्हणतात. जो अप्राप्य वस्तूची इच्छा करीत नाहीं, व नष्ट झालेल्याबद्दल शोक करीत नाहीं, आपत्कालीं मोह पावत नाहीं किंवा व्याकुळ होत नाहीं, त्या बुद्धिमानाला पंडित असें म्हणतात. ज्याची वाणी सर्व विद्यांमध्यें व प्रश्नोत्तरें करण्यांत निपुण असते, जो अनेक प्रकारच्या शास्त्रप्रकरणांचें विवरण करूं शकतो, तर्क व स्मृतिग्रंथांचें जो यथार्थ व शीघ्र स्पष्टीकरण करतो त्याला पंडित असें म्हणतात. ज्याची बुद्धि ऐकलेल्या सत्य अर्थाच्या अनुकूल असते, ज्याचें श्रवण बुद्धीच्या अनुकूल असतें, व जो केव्हांहि आर्यांचें-अर्थात् श्रेष्ठ पुरुषांच्या मर्यादेचें उल्लंघन करीत नाहीं, त्याला पंडित असें म्हणतात. ज्या गुरुकुलामध्यें असे अध्यापक असतात, तेथें विद्या, धर्म व उत्तमाचार यांची वृद्धि होते, व त्यामुळें प्रतिदिवशीं आनंद वाढत असतो.

मूर्खांचीं लक्षणें.

अश्रुतश्च समुन्नद्धो दरिद्रश्च महामनाः ॥
अर्थांश्चाकर्मणा प्रेप्सुर्मूढ इत्युच्यते बुधैः ॥ १ ॥
अनाहूतः प्रविशति ह्यपृष्टो बहु भाषते ॥
अविश्वस्ते विश्वसिति मूढचेता नराधमः ॥ २ ॥

भार. उद्यो. अ. ३२.

ज्याणें कोणतेंहि शास्त्र म्हटलें नाहीं व ऐकलेंहि नाहीं, ज्याला घमेंड फार आहे, जो दरिद्री असतांहि मोठे मनोरथ करीत असतो, कर्म केल्यावांचून जो फल प्राप्त व्हावें असें इच्छितो त्याला बुद्धिमान् लोक मूर्ख असें म्हणतात. जो न बोलावतां सभेंत किंवा कोणाच्या घरीं जातो, व तेथें मोठ्या आसनावर बसतो, कोणी न विचारतांहि पुष्कळ बडबडतो, अविश्वासू मनुष्यावर विश्वास ठेवितो, त्याला मूर्ख असें म्हणतात. हा सर्व मनुष्यांत हीन योग्यतेचा समजावा. ज्या ठिकाणीं अशा तऱ्हेचे मूर्ख अध्यापक असतात, तेथील लोकांत अविद्या, अधर्म, असभ्यता, कलह, विरोध व दुही हीं वाढतात व त्यायोगानें सर्वांस दुःख भोगावें लागतें.

विद्यार्थ्याचें लक्षण.

आलस्यं मदमोहौ च चापलं गोष्ठिरेव च ॥
स्तब्धता चाभिमानित्वं तथाऽत्यागित्वमेव च ॥ १ ॥

एते वै सप्त दोषाः स्युः सदा विद्यार्थिनां मताः॥
सुखार्थिनः कुतो विद्या कुतो विद्यार्थिनः सुखम् ॥ २ ॥
सुखार्थी वा त्यजेद्विद्यां विद्यार्थी वा त्यजेत्सुखम् ॥

भा. उद्यो. विदुर प्रजागर अ. ३९

आळस अर्थात् शारीरिक व मानसिक जडत्व, कैफ-मद, मोह अर्थात् कोणत्याहि वस्तूसंबंधानें मन फसून जाणें, अस्थिरपणा, इकडच्या तिकडच्या व्यर्थ गोष्टी करणें व ऐकणें-शिकण्या शिकवण्यांत थांवणें, अभिमान, अत्यागी अर्थात् स्वार्थी असणें हे सात दोष विद्यार्थ्यांमध्यें नसावे. जे विद्यार्थी या सात दोषांनीं युक्त असतील त्यांनां विद्या येत नाहीं. चैन करण्याची इच्छा करणाराला विद्या कशी येणार? व विद्या शिकूं इच्छिणाराला चैन कशी भोगतां येणार? विषयसुखाची जो इच्छा करीत असेल त्याणें विद्या सोडावी व विद्या शिकणारानें विषयसुख सोडावें. या प्रमाणें चैन सोडल्यावांचून विद्या येऊं शकत नाहीं:—

पूर्णविद्वान् होण्याचा उपाय.

सत्ये रतानां सततं दान्तानामूर्ध्वरेतसाम् ॥
ब्रह्मचर्यं दहेद्राजन् सर्वपापान्युपासितम् ॥

"जे सदाचारामध्यें प्रवृत्त असतात, ज्यांचीं इंद्रियें स्वाधीन झालीं आहेत, ज्यांचें वीर्य स्खलन झालेलें नाहीं, त्यांचेंच ब्रह्मचर्य पूर्ण होतें व तेच पूर्ण विद्वान् होऊं शकतात" यासाठीं अध्यापक व अध्यापिका यांनीं आपलें आचरण उत्तम ठेवावें व त्यांणीं आपल्या अंगांत पंडितत्वाचीं सर्व लक्षणें वास करतील असें करावें. अध्यापक लोकांनीं आपल्या शिष्यांला असें शिक्षण द्यावें कीं, ते सत्यवादी, सत्याभिमानी, सत्यकारी, सभ्य, जितेंद्रिय, सुशील, शारीरिक बलानें युक्त, आत्मिकबलानें युक्त, सर्व वेदादिशास्त्रांमध्यें प्रवीण, सर्व उत्तम गुणांनीं युक्त होतील अध्यापकांच्या साहचर्यानें त्यांच्यांतील कुचेष्टा नाहींशा होऊन ते विद्या शिकण्यांत व शिकवण्यांत आनंद मानणारे होतील असे सदाचारी व दीर्घोद्योगी अध्यापक असले पाहिजेत. विद्यार्थी लोकांनींहि स्वतः जितेंद्रिय, शांत, विचारशील, प्रयत्नशील, सद्गुणी व शिक्षकांवर प्रीति करणारे असें व्हावें व त्याणीं ब्रह्मचर्यानें पूर्णायुष्य संपादन करावें, पूर्णविद्या मिळवावी, धर्माचें पूर्ण ज्ञान मिळवावें व पुरुषार्थ करण्याची इच्छा वाढवावी इत्यादि ब्राह्मणवर्णाचीं कामें आहेत. क्षत्रियांचीं कामें पुढें राजधर्म प्रकरणांत सांगण्यांत येतील. वैश्यांचीं कर्तव्यें पुढें लिहिल्याप्रमाणें आहेत. ब्रह्मचर्याचे नियमांचें पालन करून वेदादि शास्त्रांचें अध्ययन करणें, विद्या पुरी झाल्यावर विवाह करणें, नाना देशांच्या भाषा शिकणें, नाना

प्रकारच्या व्यापाराची रीति शिकणें, व्यापारांतील भाव समजून घेणें, खरेदीविक्रीच्या सर्व खुब्या शिकणें, द्वीपद्वीपांतरीं व देशदेशांतरीं जाणें येणें, लाभ व्हावा म्हणून निरनिराळीं कार्यें आरंभणें, पशूंचें पालन करणें, शेती करणें व ती सुधारण्याचे सर्व उपाय करणें, शेती दुसऱ्यांकडून करवणें, द्रव्य वाढवणें, विद्या व धर्म यांची वाढ करण्यासाठीं द्रव्याचा व्यय करणें, सत्यवादी व निष्कपटी होऊन सचोटीनें व्यापार करणें, सर्व पदार्थांचें असें रक्षण करणें कीं त्यांतील कशाचाहि नाश न होईल. इत्यादि हीं वैश्यांचीं कर्तव्यें आहेत. शूद्र सेवा करण्यांत चतुर, पाकविद्येमध्यें निपुण, द्विजांची सेवा प्रेमानें करणारे असे असावे. या सेवेवर त्यांनीं आपली उपजीविका करावी. या शूद्रांला खाणें, पिणें, वस्त्रपात्र, स्थान, विवाह वगैरेसाठीं जो खर्च लागतो तो सर्व द्विजांनीं द्यावा. किंवा मासिक वेतन त्यांना द्यावें. तात्पर्य चारहि वर्णांनीं परस्परांत प्रीति, उपकार, सज्जनतापूर्वक वागावें, तसेंच सर्वांनीं सुखदुःख, हानी, लाभ वगैरे मध्यें ऐक्यमत्त्यानें राहून राज्य व प्रजा यांची उन्नति करण्यासाठीं तन, मन व धन यांचा व्यय करण्यास तयार असावें.

स्त्रिया बिघडण्याचें कारण.

पानं दुर्जनसंसर्गः पत्या च विरहोऽटनम् ॥
स्वप्नोऽन्यगेहवासश्च नारीसन्दूषणानि षट् ॥ मनु.९।१३।

मद्य, भांग आदिक मादक द्रव्यांचें सेवन करणें, दुष्ट पुरुषांशीं सहवास करणें, पतीचा वियोग होणें, एकटी इकडे तिकडे (पाखंडी किंवा ढोंगी लोकांच्या दर्शन घेण्याच्या मिषानें) व्यर्थ फिरणें, दुसऱ्याच्या घरीं वास्तव्य करणें व तेथेंच शयन करणें हे सहा प्रकार स्त्रीला दूषित करणारे आहेत. या स्त्रीदूषणांच्या अनुरोधानें पुरुष कसा दूषित होतो हेंहि जाणावें. स्त्रीपुरुषांचा वियोग दोन प्रकारचा आहे. (१) कांहीं कार्य करण्यासाठीं देशांतरीं पुरुष जातो तेव्हां त्याचा जो स्त्रीशीं वियोग होतो तो साधारण वियोग होय. होतां होईल तों पुरुषानें स्त्रीला आपल्या बरोबर घेऊन जावें हें चांगलें. कारण स्त्रीपुरुषांचा वियोग फार दिवस होणें योग्य नाहीं. (२) मृत्यूनें जो स्त्रीपुरुषांमध्यें वियोग होतो तो विशेष प्रकारचा वियोग आहे असें समजावें.

पुनर्विवाह व नियोग.

(प्रश्न) स्त्रीपुरुषांनीं पुष्कळ विवाह करावे कीं नाहीं ? (उत्तर) एकाच समयीं स्त्रीपुरुषांनीं पुष्कळ विवाह करूं नयेत. (प्र०) काय विशिष्ट समयीं केले तर चालतील ? (उ०) स्त्री जिवंत असे पर्यंत पुरुषानें व पुरुष जिवंत असेपर्यंत

स्त्रीनें दुसरा विवाह करूं नये. (प्र०) काय स्त्रियांनीं पुनर्विवाह करावा असें तुम्ही म्हणतां? (उ०) असें मनू म्हणतो पहा—

साचेदक्षतयोनिः स्याद् गतप्रत्यागतापि वा ॥
पौनर्भवेन भर्त्रा सा पुनः संस्कारमर्हति ॥ मनु० ९।१७६ ॥

ज्या स्त्रीचें पाणिग्रहण मात्र झालें असेल व स्त्रीपुरुष संयोग झाला नसेल, अशा अक्षत-योनि विधवेचा पुनर्विवाह व्हावा हें योग्य आहे. त्याचप्रमाणें जो पुरुष अक्षतवीर्य असतां विधुर झाला असेल त्याणेंही आपला दुसरा विवाह करावा. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या द्विजातींनीं क्षत-योनि झाल्यावर स्त्रीनें क्षतवीर्य झाल्यानंतर पुरुषानें पुनर्विवाह करूं नये; करणें असेल तर नियोग करावा. (प्र०) पुनर्विवाह करण्यांत दोष काय? (उ०) पाहिजे तेव्हां स्त्रीपुरुषांनीं एकमेकांस सोडचिठ्ठी देऊन द्वितीय विवाह करणें हें शास्त्रविरुद्ध आहे. अशा करण्यापासून परस्परांत प्रीति वाढत नाहीं हा **पहिला दोष** आहे. **दुसरा दोष** असा कीं, जेव्हां स्त्री मेल्यानंतर पुरुष किंवा पुरुष मेल्यावर स्त्री पुनर्विवाह करूं लागेल, तेव्हां पहिल्या स्त्रीचे किंवा पुरुषाचे सर्व पदार्थ नाहींसे केले जातात व त्यामुळें त्यांच्या कुटुंबांमध्यें व संबंधी लोकांमध्यें तंटे उत्पन्न होतात. **तिसरा दोष** असा कीं, अशा योगानें पुष्कळ भद्रपुरुषांचें नांव, गांव, पत्ता नाहींसा होतो, कारण पुनर्विवाहानें स्त्री दुसऱ्याच्या घरीं जाते व पूर्वीच्या घराशीं तिचा कांहीं संबंध राहत नसल्यामुळें त्या पूर्वपतीच्या सर्व वस्तूंचा नाश होतो. **चौथा दोष** हा आहे कीं, पतिव्रता व स्त्रीव्रत हे धर्म नष्ट होतात. इत्यादि अनेक दोष उत्पन्न होतात म्हणून द्विजांमध्यें क्षतयोनी स्त्रीचा व क्षतवीर्य पुरुषाचा पुनर्विवाह करीत नाहींत. (प्र०) संतान नसल्यामुळें निर्वंश होऊन कुल नष्ट होऊं लागलें तरीहि पुनर्विवाह करूं नये काय? स्त्रीपुरुष व्यभिचार करूं लागतील व त्यांमुळें गर्भपतनादिक अनेक दुष्ट कृत्यें सुरू होतील त्यापेक्षां पुनर्विवाह चांगला आहे कीं नाहीं? (उ०) नाहीं. (१) *विधवा स्त्रीनें व त्याच-

---

* विधवा स्त्रियांना सन्यासदीक्षा देऊन त्या दीक्षेचें यथावत् पालन व्हावें म्हणून चार मैलांच्या आसपास वस्ती नाहीं अशा प्रकारचीं स्थलें शोधून त्या ठिकाणीं त्यांचे विधवा सन्यासाश्रम स्थापन केले व ते चालण्याकरितां त्या त्या विधवेचें जें स्त्रीधन आहे तें तिच्या स्वाधीन केलें; व त्या धनाचा उपयोग या आश्रमाकडे केला तर विधवांचें अतोनात कल्याण होईल. मनुष्याच्या मनाची स्थिति अशी आहे कीं, त्याला ज्या परिस्थितींत ठेवावें तदाकारवत् तें बनतें. म्हणून विधवा अशा ठिकाणीं ठेऊन त्यांना अध्यात्मिक विद्यांचा व्यासंग ठेवला तर संसाराच्या जंजालापेक्षां त्यांना तेथें विशेष समाधान वाटेल. ४०।४५ वर्षे वय झालेली विधवा व कमींत कमी १२ वर्षे अध्यात्मिक विद्येनें समाधान वृत्तीचा अभ्यास झालेली विधवा अध्यापिका व

प्रमाणें विधुर पतीनें आमरणान्त ब्रह्मचर्य धारण करून राहणें हें फारच चांगलें. त्यापासून कांहीं उपद्रव होणार नाहीं.

(२) ज्याला आपलें कुल नष्ट होऊं नये असें वाटत असेल तो हवा तर आपल्या ज्ञातींतील मुलगा दत्तक घेईल म्हणजे कुल नाश पावणार नाहीं. (३) पण ज्यांनां ब्रह्मचर्य पालन करणें अगदीं अशक्य आहे असें वाटत असेल, त्यांनीं नियोग करून संतान उत्पन्न करावें. (प्र०) पुनर्विवाह व नियोग यांत भेद काय? (उ०) यांत मुख्य भेद आहेत ते–(१) ज्याप्रमाणें विवाहित कन्या पित्याचें घर सोडून पतीच्या घरीं जाऊन राहते, व पित्याच्या घराशीं कांहीं संबंध ठेवित नाहीं, त्याचप्रमाणें विधवास्त्रीचा पुनर्विवाह झाल्यावर ती आपल्या दुसऱ्या पतीच्या घरीं जाऊन राहते. (२) पुनर्विवाहित स्त्रीचे पुत्र पुनर्विवाहित पतीच्या मालमत्तेचे हकदार प्रथमविवाहित स्त्रीच्या पुत्रांप्रमाणेंच होतात, पण नियोग केलेल्या स्त्रीचे पुत्र मृतपतीचे वंशज समजले जातात. वीर्यदान करणाऱ्या पुरुषाचें गोत्र त्यांना प्राप्त होत नसून ते पूर्णपणें मृतपतीचे पुत्र व गोत्रज समजले जातात व ते त्याचेच दायभागी होतात व त्याच्याच घरांत राहतात. (३) विवाहित स्त्रीपुरुषांनीं परस्परांची सेवा करणें आवश्यक असतें, पण नियुक्त स्त्रीपुरुषांचा तसा कांहीं संबंध नसतो. (४) विवाहित स्त्रीपुरुषांचा संबंध मरणापर्यंत असतो पण नियुक्त स्त्रीरुषांचा संबंध संतानोत्पत्तीचें कार्य संपेपर्यंत असतो. (५) विवाहित स्त्रीपुरुष एकाच घरांत राहतात व तेथेंच सर्व कार्यें करतात, पण नियुक्त स्त्रीपुरुष आपआपल्या पूर्वीच्या घरींच राहतात. व आपआपल्या पूर्वीच्या घरासंबंधीं सर्व कृत्यें करीत असतात. याप्रमाणें *पुनर्विवाह व

उपदेशिका बनून लोकांवर उपकार करूं इच्छित असली तर तिच्याकडून जें काम होईल तें कोणाच्यानेंही होणार नाहीं. व हा जो निरुपयोगी विधवा मनुष्यसमूह समाजामध्यें लोकांच्या तिरस्कारांत राहिलेला आहे तो मोठा आदरणीय पदवीला पावेल. समाजहितचिंतकानें याचा विचार करण्यासारखा आहे. याप्रमाणें विधुरांच्या संस्थेपासूनहि योग्य उपदेशक व अध्यापक तयार होऊं शकतील व त्यापासून जनतेला मोठा लाभ होईल. सामान्य नियम असा आहे कीं, जेव्हां कोणाही स्त्रीपुरुषांचा खास किंवा विवक्षित मनुष्यावर असलेला प्रेमभाव नष्ट होतो तेव्हां तो सर्वांवर प्रेम करूं लागतो, याच नियमाला धरून ज्याची जगांतील प्रेमाची जागा नष्ट झाली; अशा योध्यांनीं जिवावर उदार होऊन मोठमोठे जगाला थक्क करणारे पराक्रम केलेले आहेत.

* विवाह, धर्माचरणानें संतानोत्पत्ति करण्याकरितां आहे. विवाह करूनहि विषयसुख भोगांत आसक्त राहून त्यालाच प्रधान मानणारे स्त्रीपुरुष व्यभिचारीवर्गांत गणले जातात हें ज्यांना कळतें त्यांना आपत्कालीं संतानोत्पत्ति करण्याची जरूरी असली तर नियोगविधि श्रेष्ठ आहे असें वाटलेंच पाहिजे, विषयासक्तीच्या आचाराला ऊत येऊं लागल्यापासून विधुर स्थितींत राजरोषपणें विषयसुखोपभोग घेण्याचीं यंत्रें सदैव जवळ राहावीं या हेतूनें ह्या पुरुषांच्या पुनर्विवाहाची शास्त्राविरुद्ध चाल रूढींत आलेली दिसते; व स्त्रियांनीं या पुरुषांच्या खुदगर्जी आचाराला

*नियोगामध्यें भेद आहेत. (प्र०) विवाह व नियोग यांचे नियम एकच आहेत कीं त्यांत भिन्नता आहे? (उ०) थोडासा त्यांत भेद आहे. कांहीं भेद पूर्वी सांगितले आहेत व आणखी जे आहेत ते येथें सांगतों. विवाहित स्त्रीपुरुषांनीं फार तर दहा मुलेंच उत्पन्न करावीं असा धर्माचा नियम आहे. पण **नियुक्त स्त्रिपुरुषांनीं एक पती व स्त्री मिळून दोन किंवा फारतर चारच मुलें उत्पन्न करावीं या पेक्षां जास्त करूं नयेत**, असा प्रतिबंध आहे. कुमार व कुमारिका यांचा जो लग्नसंबंध होतो त्यास विवाह असें म्हणतात. (अक्षतयोनि स्त्री व अक्षतवीर्य पुरुष यांचा जो पुनः लग्नसंबंध होतो त्याला पुनर्विवाह म्हणतात) क्षतयोनी विधवा स्त्री व क्षतवीर्य विधुर पुरुष यांचा विशिष्ट नियमांप्रमाणें संतानोत्पत्तीपर्यंत जो संबंध असतो त्यास नियोग असें म्हणतात. कुमारकुमारिकांचा नियोग होत नाहीं. विवाहित स्त्री पुरुषें ज्याप्रमाणें सदोदित एकमेकांच्या संगामध्यें राहतात, त्या प्रमाणें नियुक्त पुरुषांनीं राहतां नये. प्रतिमासीं ऋतुकालीं ऋतुदान समया पुरताच त्या दोघांचा एकत्र वास असावा. दुसऱ्या कोणत्याहि वेळीं त्यांनीं एकत्र होऊं नये. जर स्त्रीनें आपणासाठीं नियोग केला असेल तर दुसरा गर्भ धारण झाल्या दिवसापासून नियुक्त पतीशीं संबंध ठेवूं नये. जर पुरुषानें आपणासाठीं नियोग केला असला तरीहि दुसरा गर्भ राहिल्या दिवसापासून त्या स्त्रीशीं त्यानें संबंध ठेवूं नये. स्त्रीनें मात्र दोन तीन वर्षें पर्यंत त्या मुलाचें पालन करून नंतर तें मूल त्या नियुक्त पुरुषाला द्यावें. या प्रमाणें एक विधवा स्त्री विधुर पुरुषाशीं नियोग करून आपणासाठीं दोन व त्या पुरुषासाठीं जरूर असल्यास दोन याप्रमाणें चार मुलें उत्पन्न करूं शकते. एक विधवा स्त्री जरूर असल्यास फार तर चार नियोग करूं शकते व त्याच प्रमाणें एक विधुर पुरुष *चार नियोग करूं शकतो. अर्थात् चार नियुक्त पुरुषांपासून ती आपल्या ठिकाणीं दहा मुलें उत्पन्न करूं शकते. दोन आपणाकरितां व त्या चार पुरुषांकरितां प्रत्येकीं दोन दोन मिळून दहा संतान. त्याचप्रमाणें पुरुषही चार स्त्रियांशीं नियोग करून दहा-पर्यंत संतान उत्पन्न करूं शकतो असें जाणावें. पहा—

आळा घालूं नये व पुनर्विवाहाचा हक्क मागूं नये म्हणून त्यांना पुरुषसत्ता न्यायानें वपन करण्यास लावून विद्रूपकरून टाकण्याचा प्रघात पडलेला दिसतो. म्हणून विवाह व नियोग हेच शास्त्र सिद्ध संतानोत्पत्तीचे आचार आहेत क्षतयोनी स्त्री किंवा क्षतवीर्य पुरुष यांचा पुनर्विवाह शास्त्र सिद्ध नाहीं तर तो विषयासक्तीच्या वृत्तीना मदत करणारी, हट्टानें पाडलेली रूढी आहे असें समजावें.

* विवाहित स्त्रीपुरुषांना दहा सन्तानोत्पत्तीची यत्ता ठरविलेली आहे त्याचप्रमाणें नियोगानें पण दहाच्यावर सन्तानोत्पत्ति करूं नये म्हणून ही नियोगाकरितां यत्ता कायम केलेली आहे.

इमां त्वमिंन्द्र मीढ्वः सुपुत्रां सुभगां कृणु ॥
दशास्यां पुत्रानाधेंहि पतिमेकादशं कृधि ॥

ऋ० मं० १०।९९।४४ ॥

हे (मीढ्व इन्द्र) वीर्य सेचन करण्यांत समर्थ व ऐश्वर्ययुक्त पुरुषा, (इमाम्) या विवाहित स्त्रीला व नियुक्त विधवा स्त्रीला (सुपुत्राम्) श्रेष्ठ पुत्रांनीं युक्त व (सुभगाम्) सौभाग्ययुक्त (कृणु) कर. हे पुरुषा! तूं हिच्या ठिकाणीं दहा पुत्र उत्पन्न कर व नंतर अकरावी स्त्री पुत्रवत् आहे असें समज. तसेंच हे स्त्रिये! तूंहि या विवाहित अथवा नियुक्त पुरुषापासून दहा पुत्र उत्पन्न कर पतीला अकरावा पुत्रवत् समज. या वेदाच्या आज्ञेप्रमाणें ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या द्विजांतील स्त्रीपुरुषांनीं दहापेक्षां जास्त मुलें उत्पन्न करूं नयेत असें ठरतें. कारण जास्त संतती झाल्यानें ती निर्बल, निर्बुद्ध व अल्पायु होते व स्त्रीपुरुषहि निर्बल, अल्पायु व रोगी होतात व त्यांस वार्धक्यामध्यें अनेक रोग होऊन फार दुःख होतें. (प्र०) हा नियोग व्यभिचारासारखा दिसत नाहीं काय? (उ०) ज्याप्रमाणें अविवाहित स्त्रीपुरुषांच्या संगमाला व्यभिचार असें म्हणतात त्याचप्रमाणें अनियुक्त स्त्रीपुरुषांच्या समागमालाहि व्यभिचार असें म्हणतात. विवाहित व नियुक्त स्त्रीपुरुषांच्या समागमाला व्यभिचार म्हणत नाहींत, कारण तसे शास्त्रांत विधि आहेत. ज्याकरितां शास्त्राप्रमाणें विवाहविधि करून, दुसऱ्याच्या मुलीशीं, पाणिग्रहण झाल्यावर संबंध ठेवण्यास कोणासहि लज्जा वाटत नाहीं, त्याचप्रमाणें विधिपूर्वक धर्मशास्त्राप्रमाणें नियोग केल्यास त्यांत पाप किंवा लज्जा वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. (प्र०) हें ठीक आहे. पण हें वेश्यागमनाप्रमाणें दिसत नाहीं काय? (उ०) नाहीं. पहा वेश्यागमनामध्यें निश्चित स्त्री पुरुषांचाच संबंध नसतो, पण ज्याप्रमाणें विवाहामध्यें त्याचप्रमाणें नियोगामध्येंहि निश्चित स्त्रीपुरुषांचा संबंध घडत असतो. ज्याप्रमाणें विवाह केल्यानंतर आपल्या विवाहित स्त्रीशीं संबंध ठेवण्यास हरकत नाहीं, त्याचप्रमाणें नियोग केल्यानंतरहि जाणावें. ज्यांचा स्वभाव व्यभिचार करावयाचा असेल अशा स्त्रीपुरुषांकडून योग्य पद्धतीनें विवाह झाल्यावरहि व्यभिचार घडत असतो, तेव्हां नियोगानें असें पाप जास्त वाढेल असें मानण्याचें कांहीं कारण नाहीं. (प्र०) आमच्या दृष्टीनें नियोगामध्यें पाप दिसतें, तेव्हां कसें? (उ०) जर आपणास विधिपूर्वक नियोग करण्यांत पाप दिसतें तर मग आपण विवाहामध्यें कां नाहीं पाप समजत? वैराग्यवान् व पूर्ण विद्वान् योगी यांची गोष्ट निराळी, पण साधारण जनतेच्या स्वभावाकडे व सृष्टिक्रमाकडे पाहिलें असतां

नियोगाला प्रतिबंध करण्यापासूनच पाप घडतें असें आपणास आढळेल. गर्भपात, भ्रूणहत्या, विधवा व विधुरांपासून होणारीं अनंत संतापजनककृत्यें हीं नियोगाला प्रतिबंध केल्यापासूनच उत्पन्न झालेलीं आहेत. जेव्हां स्त्रीपुरुषें तरुण असतात, संतानोत्पत्तीची व विषयोपभोगाची प्रबल इच्छा त्यांच्या मनांत स्फुरण पावत असते, वैधव्यानें व विधुरतेनें त्यांच्या त्या इच्छांना प्रतिबंध होऊं लागला व राजव्यवहार व जातिव्यवहाराच्या योगानें त्यांना त्या इच्छा सफल करून घेणें शक्य नसलें म्हणजे गुप्तपणानें पूर्वी लिहिलेलीं कुकर्में करून आपणावर अनेक अनर्थ ओढवून घेतात. **जे स्त्रीपुरुष विधवा व विधुर स्थितींत नियोग न करतां जितेंद्रिय राहून आपला काल धर्मार्जनांत घालवतात ते खरोखर धन्य व श्रेष्ठ होत.** पण जे या श्रेष्ठ दर्जाचे लोक नसतात व जे जितेंद्रिय राहूं शकत नाहींत, त्यांनी अक्षतयोनी स्त्री व अक्षतवीर्य पुरुष यांचा पुनर्विवाह व इतरांचा आपत्कालच्या धर्माप्रमाणें नियोग केला तर पूर्वोक्त व्यभिचार व कुकर्में कमी होतील. मनुष्यांमध्यें प्रेमाची वृद्धि होऊन प्रजावृद्धि होईल. गर्भपातादिक अनर्थ होणार नाहींत. नीच पुरुषांशीं उत्तम स्त्रीचा संबंध व वेश्यादि नीच स्त्रियांशीं उत्तम पुरुषाचा संबंध होण्याचें कमी होईल, कुल कलंकित होणार नाहीं, वंशाचा उच्छेद होणार नाहीं, स्त्रीपुरुषांमध्यें संताप व भ्रूणहत्या इत्यादि कुकर्में होणार नाहींत. यासाठीं विवाह व नियोग या पद्धती आवश्यक आहेत. (प्र०) नियोगामध्यें काय काय गोष्टी झाल्या पाहिजेत ? (उ०) ज्याप्रमाणें विवाह उघड होतो त्याचप्रमाणें नियोगहि प्रसिद्धपणें व्हावा. ज्याप्रमाणें विवाहामध्यें चांगल्या पुरुषांची अनुमति असते व वधू वर प्रसन्न असतात, त्याचप्रमाणें नियोगांतहि असावे. जेव्हां स्त्रीपुरुषांचा नियोग व्हावयाचें ठरेल तेव्हां त्यांनीं आपआपल्या कुटुंबांतील स्त्रीपुरुषांपुढें सांगावें कीं, " आम्ही संतानोत्पत्तीसाठीं नियोग करीत आहों, जेव्हां नियोगाचा नियम पूर्ण होईल तेव्हां आमचा परस्पर संबंध कांहीं राहणार नाहीं व जर नंतर आम्ही संबंध ठेवला, तर आम्ही पापी होऊं व राजा व ज्ञाति यांच्याकडून दंडनीय होऊं. महिन्यांतून एक वेळ ऋतुकाळींच आम्ही गर्भीथान कर्म करूं व गर्भधारणा झाल्यावर एक वर्षपर्यंत पृथक् राहूं. " (प्र०) नियोग आपल्या वर्णामध्येंच व्हावा कीं अन्य वर्णांशींही व्हावा ? (उ०) आपल्या वर्णातील व आपल्यापेक्षां उत्तम वर्णस्थ पुरुषाशीं नियोग करावा. वैश्य स्त्रीनें वैश्य, क्षत्रिय किंवा ब्राह्मण पुरुषाशीं, क्षत्रिय स्त्रीनें क्षत्रिय व ब्राह्मण याशीं व ब्राह्मणीनें ब्राह्मणाशींच नियोग करावा. तात्पर्य हें आहे कीं, वीर्य आपणापेक्षां उत्तम किंवा आपल्या समान वर्णाचें असलें पाहिजे नीच वर्णाचें असूं नये. स्त्रीपुरुषांनीं वेदोक्त धर्माप्रमाणेंच आपले विवाह व नियोग हे विधि करावे हें त्यांस योग्य आहे. (प्र०) पुरुषाला नियोग करण्याची काय आवश्यकता आहे ? कारण तो दुसरा विवाह करूं

शकतो. (उ०) आम्ही पूर्वी सांगितलेंच आहे कीं, **वेदादि शास्त्रांमध्यें द्विज स्त्रीपुरुषांनीं एक वेळच विवाह करावा असें आहे.** त्यांनीं दुसरा विवाह करतां नये. कुमार व कुमारिका यांचा विवाह होणें हा न्याय होय; पण विधवा स्त्रीचा कुमाराशीं व कुमारीचा विधुर पुरुषाशीं विवाह होणें हा अन्याय व अधर्म आहे. ज्याप्रमाणें विधवेशीं पुरुष विवाह करूं इच्छित नाहीं त्याचप्रमाणें विधुराशीं विवाह करावा असें कुमारिकेलाहि वाटत नाहीं. ज्याअर्थी विधवेशीं कुमार व विधुराशीं कुमारिका विवाह करूं इच्छित नाहीं त्याअर्थी विधवा व विधुर यांमध्यें नियोग व्हावा हें उचित आहे. समान धर्मीयांशीं संबंध होणें हाच खरा धर्म आहे. (प्र०) ज्याप्रमाणें विवाहाविषयीं वेदादि शास्त्रांमध्यें प्रमाणें आहेत त्याचप्रमाणें नियोगाबद्दलहि आहेत काय ? (उ०) पुष्कळ प्रमाणें आहेत. पहा—

कुहस्विद्दोषा कुह वस्तोरश्विना कुहाभिपित्वं करतः कुहोषतुः ॥ को वां शयुत्रा विधवेव देवरं मर्यं न योषा कृणुते सधस्थ आ ॥

ऋ. मं. १०।४०।२॥

हे (अश्विना) स्त्रीपुरुषहो! ज्याप्रमाणें (देवरम्) देवराशीं (विधवेव) विधवा व (योषा) विवाहित स्त्री (मर्यं न) जशी आपल्यापतीशीं (सधस्थे) शय्या व स्थान यांमध्यें एकत्र होऊन संतानोत्पत्ति (आ–कृणुते) करते त्याप्रमाणें तुम्हीहि करावें. (कुहस्वित् दोषा) रात्रीमध्यें कुठें (कुह वस्तोः) व दिवसाला कुठें असतां ? (कुहभिपीत्वं) पदार्थांची प्राप्ति कुठें (करतः) केली ? (कुह ऊषतुः) कोणत्यावेळीं कोठें होतां ? (कः वां शयुत्रा) तुमचें शयनस्थान कोठें आहे ? किंवा तुम्ही कोणत्या देशांतील राहणारे आहां ? या वेदमंत्रांतील प्रश्नांवरून उघड होतें कीं, स्त्री व पुरुष यांणीं स्वदेशीं व विदेशीं एकत्र रहावें. त्याप्रमाणें विधवेनें विवाहित पतिप्रमाणेंच नियुक्त पतीला मानून संतानोत्पत्ति करावी. (प्र०) या मंत्रांत देवराशीं नियोग करावा असें आहे पण जिच्या पतीला लहान भाऊ नसेल तिणें कोणाशीं नियोग करावा ? (उ०) देवर शब्दाचा तुम्ही समजतां तसा अर्थ नाहीं, **" देवरः कस्माद्द्वितीयो वर उच्यते ।** निरु. ३ । १५ ॥ " द्वितीय वराला देवर असें म्हणतात, मग तो पतीचा लहान भाऊ असो, किंवा मोठा असो, आपल्या वर्णाचा किंवा आपल्याहून उच्च वर्णाचा असो. ज्याच्याशीं नियोग होतो त्याला देवर असें म्हणतात. तसेंच—

उदीर्ष्व नार्यभि जीवलोकं गतासुमेतमुपशेष एहि ॥ हस्तग्राभस्य दिधिषोस्तवेदं पत्युर्जनित्वमभि सं बभूथ ॥ ऋ. मं. १०।१८।८ ॥

हे (नारी) विधवा स्त्रिये (एतं गतासुम्) या मेलेल्या पतीची आशा सोडून (शेषे) बाकी राहिलेल्या पुरुषांमधील (अभि, जीवलोकम्) जिवंत असलेल्या वराला (उपैहि) प्राप्त हो. (उदीर्ष्व) या गोष्टीचा विचार कर कीं, (हस्तग्राभस्य दिधिषोः) तुझें पाणिग्रहण करणाऱ्या नियुक्त पतीसाठीं तुझा नियोग झाला असला तर (इदम्) हें (जनित्वम्) बालक त्या नियुक्त (पत्युः) पतीचें होईल व जर तूं तुझ्यासाठीं नियोग करशील तर तें (तव) तुझें होईल. हा नियम मनांत धारण कर व (अभि. सं, बभूथ) नियमयुक्त हो. याचप्रमाणें नियुक्त पुरुषानेंहि या नियमांचें पालन करावें. तसेंच—

अदेवृघ्यपतिघ्नी हैधि शिवा पशुभ्यः सुयमा सुवर्चाः ॥ प्रजावती वीरसूर्देवृकामा स्योने-ममग्निं गार्हपत्यं सपर्य ॥ अथर्व. कां. १४।२।१८॥

हे (अपतिघ्नी) पतीला दुःख न देणाऱ्या व (अदेवृघ्नी) देवराला दुःख न देणाऱ्या स्त्रिये, (इह) या गृहस्थाश्रमामध्यें (पशुभ्यः) पशूंचें (शिवा) कल्याण करणारी, (सुयमाः) उत्तम प्रकारें नियमाचें पालन करणारी, (सुवर्चाः) सौंदर्ययुक्त व शास्त्र जाणणारी, (प्रजावती) उत्तम पुत्रपौत्रादिकांनीं युक्त, (वीरसूः) शूरवीर अशा पुत्रांला उत्पन्न करणारी (देवृकामा) देवराची कामना पुरी करणारी, (स्योना) सुख देणारी अशी तूं पति किंवा देवर यांना (एधि) प्राप्त हो व (इमम्) या (गार्हपत्यं) गृहस्थसंबंधी (अग्निम्) अग्निहोत्राचें (सपर्य) सेवन कर. तसेंच—

तामनेन विधानेन निजो विन्देत देवरः ॥ मनु. ९।६९॥

जी अक्षतयोनी स्त्री विधवा झाली असेल, तिच्याशीं तिच्या पतीच्या लहान भावानें विवाह करावा. (प्र०) एका स्त्रीनें व एका पुरुषानें किती नियोग करावे? व विवाहित नियुक्त पतींचीं नांवें काय ? (उ०)—

सोमः प्रथमो विविदे गन्धर्वो विविद उत्तरः॥
तृतीयो अग्निष्टे पतिस्तुरीयस्ते मनुष्यजाः॥

ऋ. मं. १०।८५।४० ॥

हे स्त्रिये ! जो (ते) तुला (प्रथमः) पहिला विवाहित (पतिः) पति (विविदे) प्राप्त होतो, त्याला (सोमः) त्याच्या ठिकाणीं सुकुमारत्वादि गुण असल्यामुळें सोम असें म्हणतात. जो तुला नियोग करून दुसरा पति (विविदे) प्राप्त होतो त्याला, (गन्धर्वः) त्याणें स्त्रीशीं पूर्वी संभोग केला असल्यामुळें, गंधर्व असें म्हणतात. जो (तृतीय उत्तरः) या दोहों नंतर तिसरा पति तुला मिळतो, त्याला (अग्निः) त्याच्या शरीरांत उष्णता फार असल्यामुळें, अग्नि असें म्हणतात. व जे (ते) तुला (तुरीयः) चवथ्यापासून अकराव्यापर्यंत पती मिळतील, त्यांनां (मनुष्यजाः) मनुष्य असें म्हणतात. **'इमां त्वमिन्द्र०'** या मंत्रावरून स्त्रीनें *अकरापर्यंत नियोग करावे व त्याचप्रमाणें पुरुषानेंहि अकरा नियोग करावे असें उघड होतें. (प्र०) वरील मंत्रांतील "एकादश" या शब्दाचा अर्थ "दहा पुत्र व अकरावा पती" असा कां समजूं नये ? (उ०) जर असा अर्थ केला तर "विधवेव देवरम्।" "देवरः कस्माद् द्वितीयो वर उच्यते।" "अदेवृघ्नी" "गन्धर्वो विविद उत्तरः।" इत्यादि वेदवाक्यांच्या विरुद्ध अर्थ होईल. कारण तसा अर्थ केला असतां दुसऱ्या पतीची प्राप्तीच होत नाहीं; मग "विधवेव देवरं" चा अर्थ कसा होणार ? तसेंच—

देवराद्वा सपिण्डाद्वा स्त्रिया सम्यङ् नियुक्तया ॥
प्रजेप्सताधिगन्तव्या सन्तानस्य परिक्षये ॥ ५९ ॥
ज्येष्ठो यवीयसो भार्यां यवीयान् वाग्रजस्त्रियम् ॥
पतितौ भवतो गत्वा नियुक्तावप्यनापदि ॥ ५८ ॥
औरसः क्षेत्रजश्चैव० ॥ मनु० अ० ९ ॥ १५९ ॥

सपिंड अर्थात् पतीच्या सहा पिढ्यांमध्यें येणारा पतीचा लहान किंवा मोठा भाऊ

---

* या प्रकरणांत लक्षांत ठेवण्याचें आहे कीं, विवाहित किंवा नियोजित स्त्रीपुरुषांनीं १० पेक्षां जास्त सन्तानोत्पत्ती करूं नये व त्याकरितां वर्षांच्या गृहस्थाश्रमाच्या अवधींत ११ पेक्षां जास्त वेळां पतीला धारण करूं नये. हा मुद्दा लक्षांत न ठेवला तर मंत्रार्थ विपरीत भासण्याचा संभव आहे.

स्वजातीय अथवा आपल्यापेक्षां उत्तम जातिस्थ पुरुष यांशीं विधवा स्त्रीचा नियोग व्हावा. विधुर व विधवा यांचा संतानोत्पत्तीसाठींच नियोग होतो. किंवा पूर्वसंतानाचा नाश झाल्यानंतर नियोग करावा. **आपत्काल नसतां अर्थात् संतानादिकांची अपेक्षा नसतां केवळ विषयसुखाच्या अनावर इच्छेनें जे नियोग करतात, मोठ्या भावाच्या स्त्रीशीं लहान भावाचा किंवा लहान भावाच्या स्त्रीशीं मोठ्या भावाचा पुत्र असतांना जो नियोग केला जातो, त्या योगानें, ते सर्व पतित होतात. तसेंच नियोगाचें संतानोत्पत्ति हें कार्य संपल्यावर जे नियुक्त स्त्रीपुरुष परस्पर समागम करतात ते हि पतित होतात.** दुसरा गर्भधारण होईपर्यंतच एका नियोगाची अवधि आहे. म्हणून दुसरा गर्भधारण झाल्यावर परस्परांनीं संबंध ठेवूं नये. व जर दोघांनीं परस्परांसाठीं नियोग केला असेल तर चवथा गर्भ राही पर्यंत समागम करावा. याप्रमाणें पूर्वोक्त पद्धतीनें वागलें असतां दहा मुलें उत्पन्न होऊं शकतात. यापुढें समागम करणें हें विषयासक्तीचें दर्शक आहे अर्थात् त्याच्या योगानें मनुष्य पतित होतो. त्याचप्रमाणें विवाहित स्त्रीपुरुषें दहां पेक्षां जास्त मुलें होईपर्यंत समागम करतील तर तीं कामातुर आहेत असें समजावें, तीं निंदनीय होत. अर्थात् विवाह किंवा नियोग केवळ संतानोत्पत्तिसाठींच केले जातात पशूं प्रमाणें क्रीडा कर. ण्यासाठीं नाहीं. (**प्र०**) पति मरण पावल्यावरच नियोग केला जातो कीं तो जिवंत असतानांहि करतां येतो? (**उ०**) पति जिवंत असतानांहि करतां येतो, पण तो संतानोत्पत्तीला असमर्थ असला पाहिजे. पहा—

अन्यमिच्छस्व सुभगे पतिं मत्॥ ऋ. मं. १०।१०।१०॥

जेव्हां पति संतानोत्पत्ति करण्यास असमर्थ होईल तेव्हां त्याणें आपल्या पत्नीस अशी आज्ञा करावी कीं, "हे (सुभगे) सौभाग्याची इच्छा करणाऱ्या स्त्रिये! तूं (मत्) माझ्याहून (अन्यम्) दुसऱ्या (पतिम्) पतीची (इच्छस्व) इच्छा कर. कारण माझ्याकडून आतां संतानोत्पत्ति होणार नाहीं." अशी आज्ञा झाल्यावर त्या स्त्रीनें दुसऱ्याशीं नियोग करून संतानोत्पत्ती करावी. परंतु त्या स्त्रीनें आपल्या विवाहित पतीच्याच सेवेमध्यें सदैव तत्पर असलें पाहिजे. याचप्रमाणें जेव्हां स्त्री रोगादि दोषांनीं ग्रस्त होईल तेव्हां तिणेंहि आपल्या पतीस असें सांगावें कीं, "हे स्वामिन्! आपण मजकडून संतानोत्पत्तीची आशा सोडून द्या व दुसऱ्या विधवा स्त्रीशीं नियोग करून संतानोत्पत्ती करा." या कथानुसारच पूर्वी **पांडु** राजाच्या **कुंती** नामक व **माद्रि** नामक स्त्रियांनीं नियोग केले होते. त्याचप्रमाणें **व्यास** ऋषींनीं, चित्रांगद, व विचित्रवीर्य मरण पावल्यावर, आपल्या भावाच्या स्त्रियांशीं नियोग करून अंबा-

अंबिकेच्या ठिकाणीं **धृतराष्ट्र** व अंबालिकेच्या ठिकाणीं **पांडु** व दासीच्या ठिकाणीं **विदुर** याप्रमाणें पुत्र उत्पन्न केले होते. या इतिहासावरूनहि पूर्वोक्त नियोगविषयक विधान खरें ठरतें. तसेंच—

प्रोषितो धर्मकार्यार्थं प्रतीक्ष्योऽष्टौ नरः समाः ॥
विद्यार्थं षड् यशोर्थं वा कामार्थं त्रींस्तु वत्सरान् ॥७९॥
वन्ध्याष्टमेऽधिवेद्याब्दे दशमे तु मृतप्रजा ॥
एकादशे स्त्री जननी सद्यस्त्वप्रियवादिनी॥८१॥मनु. ९॥

विवाहित स्त्रीनें, जर पती धर्मकार्यासाठीं विदेशीं गेला असेल तर आठ वर्षें वाट पहावी, विद्या व कीर्तीसाठीं गेला असेल तर सहा वर्षें वाट पहावी, धनासाठीं गेला असल्यास तीन वर्षें वाट पहावी व नंतर नियोग करावा व संतानोत्पत्ति करावी. जेव्हां विवाहित पति येईल तेव्हां नियुक्त पतीशीं संबंध ठेवूं नये. याचप्रमाणें वंध्या स्त्री असेल तर विवाहापासून आठ वर्षांनीं, मुलें उपजून मरत असतील तर दहा वर्षांनीं, पुत्र मुळींच होत नसतील व कन्याच मात्र होत असतील तर अकरा वर्षांनीं व अप्रिय भाषण करणारी स्त्री असेल तर ताबडतोब, दुसऱ्या स्त्रीशीं नियोग करून संतानोत्पत्ति करावी. जर पुरुष अत्यंत दुःख दायक असेल तर स्त्रीनें त्याला सोडून दुसऱ्या पुरुषाशीं नियोग करून संतानोत्पत्ति करावी व त्या विवाहित पतीला दायभाग होणारीं मुलें उत्पन्न करावीं. इत्यादि प्रमाणानुसार व युक्तीला धरून स्वयंवर, विवाह व नियोग करून आपआपल्या कुलाची उन्नति करावी. विवाहित पतीपासून जो मुलगा उत्पन्न होतो त्याला "**औरस**" असें म्हणतात. हा पित्याच्या सर्व मालमतेचा स्वामी होतो. नियोग करून उत्पन्न झालेल्या पुत्राला "**क्षेत्रज**" असें म्हणतात. हाहि मृत पित्याचा दायभागी होतो. आतां या ठिकाणीं स्त्रीपुरुषांनीं हें ध्यानांत ठेवावें कीं, आपल्या शरीरांत असलेलें रज व वीर्य हीं अमूल्य आहेत. जे कोणी या अमूल्य पदार्थांचा, वेश्येचे संगानें किंवा दुष्ट पुरुषांच्या संगानें, व्यय करतात, त्यांना महामूर्ख असें समजावें. साधारण शेतकरी किंवा माळी आपणाकडे असलेलें बीज आपल्या शेताखेरीज किंवा बागेखेरीज दुसरीकडे पेरीत नाहीं, जर तो आपलें शेत टांकून दुसरीकडे तें बीज फेंकूं लागला तर त्यास मूर्ख म्हणतात. याप्रमाणें जर साधारण मनुष्याची स्थिति आहे तर मग जो पुरुष आपल्या शरीररूपी उत्तम वृक्षाच्या बीजाला वेश्यादिक वाईट क्षेत्रांत फेंकून देतो त्याला महामूर्ख म्हटलें तर वावगें होणार नाहीं. कारण त्या पेरलेल्या बीजाचें फल त्यास मिळत नाहीं. पहा "**आत्मा वै जायते पुत्रः ।**" असें ब्राह्मण ग्रंथांत सांगितलें आहे. तसेंच—

अङ्गादङ्गात्संभवसि हृदयादभिजायसे ॥
आत्मा वै पुत्रनामासि स जीव शरदः शतम् ॥

निरु० ३।४ ॥

हे पुत्रा! तूं प्रत्येक अंगापासून उत्पन्न झालेल्या वीर्यापासून व हृदयापासून उत्पन्न होतोस; म्हणून तूं माझा आत्मा आहेस. माझ्यापूर्वी मरूं नको, शंभर वर्षेपर्यंत जिवंत रहा. ज्या वीर्यापासून मोठमोठे महात्मे व महाशय उत्पन्न होतात त्या वीर्याचा वेश्यादिक दुष्ट क्षेत्रामध्यें नाश करणें, किंवा दुष्ट हीन वर्णाचें बीज–वीर्य–उत्तम क्षेत्रामध्यें पेरणें, हीं दोनहि कृत्यें फारच हानीकारक आहेत. (प्र०) विवाह कां करावा? विवाहाच्या योगानें स्त्री व पुरुष बंधनामध्यें पडून, दोघांलाहि फार संकोच होतो व दुःख भोगावें लागतें. म्हणून ज्यांमध्यें प्रीति उत्पन्न होईल त्यांणीं इष्ट वाटेल तोंपर्यंत एके ठिकाणीं रहावें व जेव्हां प्रीतीमध्यें बिघाड होईल तेव्हां संबंध सोडून द्यावा. असें केलें असतां बरें कीं वाईट? (उ०) असें करणें हा पशुपक्षि यांचा व्यवहार आहे मनुष्यांचा नाहीं, जर मनुष्यांमध्यें विवाहाचा निर्बंध राहणार नाहीं तर गृहस्थाश्रमांतील उत्तम उत्तम व्यवहार नष्ट भ्रष्ट होऊन जातील. वृद्धावस्थेमध्यें कोणी कोणाची सेवा करणार नाहीं. सर्वत्र व्यभिचार वाढून सर्व लोक रोगी, निर्बल व अल्पायु होतील व शीघ्र नामशेष होऊन जातील. कोणी कोणाला भिणार नाहीं व कसलेंहि कृत्य केलें तरी कोणाला लज्जा वाटणार नाहीं, व अनाचार फार वाढला जाऊन सर्व कुलें नष्ट होऊन जातील. कोणी कोणाच्या पदार्थाचा हक्कदार होणार नाहीं व कोणाचेंहि कोणच्याहि पदार्थावर दीर्घकालपर्यंत स्वत्व राहणार नाहीं. इत्यादि दोष उत्पन्न होऊं नयेत म्हणून विवाह नियमानुसार व्हावे हें उचित आहे. (प्र०) विवाह एकदांच केला तर एका पुरुषाला एक स्त्री व एक स्त्रीला एक पुरुष याप्रमाणें ठीक व्यवस्था होईल हें खरें, पण जर दोहोंतून एक दीर्घ रोगानें ग्रस्त झालें व दुसऱ्याची युवावस्था असली तर त्याणें काय करावें? किंवा स्त्री गर्भवती असेल तर पुरुषानें काय करावें? (उ०) याचें प्रत्युत्तर नियोग विषयाचेवेळीं पूर्वीच दिलें आहे. स्त्री गर्भवती असतां एक वर्षपर्यंत समागम करूं नये. त्याचप्रमाणें स्त्रीपुरुषांमध्यें जर कोणी दीर्घरोगानें ग्रस्त होईल तर त्याशींहि इतरानें समागम करूं नये. अशा स्थितींत जर त्या विषयासक्ताला व्रतस्थ राहणें शक्य नसलें तर पूर्वोक्त पद्धतीप्रमाणें नियोग करावा. परंतु वेश्यागमन अथवा व्याभिचार करूं नये. असो.

अप्राप्त धनाची मनुष्यांनीं इच्छा करावी, मिळवलेल्याचें रक्षण करावें, राखलेल्याची वाढ करावी, व अशा रीतीनें वाढलेल्या धनाचा देशोपकाराच्या कामीं खर्च करावा. सर्वप्रकारच्या आपआपल्या वर्णाश्रमसंबंधीं व्यवहार, उत्साह प्रयत्नपूर्वक करून, तन, मन व धन यांच्या योगानें सर्वदा परोपकार करावा. आपल्या माता, पिता, सासु, श्वशुर यांची शुश्रूषा करावी, तसेंच आपले मित्र, शेजारी, संबंधी, राजा, विद्वान्, वैद्य व सत्पुरुष यांच्यावर प्रीति करावी. दुष्ट व अधर्मी लोकांचा द्वेष न करतां त्यांविषयीं उदास रहावें व त्यांची सुधारणा होईल असा यत्न करावा. शक्य असेल त्याप्रमाणें आपल्या मुलांला विद्वान् बनविण्यासाठींच आपल्या धनादि पदार्थांचा व्यय करून त्यांस विद्वान् व सुशिक्षित करावें. आपण धर्मयुक्त व्यवहार करून मोक्षाचें साधन करीत असावें. असें वागलें असतां परम आनंदाची प्राप्ति खात्रीनें होईल. तसेंच पुढें लिहिल्याप्रमाणें जे श्लोक असतील ते कोणींहि प्रमाण मानूं नयेः—

पतितोऽपि द्विजः श्रेष्ठो न च शूद्रो जितेन्द्रियः ॥
निर्दुग्धाचापि गौः पूज्या न च दुग्धवती खरी ॥
अश्वालम्भं गवालम्भं संन्यासं पलपैत्रिकम् ॥
देवराच्च सुतोत्पत्तिं कलौ पञ्च विवर्जयेत् ॥
नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ ॥
पञ्चस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते ॥

हे कपोलकल्पित पाराशरीचे श्लोक आहेत. दुष्टकर्म करणारा द्विज श्रेष्ठ व सत्कर्म करणारा शूद्र नीच मानणें यापेक्षां दुसरा जास्त अन्याय, पक्षपात व अधर्म कोणता असणार ? दुध देणारी व न देणारी अशा दोनहि प्रकारच्या गाईवर गोपालांचें प्रेम सारखेंच असतें काय ? ते दोघांचें पालन सारखेंच करतात काय ? कुंभार लोक गाढवें पाळीत नाहींत काय ? गाय व गाढवी यांमध्यें जसा भेद आहे त्याप्रमाणें द्विज, शूद्र यांमध्यें नसल्यामुळें हा दृष्टांतहि विषम आहे. कदाचित् द्विज व शूद्र जसे एका मनुष्य जातींत आहेत त्याचप्रमाणें गाय व गाढवी हि एकाच पशुजातींत आहेत असें मानल्यास एकांशामध्यें दृष्टान्त व दार्ष्टांत हे मिळतात, तथापि यांचा आशय अयोग्य व अधर्म वाढवणारा असल्यामुळें असले श्लोक विद्वानांनीं मानण्यास योग्य नाहींत.

(अश्वालम्भ) घोडा मारून त्याचा होम करणें, (गवालम्भ) गाय मारून त्याचा होम करणें हीं कर्में वेदविहित नाहींत, म्हणून त्याचा कलियुगापुरताच निषेध करणेंहि वेदविरुद्धच समजावें. जर कलियुगांमध्यें यांचा निषेध केला तर कृतत्रेतादि युगांमध्यें त्यांचा विधि होईल. अशीं दुष्ट कामें श्रेष्ठ युगामध्यें होणें सर्वथा असंभवनीय आहे. वेदादि शास्त्रां

मध्यें संन्यास धारण करण्याचा विधि आहे, म्हणून त्याचा निषेध करणें असमंजसपणाचें आहे. मांसाचा निषेध सर्व काळीं सारखाच आहे. देवरापासून पुत्रोत्पत्ति करणें हें वेदांमध्यें सांगितलें आहे, त्याचा निषेध करण्याचा या श्लोककर्त्यास मुळींच अधिकार नाहीं.

(नष्टे) पती देशदेशांतरीं गेला असतां घरीं स्त्रीनें नियोग करावा काय? जर अशा रीतीनें नियोग केला व पती घरीं आला तर ती स्त्री कोणाची समजावी? आपण विवाहित पतीची असें म्हणाल तर तें खरें, पण असें पराशरीमध्यें कोठेंहि म्हटलें नाहीं. या श्लोकांत लिहिलेले पांचच आपत्काल स्त्रीला येणें शक्य आहेत, आणखी नाहींत? लढाईमध्यें पती मरणें, रोगानें ग्रस्त होणें हे आणखी आपत्काल नाहींत काय? यांची गणना आहे कोठें? म्हणून असले श्लोक प्रमाण मानण्यास योग्य नाहींत.

(प्र०) तुम्ही पराशर मुनींचें वचनहि मानीत नाहीं काय? (उ०) कीणाचेंहि वचन जर तें वेदविरुद्ध असेल तर आम्ही मानीत नाहीं. हें तर पराशरांचें वचनहि नाहीं. पुष्कळ ढोंगी लोक " ब्रह्मोवाच, वसिष्ठ उवाच, राम उवाच, शिव उवाच, विष्णुरुवाच, देव्युवाच " यांप्रमाणें श्रेष्ठांचें नांव घालून ग्रंथरचना करतात, ती याकरतां कीं, ते आपले ग्रंथ सर्वमान्य होऊन संसारभर त्यांचा प्रसार व्हावा व त्यायोगानें आपली उपजीविका उत्तम प्रकारें चालावी. या स्वार्थमय क्षुद्र हेतूनें हे अनर्थकारक गाथाग्रंथ बनवितात; सर्व स्मृतींमध्यें मनुस्मृतीच-कांहीं प्रक्षिप्त श्लोक खेरीज करून वेदानुकूल आहे. अन्य स्मृती तशा नाहींत. याप्रमाणेंच अन्य भ्रमजाल वाढवणाऱ्या ग्रन्थांविषयीं जाणावें.

(प्र०) गृहस्थाश्रम सर्वांत श्रेष्ठ आहे कीं नाहीं? (उ०) आपापल्या कर्तव्यांच्या मानानें सर्व आश्रम श्रेष्ठच आहेत, परंतुः—

यथा नदीनदाः सर्वे सागरे यान्ति संस्थितिम् ॥
तथैवाश्रमिणः सर्वे गृहस्थे यान्ति संस्थितिम् ॥ म० ६।९०

यथा वायुं समाश्रित्य वर्तन्ते सर्वजन्तवः ॥
तथा गृहस्थमाश्रित्य वर्तन्ते सर्व आश्रमाः ॥ ७७ ॥

यस्मात्त्रयोप्याश्रमिणो दानेनान्नेन चान्वहम् ॥
गृहस्थेनैव धार्यन्ते तस्माज्ज्येष्ठाश्रमो गृही ॥ ७८ ॥

स संधार्यः प्रयत्नेन स्वर्गमक्षय्यमिच्छता ॥
सुखं चेहेच्छता नित्यं योऽधार्यो दुर्बलेन्द्रियैः ॥ ७९ ॥
मनु० अ० ३ ।

ज्याप्रमाणें समुद्र मिळेपर्यंत नदी व नद भ्रमण करीत असतात व समुद्र मिळाला असतां त्याच्या आश्रयानें स्थिर होतात, त्याचप्रमाणें गृहस्थाच्या आश्रयानें इतर आश्रम स्थिर होतात. गृहस्थाच्या सहाय्यावांचून कोणाचेहि व्यवहार नीट चालत नाहींत. ब्रह्मचारी, वानप्रस्थ व संन्यासी या तीनहि आश्रमांतील माणसांला गृहस्थच प्रतिदिवशीं अनेक पदार्थांचें व अन्नादिकांचें दान करून त्यांचें पोषण व धारण करतो, म्हणून गृहस्थाश्रम हाच सर्वांत श्रेष्ठ व धुरंधर आहे. म्हणून मोक्षाची व संसारसुखाची इच्छा करणारानें प्रयत्नानें गृहस्थाश्रमाचें अवलंबन करावें.

दुर्बलेंद्रिय, भीरु व निर्बल पुरुष या गृहस्थाश्रमाचें धारण करूं शकत नाहींत. ज्याला हा स्वीकारावयाचा असेल त्यानें याचें उत्तम प्रकारें धारण व पालन करावें. या सर्व संसारामध्यें जो कांहीं व्यवहार आहे तो सर्व गृहस्थाश्रमावर अवलंबून आहे, जर गृहस्थाश्रम नसता तर संतानोत्पत्ति न झाल्यामुळें ब्रह्मचर्य, वानप्रस्थ व संन्यास हे कसे साधले असते ? जो गृहस्थाश्रमाची निंदा करतो तोच निंदनीय समजावा व जो प्रशंसा करीत असेल तो प्रशंसनीय समजावा. जेव्हां स्त्री व पुरुष हीं दोघेंहि परस्परांवर प्रसन्न, विद्वान्, पुरुषार्थी व सर्व प्रकारच्या व्यवहारांला जाणणारीं असतील तेव्हांच गृहस्थाश्रम सुखदायक होतो. गृहस्थाश्रमामध्यें सुख व्हावें अशी ज्यांची इच्छा असेल त्यांनीं प्रथमतः ब्रह्मचर्य पालन करावें व नंतर स्वयंवर विवाह करून गृहस्थी व्हावें.

याप्रमाणें संक्षेपानें समावर्तन, विवाह व गृहस्थाश्रम यांविषयीं विवरण झालें; यापुढें वानप्रस्थ व संन्यास या दोन आश्रमांविषयीं लिहावयाचें.

इति सुभाषाविभूषितः समावर्तन विवाह गृहाश्रम विषये
चतुर्थः समुल्लासः संपूर्णः ॥ ४ ॥

अथ पंचमः समुल्लासः ।

अथ वानप्रस्थसंन्यासविधिं वक्ष्यामः ॥

ब्रह्मचर्याश्रमं समाप्य गृही भवेत् गृही भूत्वा वनी
भवेत् वनी भूत्वा प्रव्रजेत् ॥ शत० कां० १४ ॥

मनुष्यांनीं ब्रह्मचर्याश्रम समाप्त केल्यानंतर गृहस्थाश्रम स्वीकारावा, गृहस्थाश्रम संपवून वानप्रस्थाश्रम स्वीकारावा व नंतर संन्यास घ्यावा हें त्यांस उचित आहे. तसेंच—

एवं गृहाश्रमे स्थित्वा विधिवत्स्नातको द्विजः ॥
वने वसेत्तु नियतो यथावद्विजितेन्द्रियः ॥ १ ॥
गृहस्थस्तु यदा पश्येद् वलीपलितमात्मनः ॥
अपत्यस्यैव चापत्यं तदारण्यं समाश्रयेत् ॥ २ ॥
संत्यज्य ग्राम्यमाहारं सर्वं चैव परिच्छदम् ॥
पुत्रेषु भार्यां निक्षिप्य वनं गच्छेत्सहैव वा ॥ ३ ॥
अग्निहोत्रं समादाय गृह्यं चाग्निपरिच्छदम् ॥
ग्रामादरण्यं निःसृत्य निवसेन्नियतेन्द्रियः ॥ ४ ॥
मुन्यन्नैर्विविधैर्मेध्यैः शाकमूलफलेन वा ॥
एतानेव महायज्ञान् निर्वपेद्विधिपूर्वकम् ॥ ५ ॥ मनु० ६ ॥

ब्रह्मचर्य समाप्त केल्यानंतर व्रतस्नात होऊन ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या द्विजांनीं गृहस्थाश्रमाचा स्वीकार करावा. या गृहस्थाश्रमामध्यें राहून निश्चितात्मा व जितेन्द्रिय होऊन ब्रह्मचर्याश्रम समाप्त केल्यावर वानप्रस्थाश्रम स्वीकारावा. ॥ १ ॥ जेव्हां आपल्या मुलाला मुलगा होईल व आपले केंश पांढरे होऊन अंगावरील चामडी ढिली झाल्यामुळें सुरुकुत्या पडतील तेव्हां गृहस्थानें वनामध्यें प्रवेश करावा. ॥ २ ॥ शहरांतील सर्व आहार व वस्त्रेंप्रावरणें सोडून देऊन व उत्तम उत्तम चैनीच्या पदार्थांचा त्याग करून, आपल्या पत्नीला आपल्या मुलांकडे ठेवून किंवा बरोबर घेऊन वनामध्यें जाऊन रहावें. ॥ ३ ॥ आपल्या गांवांतून निघतेवेळीं सांगोपांग अग्निहोत्र बरोबर घेऊन, जितेन्द्रिय बनून अरण्यांत जाऊन राहावें. ॥ ४ ॥ ऋषि, मुनि भक्षण करतात

त्या नानाप्रकारच्या पवित्र अन्नाच्या योगानें व सुंदर शाक, मूळ, फल, फूल व कंद वगैरे प्रकारच्या अन्नानें पंचमहायज्ञ करावे. याच अन्नानें अतिथींची सेवा करावी व स्वतःचा निर्वाहहि त्यानेंच करावा. ॥ ५ ॥

स्वाध्याये नित्ययुक्तः स्यादान्तो मैत्रः समाहितः ॥
दाता नित्यमनादाता सर्वभूतानुकम्पकः ॥ ८ ॥
अप्रयत्नः सुखार्थेषु ब्रह्मचारी धराशयः ॥
शरीरेष्वममश्चैव वृक्षमूलनिकेतनः ॥ २६ ॥ मनु० ६ ॥

स्वाध्यायामध्यें–शिकण्याशिकवण्यामध्यें–सदोदित तत्पर, आत्मसंयमन करणारा, सर्वांचा मित्र, इंद्रियांचें दमन करणारा, विद्येचें दान करणारा, सर्वांवर दया करणारा व कोणाकडून कांहींहि न घेणारा, अशा प्रकारें वानप्रस्थाश्रमी मनुष्यानें वागावें. ॥ ८ ॥ शरीरसुखासाठीं फार आयास करूं नयेत, ब्रह्मचारी रहावें, स्त्री आपणाजवळ असली तरीहि विषयचेष्टा करूं नयेत. भूमीवर निजावें. आपल्या शरीरावर व त्याचप्रमाणें शरीराच्या आधारानें असणाऱ्या इतर पदार्थांवर ममत्व ठेवूं नये. वृक्षाच्या खालीं वास करावा. ॥ २६ ॥ तसेंच—

तपःश्रद्धे ये ह्युपवसन्त्यरण्ये शान्ता विद्वांसो भैक्ष्यचर्यं
चरन्तः ॥ सूर्यद्वारेण ते विरजाः प्रयान्ति यत्रामृतः स
पुरुषो ह्यव्ययात्मा ॥ मुण्ड० ॥ २।११ ॥

जे शान्त व विद्वान् लोक वनामध्यें राहून, तप व धर्मानुष्ठान करून व सत्यावर श्रद्धा ठेवून, भिक्षावृत्तीचा अवलंब करून वनामध्यें राहतात, ते त्या ठिकाणीं निर्मल होऊन प्राणाच्या द्वारानें अविनाशी, हानिलाभरहित, पूर्णपुरुष अशा परमात्म्याला प्राप्त करून घेऊन आनन्दित होतात. तसेंच—

अभ्यादधामि समिधमग्ने व्रतपते त्वयि ॥
व्रतञ्च श्रद्धां चोपैमीन्धे त्वा दीक्षितो अहम् ॥

यजु० २०।२४॥

वानप्रस्थाश्रमांतील मनुष्यानें असें म्हणावें कीं "हे (व्रतपते अग्ने) अग्निहोत्राला साधनीभूत असणाऱ्या अग्ने! (त्वयि) तुझ्यामध्यें अर्थात् अग्नीमध्यें (समिधम्) हवनीय पदार्थांचा (अभ्यादधामि) होम करून, (अहम्) मी (दीक्षितः) दीक्षित होऊन (व्रतम्) सत्याचरणरूपी व्रत व (श्रद्धाम्) श्रद्धा यांना (उपैमि) प्राप्त

होईन" अर्थात् हवन करून मी दीक्षित होईन व सत्याचरण आणि श्रद्धा यांना प्राप्त करून घेईन. अशी इच्छा वानप्रस्थी मनुष्यानें धरावी. तसेंच नानाप्रकारची तपश्चर्या करून, सत्संग धरून, योगाभ्यास करून, सुविचार मनांत बाळगून, ज्ञान व पवित्रता प्राप्त करून घ्यावी. नंतर जेव्हां संन्यास घेण्याची इच्छा होईल तेव्हां स्त्रीला पुत्रांकडे पाठवून देऊन, आपण संन्यास घ्यावा. याप्रमाणें हें संक्षेपानें वानप्रस्थाश्रमाचें व्याख्यान झालें.

अथ संन्यासविधिः।

वनेषु च निहृत्यैवं तृतीयं भागमायुषः ॥
चतुर्थमायुषो भागं त्यक्त्वा संगान् परिव्रजेत् ॥
मनु० ६।३३॥

याप्रमाणें वनामध्यें आयुष्याचा तिसरा भाग—पन्नासाव्या वर्षापासून ७५ वर्षांचें वय होईपर्यंत—वानप्रस्थाश्रमाप्रमाणें घालवून चवथ्या आयुष्याच्या भागामध्यें सर्व-संग-परित्याग करून परिव्राट् अर्थात् संन्यासी व्हावें. (प्र०) गृहस्थ व वानप्रस्थ या आश्रमांचा स्वीकार न करतां, एकदम ब्रह्मचर्यातूनच संन्यास घेतला तर पाप लागतें किंवा कसें? (उ०) केव्हां लागतें व केव्हां नाहीं. (प्र०) हें कसें? (उ०) जे ब्रह्मचर्यातूनच एकदम विरक्त होतात ते जर कांहीं कारणानें विषयामध्यें फसले तर ते महापापी होतात व जर ते न फसले तर महान्पुण्यात्मे व सत्पुरुष समजले जातात.

यदहरेव विरजेत्तदहरेव प्रव्रजेत्, वनाद्वा गृहाद्वा ब्रह्मचर्यादेव प्रव्रजेत् ॥

हें ब्राह्मणग्रंथांतील वचन आहे. "ज्यादिवशीं वैराग्य प्राप्त होईल त्याच दिवशीं गृहस्थाश्रमांतून किंवा वानप्रस्थाश्रमांतून संन्यास घ्यावा." या वचनांत प्रथमतः वनांतूनच संन्यास घ्यावा असें सांगून नंतर पाहिजे त्या आश्रमांतून घ्यावा असा विकल्प सांगितला आहे. (१) वानप्रस्थानंतर संन्यास घ्यावा, (२) गृहस्थाश्रमांतूनही संन्यास घ्यावा; (३) तसेंच जो पूर्ण विद्वान्, जितेन्द्रिय व विषयोपभोगाची इच्छा न धरणारा असेल त्यानें, परोपकाराच्या इच्छेनें युक्त होऊन, ब्रह्मचर्याश्रमांतूनहि संन्यासाचें ग्रहण करावें. याचप्रमाणें वेदामध्येंहि "**यतयः, ब्राह्मणस्य विजानतः**" इत्यादि पदांनीं संन्यासाचें ग्रहण केलेलें आहे. पण—

नाविरतो दुश्चरितान्नाशान्तो नासमाहितः ॥
नाशान्तमानसो वापि प्रज्ञानेनैनमाप्नुयात् ॥ कठ. व० २।२३॥

ज्याणें दुराचरण सोडलें नाहीं, ज्याला शांति मिळाली नाहीं, ज्याणें योग साधला

नाहीं, ज्याचें मन शान्त नाहीं त्याणें संन्यास घेतला तरीहि, प्रज्ञानाच्या योगानें त्याला परमात्मा प्राप्त होत नाहीं. म्हणून—

यच्छेद्वाङ्मनसी प्राज्ञस्तद्यच्छेद् ज्ञान आत्मनि ॥
ज्ञानमात्मनि महति नियच्छेत्तद्यच्छेच्छान्त आत्मनि ॥

कठ. व० ३।१३ ॥

बुद्धिमान् संन्याशानें वाणि व मन यांला अधर्मापासून परावृत्त करून, त्यांला ज्ञान व आत्मा यांच्या ठिकाणीं लावावें. व त्या ज्ञान व आत्मा यांना परमात्म्यामध्यें एकाग्र करावें. या योगानें प्राप्त होणारें विज्ञान आपल्या शान्तस्वरूप आत्म्यामध्यें स्थिर करावें. तसेंच—

परीक्ष्य लोकान् कर्मचितान् ब्राह्मणो निर्वेदमायान्
नास्त्यकृतः कृतेन ॥ तद्विज्ञानार्थं स गुरुमेवाभिगच्छेत्
समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् ॥ मुंड० २।१२ ॥

सर्व लौकिक भोगकर्मांनें संचित झालेले आहेत असें पाहून (ब्राह्मणः) संन्याशाला वैराग्य प्राप्त होतें. कारण (अकृत)–न केलेला असा–परमात्मा (कृतेन) केवळ कर्मांच्या योगानें प्राप्त होत नाहीं. म्हणून तो गुरूला अर्पण करण्यासाठीं कांहीं पदार्थ हातांत घेऊन, वेद व परमेश्वर यांना जाणणाऱ्या गुरूजवळ, परमेश्वरसंबंधीं विज्ञान प्राप्त करून घेण्यासाठीं जातो व सर्व संदेहांची निवृत्ति करून घेतो. विज्ञान प्राप्त करून घेण्यासाठीं पुढील प्रकारच्या मनुष्यांची संगति सोडून द्यावीः–

अविद्यायामन्तरे वर्तनानाः स्वयं धीराः पण्डितं मन्य-
मानाः॥ जङ्घन्यमानाः परियन्ति मूढा अन्धेनैव नीयमाना
यथान्धाः ॥ ८ ॥ अविद्यायां बहूधा वर्तमाना वयं
कृतार्था इत्यभिमन्यन्ति बालाः ॥ यत्कर्मिणो न प्रवेदयन्ति
रागात् तेनातुराः क्षीणलोकाश्च्यवन्ते ॥ ९ ॥ मुंड० खं० २॥

जे अविद्येच्या आंत राहूनहि आपण धीर व पंडित आहोंत असें समजतात, ते मूढ नीच गतीला प्राप्त होतात. आंधळ्यांच्या आश्रयानें जाणारे आंधळे ज्याप्रमाणें खड्ड्यांत पडतात त्याप्रमाणें त्यांची स्थिति होते. जे मूढ बहुधा अविद्येमध्यें असतांहि आपण कृतार्थ आहोंत असें अभिमानानें म्हणतात ते, ज्याला केवळ कर्मकांडी लोक रागद्वेषानें मोहित होऊन समजूं किंवा समजावूं शकत नाहींत, त्यापासून च्युत होऊन व वारंवार दुःखित होऊन जन्ममरणरूप दुःखामध्यें पडतात. म्हणून—

वेदान्तविज्ञानसुनिश्चितार्थाः संन्यासयोगाद्यतयः
शुद्धसत्वाः ॥ ते ब्रह्मलोकेषु परान्तकाले परामृताः
परिमुच्यन्ति सर्वे ॥ मुंड० २।६॥

जे लोक (वेदान्त०) परमेश्वरप्रतिपादक वेदमंत्रांचा अर्थ पूर्णपणें जाणतात व निश्चयानें सदाचाराप्रमाणें वागतात व संन्यासयोगानें ज्यांचें अंतःकरण शुद्ध झालें आहे, तेच खरे संन्यासी होत, ते परमेश्वरामध्यें असलेल्या मुक्तीच्या आनंदाला प्राप्त करून घेऊन, जेव्हां मुक्तिसुखाची अवधि पूर्ण होते, तेव्हां तेथून सुटून संसारामध्यें पुनः येतात, मुक्ति प्राप्त झाल्याशिवाय दुःखाचा नाश होत नाहीं. पहा—

न वै सशरीरस्य सतः प्रियाप्रिययोरपहतिरस्त्य
शरीरं वावसन्तं न प्रियाप्रिये स्पृशतः॥ छान्दो० ८।१२

जो देहधारी जीव असतो तो सुखदुःखांच्या प्राप्तिपासून निराळा राहूं शकत नाहीं, पण मुक्तिमध्यें जेव्हां जीवात्मा शरीररहित होऊन व शुद्ध होऊन परमेश्वराच्या सन्निध जाऊन राहतो तेव्हांच त्याला सांसारिक सुखदुःखांची प्राप्ति होत नाहीं, म्हणून–

पुत्रैषणायाश्च वित्तैषणायाश्च लोकैषणायाश्च
व्युत्थायाथ भिक्षाचर्यं चरन्ति॥ शत० ब्रा० १४।५।२।१

पुत्र होण्याची इच्छा, धनदौलत मिळण्याची इच्छा, लोकांकडून मान मिळण्याची इच्छा या सोडून, संन्यासी लोक भिक्षावृत्तीचा अवलंब करून रात्रंदिवस मोक्षाच्या साधनांमध्यें तत्पर असतात. तसेंच—

प्राजापत्यां निरूप्येष्टिं तस्यां सर्ववेदसं हुत्वा
ब्राह्मणः प्रव्रजेत् ॥ १ ॥ यजुर्वेद ब्राह्मणे. ॥

(प्राजापत्याम्) प्रजापति परमेश्वराची प्राप्ति व्हावी म्हणून (इष्टिम्) यज्ञ करून, त्या यज्ञामध्यें यज्ञोपवीत, शिखा वगैरे चिन्हांचा त्याग करून, आहवनीयादि पांचहि अग्नींचें प्राण, अपान, व्यान, उदान व समान या पंचप्राणांच्या ठिकाणीं आरोपण करून (ब्राह्मणः) ब्रह्म जाणणाऱ्यानें गृहाश्रम सोडून संन्याशी व्हावें. तसेंच—

प्राजापत्यां निरूप्येष्टिं सर्ववेदसदक्षिणाम् ॥
आत्मन्यग्नीन् समारोप्य ब्राह्मणः प्रव्रजेद् गृहात् ॥३८॥
यो दत्वा सर्वभूतेभ्यः प्रव्रजत्यभयं गृहात् ॥
तस्य तेजोमया लोका भवन्ति ब्रह्मवादिनः ॥ ३९ ॥

परमेश्वरप्राप्तीसाठीं यज्ञ करून, त्यामध्यें सर्वस्वाचें दान करून आत्म्यामध्यें पांचहि अग्नींला स्थापित करून, गृह सोडून संन्यास घ्यावा. जो सर्व प्राणिमात्रांला अभय

देऊन, घरांतून निघून संन्याशी होतो, त्या (ब्रह्मवादी) परमेश्वरप्रकाशित, वेदोक्त धर्मादि सर्व विद्यांचा उपदेश करणाऱ्या संन्याशाला, सर्व प्रकाशमय अर्थात् मोक्षानंदमय लोक प्राप्त होतात. (प्र०) संन्याशांचा धर्म काय आहे ? (उ०) पक्षपातरहित होऊन न्यायाचरण करणें, सत्याचें ग्रहण करून असत्याचा त्याग करणें, वेदोक्त ईश्वराज्ञेचें पालन करणें, परोपकार करणें, सत्यभाषण करणें वगैरे सर्व आश्रमीयांचे समानच धर्म आहेत, पण त्यांतल्या त्यांत संन्याशानें हे पुढील धर्म पाळिले पाहिजेत.

विशेष धर्म. (मनु. अ. ६)

दृष्टिपूतं न्यसेत्पादं वस्त्रपूतं जलं पिबेत् ॥
सत्यपूतां वदेद्वाचं मनःपूतं समाचरेत् ॥ ४६ ॥

जेव्हां संन्यासी मार्गानें चालत असेल तेव्हां त्याणें इकडे तिकडे न पाहतां भूमीवर दृष्टि ठेवून चालावें, वस्त्रानें गाळलेलेंच पाणी प्यावें, निरंतर सत्य बोलावें, सर्वदा मनानें विचार करून सत्याचें ग्रहण करावें व असत्याचा त्याग करावा.

क्रुद्ध्यन्तं न प्रतिक्रुद्ध्येदाक्रुष्टः कुशलं वदेत् ॥
सप्तद्वारावकीर्णां च न वाचमनृतां वदेत् ॥ ४८ ॥

जेव्हां, उपदेश करण्याच्या वेळीं किंवा वादविवाद करावयाच्या वेळीं, कोणी मनुष्य संन्याशावर रागावेल किंवा त्याची निंदा करील, तेव्हां संन्यस्तानें उलट रागावूं नये; पण सदैव त्याच्या हिताचाच उपदेश करावा, (१ मुख + २ नासिकेचीं छिद्रें + २ नेत्र + २ कान) या सात द्वारांमध्यें पसरलेल्या वाणीला कोणत्याहि कारणानें असत्यानें विघडवूं नये.

अध्यात्मरतिरासीनो निरपेक्षो निरामिषः ॥
आत्मनैव सहाय्येन सुखार्थी विचरेदिह ॥ ४९ ॥

आपला आत्मा परमात्मा यांत स्थिर होऊन, कशाचीहि अपेक्षा न करतां, मद्यमांसाचें सेवन न करतां, आत्म्याच्याच सहाय्यानें सुखार्थी होऊन, या संसारामध्यें धर्म व विद्या यांची वृद्धि करण्यासाठीं उपदेश करीत करीत सदासर्वदा फिरावें.

क्लृप्तकेशनखश्मश्रुः पात्री दण्डी कुसुम्भवान् ॥
विचरेन्नियतो नित्यं सर्वभूतान्यपीडयन् ॥ ५२ ॥

केंस, नखें, दाढी, मिशा काढून, सुंदर पात्र व दण्ड घेऊन, भगवीं वस्त्रें धारण करून, संयतात्मा होऊन, सर्व भूतांला पीडा न देतां सर्वत्र संचार करावा.

इन्द्रियाणां निरोधेन रागद्वेषक्षयेण च ॥
अहिंसया च भूतानाममृतत्वाय कल्पते ॥ ६० ॥

अधर्माचरणापासून इंद्रियांचा निरोध करून, प्रीति व द्वेष यांचा त्याग करून, सर्व प्राण्यांशीं निर्वैर वर्तन करून, मोक्ष प्राप्त करून घेण्याचें सामर्थ्य वाढवावें.

दूषितोऽपि चरेद्धर्मं यत्र तत्राश्रमे रतः ॥
समः सर्वेषु भूतेषु न लिङ्गं धर्म-कारणम् ॥ ६६ ॥

संसारांतील कोणी मनुष्यानें त्याला दूषण दिलें किंवा चांगलें म्हटलें, तथापि त्याची पर्वा न करतां, त्या त्या आश्रमामध्यें राहणाऱ्या पुरुषानें किंवा संन्याशानें, सर्व प्राण्यांशीं पक्षपातरहित बुद्धीनें वागून, स्वतः धर्मात्मा बनून दुसऱ्यांला धर्मात्मे करण्याचा यत्न करावा. हें आपल्या मनांत निश्चयपूर्वक बाळगावें कीं, दंड, कमंडलु, काषायवस्त्रादिक बाह्य चिन्हें हीं धर्माचीं कारणें नव्हेत. संन्याशाचें मुख्य कर्तव्य सर्व मनुष्यांना सत्याचा उपदेश करणें, विद्यादान करणें व त्यांच्या उन्नतीचे त्यांना उपाय सुचविणें हें आहे.

फलं कतकवृक्षस्य यद्यप्यम्बुप्रसादकम् ॥
न नामग्रहणादेव तस्य वारि प्रसीदति ॥ ६७ ॥

यद्यपि निर्मळी वृक्षाचें फळ पूड करून पाण्यांत टाकलें असतां पाणी शुद्ध करूं शकतें, तथापि त्या फळाचें नुसतें नामस्मरण केल्यानें पाणी शुद्ध होणार नाहीं. तें जेव्हां पूड करून पाण्यांत घालावें तेव्हांच पाणी शुद्ध होईल.

प्राणायामा ब्राह्मणस्य त्रयोऽपि विधिवत्कृताः ॥
व्याहृतिप्रणवैर्युक्ता विज्ञेयं परमं तपः ॥ ७० ॥

ब्रह्मज्ञानी संन्याशानें ओंकारसहित सप्तव्याहृतींनीं युक्त विधिपूर्वक प्राणायाम जितकी शक्ति असेल त्याप्रमाणें करावेत, पण कमींत कमी तीन तरी करावे, हें संन्याशाचें परम तप आहे.

दह्यन्ते ध्मायमानानां धातूनां हि यथा मलाः ॥
तथेन्द्रियाणां दह्यन्ते दोषाः प्राणस्य निग्रहात् ॥ ७१ ॥

ज्याप्रमाणें धातूंचे मल अग्नीमध्यें तापवल्यानें व गाळल्यानें नाहींसे होतात, त्याचप्रमाणें प्राणाच्या निग्रहानें मन आदिक सर्व इंद्रियांचे दोष भस्म होतात.

प्राणायामैर्दहेद्दोषान् धारणाभिश्च किल्बिषम् ॥
प्रत्याहारेण संसर्गान् ध्यानेनानीश्वरान् गुणान् ॥ ७२ ॥

संन्यासी लोकांनीं प्राणायामांच्या योगानें आत्मा, अंतःकरण व इंद्रियें यांचे दोष, धारणेच्या योगानें पातक, प्रत्याहाराच्या योगानें संसर्गदोष, ध्यानाच्या योगानें हर्षशोक व अविद्यादि अनीश्वरगुण यांचा नाश करावा.

उच्चावचेषु भूतेषु दुर्ज्ञेयामकृतात्मभिः ॥
ध्यानयोगेन संपश्येद् गतिमस्यान्तरात्मनः ॥ ७३ ॥

अयोगी व अविद्वान् यांस समजण्यास अशक्य व सर्व लहानथोर पदार्थांत जो व्यापला आहे, अशा परमात्म्याची व्याप्ति ध्यानयोगाच्या योगानें जाणून, आपल्या आत्म्याची व परमेश्वराची गति जाणावी.

अहिंसयेन्द्रियासङ्गैर्वैदिकैश्चैव कर्मभिः ॥
तपसश्चरणैश्चोग्रैः साधयन्तीह तत्पदम् ॥ ७५ ॥

सर्व भूतांशीं निर्वैर होऊन, इंद्रियांच्या विषयांचा त्याग करून, वेदोक्त कर्में व अत्युग्र तपश्चर्या करून या संसारामध्येंच राहणारा संन्यासी त्या मोक्षपदाला प्राप्त करून घेतो.

यदा भावेन भवति सर्वभावेषु निस्पृहः ॥
तदा सुखमवाप्नोति प्रेत्यचेह च शाश्वतम् ॥ ८० ॥

जेव्हां संन्याशी सर्व भावांच्या ठिकाणीं–पदार्थांच्या ठिकाणीं–निस्पृह, कांक्षारहित होतो व आंतील व बाहेरील सर्व व्यवहारांमध्यें पवित्र होतो, तेव्हांच त्याला या देहामध्यें व मरणानंतर शाश्वत सुख प्राप्त होतें.

चतुर्भिरपि चैवैतैर्नित्यमाश्रमिभिर्द्विजैः ॥
दशलक्षणको धर्मः सेवितव्यः प्रयत्नतः ॥ ९१ ॥

यासाठीं ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यासी या चारहि आश्रमांत असणाऱ्या लोकांनीं दशलक्षणांनीं युक्त असणाऱ्या धर्माचें पालन करावें.

धर्माचीं दहा लक्षणें.

धृतिः क्षमा दमोऽस्तेयं शौचमिन्द्रियनिग्रहः ॥
धीर्विद्या सत्यमक्रोधो दशकं धर्मलक्षणम् ॥ ९२ ॥

(१) **धृतिः**—सदैव धैर्य धरणें; (२) **क्षमा**–निंदास्तुति, मानापमान, हानिलाभ, इत्यादि द्वन्द्वें सहन करणें; (३) **दमः**–मनाला अधर्मापासून परावृत्त करून त्याला धर्मांत प्रवृत्त करणें अधर्माचरणाची इच्छाहि न करणें; (४) **अस्तेयं**–चोरी न करणें; मालकाच्या आज्ञेशिवाय, छल, कपट, विश्वासघातादिक कृत्यें करून, वेदविरुद्ध उपदेश करून, व अशाच अन्य अनन्वित कृत्यांच्या योगानें दुसऱ्याच्या पदार्थांचा अपहार करणें ही चोरी होय. चोरी न करणें हेंच अस्तेय होय. (५) **शौचं**—रागद्वेष व पक्षपात सोडून आंतरिक शुद्धि करणें व जल, मृत्तिका,

मार्जन वगैरे करून बाह्य शुद्धि करणें; (६) **इंद्रिय निग्रहः**—इंद्रियांचा अधर्माचरणाच्या बाजूनें निरोध करून त्यांना धर्ममार्गानें जाऊं देणें; (७) **धीः**—मादक द्रव्यें, बुद्धिनाशक अन्यपदार्थ, दुष्टांची संगति, आलस्य, प्रमादादि दोष यांचा त्याग करून, श्रेष्ठ पदार्थांचें सेवन व सज्जनांची संगति करून योगाभ्यासानें बुद्धि वाढवणें. (८) **विद्या**—पृथिवीपासून परमेश्वरापर्यंत असणाऱ्या सर्व पदार्थांचें यथायोग्य ज्ञान करून घेणें, त्यांच्यापासून यथायोग्य उपकार करून घेणें, ज्याप्रमाणें आत्म्यामध्यें सत्य असेल त्याप्रमाणेंच मनामध्यें विचार करणें, जें सत्य मनांत असेल तसेंच वाणीनें बोलणें, जें वाणीमध्यें सत्य असेल तसेंच आचरण करणें, ही विद्या समजावी. याहून जी विपरीत ती अविद्या होय. (९) **सत्यं**—जो पदार्थ जसा असेल त्याला तसाच समजणें, तसेंच बोलणें व त्याचप्रमाणें आचरण करणें. (१०) **अक्रोधः**–क्रोधादि दोषांला टाकून शांति वगैरे गुणांचें ग्रहण करणें; हीं धर्माचीं दहा लक्षणें आहेत. या धर्माचें चार आश्रमांतील पुरुषांनीं अवलंबन करावें व संन्याशानें असें स्वतः वागून दुसऱ्यांस हा धर्म समजावून द्यावा हें त्याचें कर्तव्य आहे.

संन्यासधर्म.

अनेन विधिना सर्वांस्त्यक्त्वा संगान् शनैः शनैः ॥
सर्वद्वन्द्वविनिर्मुक्तो ब्रह्मण्येवावतिष्ठते ॥ ८१ ॥ मनु० अ० ६.

याप्रमाणें हळू हळू सर्व संसर्गदोषांला सोडून, हर्षशोकादि द्वंद्वांतून सुटून संन्याशी ब्रह्मामध्यें स्थिर होतो.

संन्याशांचें मुख्य कर्तव्य हें आहे कीं, त्यांनीं तीनहि पूर्व आश्रमांतील लोकांना सर्व सत्य व्यवहारांचा निश्चयात्मक उपदेश करावा, त्यांना अधार्मिक व्यवहारांपासून सोडवून, त्यांच्या सर्व संशयांचें छेदन करून, त्यांना धर्मयुक्त व्यवहारांमध्यें प्रवृत्त करावें.

(**प्र०**) संन्यासग्रहण करणें हा ब्राह्मणाचा धर्म आहे कीं, क्षत्रियादिकांचाहि आहे ? (**उ०**) जो सर्व वर्णांमध्यें पूर्ण विद्वान्, पूर्ण धार्मिक व परोपकारप्रिय असतो त्याला ब्राह्मण असें म्हणतात, अशालाच संन्यास घेण्याचा अधिकार आहे. पूर्ण विद्या, परमेश्वरावर व धर्मावर निष्ठा, वैराग्य व परोपकारबुद्धि या गुणांनीं युक्त नसणारानें संन्यास घेतला तरी त्यापासून संसारावर विशेष उपकार होत नाहीं. म्हणून (पूर्वोक्त गुणयुक्त) ब्राह्मणालाच संन्यासाचा अधिकार आहे असें सर्व समजतात. ब्राह्मणेतरांला अधिकार नाहीं. पहा—

एषो वोऽभिहितो धर्मो ब्राह्मणस्य चतुर्विधः ॥
पुण्योऽक्षयफलः प्रेत्य राजधर्मान्निबोधत ॥ मनु० ६।९७॥

मनु म्हणतो कीं, " हे ऋषिलोक हो ! हा चार प्रकारचा अर्थात् ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास हे चार आश्रम स्वीकारणें हा ब्राह्मणाचा धर्म आहे. त्यांत

संन्यासाश्रम हा या ठिकाणीं पुण्यस्वरूप होऊन व शरीर सुटल्यानंतर मोक्षरूप होऊन अक्षय्य आनंद प्राप्त करून देतो. यापुढें राजांचा धर्म ऐका." यावरून हें ठरतें कीं, संन्यास ग्रहण करण्याचा मुख्य अधिकार ब्राह्मणांला आहे व ब्रह्मचर्यादि इतर तीनहि आश्रमांचा अधिकार क्षत्रियादिकांला आहे. (प्र०) संन्यास घेण्याची आवश्यकता काय आहे? (उ०) ज्याप्रमाणें शरीरामध्यें शिराची आवश्यकता आहे त्याचप्रमाणें आश्रमांमध्यें संन्यासाची आवश्यकता आहे; कारण या आश्रमांवांचून विद्या व धर्म यांची वाढ व उन्नति होऊं शकत नाहीं. धर्मोन्नति व धर्मवृद्धि करण्यास इतर आश्रमांतील लोकांना वेळ नसतो; कारण ते विद्याग्रहण, गृहकृत्यें व तपश्चर्यादि स्वकीय आश्रमांतील कृत्यें करण्यास लागलेले असतात. संन्यासी जसा पूर्णपणें निःपक्षपाती होऊं शकेल तसा इतर आश्रमस्थ पुरुष होऊं शकणार नाहीं. संन्याशी जसा सर्वतोमुक्त होऊन सर्व जगतावर उपकार करूं शकतो तसा इतर आश्रमांतील मनुष्य करूं शकत नाहीं; कारण संन्याशाला, सत्यविद्यांच्या योगानें उत्पन्न होणाऱ्या पदार्थांसंबंधीं विज्ञानाची उन्नति करण्यास, जसा वेळ मिळतो तसा इतर आश्रमीयांला, आपआपलीं कर्तव्यें करावयाचीं असल्यामुळें, मिळत नाहीं. (प्र०) संन्यास घेणें हें ईश्वरी नियमांच्या विरुद्ध आहे, कारण मनुष्यांची वाढ करणें हें ईश्वराला इष्ट आहे. जर सर्व लोक संन्यासी बनले तर सर्वांचें मूल–छेदन होऊन प्रजोत्पत्ति हा परमेश्वराचा मुख्य उद्देशहि साधणार नाहीं. तेव्हां संन्यास हा श्रेष्ठ आश्रम कसा? (उ०) आपला कोटिक्रम ठीक आहे. पण पहा, विवाह करूनही पुष्कळांला संतानोत्पत्ति होत नाहीं, कित्येकांना होऊन शीघ्र नाहींशी होते; काय यांनांहि तुम्ही परमेश्वराच्या विरुद्ध वागणारे म्हणतां? "यत्ने कृते यदि न सिद्ध्यति कोऽत्र दोषः।" यत्न केला असतां फलप्राप्ति झाली नाहीं तर त्यांत कर्त्याचा काय बरें दोष? असें तुम्ही म्हणाल, तर त्यावर आम्ही असें तुम्हांस विचारतों कीं, कुटुंबामध्यें पुष्कळ मुलें उत्पन्न होऊन तीं एकमेकाशीं विरुद्ध आचरण करून भांडून भांडून मरतात व त्यांचा आणि आपला नाश करून घेतात, हें चांगलें काय? जेव्हां कोणी एखादा संन्याशी वेदोक्त कर्माचा उपदेश करून सर्वांला धर्मामृत पाजतो तेव्हांच त्या परस्परांत प्रीति उत्पन्न होऊन लाखों मनुष्यांचें कलहापासून रक्षण होतें. सहस्रों गृहस्थांमध्यें आनंद वाढवून त्यांची तो उन्नति करील. हें काम संन्याशाशिवाय कोण करणार? सर्व मनुष्यें संन्यास घेतील ही भीति बाळगण्याचें कारण नाहीं, कारण विषयांवरील आसक्ति सर्वांची नाश पावणें शक्य नाहीं. जे लोक संन्याशाच्या उपदेशानें धार्मिक होतात ते त्याचे धर्मपुत्र आहेत असें समजावें. (प्र०) हल्लींचे पुष्कळ संन्याशी तर असें समजतात कीं, आपणाला कांहीं कर्तव्य नाहीं, जें काय यदृच्छेनें मिळेल त्यांत आनंदानें आम्ही राहूं, उगीच अविद्येमध्यें बडबडणाऱ्या लोकांशीं डोकेफोड कोण करतो? आम्ही ब्रह्मस्वरूप आहोंत, आम्हांला काय

करावयाचें आहे? तूं ब्रह्म आहेस हें दुसऱ्याला सांगावें, कांहीं केलें तरी त्याचें पापपुण्य तुला लागत नाहीं अशी त्याची खात्री करावी, शीतोष्ण शरीराला भासतात, क्षुधातृषा प्राणांला भासतात, सुखदुःख हा मनाचा धर्म आहे, जग मिथ्या असून जगांतील व्यवहारहि सर्व कल्पित व असत्य आहेत, यासाठीं या व्यवहारांच्या पाठीमागें लागणें हें विद्वानांला योग्य नाहीं. जें कांहीं आपणाकडून पापपुण्य घडतें तें सर्व देह व इंद्रियें होंच करतात. आत्म्याचा त्याच्याशीं कांहीं संबंध नाहीं, अशा प्रकारचा हे संन्यासी उपदेश करतात; असें असतां तुम्ही सांगत अहां हा कांहीं निराळाच धर्म दिसतो, तेव्हां आम्ही खरें तरी काय समजावें? (उ०) काय त्यांना उत्तम उत्तम कर्तव्यें करावयाचीं नसतात? मनूनें तर "**वैदिकैश्चैव कर्मभिः।**" धर्मयुक्त वैदिक सत्कर्में संन्याशानें अवश्य केलीं पाहिजेत असें म्हटलें आहे. भोजनाच्छादनादिक कृत्यें ते सोडूं शकतात? जर हीं कर्में सुटत नाहींत तर मग उत्तम कर्में ते न करतील तर पतित व पापभोगी ते होणार नाहींत काय? ज्याअर्थीं ते गृहस्थांकडून अन्नवस्त्र घेतात त्या अर्थी गृहस्थांवर धर्मोपदेशद्वारें प्रत्युपकार करणें हें त्यांचें कर्तव्य जर त्यांणीं केलें नाहीं तर ते पापी होणार नाहींत काय? ज्या नाकानें वास येत नाहीं, डोळ्यांनीं दिसत नाहीं व कानानें ऐकूं येत नाहीं तें नाक, डोळे व कान असून जसा उपयोग नाहीं, त्याचप्रमाणें सत्योपदेश व वेदादिशास्त्रांचा विचार व प्रचार न करणारे संन्यासी जगामध्यें व्यर्थ जिवंत राहत असून भार रूप आहेत. लोकांशीं डोकेंपोड कोणी करावी असें म्हणणारे व मिथ्यावादाचा प्रसार करणारे सर्व लोक पापी आहेत असें समजावें. जें शरीरादिकांकडून काम केलें जातें त्याचा प्रेरक आत्माच आहे व त्या कृतकर्मांचा फलभोक्ताहि तोच आहे. जे जीवाला ब्रह्म मानतात ते अविद्येमध्यें बुडलेले असतात असें समजावें; कारण जीव अल्प व अल्पज्ञ आहे व ब्रह्म सर्वव्यापक, सर्वज्ञ, नित्य, शुद्ध, बुद्ध व मुक्त स्वभाव असें आहे. जीव केव्हां बद्ध असतो व केव्हां मुक्त असतो ब्रह्म सर्वव्यापक व सर्वज्ञ असल्यामुळें त्याला भ्रम किंवा अविद्या प्राप्त होणें शक्य नाहीं, जीवाला मात्र केव्हां अज्ञान व केव्हां ज्ञान प्राप्त होतें. ब्रह्म जन्ममरण व दुःख यांना केव्हांहि प्राप्त होऊं शकत नाहीं, पण जीवाला मात्र तें प्राप्त होतें. यासाठीं त्यांचा तो उपदेश खोटा आहे असें सर्वांनीं समजावें. (प्र०) संन्यासी सर्व कर्मांला सोडतात, अग्नि व धातु यांना स्पर्श करीत नाहींत हें धर्माला धरून आहे कीं काय? (उ०) नाहीं, "**सम्यङ् नियमास्ते यस्मिन् यद्वा सम्यङ् न्यस्यन्ति दुःखानि कर्माणि येन स संन्यासः। स प्रशस्तो विद्यते यस्य स संन्यासी**"। जो दुष्ट कर्मांचा त्याग करतो व उत्तम स्वभाव धारण करतो, त्याला संन्यासी असें म्हणतात. संन्यासी हा सुकर्में करणारा व दुष्ट कृत्यांचा प्रतिकार कारणारा असतो. (प्र०) अध्यापन व उपदेश गृहस्थहि करतात मग संन्यासाची काय आवश्यकता आहे? (उ०) सर्व

आश्रमांतील जनांनीं सत्योपदेश करावा व ऐकावा पण संन्याशाला ज्याप्रमाणें अवकाश असतो तसा इतरांना नसतो व तो जसा निःपक्षपातीपणानें हें काम करूं शकतो त्याप्रमाणें गृहस्थी लोकांकडून होणें शक्य नाहीं. विद्वान् ब्राह्मण स्त्रीपुरुषांनीं अनुक्रमें स्त्रीपुरुषांना उपदेश करावा हें त्यांस योग्य आहे. त्याचप्रमाणें त्यांनीं अध्यापनाचेंहि काम आपणाकडे घ्यावें हें उत्तम. पण देशोदेशीं फिरून लोकांमध्यें धर्मजागृति करणें हें संन्याशाशिवाय दुसऱ्याकडून होणें शक्य नाहीं. जेव्हां ब्राह्मण वेदविरुद्ध व धर्मविरुद्ध आचरण करतात तेव्हां त्यांचें नियमन कर्तव्य दक्ष संन्यासीच करूं शकतो यासाठीं संन्यासी देशांत असणें उचित आहे. (प्र०) "**एकरात्रिं वसेद् ग्रामे**" इत्यादि वचनांमध्यें संन्याशानें एका गावामध्यें एकच रात्र रहावें असें सांगितलें आहे. तें योग्य आहे काय? (उ०) हें कांहीं अंशीं खरें आहे. एके ठिकाणींच संन्यासी राहील तर त्याच्याकडून जगावर जास्त उपकार होणार नाहीं. स्थान विशेषाचा अभिमान व त्यामुळें रागद्वेषहि जास्त होतो. जर एकत्र राहून विशेष जनहित होत असेल तर राहावें, त्याला धर्माचा कांहीं प्रतिबंध नाहीं. पूर्वी जनक राजाच्या येथें पंचशिखादि संन्यासी चारचार महिने राहिले होते, व दुसरे कांहीं तर अनेक वर्षें राहिले होते. आधुनिक पाखंडी संन्यासी तर एकत्र जास्त दिवस कां राहत नाहींत याचें कारण निराळें आहे. जर ते एकागांवीं राहिले तर त्यांचें पाखंड बाहेर फुटेल व अप्रतिष्ठा होईल म्हणून ते एका गावांत फार दिवस राहत नाहींत. (प्र०)—

यतीनां काञ्चनं दद्यात्तांबूलं ब्रह्मचारिणाम् ॥
चौराणामभयं दद्यात्स नरो नरकं व्रजेत् ॥

इत्यादि वचनांमध्यें संन्याशाला सुवर्णदान करूं नये असें सांगितलें आहे, हें चांगलें कीं वाईट? (उ०) हीं वचनें वर्णाश्रमधर्माच्या विरुद्ध असणाऱ्या संप्रदायी, स्वार्थसाधू पौराणिक लोकांनीं बनवलेलीं आहेत. या पौराणिक लोकांनां असें वाटत असावें कीं, जर संन्याशी लोकांनां द्रव्य मिळालें तर ते आपल्या पौराणिक कपोलकल्पित मतांचें फार खंडण करतील व त्यामुळें आमचा तोटा होईल, ते आमच्या आधीन राहणार नाहींत, जोंपर्यंत संन्यासी भिक्षावृत्तीनें राहतील तोंपर्यंतच ते आमच्या स्वाधीन राहतील व आमचें खंडन करणार नाहींत. आतां असें पहा कीं, जर मूर्ख व स्वार्थीलोकांना दान केलें असतां आपण उत्तम कृत्य केलें असें ते समजतात, तर मग विद्वान् व परोपकारी संन्याशांला दान देण्यापासून हानी कशी व कां होईल. तसेंच म्हटलें आहेः—

विविधानि च रत्नानि विविक्तेषूपपादयेत् ॥ मनु० ११।६॥

"नानाप्रकारचीं रत्नं (विविक्त) संन्याशांला द्यावीं." याप्रमाणें मनुस्मृतीमध्यें लिहिलें

आहे. तसेंच मागच्या श्लोकांत यतीला सुवर्ण देणारा नरकाला जातो असें म्हटलें आहे, त्यावरून चांदी, मोतीं, हिरा वगैरे देणारा स्वर्गाला जातो असा अर्थ निघतो. असो. तात्पर्य उत्तम कर्तव्यदक्ष संन्याशाला द्रव्य देणें वाईट नाहीं. (प्र०)"**यतिहस्ते धनं दद्यात्।**" जो संन्याशाच्या हातांत धन देतो तो नरकाला जातो. अशीं वचनें आहेत त्याची वाट काय? (उ०) हें वचनही अविद्वानानें बनावट केलें आहे. पहा-जर हातांत धन देऊं नये तर काय पायावर ठेवावें? कीं गठली बांधून द्यावें? असल्या कल्पना प्रमाण मानण्यास योग्य नाहींत. ही गोष्ट खरी आहे कीं, ज्या संन्याशाला जास्त द्रव्य मिळेल तो मोहित होईल व चैनी बनून अनेक रोगांनीं व पापवासनांनीं पीडितहि होईल. पण ही गोष्ट अज्ञानी माणसाची झाली. जो मनुष्य विद्वान् व कर्तव्य-दक्ष असतो, तो अयुक्त व्यवहार कधींहि करणार नाहीं व मोहामध्येंहि फसणार नाहीं. जो विद्वान् पुरुष गृहस्थाश्रम पालन करून झाल्यावर संन्यस्त होतो, किंवा ब्रह्मचर्यावस्थेमध्येंच पूर्ण विरक्त होऊन संन्यासग्रहण करतो, त्याच्याकडून अयोग्य वर्तन होऊं शकत नाहीं. (प्र०) लोक असें म्हणतात कीं, श्राद्धामध्यें जर संन्यासी लोक येऊन जेवले तर त्याचे पितर नरकांत जातात. हें खरें काय? (उ०) प्रथमतः मेलेले पितर येणें श्राद्धांत दिलेलें अन्न त्यांनां पोंचणें या गोष्टी सर्वथैव अप्रमाण व वेदाच्या व तर्काच्या विरुद्ध आहेत म्हणून या गोष्टी कोणीहि खऱ्या मानूं नयेत. कारण ते जर येऊंच शकत नाहींत तर ते मग नरकांत जाणें शक्य कसें असणार? ईश्वराच्या उत्तम व्यवस्थेनें मरणानंतर जीव आपआपल्या पुण्यपापांप्रमाणें अन्य जन्म घेतात. तेथून त्यांचें येणें शक्य कसें होईल? म्हणून ही गोष्ट पोटार्थी पौराणिकांनीं मनानें खोटीच कल्पिली आहे. जेथें संन्याशी लोक जातील तेथें ते मृतांचें श्राद्ध करणें हें वेदादि शास्त्रांच्या विरुद्ध आहे असें सर्वांला सांगतील व त्या योगानें हे पाखंड दूर होईल, या भीतीनें स्वार्थी लोकांनीं वरील तऱ्हेचीं वचनें लिहिलीं आहेत. (प्र०) जो ब्रह्मचर्यांतून संन्यास घेईल त्याचा निर्वाह होणें कठीण पडेल, व काम विकाराचा प्रतिबंध करणेंहि त्यास कठीण होईल. म्हणून गृहस्थाश्रम व वानप्रस्थाश्रम यांचें पालन झाल्यावरच संन्यास घेणें चांगलें कीं नाहीं? (उ०) जो निर्वाह करूं शकणार नाहीं व ज्याच्यानें इंद्रियांचा निरोध होणार नाहीं त्याणें ब्रह्मचर्यांतून संन्यास घेऊं नये. पण जो इंद्रियांचा संयम करूं शकेल त्याणें कां घेऊं नये? ज्याला विषयांपासून उत्पन्न होणारे दोष व वीर्यलक्षणाचे गुण समजले आहेत, तो केव्हांहि विषयासक्त होणार नाहीं. त्याचें वीर्य सुविचार वाढवण्याच्या कामीं खर्च होतें. वैद्य व औषधें यांची आवश्यकता रोग्याला असते तशी ती निरोगी मनुष्याला नसते. त्याचप्रमाणें **ज्या स्त्रीला किंवा ज्या पुरुषाला विद्या व धर्म यांची वृद्धि करावयाची असेल व जगावर उपकार करावयाचा असेल त्यांनीं विवाह करूं नये.** याच नियमाला अनुसरून पंचशिख आदिक पुरुष

व गार्गी वगैरे स्त्रिया यांनीं विवाह केला नाहीं. म्हणून योग्य व विद्वान् मनुष्यांनींच संन्यास घ्यावा हें त्यांस उचित आहे. जे अयोग्य व अनधिकारी संन्यास घेतील ते स्वतः पतित होऊन दुसऱ्यांला खड्ड्यांत पाडतील. ज्याप्रमाणें राजाला "**सम्राट्**" असें म्हणतात त्याचप्रमाणें संन्याशाला "**परिव्राट्**" असें म्हणतात. पण दोहोंमध्यें भेद इतकाच कीं, राजाचा मान आपल्या देशांतच असतो पण संन्याशाचा मान सर्व देशांत असतो. पहा—

विद्वत्त्वं च नृपत्त्वं च नैव तुल्यं कदाचन ॥
स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते ॥ चाणक्यनीति.

विद्वान् व राजा यांची तुलना होऊं शकत नाहीं, कारण राजाचा सत्कार त्याची प्रजाच करते पण विद्वानाचा सत्कार सर्व ठिकाणीं होतो. म्हणून हें सर्वांनीं लक्ष्यांत ठेवावें कीं, विद्या, सुशिक्षण व बल हीं प्राप्त करून घेण्यासाठीं **ब्रह्मचर्य** आहे; सर्व प्रकारचे सामाजिक, राजकीय, औद्योगिक वगैरे उत्तम व्यवहार सिद्ध करण्यासाठीं **गृहस्थाश्रम** आहे; विचार, ध्यान व विज्ञान वाढण्यासाठीं व तप करण्यासाठीं **वानप्रस्थाश्रम** आहे व वेदादि सत्य शास्त्रांचा प्रसार, धार्मिक व्यवहारांचा स्वीकार, दुष्ट व्यवहारांचा त्याग व सर्वांस सत्य उपदेश करण्यासाठीं **संन्यासाश्रम** आहे. जे लोक संन्यास घेऊन सत्योपदेशाचें काम करीत नसतात ते पतित होऊन नरकगामी होतात. म्हणून सर्व संन्याशांनीं प्रयत्न करून सत्योपदेश, शंकासमाधान, वेदादि सत्यशास्त्रांचें अध्यापन, वेदोक्त धर्माची वृद्धि इत्यादि करून सर्व जगताची उन्नति करावी. (**प्र०**) जे संन्यासी नाहींत, असे साधु, बैरागी, गोसांवी वगैरे प्रकारचे लोक आहेत त्यांचा समावेश संन्याशांत होतो कीं नाहीं? (**उ०**) नाहीं. कारण त्यांच्यांत संन्याशांचें एकहि लक्षण नाहीं. ते वेदविरुद्ध मार्गीमध्यें प्रवृत्त होऊन वेदवचनापेक्षां आपल्या संप्रदायांच्या आचार्यांचीं वचनें जास्त प्रमाणभूत असें समजतात! आपल्याच मताची प्रशंसा करतात! स्वतः या प्रपंचामध्यें फसून दुसऱ्यांलाहि आपल्या मतामध्यें ओढून फसवितात! जनांची सुधारणा करणें तर दूर राहिलें पण सर्वांना खोट्या मार्गानें नेऊन त्यांची हे अधोगति करतात व आपला स्वार्थ साधतात. म्हणून यांची संन्यासाश्रमामध्यें गणना करतां येत नाहीं, यांची गणना स्वार्थाश्रमांत करावी. जे लोक स्वतः धर्माप्रमाणें चालून, दुसऱ्यांना त्याप्रमाणें चालण्याचा उपदेश करतात व स्वतःसहित सर्व संसाराला या जन्मीं व दुसऱ्या जन्मीं सुखी करतात त्याच धन्य व धार्मिक पुरुषांना संन्यासी असें म्हणतात. याप्रमाणें संक्षेपानें संन्यासाश्रमासंबंधानें विवरण झालें, आतां राजा व प्रजा यांच्या धर्माविषयीं लिहावयाचें.

इति सुभाषाविभूषितो वानप्रस्थ संन्यासाश्रमविषयः पंचमः समुल्लासः संपूर्णः ॥ ५ ॥

अथ षष्ठसमुल्लासः ।

अथ राजधर्मान् व्याख्यास्यामः ।

राजधर्मान् प्रवक्ष्यामि यथावृत्तो भवेन्नृपः ॥
संभवश्च यथा तस्य सिद्धिश्च परमा यथा ॥ १ ॥
ब्राह्मं प्राप्तेन संस्कारं क्षत्रियेण यथाविधि ॥
सर्वस्यास्य यथान्यायं कर्तव्यं परिरक्षणम् ॥ २ ॥

मनु. अ. ७॥

मनु भगवान् ऋषींला सांगतात कीं, चार वर्णांच्या व आश्रमांच्या व्यवहारांचें कथन केल्यानंतर "राजधर्माचें कथन करतों;" राजाचें वर्तन कसें असावें, त्याची उत्पत्ति कशी होते, व त्याला प्रभुत्वाची परम सिद्धि कशी प्राप्त होते, हें सर्व सांगतों. यथाविधि वेदोक्त संस्कार प्राप्त झालेल्या क्षत्रियानें आपल्या सर्व राज्याचें रक्षण न्यायानें केल्यानें तो खरा राजा होतो. राजानें प्रजेचें रक्षण कसें करावें तें पुढील वेदमंत्रांत सांगितलें आहे.—

त्रीणि राजाना विदथे पुरूणि परि विश्वानि भूषथः सदांसि ॥ ऋ. म. ३।३८।६॥

परमेश्वर उपदेश करतो कीं, (राजाना) राजा व प्रजेंतील पुरुष मिळून (विदथे) सुखप्राप्तिकारक व ज्ञानवृद्धिकारक, राजा व प्रजा यांच्या संबंधानें उत्पन्न होणाऱ्या व्यवहारांमध्यें (त्रीणि) तीन (सदांसि) सभा–विद्यार्यसभा, धर्मार्यसभा व राजार्यसभा–नियत करून (पुरूणि) पुष्कळ (विश्वानि) समग्र प्रजासंबंधीं मनुष्यादि प्राण्यांला (परिभूषथः) सर्व प्रकारें विद्या, स्वातंत्र्य, धर्म, सुशिक्षा व धन इत्यादि पदार्थांनीं अलंकृत करावें. तसेंच—

तं सभा च समितिश्च सेना च ॥ १ ॥ अथर्व. १९।२।९।२॥
सभ्यः सभां मे पाहि येच सभ्याः सभासदः ॥२॥
अथर्व. १९।७।९९।९॥

(तम्) त्या राजधर्माचें (सभा च) त्या तीनहि सभांनीं व (समितिश्च) संग्राम व्यवस्था, युद्धकला यांच्या योगानें व (सेना च) सैन्याच्या योगानें रक्षण करावें.

राजानें सर्व सभासदांनां अशी आज्ञा करावी कीं, हे (सभ्य) सभास्थानीं विराजमान् होण्यास योग्य अशा मुख्य सभासदा! तूं (मे) माझ्या (सभाम्) सभेच्या धर्मयुक्त व्यवस्थेचें (पाहि) पालन कर व (ये च) जे (सभ्याः) सभेमध्यें प्रवेश करण्यास योग्य, असे (सभासदः) सभासद असतील त्यांनीं ही पूर्वोक्त सभांची व्यवस्था नीट ठेवावी. याचा अभिप्राय असा आहे कीं, कोणा एका विशिष्ट व्यक्तीला राज्याचा सर्व अधिकार देऊं नये. राजाच्या आधीन सभा, सभेच्या आधीन राजा, प्रजेच्या आधीन राजा व राजसभा अशी व्यवस्था असावी. राजा जेथें स्वतंत्र असतो व त्यावर कोणाचाहि दाब नसतो तेव्हां कशी स्थिति होते ती पहाः—

राष्ट्रमेव विश्याहन्ति तस्माद्राष्ट्री विशं घातुकः । विशमेव राष्ट्र्याद्यां करोति तस्माद्राष्ट्री विशमत्ति न पुष्टं पशुं मन्यत इति ॥ शत. १३।२।३।७-८॥

जो अनियन्त्रित राजा असतो, (राष्ट्रम् एव विशि आहन्ति) तो राष्ट्रामध्यें प्रवेश करून प्रजेचा नाश करतो, अर्थात् एकटा अनियंत्रित राजा उन्मत्त होऊन (राष्ट्री विशं घातुकः) तो प्रजेचा घात करण्यास कारण होतो. (विशमेव राष्ट्री आद्यां करोति) तो उन्मत्त राजा प्रजेला खाऊन टाकतो, (अर्थात् प्रजेला अत्यंत पीडा देतो, म्हणून कोणाच्याहि हातांत अनियंत्रित राजसत्ता असूं नये. ज्याप्रमाणें सिंह-व्याघ्रादिक हिंस्र पशू (पुष्टं पशुं न मन्यते) दुसऱ्या पुष्ट पशूला पाहून ते जिवंत रहावेत असें इच्छित नाहींत, तर त्यांनां मारून खाऊन टाकतात, त्याचप्रमाणें अनियंत्रित उन्मत्त राजा (राष्ट्री विशम् अत्ति) प्रजेचा नाश करतो. आपल्या राज्यांत कोणालाहि वाढूं देत नाहीं, श्रीमान् पुरुषांनां लुटतो, अनेक अन्याय करतो व आपलें काम साधतो. म्हणून—

इन्द्रो जयाति न परा जयाता अधिराजो राजसु राजयातै ॥ चर्कृत्य ईड्यो वन्द्य श्चोपसद्यो नमस्यो भवेह ॥ अथर्व. ६।१०।९८।१॥

हे मनुष्य हो! जो या तुमच्या (इह) समुदायामध्यें (इन्द्रः) परम ऐश्वर्याचा कर्ता व शत्रूंनां (जयाति) जिंकणारा व कधींहि (न पराजयाता) ज्याचा पराजय होत नाहीं व जो (राजसु) राजांमध्यें (अधिराजः) सर्वांपेक्षां श्रेष्ठ व (राजयातै) त्यांमध्यें

प्रकाशमान् होतो (चर्कृत्य) सभापति होण्याला अत्यंत योग्य (ईड्यः) प्रशंसनीय गुणकर्मस्वभावयुक्त (वन्द्यः) सत्कार करण्यास योग्य (च उपसद्यः) जवळ जाण्यास व शरण जाण्यास योग्य व (नमस्यः) सर्वांनीं नमस्कार करण्यास योग्य असतो, तोच तुमचा सभापति (भव) होवो. अर्थात् लोकांनीं अशाप्रकारें गुणविशिष्ट पुरुषाला सभापति-लोकनियुक्त राजा करावा. तसेंच—

इमन्देवा असपत्न ꣳ सुवध्वं महते क्षत्रायं महते ज्यैष्ठ्यायं महते जानराज्यायेन्द्रस्येन्द्रियायं ॥ यजु. ९।४०॥

हे (देवाः) विद्वान् राजप्रजा जन हो! तुम्हीं (इमम्) या प्रकारच्या मनुष्याला (महते क्षत्राय) महान् चक्रवर्ती राज्यासाठीं (महते ज्यैष्ठ्याय) सर्वांहून मोठें होण्यासाठीं (महते जानराज्याय) महान् महान् विद्वानांनीं युक्त राज्याचें पालन करण्यासाठीं (इन्द्रस्य इन्द्रियाय) परम ऐश्वर्ययुक्त राज्याचें व धनाचें रक्षण करण्यासाठीं (असपत्नं सुवध्वम्) सर्व संमति करून पक्षपातरहित, पूर्ण विद्यायुक्त, विनयशील, सर्वांचा मित्र, अशा लोकनियुक्त सभापतीला राजा व सर्वाधीश मानून सर्व भूमंडळावरील शत्रुभाव नाहींसा करावा, व—

स्थिरा वः सन्त्वायुधा पराणुदे वीळू उत प्रतिष्कभे ॥ युष्माकमस्तु तविषी पनीयसी मा मर्त्यस्य मायिनः ॥ ऋ. १।३९।२॥

ईश्वर उपदेश करीत आहे कीं, हे राजपुरुष हो! (वः) तुमचीं (आयुधा) आग्नेयादि अस्त्रें, शतघ्नी आदिक तोफा, भुशुंडी आदिक बंदुका, धनुष्य, बाण, तलवार इत्यादिक शस्त्रें, शत्रूंचा (पराणुदे) पराजय करण्यासाठीं व (उत प्रतिष्कभे) त्यांचा प्रतीकार करण्यासाठीं (वीळू) प्रशंसित व (स्थिरा) दृढ (सन्तु) असावींत. सदासर्वदा तुम्हीं तुमचीं शस्त्रास्त्रें तयार ठेवा. व (युष्माकम्) तुमची (तवीषी) सेना (पनीयसी) प्रशंसनीय (अस्तु) असावी. तुम्ही नेहेमीं विजयी व्हाल अशी सैन्याची तयारी नेहेमीं ठेवा. (मा मायिनः मर्त्यस्य) पण जो निंदित व अन्यायरूपी कपटयुक्त काम करणारा मनुष्य असेल, त्याला पूर्वोक्त शस्त्रास्त्रें-जीं तुमच्या जवळ आहेत तीं-न लाभोत. जोंपर्यंत मनुष्यें धार्मिक असतात, तोंपर्यंतच त्यांच्या राज्याची वृद्धि होत असते, पण जेव्हां तीं अधर्मयुक्त आचरण करूं लागतात तेव्हां पासून

त्यांच्या नाशाला प्रारंभ होतो. महान् विद्वानांनां **विद्यासभे**चा अधिकार द्यावा, धार्मिक विद्वानांनां **धर्मसभे**चा अधिकार द्यावा व प्रशंसनीय धार्मिक पुरुषांनां **राजसभे**चे सभासद बनवावें व त्यांमध्यें सर्वोत्तम गुणांनीं जो उत्तम महान् विद्वान् पुरुष असेल त्याला सभापति किंवा लोकनियुक्त राजा करावा व याप्रमाणें सर्वांनीं आपली उन्नति करावी. तीनहि सभांच्या संमतीनें राजनीतीचे नियम करावे व त्या नियमांच्या आधीन सर्व लोकांनीं वागावें. सर्वांच्या संमतीनें सार्वजनिक हिताचीं कामें करावीं. सार्वजनिक हित करण्याच्या कामांमध्यें मनुष्यानें परतंत्र असावें व स्वकीय हिताचें काम करण्यांत मनुष्यानें स्वतंत्र असावें.

सभापतीचे गुण कसे असावे?

इन्द्रानिलयमार्काणामग्नेश्च वरुणस्य च ॥
चन्द्रवित्तेशयोश्चैव मात्रा निर्हृत्य शाश्वतीः ॥ ४ ॥
तपत्यादित्यवच्चैषां चक्षूंषि च मनांसि च ॥
न चैनं भुवि शक्नोति कश्चिदप्यभिवीक्षितुम् ॥ ६ ॥
सोऽग्निर्भवति वायुश्च सोऽर्कः सोमः स धर्मराट् ॥
स कुबेरः स वरुणः स महेन्द्रः प्रभावतः ॥ ७ ॥

मनु. अ. ७॥

तो सभेश राजा (इन्द्रः) विद्युच्छक्तीप्रमाणें शीघ्र ऐश्वर्य संपादन करणारा, (अनिलः) वायुप्रमाणें सर्वांनां प्राणांसारखा प्रिय व हृदयांतील गोष्ट जाणणारा, (यमः) निःपक्षपाती न्यायाधीशाप्रमाणें वर्तन करणारा, (सूर्यः) सूर्याप्रमाणें न्याय, धर्म व विद्या यांचा प्रकाशक व अन्याय अधर्म व अविद्या यांचा निरोध करणारा (अग्निः) विस्तवाप्रमाणें दुष्टांचें भस्म करणारा, (वरुणः) दुष्टांला अनेक प्रकारें बांधणारा, (चन्द्रः) चंद्राप्रमाणें श्रेष्ठांला आनंद देणारा, (वित्तेशः) कुबेराप्रमाणें खजिने भरून ठेवणारा असा असावा; तो सूर्याप्रमाणें प्रतापी, आपल्या तेजानें सर्वांला बाहेरून व आंतून मनाला तप्त व चकित करणारा, त्याच्याकडे करड्या नजरेनें पाहण्यास कोणीहि समर्थ नसतो. जो अग्नि, वायु, सूर्य व सोम यांच्यांतील गुणांनीं युक्त, धर्माचा प्रकाश करणारा, धनाची वृद्धि करणारा, व ऐश्वर्ययुक्त असेल तोच सभाध्यक्ष' होण्यास योग्य आहे असें समजावें.

खरा राजा कोण ?

स राजा पुरुषो दण्डः स नेता शासिता च सः ॥
चतुर्णामाश्रमाणां च धर्मस्य प्रतिभूःस्मृतः ॥ १७ ॥ म. अ. ७

दण्ड हाच पुरुष, व हाच राजा, तोच न्यायकर्ता व शासनकर्ता, व तोच चार वर्ण व चार आश्रम यांच्या धर्माचा जिम्मेदार असतो.

दण्डः शास्ति प्रजाः सर्वा दण्ड एवाभिरक्षति ॥
दण्डः सुप्तेषु जागर्ति दण्डं धर्मं विदुर्बुधाः ॥ १८ ॥ म. अ. ७

दण्ड हाच प्रजांचें शासन करणारा, सर्वांचें रक्षण करणारा, मनुष्य निजले असतां तोच जागतो, म्हणून बुद्धिमान् लोक दण्डालाच धर्म असें म्हणतात.

समीक्ष्य स धृतः सम्यक् सर्वा रञ्जयति प्रजाः ॥
असमीक्ष्य प्रणीतस्तु विनाशयति सर्वतः ॥ १९ ॥ म. अ. ७

विचार करून जो दण्ड केला जातो त्याच्या योगानें सर्व प्रजा आनंदित होतात, पण अविचारानें केलेल्या दण्डापासून सर्वांचा सर्वप्रकारें नाश होतो. तसेंच—

दुष्येयुः सर्ववर्णाश्च भिद्येरन् सर्वसेतवः ॥
सर्वलोकप्रकोपश्च भवेद्दण्डस्य विभ्रमात् ॥ २४ ॥ म. अ. ७

दंड न करण्यापासून सर्व वर्ण दूषित होतील व सर्व मर्यादा नाहींशा होतील, त्याचप्रमाणें अयोग्य दंड केल्यानें सर्व लोक त्रस्त व क्षुब्ध होतात.

यत्र श्यामो लोहिताक्षो दण्डश्चरति पापहा ॥
प्रजास्तत्र न मुह्यन्ति नेता चेत्साधु पश्यति ॥ २५ ॥ म.अ. ७

ज्या ठिकाणीं कृष्णवर्ण व रक्तनेत्रयुक्त भयंकर पुरुषाप्रमाणें सर्वत्र दण्ड पापांचा नाश करण्यास तयार असतो, त्याठिकाणीं प्रजा मोहयुक्त होत नाहींत व सदोदित आनंदित होत असतात. जर पक्षपातरहित विद्वान् पुरुष न्याय देणारा असेल तेथेंच अशी स्थिति असते, पण जेथें पक्षपाती राजपुरुष असतात तेथील स्थिति फार भयंकर होय.

तस्याहुः संप्रणेतारं राजानं सत्यवादिनम् ॥
समीक्ष्य कारिणं प्राज्ञं धर्मकामार्थकोविदम् ॥ २६ ॥ म.अ. ७

जो राजा सत्यवादी, विचारशील, बुद्धिमान्, धर्म अर्थ व काम सिद्ध करण्यांत तत्पर असतो तोच दण्ड देण्यास योग्य असें विद्वान् समजतात.

तं राजा प्रणयन् सम्यक् त्रिवर्गेणाभिवर्द्धते ॥
कामात्मा विषमः क्षुद्रो दण्डेनैव निहन्यते ॥२७॥ म. अ. ७

जो राजा उत्तम प्रकारें विचारानें दण्ड करतो, तो धर्म अर्थ व काम यांची वृद्धि करतो, पण जो विषयलंपट, क्षुद्र व तिर्सट असतो त्याचा त्या दंडानेंच नाश होतो.

दंडो हि सुमहत्तेजो दुर्धरश्चाकृतात्मभिः ॥
धर्माद्विचलनं हन्ति नृपमेव सबान्धवम् ॥ २८ ॥ म० अ० ७

दंड हा महान् तेजोमय असल्यामुळें अविद्वान् व अधर्मात्मा पुरुष त्याचें धारण करूं शकत नाहीं; अधार्मिक राजाचा कुलासह तो दंड नाश करतो.

सोऽसहायेन मूढेन लुब्धेनाकृतबुद्धिना ॥
न शक्यो न्यायतो नेतुं सक्तेन विषयेषु च ॥३०॥ म. अ. ७

आप्त पुरुषांचें सहाय्य ज्याला नाहीं, जो अशिक्षित, लोभी, विषयलंपट, व मूढ असतो तो न्याय करण्यास व दण्ड देण्यास केव्हांहि योग्य नसतो.

शुचिना सत्यसंधेन यथाशास्त्रानुसारिणा ॥
प्रणेतुं शक्यते दण्डः सुसहाय्येन धीमता ॥३१॥ मनु. अ.७॥

जो सदा पवित्र व शुद्ध, सत्याप्रमाणें आचरण करणारा व सदाचरणी लोकांची संगति धरणारा, नीतिशास्त्राप्रमाणें चालणारा, जो श्रेष्ठ पुरुषांच्या सहाय्यानें युक्त असतो व जो स्वतः बुद्धिमान् असतो तोच न्याय करण्यास व दंड देण्यास समर्थ असतो. ह्मणून—

सैनापत्यं च राज्यं च दण्डनेतृत्वमेव च ॥
सर्वलोकाधिपत्यं च वेदशास्त्रविदर्हति ॥१००॥ मनु. अ. १२

सैन्यामध्यें सेनापतीच्या जागीं, राज्याच्या अधिकारावर, दंड देण्याच्या न्यायखात्यावर व सर्वाधीशाच्या–राजाच्या जागेवर, संपूर्ण वेदशास्त्रांमध्यें प्रवीण, पूर्णविद्यायुक्त, धर्मात्मा, जितेन्द्रिय, सुशील, अशा लोकांनाच स्थापन करावें. अर्थात् मुख्य सेनापति, मुख्य राज्याधिकारी, न्यायाधीश, प्रधान, राजा, हे सर्व पूर्ण विद्वान् असलेच पाहिजेत.

दशावरा वा परिषद्यं धर्मं परिकल्पयेत् ॥
त्र्यवरा वापि वृत्तस्था तं धर्मं न विचालयेत् ॥११०॥ म.अ.१२

कमींत कमी दहा, किंवा अगदीं हीन पक्षीं तीन, विद्वान् पुरुष ज्या सभेंत असतील, त्या विद्वत्सभेनें केलेले नियम कोणांहि उल्लंघूं नयेत्.

त्रैविद्यो हैतुकस्तर्की नैरुक्तो धर्मपाठकः ॥
त्रयश्चाश्रमिणः पूर्वे परिषत्स्याद्दशावरा ॥ १११ ॥
ऋग्वेदविद्यजुर्विच्च सामवेदविदेव च ॥
त्र्यवरा परिषज्ज्ञेया धर्मसंशयनिर्णये ॥११२॥ म.अ.१२

" चार वेदांमध्यें पारंगत झालेले, न्यायशास्त्र, मीमांसात्मक तर्कशास्त्र, निरुक्त व धर्मशास्त्र यांना जाणणारे, असे सभेचे सभासद असावे. ते ब्रह्मचारी, गृहस्थ किंवा वानप्रस्थी असावेत. सभेमध्यें कमींतकमी दहा तरी सभासद असावेत. " किंवा " धर्माचा निर्णय करण्यासाठीं ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद जाणणारे निदान तीन तरी सभासद असावेत. " अशा सभेनें केलेले नियम कोणीहि मोडूं नयेत.

एकोऽपि वेदविद्धर्मं यं व्यवस्येद् द्विजोत्तमः ॥
स विज्ञेयः परो धर्मो नाज्ञानामुदितोऽयुतैः ॥ ११३ ॥
अव्रतानाममन्त्राणां जातिमात्रोपजीविनाम् ॥
सहस्रशः समेतानां परिषत्त्वं न विद्यते ॥ ११४ ॥
यं वदन्ति तमोभूता मूर्खा धर्ममतद्विदः ॥
तत्पापं शतधा भूत्वा तद्वक्तृनेनुगच्छति॥११५॥ मनु.अ.१२

" सर्व वेद जाणणारा, उत्तम द्विज संन्यासी जी धर्माची व्यवस्था करील ती सर्वांत श्रेष्ठ आहे असें समजावें. कारण तशी धर्मव्यवस्था लाखों अज्ञानी लोक एकत्र मिळाले तरीहि त्यांना करतां येणार नाहीं. व ते अज्ञानी जी करतील ती कोणीहि मानण्यास योग्य नाहीं. " " जे ब्रह्मचर्य, सत्यभाषणादि व्रतें धारण करीत नाहींत, शूद्रवत् वर्तन करतात, असे हजारों पुरुष एकत्र जमले तथापि तिला सभा असें ह्मणतां येणार नाहीं. " " जे अविद्यायुक्त, मूढ व वेदांला न जाणणारे लोक असतात, ते जो धर्म सांगतील त्यावर कोणीहि विश्वास ठेवूं नये; कारण जे मूर्खांनीं सांगितलेल्या तत्वांप्रमाणें आचरण करतात त्यांच्या पाठीमागें सहस्रशः पातकें लागतात. " या साठीं विद्यासभा, धर्मसभा व राजसभा यांच्यामध्यें मूर्खांचा प्रवश होऊं देऊं नये; त्यांमध्यें सर्व सभासद पूर्ण विद्वान् व विचारी असावेत. तसेंच—

राजपुरुषांला अवश्य लागणारे गुण.

त्रैविद्येभ्यस्त्रयीं विद्यां दण्डनीतिं च शाश्वतीम् ॥
आन्वीक्षिकीं चात्मविद्यां वार्तारम्भांश्च लोकतः ॥४३॥ मनु.७।

जे चारहि वेदांतील कर्म, उपासना व ज्ञान या तीनहि विद्यांना जाणतात, सनातन दण्डनीति, न्यायविद्या, आत्मविद्या-अर्थात् परमात्म्याचे गुण कर्म व स्वभाव जिच्या योगानें जाणले जातात ती ब्रह्मविद्या-व लोकांशीं वार्तारंभ अर्थात् प्रश्नोत्तरें करून माहिती काढण्याची विद्या या ज्यांना येत असतील तेच सभांचे सभासद व सभापति होऊं शकतात.

इंद्रियाणां जये योगं समातिष्ठेद्दिवानिशम् ॥
जितेन्द्रियो हि शक्नोति वशे स्थापयितुं प्रजाः ॥ ४४ ॥

म. अ. ७

सर्व सभासद व सभापति यांनीं इंद्रियनिग्रह करून सदोदित धर्माप्रमाणें वर्तन करावें व अधर्माचा नाश करावा. इंद्रियांना स्वाधीन ठेवण्यासाठीं त्यांनीं अहोरात्री-मधून नियतसमयीं नियमानें योगाभ्यास करावा. ज्याच्या ताब्यांत त्याचीं मनादि इंद्रियें व प्राण राहत नाहींत, अर्थात् जो आपल्या शरीरांतील प्रजेला स्वाधीन ठेवूं शकत नाहीं त्याच्या वशामध्यें राज्यांतील लोक येणें सर्वथैव अशक्य आहे.

दुर्व्यसनांचा परिणाम.

दश कामसमुत्थानि तथाष्टौ क्रोधजानि च ॥
व्यसनानि दुरन्तानि प्रयत्नेन विवर्जयेत् ॥ ४५ ॥
कामजेषु प्रसक्तो हि व्यसनेषु महीपतिः ॥
वियुज्यतेऽर्थधर्माभ्यां क्रोधजेष्वात्मनैव तु ॥४६॥ म.अ. ७

" कामापासून उत्पन्न होणारीं दहा व्यसनें व क्रोधापासून उत्पन्न होणारीं आठ व्यसनें आहेत; यांत जो मनुष्य फसतो त्याचा परिणाम फारच वाईट होतो; त्यांतून सुटणें फार कठीण असतें, म्हणून प्रयत्नानें मनुष्यानें त्यांत सांपडून फसूं नये." " जो राजा कामापासून उत्पन्न झालेल्या दहा दुष्ट व्यसनांत फसतो, तो राज्यादिक धन व धर्म यांना मुकतो. व जो क्रोधापासून उत्पन्न झालेल्या आठ व्यसनांत फसला जातो त्याला शरीराला व आत्मोन्नतीलाहि मुकावें लागतें. " कामापासून कोणतीं व्यसनें उत्पन्न होतात तीं पुढें लिहिलीं आहेत—

काममूलकव्यसनें.

मृगयाक्षा दिवास्वप्नः परिवादः स्त्रियो मदः ॥
तौर्यत्रिकं वृथाट्या च कामजो दशको गणः ॥४७॥ म. अ.७

मृगया करणें, फांसे, जुगार वगैरे खेळणें, दिवसा निजणें, कामविषयासंबंधींच्या

गोष्टी व दुसऱ्याची निंदा करणें, अतीशय स्त्रीसंग करणें, मादक द्रव्यांचें–अर्थात् मद्य, अफीण, भांग, गांजा, चरस वगैरे पदार्थांचें–सेवन करणें, गाणें, बजावणें, नाचणें किंवा नाच पाहणें; इकडून तिकडे व्यर्थ भटकणें हीं दहा कामापासून उत्पन्न होणारीं व्यसनें आहेत.

क्रोधमूलकव्यसनें.

पैशुन्यं साहसं द्रोह ईर्ष्यासूयार्थदूषणम् ॥
वाग्दण्डजं च पारुष्यं क्रोधजोऽपि गणोऽष्टकः ॥ ४८ ॥

म. अ. ७

(पैशुन्यम्) चहाडी चुगली करणें, (साहसम्) बलात्कारानें कोणत्याहि स्त्रीकडून कुकर्म करविणें व अशा सारखीं भयंकर कृत्यें करणें, द्रोह करणें, (ईर्ष्या) दुसऱ्याची उन्नति सहन न करणें, (असूया) दोषांवर गुणांचें आरोपण करणें किंवा गुणांवर दोषांचें आरोपण करणें, (अर्थदूषण) अधर्मयुक्त दुष्टकृत्यांमध्यें धनाचा व्यय करणें, नेहेमीं कठोर भाषण करणें, अपराधावांचून कठोर भाषण किंवा शिक्षा करणें, हे आठ दुर्गुण क्रोधापासून उत्पन्न होतात,

द्वयोरप्येतयोर्मूलं यं सर्वे कवयो विदुः ॥
तं यत्नेन जयेल्लोभं तज्जावेतावुभौ गणौ ॥४९॥ म. अ. ७

लोभापासून हीं दोनहि प्रकारचीं व्यसनें उत्पन्न होतात असें सर्व विद्वान् लोक जाणतात. म्हणून सर्वांनीं लोभापासून दूर रहावें.

पानमक्षाः स्त्रियश्चैव मृगया च यथाक्रमम् ॥
एतत्कष्टतमं विद्याच्चतुष्कं कामजे गणे ॥ ५० ॥
दण्डस्य पातनं चैव वाक्पारुष्यार्थदूषणे ॥
क्रोधजेऽपि गणे विद्यात्कष्टमेतत्त्रिकं सदा ॥५१॥ म. अ. ७

कामापासून उत्पन्न होणाऱ्या दहा दुर्गुणांमध्यें चार तर फारच भयंकर आहेत. (१) मद्यादि मादक द्रव्यांचें सेवन, (२) जुगार खेळणें, (३) स्त्रीसंग अतीशय करणें, (४) मृगया खेळणें; हीं चार व्यसनें फारच घातक आहेत. तसेंच क्रोधापासून होणाऱ्या आठ दुर्गुणांमध्यें (१) अपराधावांचून दण्ड देणें, (२) कठोर भाषण करणें, व (३) द्रव्याचा विनियोग दुष्टकृत्यांत करणें हे तीन दुर्गुण फारच घातक आहेत.

सप्तकस्यास्य वर्गस्य सर्वत्रैवानुषङ्गिणः ॥
पूर्वं पूर्वं गुरुतरं विद्याद्व्यसनमात्मवान् ॥५२॥
व्यसनस्य च मृत्योश्च व्यसनं कष्टमुच्यते ॥
व्यसन्यधोऽधो व्रजति स्वर्यात्यव्यसनी मृतः ॥ ५३ ॥

मनु. अ. ७॥

या पूर्वोक्त सात दुर्गुणांमध्यें पुढच्यापेक्षां मागचा जास्त भयंकर आहे. द्रव्याच्या अपव्ययापेक्षां कठोर भाषण, कठोर वचनापेक्षां अन्याय करणें व अन्यायानें निरपराध्याला शिक्षा करणें, त्यापेक्षां मृगया खेळणें, मृगयेपेक्षां स्त्रीव्यसन असणें, त्यापेक्षां जुगार खेळणें व जुगारापेक्षां मद्यादिक मादक पदार्थांचें सेवन करणें फार हानिकारक आहे. दुष्टव्यसनांत फसण्यापेक्षां मरणें चांगलें असें सर्वांनीं समजावें; कारण दुराचरणी पुरुष जर जास्त वांचला तर त्याची प्रतिदिवशीं अवनतिच होत जाणार व तो जास्त जास्त पातकें करीत राहणार व त्यामुळें त्याला सदैव दुःखेंच प्राप्त होणार; पण जो व्यसनांमध्यें फसत नाहीं त्याला सदोदित सुख प्राप्त होतें; म्हणून राजा व प्रजा यांनीं अवश्य लक्षांत ठेवण्यासारखी ही गोष्ट आहे कीं, त्यांनीं मद्यपानादिक दुष्ट व्यसनांपासून दूर राहून धर्मयुक्त कृत्यें आपआपल्या गुणकर्मस्वभावानुरूप सदोदित करावींत.

मंत्री व राजसभेचे सभासद कसे असावे ?

मौलान् शास्त्रविदः शूरांल्लब्धलक्षान् कुलोद्गतान् ॥
सचिवान्सप्त चाष्टौ वा प्रकुर्वीत परीक्षितान् ॥ ५४ ॥

म. अ. ७

स्वदेशांत ज्यांचा जन्म झाला आहे, वेदादिशास्त्रें जाणणारे, शूरवीर, ज्यांचें लक्ष्य व विचार निष्फल होत नाहींत, जे कुलीन आहेत व ज्यांची सर्वप्रकारें उत्तम परीक्षा केलेली आहे असे धार्मिक सात किंवा आठ मंत्री नेमावे.

अपि यत्सुकरं कर्म तदप्येकेन दुष्करम् ॥
विशेषतोऽसहाय्येन किंतु राज्यं महोदयम् ॥ ५५ ॥
तैः सार्धं चिन्तयेन्नित्यं सामान्यं सन्धिविग्रहम् ॥
स्थानं समुदयं गुप्तिं लब्धप्रशमनानि च ॥ ५६ ॥ म.अ. ७

मंत्री कशाला पाहिजेत ? असा कोणी प्रश्न विचारील त्याला उत्तर असें कीं-

अगदीं साधें काम करावयाचें असलें तरीहि तें एकाला करण्यास फार कठीण जातें, मग कोणाच्याहि सहाय्यावांचून राज्य चालविण्यासारखें मोठें काम कसें बरें होईल? म्हणून सभापतीनें किंवा राजानें कुशल व विद्वान् मंत्रिमंडळाच्या सल्लयानें विचार करावा व (सन्धिम्) कोणाची मित्रता करावी, (विग्रहम्) कोणाशीं विरोध करावा, (स्थानम्) केव्हां व कसा आपल्या राज्याचा बंदोबस्त करून स्वस्थ रहावें, (समुदयम्) आपणाला योग्य समय प्राप्त झाल्याबरोबर दुष्ट शत्रूवर कशी चढाई करावी, (गुप्तिम्) राजसेना व कोश यांचें कसें रक्षण करावें, (लब्धप्रशमनानि) जे जे प्रदेश मिळविले असतील त्यांत शांतता कशी करावी वगैरे प्रकारचे विचार मंत्र्यांसह नेहमीं करावे.

तेषां स्वं स्वमभिप्रायमुपलभ्य पृथक् पृथक् ॥
समस्तानां च कार्येषु विदध्याद्धितमात्मनः ॥ ५७ ॥

म. अ. ७

त्या प्रत्येक मंत्र्याचा विशिष्ट कार्यामध्यें अभिप्राय पृथक् पृथक् समजून घ्यावा बहुमतानुसार आपल्याला व दुसऱ्याला हितकारक जसें होईल तसें कर्तव्य करावें.

अन्यानपि प्रकुर्वीत शुचीन् प्राज्ञानवस्थितान्
सम्यगर्थसमाहर्तॄन् अमात्यान् सुपरीक्षितान् ॥६०॥
निवर्तेतास्य यावद्भिरितिकर्तव्यता नृभिः ॥
तावतोऽतन्द्रितान् दक्षान् प्रकुर्वीत विचक्षणान् ॥६१॥
तेषामर्थे नियुञ्जीत शूरान् दक्षान् कुलोद्गतान् ॥
शुचीनाकरकर्मान्ते भीरूनन्तर्निवेशने ॥ ६२ ॥म. अ. ७

याचप्रमाणें आणखीं जरूर असल्यास पवित्र, बुद्धिमान्, निश्चयात्मक बुद्धीनें युक्त अनेक पदार्थांचा संग्रह करण्यांत चतुर, असे सुपरीक्षित मंत्री करावे. आपल्या राज्याच्या मानानें व कर्तव्यांच्या मानानें जितके मंत्री आवश्यक असतील तितके उद्योगी, बलवान् व चतुर असे पुरुष मंत्री करावे; यांच्या आधीन शूरवीर, बलवान्, कुलीन, पवित्र अशा भृत्यांना नेमून त्यांच्यावर भांडारखान्यावरील व रत्नखाणीवरील इत्यादि मोठमोठीं कृत्यें सोंपवावीं व जे भीरु असतील त्यांना आंतील कामांवर नेमावें.

दूताचें लक्षण.

दूतं चैव प्रकुर्वीत सर्वशास्त्रविशारदम् ॥
इङ्गिताकारचेष्टज्ञं शुचिं दक्षं कुलोद्गतम् ॥ ६३ ॥

अनुरक्तः शुचिर्दक्षः स्मृतिमान् देशकालवित् ॥
वपुष्मान् वीतभीर्वाग्मी दूतो राज्ञः प्रशस्यते॥६४॥मनु.अ.७

जो उत्तम कुलांत उत्पन्न झाला आहे, जो चतुर व पवित्र असून मनुष्यांच्या हावभाव व चेष्टा यांवरून अंतःकरणांत काय आहे तें जाणतो व (सभ्यांच्या परिस्थितीवरून) भविष्यकालीं काय होणार तें जाणूं शकतो व जो सर्व शास्त्रांमध्यें विशारद असतो त्याला दूत नेमावें. दूत नेहेमीं राजकार्य करण्यामध्यें प्रीति करणारा व उत्साही असावा; निष्कपटी, पवित्रात्मा, चतुर, पुष्कळ कालापूर्वी झालेल्या गोष्टींचेंहि स्मरण ठेवणारा, देशकालवर्तमानाप्रमाणें काम करणारा, सुंदर व बळकट शरीरानें युक्त, निर्भय व उत्तम वक्ता असा राजाचा दूत असावा.

अधिकारव्यवस्था.

अमात्ये दण्ड आयत्तो दण्डे वैनयिकी क्रिया ॥
नृपतौ कोशराष्ट्रे च दूते सन्धिविपर्ययौ ॥ ६५ ॥ मनु. अ. ७॥

अमात्याजवळ दण्ड देण्याचा अधिकार असावा. दण्ड देण्याचे वेळीं कोठेंहि अन्याय न होईल असें त्यानें करावें. कोश व राजकार्य यांवर नृपतीचा अधिकार असावा. तसेंच सभेच्या आधीन सर्व कार्य असावें. तसेंच दूताला संधि (मैत्री) किंवा निग्रह (लढाई) करण्याचा अधिकार असावा. कारण—

दूत एव हि संधत्ते भिनत्त्येव च संहतान् ॥
दूतस्तत्कुरुते कर्म भिद्यन्ते येन मानवाः॥६६॥ मनु. अ. ७॥

दूतच परस्पर राजांमध्यें मैत्री उत्पन्न करतो व तोच ज्यांची एकी झाली असेल त्यांच्यांत फूट उत्पन्न करतो. शत्रू व बंधूंमध्यें फूट उत्पन्न करणें हें काम दूतांचेंच आहे. म्हणून—

बुद्धा च सर्वं तत्त्वेन परराजचिकीर्षितम् ॥
तथा प्रयत्नमातिष्ठेद् यथात्मानं न पीडयेत्॥६८॥मनु.अ.७॥

सभापति व सर्व सभासद यांनीं दूतादि साधनांच्या योगानें दुसऱ्या राजांचा अभिप्राय यथार्थ जाणून असा प्रयत्न करावा कीं, त्या राजांपासून आपणांस त्रास न होईल.

राज्यरक्षणाचे उपाय.

धनुर्दुर्गं महीदुर्गमब्दुर्गं वार्क्षमेव वा ॥
नृदुर्गं गिरिदुर्गं वा समाश्रित्य वसेत्पुरम् ॥ ७० ॥

एकः शतं योधयति प्राकारस्थो धनुर्धरः ॥
शतं दशसहस्राणि तस्माद्दुर्गं विधीयते ॥ ७४ ॥ मनु. अ. ७॥

ज्या ठिकाणीं सुंदर जंगल आहे व धनधान्य उत्तम प्रकारें उत्पन्न होऊं शकतें अशा ठिकाणीं (धनुर्दुर्गम्) धनुर्धारी पुरुषांनीं युक्त (महीदुर्गम्) भुईकोट किल्ला बांधावा, त्याच्या सभोंवतीं (अब्दुर्गम्) पाण्यानें पूर्ण भरलेला खंदक असावा. तसेंच (वार्क्षम्) चारहि बाजूंला वन असावें, (नृदुर्गम्) चारहि बाजूंला सेना असावी. (गिरिदुर्गम्) चारहि बाजूंला पहाड असून जी मध्यें जागा असते त्या ठिकाणीं कोट बांधून नगर वसवावें, नगराच्या चारहि बाजूंला प्रकोट किंवा प्राकार असावेत; कारण प्राकाराच्या आश्रयानें असणारा धनुर्धारी शक्तियुक्त एक वीर शंभर मनुष्यांशीं लढूं शकतो. शंभर वीर दहा हजारांवरोवर युद्ध करूं शकतात; यासाठीं दुर्ग बांधणें उचित आहे.

दुर्ग कसा असावा.

तत्स्यादायुधसंपन्नं धनधान्येन वाहनैः ॥
ब्राह्मणैः शिल्पिभिर्यन्त्रैर्यवसेनोदकेन च ॥ ७५ ॥
तस्य मध्ये सुपर्याप्तं कारयेद्गृहमात्मनः ॥
गुप्तं सर्वर्तुकं शुभ्रं जलवृक्षसमन्वितम् ॥ ७६ ॥ म० अ० ७॥

त्या किल्ल्यामध्यें शस्त्रास्त्रें, धन, धान्यें, वाहनें, ब्राह्मण (कीं जे उपदेश करण्यास योग्य असतील ते), शिल्पी–कारागीर, यंत्रें–नाना प्रकारच्या कला, (यवसेन) चारा, गवत वगैरे, व त्याचप्रमाणें पाण्याचा पुरवठा इतक्या गोष्टी असाव्या. याच्या मध्यभागीं जल, वृक्ष, पुष्पादि सर्व पदार्थांनीं युक्त, सर्व ऋतूंमध्यें सुखकारक, श्वेतवर्ण व सर्व राजकार्य करण्यास पुरेल असें विस्तृत गृह आपणासाठीं तयार करावें.

तदध्यास्योद्वहेद्भार्यां सवर्णां लक्षणान्विताम् ॥
कुले महति संभूतां हृद्यां रूपगुणान्विताम् ॥ ७७ ॥
पुरोहितं च कुर्वीत वृणुयादेव चर्त्विजम् ॥
तस्य गृह्याणि कर्माणि कुर्युर्वै तानि कानि च ॥ ७८ ॥
मनु० अ० ७

याप्रमाणें ब्रह्मचर्यामध्यें विद्या शिकून इतकें राजकार्य केल्यानंतर सौंदर्ययुक्त, गुणयुक्त, आपल्याला प्रिय, उत्तम कुलांत उत्पन्न झालेली, सुंदर लक्षणांनीं युक्त, क्षत्रिय कुलांतील कन्या जी आपल्याप्रमाणेंच विद्यादिगुणांनीं युक्त असेल, अशा

एकाच स्त्रीशीं विवाह करावा. दुसऱ्या कोणत्याहि स्त्रियांशीं विवाहसंबंध–अर्थात् कामसंबंध–ठेवूं नये. पुरोहित व ऋत्विज् यांना अशासाठीं नेमावें कीं, त्यानीं अग्निहोत्र व पक्षेष्टी इत्यादि राजघरांतील सर्व धार्मिक कृत्यें करावींत; व आपण सदैव राजकार्यामध्यें तत्पर रहावें. राजाचें हेंच संध्योपासनादि काम आहे कीं, त्यानें रात्रंदिवस राजकार्यामध्यें प्रवृत्त रहावें व कोणतेंहि राजकार्य विघडूं न द्यावें.

राज्यव्यवस्थेचे सामान्य नियम.

सांवत्सरिकमाप्तैश्च राष्ट्रादाहारयेद्बलिम् ॥
स्याच्चाम्नायपरो लोके वर्तेत पितृवन्नृषु ॥ ८० ॥
अध्यक्षान् विविधान् कुर्यात् तत्र तत्र विपश्चितः ॥
तेऽस्य सर्वाण्यवेक्षेरन् नृणां कार्याणि कुर्वताम् ॥ ८१ ॥
आवृत्तानां गुरुकुलाद्विप्राणां पूजको भवेत् ॥
नृपाणामक्षयो ह्येष निधिर्ब्राह्मोऽभिधीयते ॥८२॥ म. अ. ७

राजानें वार्षिक कर आप्त—विद्वान्–पुरुषांच्या द्वारें ग्रहण करावा. सभापति राजानें लोकांमध्यें वेदानुकूल वागावें व लोकांचें पित्याप्रमाणें पालन करावें. राजसभेनें राजकार्य उत्तम रीतीनें करण्यासाठीं अनेक विद्वान् अध्यक्षांची योजना करावी. या अध्यक्षांचें काम हें आहे कीं, राजकार्य करण्यास नेमलेले पुरुष आपआपलीं कामें नीट रीतीनें करीत आहेत कीं नाहीं, तें पाहणें. जे योग्य रीतीनें कामें करतील त्यांचा सत्कार करणें व जे अयोग्य रीतीनें करतील त्यांस दंड देणें. वेदप्रचार हें राजांचें मुख्य काम आहे, तें करण्यासाठीं राजानें नेहमीं तयार असावें. जो कोणी ब्रह्मचर्य पालन करून वेदादि शास्त्रें शिकून गुरुकुलांतून येईल त्याचा राजानें सत्कार करावा. त्याचप्रमाणें जो उत्तम रीतीनें शिकवून विद्यार्थ्यांना विद्वान् करतो त्याचाहि सत्कार करावा. अशा करण्यानें राज्यामध्यें विद्येचा प्रसार होतो.

युद्धव्यवस्था.

समोत्तमाधमै राजा त्वाहूतः पालयन् प्रजाः ॥
न निवर्तेत संग्रामात् क्षात्रं धर्ममनुस्मरन् ॥ ८७ ॥
आहवेषु मिथोऽन्योऽन्यं जिघांसन्तो महीक्षितः ॥
युध्यमानाः परं शक्त्या स्वर्गं यान्त्यपराङ्मुखाः ॥८९॥ अ.म. ७

जेव्हां आपल्या प्रजांचें यथायोग्यरीतीनें पालन करणाऱ्या राजाला, त्यापेक्षां लहान, बरोबरीचा किंवा मोठा, युद्धासाठीं आव्हान करील, तेव्हां क्षत्रियांच्या धर्माचें

स्मरण करून, त्यानें युद्धापासून परावृत्त होऊं नये. चातुर्यानें युद्ध करून आपला विजय होईल असें करावें. संग्रामामध्यें परस्परांला ठार मारण्यास प्रवृत्त होणारे, निर्भय होऊन युद्ध करणारे व केव्हांहि युद्धांतून न पळून जाणारे, जे क्षत्रिय असतात, त्यांनां सुख प्राप्त होतें. युद्धांतून केव्हांहि पळूं नये; पण केव्हां केव्हां शत्रूला जिंकण्यासाठीं त्याला हुलकावणी देणें उचित असतें अशा प्रसंगीं जें योग्य असेल तें करावें. एकदम पुढें चाल करून जाऊन आपला आपण तोटा करून घेणें योग्य नाहीं. तात्पर्य ज्या रीतीनें आपला विजय होईल त्या रीतीचा अवलंब करावा.

न च हन्यात्स्थलारूढं न क्लीबं न कृताञ्जलिम् ॥
न मुक्तकेशं नासीनं न तवास्मीति वादिनम् ॥ ९१ ॥
न सुप्तं न विसन्नाहं न नग्नं न निरायुधम् ॥
नायुध्यमानं पश्यन्तं न परेण समागतम् ॥ ९२ ॥
नायुधव्यसनं प्राप्तं नार्तं नातिपरिक्षतम् ॥
न भीतं न परावृत्तं सतां धर्ममनुस्मरन् ॥ ९३ ॥

म० अ० ७

इकडे तिकडे युद्ध पहात उभे असणारे, क्लीब, हात जोडणारे, डोकीचे केश ज्यांचे सुटले आहेत, बसलेले, "मी तुला शरण आलों" असें बोलणारे, निजलेले, मूर्छा आलेले, नग्न, आयुधरहित, युद्ध न करतां केवळ पाहत असलेले, शत्रूच्या बरोबर आलेले (पण त्याला सहाय्य न करणारे), आयुधांच्या प्रहारानें पीडित, दुःखी, अत्यंत घायाळ, भ्यालेले, पळत असलेले अशा प्रकारच्या लोकांनां, सज्जनांच्या धर्माचें स्मरण करून, वीर पुरुषांनीं मारूं नये; पण त्यांना पकडून नजर कैदेंत ठेवावें व त्यांच्या खाण्यापिण्याचा बंदोबस्त नीट ठेवावा. जे जखमी झालेले असतील त्यांना चिडवूं नये किंवा दुःखहि देऊं नये पण त्यांच्या औषधपाण्याची नीट व्यवस्था लावावी. त्यांच्या संबंधीं जीं जीं योग्य कामें असतील तीं तीं करावीं. स्त्री, बालक, वृद्ध व आतुर यांच्यावर शस्त्र चालवूं नये. कैद केलेल्या शत्रूच्या बालकांना आपल्या संतानाप्रमाणें पाळावें. स्त्रियांनां आपल्या भगिनींच्या ठिकाणीं समजून त्यांचा योग्य परिपाल करावा. विषयेच्छेनें त्यांच्याकडे कधींहि पाहूं नये. जेव्हां राज्यांत चहूंकडे फिरून शांतता होईल व पुनः युद्धाची आशंका राहणार नाहीं, तेव्हां त्यांनां सोडून द्यावें. ज्यांच्यापासून पुढें विघ्न उत्पन्न होईल असें वाटेल त्यांनां सदैव कारागृहामध्यें ठेवावें.

यस्तु भीतः परावृत्तः सङ्ग्रामे हन्यते परैः ॥
भर्तुर्यद्दुष्कृतं किंचित् तत्सर्वं प्रतिपद्यते ॥ ९४ ॥
यच्चास्य सुकृतं किंचित् अमुत्रार्थमुपार्जितम् ॥
भर्ता तत्सर्वमादत्ते परावृत्तहतस्य तु ॥९५॥ म. अ. ७ ॥

जो समरांगणांतून भिऊन पळतो, किंवा पळत असतां मारला जातो, त्याला त्याच्या धन्याचे अपराध लागतात व त्यामुळें त्याला दंड भोगावा लागतो. तसेंच जें त्याचें सुकृत असतें-कीं ज्याच्यापासून त्याला इहपरलोकीं सुख मिळालें असतें तें-त्याच्या स्वामीला प्राप्त होतें; अर्थात् युद्धांतून पळून जाणाऱ्याला कोणत्याच प्रकारें सुख प्राप्त होत नाहीं, त्याचें सर्व पुण्यफल नष्ट होऊन जातें, त्याची प्रतिष्ठा होत नाहीं. पण जो योग्य रीतीनें युद्ध करतो त्याची मानमान्यता वाढते.

रथाश्वं हस्तिनं छत्रं धनं धान्यं पशून् स्त्रियः ॥
सर्वद्रव्याणि कुप्यं च यो यज्जयति तस्य तत् ॥९७॥
राज्ञश्च दद्युरुद्धारमिषेषा वैदिकी श्रुतिः ॥
राज्ञा च सर्वयोद्धेभ्यो दातव्यमपृथग्जितम् ॥ ९७ ॥
मनु. अ. ७।

लढाईमध्यें रथ, घोडे, हत्ति, छत्र, धन, धान्य, पशु, स्त्रिया, सर्वप्रकारचीं द्रव्यें व तेलतूपाचे वुदले इत्यादि पदार्थ जे ज्याला मिळतील ते त्यानें घ्यावे. हा नियम कोणीहि मोडूं नये. सैन्यांतील लोकांनींहि आपण जिंकलेल्या पदार्थांपैकीं सोळावा भाग राजाला द्यावा; त्याचप्रमाणें जें धन सर्वांनीं मिळून जिंकून आणलें असेल त्याचा सोळावा हिस्सा राजानें सेनानायकांना द्यावा. जो लढाईमध्यें मरण पावला असेल त्याच्या स्त्रीला अगर पुत्राला त्या मिळालेल्या संपत्तीचा कांहीं भाग द्यावा. त्याच्या स्त्रीचें व अज्ञान अर्भकाचें यथावत् पालन करावें. जेव्हां तीं मुलें योग्य व समर्थ होतील तेव्हां त्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणें अधिकार द्यावे. जो आपल्या राज्याची वृद्धि व्हावी, आपला विजय व्हावा व आपला उत्कर्ष व्हावा असें इच्छित असेल त्यानें हे वरील नियम पूर्णपणें पाळावे.

पुरुषार्थाची पराकाष्ठा.

अलब्धं चैव लिप्सेत लब्धं रक्षेत्प्रयत्नतः ॥
रक्षितं वर्धयेच्चैव वृद्धं पात्रेषु निःक्षिपेत् ॥ ९९ ॥

अलब्धमिच्छेद्दण्डेन लब्धं रक्षेदवेक्षया ॥
रक्षितं वर्द्धयेद् वृद्ध्या वृद्धं दानेन निक्षिपेत् ॥ १०१ ॥
॥ मनु. अ. ७ ॥

राजा, राजसभा (व इतर पुरुषार्थी लोक) यांनीं अलब्ध वस्तूची प्राप्ति करून घेण्याची इच्छा धरावी; प्राप्त झालेल्याचें प्रयत्नानें रक्षण करावें; रक्षित पदार्थांची वाढ होईल अशी योजना करावी व वाढलेल्या धनाचा विनियोग-वेदविद्याप्रचार, धर्मप्रचार विद्यार्थ्यांला सहाय्य, वैदिकमार्गाचा प्रसार करण्यासाठीं उपदेशक पाठविणें, असमर्थ व अनाथ जे असतील त्यांचें पालन इत्यादि योग्य कृत्यें करण्यांत करावा. हे चार प्रकार करणें हेंच आपलें उद्देश्य आहे असें समजून व आळस सोडून यांचें नित्य अनुष्ठान करीत असावें. दुसऱ्याला दंड करून अप्राप्त वस्तु प्राप्त करून घ्यावी, तीवर नित्य देखरेख करून प्राप्त झालेल्याचें रक्षण करावें, व्याज वगैरे उपायांनीं तिची वृद्धि करावी, व अशा रीतीनें वाढलेल्या द्रव्यादि पदार्थांचा विनियोग दुसऱ्यांला पूर्वोक्त कामांत सहाय्य करण्याकडे करावा.

दक्षता.

अमायय्यैव वर्तेत न कथञ्चन मायया ॥
बुद्ध्येतारिप्रयुक्तां च मायां नित्यं स्वसंवृतः ॥ १०४ ॥
नास्य छिद्रं परो विद्याच्छिद्रं विद्यात्परस्य तु ॥
गूहेत्कूर्म इवाङ्गानि रक्षेद्विवरमात्मनः ॥ १०५ ॥
बकवच्चिन्तयेदर्थान् सिंहवच्च पराक्रमेत् ॥
वृकवच्चावलुम्पेत शशवच्च विनिष्पतेत् ॥ १०६ ॥
एवं विजयमानस्य येऽस्य स्युः परिपन्थिनः ॥
तानानयेद्वशं सर्वान् सामादिभिरुपक्रमैः ॥ १०७ ॥
मनु. अ. ७ ।

निष्कपटीपणानें सर्वांबरोबर व्यवहार करावा. कोणत्याहि प्रकारचें कपट करूं नये, आपलें रक्षण व्हावें म्हणून नित्य दक्षतेनें शत्रूनें केलेलें कपट जाणावें. आपलीं छिद्रें अर्थात् आपली निर्बलता शत्रूला समजूं देऊं नये; पण शत्रूची मात्र आपण समजून घ्यावी. ज्याप्रमाणें कांसव आपलीं अंगें झांकून ठेवितो; त्याप्रमाणेंच आपलीं छिद्रें व वर्मस्थानें गुप्त ठेवावीं. ज्याप्रमाणें बगळा ध्यानस्थ होऊन पुढें आलेला मासा पटकन् गिळून टाकतो

त्याप्रमाणें द्रव्यसंग्रहासंबंधीं नेहेमीं विचार करावा. द्रव्यादिपदार्थांची व बलाची वृद्धि करण्यासाठीं व शत्रूला जिंकण्यासाठीं सिंहाप्रमाणें प्रयत्न करावा. लांडग्या व चित्त्याप्रमाणें लपून छपून शत्रूंला पकडावें. जर अत्यंत बलवान् शत्रु जवळ आला असेल तर सशाप्रमाणें दूर पळून जावें (व त्यावर एकदम छापा घालावा.) याप्रमाणें विजय करणाऱ्या सभापतीच्या राज्यांत जे कोणी दुष्ट डाकु किंवा लुटारू असतील व राजाचे जे कोणी शत्रू असतील, त्यांना सामादि उपायांनीं वश करून घ्यावें. हे उपाय चार आहेत. (१) **साम**—शांततेनें स्नेह करून राहणें, (२) **दाम**—कांहीं देऊन त्यांना शांत करणें, (३) **भेद**—फंद फितुरी, फोड तोड करून शत्रूला वश करणें व जर हे तीनहि उपाय साधले नाहींत तर (४) **दण्ड**—शिक्षा किंवा युद्ध करून त्यांना वश करून घेणें. याप्रमाणें हे चार उपाय आहेत.

राष्ट्राची स्वस्थता व राज्यक्रांति यांचीं कारणें.

यथोद्धरति निर्दाता कक्षं धान्यं च रक्षति ॥
तथा रक्षेन्नृपो राष्ट्रं हन्याच्च परिपन्थिनः ॥ ११० ॥
मोहाद्राजा स्वराष्ट्रं यः कर्षयत्यनवेक्षया ॥
सोचिराद्भ्रश्यते राज्याज्जीविताच्च सबान्धवः ॥१११॥
शरीरकर्षणात्प्राणाः क्षीयन्ते प्राणिनां यथा ॥
तथा राज्ञामपि प्राणाः क्षीयन्ते राष्ट्रकर्षणात् ॥११२॥

ज्याप्रमाणें धान्याचा व्यापारी दगडकोंड्याचा त्याग करून धान्याचें रक्षण करतो, त्याचप्रमाणें राजानें दुष्ट लोकांना शिक्षा करून सज्जनांचें व राष्ट्राचें उत्तम रीतीनें पालन करावें म्हणजे राष्ट्र सुस्थितींत राहतें. पण जो राजा अविचारानें आपल्या राष्ट्राला कष्ट देतो व लोकांना त्रास देतो, त्याचा बंधुवर्गासहवर्तमान पूर्ण नाश होतो व त्याच्या हातांतून राजसत्ताहि नाहींशी होते. ज्याप्रमाणें शरीराला दुर्बल करण्यानें व फार त्रास देण्यानें प्राण नाहींसे होतात तद्वतच राज्याला क्षीण करण्यानें किंवा प्रजेला दुःख देण्यानें राजांचे प्राण नाहींसे होतात.

राष्ट्राचें रक्षण कसें करावें?

राष्ट्रस्य संग्रहे नित्यं विधानमिदमाचरेत् ॥
सुसंगृहीतराष्ट्रो हि पार्थिवः सुखमेधते ॥ ११३ ॥
द्वयोस्त्रयाणां पञ्चानां मध्ये गुल्ममधिष्ठितम् ॥
तथा ग्रामशतानां च कुर्याद्राष्ट्रस्य संग्रहम् ॥ ११४ ॥

ग्रामस्याधिपतिं कुर्याद्दशग्रामपतिं तथा ॥
विंशतीशं शतेशं च सहस्रपतिमेव च ॥ ११५ ॥

राजा व राजसभा यांनीं राजकार्याविषयीं असा प्रयत्न करावा कीं, ज्याच्या योगानें राज्याचें रक्षण होईल व प्रजेला सुख प्राप्त होईल. जो राजा राज्यपालनामध्यें तत्पर असतो व ज्याची प्रजा सुखी असते त्याला अत्यंत सुख मिळतें. राज्याचा बंदोबस्त नीट करण्यासाठीं दोन, तीन, पांच व शंभर गांवांच्या ठिकाणीं राज्यस्थान करून, ग्रामसंख्येप्रमाणें व कामाप्रमाणें योग्य अधिकारीवर्ग नेमून सर्व राज्याचें उत्तम प्रकारें रक्षण करावें. दरएक गांवांमध्यें एक एक अधिकारी नेमावा. पुनः दर दहा गांवांवर एक नेमावा, पुनः वीस गांवांवर तिसरा नेमावा, पुनः शंभर गांवांवर चवथा नेमावा व हजार गांवांवर पांचवा नेमावा. याप्रमाणें अधिकारी नेमून कारभार चालवावा. सध्यांच्या राज्यव्यवस्थेमध्येंहि असाच प्रकार आहे, दरएक गांवाला एक पाटील-पटवारी असतो, दहा गांवांवर एक ठाणेदार असतो, प्रत्येक दोन ठाण्यांवर एक मोठा ठाणेदार असतो, पांच ठाण्यांवर एक तहसीलदार, दहा तहसीली मिळून एक जिल्हा होतो व प्रत्येक जिल्ह्याला एक मोठा अम्मलदार असतो. ही व्यवस्थाहि मन्वादि धर्मशास्त्रांवरूनच घेतलेली आहे. असो.—

ग्रामदोषान् समुत्पन्नान् ग्रामिकः शनकैः स्वयम् ॥
शंसेद्ग्रामदशेशाय दशेशो विंशतीशिनम् ॥ ११६ ॥
विंशतीशस्तु तत्सर्वं शतेशाय निवेदयेत् ॥
शंसेद्ग्रामशतेशस्तु सहस्रपतये स्वयम् ॥ ११७ ॥

पूर्वी सांगितल्याप्रमाणें प्रबंध करून अशी आज्ञा करावी कीं, जे जे दोष ग्रामांमध्यें उत्पन्न होतील, ते ते गुप्तपणानें ग्रामपतीनें दशग्रामपतीला सांगावे; त्यानें वीस गांवांच्या अधिकाऱ्याला ते कळवावे; त्यानें आपल्या वीस गांवांतील वर्तमान शतग्रामाधिपतीला कळवावें; त्यानें आपल्या शंभर गांवांतील वर्तमान सहस्रग्रामाधिपतीला नित्य कळवीत जावें. वीस वीस ग्रामांच्या पांच अधिकाऱ्यांवर शंभर गांवांचा एक अधिकारी असतो; म्हणून वीस वीस गांवांच्या पांच अधिकाऱ्यानीं आपल्या वरिष्ठ शतग्रामपतीला आपल्या गांवांतील वर्तमान कळवावें. शतग्रामपतीनें सहस्रग्रामपतीला विदित करावें; त्यानें दशसहस्र ग्रामपतीला कळवावें, त्यांनीं त्यांनीं आपआपलें वृत्त एकलक्ष गांवांवर नेमलेल्या राजसभेला कळवावें व या अशा लक्षग्रामाधिष्ठित राजसभांनीं सार्वभौम–चक्रवर्ती-महाराज-सभेला आपआपलें वृत्त

विदित करावें; व याप्रमाणें सर्व भूमंडलाचें नियंत्रण व प्रतिपालन उत्तम रीतीनें करावें.

तेषां ग्राम्याणि कार्याणि पृथक्कार्याणि चैव हि ॥
राज्ञोऽन्यः सचिवः स्निग्धस्तानि पश्येदतन्द्रितः ॥१२०॥
नगरे नगरे चैकं कुर्यात्सर्वार्थचिन्तकम् ॥
उच्चैःस्थानं घोररूपं नक्षत्राणामिव ग्रहम् ॥ १२१ ॥
स ताननुपरिक्रामेत् सर्वानेव सदा स्वयम् ॥
तेषां वृत्तं परिणयेत् सम्यग्राष्ट्रेषु तच्चरैः ॥ १२२ ॥

पूर्वी सांगितलेले जे ग्रामाधीशादिक त्यांच्यावर राजसभेमधील नेमलेला जो राजाचा (प्रतिनिधि) सचिव त्यानें आळस सोडून प्रेमानें सर्व न्यायाधीशादि राजपुरुष आपआपलीं कामें योग्य करीत आहेत कीं नाहींत तें फिरतीवर जाऊन पहावें. प्रत्येक मोठमोठ्या नगरामध्यें एक कार्यविचार करणारी सभा स्थापावी व ती भरण्याचें ठिकाण सुंदर, उंच, विशाल, व चंद्राप्रमाणें शोभायमान् असें असावें. या सभेमध्यें जे जे उत्तम विद्वान् असतील व विद्येच्या योगानें कार्याकार्यनिर्णय करण्यास समर्थ असतील, त्यांना नेमावें व त्यांनीं तेथें जमून विचार करावा, राजा व प्रजा यांना काय हितकर आहे तें पहावें व त्या त्या नियमांचा प्रकाश करावा. ज्या सभापतीला नित्य, फिरतीच्या कामावर नेमलें असेल, त्याच्या हाताखालीं गुप्त हेर पुष्कळ द्यावे. हे चार भिन्न भिन्न जातीचे असावे. या हेरांकडून त्यानें सर्व राजपुरुषांचे व प्रजांचे सर्व गुणदोष गुप्तपणानें जाणावे व जे अपराधी असतील त्यांस शिक्षा करावी व जे गुणी असतील त्यांचा सन्मान करावा.

राज्ञो हि रक्षाधिकृताः परस्वादायिनः शठाः ॥
भृत्या भवन्ति प्रायेण तेभ्यो रक्षेदिमाः प्रजाः ॥ १२३ ॥
ये कार्यिकेभ्योऽर्थमेव गृह्णीयुः पापचेतसः ॥
तेषां सर्वस्वमादाय राजा कुर्यात् प्रवासनम् ॥ १२४ ॥

मनु० ७ ।

राजानें धार्मिक, कुलीन व सुपरीक्षित विद्वानांलाच अधिकारी नेमावें; व त्यांच्या हाताखालीं जसे चांगले लोक नेमावे तसेच कांहीं शठ, डाकू किंवा परस्वाचें हरण करणारे लोक असतील त्यांनाहि नेमून त्यांचे दुर्गुण जाऊन ते सद्गुणी होतील असें

करावें. अशा रीतीनें प्रजारक्षण करीत असावें. जे राजपुरुष वादिप्रतिवादींकडून गुप्त रीतीनें लांच घेऊन अन्याय करतात, त्यांचें सर्वस्व हरण करून त्यांना योग्य दंड करून व हद्दपार करून, त्यांना अशा ठिकाणीं नेऊन ठेवावें कीं, त्या ठिकाणाहून ते परत येऊं शकणार नाहींत. अशा लांचखाऊ दुष्ट पुरुषांना जर दंड दिला नाहीं तर इतर लोकांनाहि तसा अन्याय करण्यास उत्तेजन येईल व दुसरे राजपुरुषहि अन्याय करूं लागतील, म्हणून त्यांना योग्य दंड करावा. राजपुरुषांना जें वेतन द्यावयाचें तें असें असावें कीं, त्या योगानें त्यांचा योगक्षेम चांगला चालेल व साधारणपणें ते धनाढ्यहि होतील; त्यांना मासिक किंवा वार्षिक वेतन द्यावें किंवा तहांहयात भूमीचें उत्पन्न तोडून द्यावें. राजपुरुष वृद्ध होऊन काम करण्यास असमर्थ झाले म्हणजे त्यांना अर्धा पगार देऊन विश्रांति घेण्यास सांगावें. हा पगार ते जिवंत असेपर्यंतच मिळत जावा. त्यांच्या मुलांना त्यांच्या गुणांप्रमाणें नोकरी द्यावी. जर त्यांचे बालक अल्पवयी असतील तर किंवा स्त्रिया जीवंत असतील तर त्यांचीहि योग्य व्यवस्था सरकारांतून द्रव्य वगैरे देऊन करावी. पण जर त्यांच्या स्त्रिया किंवा मुलें कुकर्म करणारीं होतील तर त्यांना कांहींएक देऊं नये. याप्रमाणें राज्याचा बंदोबस्त करावा.

करग्रहण.

यथा फलेन युज्येत राजा कर्ता च कर्मणाम् ॥
तथावेक्ष्य नृपो राष्ट्रे कल्पयेत्सततं करान् ॥ १२८ ॥
यथाल्पाऽल्पमदन्त्याद्यं वार्य्योकोवत्सषट्पदाः ॥
तथाल्पाल्पो ग्रहीतव्यो राष्ट्राद्राज्ञाब्दिकः करः ॥ १२९ ॥
नोच्छिद्यादात्मनो मूलं परेषां चातितृष्णया ॥
उच्छिन्दन्ह्यात्मनो मूलमात्मानं तांश्च पीडयेत् ॥ १३९ ॥

म. अ० ७

राजा, राजपुरुष व प्रजाजन यांना योग्य फल मिळून आनंद व्हावा व सुख व्हावें हा उद्देश मनांत धरून राजा व राजसभा यानीं योग्य विचार करून कर घेण्याचें ठरवावें. ज्याप्रमाणें जळू, वासरूं व भुंगा हे आपल्या भोग्य पदार्थांचें थोडें थोडें ग्रहण करतात; त्याचप्रमाणें प्रजेकडून राजानें वार्षिक कर थोडा थोडा घ्यावा. अतिलोभानें दुसऱ्यांच्या व आपल्या सुखाच्या मूलाचा नाश कधींहि करूं नये; कारण जो सुखाचा उच्छेद करतो तो दुसऱ्यांना व आपणास्वत:ला त्रासच देतो; असें म्हणण्यास हरकत नाहीं.

तीक्ष्णश्चैव मृदुश्च स्यात्कार्यं वीक्ष्य महीपतिः ॥
तीक्ष्णश्चैव मृदुश्चैव राजा भवति संमतः ॥ १४० ॥
एवं सर्वं विधायेदमितिकर्तव्यमात्मनः ॥
युक्तश्चैवाप्रमत्तश्च परिरक्षेदिमाः प्रजाः ॥ १४२ ॥

जो राजा कार्याकार्य पाहून कोमल व तीक्ष्ण होतो तो अपराध्यांवर तीक्ष्णता व सज्जनांवर कोमलता करीत असल्यामुळें सर्वांला प्रिय होतो. याप्रमाणें राज्याचा प्रबंध करून सदोदित लक्षपूर्वक आचरण करून व चुका न करतां निरंतर प्रजांचें पालन करावें.

विक्रोशन्त्यो यस्य राष्ट्राद्धियन्ते दस्युभिः प्रजाः ॥
सम्पश्यतः सभृत्यस्य मृतः स न तु जीवति ॥ १४३ ॥
क्षत्रियस्य परो धर्मः प्रजानामेव पालनम् ॥
निर्दिष्टफलभोक्ता हि राजा धर्मेण युज्यते ॥ १४४ ॥

मनु० ७.

ज्या राजाच्या राज्यांतील प्रजा रोदन करीत असतात व राजा राज्य करीत असतां चोर, लुटारू व डाकू लोक प्रजांच्या सर्वस्वाचें व प्राणांचेंहि हरण करीत असतात, तो राजा अमात्यगणासहवर्तमान मेलेलाच आहे असें समजावें, व तो जीवंत नसून महद्दुःख भोगण्यास योग्य आहे असें समजावें. वास्तविक पाहतां प्रजांचें पालन करणें हाच क्षत्रियांचा व राजाचा परम धर्म आहे. मनुस्मृतीच्या सातव्या अध्यायामध्यें ज्या रीतीनें कर घ्यावा असें सांगितलें आहे त्या रीतीनें व राजसभा नियत करील तेवढाच कर घेणारा राजा धार्मिकत्वाला जाऊन सुखी होतो. याशिवाय अन्य प्रकारांनीं जास्त कर घेऊन लोकांना त्रास देणारे राजे दुःखाला प्राप्त होतात.

राजाची दिनचर्या.

उत्थाय पश्चिमे यामे कृतशौचः समाहितः ॥
हुताग्निर्ब्राह्मणांश्चार्च्य प्रविशेत्स शुभां सभाम् ॥ १४५ ॥
तत्र स्थिताः प्रजाः सर्वाः प्रतिनन्द्य विसर्जयेत् ॥
विसृज्य च प्रजाः सर्वा मन्त्रयेत्सह मन्त्रिभिः ॥ १४६ ॥

पहांटेची प्रहर रात्र शेष राहिली म्हणजे उठून शौचमुखमार्जनादि क्रिया कराव्यात नंतर स्नान करून परमेश्वराचें ध्यान, अग्निहोत्र, धार्मिक विद्वानांचा सत्कार वगैरे

करून नंतर राजसभेमध्यें प्रवेश करावा. त्याठिकाणीं आलेल्या प्रजाजनांचा सन्मान करून त्यांस निरोप द्यावा व नंतर मुख्य मन्त्र्यांसहवर्तमान राज्यव्यवस्थेविषयीं विचार करावा. विचार करावयाचा असतां एकांत जागेमध्यें बसावें. पहा—

गिरिपृष्ठं समारुह्य प्रासादं वा रहोगतः ॥
अरण्ये निःशलाके वा मंत्रयेदविभावितः ॥ १४७ ॥
यस्य मन्त्रं न जानन्ति समागम्य पृथग्जनाः ॥
स कृत्स्नां पृथिवीं भुङ्क्ते कोशहीनोऽपि पार्थिवः ॥१४८॥

मनु. ७

मन्त्र्यांसह फिरावयास जावें, डोंगरावर जाऊन बसावें, अरण्यांत जावें किंवा राजवाड्यांत अगदीं एकांतांत बसावें. तात्पर्य जेथें एक शलाकाहि नसेल अशा एकांत जागीं मन्त्र्यांसह विचार करावा. पुष्कळ मंडळी जमूनसुद्धां ज्या राजाचे गुप्त बेत बाहेर फुटत नाहींत, अर्थात् ज्या राजाचे विचार गंभीर, शुद्ध व परोपकारमय असून नेहेमीं गुप्त असतात, त्या राजाजवळ जरी धन नसलें तथापि तो सर्व पृथिवीचें राज्य उत्तम रीतीनें चालविण्यास योग्य असतो; म्हणून मन्त्र्यांच्या व राजसभेच्या सभासदांच्या ऐकमतानेंच जें काय करणें तें करावें व सर्व विचार गुप्त ठेवावे.

संधि व विग्रह.

आसनं चैव यानं च संधिं विग्रहमेव च ॥
कार्यं वीक्ष्य प्रयुञ्जीत द्वैधं संश्रयमेव च ॥ १६१ ॥
संधिं तु द्विविधं विद्याद् राजा विग्रहमेव च ॥
उभे यानासने चैव द्विविधः संश्रयः स्मृतः ॥ १६२ ॥

राजा व इतर सर्व राजपुरुष यांनीं हें लक्षांत ठेवावें कीं, (आसनम्) सैन्यासह स्वस्थ बसणें, (यानम्) शत्रूवर हल्ला किंवा चढाई करणें, (सन्धिम्) मित्रता करणें, (विग्रहम्) दुष्ट शत्रूशीं लढाई करणें, (द्वैधम्) सैन्याची रचना दोन प्रकारची करून आपला विजय करून घेणें, (संश्रयम्) स्वतः निर्बल असतां दुसऱ्या प्रबल राजाचा आश्रय करून आपलें कार्य साधणें, ह्या सहा प्रकारांचा योग्य वेळीं उपयोग करावा. आसन, यान, संधि, विग्रह, द्वैधीभाव व संश्रय या सहा प्रकारांचे प्रत्येकीं दोन दोन भेद आहेत.

समानयानकर्मा च विपरीतस्तथैव च ॥
तदा त्वायतिसंयुक्तः संधिर्ज्ञेयो द्विलक्षणः ॥ १६३ ॥

स्वयंकृतश्च कार्यार्थमकाले काल एव वा ॥
मित्रस्य चैवापकृते द्विविधो विग्रहः स्मृतः ॥ १६४ ॥

(संधिः) शत्रूशीं मित्रता करावी किंवा विपरीतता करावी, परंतु वर्तमान व भविष्यकालीं करावयाचीं कामें निर्धास्तपणानें करीत जावें. याला द्विविध संधि असें म्हणतात. (विग्रहः) कार्यसिद्धि होण्यासाठीं उचित समयीं किंवा अनुचित समयीं स्वतःच्या शत्रूशीं विरोध करणें किंवा आपल्या मित्राला ग्रास देणाऱ्या शत्रूशीं विरोध करणें, हे दोन प्रकारचे विग्रह आहेत.

एकाकिनश्चात्ययिके कार्ये प्राप्ते यदृच्छया ॥
संहतस्य च मित्रेण द्विविधं यानमुच्यते ॥ १६५ ॥
क्षीणस्य चैव क्रमशो दैवात्पूर्वकृतेन वा ॥
मित्रस्य चानुरोधेन द्विविधं स्मृतमासनम् ॥ १६६ ॥

(यानम्) कोणतेंहि कार्य सिद्ध करण्यासाठीं आपण एकट्यानें किंवा मित्राला बरोबर घेऊन शत्रूवर अकस्मात् चाल करणें हीं दोन प्रकारचीं यानें आहेत. (आसनम्) स्वतः क्षीण झाल्यानें किंवा बलहीन असल्यामुळें स्वस्थ राहणें अथवा मित्राच्या अनुरोधानें स्वस्थ राहणें हीं दोन प्रकारचीं आसनें आहेत.

बलस्य स्वामिनश्चैव स्थितिः कार्यार्थसिद्धये ॥
द्विविधं कीर्त्यते द्वैधं षाड्गुण्यगुणवेदिभिः ॥ १६७ ॥
अर्थसंपादनार्थंच पीड्यमानस्य शत्रुभिः ॥
साधुषु व्यपदेशार्थं द्विविधः संश्रयः स्मृतः ॥ १६८ ॥

(द्वैधम्) सेनापति व सेना यांचे दोन विभाग करून आपली कार्यसिद्धि करण्यासाठीं विजय संपादन करणें यालाच दोन प्रकारचें द्वैध असें म्हणतात. (संश्रयः) आपल्या इष्ट हेतूंचें साफल्य व्हावें म्हणून बलवान् राजाचा किंवा एखाद्या महात्म्याचा आश्रय करून राहणें व त्यामुळें शत्रूच्या पीडेपासून सुटणें हा दोन प्रकारचा संश्रय आहे.

यदावगच्छेदायत्यामाधिक्यं ध्रुवमात्मनः ॥
तदात्वे चाल्पिकां पीडां तदा संधिं समाश्रयेत् ॥१६९॥
यदा प्रकृष्टा मन्येत सर्वास्तु प्रकृतीर्भृशम् ॥
अत्युच्छितं तथात्मानं तदा कुर्वीत विग्रहम् ॥ १७० ॥

आतां युद्ध केल्यापासून आपला तोटा आहे व मग युद्ध करण्यापासून आपला लाभ सूचित होणार आहे असें जर निश्चयात्मक वाटेल तर अशावेळीं शत्रूशीं संधि करावा व उचित समयापर्यंत धीर धरून रहावें. (यदा०) जेव्हां आपली प्रजा व सेना अत्यंत प्रसन्न, उन्नतियुक्त व श्रेष्ठ असेल; व जेव्हां आपणहि उत्साहयुक्त असेल तेव्हां शत्रूशीं विग्रह—युद्ध—करावें.

यदा मन्येत भावेन हृष्टं पुष्टं बलं स्वकम् ॥
परस्य विपरीतं च तदा यायाद्रिपुं प्रति ॥ १७१ ॥
यदा तु स्यात्परिक्षीणो वाहनेन बलेन च ॥
तदासीत प्रयत्नेन शनकैः सान्त्वयन्नरीन् ॥ १७२ ॥

जेव्हां आपलें सैन्य उत्साहयुक्त व पुष्ट आहे व शत्रूचें बल निर्बल आहे असे समजेल तेव्हांच एकदम यान अर्थात् शत्रूवर चाल करून जावें. (यदा०) जेव्हां आपली सेना बल व वाहनें इत्यादि बाबतींत क्षीण झाली असेल तेव्हां हर प्रयत्नानें शत्रूचें सांत्वन करीत करीत आपण स्वस्थ रहावें.

मन्येतारिं यदा राजा सर्वथा बलवत्तरम् ॥
तदा द्विधा बलं कृत्वा साधयेत्कार्यमात्मनः ॥ १७३ ॥
यदा परबलानां तु गमनीयतमो भवेत् ॥
तदा तु संश्रयेत्क्षिप्रं धार्मिकं बलिनं नृपम् ॥ १७४ ॥

जेव्हां शत्रु बलवान् आहे असें वाटेल तेव्हां आपल्या सैन्याचे दोन विभाग करून आपलें कार्य साधावें. (यदा०) आपल्यावर शत्रूची चढाई लवकर होईल (व तिचा प्रतीकार करण्याचें आपणाकडे सामर्थ्य नाहीं) असें जेव्हां वाटेल तेव्हां लवकर धार्मिक व बलवान् राजाचा आश्रय करावा.

निग्रहं प्रकृतीनां च कुर्याद्योऽरिबलस्य च ॥
उपसेवेत तं नित्यं सर्वयत्नैर्गुरुं यथा ॥ १७५ ॥
यदि तत्रापि संपश्येद्दोषं संश्रयकारितम् ॥
सुयुद्धमेव तत्रापि निर्विशङ्कः समाचरेत् ॥ १७६ ॥

मनु. अ. ७

जो आपल्या प्रजेचा व शत्रूच्या बलाचा निग्रह करूं शकतो त्या पराक्रमी राजाचीच सेवा गुरूप्रमाणें करावी. (यदि०) ज्याचा आपण आश्रय केला असेल त्याच्या कृतींमध्यें जर कांहीं दोष दिसत असले तर निःशंकपणानें युद्धाला सुरुवात करावी. जो राजा धार्मिक असेल त्याच्याशीं मैत्री करावी व जो राजा दुष्ट असेल त्याला जिंकण्यास वरील उपाय योजावेत.

संक्षिप्त राजनीति.

सर्वोपायैस्तथा कुर्यान्नीतिज्ञः पृथिवीपतिः ॥
यथास्याभ्यधिका न स्युर्मित्रोदासीनशत्रवः ॥ १७७ ॥
आयतिं सर्वकार्याणां तदात्वं च विचारयेत् ॥
अतीतानां च सर्वेषां गुणदोषौ च तत्वतः ॥ १७८ ॥

ज्याच्या योगानें आपले मित्र, उदासीन (मध्यस्थ) व शत्रु हे आपणाहून अधिक होणार नाहींत, त्या तऱ्हेचे उपाय राजनीति जाणणाऱ्या राजानें योजावेत. सर्व कर्तव्याविषयीं वर्तमानकालीं काय केलें पाहिजे, भविष्यकालीं काय करावें व भूतकालीं केलेल्या कामांमध्यें गुणदोष काय आहेत हें विचार करून जाणावें.

आयत्यां गुणदोषज्ञस्तदात्वे क्षिप्रनिश्चयः ॥
अतीते कार्यशेषज्ञः शत्रुभिर्नाभिभूयते ॥ १७९ ॥
यथैनं नाभिसंदध्युर्मित्रोदासीनशत्रवः ॥
तथा सर्वं संविदध्यादेष सामासिको नयः ॥ १८० ॥

मनु. ७.

दोषांचें निवारण व गुणांची स्थिरता करण्याचा प्रयत्न करावा. भविष्यकालीं करावयाच्या कामांमध्यें होणारे गुणदोष जाणणारा, वर्तमानकालीं करावयाच्या कामांमध्यें करावयाचें प्रसंगावधान दाखविणारा व भूतकालीं आरंभलेल्या कामांमध्यें करावयाचें शिल्लक काय आहे हें जाणणारा जो राजा असतो, त्याचा शत्रु पराजय करूं शकत नाहींत. (यथे०) आपले मित्र, उदासीन व शत्रु हे आपलें कोणत्याहि रीतीनें नुकसान करूं शकणार नाहींत, अशा रीतीची व्यवस्था न चुकतां करावी हीच संक्षिप्त राजनीति आहे.

लढाईची तयारी कशी करावी ?

कृत्वा विधानं मूले तु यात्रिकं च यथाविधि ॥
उपगृह्यास्पदं चैव चारान् सम्यग्विधाय च ॥ १८४ ॥

संशोध्य त्रिविधं मार्गं षड्विधं च बलं स्वकम् ॥
सांपरायिककल्पेन यायादरिपुरं शनैः ॥ १८५ ॥

जेव्हां राजा शत्रूशीं युद्ध करण्याकरितां जाईल तेव्हां त्यानें प्रथमतः आपल्या राज्याचें रक्षण करण्याची व्यवस्था उत्तम रीतीनें करावी, सेना, यानें, वाहनें, शस्त्रास्त्रें वगैरे शत्रूवर करावयाच्या चढाईची तयारी पूर्ण करावी, गुप्त हेरांनां चोहोंकडचा समाचार आणण्यासाठीं गुप्तपणानें नेमावें व मग शत्रूंवर चढाई करण्यास उठावें. (संशो०) जल, भूमि व आकाश हे तीनहि मार्ग नीट आहेत कीं नाहीं तें पहावें. रथ, अश्व, हत्ती यांच्या सहाय्यानें भूमार्गावरून, नौकांतून जलमार्गानें व विमानांतून आकाशमार्गानें जावें. पायदळ, घोडेस्वार, हत्तीस्वार, शस्त्रवान् व अस्त्रवान् रथी, कोश व नोकर चाकर या सहा प्रकारच्या बलासह–त्यांची खानपानादि व्यवस्था उत्तम करून–कोणतें तरी एक निमित्त पुढें करून हलके हलके शत्रूच्या नगरावर चाल करावी.

शत्रुसेविनि मित्रे च गूढे युक्ततरो भवेत् ॥
गतप्रत्यागते चैव स हि कष्टतरो रिपुः ॥ १८६ ॥
दण्डव्यूहेन तन्मार्गं यायात्तु शकटेन वा ॥
वराहमकराभ्यां वा सूच्या वा गरुडेन वा ॥ १८७ ॥

जो बाहेरून आपला मित्र आहे असें भासवितो, पण वास्तविक आंतून शत्रूला मिळालेला असतो; व कामावरून दूर केलेला मनुष्य फिरून कामावर आलेला असतो; तोहि फार मोठा शत्रु आहे असें समजावें व त्याच्याशीं व्यवहार करतांना फारच सावधगिरी ठेवावी. (दण्डव्यूहः) दंडाप्रमाणें सरळ रांगेनें सैन्य उभें करणें किंवा चालविणें, (शकटव्यूहः) शकटाप्रमाणें सैन्य-रचना करणें, (वराहव्यूहः) एकदम मिळून सर्वांनीं डुकराप्रमाणें दौडत दौडत जाऊन चाल करणें, किंवा डुकराप्रमाणेंच एका पाठीमागून दुसऱ्यानें धांवत जाणें, (मकरव्यूहः) मगर जसे पाण्यांतून चालतात, त्या त्यांच्या गतिप्रमाणें सैन्यरचना करणें, (सूचीव्यूहः) सुई जशी अग्रभागीं अगदीं सूक्ष्म असते व मागें जाड होत येते तशीच सैन्याची रचना करणें, (गरुडव्यूहः) जसा गरुड वाऱ्यामध्यें वरखालीं उड्डाणें करतो तद्वत् सैन्याची एकदम हालचाल करणें, इत्यादि अनेक व्यूह आहेत. योग्यवेळीं ते ते व्यूह रचून शत्रूशीं लढावें. सर्व राजपुरुषांना व प्रजाजनांला ही युद्धविद्या शिकवावी व आपणहि तींत तरबेत असावें. जे पूर्ण सुशिक्षित योद्धे असतात तेच उत्तमप्रकारें लढून विजय संपादन करतात. असो.

यतश्च भयमाशंकेत् ततो विस्तारयेद्बलम् ॥
पद्मेन चैव व्यूहेन निविशेत सदा स्वयम् ॥ १८८ ॥
सेनापतिबलाध्यक्षौ सर्वं दिक्षु निवेशयेत् ॥
यतश्च भयमाशंकेत् प्राचीं तां कल्पयेद्दिशम् ॥ १८९ ॥

ज्या बाजूनें भय प्राप्त होण्याचा संभव असेल त्या बाजूनें सैन्याचा विस्तार करावा; व पद्मव्यूहाप्रमाणें सैन्याची रचना करून आपण मध्यभागीं रहावें. (सेनाप०) सेनापति व बलाध्यक्ष अर्थात् आज्ञा देणारा व सैन्याबरोबर लढणारा अशा दोन प्रकारच्या वीरांना आठहि दिशांमध्यें जय्यत तयारीनें ठेवावें. जिकडे लढाई होत असेल तिकडे सैन्याचें मुख करावें. परंतु इतर ठिकाणांचाहि नीट बंदोबस्त ठेवावा. नाहींतर शत्रु मागच्या बाजूनीं हल्ला करून आपला पराभव करूं शकेल.

गुल्मांश्च स्थापयेदाप्तान् कृतसंज्ञान् समंततः ॥
स्थाने युद्धे च कुशलानभीरूनविकारिणः ॥ १९० ॥
संहतान् योधयेदल्पान् कामं विस्तारयेद्बहून् ॥
सूच्या वज्रेण चैवैतान् व्यूहेन व्यूह्य योधयेत् ॥ १९१ ॥
स्यन्दनाश्वैः समे युध्येदनूपे नौद्विपैस्तथा ॥
वृक्षगुल्मावृते चापैरासिचर्मायुधैः स्थले ॥ १९२ ॥

गुल्म अर्थात् दृढस्तंभाप्रमाणें युद्धामध्यें स्थिर राहणारे, युद्धविद्याविशारद, धार्मिक भयरहित, चतुर व ज्यांच्या मनांत कशाचाहि विकार उत्पन्न होत नाहीं असे जे पुरुष असतील त्यांना भिन्नाभिन्न नांवें ठेवून सैन्याच्या चारहि बाजूंला ठेवावें. (संह०) जर पुष्कळ सैन्याशीं थोड्या सैन्यानें लढावयाचें असेल तर एकजुटीनें हल्ले करावेत; वेळ पाहून त्यांनांच एकदम पसरूं द्यावें; जर नगरदुर्गांत किंवा शत्रूच्या सैन्यांत प्रवेश करून युद्ध करणें असेल तर सूचीव्यूह अथवा वज्रव्यूह यांची रचना करून युद्ध करावें. ज्याप्रमाणें खड्ग कापित जातें तद्वत् शत्रुसैन्याला एकदम कापित जाणें याला वज्रव्यूह असें म्हणतात. जस जसा आंत प्रवेश होईल त्याप्रमाणें समयोचित व्यूह रचून लढावें; जर समोरून शत्रूची (शतघ्नी) तोफ सुरू असेल किंवा (भुशुंडी) बंदुक सुरू असेल तर (सर्पव्यूहः) भुईसरपट चालून शत्रूच्या तोफांजवळ जाऊन, मारामारी व पकडापकडी करून, त्या तोफा आपल्या स्वाधीन करून घ्याव्या. मग वाटल्यास त्याच तोफा उलट

शत्रूवर सोडण्यास प्रारंभ करावा. शत्रूचें सैन्य पळूं लागलें असतां त्यांचा घोडेस्वारांकडून पाठलाग करवावा, त्यांना वाटल्यास पकडावें किंवा पळवून लावावें. (स्यन्द०) पायदळ, रथ व घोडे यांनीं समरभूमिवर युद्ध करावें, समुद्रामध्यें नौकांनीं, थोडें पाणी असल्यास हत्तींनीं, वृक्ष व झाडी असल्यास बाणांनीं, व साधारण वालुमय इतर स्थळीं ढाल तरवार घेऊन युद्ध करावें.

प्रहर्षयेद्बलं व्यूह्य तांश्च सम्यक् परीक्षयेत् ॥
चेष्टाश्चैव विजानीयादरीन् योधयतामपि ॥ १९४ ॥
उपरुध्यारिमासीत राष्ट्रं चास्योपपीडयेत् ॥
दूषयेच्चास्य सततं यवसान्नोदकेन्धनम् ॥ १९५ ॥
भिन्द्याच्चैव तडागानि प्राकारपरिखास्तथा ॥
समवस्कंदयेच्चैनं रात्रौ वित्रासयेत्तथा ॥ १९६ ॥

युद्ध चाललें असतांना लढणाऱ्या लोकांना उत्साहित व हर्षित करावें. युद्ध बंद झाल्यानंतर ज्या योगानें त्यांचें शौर्य व लढण्याला उत्साह वाढेल असें भाषण करावें व सर्वांला खानपान, शस्त्रास्त्र, औषधपाणी इत्यादिकांची नीट व्यवस्था करून प्रसन्न ठेवावें. व्यूह रचल्यावांचून लढाई करूं नये व करवूंहि नये. आपल्या लढणाऱ्या सैन्याच्या हालचालीवरून ते हुशारीनें लढत आहेत कीं कपट करीत आहेत तें जाणावें. (उपरु०) जर वेळ योग्य असेल तर शत्रूला चारहि-बाजूंनीं घेरून त्याला कोंडावें, त्याच्या राज्याला त्रास द्यावा व त्याचें चारा, अन्नपाणी, व लांकुडफांटें यांचा पुरवठा बंद करावा किंवा दूषित करावा. (भिन्या०) शत्रूचे तलाव, व कोट किल्ले व तट तोडून व फोडून त्याच्यावर रात्रीबेरात्रीं छापे घालून त्याला त्रास द्यावा; व आपला विजय होण्यास जीं साधनें अवश्य असतील त्यांचा अवलंब योग्य वेळ पाहून करावा.

प्रमाणानि च कुर्वीत तेषां धर्म्यान्यथोदितान् ॥
रत्नैश्च पूजयेदेनं प्रधानपुरुषैः सह ॥ २०३ ॥
आदानमप्रियकरं दानं च प्रियकारकम् ॥
अभीप्सितानामर्थानां काले युक्तं प्रशस्यते ॥ २०४ ॥

मनु० ७

शत्रूला जिंकल्यानंतर त्याशीं करारपत्रें व प्रतिज्ञापत्रें करावीं व उचित वाटल्यास

त्याच्या वंशजाला किंवा जवळच्या संबंधीजनाला त्या राज्याचा अधिकार सत्कारपूर्वक देऊन त्याच्याकडून अशी प्रतिज्ञा लिहून घ्यावी कीं, त्यानें आपल्या हुकुमाप्रमाणें चालावें व धर्मयुक्त राजनीतिप्रमाणें प्रजेचें पालन करावें. असा प्रतिज्ञालेख झाल्यावर त्याला स्वतः उपदेश करावा व त्याच्या जवळ प्रधानादि पुरुष आपण असे नेमावे कीं, त्याच्याकडून आपणाला पुनः उपद्रव न होईल; ज्याला जिंकलें असेल त्या राजाला प्रधानपुरुषांसह सत्कारपूर्वक भेटून, रत्नें वगैरे देऊन त्याची व्यवस्था नीट ठेवावी. त्याचा योगक्षेम न चालेल असें करूं नये. त्याला जरी कैद केलें तरीहि त्याचा शक्य तेवढा सत्कार करावा व त्याला शोकरहित करावें. (आदा०) या संसारामध्यें दुसऱ्याचे पदार्थ हिरावून घेणें हें अप्रीतिकारक असून दान करणें हें प्रीति वाढविणारें आहे. योग्य समय पाहून उचित क्रिया करणें व त्या पराजित राजाला योग्य इष्ट पदार्थ देणें हें चांगलें आहे. त्याला चिडवूं नये, त्याची थट्टा करूं नये किंवा त्याला हंसूं नये. मी तुझा पराजय केला आहे असें त्याच्या समोर म्हणूं नये. आपण माझे बंधु आहांत अशा प्रकारें गोड शब्दांनीं बोलावें.

शत्रु, मित्र व उदासीन.

हिरण्यभूमिसंप्राप्त्या पार्थिवो न तथैधते ॥
यथा मित्रं लघुं लब्ध्वा कृशमप्यायतिक्षमम् ॥ २०८ ॥

धर्मज्ञं च कृतज्ञं च तुष्टप्रकृतिमेव च ॥
अनुरक्तं स्थिरारंभं लघुमित्रं प्रशस्यते ॥ २०९ ॥

प्राज्ञं कुलीनं शूरं च दक्षं दातारमेव च ॥
कृतज्ञं धृतिमन्तं च कष्टमाहुरिरिं बुधाः ॥ २१० ॥

आर्यता पुरुषज्ञानं शौर्यं करुणवेदिता ॥
स्थौललक्ष्यं च सततमुदासीनगुणोदयः ॥ २११ ॥

मनु. ७

अचल प्रेमयुक्त, भविष्यकालीं होणाऱ्या गोष्टींवर विचार करणारा, कार्य सिद्ध करण्यास समर्थ असे मित्र किंवा साधारण प्रतीचे मित्र असल्यानें जशी राजाची उन्नति होते त्याप्रमाणें सुवर्ण किंवा भूमि प्राप्त झाल्यानेंहि होत नाहीं. (धर्म०) धर्म जाणणारा, कृतज्ञ, सदा प्रसन्न, अनुरक्त व उत्साही असा जरी लहानसा मित्र

असला तरी त्यापासून फार लाभ होतात. (प्राज्ञ०) बुद्धिमान्, कुलीन, शूरवीर, चतुर, दाता, कृतज्ञ, धैर्यवान् अशा पुरुषाशीं कधींहि वैर करूं नये हें ध्यानांत नेहमीं ठेवावें. जो अशांशीं शत्रुत्व करील त्याला फारच दुःख होईल. (आर्य०) जो मनुष्याची परीक्षा करूं शकतो, जो शूर, करुणायुक्त, वरवरच्या गोष्टी निरंतर सांगतो व जो प्रशंसित गुणांनीं युक्त आहे; त्याला उदासीन असें म्हणतात. याप्रमाणें मित्र, शत्रु व उदासीन यांची व्याख्या आहे.

इपारचा कार्यक्रम.

एवं सर्वमिदं राजा सह संमन्त्र्य मंत्रिभिः ॥
व्यायाम्याप्युत्य मध्यान्हे भोक्तुमन्तःपुरं विशेत् ॥२१६॥

मनु० ७ ॥

पूर्वी सांगितल्याप्रमाणें प्रातःकालीं उठून शौचमुखमार्जनादि करून, स्नानसंध्योपासन व अग्निहोत्रादिक करून, मंत्र्यांसह करावयाचा तो विचार करून, सैन्यांमध्यें जाऊन, सेनापतीशीं भाषणादि करून, नाना प्रकारची व्यूहरचना–कवाइत–पाहून, त्यांना उत्साहित करून, सर्व हत्ती, घोडे, गाई यांच्या पशुशाला पाहून, शस्त्रास्त्रस्थान, वैद्यालय, धनकोश या सर्वांचें निरीक्षण करून, या सर्वांमध्यें जी कांहीं न्यूनता असेल ती दूर करण्याचा उपाय सुचवून, व्यायामशालेंत जाऊन व्यायाम करून, नंतर भोजन करण्यासाठीं अंतःपुरामध्यें–जेथें पत्नी राहत असते तेथें जावें. तेथें जें भोजन करावयाचें असेल त्याची आधीं चांगल्या रीतीनें परीक्षा करून, बुद्धिबलपराक्रमवर्धक, रोगनाशक, अनेक प्रकारचे व्यंजनपानादिक, सुगंधितमिष्टान्नादिक, अनेक रसयुक्त उत्तम अन्नाचें सेवन करावें व सुखी व्हावें. याप्रमाणें राज्यव्यवस्था नीट पाहून राज्याची उन्नति करावी. कराच्या बोजानें प्रजेला त्रास देऊं नये. पहा—

कराचें प्रमाण.

पञ्चाशद्भाग आदेयो राज्ञा पशुहिरण्ययोः ॥
धान्यानामष्टमो भागः षष्ठो द्वादश एव वा ॥२३०॥ मनु० ७

व्यापार करणारे, शिल्पकार, कारागीर यांना सुवर्णादिकांचा जेवढा लाभ होत असेल त्याचा पन्नासावा भाग कर म्हणून घ्यावा. तांदूळ वगैरे धान्याचा सहावा, आठवा किंवा बारावा भाग घ्यावा. जर धान्य न घेतां धनरूपानें घ्यावयाचा असेल तर तो इतका नियमित घ्यावा कीं त्याच्या योगानें शेतकऱ्यांना खाण्यापिण्याची ददात न पडेल व ते दुःखी न होतील. कारण प्रजाजन धनाढ्य व अन्नादिकांनीं सुसंपन्न असले तरच राजाची उन्नति होते. राजानें आपल्या मुलांप्रमाणें प्रजेला समजावें व

त्यांना सुख द्यावें व प्रजेनेंहि राजाला व राजपुरुषांनां पितृवत् समजून तसें वागावें. शेतकरी वगैरे प्रजाजन व परिश्रम करणारे ह्यांचा राजा हा रक्षक आहे. जर प्रजा नसेल तर राजाची काय जरूर आहे ? प्रजा आहे म्हणून राजा आहे. जर राजा नसेल तर प्रजा कोणाची होईल ? राजा व प्रजा हे दोघेहि आपआपल्या कामांमध्यें स्वतंत्र व परस्परसंबंधी कामामध्यें परतंत्र आहेत. तसेंच प्रजेच्या सर्व साधारण संमतिविरुद्ध राजा व राजपुरुष यांनीं चालूं नये. राजाज्ञेविरुद्ध राजपुरुषांनीं वर्तन करूं नये व प्रजेनेंहि करूं नये. ही संक्षेपानें राजनीति सांगितली आहे. विशेष पहाणें असल्यास महाभारत, मनुस्मृति, शुक्रनीति वगैरे ग्रंथ पहावे व त्यांवरून राजनीतीचे सर्व मार्ग जाणावे व त्याप्रमाणें वागून राष्ट्राची उन्नति करावी.

न्यायव्यवस्था (मनु. अ. ८.)

प्रत्यहं देशदृष्टैश्च शास्त्रदृष्टैश्च हेतुभिः ॥
अष्टादशसु मार्गेषु निबद्धानि पृथक् पृथक् ॥ ३ ॥

सभा, राजा व राजपुरुष यांनीं देशाचार व शास्त्रव्यवहार यांच्या साहाय्यानें पुढें लिहिलेल्या अठरा विवादस्थानांचा प्रतिदिवशीं निर्णय करावा. जे नियम पूर्वीच्या शास्त्रांत नसतील व ज्यांची देशकालानुसार आवश्यकता वाटेल ते उत्तमोत्तम नियम करून राजा व प्रजा यांची उन्नति करावी.

तेषामाद्यमृणादानं निक्षेपोऽस्वामिविक्रयः ॥
संभूय च समुत्थानं दत्तस्यानपकर्म च ॥ ४ ॥
वेतनस्यैव चादानं संविदश्च व्यतिक्रमः ॥
क्रयविक्रयानुशयो विवादः स्वामिपालयोः ॥ ५ ॥
सीमाविवादधर्मश्च पारुष्ये दण्डवाचिके ॥
स्तेयं च साहसं चैव स्त्रीसंग्रहणमेव च ॥ ६ ॥
स्त्रीपुन्धर्मो विभागश्च द्यूतमाह्वय एव च ॥
पदान्यष्टादशैतानि व्यवहारस्थिताविह ॥ ७ ॥

विवादस्थानें अठरा आहेत, तीं हीं:—(१) **ऋणादानम्**—कोणाकडून ऋण घेतलें असेल तर त्यासंबंधाचा विवाद; (२) **निक्षेपः**—ठेव, किंवा कोणी कोणाकडे कांहीं पदार्थ कांहीं कामानिमित्त ठेवलेला असतो, त्यासंबंधीं वाद; (३) **अस्वामिविक्रयः**—एकाचा पदार्थ दुसऱ्यानें मालकाच्या आज्ञेशिवाय विकणें; (४) **संभूय**

समुत्थानम्—सर्वांनीं एकत्र मिळून कांहीं कृत्य करणें; (५) **दत्तस्यानपकर्म**—दिलेला पदार्थ मागितला असतां पुनः परत न करणें; (६) **वेतनस्यादानम्**—नोकरी करणाराला जो पगार–(वेतन) मिळतो तो कमी करणें किंवा त्यांतील कांहीं भाग आपण घेणें; (७) **संविद्यतिक्रमः**—केलेल्या प्रतिज्ञेचें पालन न करणें; (८) **क्रयविक्रयानुशयः**—घेण्यादेण्यांत वादविवाद; (९) **स्वामिपालविवादः**—पशूंचा स्वामी व पालक यांत होणारा वादविवाद; (१०) **सीमाविवादधर्मः**–**सीमे**च्या संबंधाचा वाद; (११) **पारुष्यम्**–कठोर शिक्षा करणें; (१२) **दण्डवाक्**–शिव्यागाळी, बेअब्रू, किंवा कडक भाषण करून दुसऱ्याला दुखविणें; (१३) **स्तेयम्**–**चोरी** करणें, दरोडा घालणें; (१४) **साहसम्**–**बलात्कार** करून कांहीं काम करणें; (१५) **स्त्रीसंग्रहणम्**–**परस्त्रीशीं व्यभिचार** करणें; (१६) **स्त्रीपुन्धर्मः**–स्त्रीपुरुषांदिकांच्या **धर्मामध्यें व्यतिक्रम** होणें; (१७) **विभागः**–**दायविभाग** संबंधीं वादविवाद; (१८) **द्यूतमाह्वयः**—जड व चेतन पदार्थांला डावामध्यें धरून जुगार खेळणें. हीं अठरा प्रकारचीं परस्पर वादिप्रतिवादींमध्यें उत्पन्न होणारीं विवादस्थानें आहेत.

एषु स्थानेषु भूयिष्ठं विवादं चरतां नृणाम् ॥
धर्मं शाश्वतमाश्रित्य कुर्यात्कार्यविनिर्णयम् ॥ ८ ॥

या विवादस्थानांमध्यें विवाद करणाऱ्या पुरुषांनां शाश्वत धर्माचा आश्रय करून न्याय द्यावा. कोणाचाहि केव्हांहि पक्षपात करूं नये.

धर्मो विद्धस्त्वधर्मेण सभां यत्रोपतिष्ठते ॥
शल्यं चास्य न कृन्तन्ति विद्धास्तत्र सभासदः ॥ १२ ॥

सभा वा न प्रवेष्टव्या वक्तव्यं वा समञ्जसम् ॥
अब्रुवन् विब्रुवन्वापि नरो भवति किल्बिषी ॥ १३ ॥

अधर्मानें ग्रस्त झालेला धर्म ज्या सभेमध्यें उपस्थित होतो व जेथील सभासद त्या धर्माचें शल्य काढुन टाकित नाहींत त्या सभेंतील सर्व सभासद त्याच शल्यानें घायाळ होतात. अर्थात् ज्या न्यायसभेकडून पक्षपात होतो, अपराध्याला दंड मिळत नाहीं व निरपराध्याला त्रास होतो, त्या सभेचे सर्व सभासद दुष्कीर्तीनें कलंकीत होतात. (सभा०) धार्मिक मनुष्यानें इच्छा नसेल तर न्यायसभेला जाऊं नये, पण जर तो एकदां न्यायसभेला गेला तर त्यानें जें काय खरें असेल तेंच बोलावें. कोणत्याहि

सभेंत अन्याय होत आहे हें पाहत असतांहि मौन धरणें, किंवा अन्यायाची बाजु संभाळणें या दोनहि गोष्टींच्या योगानें तो मनुष्य महापापी होतो.

यत्र धर्मो ह्यधर्मेण सत्यं यत्रानृतेन च ॥
हन्यते प्रेक्षमाणानां हतास्तत्र सभासदः ॥ १४ ॥
धर्म एव हतो हन्ति धर्मो रक्षति रक्षितः ॥
तस्माद्धर्मो न हन्तव्यो मा नो धर्मो हतोऽवधीत् ॥ १५ ॥

ज्या सभेमध्यें धर्माचें अधर्मानें व सत्याचें असत्यानें हनन केलें जातें, त्याठिकाणचे सर्व सभासद मेलेले आहेत असें समजावें. (धर्म०) जो धर्माचें हनन करतो, त्याचा धर्म नाश करतो व जो धर्माचें रक्षण करतो त्याचें रक्षण धर्म करतो. हनन केलेल्या धर्मानें आपलें हनन करूं नये यासाठीं कोणीहि धर्माचें हनन करूं नये. अर्थात् सर्वदा सर्वांनीं धर्माचा व न्यायाचा प्रतिपाल करावा.

वृषो हि भगवान् धर्मस्तस्य यः कुरुते ह्यलम् ॥
वृषलं तं विदुर्देवास्तस्माद्धर्मं न लोपयेत् ॥ १६ ॥
एक एव सुहृद्धर्मो निधनेऽप्यनुयाति यः ॥
शरीरेण समं नाशं सर्वमन्यद्धि गच्छति ॥ १७ ॥

धर्माला वृष असें म्हणतात, धर्माच्या योगानें ऐश्वर्य व सुखें हीं प्राप्त होतात. धर्माचा जो नाश करतो त्याला विद्वान् लोक वृषल-शूद्र-असें म्हणतात. म्हणून कोणीहि धर्माचा लोप करूं नये. (एक०) या संसारामध्यें धर्म हाच एक असा मित्र आहे कीं जो मृत्युनंतरहि बरोबर राहतो. बाकीचे सर्व पदार्थ शरीराबरोबरच नाश पावतात. अर्थात् मरणाबरोबर त्यांचा संग सुटतो, पण धर्माचा सुटत नाहीं.

पादो धर्मस्य कर्तारं पादः साक्षिणमृच्छति ॥
पादः सभासदः सर्वान् पादो राजानमृच्छति ॥ १८ ॥
राजा भवत्यनेनास्तु मुच्यन्ते च सभासदः ॥
एनो गच्छति कर्तारं निन्दार्हो यत्र निन्द्यते ॥ १९ ॥

मनु० ८

जेव्हां राजसभेमध्यें पक्षपात होतो व अन्याय केला जातो तेव्हां त्या अधर्माचे चार विभाग होऊन त्यांतील एक कर्त्याला, दुसरा साक्षीला, तिसरा सर्व सभासदांला

व चवथा भाग राजाला लागतो. याप्रमाणें सर्व कलंकित होतात. (राजा०) पण ज्या सभेमध्यें निंद्य मनुष्याची निंदा, स्तुतीला योग्य असणाराची स्तुति, अपराध्याला दंड व माननीयाला मान मिळतो त्या ठिकाणचा राजा व सर्व सभासद निष्पाप होतात व सर्व पाप अपराध्यालाच लागतें.

साक्षी कसे असावे ?

आप्ताः सर्वेषु वर्णेषु कार्य्याः कार्येषु साक्षिणः ॥
सर्वधर्मविदोऽलुब्धा विपरीतांस्तु वर्जयेत् ॥ ६३ ॥
स्त्रीणां साक्ष्यं स्त्रियः कुर्युर्द्विजानां सदृशा द्विजाः ॥
शूद्राश्च सन्तः शूद्राणामन्त्यानामन्त्ययोनयः ॥ ६८ ॥

सर्व वर्णांमध्यें जे धार्मिक, विद्वान्, निष्कपटी, सर्वप्रकारें धर्माला जाणणारे लोभरहित, सत्यवादी अशा प्रकारच्या लोकांनीं न्याय करावयाच्यावेळीं साक्षी नेमावे. यांहून विपरीत गुणांनीं जे युक्त असतील त्यांनां नेमूं नये. स्त्रियांसाठीं स्त्रिया, द्विजांसाठीं द्विज, शूद्रांसाठीं शूद्र, व अंत्यजांसाठीं अंत्यज असे साक्षी असावेत.

साहसेषु च सर्वेषु स्तेयसंग्रहणेषु च ॥
वाग्दण्डयोश्च पारुष्ये न परीक्षेत साक्षिणः ॥ ७२ ॥
बहुत्वं परिगृह्णीयात्साक्षिद्वैधे नराधिपः ॥
समेषु तु गुणोत्कृष्टान् गुणिद्वैधे द्विजोत्तमान् ॥ ७३ ॥

साहस, बलात्कार, चोरी, व्यभिचार, कठोर भाषण, निरपराध्याला दंड देणें इत्यादि अपराधांमध्यें साक्षी घेऊं नयेत. कारण हीं कामें गुप्त होतात. (बहु०) दोनहि बाजूंच्या साक्षींमध्यें बहुमतानुसार, दोनहि बाजूला सारखे असतील तर त्यांतील विद्वान् साक्षीप्रमाणें, जर दोनहि बाजूंला गुणी व विद्वान् असतील तर त्यांच्यांत जे द्विजोत्तम, यति, मुनि, ऋषि असतील त्यांच्या मताप्रमाणें न्याय करावा.

समक्षदर्शनात्साक्ष्यं श्रवणाच्चैव सिद्ध्यति ॥
तत्र सत्यं ब्रुवन् साक्षी धर्मार्थाभ्यां न हीयते ॥ ७४ ॥
साक्षी दृष्टश्रुतादन्यद् विब्रुवन्नार्यसंसदि ॥
अवाङ्नरकमभ्येति प्रेत्य स्वर्गाच्च हीयते ॥ ७५ ॥

पाहिलेलें सांगणारे व ऐकलेलें सांगणारे असे दोन प्रकारचे साक्षी असतात,

साक्षी खरें सांगतात ते धर्म व अर्थ या दृष्टीनें दंडनीय होत नाहींत, पण जे असत्य बोलतात ते दंड करण्यास योग्य होत. (साक्षी०) राजसभेमध्यें किंवा विद्वत्सभेमध्यें जे साक्षी पाहिलेल्या व ऐकलेल्या गोष्टी जशाच्या तशाच न सांगतां खोट्या सांगतात; त्यांना (अवाङ्नरकम्) जिव्हाच्छेदनरूप दुःखानें वर्तमानसमयीं नरक प्राप्त होतो व मेल्यानंतर त्यांला मुळींच सुख प्राप्त होत नाहीं.

स्वभावेनैव यद्ब्रूयुस्तद्ग्राह्यं व्यावहारिकम् ॥
अतो यदन्यद्ब्रूयुर्धर्मार्थं तदपार्थकम् ॥ ७८ ॥
सभान्तः साक्षिणः प्राप्तानर्थिप्रत्यर्थिसन्निधौ ॥
प्राड्विवाकोऽनुयुञ्जीत विधिनाऽनेन सान्त्वयन् ॥ ७९ ॥

साक्षी जें कांहीं स्वाभाविक रीतीनें व्यवहारसंबंधीं सांगेल तेंच खरें आहे असें मानावें व याशिवाय शिकविलेलें जें कांहीं तो तेथें बोलेल तें सर्व मिथ्या आहे असें समजावें. जेव्हां (अर्थी) वादी व (प्रत्यर्थी,) प्रतिवादी यांच्या समक्ष साक्षी न्यायसभेपुढें येतील तेव्हां शांततापूर्वक न्यायाधीश व (प्राड्विवाक) वकील किंवा ब्यॅरिष्टर यांनीं त्याला प्रश्न विचारावेत व सत्यासत्यतेचा निर्णय करावा. तो असाः—

यद्वयोरनयोर्वेत्थ कार्येऽस्मिञ्चेष्टितं मिथः ॥
तद्भूत सर्वं सत्येन युष्माकं ह्यत्र साक्षिता ॥ ८० ॥
सत्यं साक्ष्ये ब्रुवन् साक्षी लोकानाप्नोति पुष्कलान् ॥
इह चानुत्तमां कीर्तिं वागेषा ब्रह्मपूजिता ॥ ८१ ॥

"हे साक्षिलोकहो! या दोघांच्या परस्पर कर्मांमध्यें जें तुम्ही जाणत असाल तें सर्व जसें तुम्हांला माहित असेल तसें खरें सांगा; कारण तुमची या कामांत साक्षी घ्यावयाची आहे. (सत्यं०) जो साक्षी सत्य बोलतो त्याला जन्मजन्मांतरीं उत्तम लोकांत उत्तम जन्म प्राप्त होतो व सुख मिळतें. या जन्मीं व पुढच्या जन्मीं उत्तम कीर्ति होते; कारण वाणी हीच सत्कार व तिरस्काराला कारण आहे. जो सत्य बोलतो त्याची प्रतिष्ठा व जो मिथ्या बोलतो त्याची अप्रतिष्ठा होते.

सत्येन पूयते साक्षी धर्मः सत्येन वर्धते ॥
तस्मात्सत्यं हि वक्तव्यं सर्ववर्णेषु साक्षिभिः ॥ ८२ ॥

आत्मैव ह्यात्मनः साक्षी गतिरात्मा तथात्मनः ॥
मावमंस्थाः स्वमात्मानं नृणां साक्षिणमुत्तमम् ॥ ८४ ॥

सत्य बोलण्यानें साक्षी पवित्र होतो व सत्य बोलण्यानें धर्म वाढतो; म्हणून सर्व वर्णांतील साक्षीनीं सत्यच बोलावें. (आत्मै०) आत्म्याचा साक्षी आत्मा व आत्म्याची गतिहि आत्माच आहे. हें जाणून, हे पुरुषा ! तूं सर्व मनुष्यांतील उत्तम साक्षी आहेस म्हणून तूं आपल्या आत्म्याचा अपमान करूं नकोस. अर्थात् जें सत्य तुला माहित आहे तें तसेंच सांग, असत्य बोलूं नकोस.

यस्य विद्वान् हि वदतः क्षेत्रज्ञो नाभिशंकते ॥
तस्मान्न देवाः श्रेयांसं लोकेऽन्यं पुरुषं विदुः ॥ ९६ ॥
एकोऽहमस्मीत्यात्मानं यत्त्वं कल्याण मन्यसे ॥
नित्यं स्थितस्ते हृद्येष पुण्यपापेक्षिता मुनिः ॥ ९१ ॥

बोलत असतां ज्याचा आत्मा साशंक होत नाहीं, तोच पुरुष धन्य होय. विद्वान् लोक त्याहून दुसरा कोणीहि धन्य आहे असें समजत नाहींत. (एकः) हे कल्याणाची इच्छा करणाऱ्या पुरुषा ! जो तूं "मीं एकटा आहें" असें समजून खोटें बोलत आहेस, तें चांगलें नाहीं; पण जो तुझ्या हृदयामध्यें अंतर्यामी पापपुण्य देणारा मुनि परमेश्वर दुसरा आहे त्या परमेश्वराला भिऊन तूं सत्य बोल. असा साक्षीला उपदेश करून मग त्याची साक्ष घ्यावी.

लोभान्मोहाद्भयान्मैत्र्यात्कामात् क्रोधात्तथैव च ॥
अज्ञानाद्बालभावाच्च साक्ष्यं वितथमुच्यते ॥ ११८ ॥
एषामन्यतमे स्थाने यः साक्ष्यमनृतं वदेत् ॥
तस्य दण्डविशेषांस्तु प्रवक्ष्याम्यनुपूर्वशः ॥ ११९ ॥

जो लोभ, मोह, भय, मित्रता, काम, क्रोध, अज्ञान व बालपणा या स्थितींत साक्षी देईल ती सर्व खोटी आहे असें समजावें. (एषां०) याप्रमाणें जो साक्षी खोटें बोलेल त्याला पुढील शिक्षा करावी:-

लोभात्सहस्रं दण्ड्यस्तु मोहात्पूर्वं तु साहसम् ॥
भयाद्द्वौ मध्यमौ दण्ड्यौ मैत्रात् पूर्वं चतुर्गुणम् ॥ १२० ॥

कामादृशगुणं पूर्वं क्रोधात्तु त्रिगुणं परम् ॥
अज्ञानाद्वे शते पूर्णे बालिश्याच्छतमेव तु ॥ १२१ ॥

लोभानें खोटी साक्ष देणाराला उत्तमसाहस म्हणजे सहस्रपण (सुमारें १००० पैसे=पंधरा रु० दहा आणे), मोहानें खोटी साक्ष देणाराला प्रथमसाहस म्हणजे सार्ध द्विशतपण (सुमारें २५० पैसे=तीन रु. साडेचवदा आणे), भयानें देणाराला दोन मध्यमसाहस म्हणजे सहस्रपण (सुमारें १००० पैसे=पंधरा रु. दहा आणे), जो मित्रत्वाच्या योगानें खोटी साक्ष देईल त्याच्याकडून प्रथम साहसचे चौपट म्हणजे सहस्रपण (सुमारें १००० पैसे=पंधरा रु. दहा आणे) दण्ड द्यावा. (कामा०) कामनेच्या योगानें जो खोटी साक्ष देईल त्याला प्रथमसाहसचे दसपट म्हणजे (सुमारें २५०० पैसे=एकोनचाळीस रु. एक आणा) दण्ड करावा. क्रोधानें खोटी साक्ष देणाराला उत्तमसाहसचे तिप्पट म्हणजे (सुमारें ३००० पैसे=शेचाळीस रु. चवदा आणे), अज्ञानानें खोटी साक्ष देणाराला द्विशतपण म्हणजे (सुमारें२०० पैसे=तीन रु. दोन आणे), मूर्खपणानें देणाराला शतपण म्हणजे (सुमारें १०० पैसे=एक रु. नऊ आणे), दण्ड करावा. " पण " हें परिणाम फार प्राचीन असून सुमारें पैशाच्या वजना इतकें तांब्याचें नाणें होतें असें आढळतें.

अपराध्यास दण्ड.

उपस्थमुदरं जिह्वा हस्तौ पादौच पञ्चमम् ॥
चक्षुर्नासा च कर्णौच धनं देहस्तथैव च ॥ १२५ ॥
अनुबन्धं परिज्ञाय देशकालौ च तत्त्वतः ॥
सारापराधौ चालोक्य दण्डं दण्ड्येषु पातयेत् ॥ १२६ ॥

दण्ड देण्याचीं उपस्थेन्द्रिय, पोट, जीभ, हात, पाय, डोळे, नाक, कान, धन व देह हीं दहा स्थानें आहेत. यांच्यावर दंड केला जातो. (अनु०) देश, काल, व पुरुषाची पात्रता व अपराधाची तीव्रता यांचा विचार करून जो दंड देणें योग्य वाटेल तसा द्यावा. उदाहरण—लोभानें खोटी साक्ष दिली त्याला पंधरा रु. दहा आणे दंड करावा असें सांगितलें आहे, पण जर अपराधी मनुष्य अत्यंत गरीब असेल किंवा अतिशय श्रीमान् असेल तर त्याप्रमाणें कमी किंवा दुप्पट तिप्पट जास्ती दण्ड करावा.

अधर्मदण्डनं लोके यशोघ्नं कीर्तिनाशनम् ॥
अस्वर्ग्यं च परत्रापि तस्मात्तत्परिवर्जयेत् ॥ १२७ ॥

अदण्ड्यान् दण्डयन् राजा दण्ड्यांश्चैवाप्यदण्डयन् ॥
अयशो महदाप्नोति नरकं चैव गच्छति ॥ १२८ ॥
वाग्दण्डं प्रथमं कुर्याद्धिग्दण्डं तदनन्तरम् ॥
तृतीयं धनदण्डं तु वधदण्डमतः परम् ॥ १२९ ॥
मनु० अ० ८ ॥

अधर्मानें दंड करण्यापासून वर्तमानकालीं प्रतिष्ठा कमी होते, यश नाहींसें होतें, भविष्यकालीं व परजन्मीं होणारी कीर्ति नाश पावते व परजन्मीं दुःख होतें; म्हणून कोणालाहि अधर्मानें दंड करूं नये. (अद०) जो राजा निरपराध्यांला दंड देतो व अपराध्यांला दंड करीत नाहीं, त्याची तो जीवंत असे पर्यंत फार निंदा होते व मेल्यानंतर त्याला फार दुःख होतें, म्हणून राजानें अपराधी माणसाला दंड करावा व निरपराध्याला कधींहि दंड करूं नये. (वाग्द०) प्रथम वाणीनें दंड करावा. अर्थात् निंदा करावी, नंतर त्याचा धिक्कार करावा, तिसऱ्यानें त्याला द्रव्याचा दंड करावा व नंतर वधदण्ड अर्थात् बांधून वेतानें मारणें, शिरच्छेद करणें वगैरे प्रकारें दंड करावा.

येन येन यथाङ्गेन स्तेनो नृषु विचेष्टते ॥
तत्तदेव हरेत्तस्य प्रत्यादेशाय पार्थिवः ॥ ३३४ ॥
पिताचार्यः सुहृन्माता भार्या पुत्रः पुरोहितः ॥
नादण्ड्यो नाम राज्ञोऽस्ति यः स्वधर्मे न तिष्ठति॥३३५॥

चोर ज्या ज्या अवयवांनीं मनुष्यांमध्यें विरुद्ध चेष्टा करतो अर्थात् चोरी करतो, त्या त्या अंगांचें राजानें छेदन करावें. (पिता०) पिता, आचार्य, माता, मित्र, भार्या पुत्र, पुरोहित वगैरे जे कोणी स्वधर्माप्रमाणें आचरण करीत नसतील, त्यांना राजानें यथायोग्य दंड करावा. जेव्हां राजा न्यायासनावर बसतो तेव्हां त्यानें कोणाचाहि पक्षपात न करतां सर्वांचा यथायोग्य न्याय करावा.

कार्षापणं भवेद्दण्ड्यो यत्रान्यः प्राकृतो जनः ॥
तत्र राजा भवेद्दण्ड्यः सहस्रमिति धारणा ॥ ३३६ ॥
अष्टापाद्यन्तु शूद्रस्य स्तेये भवति किल्बिषम् ॥
षोडशैव तु वैश्यस्य द्वात्रिंशत्क्षत्रियस्य च ॥ ३३७ ॥

ब्राह्मणस्य चतुःषष्टिः पूर्णं वापि शतं भवेत् ॥
द्विगुणा वा चतुःषष्टिस्तद्दोषगुणविद्धि सः ॥ ३१८ ॥

ज्या अपराधाबद्दल साधारण मनुष्याला सुमारें एक पैसा दंड व्हावा त्याच अपराधाबद्दल राजाला सुमारें हजार पैसे दंड असावा. साधारण मनुष्याच्या हजार पट राजाला दंड करावा. मंत्री किंवा दिवाण यांना आठशेपट; याप्रमाणें ज्याची जसी कमी जास्ती योग्यता असेल त्यामानानें त्याला अधिक कमी दंड करावा. साधारण चपराशालाहि सामान्य पुरुषांच्या सात आठपट दंड करावा. साधारण प्रजाजनांपेक्षां राजपुरुषांला जास्त दंड करणें योग्य होय. असें न केलें तर राजपुरुष सर्व प्रजेला फार त्रास देतील. अधिक दण्ड केल्यानें सिंह वश होतो व अल्पशः दंडानें बकरी वश होते. याचप्रमाणें प्रजेपेक्षां राजपुरुषांना अधिक दंड केला पाहिजे. (अष्टा०) शूद्राला चोरीच्या आठपट, वैश्याला सोळापट, क्षत्रियाला बत्तीसपट, (ब्राम्ह०) ब्राम्हणाला चवसष्टपट अधिक दंड झाला पाहिजे. किंवा ब्राह्मणाला शतपट किंवा एकशें अठ्ठावीसपट करावा. अर्थात् ज्ञान, प्रतिष्ठा व योग्यता ज्याची जशी असेल तसा त्याला कमी जास्ती दंड करावा.

ऐन्द्रं स्थानमभिप्रेप्सुर्यशश्चाक्षयमव्ययम् ॥
नोपेक्षेत क्षणमपि राजा साहसिकं नरम् ॥ ३४४ ॥
वाग्दुष्टात्तस्कराच्चैव दण्डेनैव च हिंसतः ॥
साहसस्य नरः कर्ता विज्ञेयः पापकृत्तमः ॥ ३४५ ॥

राजाचे अधिकारी, धर्म व ऐश्वर्य यांची इच्छा करणारा राजा यांनीं बलात्कारानें आपलें काम साधणाऱ्या डाकूंना शिक्षा करण्यास एक क्षणहि उशीर लावूं नये. (वाग्दु०) दुष्ट वचन बोलणारा, चोरी करणारा, अपराधा बांचून दण्ड देणारा या सर्वांपेक्षां बलात्कार करणारा अतिशय दुष्ट होय.

साहसे वर्तमानन्तु यो मर्षयति पार्थिवः ॥
स विनाशं व्रजत्याशु विद्वेषं चाधिगच्छति ॥ ३४६ ॥
न मित्रकारणाद्राजा विपुलाद्वा धनागमात् ॥
समुत्सृजेत्साहसिकान् सर्वभूतभयावहान् ॥ ३४७ ॥

बलात्कार करणाऱ्या पुरुषाला जो राजा दण्ड देत नाहीं त्याचा लवकरच नाश होतो व सर्व विद्वान् लोक त्याचा द्वेष करतात. (न मि०) मित्रत्वामुळें किंवा पुष्कळ

धन मिळत आहे म्हणून कोणत्याहि राजानें सर्वांला त्रास देणाऱ्या साहसी पुरुषांना–बलात्कार करणाऱ्यांना–दंड दिल्यावांचून कधींहि सोडूं नये.

गुरुं वा बालवृद्धौ वा ब्राह्मणं वा बहुश्रुतम् ॥
आततायिनमायान्तं हन्यादेवाविचारयन् ॥ ३५० ॥
नाततायिवधे दोषो हन्तुर्भवति कश्चन ॥
प्रकाशं वाऽप्रकाशं वा मन्युस्तन्मन्युमृच्छति ॥ ३५१ ॥
यस्य स्तेनः पुरे नास्ति नान्यस्त्रीगो न दुष्टवाक् ॥
न साहसिकदण्डघ्नौ स राजा शक्रलोकभाक् ॥ ३८६ ॥

मनु. अ. ८

गुरु, पुत्र, वृद्ध, ब्राह्मण किंवा बहुश्रुत कोणीहि असो, जर तो धर्म सोडून अधर्मानें जात असेल व दुसऱ्याला विनाकारण मारीत असेल तर अशा आततायी माणसाला विचार केल्यावांचून ठार मारावा–किंवा ठार मारल्यावर मग विचार करावा. (नाततायि०) दुष्ट पुरुषांना मारल्यानें मारणाराला पाप लागत नाहीं मग त्याचा वध प्रसिद्धपणें झालेला असो किंवा अप्रसिद्धपणें झालेला असो. क्रोधी माणसाला क्रोधी मनुष्यानें ठार मारणें हें क्रोधाची क्रोधाशींच लढाई झाल्या सारखें आहे. (यस्य०) ज्याच्या राज्यांत चोर, परस्त्रीगामी, दुष्टवचन बोलणारा, साहसी, डाकू व राजाज्ञेचा भंग करणारा, इत्यादि प्रकारचे लोक नसतात तो राजा अत्यंत श्रेष्ठ होय.

व्यभिचाराला शिक्षा.

भर्तारं लङ्घयेद्या तु स्त्री ज्ञातिगुणदर्पिता ॥
तां श्वभिः खादयेद्राजा संस्थाने बहुसंस्थिते ॥ ३७१ ॥
पुमांसं दाहयेत्पापं शयने तप्तआयसे ॥
अभ्यादध्युश्च काष्ठानि तत्र दह्येत पापकृत् ॥ ३७२ ॥

जी स्त्री आपल्या बाप, बान्धवांच्या जोरावर व आंगच्या गुणांच्या घमेंडीनें आपल्या पतीचा त्याग करील व व्यभिचार करील, तिला पुष्कळ स्त्रीपुरुषांच्या समोर, कुत्र्यांकडून खावयून ठार मारावी. (पुमां०) त्याचप्रमाणें जो पुरुष आपल्या स्त्रीला सोडून परस्त्रीगमन अथवा वेश्यागमन करतो, त्याला तापलेल्या लोखंडी पत्र्यावर निजवून, सर्व स्त्रीपुरुषांच्या देखत, त्याच्या देहाचें भस्म करावें. (प्रश्न.) राजा, राणी किंवा न्यायाधीश जर व्यभिचारादि कुकर्में करतील तर त्यांना कोणी दंड करावा?

(उत्तर) लोकनियुक्त सभेनें दंड करावा. सामान्य लोकांपेक्षां त्यांना अधिक दंड झाला पाहिजे. (प्र०) राजानें त्यानीं केलेला दण्ड कां स्वीकारावा ? (उ०) राजा हा एक पुण्यात्मा व भाग्यशील मनुष्य आहे. जर त्याला सभेनें दंड केला असतां त्यानें मान्य केला नाहीं, तर दुसरे मनुष्य तरी राजदंडाला कसा मान देतील ? शिवाय जेव्हां सर्व प्रजा, प्रधान व सभा राजाला धार्मिकपणें दंड करूं लागतात तेव्हां एकट्या राजाचें तरी काय चालतें ? जर अशा रीतीनें अपराध्याला दंड दिला नाहीं तर राजा, प्रधान व सर्व समर्थ पुरुष अन्यायांत बुडून, न्याय व धर्म यांचा नाश करून, आपणांसहीत सर्व प्रजांचा नाश करून घेतात. न्याययुक्त दंड हाच राजा आहे व तोच धर्म होय ; जो त्याचा नाश करतो त्याच्यासारखा दुसरा नीच पुरुष कोण बरें असणार ! (प्र०) मनुष्य शरीर बनवूं शकत नाहीं व जीवंतहि करूं शकत नाहीं, यासाठीं हे वर लिहिलेले कडक दंड करणें मनुष्याला योग्य नाहीं हें खरें कीं नाहीं ? (उ०) जे याला कडक शिक्षा असें समजतात, त्यांना राजनीति मुळींच समजत नाहीं असें समजावें ; कारण एका मनुष्याला असा कडक दंड दिला असतां दंडाच्या भीतीनें दुसरे लोक अधर्म करण्यास प्रवृत्त होत नाहींत व सर्व धर्मयुक्त वर्तन करूं लागतात. सुगम दंड केला तर दुष्ट मनुष्यांना त्याचें कांहीं वाटत नाहीं व ते आपलीं दुष्टकृत्यें प्रत्यहीं चालू ठेवतात व यामुळें राज्यामध्यें दुराचारी पुरुष जास्ती वाढतात. अर्थात् एकाला जास्त दंड करणें हें अनेकांला थोडथोडा दंड करण्यापेक्षां बरें आहे हें थोड्याशा विचाराअंतीं सर्वांस समजेल.

जकात.

दीर्घाध्वनि यथादेशं यथाकालं करो भवेत् ॥
नदीतीरेषु तद्विद्यात्समुद्रे नास्ति लक्षणम् ॥ ४०६ ॥

लांब मार्गामध्यें ज्या मानानें खाड्या, नद्या व नाले असतील व ज्या मानानें देश मोठा असेल त्या मानानें नाकेबंदी करून कर स्थापन करावे. मोठ्या समुद्रांत अशीं नाकीं बसविणें अशक्य आहे, पण त्या संबंधाची व्यवस्था राजा, प्रजा व मोठ्या नौका ठेवून व्यापार करणारे लोक या सर्वांच्या सोईची होईल अशी करावी. देश-देशांतरीं व द्वीपद्वीपांतरीं नौकांतून जाणाऱ्या आपल्या प्रजेचें सर्व ठिकाणीं उत्तम प्रकारें रक्षण होईल व त्यांना कोठें कोणाकडूनहि दुःख न पोंचेल अशी व्यवस्था करावी. आपल्या देशांत पूर्वीं जहाजें नव्हतीं व आपले पूर्वज परदेशगमन करीत नव्हते असें कित्येक लोक समजतात पण हें सर्व खोटें आहे.

तपासणी.

अहन्यहन्यवेक्षेत कर्मान्तान्वाहनानि च ॥
आयव्ययौ च नियतावाकरान्कोशमेव च ॥ ४१९ ॥
एवं सर्वानिमान् राजा व्यवहारान् समापयन् ॥
व्यपोह्य किल्बिषं सर्वं प्राप्नोति परमाङ्गतिम् ॥ ४२० ॥

मनु० ८

राजानें प्रत्येक दिवशीं आपलीं आरंभलेलीं कामें कशीं समाप्त होत आहेत तें पहावें, त्याचप्रमाणें वाहनें, हत्ती, घोडे, नियत आयव्यय, (आकर) रत्नादिकांच्या खाणी, कोश, खजिने, यांची तपासणी करावी. (एवं०) जो राजा याप्रमाणें सर्व व्यवहार करतो त्याचीं सर्व पापें नाहींशीं होऊन तो परमगति अर्थात् मोक्षसुखाला प्राप्त होतो.

(प्र.) संस्कृतविद्येंत राजनीति पुरी आहे कीं काय ?

(उ.) होय. अगदीं पुरी आहे, कारण या सर्व भूमंडलावर जी आज राजनीति चालत आहे व पुढें चालेल ती सर्व संस्कृत ग्रंथांतूनच घेतलेली आहे. तसेंच जे नियम बांधलेले नाहींत ते नियम राजा व प्रजा यांचें सुख वाढविण्यासाठीं विद्वान् लोक व राजसभा यांनीं करावे, असें "**प्रत्यहं लोकदृष्टैश्च शास्त्रदृष्टैश्च हेतुभिः ।** मनु. ८।३॥ " इत्यादि स्मृतिवचनांत सांगितलें आहे. या सर्वांचा विचार केला असतां आपल्या संस्कृत ग्रंथांत पूर्ण राजनीति आहे असें ठरतें. नित्य ध्यानांत ठेवण्याच्या गोष्टी—बाल्यावस्थेमध्यें विवाह न करणें व न करविणें, तारुण्यामध्येंहि नवरानवरीच्या प्रसन्नतोशिवाय विवाह न करणें. पूर्ववयांत ब्रह्मचर्येंचें पूर्णपणें पालन करणें, व्याभिचार न करणें व पुष्कळ विवाहहि न करणें इत्यादि नियम पाळून आत्मा व शरीर यांचें बल वाढवावें. शरीर अशक्त राहून विद्या येत असली तरीहि त्यापासून कांहीं लाभ होणें शक्य नाहीं, करीतां शरीर व आत्मा यांचें बल सारखें वाढविण्याचा प्रयत्न जारीनें झाला पाहिजे. बलवान् ज्ञानी पुरुष शेकडों जनांला क्षणांत जिंकूं शकतो. विद्येकडे दुर्लक्ष करून केवळ शरीराचें बलच जर वाढविलें तरीहि अशा सशक्तांकडून राज्यपालनादिक कांहींएक होऊं शकणार नाहीं. म्हणून राज्यव्यवस्था नीट रहावी व लोकांचें संरक्षण उत्तम तऱ्हेनें होऊन सर्व सुखी व्हावेत म्हणून शरीर व बुद्धि यांना उत्तम शिक्षण मिळून त्यांची जोरदार वाढ होण्याची व्यवस्था झाली पाहिजे. व्याभिचार व विषयासक्ति वगैरे

बलबुद्धिविनाशक व्यवहार कोणीहि करूं नयेत. विशेषेंकरून क्षत्रिय लोक अंगानें दृढ व बुद्धीनें तरतरीत असले पाहिजेत. जर क्षत्रिय लोक विषयलोलुप होतील तर सर्व राज्याची व्यवस्था बिघडून चोहोंकडे अंदाधुंदी होईल. "**यथा राजा तथा प्रजा।**" जसा राजा असतो त्याचप्रमाणें प्रजाहि होते, म्हणून राजा व राजपुरुष यांनीं केव्हांहि कुकर्में करूं नयेत व सदैव न्याययुक्त धर्मयुक्त वर्तन करावें व सर्वांला अनुकरणीय व्हावें.

हें येथें संक्षेपानें राजनीतीचें वर्णन केलें आहे. या संबंधानें विशेष विस्तार पाहणें असल्यास वेद, मनुस्मृतीचे सात, आठ व नऊ हे अध्याय, शुक्रनीति, विदुर-प्रजागर, महाभारतांतील शांतिपर्वांतर्गत राजधर्म व आपद्धर्म वगैरे पुरतकें पाहून पूर्ण राजनीति जाणावी व तिचा अवलंब करून मांडलिकांनीं व सार्वभौमांनीं आपआपलीं कामें योग्य रीतीनें करावीं. सर्वांनीं "**वयं प्रजापतेः प्रजा अभूम।** यजु. ॥" आम्ही परमेश्वराची प्रजा व परमेश्वर आमचा राजा आहे हें लक्षांत ठेवावें. त्या परमेश्वराच्या राज्यांतील विशिष्ट कर्तव्य करण्यासाठीं आमची नेमणूक झाली आहे असें समजून तीं तीं आपलीं कर्तव्यें उत्तम रीतीनें पार पाडावींत व अशी इच्छा करावी कीं, "परमेश्वरानें दयालु होऊन आपल्या सभेमध्यें आम्हांला राज्याधिकारावर नियुक्त करावें व आमच्या द्वारें सत्य व न्याय यांची वृद्धि करवावी" याप्रमाणें साररूपानें राजनीतिविषय येथें समाप्त झाला पुढील प्रकरणीं ईश्वर व वेदविषय लिहिला जाईल.

इति सुभाषाविभूषित राजधर्मविषयः षष्ठसमुल्लासः संपूर्णः।

अथ सप्तमसमुल्लासः

अथेश्वरवेदविषयं व्याख्यास्यामः ॥

(१) देवता व परमेश्वर.

ऋचो अक्षरे परमे व्योमन् यस्मिन् देवा अधि विश्वे निषेदुः ॥ यस्तन्न वेद किमृचा करिष्यति य इत्तद्विदुस्त इमे समासते ॥ ऋ० १।१६४।३९ ॥

जो सर्व दिव्य गुणकर्मस्वभाव व विद्या यांनीं युक्त आहे; ज्याच्या आश्रयानें पृथिवी व सूर्यादि लोक राहिले आहेत; जो आकाशाप्रमाणें सर्वत्र व्याप्त आहे व जो देवांचाहि देव आहे, त्या परमेश्वराला जे मनुष्य जाणत नाहींत, मानीत नाहींत व त्याचें ध्यानहि करीत नाहींत, ते नास्तिक व मंदमति लोक सर्वदा दुःखसागरामध्यें बुडतात व जे मनुष्य त्याला जाणतात तेच सुखी होतात. (**प्रश्न**) वेदांमध्यें अनेक ईश्वरांची उपासना सांगितली आहे कीं, एका ईश्वराची? (**उत्तर**) चारहि वेदांमध्यें अनेक ईश्वर सिद्ध होतील अशाला कांहीं आधार सांगितलेला नाहीं, इतकेंच नव्हे तर ईश्वर एक आहे असेंच चोहोंकडे लिहिलेलें आहे. (**प्र०**) मग वेदांमध्यें अनेक देवता सांगितल्या आहेत त्यांचा काय अभिप्राय आहे? (**उ०**) ज्यांमध्यें दिव्यगुण असतात त्यांना **देवता** असें म्हणतात. पृथिवीमध्यें दिव्यगुण आहेत म्हणून ती देवता आहे खरी, पण तिलाच ईश्वर किंवा उपास्य म्हणून कोठेंहि वेदांमध्यें सांगितलें नाहीं. पहा "**ऋचो अक्षरे०**" या वरच्या मंत्रांत "ज्यामध्यें (पृथिव्यादि) देवता राहतात तो जाणण्याला व उपासनेला योग्य आहे" असें सांगितलें आहे. यावरूनहि देव व परमेश्वर यांतील भेद सिद्ध होतो. देव किंवा देवता या शब्दांनीं जे परमेश्वराचें ग्रहण करतात, ती त्यांची चुकी आहे. त्याचप्रमाणें परमेश्वर शब्दानें देवतांचें ग्रहण करणें ही सुद्धां चुकीच आहे. परमेश्वर हा देवांचाहि देव आहे. म्हणूनच त्याला "**महादेव**" असें म्हणतात. तो सर्व जगाची उत्पत्ति, स्थिति व लय करतो व तोच न्यायकर्ता व सर्वांचा आधार आहे. "**त्रयस्त्रिंशत् त्रिंशता०**" इत्यादि वेदमंत्रांमध्यें व त्यांच्या शतपथादि ब्राह्मणांतील व्याख्यांमध्यें तेहेतीस देव आहेत असें सांगितलें आहे. पृथिवी, जल, अग्नि, वायु, आकाश, चंद्र, सूर्य, नक्षत्रें, हे आठ वसू+प्राण, अपान, व्यान, उदान, समान, नाग, कूर्म, कृकल, देवदत्त, धनंजय व जीवात्मा हे अकरा रुद्र+संव-

त्सराचे बारा महिने हे बारा आदित्य + इंद्र म्हणजे विद्युत् व + यज्ञ अर्थात् प्रजापति हे तेहेतीस देव आहेत. [सृष्टि ज्यांच्या आधारानें राहते त्यांना "**वसु**" असें म्हणतात; जे शरीरांतून निघाले असतां रडवितात त्यांना "**रुद्र**" असें म्हणतात; जे आयुष्याला घेऊन जातात व कमी करतात त्यांना "**आदित्य**" असें म्हणतात; इंद्र म्हणजे परम ऐश्वर्यानें युक्त जो असतो तो; व यज्ञाला प्रजापति असें म्हणतात. कारण हवनाच्या योगानें वायु, वृष्टि, जल व ओषधि यांची शुद्धि होते; विद्वानांचा सत्कार व शिल्पविद्या यांचाहि समावेश यज्ञामध्येंच होत असल्यामुळें प्रजांचें पालन यज्ञापासून होतें, म्हणूनच यज्ञाला प्रजापति असें म्हणतात]. या तेहेतीस देवांचा स्वामी व सर्वांहून महान् असा जो चवतीसावा परमात्मा आहे, तोच उपास्य आहे असें शतपथाच्या चौदाव्या कांडामध्यें स्पष्ट सांगितलें आहे. याचप्रमाणें अन्यत्रहि सांगितलें आहे. जर लोकांनीं हीं सर्व प्रमाणें पाहिलीं असतीं तर ते अनेक उपास्यांच्या भ्रमजालामध्यें सांपडून भेदाधिक्य करण्यास कारणीभूत झालेच नसते.

ईशा वास्यमिद ꣳ सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत् ॥ तेन त्यक्तेन भुञ्जीथा मा गृधः कस्य स्विद्धनम् ॥ यजु. ४० । १ ॥

हे मनुष्य हो ! जें कोणतें या (जगत्याम्) संसारामध्यें जगत् आहे, त्या सर्वांमध्यें (वास्यम्) व्याप्त होऊन जो त्या सर्वांचें नियमन करतो त्याला ईश्वर असें म्हणतात. त्याला भिऊन तूं (कस्य) कोणाच्याहि (धनम्) धनाची अन्यायानें अभिलाषा धरूं नकोस. कोणाच्याहि धनाचा अपहार करूं नकोस. त्या अन्यायाचरणाचा त्याग कर व न्यायरूप धर्माचरणाच्या योगानें आपल्या आत्म्यानें आनंदाचा उपभोग कर. या मंत्रांत ईश्वराचें सर्वव्यापित्व दाखविलें आहे.

अहं भुवं वसुनः पर्व्यस्पतिरहं धनानि संजयामि शश्वतः ॥ मां हवन्ते पितरं न जन्तवोऽहं दाशुषे विभजामि भोजनम् ॥ १ ॥ अहमिन्द्रो न पराजिग्य इद्धनं न मृत्यवेऽवतस्थे कदाचन ॥ सोममिन्मा सुन्वन्तो याचता वसु न मे पूरवः सख्ये-रिषाथन ॥ २ ॥ ऋ. मं. १०।४८ ॥

ईश्वर सर्वांनां उपदेश करतो कीं, " हे लोक हो ! (अहम्) मी (वसुनः) सर्व जगताच्या (पूर्व्यः) पूर्वी (भुवम्) विद्यमान होतों व या सर्व जगाचा मी (पतिः) पालक आहें. (धनानि) मी सर्व धनें भक्तांला देणारा व (शश्वतः) अनादिकालापासून (संजयामि) मी विजयी आहें, मी सनातन जगत्कारण आणि सर्व धनांचा विजय करणारा व दाता आहें. (माम्) मलाच (जन्तवः) सर्व जीवानीं (पितरं हवन्ते) पित्याप्रमाणें हाक मारावी. (दाशुषे) मी दानशील आहें म्हणून मी सर्वांस सुख देणाऱ्या जगतासाठीं (भोजनम्) भोग्य पदार्थांचा (विभजामि) विभाग करतों व सर्वांचें पालन करतों. (अहं इंद्रः) मी परमैश्वर्यवान् सूर्याप्रमाणें सर्व जगाचा प्रकाश करणारा आहें. (न पराजिग्ये) माझा कधींहि पराजय होत नाहीं. (न मृत्यवे) मी कधीं मृत्यूला प्राप्त होत नाहीं (इत् धनम्) मी जगत् रूपी धनाचा निर्माणकर्ता आहें. मी सर्व जगाची उत्पत्ति करणारा आहें असें समजा. हे जीव हो ! (सोमम्) ऐश्वर्यप्राप्तीसाठीं (सुन्वन्तः) यत्न करून तुम्ही माझ्याकडे (वसु याचत) विज्ञानादि धनाची याचना करा. (मे सख्ये रिषाथन) माझ्या मैत्रीपासून तुम्ही दूर होऊं नका. मी सत्यभाषण व स्तुति करणाऱ्या लोकांना सनातन ज्ञानधन देतों. मी वेदाचा प्रकाश करणारा आहें व तेच वेद मला यथायोग्य दाखवून देतात त्या वेदानेंच सर्वांच्या ज्ञानाला मी वाढवितों. मी सत्पुरुषांचा प्रेरक, यज्ञ करणाऱ्यांला फल देणारा, विश्वसंबंधीं सर्व कार्य करणारा व विश्वाला आधार देणारा आहें. म्हणून हे लोक हो ! तुम्ही उपासनेकरितां माझ्या ठिकाणीं कोणा दुसऱ्याची स्थापना करून पूजा करूं नका, दुसऱ्याला मानूं नका व जाणूंहि नका." याप्रमाणें वागण्यानेंच सर्वांचें कल्याण होईल.

हिरण्यगर्भः समवर्त्तताग्रे भूतस्य जातः पतिरेक आसीत् ॥ स दाधार पृथिवीं

---

(१) " न प्रतीके न हि सः " ब्रह्मसू. अ. ४ पाद १।४ प्रतीकामध्यें ब्रह्मोपासना करणें ठीक नाहीं कारण प्रतीक ब्रह्म नाहीं. " ब्रह्मदृष्टिरुत्कर्षात् " ब्रह्माचें ध्यानच श्रेष्ठ आहे. याकरितां प्रतीकामध्यें ब्रह्मदृष्टि न करतां ब्रह्मामध्येंच केली पाहिजे व तें ध्यान निर्विषय मन होईल तेव्हांच लाभणारें आहे. कोणतेंहि प्रतीक घेतलें तरी त्याचा विषयान्तर्गत समावेश होणारा आहेच म्हणून स्वामी रामानुज भाष्यामध्यें म्हणतात कीं प्रतीकोपासनं हि नाम " अब्रह्मणी ब्रह्मदृष्ट्यानुसन्धानम् " श्रीभाष्ये । ब्रह्माहून भिन्न वस्तूमध्यें ब्रह्मदृष्टि करणें याला प्रतीकोपासना म्हणतात; परंतु उपासना अधिकारांत ब्रह्माहून भिन्नांत ब्रह्मदृष्टि करणें येत नाहीं असा उपदेश आहे. म्हणून प्रतीक म्हणजे परिच्छिन्न पदार्थांमध्यें ब्रह्मदृष्टि करण्याचा शास्त्रांत निषेध आहे असें समजावें.

यामुतेमां कस्मै देवाय हविषा विधेम ॥

॥ यजु. अ. १३।४ ॥

हे मनुष्य हो ! (भूतस्य) जो या सृष्टीच्या (अग्रे) पूर्वी होता व जो (हिरण्य-गर्भः) सूर्यादि तेजोमय गोलांचें उत्पत्तिस्थान आहे तसेंच (पतिः) जें सर्व कांहीं आहे त्या सर्वांचा आधार व पालनकर्ता आहे.—पूर्वी होता व पुढेंहि असेल (सः दाधार) त्यानें पृथ्वीपासून सूर्यापर्यंत सर्व सृष्टि उत्पन्न करून धारण केली आहे. (कस्मै०) अशा त्या सुखमय परमेश्वराची जशी आम्ही उपासक लोक उपासना करतों तशी तुम्हींहि करा." या मंत्रावरून ईश्वराचें अस्तित्व व अनादित्व सिद्ध होतें.

(२) ईश्वराचें अस्तित्व.

(प्र०) तुम्ही ईश्वर आहे असें म्हणतां, पण त्याच्या अस्तित्वाची सिद्धि कशी करणार ? (उ०) प्रत्यक्षादि प्रमाणांनीं आम्ही ईश्वराचें अस्तित्व सिद्ध करतों. (प्र०) हें अशक्य आहे. ईश्वरामध्यें प्रत्यक्ष प्रमाण कसें लागू पडेल ? (उ०) पहा.—"**इंद्रियार्थसन्निकर्षोत्पन्नं ज्ञानमव्यपदेश्यमव्यभिचारि व्यवसायात्मकं प्रत्यक्षम्** ॥ न्याय. १ । ४ ॥ ही प्रत्यक्षाची व्याख्या महर्षि गौतमानीं केलेली आहे. जें ज्ञान, श्रोत्र, त्वचा, चक्षु, जिव्हा, घ्राण, व मन यांचा अनुक्रमें शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, सुखदुःख-सत्यासत्य इत्यादि विषयांशीं संबंध होऊन उत्पन्न होतें, तें प्रत्यक्ष ज्ञान होय, पण तें निर्भ्रांत-भ्रमरहित-असें असलें पाहिजे. यावरून आपल्या लक्षांत येईल कीं, इंद्रियें व मन यांना गुणांचें प्रत्यक्ष होतें, पण गुणीचें प्रत्यक्ष होत नाहीं. जसें त्वचा वगैरे चारहि इंद्रियांनीं स्पर्श, रूप, रस व गंध या चारहि गुणांचें प्रत्यक्ष झाल्यावर त्यांच्या सहाय्यानें गुणी-पृथिवी-चें (आत्म्याचा मनाशीं संयोग होऊन) प्रत्यक्ष होतें; याचप्रमाणें या प्रत्यक्ष सृष्टीमधील रचनाविशेष, आदि ज्ञानादि गुणांचें प्रत्यक्ष झाल्यानेंच परमेश्वराचेंहि प्रत्यक्ष होतें. तसेंच जेव्हां आत्मा मनाशीं व मन इंद्रियांशीं संयोग पावून चौर्यकर्मादिक वाईट कृत्यें व परोपकारादिक उत्तम कृत्यें करण्यास ज्याक्षणीं प्रारंभ करतो, त्याक्षणींच जीवाच्या इच्छा, ज्ञान वगैरे वृत्ती त्या त्या बऱ्या-वाईट विषयांकडे झुकतात व त्याबरोबरच करावयाचें काम वाईट असेल तर भय, लज्जा व शंका उत्पन्न होतात व काम चांगलें असल्यास निर्भयता, निःशंकपणा व आनंदोत्साह उत्पन्न होतात. या लहरी जीवात्म्याकडून निघत नसून परमात्म्याकडून निघतात. शिवाय जेव्हां जीवात्मा अंतर्बाह्य शुद्ध होऊन परमात्मविचारांमध्यें निमग्न होतो तेव्हां त्याला परमात्मा व संसार हीं दोन्हीं प्रत्यक्ष होतात; तात्पर्य युक्ति व अनुभव यांनीं जर परमेश्वर प्रत्यक्ष होतो तर मग अनुमानादि अन्यप्रमाणानीं

परमेश्वराचें ज्ञान झालेंच पाहिजे यांत संदेह उत्पन्न होण्याचें कांहीं कारण नाहीं. कारण कार्य पाहून कारणाचें अनुमान करतां येतें (प्र०) परमेश्वर आहे कोठें? (उ०) परमेश्वर सर्वव्यापक असल्यामुळें तो सर्वत्र आहे. जर तो एक देशी असता तर तो सर्वान्तर्यामी, सर्वद्रष्टा, सर्वज्ञ, सर्वनियन्ता, सर्वस्रष्टा, सर्वाधार व सर्वांचा प्रलय करणारा होऊं शकला नसता. कारण जर तो सर्वत्र नाहीं व कोणत्या तरी विशेष स्थानीं आहे, तर त्या स्थानाशिवाय जी इतर जागा राहिलेली आहे; त्याठिकाणांतील कार्यें त्याकडून होणार नाहींत. ईश्वर तर सर्व ठिकाणचीं कामें करीत आहे. म्हणून तो सर्व ठिकाणीं आहे. (प्र०) परमेश्वर दयालु असून न्यायकारीहि आहे काय? (उ०) होय. (प्र०) हे दोन गुण परस्परविरुद्ध आहेत व ते एकत्र कसे संभवतील? जो न्याय करतो तो दयेचा अवलंब कसा करील व जो दयालु आहे त्याच्याकडून बरोबर न्याय तरी कसा होईल. केलेल्या बऱ्यावाईट कृत्यानुरूप बरोबर तंतोतंत सुखदुःख देणें याला न्याय असें म्हणतात; अपराध्याला सोडणें, थोडा दंड करणें इत्यादि प्रकाराला दया म्हणतात. हे दोन गुण एकत्र कसे राहतील? (उ०) वास्तविक न्याय व दया यांमध्यें नाममात्राशिवाय कांहीं भेद नाहीं. कारण जो परिणाम न्यायानें होतो तोच दयेनें दंड दिल्यानें होतो. ज्याच्या योगानें मनुष्यें अपराध करणार नाहींत व दुःखी होणार नाहींत अशा करण्याला दया असें म्हणतात. जो दया व न्यायाचा आपण अर्थ केलात तो बरोबर नाहीं, कारण तशा दयेपासून पुढें त्याचें नुकसानच होतें. ज्यानें जितकें जसें वाईट काम केलें असेल त्याला बरोबर तितकाच दंड देणें हाच खरा न्याय व हीच खरी दया आहे. अपराध्याला सोडून देणें ही दया नसून निर्दयपणाच आहे. कारण एका दुष्ट पुरुषाला दंड न देतां सोडण्यापासून हजारों सत्पुरुषांला त्रास होतो. एकाला शिक्षा न देण्यापासून हजारों माणसांना अप्रत्यक्ष दुःख दिल्यासारखें होतें, ही दया कसली? दुष्टांना शासन करणें, कारागृहवासांत त्यांना ठेवून त्याच्याकडून पुढें होणाऱ्या पापापासून त्याला बचावणें व त्या दुष्टांच्या त्रासांतून इतर पुरुषांना सोडविणें हीच खरी दया आहे. अपराध्याला सोडणें ही दया नव्हे. (प्र०) मग दया व न्याय हे दोन शब्द तरी कसे झाले? जर दोनहि शब्दांचें तात्पर्य एकच असतें तर दोन शब्दांची उत्पत्तिच झाली नसती. यावरून उघड होतें कीं, या दोन शब्दांत भेद आहे. (उ०) एकाच अर्थाचे अनेक शब्द व अनेक अर्थांचा एकच शब्द असे भाषेमध्यें पुष्कळ असतात. (प्र०) असेनात? पण सर्व लोक दया व न्याय यांत भेद मानतात ना? (उ०) या संसारांतील मनुष्यें सत्यासत्याचा गोंधळ करतात, पण विचारानेंच त्यांतील भेद पाहिला पाहिजे. प्रथमतः पहा कीं, ईश्वराची मोठी दया ही आहे कीं, त्यानें सर्व जीवांचे मनोरथ सिद्ध होण्यासाठीं या जगतामध्यें सर्व पदार्थ उत्पन्न करून ते मनुष्यांला दान दिले

आहेत; यापेक्षां अणखी दुसरी दया कोणती असणार बरें? परमेश्वराचा न्याय तर प्रत्यक्ष दिसतच आहे, सुखदुःखाचा कमी अधिकपणा यांच्यावरून त्याचें न्यायकारित्व उत्तम व्यक्त होतें. दया ही आंतील वृत्ति आहे व न्याय ही बाह्यवृत्ति आहे. मनांमध्यें सर्वांला सुख व्हावें व दुःख नाहींसें व्हावें ही इच्छा करणें ही दया होय व ती इच्छा सफल होण्यासाठीं अपराधानुकूल दंड देणें हा न्याय होय. मनुष्यमात्रांला पापापासून व दुःखापासून दूर करणें हेंच या दोहोंचेंहि प्रयोजन आहे. (प्र०) ईश्वर साकार आहे कीं निराकार आहे? (उ०) ईश्वर निराकार आहे. कारण जो साकार असतो तो सर्वत्र व्यापक असूं शकत नाहीं व जो सर्वव्यापक नसेल तो सर्वज्ञत्वादि गुणांनीं युक्त असूं शकणार नाहीं. साकार वस्तु परिमित असते म्हणून तीमधील गुणहि परिमितच असूं शकतात. त्याप्रमाणें तो देहधारी असेल तर शीतोष्ण, क्षुधातृषा, रोग, दोष, छेदनभेदन इत्यादि शरीराचे दोष त्यामध्यें राहणार; अर्थात् ईश्वर निराकारच असला पाहिजे. शिवाय जो देहधारी असतो, त्याचा तो देह उत्पन्न होण्यास दुसऱ्यांचें साहाय्य लागतें, याचप्रमाणें साकार ईश्वराच्या उत्पत्तीला, त्याचे कान, नाक, डोळे करण्यासाठीं दुसऱ्या कोणाची तरी आवश्यकता ही आहेच. जो पदार्थ संयोगापासून उत्पन्न होतो, त्या दोन पदार्थांला संयुक्त करणारा निराकार चेतन निराळा अवश्य असला पाहिजे. जर कोणी येथें असें म्हणेल कीं, परमेश्वरानें स्वकीय इच्छाशक्तीच्या योगानें आपलें शरीर बनविलें, तरी त्यावरून एवढें सिद्ध होतें कीं, शरीर बनविण्यापूर्वी तो निराकार होता. वरील सर्व विवेचनाचें तात्पर्य हें आहे कीं परमेश्वर निराकार आहे व म्हणूनच तो जगाच्या सूक्ष्म कारणांमध्यें व्यापून, त्या सूक्ष्मापासून स्थूल जगत् बनवूं शकतो. (प्र.) ईश्वर सर्वशक्तिमान् आहे कीं नाहीं? (उ.) आहे, पण सर्वशक्तिमान् शब्दाचा जसा तुम्ही अर्थ समजतां तसा तो नाहीं. परमेश्वर सर्वशक्तिमान् आहे याचा अर्थ एवढाच कीं, तो जगाच्या उत्पत्ति, स्थिति, लय व जीवांला यथोचित पुण्यपापानुकूल सुखदुःख देण्याची व्यवस्था इत्यादि आपल्या कामांमध्यें थोडें सुद्धां कोणाचें साहाय्य घेत नाहीं; अर्थात् हीं कृत्यें आपल्या अनंत सामर्थ्यानें तो पूर्ण करतो. (प्र.) आम्ही तर सर्वशक्तिमान् शब्दाचा असा अर्थ समजतों कीं, तो काय पाहिजे तें करूं शकतो, कारण त्याला विचारणारा त्याच्यावर कोणींच नाहीं. (उ.) परमेश्वर सर्व कांहीं करूं शकतो असें जें तुम्ही म्हणतां त्याचा अर्थ तरी काय? तो आपला स्वतःचा नाश, अनेक ईश्वरांची उत्पत्ति, चोरी व्यभिचारादि पापाचरणें, अविद्वत्तेचा स्वीकार व स्वतः दुःखी होणें इत्यादि गोष्टी तो करूं शकतो कीं काय? वास्तविक या गोष्टी परमेश्वराच्या गुणकर्मस्वभावाच्या विरुद्ध आहेत, अर्थात् परमेश्वरामध्यें या संभवत नाहींत. यावरून उघड होतें कीं, परमेश्वर सर्व कांहीं करूं शकतो असा सर्वशक्तिमान् शब्दाचा अर्थ नसून त्याचें कृत्य करण्यास त्याला

दुसऱ्याची मदत लागत नाहीं असा आहे. (प्र.) परमेश्वर सादि (उत्पन्न झालेला) आहे कीं अनादि आहे ? (उ.) परमेश्वर अनादि आहे ज्याची उत्पत्ति कोणत्याहि कारणापासून किंवा कोणत्याही समयीं झालेली नसते. त्याला अनादि असें म्हणतात. हे सर्व अर्थ पूर्वी (प्रथम समुल्लास पृ० १५ मध्यें) दिलेलेच आहेत. ते तेथें पहावे. (प्र.) परमेश्वर काय इच्छितो ? (उ.) सर्वांचें कल्याण व्हावें सर्व लोक स्वतंत्र, सुखी, आनंदी असावे अशी त्याची इच्छा आहे. तो कोणालाहि अपराधावांचून पराधीन करीत नाहीं. (प्र०) परमेश्वराची स्तुति, प्रार्थना व उपासना केली पाहिजे कीं नाहीं. (उ०) सर्वांनीं अवश्य केली पाहिजे. (प्र०) ईश्वराची जो स्तुति करील, त्याच्या त्या स्तुतीला भुलून तो स्तुति करणाराचें पाप नाहींसें करील काय ? (उ०) नाहीं. (प्र०) मग स्तुतिप्रार्थना करण्यापासून लाभ काय ? (उ०) स्तुतिप्रार्थनेचें फल निराळेंच आहे. (प्र०) तें कोणतें ? (उ०) स्तुतीच्या योगानें परमेश्वरावर आपली प्रीति बसते, त्याच्या गुणकर्मस्वभावांच्या योगानें आपले गुणकर्मस्वभाव सुधारतां येतात, प्रार्थनेच्या योगानें निरभिमानता उत्पन्न होऊन उत्साह वाढतो व साहाय्य मिळतें. उपासनेच्या योगानें ब्रह्माशीं एकतानता होऊन त्याचा साक्षात्कार होतो. अशीं फळें होतात. (प्र०) यांचें जरा जास्त स्पष्टीकरण करा बरें. (उ०) ठीक आहे पहाः—

(३) ईश्वराची स्तुति.

स पर्यगाच्छुक्रमकायमव्रणमस्नाविरꣳ शुद्धमपापविद्धम् ॥ कविर्मनीषी परिभूः स्वयम्भूर्याथातथ्यतोऽर्थान् व्यदधाच्छाश्वतीभ्यः समाभ्यः ॥ यजु० ४० । ८ ॥

(सः) तो ईश्वर (पर्यगात्) सर्वत्र व्यापक व अनंत बलवान् आहे. तो (शुक्रम्) शुद्ध, (कविः) सर्वज्ञ, (मनीषी) सर्वांतर्यामी, मननशील, (परिभूः) सर्वांवर विराजमान, (स्वयंभूः) सनातन, स्वयंसिद्ध, असा परमेश्वर (शाश्वतीभ्यः समाभ्यः) अनादि कालापासून आपल्या अनादि सनातन जीवरूपी प्रजेला वेदद्वारा (अर्थान् व्यदधात्) संपूर्ण अर्थांचा बोध यथावत् करीत आहे. ही **सगुण** स्तुति झाली. ज्यामध्यें परमेश्वराच्या गुणांचें वर्णन असतें तिला सगुण स्तुति असें म्हणतात. तसेंच— (अकायम्) तो परमेश्वर कधींहि शरीर धारण करीत नाहीं अर्थात् तो अ-जन्मा आहे (अव्रणम्) त्याच्यामध्यें व्रण किंवा छिद्र नाहीं. (अस्नाविरम्) तो नाडीशिरास्नायूंच्या बंधनांत पडत नाहीं, (अपापविद्धम्) तो कधींहि पापाचरण करीत नाहीं,

ज्याला क्लेश, दुःख, अज्ञान हीं केव्हांहि होत नाहींत, रागद्वेषादि विकारांहून तो पृथक् अशा तऱ्हेनें जे विकार ईश्वरामध्यें नाहींत ते नाहींत असें म्हणणें ही निर्गुण स्तुति समजावी. परमेश्वराचे जसे गुणकर्मस्वभाव आहेत. तसेच आपले व्हावे अशी इच्छा होणें हें स्तुतीचें फल आहे. परमेश्वर न्यायकर्ता आहे तसें आपण हि व्हावें असें वाटून त्याप्रमाणें आचरण करणें हें सर्वथैव लाभप्रद आहे असें न करतां तोंडावाटे भराभर परमेश्वरस्तुतीचे श्लोक म्हणणें व आपलें आचरण सुधारण्याची मुळींच खटपट न करणें, अशा स्तुतिपाठापासून कांहीं लाभ नाहीं.?

(४) प्रार्थना.

यां मेधां देवगणाः पितरश्चोपासते । तया मामद्य मेधयाऽग्ने मेधाविनं कुरु स्वाहा ॥

यजु० ३२।१४ ॥

हे (अग्ने) प्रकाशस्वरूप परमेश्वर! (देवगणाः पितरः) विद्वान्, ज्ञानी व योगी लोक (याम्) ज्या (मेधाम्) बुद्धीची (उपासते) उपासना करतात (तया) त्या (मेधया) बुद्धीच्या योगानें (माम्) मला (अद्य) याच जन्मामध्यें (मेधाविनम्) बुद्धिमान् (कुरु) कर. (स्वाहा) त्या बुद्धीनें मी तुला जाणूं शकेन.

तेजोऽसि तेजो मयि धेहि । वीर्यमसि वीर्यं मयि धेहि ॥ बलमसि बलं मयि धेहि । ओजोऽस्योजो मयि धेहि । मन्युरसि मन्युं मयि धेहि । सहोऽसि सहो मयि धेहि ॥

यजु० १९।९॥

हे परमेश्वर! तूं प्रकाशस्वरूप आहेस, कृपाकरून माझ्यामध्येंहि प्रकाश उत्पन्न कर. तूं अनंतपराक्रमयुक्त आहेस, कृपाकरून माझ्यामध्येंहि पराक्रम करण्याचें सामर्थ्य उत्पन्न कर. तूं अनंतबलयुक्त आहेस, माझ्यामध्येंहि बल स्थापन कर. तूं अनंतबुद्धिसामर्थ्यानें युक्त आहेस, माझ्यामध्येंहि तें सामर्थ्य उत्पन्न कर. तूं दुष्टांवर क्रोध करणारा आहेस तसा मलाहि कर. तूं निंदास्तुति यांना सहन करणारा आहेस, करितां मलाहि तसाच कर.

यज्जाग्रतो दूरमुदैति दैवं तदु सुप्तस्य तथैवेति ।
दूरङ्गमं ज्योतिषां ज्योतिरेकन्तन्मे मनः शिव-
संङ्कल्पमस्तु ॥ ॥ य० ३४।१॥

हे परमेश्वरा ! तुझ्या कृपेनें माझें मन जागेपणीं दूर दूर जातें, सदोदित (दैवम्) दिव्यगुणांनीं युक्त असतें. (सुप्तस्य) मी निजलों असतां तें सुषुप्तीला प्राप्त होतें, स्वप्नामध्यें तें जणूं काय दूर दूर जाऊन काम करतें, तें सर्व प्रकाशकांचेंहि प्रकाशक आहे, असें तें माझें मन शुभसंकल्पयुक्त होवो. अर्थात् दुसऱ्यांचें हित करण्यांत तत्पर व केव्हां कोणाची इच्छेनेंहि हानी न करणारें असें असो.

येन कर्माण्यपसो मनीषिणो यज्ञे कृण्वन्ति
विदथेषु धीराः॥ यदपूर्वं यक्षमन्तः प्रजानां
तन्मे मनः शिवसंङ्कल्पमस्तु ॥ ३४।२॥

हे सर्वांतर्यामि परमात्मन् ! ज्याच्या साहाय्यानें कर्मे करणारे (मनीषिणः) धैर्ययुक्त विद्वान् लोक (यज्ञे) यज्ञ व (विदथेषु कृण्वन्ति) युद्धादि कृत्यें करतात, व जें (अपूर्वम्) अपूर्व, अतर्क्य, (यक्षम्) पूजनीय, व (प्रजानां अन्तः) सर्व प्रजांच्या आंत असणारें असें जें माझें मन आहे तें शुभ संकल्पानें युक्त होवो; अर्थात् तें नेहेमीं धर्म करण्याची इच्छा करून अधर्माला सोडून देवो.

यत्प्रज्ञानमुत चेतो धृतिश्च यज्ज्योतिरन्तर
मृतं प्रजासु ॥ यस्मान्नऋते किञ्चन कर्म
क्रियते तन्मे मनः शिवसंङ्कल्पमस्तु ॥

जें उत्कृष्ट ज्ञान, चित्तवृत्ति, धृति व सर्व प्रजांच्या अंतर्यामी असणारी अविनाशी प्रकाशवृत्ति यांनीं युक्त आहे, ज्याच्यावांचून कोणी कोणतेंहि काम करूं शकत नाहीं, तें माझें मन शुद्ध गुणांनीं युक्त होवो व दुष्ट गुणांपासून दूर राहो.

येनेदं भूतं भुवनं भविष्यत् परिगृहीतममृ-

तेन॒ सर्वम् ॥ येन॑ य॒ज्ञस्ता॒यते॑ स॒प्त होता॒
तन्मे॒ मन॑: शि॒वसं॑ङ्कल्पमस्तु ॥३४।४॥

हे परमेश्वर ! ज्याच्या योगानें योगी लोक भूत, भविष्य व वर्तमान समयांतील व्यवहारांला जाणतात, जें अविनाशी जीवात्म्याला परमात्म्याशीं संलग्न करून त्याला त्रिकालज्ञ करितें, ज्याच्यामध्यें ज्ञान आहे व ज्याचा (सप्त होता) पंच ज्ञानेंद्रियें, बुद्धि व आत्मा यांचा ज्याच्याशीं संयोग राहतो, (येन) ज्याच्या योगानें (यज्ञः तायते) योगरूपी यज्ञ वाढविला जातो तें माझें मन योगविज्ञानयुक्त होवो व अविद्यान्धकारापासून दूर राहो.

यस्मि॒न्नृच॒: साम॒यजूं॑ष्यृ॒ यस्मि॒न्प्रति॑ष्ठिता
रथना॒भावि॒वारा॒: ॥ यस्मि॑ँश्चि॒त्त ꣳ सर्व॒-
मो॒तं प्र॒जाना॑ं तन्मे॒ मन॑: शि॒वसं॑ङ्कल्प-
मस्तु ॥ ३४।५ ॥

हे परम विद्वान् परमेश्वर! तुझ्या कृपेनें, माझ्या मनामध्यें, रथाच्या चाकाच्या तुम्बामध्यें जसे आरे बसविले असतात; त्याचप्रमाणें ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद यांची स्थापना होत असते; व ज्यामध्यें सर्व प्रजांचें चित्त चेतन आहे असें जाणलें जातें, तें माझें मन विद्याप्रिय होवो व अविद्येपासून दूर राहो.

सु॒षा॒र॒थिर॒श्वंनिव॒ यन्म॑नु॒ष्या॒न्नेनी॒यते॑ऽभीशु॒-
भि॒र्वा॒जिन॑ इव ॥ हृ॒त्प्रति॑ष्ठं॒ यद॑जि॒रं॑ जवि॑ष्ठं॒
तन्मे॒ मन॑: शि॒वसं॑ङ्कल्पमस्तु ॥ यजु. ३४।६ ॥

हे सर्वनियामक ईश्वर ! जें माझें मन उत्तम (सुषारथिः) सारथ्याप्रमाणें किंवा लगामानें युक्त असणाऱ्या (अश्वान्) घोड्यांप्रमाणें मनुष्यांना इकडे तिकडे नेऊन आनंद देतें, जें हृदयांत वास करितें, जें (जविष्ठम्) गतिमान् व वेगवान् आहे; तें माझें मन सर्व इंद्रियांला अधर्माचरणापासून सोडवून धर्माप्रमाणें चालण्यास साहाय्य देईल असें कर.

अग्ने नय सुपथा राये अस्मान् विश्वानि देव वयुनानि विद्वान् ॥ युयोध्यस्मज्जुहुराणमेनो भूयिष्ठां ते नम उक्तिं विधेम ॥

यजु० ४० । १६ ॥

हे सुखदायक (अग्ने) स्वप्रकाशस्वरूप सर्वज्ञ परमेश्वर ! आम्हांला तूं (सुपथा) श्रेष्ठमार्गानें ने व सर्व प्रज्ञानांची प्राप्ति करून दे. जें कांहीं आमच्यांत (जुहुराणम्) कुटिल पापाचरण असेल त्याचा पूर्ण (युयोधि) नाश कर, तें आमच्यापासून दूर राहूं दे. आम्ही तुझी नम्रतापूर्वक स्तुति करतों कीं, जिच्या योगानें तूं आम्हांला पवित्र कर.

मा नो महान्तमुत मा नोऽअर्भकं मा न उक्षन्तमुत मा न उक्षितम् ॥ मानो वधीः पितरं मोत मातरं मा नः प्रियास्तन्वो रुद्र रीरिषः ॥ यजु० १६ । १५ ॥

हे (रुद्र) दुष्टांला त्यांच्या पापावद्दल दण्ड करून त्यांना रोदन करावयास लावणाऱ्या परमेश्वरा ! तूं आमच्या लहानथोर लोक, गर्भ, माता, पिता, प्रियजन, बंधुवर्ग व शरीरें यांचा घात आमच्याकडून होईल असें कृत्य आम्हांकडून करून घेऊं नकोस, अशा मार्गानें आम्हांला चालीव कीं, ज्याच्यायोगानें आम्ही दंडाला योग्य होणार नाहीं.

असतो मा सद् गमय तमसो मा ज्योतिर्गमय मृत्यो र्माऽमृतं गमयेति ॥ शतपथ० ब्रा० १४।३।१।३० ॥

हे परमगुरो परमात्मन् ! तूं आम्हांला असत्य मार्गापासून दूर करून सत्य मार्गानें ने. अविद्यान्धकारांतून सोडवून विद्यारूपी सूर्याची प्राप्ति करवून दे, व मृत्युरूपी रोगांपासून आम्हांला दूर करून मोक्षरूपी आनंदामृताची प्राप्ति करून दे. ज्या दोषांपासून व दुर्गुणांपासून परमेश्वर पृथक् आहे त्यांपासून आपणहि पृथक् होण्याविषयीं परमेश्वराची प्रार्थना करणें ही विधिनिषेधमुख असल्यामुळें सगुणनिर्गुणात्मक गणली जाते.

जो मनुष्य ज्या गोष्टीची प्रार्थना करीत असेल त्यानें त्याप्रमाणें आपलें वर्तन सुधारण्याची अव्याहत खटपट केली पाहिजे. जसें एखादा मनुष्य आपली बुद्धि उत्तम व्हावी म्हणून प्रार्थना करीत असेल तर त्यानें आपणाकडून होईल तितका विद्याव्यासंग वाढविला पाहिजे. आपल्या पुरुषार्थाची पराकाष्ठा केल्यानंतर मग परमेश्वराची प्रार्थना करणें चांगलें होय. तसेंच कित्येक लोक अशी प्रार्थना करीत असतात कीं, "हे ईश्वरा! माझ्या शत्रूंचा नाश कर, मला सर्वांत मोठा कर, माझी प्रतिष्ठा वाढो, माझ्या आधीन सर्व रहातील असें कर." अशा तऱ्हेच्या प्रार्थना करणें वाईट, इतकेंच नव्हे तर अशा प्रार्थनेचा परमेश्वर कधिंहि स्वीकार करित नाहीं. शिवाय या प्रार्थना अशक्यहि आहेत. दोनहि शत्रू परस्परांचा नाश व्हावा म्हणून परमेश्वराची प्रार्थना करूं लागले म्हणजे परमेश्वरानें गुणावगुणांचा विचार न करतां दोघांचाहि नाश करावा काय? येथें कोणी असें म्हणतील कीं, ज्यांची भक्ति परमेश्वरावर ज्यास्ती असेल त्यांची प्रार्थना सफल व्हावी. यावर आम्ही असें म्हणतों कीं, ज्याची भक्ति कमी असेल त्याच्या शत्रूचा कमी नाश व्हावा. वाचकांनीं येथें एवढें लक्षांत ठेवावें कीं, या कुतर्काना सीमाच नसते. जर असल्या प्रार्थना परमेश्वरानें ऐकल्या असत्या तर लोकांनीं अशीहि प्रार्थना केली असती कीं, "हे परमेश्वरा! मला माझ्या पोळ्या बनवून माझ्या पोटांत भर; माझ्या घरांतील कचरा झाड; कपडे धुवून टाक; माझी शेती कर." वाहवा भक्त महाराज! आपण तर खूप भक्तीची पराकाष्ठा केली. अशा प्रार्थना जर परमेश्वर ऐकेल तर सर्व लोक आळशी होऊन पुरुषार्थहीन होतील. परमेश्वर तर लोकांनीं (चतुर्विध) पुरुषार्थ करावे असें इच्छितो व त्याची वेदद्वारा लोकांस आज्ञाच तशी आहे. पहा–

कुर्व्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतꣳसमाः ॥

॥ यजु० ४०।२॥

"हे मनुष्य हो! तुम्ही शंभर वर्षेपर्यंत जगण्याची इच्छा करा व त्या आयुष्यामध्यें नेहेमीं काम करीत रहा." पहा सृष्टीमध्यें प्राणी किंवा अप्राणीरूप जे पदार्थ आहेत ते सर्व आपआपलीं कामें करीत आहेत. मुंग्या सदोदित प्रयत्न करीत असतात, पृथिवी सर्वदा फिरत असते, वृक्ष वाढत असतात; या सर्व पदार्थांपासून मनुष्यांनींहि कर्तव्याचा धडा शिकला पाहिजे. जो पुरुष पुरुषार्थ करणारा असतो त्याला दुसरेहि साहाय्य करूं शकतात. धर्मयुक्त पुरुषार्थ करणाऱ्या पुरुषाला परमेश्वरहि साहाय्य करतो. कोणाला नोकरीला जरी एखादा पुरुष ठेवावयाचा असेल तरीहि तो उद्योगी माणसालाच ठेवतो, आळशाला कोणीहि चाहत नाहीं. नेत्र असून पाहाण्याचा प्रयत्न करणाराला दिसतें, प्रयत्न न केला तर तो पूर्ण अंधच होय. याचप्रमाणें परमेश्वरहि

परोपकाराच्या कृत्यांत सर्वांस साहाय्य करतो. दुसऱ्याला ज्यापासून त्रास होईल अशा कृत्यांत तो कोणाला साहाय्य करीत नाहीं; गूळ पाहिजे असेल तर तो मिळण्यासाठीं प्रयत्नच केला पाहिजे, तो फार गोड आहे अशी त्याची स्तुति करीत बसल्यानें तो प्राप्त होणार नाहीं व त्याची रुचिहि समजणार नाहीं. तात्पर्य, पुरुषार्थ करून प्रार्थना केली पाहिजे. तरच परमेश्वराचें साहाय्य मिळेल. नाहींतर कांहीं मिळणार नाहीं.

(५) उपासना.

समाधिनिर्धूतमलस्य चेतसो निवेशितस्यात्मनि यत्सुखं भवेत् ।
न शक्यते वर्णयितुं गिरा तदा स्वयं तदन्तःकरणेन गृह्यते ॥

उपनिषद् ॥

ज्याचे समाधिच्या योगानें अविद्यादि मल नाश पावले आहेत, व आत्मसंस्थ होऊन परमेश्वरामध्यें जो आपलें चित्त लावूं शकतो, त्याला परमात्मसंयोगानें अप्रतिम सुख प्राप्त होतें, त्या सुखाचें वाणीनें वर्णन करतां येत नाहीं, कारण जीवात्मा स्वतःच त्याचें अंतःकरणानें ग्रहण करूं शकतो. " उपासना " या शब्दाचा अर्थ " (उप) जवळ (आसना) बसणें " असा आहे. अष्टांगयोग करून परमात्मसान्निध्य संपादणें व त्याच्या सर्वव्यापित्व, सर्वांतर्यामित्व इत्यादि गुणांचा साक्षात्कार करून घेणें यासाठीं " जीं कांहीं कृत्यें करावीं लागतात त्या सर्वांचा उपासनेमध्यें समावेश होतो. उपासनेला यमनियमांच्या पालनांची आवश्यकता आहे. ते यमनियम पुढें दिले आहेतः-

तत्राहिंसासत्यास्तेयब्रह्मचर्यापरिग्रहा यमाः ॥ योग. साध. २०॥

उपासना उत्तम रीतीनें सिद्ध व्हावी अशी इच्छा असेल तर त्या उपासकानें (अहिंसा) कोणाशींहि वैरभाव ठेवूं नये. (सत्यम्) सदोदित सत्य बोलावें. केव्हांहि खोटें बोलूं नये; सर्वदा सत्य व्यवहारच करावे. (अस्तेयम्) कोणाच्याहि पदार्थांचा अपहार करूं नये व सर्वांवर प्रीति ठेवावी. (ब्रह्मचर्यम्) जितेंद्रिय असावें, विषयलंपट होऊं नये. (अपरिग्रहः) निरभिमानी व निर्लोभी असणें, हे पांच यम मिळून उपासना योगाचें पहिलें अंग होतें, नंतर–

शौचसंतोषतपःस्वाध्यायेश्वरप्रणिधानानि नियमाः ॥

योग. सा. ३२।

(शौचम्) रागद्वेष सोडून आंतरिक शुद्धि करावी व जलादि साधनांनीं बाहेरची शुद्धि करावी. (सन्तोषः) धर्मयुक्त पुरुषार्थ करून लाभ झाला तर त्यांत आनंद मानूं नये व हानी झाली तर अप्रसन्न होऊं नये. सदोदित आळस

सोडून पुरुषार्थ करीत असावें. (तपः) सुखदुःख सहन करण्याची शक्ति आणावी व धर्माचें अनुष्ठान करावें, अधर्माचें अवलंबन कधींहि करूं नये. (स्वाध्यायः) सर्वदा वेदादि सत्यशास्त्रांचें अध्ययन व अध्यापन करावें. सत्पुरुषांचा संग करावा. (ईश्वरप्रणिधानम्) "ओ३म्" या परमेश्वराच्या नांवाचा अर्थविचारपूर्वक जप करावा व आपल्या आत्म्याला परमेश्वरामध्यें त्याच्या आज्ञेप्रमाणें पूर्णपणें लीन करावें. हे पांच नियम मिळून उपासनेचें दुसरें अंग होतें. याच्या पुढील सहा अंगांचें वर्णन "वैदिकधर्मस्वरूप" नामक ग्रंथामध्यें "उपासना" प्रकरणामध्यें केलेलें आहे तेथें पहावें किंवा विस्तार पहावयाचा असल्यास पतञ्जलिमहामुनिकृत योगदर्शन पहावें. उपासना नीट करण्याची इच्छा असल्यास त्यानें शुद्ध अशा एकान्तस्थलीं जाऊन तेथें आसन लावून प्राणायाम करावा, व त्या प्राणायामाच्या योगानें मनाला बाह्यविषयांपासून परावृत्त करून त्यांची नाभिप्रदेश, हृदय, कण्ठ, नेत्र, शिखा, पाठीचें मधलें हाड इत्यादि स्थानांपैकीं कोणत्यातरी स्थानांवर धारणा करून, आत्मा व परमात्मा यांचें विवेचन करून परमात्म्यामध्यें मग्न व्हावें. या मग्नतेलाच संयम असें म्हणतात व ही जो अनुभवतो तो संयमी होतो. जेव्हां साधक हीं साधनें करतो तेव्हां त्याचा आत्मा व अंतःकरण पवित्र होऊन सत्यपूर्ण होतें. त्याचें ज्ञान व विज्ञान नित्य वाढून त्याला मुक्ति सहज प्राप्त होते. जो आठ प्रहरांतून एक घटका तरी अशा रीतीनें ध्यान करतो त्याची आत्मोन्नति खात्रीनें होते. सर्वज्ञत्वादि गुणांचें चिंतन करून परमेश्वराची उपासना करणें ती सगुण उपासना होय व रागद्वेषरूपरसगंधादि गुणांहून तो पृथक् आहे असें त्याचें चिंतन करणें ही निर्गुणोपासना होय. ज्याप्रमाणें थंडीनें पीडित झालेला पुरुष अग्नीच्या जवळ गेल्याबरोबर त्याला सुख होतें त्याचप्रमाणें अशा रीतीनें उपासना करणाऱ्याला परमेश्वराची प्राप्ति होत असल्यामुळें त्याचीं सर्व दुःखें व सर्व दोष नाश पावून त्याच्यामध्यें परमेश्वराप्रमाणें गुणकर्मस्वभाव आविर्भूत होतात; म्हणूनच परमेश्वराची स्तुति, प्रार्थना व उपासना करणें योग्य आहे. उपासनेचीं अन्य फलें जरी दूर राहिलीं तरी उपासकामध्यें आत्मिक बलाची वृद्धि होत असल्यानें पर्वतप्राय दुःख आलें तरी तो घाबरत नाहीं व त्यांतून सहनशीलतेनें पार पडतो ही कांहीं लहान गोष्ट आहे? शिवाय ज्या परमेश्वरानें परमौदार्यानें हें जग उत्पन्न करून जीवांला सुखाचीं साधनें करून दिलीं त्याच्या गुणांचें स्मरण न करणें म्हणजे त्यालाच न मानण्यासारखें कृतघ्नपणाचें व मूर्खपणाचें काम आहे. (प्र०) परमेश्वराला श्रोत्रादि इंद्रियें नाहींत मग तो सर्व इंद्रियांचीं कामें कशीं करतो?(उ०)–

(६) परमेश्वराच्या गुणांचें वर्णन.

अपाणिपादो जवनो ग्रहीता पश्यत्यचक्षुः स शृणोत्यकर्णः ।
सवेत्ति वेद्यं न च तस्यास्ति वेत्ता तमाहुरग्र्यं पुरुषं महान्तम् ॥
श्वेताश्वतर उ० ३।१९॥

परमेश्वराला हात नाहींत पण तो आपल्या अतर्क्य शक्तीनें जगद्रचना करतो, त्याला पाय नाहींत पण तो सर्वव्यापक असल्यामुळें सर्वांहून अधिक वेगवान् आहे, डोळे नसतांहि सर्वांला यथावत् पहातो, श्रोत्रेन्द्रिय नसतांहि सर्व ऐकतो, त्याला अंतःकरण नाहीं तरीहि सर्वांला तो जाणतो; अशा त्या परमेश्वराला जाणणारा या जगांत कोणीहि नाहीं, तो सनातन सर्वश्रेष्ठ व पूर्ण असल्यामुळें त्याला पुरुष असें म्हणतात. तो इंद्रियांच्या साहाय्यावांचूनच आपल्या अतुल सामर्थ्यानें सर्व कामें करतो. (प्र०) परमेश्वर निष्क्रिय व निर्गुण आहे असें पुष्कळ लोक समजतात तें खरें आहे काय? (उ०)

न तस्य कार्यं करणं च विद्यते न तत्समश्चाभ्यधिकश्च दृश्यते । पराऽस्य शक्तिर्विविधैव श्रूयते स्वाभाविकी ज्ञानबलक्रिया च ॥ श्वेताश्वतर उ० ६।८॥

परमात्म्याच्या तद्रुप कोणतेंहि जगतांत कार्य नाहीं किंवा त्याचें कारणहि नाहीं म्हणजे त्याला उत्पन्न करणारें असें दूसरें कारण नाहीं तोच सर्वांचें कारण आहे. त्याच्या बरोबरीचाहि दुसरा कोणी नाहीं व अधिकहि कोणी नाहीं. त्याच्यामध्यें अनन्त ज्ञान, अनन्त बल व अनंत क्रिया अर्थात् सर्वोत्तम शक्ति स्वाभाविक आहे. जर परमेश्वर निष्क्रिय असता तर त्याच्याकडून, जगाची उत्पत्ति, स्थिति व लय हीं झालीं नसतीं. म्हणून तो 'विभू' आहे. तथापि तो चेतन असल्यामुळें त्याच्यांत क्रियापण आहे (प्र०) जेव्हां तो कोणती तरी क्रिया करतो तेव्हां ती क्रिया अंतयुक्त होते किंवा अनंत होते? (उ०) जेवढ्या देशकालामध्यें विशिष्ट क्रिया करणें तो उचित समजतो तेवढ्या देशकालामध्यें तो क्रिया करतो, जास्ती किंवा कमी करीत नाहीं. (प्र०) परमेश्वर आपला अंत जाणतो कीं नाहीं? (उ०) जाणणें म्हणजे जी वस्तु जशी आहे तशीच तिला समजणें. परमात्मा पूर्ण ज्ञानी असल्यामुळें त्याला त्याच्या संबंधानें पूर्ण ज्ञान आहे, परमेश्वर अनंत असल्यानें तो आपणास अनंतच समजतो परमेश्वर अनंत असतां जर तो आपणास सान्त समजेल तर तें अज्ञान होईल. अनंताला अनंत समजणें ज्ञान व अनंताला सान्त व सान्ताला अनंत समजणें अज्ञान होय. **"यथार्थदर्शनं ज्ञानमिति ।"** ज्याचा जसा गुण कर्म स्वभाव असेल त्याला तसेंच जाणणें व मानणें हें ज्ञान व विज्ञान होय व तसें न समजणें हें अज्ञान समजावें.

क्लेशकर्मविपाकाशयैरपरामृष्टः पुरुषविशेष ईश्वरः ॥

योगसू. समाधि. २४ ।

जो अविद्यादि क्लेशांपासून व कुशलाकुशल, इष्टानिष्ट व मिश्रफलदायक कर्मांच्या वासनांपासून अलिप्त असतो, त्या सर्व जीवांहून भिन्न असणाऱ्या पुरुषाला **ईश्वर** असें म्हणतात.

(प्र०) ईश्वरासिद्धेः ॥ सांख्य० १।९२ ॥
प्रमाणाभावान्न तत्सिद्धिः ॥ सांख्य० ५।१० ॥
संबंधाभावान्नानुमानम् ॥ सां० ५।११ ॥

अहो तुम्ही ईश्वर आहे असें म्हणतां पण सांख्यशास्त्रामध्यें काय सांगितलें आहे तें पहा. सांख्यशास्त्र म्हणतें कीं, " ईश्वर प्रत्यक्ष दिसत नाहीं म्हणून त्याची सिद्धि होणें अशक्य आहे. " " ज्या अर्थी त्याची सिद्धि प्रत्यक्ष नाहीं त्या अर्थी अनुमानादि प्रमाणेंहि लागू होणार नाहींत." " व्याप्तिसंबंध नसल्यामुळें त्याचें अनुमान होऊं शकत नाहीं. अर्थात् प्रत्यक्षानुमान हीं प्रमाणें जेथें लागू होत नाहींत तेथें शब्दप्रमाणहि लागूं शकत नाहीं अर्थात् ईश्वराची सिद्धि होणें अशक्य आहे." सांख्य ईश्वराला मानीत नाहींत त्यावर तुमचें काय मत आहे? (उ०) सांख्याचार्य कपिल महामुनींला आपण निरीश्वरवादी म्हणतां, पण त्यांच्या सूत्रांचा आपणास अर्थच नीट समजला नाहीं हें खरें. "ईश्वर जगताचें उपादान कारण नाहीं. म्हणून ईश्वरसिद्धि करण्यासाठीं कोणतेंहि प्रत्यक्ष प्रमाण नाहीं " असा भाव वरील सूत्रांचा आहे "ईश्वर नाहीं " असा त्याचा अर्थ नव्हे. परमेश्वर सर्वत्र व्यापक असल्यामुळें त्याला "पुरुष" असें म्हणतात व त्याच प्रमाणें शरीरामध्येंहि जीव शयन करीत असल्यामुळें त्यालाहि " पुरुष " असें म्हणतात. पहाः—

प्रधानशक्तियोगाच्चेत्संगापत्तिः ॥ ८ ॥
सत्तामात्राच्चेत्सर्वैश्वर्यम् ॥ ९ ॥
श्रुतिरपि प्रधानकार्यत्वस्य ॥ १२ ॥ सांख्य० अ० ५ ॥

(प्रधान) जर पुरुषाला प्रधानशक्तीचा योग (परमाणु एकाला एक मिळून वृद्धि पावणें व पुनः मूळस्थितींत येणें) होईल तर त्याचे ठिकाणीं संगापत्ति होईल—अर्थात् ज्याप्रमाणें प्राकृतिक सूक्ष्म परमाणु एकत्र जुळल्यानें संगतिरूप कार्य-सृष्टि उत्पन्न होते, त्याचप्रमाणें जर परमेश्वरामध्यें तशा प्रधानशक्तीचा योग मानला तर तोहि स्थूल होईल म्हणून परमेश्वर जगाचें उपादान कारण नाहीं, तो निमित्त कारण आहे. (सत्ता०) जर चैतन्यमय परमेश्वर जगाचें उपादान कारण मानलें तर जसा परमेश्वर पूर्ण ऐश्वर्ययुक्त आहे त्याचप्रमाणें हें जगहि असलेंच पाहिजे; पण तसें नाहीं अर्थात् परमेश्वर जगाचें उपादान कारण नसून निमित्त कारण आहे. (श्रुति०)

उपनिषदांमध्येंहि प्रधानप्रकृति हेंच जगाचें उपादान कारण आहे असें सांगितलें आहे. पहा—

अजामेकां लोहितशुक्लकृष्णां बह्वीः प्रजाः सृजमानां स्वरूपाः ॥

श्वेताश्व० ४।५॥

(अजाम्) जी जन्मरहित व (शुक्लाम्) सत्व (लोहिताम्) रज व (कृष्णाम्) तम या तीन गुणांनीं युक्त प्रकृति आहे, तीच (स्वरूपाः) आपल्या आकाराच्या योगानें बहु प्रजारूपी होत असते; अर्थात् प्रकृति परिणामिनी असल्यानें अवस्थान्तराला प्राप्त होत असते; त्याचप्रमाणें पुरुष अपरिणामी असल्यामुळें अवस्थान्तर पावून त्याचें रूपान्तर होत नाहीं; तो सदोदित कूटस्थ निर्विकार असतो. तात्पर्य *कपिलाचार्यांच्या सांख्यदर्शनामध्यें निरीश्वरवाद मुळींच नाहीं असें असतांहि जे त्यांना निरीश्वरवादी म्हणत असतील तेच खरे नास्तिक होत. तसेंच मीमांसकांच्या धर्मधार्मिवादानें व न्यायवैशेषिकांच्या आत्मशब्दप्रयोगानेंहि ते निरीश्वरवादी होऊं शकत नाहींत; कारण मीमांसक परमेश्वराला सर्वज्ञत्वादि धर्मयुक्त मानतात, "**अतति सर्वत्र व्याप्नोतीत्यात्मा**" जो सर्वत्र व्यापक आहे तो आत्मा होय. परमेश्वरामध्यें सर्वव्यापित्व, सर्वज्ञत्व इत्यादि गुण आहेत व तो सर्व जीवांचा आत्मा आहे असें मीमांसक, वैशेषिक व नैयायिक तत्ववेत्ते मानतात. यावरून उघड ठरतें कीं, ते सर्व आस्तिकच आहेत.

(७) अवतार.

(प्र०) ईश्वर अवतार घेतो कीं नाहीं? (उ०) नाहीं. कारण वेदांमध्यें "**अज एकपाद्**" "**स पर्यगाच्छुक्रमकायम्**" असें सांगितलें आहे. यावरून परमेश्वर जन्म घेत नाहीं व शरीरहि धारण करीत नाहीं असें ठरतें. (प्र०) "**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ॥ अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥**" यामध्यें श्रीकृष्ण म्हणतो कीं, जेव्हां धर्माचा लोप होतो तेव्हां मी शरीर धारण करतों हें कसें? (उ०) परमेश्वर शरीर धारण करतो हें म्हणणें वेदविरुद्ध असल्यामुळें अप्रमाण होय. आतां आपण जें श्रीकृष्णाविषयीं म्हणतां, तर त्याविषयीं असें आहे कीं, श्रीकृष्ण हा योगीश्वर व धर्मात्मा होता, धर्मरक्षण करण्याची त्याची इच्छा असल्यामुळें युगायुगामध्यें जेव्हां अधर्म वाढेल तेव्हां आपण उत्पन्न होऊन धर्माचें रक्षण करूं असें त्यानें म्हटलें तर

* श्रीकृष्ण गीतेमध्यें "मुनीनां कपिलो मुनिः" सर्व मुनींत श्रेष्ठ कपिल असें म्हणतो, असा श्रेष्ठ मुनि नास्तिक कसा असेल?

त्यांत कांहींच वावगें नाहीं. " **परोपकाराय सतां विभूतयः ।** " परोपकारासाठीं थोर आपलें तनमनधन अर्पितात, परोपकारांतच थोरांचें थोरपण आहे. हा अमोलिक गुण श्रीकृष्णामध्यें होता, एवढ्यानें श्रीकृष्ण ईश्वर आहे असें ठरत नसून महात्मा व योगीश्वर ठरत आहे. (प्र०) जर असें आहे तर या संसारामध्यें ईश्वराचे चौवीस अवतार होतात व मत्स्यादिक हे सर्व अवतार आहेत असें लोक कसें मानितात ? (उ०) वेदांचा अर्थ न जाणल्यामुळें, मतमतांतराभिमानी संप्रदायी लोकांनीं अज्ञानी लोकांना फशीं पाडल्यामुळें अज्ञानी लोक अशीं अप्रामाणिक भाषणें बोलतात व मानितात. (प्र०) अहो जर ईश्वरानें अवतार घेतला नसता तर कंस रावणादिक दुष्ट राक्षसांचा घात कसा झाला असता ? (उ०) ज्याअर्थी कंसादिक जन्माला आलेले होते त्या अर्थी त्यांचा नाश केव्हां तरी झालाच असता. परमेश्वर जगताची उत्पत्ति, स्थिति व प्रलय हीं तो स्वतःनिराकार असतांहि करतो. जगताच्या घडामोडीपुढें कंसादिक किडीमुंग्यांप्रमाणें होत, त्यांच्यासाठीं अवतार घेण्याची काय आवश्यकता आहे ? शिवाय परमेश्वर सर्व व्यापक असल्यामुळें तो कंस व रावण इत्यादिकांच्या शरीरामध्येंहि पूर्णपणें भरलेला होताच, त्याची इच्छा असती तर त्यानें मर्मच्छेदन करून तेव्हांच नाश करून टाकिला असता. अशा अनंतसामर्थ्ययुक्त परमेश्वराला एखाद्या क्षुद्र जीवाला मारण्यासाठीं शरीरधारी व जरामरण धर्मयुक्त व्हावें लागतें असें मानणें हा मूर्खपणा नव्हे तर काय ? भक्तजनांचा उद्धार करण्यासाठीं तो अवतार घेतो असें जे कोणी म्हणतील, त्याचें तेंहि म्हणणें निर्मूल आहे; कारण भक्तजनांचा पूर्ण उद्धार करण्याचें पूर्ण सामर्थ्य निराकार परमेश्वरामध्यें आहे. सूर्य, चंद्र, पृथिवीवगैरे तेजोगोलमयसृष्टीची उत्पत्ति, स्थिति व प्रलय करण्यास लागणाऱ्या सामर्थ्यापेक्षां कंस रावणादि राक्षसांचा वध करण्यास व गोवर्धन उचलण्यास जास्त सामर्थ्य लागतें काय ? जो कोणी या सृष्टीचा विचार करील त्याला ईश्वराच्या सामर्थ्याची कल्पना होऊन " न भूतो न भविष्यति " ईश्वरा इतका सामर्थ्यवान् कोणीहि नाहीं असेंच त्याला वाटेल. युक्तीनें पाहिलें असतांहि ईश्वर जन्मधारण करीत नाहीं असेंच वाटेल. पहा आकाशाप्रमाणें सर्व व्यापक ईश्वर एखाद्या लहान शरीरांत कसा येऊन राहील ? हें एवढें विस्तीर्ण व व्यापक आकाश एखाद्या लहानशा जागेंत जसें माऊं शकत नाहीं तद्वतच सर्वव्यापक परमेश्वर एखाद्या शरीरांत राहूं शकत नाहीं व गर्भामध्येंहि येऊं शकत नाहीं. त्याचें येणें जाणेंहि अशक्य आहे. कारण तो सर्व ठिकाणीं–गर्भामध्यें व सर्वांच्या शरीरांत आहेच. जेथें तो नव्हता त्याठिकाणीं तो आला हें म्हणणें योग्य होईल; येणें जाणें हे शब्द एकदेशी पदार्थाला लागू होतात. अर्थात् तो सर्वव्यापक असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं येणें जाणें हे शब्द योग्य रीतीनें लागू होत नाहींत. परमेश्वराला विद्याहीनांशिवाय दुसरे कोणीहि असें मानूं शकणार नाहींत. तात्पर्य

परमेश्वराचें जन्ममरण, येणेंजाणें, हीं होऊं शकत नाहींत. ज्याप्रमाणें "श्रीकृष्ण" ईश्वराचा अवतार नव्हे त्याचप्रमाणें "येशू" हि नव्हे. जेथें जेथें रागद्वेष, क्षुधातृष्णा, भयशोक, दुःखसुख, जन्ममरण इत्यादि गुण असतात ते ईश्वर नसून मनुष्यच होत हें निश्चयानें समजावें. (प्र०) ईश्वर आपल्या भक्तांच्या पापाची क्षमा करतो कीं काय ? (उ०) नाहीं, कारण जर तो पापाची क्षमा करील तर त्याच्या राज्यांतील न्याय नाहींसा झाला असें होईल. परमेश्वर पापाची क्षमा करतो असें ठरलें तर सर्व लोकांस पाप करण्यास उत्तेजन येईल व ते निर्भयपणानें पापें करूं लागतील. पहा, ज्याला माहीत असतें कीं, राजा माझ्या अपराधांची क्षमा करील तो महान् महान् पातकें करण्यास तयार होतो, तसेंच ज्याला माहीत असतें कीं, माझ्या पापाबद्दल मला शिक्षा मिळेल; तो मनुष्य पाप करण्यास भितो. तात्पर्य जेथें कर्मांचें यथावत् फल मिळतें तेथेंच सुव्यवस्थितपणा असतो. परमेश्वराची व्यवस्था पूर्ण असल्यामुळें तो सर्वांला त्यांच्या त्यांच्या कर्मांप्रमाणें यथावत् फल देतो व हेंच त्याचें काम आहे, अपराधांची क्षमा करणें नाहीं.

(८) जीवाची स्वतन्त्रता.

(प्र०) जीव स्वतन्त्र आहे कीं परतन्त्र ? (उ०) जीव आपलीं कर्तव्यें करण्यास स्वतन्त्र व परमेश्वरीय व्यवस्थेमध्यें तो परतन्त्र आहे. "**स्वतन्त्रः कर्ता**" । (पाणिनीयव्याकरणम्) जो स्वतन्त्र असतो तोच कर्ता असतो. परतन्त्र जो असतो तो कर्ता होऊं शकत नाहीं. (प्र०) स्वतन्त्र कोणास म्हणावें ? (उ०) ज्याच्या ताब्यांत शरीर, प्राण, इंद्रियें व अंतःकरणादि पदार्थ आहेत तो स्वतन्त्र होय. जो स्वतन्त्र नसतो त्याला त्याच्याकडून घडलेल्या पापपुण्याचें फल मिळत नाहीं. याच नियमाला अनुसरून सेनेतील लोकांनीं सेनापतीच्या तंत्रानें वागत असतां, लढाईमध्यें कितीहि जरी लोक मारले तरीहि ते अपराधी होत नाहींत, कारण ते परवश असतात. जर सर्व जीव परमेश्वराच्या प्रेरणेनें परतन्त्रपणें आपापलीं कामें करतात असें मानलें; तर जीवांला त्या कर्मांचें पापपुण्य सुखदुःखादि फल मिळणार नाहीं, त्या फलाचा प्रेरक परमेश्वर असल्यामुळें तें परमेश्वरालाच मिळेल व पापपुण्याप्रमाणें स्वर्गनरक, सुखदुःखादिक त्यालाच (परमेश्वरालाच) प्राप्त होतील. जर एखाद्या शस्त्रानें कोणी कोणाचा वध केला तर त्या वध करणाराला शासन करतात, त्या शस्त्राला करीत नाहींत, कारण शस्त्र परतन्त्र असतें व तो वधकर्ता स्वतन्त्र व प्रेरक असतो; याचप्रमाणें जर जीव परतन्त्र व परमेश्वर त्याला पराधीन ठेवून कर्म करविणारा प्रेरक असेल तर जीव पापपुण्याचा भोगी होणार नाहीं. वास्तविक पाहिलें तर आपल्या सामर्थ्यानुरूप कर्म करण्यामध्यें जीव स्वतन्त्र आहे, पण जेव्हां तो पाप करतो तेव्हां ईश्वराच्या सुव्यवस्थेनें पराधीन होऊन

त्याचें फल भोगतो, अर्थात् जीव हा कर्म करण्यास स्वतन्त्र व फल भोगण्यास परतन्त्र आहे. (प्र०) जर परमेश्वरानें जीवाला उत्पन्न केलें नसतें व त्याला सामर्थ्यहि दिलें नसतें तर त्याच्याकडून कांहींच झालें नसतें; म्हणून परमेश्वराच्याच प्रेरणेनें जीव काम करतो असें म्हणण्यास काय हरकत आहे? (उ०) ईश्वर व जगताचें उपादान कारण अनुत्पन्न आहे व सर्व व्यवहाराचें साधन आहे; त्याचप्रमाणें जीवहि अनादि आहे. त्याला कोणी उत्पन्न केलें नाहीं. जीवाचें शरीर व इंद्रियाचे गोलक मात्र परमेश्वरानें बनविलेले आहेत; पण तेहि सर्व जीवाच्या आधीन आहेत; म्हणून जो कोणी मन, काया व वचन यांच्या योगानें पापपुण्य करतो त्यालाच त्याचें फल मिळतें, ईश्वराला नाहीं. पहा कोणी एकानें खाणींतून लोखंड काढलें, तें एका व्यापाऱ्यानें विकत घेऊन लोहाराला विकलें, त्या लोहारानें त्याची तलवार बनवून ती एका मनुष्याला विकली व त्या मनुष्यानें त्या तलवारीच्या योगानें एका मनुष्याचा वध केला, तर त्या वधाबद्दल इतर कारखानदार जबाबदार होत नसून तो वध करणाराच दोषी होतो; याचप्रमाणें शरीरादिकांची उत्पत्ति करणारा परमेश्वर कर्मफलाचा भोक्ता होत नसून तीं तीं कर्में करणाऱ्या जीवांनां कर्मफल भोगविणारा आहे. जर परमेश्वरच सर्व कर्में करवित असता तर जीव कधींच पापें न करते. परमेश्वर ज्ञानपूर्ण, धार्मिक व पवित्र आहे; म्हणून जीवांनां तो पापकर्म करण्याची प्रेरणा करित नाहीं. ज्याअर्थी जगतांमध्यें पापें चाललेलीं आहेत त्याच अर्थी त्या पापकर्माचा प्रेरक परमेश्वर नसून जीव स्वतंत्ररीतीनें आपापलीं कामें करण्यांत समर्थ आहेत असें ठरतें; ज्याप्रमाणें आपणापुरतें काम करण्यास जीव स्वतन्त्र आहे त्याचप्रमाणें परमेश्वरहि आपलीं कामें करण्यास पूर्ण स्वतंत्र आहे. (प्र०) जीव व ईश्वर यांचें स्वरूप व गुणकर्मस्वभाव कसे काय आहेत? (उ०) दोघेहि चेतनस्वरूप आहेत, दोघांचाहि स्वभाव पवित्र, धार्मिक व अविनाशित्वादि गुणविशिष्ट आहे. परमेश्वर सृष्टीची उत्पत्ति, स्थिति व नाश करतो, सर्वांना नियमानें चालवितो, जीवांला पापपुण्यांचें यथायोग्य फल देतो, हीं सर्व धर्मयुक्त कामें करतो. जीवहि संततीची उत्पत्ति, तिचें पालन व शिल्पविद्यादिक बरोंवाईट कृत्यें करतो. ईश्वरामध्यें नित्यज्ञान, आनन्द, अनंत बल इत्यादि गुण आहेत व जीवामध्यें:—

इच्छाद्वेषप्रयत्नसुखदुःखज्ञानान्यात्मनो लिङ्गमिति ॥

न्याय. द. १।१।१०॥

प्राणापाननिमेषोन्मेषमनोगतीन्द्रियान्तरविकाराः
सुखदुःखे इच्छाद्वेषौ प्रयत्नश्चात्मनो लिंगानि ॥

वैशे० ३।२।४॥

(इच्छा) पदार्थ मिळण्याची अभिलाषा, (द्वेषः) वैर अथवा दुःखादिकांविषयीं निरिच्छा, (प्रयत्नाः) पुरुषार्थ, बल, (सुखम्) आनंद, (दुःखम्) विलाप, अप्रसन्नता, (ज्ञानम्) विवेक किंवा जाणणें -हे गुण न्याय व वैशेषिक या दोनहि दर्शनांमध्यें समान आहेत; पण वैशेषिकामध्यें खालील गुण विशेष आहेत. (प्राणः) प्राणवायूला बाहेरून आंत नेणें, (अपानः) प्राणवायूला बाहेर घालविणें, (निमेषः) डोळे मिटणें, (उन्मेषः) डोळे उघडणें, (मनः) निश्चय, अहंकार व स्मरण करणें, (गतिः) हालचाल करणें, (इंद्रियम्) सर्व इंद्रियांला चालविणें, (अंतरविकारः) क्षुधातृषाहर्षशोकादि विकारयुक्त होणें हे ते होत; हे सर्व गुण परमेश्वरामध्यें नाहींत. आत्मा स्थूल नसल्यामुळें यांच्याच योगानें त्याची प्रतीति करावी लागते. जोंपर्यंत आत्मा शरीरांत राहतो तोंपर्यंत हे गुण शरीरांत दिसतात, पण जेव्हां तो शरीर सोडून जातो तेव्हां शरीरांत हे गुण दिसत नाहींत. अर्थात् या गुणांवरून आत्मा शरीराहून भिन्न आहे असें मानावें लागतें. जो असतांना जे गुण दिसतात. व जो नसतांना जे गुण दिसत नाहींत त्याचे ते गुण आहेत असें ठरतें. जसा सूर्य किंवा दिवा असतांना प्रकाश असतो व तो नसतांना नसतो या अटलनियमावरून जसें प्रकाश पाहून सूर्य किंवा दीप यांचें अनुमान होतें तद्वतच गुणांवरून जीव व परमेश्वर यांचें ज्ञान होतें. (प्र०) पहा. परमेश्वर त्रिकालज्ञानी आहे. जीव पुढें काय करणार आहे हें परमेश्वराला पूर्वीच समजलेलें असतें. यावरून उघड होतें कीं जीवाचा पुढचा कार्यक्रमहि ठरलेलाच आहे, मग जीव स्वतन्त्र कसा? व जीव परतन्त्र असल्यामुळें व ईश्वरानें पूर्वीच निश्चित केलेल्या गोष्टी जीवाला करणें भागअसल्यामुळें पराधीनपणानें करीत असलेल्या कामांबद्दल ईश्वर जीवाला दंडहि करूं शकणार नाहीं; हें खरें कीं नाहीं ? (उ०) ईश्वराच्या ठिकाणीं तीन काल नाहींत, त्याच्या ठिकाणीं केवल वर्तमानकालच आहे; म्हणून त्याला त्रिकालज्ञ म्हणणें योग्य नाहीं. उत्पन्न होऊन सध्यां नसणाऱ्या कालाला भूतकाल म्हणतात व जो अजून उत्पन्न झाला नाहीं पण होणार आहे त्याला भविष्यकाल असें म्हणतात. ईश्वराला एकदां झालेलें ज्ञान नाहींसें होत नाहीं व नसलेलें ज्ञान होणार आहे असेंहि नाहीं. त्याच्याठिकाणीं एकरस अखंडित ज्ञान सदोदित वर्तमानकालाप्रमाणेंच राहतें; म्हणून त्याला त्रिकालज्ञ असें म्हणतां येणार नाहीं जीवांच्या अपेक्षेनें परमेश्वराच्या ठिकाणीं त्रिकालज्ञता कल्पितां येईल, पण वास्तविक ईश्वरामध्यें त्याच्या दृष्टीनें तीन कालच नाहींत हें कोणीहि विसरतां नये. ज्याप्रमाणें स्वतन्त्रपणानें जीव काम करतो, त्याचप्रमाणें ईश्वर सर्वज्ञ असल्यामुळें तें सर्व जाणतो; जें ईश्वर *जाणतो तेंच जीव करतो. जीवाचें कोणतेंच कर्म परमेश्वरापासून

* जीव करतो एक व ईश्वर जाणतो निराळेंच असें नसून जीव ज्या ज्यावेळीं जें जें करतो त्या त्या वेळींच ईश्वर त्याचें करणें जसें करतो तसेंच जाणतो असें समजावें.

गुप्त राहूं शकत नाहीं. कारण परमेश्वराचें ज्ञान पूर्ण आहे. अर्थात् जीवानें तीनहि कालांत केलेल्या कर्मांचें ज्ञान करून घेण्यास व त्यांचें फल देण्यास ईश्वर स्वतंत्र आहे; पण जीव फक्त थोडें वर्तमानज्ञान व कर्म करण्यास स्वतन्त्र आहे. ईश्वराचें ज्ञान अनादि अनंत असल्यामुळें जसें त्याला कर्मांचें ज्ञान असतें त्याचप्रमाणें त्याला कर्मांबद्दल फल (दंडादिक) देण्याचें ज्ञानहि अनादि असतें. या दोहोंविषयींचें त्याचें ज्ञान सत्य व निश्चित असतें. एक ज्ञान सत्य व दुसरें मिथ्या असें मानण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. तात्पर्य परमेश्वर सर्वज्ञानी असला तरीही जीवाच्या स्वातन्त्र्यांत कांहीं बिघाड होऊं शकत नाहीं. (**प्र०**) जीव हा शरीरांत निराळा विभू आहे कीं परिच्छिन्न आहे ? (**उ०**) जीव परिच्छिन्न आहे, जर तो विभू अर्थात् व्यापक असता तर जागृति, स्वप्न, सुषुप्ति, मरण, जन्म, संयोग, वियोग, जाणें, येणें हें होऊं शकलें नसतें. अर्थात् जीव हा स्वरूपतः अल्पज्ञ आहे व अल्प म्हणजे सूक्ष्म आहे. ईश्वर हा सर्वव्यापक, सूक्ष्मात्सूक्ष्मतर असून, सर्वज्ञ व सर्वव्यापक स्वरूप आहे; याकरतां जीव व ईश्वर यांचा व्याप्यव्यापक हा संबंध आहे. (**प्र०**) एकाच जागीं एकाच वेळीं दोन वस्तू राहूं शकत नाहींत या सार्वत्रिक सृष्टिनियमाप्रमाणें जीव व ईश्वर यांचा व्याप्यव्यापकसंबंध असूं शकणार नाहीं; पण त्यांचा संयोगसंबंध असूं शकेल? हे दोन पदार्थ एकाच जागीं राहूं शकतील तरी कसे? (**उ०**) अहो, हा जो आपण पदार्थविज्ञान शास्त्राचा नियम सांगितलात, हा समान आकारयुक्त पदार्थांलाच लागू आहे, असमान आकृतींमध्यें लागू नाहीं; ज्याप्रमाणें लोखंड या स्थूल पदार्थामध्यें अग्नि किंवा विद्युत् हे सूक्ष्म पदार्थ शिरून दोनहि एकत्र राहूं शकतात; त्याच प्रमाणें जीवापेक्षां परमेश्वर सूक्ष्म असल्यामुळें तो त्यांत व्यापून राहूं शकतो. अर्थात् परमेश्वर हा व्यापक व जीव हा व्याप्य आहे. ईश्वरजीवामध्यें असा हा व्यापकव्याप्य संबंध आहे; त्याचप्रमाणें सेव्यसेवक, आधारआधेय, स्वामिभृत्य, राजाप्रजा, पितापुत्र इत्यादि संबंध आहेत.

(९) द्वैत व अद्वैतवाद.

(**प्र०**) वास्तविक ईश्वर व जीव एकच आहेत. पहा. " **प्रज्ञानं ब्रह्म** ॥ १ ॥ **अहं ब्रह्मास्मि** ॥ २ ॥ **तत्त्वमसि** ॥ ३ ॥ **अयमात्मा ब्रह्म** ॥ ४ ॥ या वेदांमधील चार महावाक्यांमध्यें जीवब्रह्मैक्यच सांगितलें आहे. नाहीं काय? (**उ०**) **हीं वेदांतील वाक्यें नसून ब्राह्मण ग्रंथांतील वाक्यें आहेत.** कोणत्याही ऋषिप्रणीतशास्त्रामध्यें यांना **महावाक्यें** असें म्हटलें नाहीं. " (अहम्) मी (ब्रह्म) ब्रह्मस्थ (अस्मि) आहें " असा पहिल्या वाक्याचा अर्थ आहे.

(प्र०) अहो ! "ब्रह्म" या पदाचा "ब्रह्मस्थ"—ब्रह्मामध्यें राहणारा—असा अर्थ आपण कसा केलात? "मी ब्रह्म आहें" असाच त्याचा सरळ अर्थ होत नाहीं काय ? (उ०) नाहीं, कारण त्या ठिकाणीं " तात्स्थ्योपाधि " आहे. ज्याप्रमाणें " मञ्चाः क्रोशन्ति । " याचा " मञ्चक ओरडतात " असा शब्दशः अर्थ करावयाचा नसतो तर " मञ्चक जड असल्यामुळें कधीं ओरडत नाहीं " मञ्चकावर बसलेले पुरुष ओरडतात " असाच करावा लागतो त्याचप्रमाणें येथेंहि समजावें. (प्र०) अहो, सर्वच पदार्थ ब्रह्मामध्यें आहेत मग जीवाविषयींच विशेषतः सांगण्याचें कारण काय? (उ०) सर्व पदार्थ ब्रह्मांमध्यें आहेत हें खरें पण ज्याप्रमाणें जीव हा सामर्थ्ययुक्त असून अत्यंत निकट आहे तसे इतर पदार्थ नाहींत. त्याचप्रमाणें जीवाला ब्रह्माचें ज्ञान होऊन तो मुक्तीमध्यें ब्रह्माशीं साक्षात्संबंध ठेवून राहतो तशी इतर पदार्थांची स्थिति नाहीं; याकरितां जीव हा ब्रह्माबरोबर "तास्थ्य" अथवा तत्सहचरितोपाधि अर्थात् ब्रह्माचा सहचारी आहे. या वाक्यावरून जीव व ब्रह्म एक आहे असें ठरत नाहीं. "मी व तो एकच आहों" असें जर कोणी म्हटलें तर "माझा व त्याचा विरोध नाहीं" असाच जसा अर्थ समजतात; त्याचप्रमाणें या वाक्यावरूनहि जीव व ईश्वर यांचा अविरोधच समजावयाचा आहे. जो जीव समाधिस्थ होऊन परमेश्वरामध्यें सप्रेम निमग्न होतो, तो म्हणतो कीं "मी व ब्रह्म एक" अर्थात् अविरोधी अथवा एक अवकाशस्थ आहों. जो जीव परमेश्वराच्या गुणकर्मस्वभावाच्या अनुकूल आपले गुणकर्मस्वभाव बनवून ब्रह्मांशीं आपलें साधर्म्य करितो तोच आपली ब्रह्माशीं एकता आहे असें म्हणूं शकतो. (प्र०) बरें. "**तत्त्वमसि**" याचा काय हो अर्थ? "(तत्) तें ब्रह्म (त्वम्) तूं (असि) आहेस" या वाक्यावरून जीव व ब्रह्म यांचें ऐक्य ठरत नाहीं काय? (उ०) पहा, "तत्" शब्दाचा तुम्ही "ब्रह्म" असा अर्थ केलात, पण जेथें "ब्रह्म" शब्दाची अनुवृत्तिच नाहीं; तेथें ब्रह्म शब्द आला कोठून? (प्र०) "**सदेव सोम्येदमग्र आसीदेकमेवाद्वितीयं ब्रह्म ।**" या उपनिषदांतील पूर्व वाक्यांतून ब्रह्म शब्दाची अनुवृत्ति आली आहे. (उ०) अहो असे खोटे पुरावे नको आहेत. आपण छांदोग्योपनिषद् पाहिलेंच नाहीं असें वाटतें.

सदेव सोम्येदमग्र आसीदेकमेवाद्वितीयम् ॥

छां. ६।२।१॥

छांदोग्योपनिषदाचा पाठ असा आहे व यांत ब्रह्म शब्दच नाहीं व असें असूनहि आपण ब्रह्म शब्द तेथें जोडतां हें विलक्षण आहे. (प्र०) बरें आपण "तत्" या शब्दाचा काय अर्थ करतां ? (उ०) आधीं उपनिषदाचा पाठ पहाः—

स य एषोऽणिमा ॥ एतदात्म्यमिद ५ सर्वं तत्सत्य ५ स आत्मा तत्त्वमसि श्वेतकेतो ॥ छां० ६।८।६।७ ॥

"तो परमात्मा जाणण्यास योग्य आहे. तो सर्वांहून (अणिमा) सूक्ष्म व सर्व जगताचा व जीवाचाहि (आत्म्यम्) आत्मा तोच आहे. तो सत्यस्वरूप असून आपला आत्मा आपणच आहे. हे श्वेतकेतो ! हे प्रियपुत्रा ! (**तदात्मकस्तदन्तर्यामी त्वमसि**) त्या अंतर्यामी परमेश्वरानें युक्त असा तूं आहेस." हा अर्थ इतर उपनिषदांच्या वचनांलाहि बाधक होत नाहीं. पहा—

य आत्मनि तिष्ठन्नात्मनोऽन्तरो यमात्मा न वेद यस्यात्मा शरीरम् ॥ आत्मनेन्तरो यमयति स त आत्मान्तर्याम्यमृतः ॥

(शत० १४-६-५-३०-) बृहदारण्यक उ०

महर्षि याज्ञवल्क्य आपल्या मैत्रेयी स्त्रीला सांगतात कीं, हे मैत्रेयि ! " परमेश्वर (आत्मनि) जीवांमध्यें स्थित आहे आणि (आत्मनोन्तरः) जीवात्म्याहून भिन्न आहे, पण मूढ जीवात्मा त्या आपणाहून भिन्न असलेल्या परमेश्वराला (न वेद) जाणत नाहीं व तो आपणामध्यें व्यापून आहे हेंहि त्याला समजत नाहीं. ज्या परमेश्वराचें (आत्मा) जीव हेंच (शरीरम्) शरीर आहे. (जसा शरीरांत जीव राहतो त्याचप्रमाणें जीवांमध्यें परमेश्वर व्यापून राहतो म्हणून जीवात्म्याला परमेश्वराचें शरीर म्हटलें आहे, इतकेंच.) जीवामध्यें व्यापक असून जीवाहून भिन्न असणारा, जीवांच्या पापपुण्यांचा साक्षी होऊन त्यांना कर्मानुसार यथायोग्य फल देऊन (यमयति) त्यांचें नियमन करणारा असा जो (अमृतः) अविनाशी परमात्मा आहे तो (ते) तुझ्या (आत्मनः) आत्म्या (अंतरः) मध्यें व्यापक आहे त्याला तूं जाण." या प्रकारचीं उपनिषद्वचनें आहेत व त्यांचा दुसरा कांहीं अर्थ होऊं शकत नाहीं; त्याचप्रमाणें जेव्हां समाधिमध्यें योग्याला परमेश्वर प्रत्यक्ष होतो; तेव्हां तो म्हणतो कीं " **अयमात्मा ब्रह्म** । " " हा जो (आत्मा) माझ्यामध्यें व्यापक आहे त्यालाच ब्रह्म असें म्हणतात, व तेंच सर्वत्र व्याप्त आहे." या वाक्यांच्या व उपनिष-

---

हा भाग बृहदारण्यकोपनिषदांत जशाचा तसाच आहे. "**यो रेतसि तिष्ठन्** । रेतसेऽन्तरो० ॥२९॥" याच्या पुढें य "**आत्मनि तिष्ठन्**" हें प्रकरण आहे परंतु प्रस्तुत उपलब्ध बृहदारण्यामध्यें हा मंत्र घेतलेला नाहीं. हा द्वैताद्वैतवादाचा जो उगाच गोंधळ घातलेला आहे त्याचा योग्य खुलासा करणारा आहे कारण या मंत्राचा अर्थ फारच स्पष्ट आहे.

शतपथ ब्राह्मण.-१४-६-५-३०

ह्यांच्या अर्थावरून असें स्पष्ट होतें कीं जीव व ब्रह्म एक नाहींत, जे आधुनिक वेदान्ती यांना एक समजतात त्यांना वेदान्तशास्त्रच समजलेलें नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. (प्र०)

अनेन जीवेनात्मनानुप्रविश्य नामरूपे व्याकरवाणि ॥

छां. ६।३।२ ॥

तत्सृष्ट्वा तदेवानुप्राविशत् ॥ तैत्ति० ब्रह्मा० अ० ६ ॥

" मी सर्व जगत् व शरीर यांची रचना करून त्या जगतांमध्यें व्यापक व जीव रूप धारण करून शरीरांत प्रविष्ट होऊन नाम व रूप यांची व्याख्या करीन. " परमेश्वरानें जगत् व शरीर उत्पन्न करून तो त्यांत प्रविष्ट झाला. " इत्यादि श्रुतींवरून जीव व परमेश्वर यांचें ऐक्य ठरत नाहीं काय ? याचा दुसरा काय अर्थ होणार आहे ? (उ०) जर तुम्हांला पद व पदार्थ यांची माहिती असती तर तुम्ही असा अर्थ कधींहि केलाच नसता; या दोनहि वचनामध्यें " अनुप्रवेश " हा शब्द नीट पाहण्यासारखा आहे. " अनुप्रवेश " म्हणजे " मागून प्रवेश " अर्थात् प्रथमतः कोणाचा तरी प्रवेश झाला पाहिजे; हें उघड आहे. शरीरामध्यें प्रवेश केलेल्या जीवाबरोबर (अनुप्रविश्य) " अनुप्रवेश केल्याप्रमाणें राहून वेदद्वारा नामरूपादिकांचीं विद्या प्रगट केली; शरीरामध्यें जीवाचा " प्रवेश " व जीवामध्यें परमेश्वराचा " अनुप्रवेश " होत असतो अर्थात् " अनुप्रवेश " शब्दांतील " अनु " या उपसर्गाचें महत्व जर तुमच्या लक्षांत आलें असतें तर अशी अर्थाची धांदल तुम्ही केली नसती. (प्र०) बरें तें असो. आतां दुसरें असें पहा. " सोऽयं देवदत्तो य उष्णकाले काश्यां दृष्टः स इदानीं प्रावृट्समये मथुरायां दृश्यते! " जो देवदत्त मी उष्णकालामध्यें काशीमध्यें पाहिला होता त्यालाच मी वर्षासमयामध्यें मथुरेमध्यें पाहत आहें. " या ठिकाणीं काशीदेश व उष्णकाल इत्यादि उपाधि सोडून केवल शरीरमात्राकडे लक्ष दिलें असतां दोनहि ठिकाणचा हा एकच देवदत्त आहे असें समजतें. या प्रकारें जाणण्याच्या रीतीला **भागत्यागलक्षणा** असें म्हणतात. या भागत्याग लक्षणेच्या योगानें जीवेश्वराचें ऐक्य सिद्ध होतें. कसें तें पहा. परमेश्वराच्या परोक्ष देश, काल माया उपाधि व जीवाच्याहि देश, काल, अविद्या व अल्पज्ञता या उपाधि सोडून दोघांत समान दिसणाऱ्या चैतन्याकडे लक्ष दिलें म्हणजे दोहोंमध्यें एकच ब्रह्मवस्तु दिसूं लागते. भागत्यागलक्षणेमध्यें सामान्य भाग ग्रहण करून विशेष भाग सोडावयाचा असतो त्याचप्रमाणें येथेंहि सर्वज्ञत्वादि वाच्यार्थ ईश्वरामधील विशेष व अल्पज्ञत्वादि वाच्यार्थ जीवामधील विशेष हे सोडून, दोहोंमधील सामान्य जें चैतन्य, तेवढ्याच लक्ष्यार्थाचें ग्रहण केलें असतां अद्वैत सिद्ध होतें; यावर आपली काय शंका

आहे ? (उ०) प्रथमतः तुम्ही जीवाला व ईश्वराला नित्य मानीत आहां कीं अनित्य तें सांगा. (प्र०) हे दोनहि भेद उपाधिजन्य कल्पित असल्यामुळें अनित्य आहेत. (उ०) वरें ती उपाधि नित्य आहे कीं अनित्य? (प्र०) आमचें मत पुढील श्लोकांत स्पष्ट आहेः—

जीवेशौ च विशुद्धाचिद्भेदस्तु तयोर्द्वयोः ॥
अविद्या तच्चितायोंगः षडस्माकमनादयः ॥
कार्योपाधिरयं जीवः कारणोपाधिरीश्वरः ॥
कार्यकारणतां हित्वा पूर्णबोधोऽवशिष्यते ॥

—कारिका—शारीरभाष्य—संक्षेपकशारीर.

(१) जीव, (२) ईश्वर, (३) ब्रह्म, (४) जीवेश्वरांचा विशेष भेद, (५) अविद्या व (६) अविद्या व चेतन यांचा योग हे सहा पदार्थ आम्हां वेदान्त्यांच्या मतानें अनादि आहेत; पण त्यांतहि एक ब्रह्म अनादि अनन्त असून दुसरे पदार्थ प्रागभावाप्रमाणें अनादि सान्त आहेत; जोंपर्यंत अज्ञान असतें तोंपर्यंत हे पांच असतात व तोंपर्यंत यांच्या आदीचें ज्ञान होत नसतें, म्हणून यांना अनादि असें म्हणतात; पण जेव्हां ज्ञान होतें तेव्हां यांचा नाश होतो म्हणून यांना सान्त (नाशवान्) असें म्हणतात. (उ०) हे दोनहि तुमचे श्लोक असंबद्ध आहेत, कारण तुमच्याच मताप्रमाणें कल्पना केली तरीहि अविद्येच्या योगाशिवाय जीव व मायेच्या योगाशिवाय ईश्वर तुमच्या मतानें सिद्ध होत नाहीं. अविद्या व माया यांची, अनुक्रमें जीव व ईश्वर यांच्याशीं योग होण्यामध्यें चरितार्थता झाल्यामुळें "तच्चितोयोंगः।" (अविद्या व चेतन यांचा योग) हा जो तुम्ही सहावा पदार्थ मानतां तो राहूंच शकत नाहीं; कारण अविद्या व माया यांची जीव व ईश्वर यांच्याशीं संबंध होऊन सार्थकता झाली. ज्या अर्थी ब्रम्ह, माया किंवा अविद्या यांच्या योगाशिवाय ईश्वर बनत नाहीं; त्याअर्थी त्याला ब्रम्ह व अविद्या यांच्याशिवाय पृथक् मानणें आवश्यक नाहीं. तात्पर्य इतकेंच कीं, तुमच्या मतानें फक्त दोनच पदार्थ मानावे लागतात, (१) ब्रम्ह व (२) अविद्या. तुम्ही सहा पदार्थ मानूं शकत नाहीं, कारण तुमच्या सहा पदार्थांची उत्पत्ति या दोनच पदार्थांत आहे; तसेंच आपण कार्योपाधिपासून जीवाची व कारणोपाधिमुळें ईश्वराची सिद्धि करूं इच्छितां पण हें, जेव्हां आपण नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त स्वभाव, अनंत अशा सर्व व्यापक ब्रम्हामध्यें अज्ञान आहे असें ठरवाल तेव्हांच सिद्ध होईल. जर त्या ब्रम्हामध्यें स्वाश्रय स्वविषयक अनादि अज्ञान सर्वत्र आहे असें मानाल तर तें

ब्रम्ह शुद्ध राहणार नाहीं व जर त्याच्या एका भागामध्यें अज्ञान आहे असें मानाल तर तें अज्ञान परिछिन्न होईल व तें लहान असल्यामुळें इकडून तिकडे तिकडून इकडे जाऊं शकेल. जेथें जेथें तें अज्ञान जाईल तेथें तेथें असलेलें ब्रम्ह अज्ञानी होईल जेथून तें नाहींसें होईल तेथील ब्रह्म ज्ञानी होईल; व अशी अनवस्था झाल्यानें कोणत्याहि ठिकाणच्या ब्रह्माला अनादि शुद्ध ज्ञानयुक्त म्हणतां येणार नाहीं. जर एकाच भागांतील ब्रह्मांत कायमचें अज्ञान आहे असें मानाल तर सज्ञानी ब्रह्म व अज्ञानी ब्रह्म असे ब्रह्माचे दोन तुकडे मानावे लागतील व तसें मानलें म्हणजे ब्रह्माची अखंडता नाहींशी होईल. जर अखंड मानलें तर अज्ञानी नाहीं असें मानावें लागेल; ज्ञानाचा अभाव व विपरीत ज्ञान हे गुण आहेत म्हणून ते कोणत्या तरी द्रव्याशीं नित्य संबद्ध असणार, व हे जर आपण ब्रह्माचे गुण आहेत असें मानाल ; तर त्यांचा समवाय संबंध होऊन ते कधींही अनित्य होणार नाहींत; व या गुणांचा ब्रह्माशीं नित्य संबंध झाल्यानें ब्रह्मामध्यें दुःखादि क्लेश नित्य आहेत असें मानावें लागेल; ज्याप्रमाणें शरीराच्या एका भागामध्यें फोड झाला असतां सर्व शरीरभर दुःख पसरतें त्याचप्रमाणें ब्रह्माच्या एका देशांत अज्ञान दुःख असल्यामुळें सर्व ब्रह्मामध्यें दुःखादि क्लेश उत्पन्न होतील; याप्रमाणें सर्व ब्रह्माला दुःखादिकांचा अनुभव येऊं लागला म्हणजे अनुभव येण्याला तेथें अंतःकरणाचीहि कल्पना करावी लागेल. व अंतःकरणरूपी उपाधीचा योग झाला म्हणजे ब्रह्मालाच जीवत्व येईल. या ठिकाणीं असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, ब्रह्म व्यापक आहे कीं परिछिन्न आहे ? जर ब्रह्म सर्वव्यापक मानून उपाधि परिछिन्न मानली तर अन्तःकरणरूपी उपाधि इकडून तिकडे फिरते असें मानावें लागेल. ब्रह्म स्थिर असून उपाधि चंचल मानल्यावरहि एक आपत्ति येते, ती ही कीं, जेथें जेथें अंतःकरण जाईल तेथील शुद्ध ब्रह्माला अज्ञान उत्पन्न होईल व जेथून तें जाईल तेथील ब्रह्म अज्ञानरहित होईल. एका क्षणांत एके ठिकाणचें ब्रह्म ज्ञानी व दुसऱ्या क्षणांत अज्ञानी अशी स्थिति होणें तुमच्या दृष्टीनें शक्य असल्यामुळें बंध व मोक्षहि क्षणभंगुर होऊं लागतील; तसेंच एका प्रदेशांतील एका कालीं पाहिलेल्या वस्तूंचें स्मरण दुसऱ्या प्रदेशांत दुसऱ्या कालीं गेल्यावर राहणार नाहीं, कारण ज्या ठिकाणच्या ब्रह्मानें अंतःकरणाच्या सहाय्यानें पाहिलें तें दुसऱ्या प्रदेशांतील ब्रह्म नव्हे; जर आपण म्हणाल कीं सर्व ठिकाणचें ब्रह्म एकच आहे तर त्याबरोबर हेंहि म्हणावें लागेल कीं, तें पूर्णज्ञानी आहे. अंतःकरणें भिन्नभिन्न असल्यानें ज्ञानहि भिन्नभिन्न होतें असेंहि म्हणतां येणार नाहीं; कारण अंतःकरण जड असल्यामुळें तें ज्ञानग्रहणाला असमर्थ आहे. जर असें म्हणाल कीं केवळ ब्रह्माला किंवा केवळ अंतःकरणाला ज्ञान होत नाहीं, तर अंतःकरणस्थ चिदाभासाला ज्ञान होतें, तरीहि अंतःकरणद्वारा चैतन्यालाच ज्ञान होतें असें ठरतें. जर पूर्ण चैतन्याला अंतःकरणद्वारा ज्ञान होतें तर त्याला

अंतःकरणद्वारा सर्व ज्ञान न होतां नेत्रादिकांच्या योगानें थोडथोडें ज्ञान कसें होतें ? अशी आपल्या मतामध्यें अनेक प्रकारें अनवस्था उत्पन्न होते; अर्थात् कार्योपाधि व कारणोपाधि यांच्या योगानें ब्रह्मच जीवरूप व ईश्वररूप बनतें असें मानतां येत नाहीं; तर **जीव** हा अनादि, अनुत्पन्न व अमृत स्वरूप आहे व त्याहून भिन्न असा **ईश्वर** आहे असें मानणें हेंच योग्य होय. या ईश्वरालाच ब्रह्म असें म्हणतात. तुम्ही चिदाभासालाच जीव असें मानतां पण **आभास** हा क्षणभंगुर असल्यामुळें नाश होतो, मग मोक्षसुखाचा अनुभव कोण घेणार ? म्हणून ब्रह्म जीव आणि जीव ब्रह्म झालेला नव्हता, झालेला नाहीं व होणार नाहीं, यांना एक मानणें हा सर्वथैव भ्रम आहे; यांत शंका नाहीं. (**प्र०**) " **सदेव सोम्येदमग्र आसीदेकमेवाद्वितीयम् ॥**" या छांदोग्यवचनामध्यें सजातीयविजातीय व स्वगत अवयवादि भेदशून्य एकच अद्वैत ब्रह्म आहे, दुसरें कांहीं नाहीं असें सांगितलें आहे. तेव्हां या प्रमाणावरून अद्वैत सिद्ध होत नाहीं काय ? (**उ०**) नाहीं, कसें तें पहा. (यथा व्यावर्तकं विशेषणं भवति तथा प्रवर्तकं प्रकाशकमपि विशेषणं भवति) ' विशेषण जसें व्यावर्तक असतें तसेंच तें प्रकाशकहि असतें." वरील छांदोग्यवचनांतील "अद्वितीयम्" हें विशेषण ब्रह्माचें आहे; हें विशेषण सृष्टींतील अनेक जीव व तत्व यांपासून एका ब्रह्माचें पृथक्त्व दाखवितें; हा या विशेषणांतील व्यावर्तक गुण झाला; तसेंच त्याच विशेषणानें ब्रह्माच्या एकत्वाचें प्रकाशन केलें हा त्याचा प्रवर्तक गुण झाला. तसेंच पहा— (अस्मिन्नगरेऽद्वितीयो धनाढ्यो देवदत्तः । अस्यां सेनायामद्वितीयः शूरवीरो विक्रमसिंहः) " या नगरांत देवदत्त हा अद्वितीय धनाढ्य आहे " व " या सैन्यांत विक्रमसिंह हा अद्वितीय शूर आहे." या वाक्यांतील " अद्वितीय " या शब्दानें दुसरे कोणीच मनुष्य नाहींत असें ठरत नसून या नगरांत देवदत्तासारखा धनाढ्य व या

---

* द्वैताद्वैतवादानें लोकसमूहांच्या विचारपरंपरेंत विलक्षण दुही झालेली आहे व ती दुही वाग्जालानेंच पसरली आहे; तत्वांत दोन्ही वाद एकच आहेत; अद्वैतवादि जीवांचें अनादि कर्म त्याचे फलाकरितां सृष्टीची उत्पत्ति मानितात; यामुळें पर्यायानें जीवांचें अनादित्व त्यांना मान्य आहेच तसेंच ब्रम्ह हें जगतांत अभिन्ननिमित्तोपादान कारण आहे; असें मानितात म्हणजे निमित्तकारणप्रदच जीव व उपादान कारण सत् (प्रकृति) मिळून ब्रह्म मानितात; सारांश ब्रह्म, जीव व सत्—प्रधान प्रकृति किंवा सत्–चित्–आनंद प्रधान–जीव व ब्रह्म याच्या एकवाक्यतेला ब्रह्म असें मानितात. द्वैतवादी हीं तिन्ही गुणकर्मस्वभावदृष्ट्या पृथक् मानितात; तरी व्याप्यव्यापक व आधाराधेयसंबंधानीं एकच आहेत असें मानितात. सारांश ईश्वराला द्वैत कोणी मानीत नाहीं किंवा एक अद्वैत अविकारी चेतन ब्रह्म विकारपावून जगताकार झालेलें आहे; असें अद्वैतवादीहि मानित नाहींत; तत्वांत मुळींच विचारभेद नाहीं याकरितां वरवर वाढलेल्या वाग्जालांतील भेद सोडून विचार एकच व्हावे म्हणून द्वैतवादाची खरी स्थिति वाचकांपुढें ठेविली आहे ती द्वैताचें मंडण किंवा अद्वैताचें खंडण करण्याकरितां नाहीं.

सैन्यांत विक्रमसिंहासारखा शूर कोणीहि नाहीं, त्यांहून कमी प्रतीचे पुष्कळ आहेत; त्याचप्रमाणें पृथिवी आदि जड पदार्थ, पश्वादि प्राणि तसेच— वृक्षादिकहि पुष्कळ आहेत, यांचा "अद्वितीयम्" या विशेषणानें निषेध केलेला नाहीं. तसेंच जीव व प्रकृति हीं जरी ब्रह्मप्रमाणें नसलीं तथापि त्यांच्या अस्तित्वाचा निषेध वरील वचनांतील "**अद्वितीयम्**" या पदानें केलेला नाहीं. ब्रह्माप्रमाणें तो नसून त्यांच्यांत कांहीं न्यूनता आहे असें मात्र या विशेषणानें दर्शविलें आहे. ब्रम्ह सदैव एक आहे व जीव आणि प्रकृतिमधील तत्वेंहि अनेक आहेत या अनंत तत्वाहून ब्रह्म निराळें व एक आहे एवढीच गोष्ट वरील "**अद्वितीयम्**" या विशेषणानें सिद्ध केली आहे. या विशेषणानें जीव प्रकृति व कार्यरूपी जगत् यांचा अभाव किंवा निषेध होऊं शकत नाहीं, तर ते आहेत पण शुद्ध ब्रह्माहून न्युन आहेत, इतकाच अर्थ होऊं शकतो. हें वचन अद्वैतसिद्धीला साधकहि नाहीं व द्वैत प्रतिपादनाला बाधकहि नाहीं. या सर्व गोष्टी तुम्ही शांतपणानें विचार केल्या असतां समजण्यासारख्या आहेत. (प्र०) अहो जसे पूर्ण ब्रह्मामध्यें सत् चित् व आनंद हे गुण आहेत त्याच प्रमाणें जीवामध्यें अस्ति, भाति व प्रियरूपता हे गुण आहेत, या दोघांच्याहि गुणांचें ऐक्य तर स्पष्ट दिसतें, अशा रीतीनें ऐक्य स्पष्ट असतांना तुम्ही अद्वैतानें खंडन कां करतां? (उ०) अहो! किंचित् साधर्म्य असल्यानें त्या दोहोंमध्यें एकत्व होत नसतें. पहा. पृथिवी, जल व अग्नि हीं तीन तत्वें दृश्य, जड व भौतिक आहेत म्हणून तीं एक नाहींत कारण यांमध्यें वैधर्म्यहि वरेंच आहे. पहा. पृथ्वीमध्यें गंध, रूक्षता, काठिन्य इत्यादिगुण आहेत, जलामध्यें रस, द्रवत्व, कोमलत्व इत्यादिगुण आहेत व त्याचप्रमाणें अग्नीमध्यें रूप, दाहकत्व इत्यादि गुण आहेत. हे प्रत्येकाचे गुण निरानिराळे असल्यामुळें या तीन पदार्थांचें ऐक्य मानतां येत नाहीं; तसेंच मनुष्यें व किडे डोळ्यांनीं पाहतात, तोंडानें खातात व पायांनीं चालतात; म्हणून दोघेहि एकच असें म्हणतां येणार नाहीं, कारण मनुष्याची आकृति व किड्याची आकृति यांत फार भेद आह व शिवाय मनुष्याला दोन पाय असतात व किड्याला अनेक असतात इत्यादि भेद असल्यामुळें मनुष्य व किडा एकच असें म्हणतां येणार नाहीं; याच प्रमाणें परमेश्वरामध्यें अनंत क्रिया, ज्ञान, आनंद, सर्वव्यापित्व व निर्भ्रांतित्व इत्यादि गुण पूर्ण आहेत तसे ते जीवामध्यें नाहींत; जीवामध्यें अल्पज्ञान, अल्पबल, अल्पस्वरूप, भ्रांतित्व व परिच्छिन्नत्व इत्यादि गुण ब्रह्मांच्या गुणांहून भिन्न असे आहेत व शिवाय परमेश्वर अत्यंत सूक्ष्म व जीव हा व्याप्य असल्यामुळें तो ईश्वराहून किंचित् स्थूल असा आहे, अर्थात् गुणतः व स्वरूपतः हि जीव व ईश्वर यांत भेद आहे. (प्र०)

अथोदरमन्तरं कुरुते । अथ तस्य भयं भवति द्वितीयाद्वै भयं भवति ॥ बृहदारण्यक० ॥

" जो ब्रह्म व जीव यांत थोडा तरी भेद पाहतो त्याला भय उत्पन्न होतें, कारण दुसऱ्या पासून भय होतें. " या वचनाच्या विरुद्ध आपण प्रतिपादन कां करितां ? (उ०) या वाक्याचा अर्थ असा नाहीं. जो जीव किंवा परमेश्वर यांच्या अस्तित्वाचा निषेध करील, जो परमेश्वराला एकदेशीय मानील, जो परमेश्वराच्या आज्ञेचें उल्लंघन करून त्याच्या गुणकर्मस्वभावाविरुद्ध चालेल, अथवा दुसऱ्या मनुष्याशीं वैर करील त्याला भय उत्पन्न होईल. द्वितीयबुद्धि किंवा वैरबुद्धि ही भयाला कारण होत असते. परमेश्वराचा व माझा कांहीं संबंध नाहीं असें म्हणणें, किंवा तुला मी कांहीं समजत नाहीं असें म्हणून दुसऱ्याचा उपमर्द करणें, दुसऱ्यांला दुःख देणें इत्यादि वैरबुद्धीमुळेंच भय प्राप्त होतें. व्यवहारामध्येंहि अविरोधाला ऐक्यता असें समजतात. देवदत्त, यज्ञदत्त व विष्णुमित्र अगदीं एक आहेत या म्हणण्याचा अर्थ त्यांच्यांत विरोध नाहीं असाच होतो; त्याचप्रमाणें परमात्मा व जीवात्मा हे परस्पर अविरोधी आहेत असें समजावें. विरोध असल्यानें दुःख प्राप्त होतें व विरोध नसतां सुख होतें. हा अनुभव सार्वत्रिक आहे. (प्र०) ब्रह्म व जीव सदोदित भिन्न असतात कीं केव्हां ते एकहि होतात ? (उ०) याचें उत्तर पूर्वी एकदां दिलेलें आहे तथापि पुनः सांगतों. साधर्म्य किंवा अन्वयभाव यांच्या योगानें ऐक्यता होते व वैधर्म्य किंवा व्यतिरेक यांच्या योगानें भिन्नत्व ठरतें, पहा. आकाश व इतर मूर्त द्रव्यें जड असल्यामुळें व आकाशापासून तीं केव्हांहि पृथक् राहत नसल्यामुळें तीं भिन्न नाहींत, असेंहि म्हणतां येईल व आकाश हें विभू, सूक्ष्म, अरूप, व अनन्त असें आहे व मूर्त द्रव्यें परिछिन्न, स्थूल, दृश्य व अल्प आकारवान् असल्यामुळें तीं आकाशाहून भिन्न आहेत असेंहि म्हणतां येतें. आकाशावांचून पृथिव्यादि द्रव्यें राहूं शकत नाहींत हा यांमध्यें आशय आहे व त्याचप्रमाणें आकाशाहून मूर्तद्रव्यें स्वरूपतः भिन्न असल्यामुळें त्यांत व्यतिरेकहि आहे व म्हणून त्यांत भिन्नत्व आहे; याचप्रमाणें ब्रह्म व्यापक असल्यामुळें जीव व पृथिव्यादि द्रव्यें त्याहून अलग राहूं शकत नाहींत हें खरें, पण स्वरूपतः त्यांच्यांत भेद असल्यामुळें तीं सर्व एक आहेत असेंहि होत नाहीं. जसें घर बांधण्यापूर्वी माती, लांकडें, लोखंड वगैरे पदार्थ आकाशामध्येंच होते, घर बांधल्यानंतरहि ते आकाशांतच असतात व घर मोडल्यानंतर ते आकाशांतच राहणार अर्थात् जरी तीनहि कालामध्यें ते आकाशांत असले तथापि त्यांच्यांत व आकाशांत स्वरूपतः भेद असल्यामुळें ते व आकाश एकच असें कधीं म्हणतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें जीव व सर्व पदार्थ परमेश्वर व्यापक असल्यामुळें व ते व्याप्य असल्यामुळें परमेश्वरापासून ते कधींहि भिन्न नाहींत, तथापि त्यांच्यांत

व परमेश्वरांत स्वरूपतः भेद असल्यामुळें ते केव्हांहि एक होत नाहींत. सांप्रतचे वेदांती लोक काण्यापुरुषाप्रमाणें आहेत. ते केवळ अन्वयालाच पाहून सर्व एकच आहे असें समजतात, पण त्यांतील व्यतिरेकाकडे ते दुर्लक्ष करीत असतात. सगुणता व निर्गुणता अन्वय व व्यतिरेक, साधर्म्य व वैधर्म्य, सामान्य व विशेष हे भाव ज्यांत नाहींत असें एकहि द्रव्य या जगांत आपणास दिसणार नाहीं. असें असतांहि हट्टानें एकत्व प्रतिपादण्यामध्यें काय लाभ आहे!!

(१०) परमेश्वराचें सगुणत्व व निगुणत्व.

(प्र०) परमेश्वर सगुण आहे कीं निर्गुण? (उ०) परमेश्वर सगुणहि आहे व निर्गुणहि आहे. (प्र०) एकच परमेश्वर सगुण व तोच निर्गुण कसा बरें असूं शकेल? (उ०) "यद्गुणैः सह वर्तमानं तत्सगुणम्! गुणेभ्यो यन्निर्गतं पृथग्भूतं तन्निर्गुणम्।" जो गुणांसहित असतो त्याला सगुण असें म्हणतात. प्रत्येक पदार्थामध्यें स्वतःचे स्वाभाविक गुण असतात व दुसऱ्यांतील विरोधी गुण नसतात, यामुळें प्रत्येक पदार्थ सगुण व निर्गुण असूं शकतो. कोणताहि असा पदार्थ नाहीं कीं जो केवळ निर्गुण किंवा केवळ सगुण असेल. प्रत्येक पदार्थामध्यें स्वाभाविक गुणांनीं सगुणता व विरोधिगुणांच्या अभावामुळें निर्गुणता सदैव असते. पहा. पृथिव्यादि पदार्थांमध्यें जडत्व, रूपत्वादि गुण आहेत म्हणून ते सगुण पण चैतन्याचे ज्ञानादि गुण त्यांच्यांत नाहींत म्हणून ते निर्गुण होत. तसेंच चैतन्यांमध्यें इच्छा, ज्ञान वगैरे गुण असल्यामुळें तें सगुण व त्यामध्यें जडाचे रूपादि गुण नसल्यामुळें तें निर्गुण होय; याचप्रमाणें परमेश्वरामध्यें स्वतःचे अनंत ज्ञान बल क्रियादि गुण असल्यानें तो सगुण आहे व त्यामध्यें रूपादि जडाचे गुण व रागद्वेषादि जीवाचे गुण नसल्यानें तो निर्गुण आहे. (प्र०) साकाराला सगुण व निराकाराला निर्गुण म्हणतात असें आम्ही अनेक वेळां ऐकिलें आहे. परमेश्वर जेव्हां अवतार घेत नाहीं तेव्हां तो निर्गुण व जेव्हां तो अवतार घेतो तेव्हां तो सगुण असें कां समजूं नये? (उ०) या कल्पना अविद्वानांच्या आहेत साकारतेशीं सगुणत्वाचा कांहीं संबंध नाहीं हें थोड्याशा विचाराअंतीं सर्वांस समजण्यासारखें आहे. जसें निराकारामध्यें गुण असतात तसे ते साकारामध्येंहि असतात. असो. (प्र०) परमेश्वर विरक्त आहे कीं आसक्त आहे? (उ०) आपणास उत्तम पदार्थांची प्राप्ति झाली पाहिजे असें वाटणें ही आसक्ति होय. परमेश्वराला अप्राप्य कांहींच नाहीं, असें असल्यामुळें तो आसक्त (किंवा रागी) नाहीं. तसेंच प्राप्त असलेल्या वस्तूचा त्याग करणाराला विरक्त असें म्हणतात. परमेश्वर सर्वत्र व्यापक असल्यामुळें कोणत्याहि पदार्थाला तो सोडूं शकत नाहीं, व सर्व पदार्थ नेहेमीं त्याच्या जवळच असतात, त्यामुळें त्याला विरक्तहि म्हणतां येत नाहीं. (प्र०) ईश्वराला इच्छा आहे कीं नाहीं? (उ०) ज्याला

जी वस्तू अप्राप्त असते त्याला तीविषयीं इच्छा उत्पन्न होते. परमेश्वराला सर्व पदार्थ सर्वदा प्राप्त आहेत व तो पूर्ण सुखयुक्त आहे म्हणून त्याला इच्छा किंवा अभिलाषा केव्हांहि होत नाहीं; पण त्यामध्यें ईक्षणमात्र आहे. सर्व प्रकारच्या विद्यांचें दर्शन व सर्व सृष्टि करणें यांला ईक्षण असें म्हणतात; हें मात्र परमेश्वराच्या ठिकाणीं आहे. याप्रमाणें संक्षेपानें ईश्वरविषयक अनेक गोष्टींचें निरूपण झालें, सुज्ञांनीं विचार करून विस्तारानें जाणावें.

(११) वेदांची उत्पत्ति व त्यांचें नित्यत्व.

यस्माद्दचो अपातक्षन् यजुर्यस्मादपाकषन् ॥
सामानि यस्य सोमान्यथर्वाङ्गिरसो मुखं
स्कम्भन्तं ब्रूहि कतमस्विदेव सः ॥ अथर्व० १०।
२३।४।२० ॥

" ज्यापासून ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद प्रकाशित झाले तो कोण आहे बरें ? याचें उत्तर, ज्यानें सर्वांला उत्पन्न करून धारण केलें आहे तो परमात्मा वेदांचा प्रकाशकर्ता आहे असें आहे. " तसेंचः—

स्वयंभूर्याथातथ्यतोऽर्थान् व्यदधाच्छाश्वतीभ्यः
समाभ्यः ॥ यजु० ४०।८ ॥

" जो स्वयंभू, सर्वव्यापक, शुद्ध, सनातन, निराकार परमेश्वर आहे, तोच सनातन जीवरूपी प्रजांच्या कल्याणासाठीं, यथावत् रीतीपूर्वक वेदद्वारा सर्व विद्यांचा उपदेश करतो. " (प्र०) परमेश्वर निराकार आहे कीं साकार ? (उ०) परमेश्वर निराकार आहे. (प्र०) निराकार परमेश्वरानें जिव्हादि साधनांशिवाय वर्णोच्चार व वेदांचा उपदेश कसा केला ? कारण वर्णोच्चाराला तालवादि स्थानें व जिव्हादि अवयवांचे प्रयत्न यांची आवश्यकता असते. (उ०) परमेश्वर सर्व शक्तिमान् व सर्वव्यापक असल्यानें जीवांला आपल्या व्याप्तीनेंच उपदेश करतां येण्यासारखा आहे व त्यामुळेंच मुखादि अवयवांची त्याला अपेक्षा नाहीं. आपणाहून भिन्न असलेल्या दुसऱ्या माणसाला उपदेश करण्यासाठीं वाणीची आवश्यकता व वर्णोच्चारासाठीं मुखादि अवयवांची आवश्यकता आहे. आपल्याच मनामध्यें जेव्हां विचार चालतात; तेव्हां मुखजिव्हादिकांची हालचाल न होतां आपो-

आप शब्दोच्चारण होत असतें. दोनहि कानांमध्यें बोट घातलें असतां मुखादिकांच्या प्रयत्नाशिवाय कसा शब्द निघत असतो हें स्पष्ट समजेल. अर्थात् भिन्न मनुष्याला उपदेश करण्यासाठीं मुखाच्या प्रयत्नाची आवश्यकता असते. परमेश्वर जीवांशीं अगदीं संलग्न आहे इतकेंच नव्हे तर तो त्यांमध्यें पूर्णपणें व्यापक आहे तेव्हां तोंडानें शब्दोच्चार करून जीवाला उपदेश करण्याची परमेश्वराला जरूरी नाहीं. तो आपल्या सान्निध्यानेंच त्यांना उपदेश करतो व अशा रीतीनें परमात्मस्फूर्तीनें जीवांमध्यें वेद प्रकट होतात व ते जीव आपल्या मुखांनीं उच्चारून इतरांना वेदांचा उपदेश करतात. (प्र० केव्हां कोणाच्या आत्म्यामध्यें वेदांचा उपदेश ईश्वरानें केला? (उ०)—

अग्नेर्ऋग्वेदो वायोर्यजुर्वेदः सूर्यात्सामवेदः ॥

शतप० ११।५।२।३॥

"प्रथमतः सृष्टीच्या प्रारंभीं परमेश्वरानें अग्नि, वायु, आदित्य व अंगिरा या ऋषींच्या आत्म्यांमध्यें एका एका वेदाचा प्रकाश केला." (प्र०)—

यो ब्रह्माणं विदधाति पूर्वं यो वै वेदांश्च प्रहिणोति तस्मै ॥

श्वेताश्वेतर. ६।१८॥

इत्यादि वचनांमध्यें ब्रह्म्याच्या हृदयांमध्यें वेदांचा प्रकाश केला असें लिहिलें आहे. हें खरें कीं वरील शतपथातील खरें? (उ०) प्रथमतः वर दिलेल्या ऋषींच्या अंतःकरणांत वेदांचा प्रकाश झाल्यानंतर त्यांच्या द्वारानें ब्रह्म्याच्या आत्म्यामध्यें वेद स्थापित झाले, पहा—

अग्निवायुरविभ्यस्तु त्रयं ब्रह्म सनातनम् ॥
दुदोह यज्ञसिध्यर्थमृग्यजुःसामलक्षणम् ॥ मनु० १।२३॥

परमेश्वरानें सृष्टीच्या प्रारंभीं मनुष्यांना उत्पन्न करून अग्नि आदिक चार महर्षींला वेदांचा उपदेश केला व ब्रह्म्यानें त्या चार ऋषींपासून ऋग्वेदादि चारहि वेदांचें ग्रहण केलें. (प्र०) या चारच ऋषींमध्यें वेदांचा प्रकाश परमेश्वरानें केला व इतरांमध्यें केला नाहीं यावरून परमेश्वर पक्षपाती होत नाहीं काय ? (उ०) तेच महर्षी इतरांपेक्षां पवित्र होते, म्हणूनच त्यांना उपदेश केला. (प्र०) वेद संस्कृतभाषेंतच कां प्रकाशित झाले ? (उ०) संस्कृतभाषा ही सर्व भाषांची जननी असल्यामुळें सर्वांस साधारण आहे, म्हणून परमेश्वरीय ज्ञान या सर्व साधारण भाषेमध्येंच लोकांनां मिळालें. ज्याप्रमाणें पृथिवी, जल वगैरे परमेश्वरदत्त पदार्थ सर्वांला साधा-

रण आहेत त्याचप्रमाणें वैदिकज्ञानहि सर्वांसाठींच असल्यामुळें सर्वसाधारण संस्कृतभाषेंत दिलें असल्यानें सर्वांला साधारण होतें; जर तें कोणत्या तरी देश भाषेंत असतें तर तें सर्वांला साधारण झालें नसतें. (प्र०) वेद ईश्वरप्रणीत आहेत अन्यकृत नाहींत याला प्रमाण काय ? (उ०) जसा ईश्वर पवित्र, सर्व विद्या जाणणारा, शुद्धगुणकर्मस्वभावयुक्त, न्यायकारी, दयालु आहे, त्याच प्रमाणें ज्या पुस्तकांत ईश्वराच्या गुणकर्मस्वभावाला अनुकूल कथन असेल तेंच पुस्तक ईश्वरप्रणीत होय अन्य नाहीं. तसेंच ज्यामध्यें सृष्टिक्रम, प्रत्यक्षादि प्रमाण, आप्तपुरुष व पवित्रात्मे यांचे व्यवहार इत्यादिकांच्या विरुद्ध कथन नसेल तें ईश्वरोक्त असें समजावें. जसें ईश्वराचें ज्ञान निर्भ्रम आहे; त्याचप्रमाणें ज्या पुस्तकांत निर्भ्रांत ज्ञानाचें प्रतिपादन केलें असेल त्याला ईश्वरोक्त असें म्हणावें. जसा परमेश्वर आहे व त्यानें जसा सृष्टिक्रम बनविला आहे, तसेंच ज्या पुस्तकांत परमेश्वर, सृष्टिकार्य, कारण व जीव इत्यादिकांविषयीं प्रतिपादन असेल त्याला ईश्वरोक्त असें समजावें वेदांमधील सर्व प्रतिपादन असेंच निर्दोष असल्यामुळें सर्व वेद ईश्वरप्रणीत आहेत असें समजावें. बायबल, कुराण वगैरे ग्रंथ तसे नाहींत, त्यांतील मजकूर असंबद्ध असल्यामुळें त्यांना ईश्वरप्रणीत असें म्हणतां येत नाहीं. या विषयीं विशेष स्पष्टीकरण पुढें करण्यांत येईल. (प्र०) वेद ईश्वरानेंच केले पाहिजेत असें नाहीं. मनुष्यें क्रमशः आपलें ज्ञान वाढवून तशीं पुस्तकें नाहीं का रचूं शकणार ? (उ०) वैदिकज्ञानाशिवाय मनुष्यें आपलें ज्ञान वाढवूं शकणारच नाहींत. कारणाशिवाय कार्याची उत्पति केव्हांहि होत नसते. जंगलांत हजारों वर्षें राहणारे लोक केवल सृष्टीला पाहून विद्वान् होत नाहींत. त्यांनां जर शिकविलें तरच ते विद्वान् होतात; सध्यांहि शिकविल्याशिवाय कोणी विद्वान् होत नाहीं हा सार्वत्रिक अनुभव आहे; या वरून उघड दिसतें कीं जर परमेश्वरानें सृष्टीच्या आरंभीं त्या चार ऋषींना ज्ञान दिलें नसतें व जर त्यांनीं इतरांना उपदेश केला नसता तर आज पर्यंतचे सर्व लोक अविद्वानच राहिले असते म्हणून शिक्षणपरंपरा चालू ठेवणें हें विद्वानांचें काम आहे. शिक्षण दिल्याशिवाय कोणीहि सुशिक्षित होत नसतो. जर एखाद्या मुलाला लहानपणापासून अज्ञानी लोकांमध्यें नेऊन ठेविलें तर त्या सोवत्याप्रमाणें त्याचें मन असंस्कृत दिसेल. धनगर, जंगली लोक व भिल्ल लोक शिक्षणाच्या अभावामुळेंच असे राहिले आहेत; शिवाय जोंपर्यंत आर्यावर्त देशांतून युरोप व यूनान देशांतील लोकांना शिक्षण मिळालें नव्हतें तोंपर्यंत त्यांची दशा काय होती ? ते सुसंस्कृत होण्याला आर्यावर्तांतील विद्याच कारणीभूत झाली हें इतिहास प्रसिद्ध आहे. अमेरिकेमधील रेडइंडियन लोक लाखोंवर्षें कसे अडाणी होते व कोलंबसानें तें खंड शोधून काढल्यानंतर युरोपियन लोक तेथें जाऊन राहिल्या-

नंतर आतां तेच अमेरिकेचे मूळचे रहिवासी कसे सुशिक्षित होऊं लागले आहेत हें पाहिलें म्हणजे मनुष्यें आपोआपच ज्ञान शोधूं शकत नाहींत हें स्पष्ट दिसेल. मनुष्यांना मार्गदर्शक कांहींतरी दैविक ज्ञान पाहिजे म्हणजे त्याच्या आधारानें ते पुढें अनेक प्रगति करूं शकतात. म्हणूनच परमेश्वरानें सृष्टीच्या आरंभीं वेदांचा उपदेश केला व शिक्षणपरंपरा सुरू केली व तिच्या योगानें उत्तरोत्तर लोक विद्वान् होत आले आहेत; म्हणूनच—

स पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात् ॥

योग० समा०२६॥

त्या परमेश्वराला "**गुरु**" असें म्हणतात. ज्याप्रमाणें आम्ही अध्यापकांकडून विद्या मिळवून विद्वान् होतों, त्याचप्रमाणें सृष्टीच्या आरंभीं अग्न्यादिक ऋषींना परमेश्वरानें सर्व विद्यांचा उपदेश केला; म्हणून तो सर्वांचा गुरु होय. जीव जसा सुषुप्तिमध्यें व प्रलयामध्यें ज्ञानरहित होतो तसा परमेश्वर होत नाहीं, कारण त्याचें ज्ञान नित्य व एक रस आहे म्हणूनच तो प्रलय काल संपल्यावर सृष्टि उत्पन्न करून वेदांचा ऋषींना उपदेश करतो. अर्थात् निमित्तावांचून नैमित्तिक कार्यसिद्धि होते असें कोणींहि समजूं नये. (**प्र०**) वेद संस्कृतभाषेंत असल्यामुळें त्यांचा अर्थ त्या अग्न्यादिकांना कसा समजला ? आधीं भाषेचें ज्ञान करून देऊन मग परमेश्वरानें वेदांचा त्यांस उपदेश केला कीं काय ? (**उ०**) वैदिक ज्ञान ऋषींना ध्यानावस्थित स्थितीमध्यें अंतःस्फूर्तीनें होतें. ऋषींच्या आत्म्यांचा परमात्म्याशीं योग झाला म्हणजे स्वयमेव वैदिकज्ञानाची उमज त्यांना पडते, त्याला आधीं भाषा शिकण्याची आवश्यकता नाहीं; जेव्हां धर्मात्मे, योगी महर्षी लोक ज्या ज्या अर्थज्ञानाची इच्छा करून ध्यान लाऊन बसतात त्यांनां तें ज्ञान समाधिदशेंतील परमात्मसान्निध्यानें होतें; अर्थात् परमेश्वरानेंच त्यांना अर्थ समजाविले जेव्हां अशा वैदिक अर्थज्ञानाचा प्रकाश अनेकांच्या अंतःकरणांत पडला तेव्हां त्यांनीं तो अर्थ व ऋषिमुनींचे इतिहास मिळून "**ब्राह्मण**" ग्रंथ बनविले. ब्रह्म हें नांव वेदाचें आहे, त्या वेदाचें ज्यांत व्याख्यान आहे ते ब्राह्मण ग्रंथ होत —

" ऋषयो वेदमन्त्राः " त्या त्या मंत्रांत जें ऋषित्व होतें त्याचे जे प्रकाशक झाले त्यांनां त्या मंत्रांतील ऋषित्वाची संज्ञा प्राप्त झाली.—

ऋषयो मंत्रदृष्टयः मंत्रान्संप्राददुः ॥ निरु० १।२०॥

ज्या ज्या मंत्राचा अर्थ ज्या ज्या ऋषीला प्रथमतः समजला, व ज्याच्या आधीं त्या त्या मंत्राचा अर्थ कोणीहि प्रकाशित केला नव्हता, तो त्यानीं मंत्राची व्याख्या प्रथमतः करून दुसऱ्यांना त्याचा उपदेश केला; म्हणून ऋषीचें नांव त्या त्या मंत्र

बरोबर अजूनपर्यंतहि स्मरणार्थ लिहिलें जातें. हे ऋषी त्या त्या मंत्रांचे कर्ते नसून त्यांच्या अर्थाचे प्रकाशक आहेत. (प्र०) वेद कोणकोणत्या ग्रंथांचें नांव आहे? (उ०) ऋक्, यजुः, साम व अथर्व या चार मंत्रसंहितेला वेद असें म्हणतात. अन्य ग्रंथाला वेद ही संज्ञा मिळत नाहीं.*

(प्र०) "**मंत्रब्राह्मणयोर्वेदनामधेयम्।**" या कात्यायनमुनिप्रणीत वचनानें मंत्र व ब्राह्मणें यांना मिळून वेद ह्मणतां येईल कीं नाहीं? (उ०) संहिताग्रंथालाच अनादिकालापासून वेद असें समजत आले आहेत तसें ब्राह्मणग्रंथांला नाहीं. निरुक्तामध्येंहि—

इत्यपि निगमो भवति। इति ब्राह्मणम्॥

निरु० १। खं० ३।४॥

याप्रमाणें "निगम" व "ब्राह्मण" असा स्पष्ट भेद केलेला आहे. पाणिनिमुनीनें अष्टाध्यायीमध्येंहि—

छन्दो ब्राह्मणानि च तद्विषयाणि॥ अष्टा० ४।२।६६॥

असाच "छंदः" व "ब्राह्मण" असा भेद केला आहे. तात्पर्य सर्व ऋषिमुनि लोक मंत्रभागालाच वेद असें मानितात व ब्राह्मणग्रंथांला वेदाचीं व्याख्यानें असें मानितात. कात्यायनानें स्वतःच्या ग्रंथापुरती आपली परिभाषा बनविली आहे ती इतर सर्व ऋषींच्या मतांच्या विरुद्ध असल्यामुळें ग्राह्य मानतां येत नाहीं. ब्राह्मण ग्रंथांत ऋषिलोक, राजेलोक यांच्या अनेक कथा आहेत, हे त्या त्या पुरुषांचे इतिहास असल्यामुळें ते ते पुरुष झाल्यानंतर लिहिले गेले आहेत. वेद तर अनादि व सनातन आहे, अशा सनातन वेदांमध्यें ब्राह्मणांतील कथांचा अंतर्भाव कसा होईल; अर्थात् ब्राह्मणग्रंथांला वेद मानणें ह्मणजे वेदाचें सनातनत्व नाहींसें करण्यासारखें आहे. मंत्रभागांमध्यें असे इतिहास नाहींत. पण अनेक विद्यांचा बोध ज्यांच्या योगानें होईल असा शुद्ध शब्दांचा प्रयोग त्यांत केलेला आहे; त्यामध्यें कोणत्याहि मनुष्यविशेषाचें नांव, कथा किंवा तशा प्रसंगाचा उल्लेख मुळींच नाहीं. (प्र०) वेदांच्या शाखा किती आहेत? (उ०) वेदांच्या अकराशें सत्तावीस शाखा आहेत. (प्र०) शाखा

* कात्यायनमुनींनीं संज्ञाकृत्यामध्यें वेद व ब्राह्मण यांची वेद ही संज्ञा ठरविली तीची व्याप्ति त्या कार्यापुरतीच आहे; जसी महर्षि पाणिनिमुनींनीं "वृद्धिरादैच्" ह्या सूत्रामध्यें आदैच् यांना वृद्धिसंज्ञा ठरविली तीप्रमाणें जेथें जेथें वृद्धि शब्द येईल तेथें तेथें आ ऐ हा अर्थ घेतला तर अनवस्था होईल; त्याप्रमाणेंच ही यज्ञप्रकरणांतील संज्ञा ब्राह्मणग्रन्थाला वेदत्व ठरविणारी नसून त्या कार्यापूर्तीच आहे.

म्हणजे काय ? (उ०) वेदांच्या व्याख्यानाला शाखा असें म्हणतात. (प्र०) सध्यां विद्वान् लोक वेदांच्या अवयवांनाच शाखा असें म्हणतात, तें खरें कीं काय ? (उ०) थोडासा विचार केला असतां काय खरें तें सहज समजेल. पहा. जितक्या शाखा आहेत तितक्या आश्वलायनादि ऋषींच्या नांवावर प्रसिद्ध आहेत. जसे चारहि वेदांला परमेश्वरकृत मानितात, त्याच प्रमाणें शाखांना आश्वलायनादि ऋषिकृत मानितात. सर्व शाखांमध्यें मंत्रांचें प्रतीक धरून त्यावर व्याख्या करून ग्रंथ बनविलेले असतात. जसें तैत्तिरीयशाखेमध्यें " इषेत्वोर्जे त्वेति । " अशीं वेदांतील प्रतीकें धरून पुढें व्याख्यानें केलेलीं आहेत. अशा तऱ्हेचीं प्रतीकें धरून व्याख्या वेदांमध्यें कोठेंहि केलेली नाहीं; म्हणून परमेश्वरकृत चार वेद हे मूलवृक्षस्कंध असून, त्याच्या आश्वलायनादि शाखा ऋषिमुनिकृत आहेत. ज्या प्रमाणें मातापिता आपल्या पुत्रांची उन्नति चाहत असतात; त्याचप्रमाणें परमेश्वरहि सर्व लोकांची उन्नति चाहतो व म्हणूनच त्यानें अगदीं सृष्टीच्या प्रारंभीं सर्व लोकांच्या सुधारणेसाठीं वेदांचा प्रकाश केला. या विद्यासूर्याच्या योगानें लोकांनीं आपला अज्ञानान्धकार नाहींसा करावा व ज्ञान मिळवून आनंद व सुखें यांची अभिवृद्धि करीत जावी हें सर्वांस योग्य आहे. (प्र०) वेद नित्य आहेत कीं अनित्य आहेत? (उ०) वेद नित्य आहेत कारण परमेश्वर नित्य असल्यामुळें त्याचे ज्ञानादि गुण हि नित्यच आहेत. जो पदार्थ नित्य असतो त्याचे गुण कर्म स्वभावहि नित्यच असतात व जो अनित्य असतो त्याचे अनित्य असतात. (प्र०) काय हीं वेदांचीं पुस्तकेंहि नित्य आहेत ? (उ०) नाहीं, पुस्तकें हीं पानें व शाई यांचीं बनलेलीं असतात तीं नित्य कशीं असूं शकतील ? हीं पुस्तकें नित्य नसून वेदांतील शब्द, अर्थ व संबंध हा नित्य आहे. (प्र०) तर मग परमेश्वरानें त्या चार ऋषींच्या आत्म्यामध्यें ज्ञान उत्पन्न केलें असेल व त्या ज्ञानाच्या योगानें त्या त्या ऋषींनीं हे वेद बनविले असतील ? (उ०) ज्ञान हें ज्ञेयावांचून होत नाहीं. गायत्र्यादि छंद षड्जादि स्वर व उदात्तानुदात्तादि स्वर यांची ज्ञानपूर्वक छंदांमध्यें योजना ही सर्वज्ञ परमेश्वराशिवाय दुसऱ्या कोणाकडूनहि होणें नाहीं. ज्यांनां वेदांतील स्वारस्य समजत नाहीं; ते मनुष्यकृत वेद आहेत असें म्हणतात, पण सर्वज्ञानयुक्त प्रमादरहित वेद रचणें हें सर्वथैव मनुष्यशक्तीच्या बाहेरचें आहे असें वेद ज्ञानाचा आस्वाद घेतलेल्या माणसाला वाटल्यावांचून राहणार नाहीं. ऋषींनीं वैदिक ज्ञान संपादन केल्यानंतर व्याकरण निरुक्तादि शास्त्रें बनविलीं आहेत, तीं अनेक विद्यांचा प्रकाश सर्व लोकांस सुगमतेनें व्हावा म्हणून होत; पण जर प्रारंभीं परमेश्वरानें वेदांचा प्रकाश केला नसता तर कोणाला कांहीं एक आलें नसतें व हीं सध्यां प्रचारांत असलेलीं शास्त्रेंहि प्रचारांत आलीं नसतीं; तात्पर्य वेद हे ईश्वरोक्त

आहेत व त्यांच्या प्रमाणेंच सर्व लोकांनीं चालले पाहिजे. वैदिकमत हेंच सर्वांसाठीं आहे, निदान *सनातनधर्माभिमान्यांनीं तरी आपलें मत वेद आहे व वेदांमध्यें जें जें सांगितलें आहे त्यालाच आम्ही मानितों असेंच नेहेमीं म्हटलें पाहिजे.

याप्रमाणें ईश्वर व वेद याविषयीं संक्षेपानें वर्णन झालें आतां या पुढीलभागांत सृष्टयुत्पत्तिविषयीं लिहिलें जाईल.

इति श्रीसुभाषाविभूषित ईश्वरवेदविषयो नाम सप्तमसमुल्लासः संपूर्णः ॥ ७ ॥

---

*वेदाज्ञा सर्व लोकांना सर्वकालीं लाभदायक अशा आहेत; त्यांचें यथावत् पालन न करतां देशकालाप्रमाणें त्या आज्ञांचें स्वरूप बदलून प्रचारांत आणलेल्या कोणत्याहि विचारांना सनातन म्हणतां यावयाचें नाहीं; या दुराग्रहाची उत्पत्ति अज्ञानभूमींतच होत असते. त्याला विद्वानांनीं थारा देऊं नये.

अथ अष्टमसमुल्लासः ।

अथ सृष्ट्युत्पत्ति-स्थिति-प्रलयविषयान् व्याख्यास्यामः ।

आतां सृष्टीची उत्पत्ति, स्थिति व प्रलय यांसंबंधानें लिहावयाचें आहे. या विषयांसंबंधानें वेदांमध्यें पुढील मंत्र आहेतः—

इयं विसृष्टिर्यत आ बभूव यदि वा दधे यदि वा न ॥ यो अस्याध्यक्षः परमे व्योमन्त्सो अङ्ग वेद यदि वा न वेद ॥ ऋ. मं. १०।१२९।७॥

हे (अङ्ग) मनुष्या ! (यतः) ज्यापासून (इयम्) ही (वि-सृष्टिः) विविध सृष्टि (आबभूव) उत्पन्न झाली आहे, (दधे) जो तिचें धारण करतो व जो तिचा प्रलयहि करतो, तसेंच जो या सृष्टीचा (अध्यक्षः) स्वामी आहे, (परमे व्योमन्) व ज्या सर्व व्यापकामध्यें हें सर्व जगत् उत्पत्ति, स्थिति व लय यांनां प्राप्त होतें, (सः) तोच परमात्मा आहे असें (वेद) जाण, व दुसऱ्या कोणालाहि सृष्टिकर्ता मानूं नको. [या मंत्रांत परमेश्वरच सृष्टीची उत्पत्ति, स्थिति व प्रलय करतो असें सांगितलें आहे] तसेंच—

तमं आसीत्तमसा गूढमग्रेऽप्रकेतं सलिलं सर्वमा इदम् ॥ तुच्छ्येनाभ्वपिहितं यदासीत्तपसस्तन्महिना जायतैकम् ॥ ऋ. मं. १०।१२९।३ ॥

(इदम्) हें सर्व जग (अग्रे) सृष्टीच्या पूर्वी (तमः) अंधकारमय व (तमसा) अंधकारानें (गूढम्) झांकलेलें व वास्तव जाणण्यास कठीण होतें, असें हें (अप्रकेतम् सलिलम्) आकाशरूपी सर्व जग (तुच्छ्येनाभ्वपिहितम्) अनन्त परमेश्वराच्या समोर त्याच्या एका देशामध्यें आच्छादित झालेलें असें होतें, नंतर त्या परमेश्वरानें (तपसः महिना) आपल्या महान् सामर्थ्याच्या योगानें कारणरूपापासून (एकं जायत) कार्यरूपी केलें. [या मंत्रांत प्रलयकालीं जग अव्यक्त असतें असें सांगून, त्यालाच सृष्टीच्या आरंभीं आपल्या सामर्थ्यानें परमेश्वर व्यक्तस्थिति, आणतो असें सांगितलें आहे.]

हिरण्यगर्भः समवर्त्तताग्रे भूतस्य जातः पतिरेक आसीत् ॥ स दाधार पृथिवीं द्यामु-तेमां कस्मै देवाय हविषा विधेम ॥

ऋ० मं० १०।१२१।१॥

हे मनुष्या! जो (हिरण्यगर्भः) सूर्यादि तेजस्वी पदार्थांचा आधार व या (भूतस्य) उत्पन्न झालेल्या व उत्पन्न होणाऱ्या जगाचा (एकः) अद्वितीय (पतिः) स्वामी आहे; तो परमेश्वर या (अग्रे) सृष्टीच्या उत्पत्तीच्या पूर्वीहि विद्यमान होता. (सः) त्या परमेश्वरानें (पृथिवीम्) पृथिवीपासून (द्याम्) सूर्यापर्यंत सर्व जग उत्पन्न करून (दाधार) त्याला आधार दिला आहे, त्या (कस्मै) सुखमय परमेश्वराची प्रेमानें भक्ति करावी. [या मंत्रांत परमेश्वर सृष्टीच्या पूर्वी होता व त्यानें या जगाला आधार दिला आहे असें सांगितलें आहे.] तसेंच—

पुरुष एवेद ꣳ सर्वं यद्भूतं यच्च भाव्यम् ॥ उतामृतत्वस्येशानो यदन्नेनातिरोहति ॥यजु०३१।२॥

हे मनुष्या! जो (पुरुषः) सर्वांमध्यें पूर्ण व्यापक पुरुष आहे व जो (अमृतत्वस्य) नाशरहित कारण व जीव यांचा (ईशानः) स्वामी आहे व जो (अन्नेन अति-रोहति) पृथिव्यादि जड व जीव यांहून निराळा आहे, तोच (पुरुषः) परमात्मा या सर्व भूत (भाव्यम्) भविष्य व वर्तमान जगताचा उत्पन्नकर्ता आहे. तसेंच—

यतो वा इमानि भूतानि जायन्ते । येन जातानि जीवन्ति । यत्प्रयन्त्यभिसंविशन्ति । तद्विजिज्ञासस्व । तद्ब्रह्मेति ॥

तैत्ति० भृगु० अ० १॥

" ज्या परमात्म्याच्या रचनेच्या योगानें हीं सर्व पृथिव्यादि भूतें उत्पन्न होतात, ज्याच्या योगानें जीवनदशेला प्राप्त होतात व ज्याच्या योगानें प्रलयाला जातात, तेंच ब्रह्म होय, त्याला जाणण्याची इच्छा कर." याचप्रमाणें ब्रह्मसूत्रामध्येंहि सांगितलें आहे:—

जन्माद्यस्य च यतः ॥ उत्तरमीमां० १।१।२॥

" ज्याच्या योगानें या जगाची उत्पत्ति, स्थिति व प्रलय होतात तेंच ब्रह्म होय."

(प्र०) हें जग परमेश्वरापासून उत्पन्न झालें आहे कीं दुसऱ्या कोणापासून? (उ०)

परमेश्वर हा हें जग उत्पन्न करण्यांत निमित्त कारण आहे व प्रकृति उपादान कारण आहे. (प्र०) प्रकृति ही परमेश्वरानें उत्पन्न केलेली नाहीं काय? (उ०) नाहीं, ती अनादि आहे. (प्र०) अनादि म्हणजे काय व अनादि पदार्थ किती आहेत? (उ०) जें उत्पन्न झालेलें नसतें त्याला अनादि असें म्हणतात. परमेश्वर, जीव व जगताचें कारण हे तीन अनादि पदार्थ आहेत. (प्र०) या तुमच्या म्हणण्याला आधार काय? (उ०) याला वेदाचा आधार आहे. पहा—

द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते ॥ तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्नन्यो अभि चाकशीति ॥ ऋ. मं. १।१६४।२०॥

(द्वा) ब्रह्म व जीव हे दोनहि (सुपर्णा) चेतनत्व व पालनशक्ति या गुणांमध्यें सदृश आहेत, (सयुजा) ते व्याप्य व व्यापकभावानें संयुक्त झालेले आहेत, (सखाया) ते परस्पर मित्र आहेत व सनातन व अनादि आहेत. (समानम्) या दोहोंप्रमाणेंच (वृक्षम्) अनादि मूलरूपकारण व शाखारूप कार्य यांनीं युक्त असा एक वृक्ष आहे. जो मूलरूपांत असतांनां कारण स्थितींत असतो व स्थूल होऊन शाखारूप बनला म्हणजे त्याचा विस्तार होतो व हा विस्तार प्रलयीं छिन्नभिन्न होऊन पुनः तो कारणरूपाला जाऊन मिळतो, असा हा तिसरा अनादि पदार्थ आहे. याचे गुणकर्मस्वभावहि अनादि आहेत. पूर्वी सांगितलेल्या जीव व ब्रह्म यांपैकीं जो जीव आहे तो या शाखामय वृक्षरूप संसारांतील पापपुण्याच्या फलांचा (स्वादु अत्ति) उत्तम प्रकारें आस्वाद घेतो; पण दुसरा जो परमात्मा आहे तो (अनश्नन्) फलांचा उपभोग करीत नसून, चारहि बाजूंनीं बाहेर व आंत सर्व ठिकाणीं प्रकाशमान् होत आहे. जीवाहून ईश्वर व ईश्वराहून जीव भिन्न आहे. आणि या दोहोंपेक्षां (मूलजड-कारण) प्रकृति स्वरूपतः भिन्न आहे. असे हे तीनहि अनादि पदार्थ आहेत.

याथातथ्यतोऽर्थान् व्यदधाच्छाश्वतीभ्यः समाभ्यः ॥ यजु. ४०।८।

" अनादि सनातन जीवरूप प्रजेकरितां परमेश्वरानें वेदद्वारा सर्व विद्यांचा उपदेश केला आहे." [या मंत्रांत परमेश्वराच्या गुरुत्वाचा उल्लेख आहे व जीव हे ज्ञान ग्रहण करणारे आहेत असें ध्वनित केलें आहे.] तसेंच—

अजामेकां लोहितशुक्लकृष्णां बह्वीः प्रजाः सृजमानां सरूपाः ॥ अजो ह्येको जुषमाणोऽनुशेते जहात्येनां भुक्तभोगामजोऽन्यः ॥ श्वेताश्व० ४।५॥

" प्रकृति, जीव व परमेश्वर हे तीनहि अज अर्थात् कधींहि जन्मास न आलेले असे आहेत; अर्थात् हे तीनहि अनादि असून सर्व जगताचे कारण आहेत, यांनां कोणी कारण नाहीं. अनादि प्रकृतीचा उपभोग अनादि जीव करतो व फसतो, तसा परमात्मा फसत नाहीं; व तो प्रकृतीचा उपभोगहि घेत नाहीं. यांपैकीं ईश्वर व जीव यांचीं लक्षणें पूर्वी ईश्वराविषयीं निरूपण करतांनां (पृ. २०२–२२०) मध्यें केलेलीं आहेत, आतां प्रकृतीचें लक्षण पहावयाचें—

सत्वरजस्तमसां साम्यावस्था प्रकृतिः, प्रकृतेर्महान्, महतोऽहंकारः, अहंकारात्पञ्चतन्मात्राण्युभयमिंद्रियं पञ्चतन्मात्रेभ्यः स्थूलभूतानि पुरुष इति पञ्चविंशतिर्गणः॥ सांख्य. १।६१

(सत्वम्) शुद्धता (रजः) मध्यता व (तमः) जडता या तीन वस्तु मिळून जो संघात त्याला प्रकृति असें म्हणतात, त्यापासून महात्तत्त्व-बुद्धि, तिच्यापासून अहंकार, त्यापासून पंचतन्मात्र [शब्द, स्पर्श, रूप, रस, गन्ध] हीं सूक्ष्म भूतें आणि दहा इंद्रियें व अकरावें मन, त्या पंचतन्मात्रांपासून पृथिव्यादि पंच स्थूल भूतें, हे चौवीस पदार्थ उत्पन्न झाले. "पुरुष" अर्थात् जीव व परमेश्वर हा पंचवीसावा पदार्थ आहे; यांपैकीं महत्तत्व, अहंकार, व पंचसूक्ष्मभूतें हें सर्व मूल अविकृत प्रकृतीचें **कार्य** आहे व तेंच इंद्रियें, मन व स्थूल भूतें यांचें **कारण** आहे. **पुरुष** हा कोणाची प्रकृति व कशाचें उपादान कारणहि नाहीं व कशाचें कार्यहि नाहीं. (**प्र०**)—

सदेव सोम्येदमग्र आसीत् ॥ छांदो० ६।२॥
असद्वा इदमग्र आसीत् ॥ तैत्ति० ब्रह्मानं० अ० ७॥
आत्मैवेदमग्र आसीत् ॥ बृहदा० १।४।१॥
ब्रह्म वा इदमग्र आसीत् ॥ शत० ११।१।११।१॥

हीं उपनिषदांचीं वचनें आहेत.

" हे श्वेतकेतो ! हें जग सृष्टीच्या पूर्वी सत्, असत्, आत्मा व ब्रह्मरूप होतें."

व नंतर—

तदैक्षत बहुस्यां प्रजायेयेति ॥ सोऽकामयत ॥ बहुस्यां प्रजायेयेति ॥ तैत्तिरीयो० ब्रह्मानंदव. अ. ६॥

" तोच आत्मा आपल्या इच्छेनें अनेक रूप बनला आहे." तसेंच—

सर्वं खल्विदं ब्रह्म । नेह नानास्ति किञ्चन ॥

हेंहि उपनिषदाचें वचन आहे.

" हें सर्व जग खरोखरच ब्रह्म आहे. त्यांत नानाप्रकारचे पदार्थ कांहींच नाहींत पण जें कांहीं आहे तें सर्व ब्रह्मरूप आहे." [इत्यादि वचनांमध्यें एकच ब्रह्म आहे असें सांगितलें असतां आपण कसे तीन पदार्थ अनादि मानितां बरें]? (उ०) या वरील वचनांचा असा अनर्थ करणें तुम्हांला योग्य नाहीं. कारण *उपनिषदांमध्येंच अन्य ठिकाणीं काय काय लिहिलें आहे व त्या सर्वांची एकवाक्यता कशांत आहे तें आधीं पहा.—

एवमेव खलु सोम्यान्नेन शुङ्गेनापो मूलमन्विच्छाद्भिः सोम्य शुङ्गेन तेजोमूलमन्विच्छ तेजसा सोम्य शुङ्गेन सन्मूलमन्विच्छ सन्मूलाः सोम्येमाः सर्वाः प्रजाः सदायतनाः सत्प्रतिष्ठाः ॥ छां० ६।८।४ ॥

" हे श्वेतकेतो ! तूं अन्नरूपी पृथिवी कार्यावरून जलरूपी कारणाला जाण, कार्यरूपी जलावरून तेजोरूपी मूल जाण व तेजोरूपी कार्यावरून (सत्- रूप) सद्रूप कारण जी नित्य प्रकृति आहे तिला तूं जाण. ही सत्यरूप प्रकृति सर्व जगाचें मूळ घर व त्याच्या स्थितीचें स्थान आहे. सृष्टि उत्पन्न होण्यापूर्वी हें सर्व जग असत्सदृश होतें व जीवात्मा, ब्रह्म व प्रकृति यांत लीन झालेलें होतें. त्याचा अभाव नव्हता. आतां " सर्वं खल्विदं० " हें वाक्य " वडाची साल पिंपळाला लावण्यासारखें आहे." कारण—

सर्वं खल्विदं ब्रह्म तज्जलानीति शान्त उपासीत ॥
छांदो० ३।१४।१ ॥

नेह नानास्ति किंचन ॥ कठोप० अ० २ व० ४।११ ॥

या निरनिराळ्या उपनिषद्वचनांतून घेऊन तें तुम्ही एक बनविलें आहे; ज्याप्रमाणें

*उपनिषत् निश्चित विद्या असते त्यांत अविद्यामय तत्वार्थ शोधण्याचें काम नसतें.

शरीराचे अवयव शरीराबरोबर असले तरच ते काम देऊं शकतात; पण ते निरनिराळे केले तर त्यांच्याकडून कांहीं होऊं शकत नाहीं, तद्वतच प्रकरणांतील वाक्य प्रकरणांच्या अनुरोधानें घेतलें तरच तें अन्वर्थक भासतें व तसें न करतां जर एका प्रकरणांतील वाक्य दुसऱ्या प्रकरणांतील वाक्याशीं जोडलें तर तें— अनर्थकारक होतें. प्रकरणानुकूल त्यांचा अर्थ केला तर तो पुढें दिल्याप्रमाणें होतो—" हे जीव ! तूं ब्रह्माची उपासना कर, ज्या ब्रह्माच्या योगानें या जगाची उत्पत्ति, स्थिति, व जीवन हीं होतात, ज्याच्या बनविण्यानें व धारण केल्यानें हें जग अस्तित्वांत आहे, किंवा जें ब्रह्मावरोबर सहचरित आहे; त्याला सोडून दुसऱ्या कशाचीहि उपासना तूं करूं नकोस." तसेंच " त्या चेतनमात्र अखंडैकरस ब्रह्मामध्यें नानावस्तूंचा मिलाफ झालेला नाहीं; पण हें सर्व जगत् निरनिराळ्या रूपानें त्याच्या आधारानें राहिलें आहे." (प्र०) जगाचीं कारणें किती आहेत. (उ०)—जगाचीं तीन कारणें आहेत, (१) निमित्त कारण, (२) उपादान कारण व (३) साधारण कारण. ज्याच्या बनविण्यानें कांहीं बनतें, बनविलें नाहीं तर कांहीं बनत नाहीं, आपण स्वतःच जें बनत नाहीं; पण प्रकारान्तरानें दुसऱ्याला बनवितें त्याला " **निमित्तकारण** " असें म्हणतात; ज्याच्यावांचून कांहीं बनत नाहीं व जें अवस्थान्तर पावून कांहीं पदार्थरूप बनतें किंवा बिघडतें त्याला " **उपादानकारण** " असें म्हणतात. पदार्थ बनविण्याचें जें साधन व साधारण निमित्त असतें त्याला " **साधारणकारण** " असें म्हणतात.—निमित्तकारण दोन प्रकारचें आहे, एक सर्व सृष्टीला कारणद्वारा बनविणारें, धारण करणारें, प्रलय करणारें, त्याचप्रमाणें सर्वांची व्यवस्था ठेवणारें, असें मुख्य निमित्तकारण परमात्मा आहे. दुसरें परमेश्वराच्या सृष्टींतून पदार्थ घेऊन अनेक प्रकारचें कार्यान्तर बनविणारा साधारण निमित्तकारण जीव आहे. परमाणु प्रकृति हें संसाराचें उपादान कारण आहे—हिलाच संसार बनविण्याची सामुग्री असें म्हणतात. ही जड असल्यामुळें आपण स्वतः कांहीं बनूं व बिघडूं शकत नाहीं. दुसऱ्यानें हिला बनवावें तशी ही बनते किंवा बिघडते. कोठें कोठें जड पदार्थांच्या निमित्तानें जड पदार्थ बनत जातो किंवा बिघडतोहि, जसें परमेश्वररचित बीज पृथिवीमध्यें पडून त्याला पाणी मिळालें तर तें वाढून त्याचें झाड बनतें, पण अग्नि आदि जडाच्या संयोगानें तेंहि नाश पावतें; पण याचें नियमपूर्वक बनाविणें व बिघडविणें हें परमेश्वर व जीव यांच्या आधीन आहे; जेव्हां एखादी वस्तु बनविली जाते तेव्हां ती बनविण्याला ज्ञान, दर्शन, बल, हात आदि जीं नानाप्रकारचीं साकार व आकाशादि निराकार साधनें लागतात त्याला साधारणकारण म्हणतात. उदाहरणार्थ घडा बनविणारा कुंभार हा निमित्तकारण होय. माती हें उपादानकारण

होय; व दण्डचक्रादि समान्य निमित्त कारणें होत. तसेंच घडा बनविण्यांत व बिघडण्यांत काल, आकाश, प्रकाश, डोळे, हात, ज्ञान, क्रिया, आदि साधारण निमित्त व निमित्तकारणें पण होतात. या तीन कारणांवांचून कोणतीहि वस्तु बनत नाहीं व बिघडत नाहीं. (**प्र०**) आधुनिक वेदान्ती लोकांच्या मतानें परमेश्वर हा जगताचें " **अभिन्ननिमित्तोपादानकारण** " आहे—

यथोर्णनाभिः सृजते गृह्णते च ॥ मुंडको० १।१।७॥

" जसा कोळी दुसरा कोणताहि बाहेरचा पदार्थ न घेतां आपल्याच शरीरांतून तंतू काढून त्याचें जाळें बनवितो व त्यांतच राहून खेळतो, तद्वत् ब्रह्महि आपल्या मधूनच जगताला बनवून, आपणच जगदाकार होऊन त्यांत आपणच क्रीडा करीत असतें." " मी बहुरूप अर्थात् जगदाकार होईन अशी इच्छा व कामना करित करित तें ब्रह्म संकल्पमात्रानेंच सर्व जगद्रूप बनतें. तसेंच—

आदावन्ते च यन्नास्ति वर्तमानेऽपि तत्तथा ॥
गौडपादीयकारिका. (मांडूक्य०) ३१॥

ही मांडूक्य उपनिषदावर कारिका आहे.

" जें प्रथम नसून अंतींहि नसतें तें मध्यकालींहि नाहींच असें समजावें." सृष्टीच्या आरंभीं जगत् नव्हतें व प्रलयामध्यें संसार राहणार नाहीं; म्हणून वर्तमानकालीं सर्व जगत् ब्रह्म आहे असें कां म्हणूं नये?

(**उ०**) जर तुमच्या म्हणण्याप्रमाणें ब्रह्म हें जगाचें उपादान कारण असेल तर ब्रह्म परिणामी व अवस्थान्तरयुक्त विकारी मानावें लागेल; शिवाय आपल्याला माहीत आहेच कीं, उपादानकारणाचे गुणकर्मस्वभाव कार्यामध्यें येतात, त्याप्रमाणें ब्रह्माचे गुण जगतामध्येंहि आले पाहिजेत; जसें.—

कारणगुणपूर्वकः कार्यगुणो दृष्टः ॥ वैशेषि० २।१।२४॥

" उपादानकारणाचे सदृश कार्यामध्यें गुण येत असतात (तसेच गुण त्याच्या कार्यामध्येंहि येतात.)" या नियमाला अनुसरून पाहतां ब्रह्म सच्चिदानंदस्वरूप आहे, पण जगत् कार्यरूपामुळें असत्, जड व आनंदरहित आहे. ब्रह्म **अज** आहे (उत्पन्न न झालेलें आहे) पण जग उत्पन्न झालेलें आहे, ब्रह्म अदृश्य आहे पण जग दृश्य आहे, ब्रह्म अखंड आहे, पण जग खंडरूप आहे; अर्थात् जर पृथिव्यादि कार्य ब्रह्माचेंच बनलें आहे असें मानलें तर पृथिव्यादि कार्याचे जडत्वादि

गुण ब्रह्मामध्येंहि असले पाहिजेत, पृथिवी आदि पदार्थ जसे जड आहेत; तसेंच ब्रह्महि पण जड असलें पाहिजे, किंवा जसें ब्रह्म चेतन आहे तसेंच पृथिव्यादि कार्य पदार्थहि चेतन असले पाहिजेत; पण ज्या अर्थी अशी वस्तुस्थिति नाहीं; त्या अर्थी ब्रह्म हें सृष्टीचें उपादान कारण नव्हे हें खास; व जो तुम्ही कोळ्याचा दृष्टांत दिलात तो तुमच्या मताचा साधक नसून बाधक आहे. जडरूपी कोळ्याच्या शरीरामध्यें असणारा जीवात्मा हा निमित्त कारण असून त्याचें जड शरीर हें जड तंतूंच्या उत्पत्तीला उपादान कारण आहे; व कोळी आपल्या शरीरांतून सूत काढूं शकतो व दुसरा कोणताहि प्राणी स्वशरीरांतून तंतू काढूं शकत नाहीं हा एक परमेश्वराच्या अद्भुत रचनेचा प्रभाव आहे कोळ्याप्रमाणें व्यापक ब्रह्महि आपणामधील व्याप्य प्रकृति आणि परमाणु कारणापासून स्थूल जगताला बनवून, बाह्यभाग स्थूलरूपी करून, आपण त्याचें व्यापक असून साक्षीभूत होऊन आनंदमय राहिलेलें आहे; आतां परमेश्वरानें ईक्षण (दर्शन, विचार व कामना) केलें कीं "मी सर्व जगताला बनवून प्रसिद्ध व्हावें," अशीं जीं उपनिषद्वाक्यें आहेत, त्यांचें विवरण असें आहे कीं, जेव्हां जग उत्पन्न होतें, तेव्हांच जीवांचे विचार, ज्ञान, ध्यान, उपदेश, श्रवण इत्यादिकांमध्यें परमेश्वर प्रसिद्ध होतो व तसाच पुष्कळ स्थूल पदार्थांसह तो वर्तमान आहे असें कळतें, पण जेव्हां प्रलय होतो, तेव्हां परमेश्वर व मुक्तजीव यांशिवाय परमेश्वराला जाणणारा कोणीहि असत नाहीं. आतां मांडूक्य उपनिषदावरील जी कारिका आहे तीहि भ्रामक आहे; कारण कीं प्रलयामध्यें जग प्रसिद्ध नव्हतें, आणि सृष्टीच्या अंतापर्यंत म्हणजे प्रलयाच्या आरंभापासून पुनः सृष्टि उत्पन्न होईपर्यंत हें जगताचें कारण सूक्ष्म होऊन अप्रसिद्ध राहतें. तसेंचः—

तमं आसीत्तमसा गूढमग्रे ॥ ऋ० मं० १०।१२९।३ ॥

आसीदिदं तमो भूतमप्रज्ञातमलक्षणम् ॥ अप्रतर्क्यमविज्ञेयं प्रसुप्तमिव सर्वतः ॥ मनु० १।५ ॥

"हें सर्व जग पूर्वी प्रलयकालीं अंधकारानें आच्छादित होतें. प्रलयाला आरंभ झाल्यानंतरहि हींच स्थिति असते. या अवस्थेमध्यें तें कोणालाहि जाणण्यास अशक्य, अतर्क्य, प्रसिद्ध चिन्हांनीं युक्त नसल्यामुळें इंद्रियाला न समजणारें असें असतें प्रलयकालीं असें असलें तरी तें वर्तमानकालीं समजतें, दिसतें व प्रत्ययाला येतें अर्थात् तें यावेळीं प्रसिद्ध चिन्हांनीं युक्त जाणण्यास योग्य असें होतें आणि त्याची यथावत् *उपलब्धि पण होत असते; असें असतां त्या कारिकेमध्यें वर्तमानकालींहि जगाचा

*बुद्धि, उपलब्धि व ज्ञान यांत अर्थान्तर नाहीं [बुद्धिरुपलब्धिर्ज्ञानमित्यनर्थान्तरम्] न्याय १।१५.

अभाव लिहिला आहे तो सर्वथैव अप्रमाण आहे, कारण जें ज्ञात्याला प्रमाणांनीं जाणतां येतें व अनुभवाला येतें तें नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. (प्र०) जग बनविण्यामध्यें परमेश्वराचा हेतु काय? (उ०) याचा हेतु आम्ही सांगतों; पण जग न बनाविण्यामध्यें परमेश्वराचा हेतु कांहीं सांगूं शकाल काय? (प्र०) होय. जर त्यानें जग बनविलें नसतें तर तो सदैव आनंदामध्यें निमग्न राहूं शकता व जीवांनां पण सुखदुःखें प्राप्त झालीं नसतीं. (उ०) हें तुम्ही आळशी व दरिद्रि लोकांप्रमाणें बोललांत; पुरुषार्थी लोक असें कधींहि बोलणार नाहींत. प्रलयकालीं जीवांनां सुख किंवा दुःख असतें काय? सृष्टीच्या सुखदुःखाची तुलना केली तर दुःखापेक्षां सुखच कितीतरी पटीनें जास्त आहे पहा. बरेच पवित्रात्मे जीव मुक्तीचें साधन करून मोक्षाच्या आनंदाला प्राप्त झालेले असतात; पण प्रलयामध्यें सुषुप्तावस्थेप्रमाणेंच कांहीं न करतां असतात. तात्पर्य आळसामध्यें सुख नसून पुरुषार्थामध्यें सुख आहे. जर परमेश्वरानें जग उत्पन्न केलें नसतें तर पूर्वसृष्टींतील जीवांच्या पापपुण्यानुरूप कर्मांचीं त्यांनां फलें कशीं देतां आलीं असतीं व जीव कर्मफल कसें भोगूं शकता? म्हणून दयालु परमेश्वरानें सृष्टि उत्पन्न करून जीवांनां उन्नतावस्थेला पोंचण्यास एक साधन करून दिलें आहे. तुम्हांला कोणी विचारिलें कीं, या शरीराला डोळे असण्याचें काय प्रयोजन आहे? तर तुम्ही हेंच सांगाल कीं, पाहण्याकरतां त्यांची आवश्यकता आहे, तद्वत् परमेश्वरामध्यें जगद्रचने संबंधानें जें विज्ञान–बल-क्रिया आहे, त्याचें सार्थक जग उत्पन्न केल्यावांचून होणार आहे काय? त्या परमेश्वराच्या गुणांची सार्थकता सृष्टि उत्पन्न केल्यानेंच होणारी आहे; यापेक्षां तुम्हांला दुसरें कांहीं म्हणतां येणारें नाहीं. परमात्म्याचे न्याय, धारण, दया, आदि गुण जगदुत्पत्ति केल्यानेंच सार्थक होणार आहेत. त्याचें अनंत सामर्थ्य जगाची उत्पत्ति; स्थिति, प्रलय व व्यवस्था करण्यानेंच सफल होणारें आहे; अन्यथा नाहीं. जसा डोळ्यांचा स्वाभाविक गुण पाहणें हा आहे, तसाच परमेश्वराचा स्वाभाविक गुण जगताची उत्पत्ति करून सर्व जीवांनां असंख्य पदार्थ देऊन परोपकार करणें हा आहे. (प्र०) ठीक आहे. आतां बीज आधीं कीं वृक्ष आधीं तें सांगा पाहूं? (उ०) बीज आधीं; बीज, हेतु, निदान, निमित्त, कारण हे शब्द एकाच अर्थीचे आहेत. कारणापासून कार्य होतें; म्हणून कारण किंवा बीज हें आधीं व वृक्ष किंवा कार्य नंतर असें समजावें. (प्र०) जर परमेश्वर सर्वशक्तिमान् आहे तर तो जीवाला व सृष्टिच्या कारणालाहि उत्पन्न करूं शकेल व जर त्याला उत्पन्न करतां येत नसेल तर तो सर्वशक्तिमान् तरी कसा? (उ०) सर्वशक्तिमान् शब्दाचा अर्थ आम्ही पूर्वी सांगितलाच आहे. असंभव गोष्टी करणाऱ्याला तुम्ही सर्वशक्तिमान् समजतां काय? जर असंभव गोष्टी तो करूं शकेल म्हणजे कारणावांचून कार्य करूं शकतो तर कारणाशिवाय दुसऱ्या ईश्वराला

उत्पन्न करणें, स्वतः मरणें, व जड, दुःखी, अन्यायकारी, अपवित्र आणि कुकर्मी होणें याहि गोष्टी ईश्वराच्या ठिकाणीं संभवतील काय? वास्तविक पाहिलें असतां अग्नींतील उष्णता, पाण्यांतील शीतत्व, पृथिवींतील जडत्व इत्यादि स्वाभाविक गुणवान् पदार्थांनां परमेश्वरहि विपरीत करूं शकत नाहीं; कारण ईश्वराचे नियम सत्य व पूर्ण आहेत म्हणून तो आपल्या नियमांचें परिवर्तन करूं शकत नाहीं. तात्पर्य, सर्व शक्तिमान् पदाचा अर्थ नियमां विरुद्ध आचरण करणारा असा नसून "दुसऱ्या कोणाच्याहि सहाय्यावांचून आपलीं सर्व कार्यें तो पूर्णपणें करूं शकतो" असा आहे. (प्र०) ईश्वर साकार आहे कीं निराकार? जर निराकार आहे तर हस्तपादादि साधनांशिवाय तो जग कसें उत्पन्न करूं शकेल? व जर साकार आहे तर त्याचें काम निर्दोष आहेच. (उ०) ईश्वर निराकार आहे. जो साकार अर्थात् शरीरयुक्त आहे तो ईश्वरच नव्हे, कारण परिमितशक्तियुक्त, देशकालवस्तुपरिछिन्न, क्षुधा, तृषा, छेदन, भेदन, शीतोष्ण, ज्वर, पीडादि शारीरिक दुःखांसहित तो होणार. जीवाचे हे गुण आहेत जीव मात्र या पूर्वोक्त गुणांनीं युक्त असतो, तसा ईश्वर कधींहि होत नाहीं. तुम्ही व आम्ही हे सर्व शरीरधारी आहोंत; म्हणून त्रसरेणु, अणु, परमाणु, आणि प्रकृति यावर आमचा ताबा नाहीं. स्थूल देहधारी जे जे असतील त्यांचा या सूक्ष्मपदार्थांवर ताबा असूं शकत नाहीं. जर परमेश्वरहि देहधारी झाला तर त्याचीहि स्थिति अशीच होईल. परमेश्वर भौक्तिक इंद्रिय गोलक व हस्तपादादि अवयवरहित आहे परंतु त्याची शक्ति, बल, पराक्रम अनन्त आहे, त्यामुळें जीवांकडून किंवा *प्रकृतीकडून न होणारें असें सर्व काम तो करूं शकतो. तो प्रकृतीपेक्षां सूक्ष्म असून तीमध्यें व्यापून राहिलेला आहे व म्हणूनच त्यांनां पकडून तो जगदाकार करतो. (प्र०) अहो! मनुष्याचे आईबाप साकार आहेत म्हणून त्यांची संतति ही साकार होते, जर ते निराकार असते तर संततिहि निराकार झाली असती; तद्वतच परमेश्वर निराकार असल्यानें त्यानें बनविलेलें जगत् निराकारच असलें पाहिजे. असें असतां तें साकार कसें? (उ०) हा तुमचा प्रश्न अज्ञानी मुलाप्रमाणें आहे. कारण मागें म्हटलें आहे कीं, परमेश्वर हा जगाचा उपा-

---

* परा व अपरा असे परमात्म प्रकृतिचे दोन भेद आहेत भू, जल, अग्नि, वायु, आकाश, मन, बुद्धि, अहंकार असें एक प्रकृत्यष्टक आहे; ही अपरा प्रकृति व जीवरूप असून जिनें हें जगत् धरलेलें आहे ती परा प्रकृति होय.

[भूमिरापोऽनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च ॥
अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥ ४ ॥
अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम् ॥
जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥ ५ ॥] (गी. अ. ७)

दोन कारण नसून निमित्त कारण आहे. प्रकृति व परमाणु स्थूल आहेत व ते जगाचे उपादान कारण आहेत. ते स्थूल कारण सर्वथा निराकार नाहींत, तर ते परमेश्वराहून स्थूल व अन्यकार्य जगतापेक्षां सूक्ष्म आकारवान् आहेत; म्हणून साकारापासून साकार बनतें असें समजावें. (प्र०) परमेश्वर कारणावांचून कार्याला उत्पन्न करूं शकत नाहीं काय ? (उ०) नाहीं, कारण अभावाचा भाव होऊं शकत नाहीं म्हणजे जें वर्तमान नाहीं त्याचा भाव वर्तमान होणें सर्वथा असंभव आहे. एखाद्या गप्पा मारणारानें म्हटलें कीं, मी वंध्यापुत्राचा विवाह पाहिला, त्या दोघांनीं नरशृंगाचें धनुष्य घेतलें होतें, खपुष्पाची माळ घातली होती, ते मृगजळाचें स्नान करीत होते, गंधर्व नगरामध्यें राहत होते, तेथें मेघावांचून वृष्टि व पृथ्वीवांचून अन्नाची उत्पत्ति होत असते. या सर्व गोष्टी जशा असंभवनीय आहेत त्याचप्रमाणें कारणावांचून कार्य होणें हेंहि असंभवनीय आहे. तसेंच माझे मातापितर नसून मी उत्पन्न झालों, माझ्या तोंडांत जिव्हा नसून मी बोलतों, बिळामध्यें सर्प नव्हता पण त्यांतून बाहेर निघाला, मी कोठेंहि नव्हतों व हेहि कोठें नव्हते व आम्ही सर्वजण येथें आलों या सर्व गोष्टी प्रमत्तगीताप्रमाणें अर्थात् मूर्ख लोकांच्या भाषणाप्रमाणेंच आहेत. (प्र०) जर कारणावांचून कार्य होत नाहीं तर कारणाचें कारण कोणतें ? (उ०) हें आपण लक्षांत ठेवा कीं, जें केवल कारणरूप आहे तें कोणाचेंहि कार्य बनत नसतें. जें एकाचें कार्य बनतें व दुसऱ्याचें कारण असतें तें दुसरें होय, (तें मूल कारण नव्हे.) जसें घराचें पृथिवी हें कारण आहे; पण तेंच जलाचें कार्य होतें; पण जी आदिकारण प्रकृति आहे, ती अनादि आहे. पहा—

मूले मूलाभावादमूलं मूलम् ॥ सांख्य० १।६७ ॥

मूळाचें मूळ नसतें म्हणजे कारणाचें कारण नसतें, म्हणून अकारण असें जें सर्व कार्याचें कारण असेल तेंच मूल *कारण होय. कोणत्याहि कार्याचा आरंभ होण्याचे पूर्वी तीन कारणांची आवश्यकता असते. जसें वस्त्र बनविण्याकरतां प्रथमतः कोष्टी, सूत व नलिकादि पाहिजेत, तरच वस्त्र बनेल, तसेंच जगताची उत्पत्ति होण्याचे पूर्वी परमेश्वर, प्रकृति, काल आणि आकाश, तसेंच अनादि जीवांचें अस्तित्व, इतक्यांची आवश्यकता आहे; यामुळें या जगाची उत्पत्ति होते, यांपैकीं जर एक नसेल तर जग बनणार नाहीं. या ठिकाणीं कांहीं **नास्तिक** लोकांच्या शंका व तर्क आहेत, त्यांचाहि विचार केला पाहिजे:—

(१) शून्यं तत्त्वं भावो विनश्यति वस्तुधर्मत्वाद्विनाशस्य ॥
सांख्य० ।१।४४॥

*हेंच अविकारी कारण होय; दुसरें कारण विकारी आहे.

(प्र०) शून्य हाच काय तो पदार्थ आहे. सृष्टीच्या पूर्वी शून्य होतें व अंतींहि तें शून्यच होणार. कारण भावाचा अभाव होऊन अर्थात् वर्तमान पदार्थांचा अभाव होऊन सर्व शून्यच होणार आहे. (उ०) आकाश अवकाश, अदृश्य व बिंदू यांना शून्य असें म्हणतात. शून्य हा जड पदार्थ आहे, या शून्यामध्यें सर्व पदार्थ अदृश्य राहत असतात. जसें एका बिंदूची रेषा, व रेषांच्या योगानें वर्तुलादि आकार होत असल्यानें भूमि पर्वतादि ईश्वराच्या रचनेनें बनत असतात; तसेंच शून्याला जाणणारा शून्यच होऊं शकत नाहीं.

(२) अभावाद्भावोत्पत्तिर्नानुपमृद्य प्रादुर्भावात् ॥

न्याय० ४।१।१४॥

(प्र०) दुसरे नास्तिक म्हणतात कीं, अभावापासून भावाची उत्पत्ति होते. बीजाचें मर्दन केल्यावांचून अंकुर येत नाहीं व बीज फोडून पाहिलें तर त्यांत अंकुर नसतो. बीजांत अंकुर नसतां अंकुराची उत्पत्ति होते यावरून उघड होतें कीं, अभावापासून भावाची उत्पत्ति होते. (उ०) जो बीजाचा उपमर्द करीत आहे तो प्रथम बीजामध्येंच होता. जर नसता तर उत्पन्नहि झाला नसता व उपमर्दहि करूं शकला नसता.

(३) ईश्वरः कारणं पुरुषकर्माफल्यदर्शनात् ॥

न्या. ४।१।२१॥

(प्र०) तिसरा नास्तिक म्हणतो कीं, मनुष्य जशीं जशीं कर्में करतो तशीं तशीं सर्व कर्मांचीं फलें त्याला प्राप्त होत नाहींत. असें आढळतें कीं, कांहीं कर्मांचीं फलें कर्त्याला मिळतच नाहींत; अर्थात् कित्येक कर्में निष्फल होतात; यावरून उघड होतें कीं, कर्मांचें फल देणें पूर्णपणें ईश्वराधीन आहे. त्याला वाटलें तर तो फल देतो नाहींतर नाहीं. तात्पर्य, फल देणें ईश्वराधीन आहे. (उ०) जर तुम्ही म्हणतां त्याप्रमाणें फल देणें ईश्वराधीन असेल तर कर्म न करतां तो कां फल देत नाहीं? यावरून हें समजावयाचें कीं, ईश्वर स्वतंत्रपणानें मनुष्यांना फल देत नाहीं तर जीव जसें कर्म करतो तसेंच त्याला ईश्वर फल देतो; त्यामध्यें यत्किंचितहि कमी जास्तीपणा तो करीत नाहीं असेंच विचाराअंतीं सर्वांस वाटेल.

(४) अनिमित्ततो भावोत्पत्तिः कण्टकतैक्ष्ण्यादिदर्शनात् ॥

न्या. ४।१।२२॥

(प्र०) चवथा नास्तिक म्हणतो कीं, निमित्तावांचून पदार्थांची उत्पत्ति होते. बाभळ आदि पुष्कळ झाडांनां आपोआपच तीक्ष्ण कांटे उत्पन्न होतात हें आपण पाहतों. यावरून असें दिसतें कीं, जेव्हां सृष्टीचा आरंभ होतो तेव्हां तेव्हां पण निमित्तावांचून शरीरादि पदार्थ उत्पन्न होतात. ज्यापासून जे पदार्थ उत्पन्न होतात तेंच त्यांचें निमित्त होय. कांटेच्या झाडांनांच कांटे उत्पन्न होतात, इतरांना नाहीं. अर्थात् निमित्तावांचून कांहींहि होऊं शकत नाहीं.

(५) सर्वमनित्यमुत्पत्तिविनाशधर्मकत्वात् ॥ न्या. ४।१।२९॥

(प्र०) पांचवा नास्तिक म्हणतो कीं, सर्व पदार्थ उत्पत्ति व विनाशवान् असल्यामुळें अनित्य आहेत. (आधुनिक वेदान्ती या पंचम कोटींतील आहेत.) त्यांच्या मतें:—

श्लोकार्धेन प्रवक्ष्यामि यदुक्तं ग्रंथकोटिभिः ॥
ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः ॥

"ब्रह्म सत्य, जग मिथ्या व जीव व ब्रह्मामध्यें भेद मुळींच नाहीं." (उ०) जर सर्वांची नित्यता नित्य असेल तर सर्व अनित्य होऊं शकणार नाहीं. (प्र०) सर्वांची नित्यताहि अनित्यच आहे. जसा अग्नि काष्ठांना जाळून स्वयंहि नाश पावतो. (उ०) जें प्रत्यक्षादि प्रमाणांनीं अनुभवाला येतें, तें वर्तमानसमयींहि अनित्य मानणें सर्वथैव असंबद्ध आहे. परमसूक्ष्म कारणालाहि अनित्य म्हणतां यावयाचें नाहीं. ब्रह्म सत्य आहे व त्यापासून (तुमच्या मतें) जग उत्पन्न झालें आहे, त्या अर्थीं त्या सत्य ब्रह्माचें हें जगद्रूपी कार्य कधींहि असत्य असूं शकणार नाहीं. स्वप्नाप्रमाणें किंवा रज्जुसर्पाप्रमाणें तें काल्पनिकहि मानतां येत नाहीं, कारण कल्पना हा गुण कोणाचा आहे ? द्रव्य व गुण हे कधींहि पृथक् पृथक् राहूं शकत नाहींत. जर कल्पनेचा कर्ता नित्य आहे तर त्याची कल्पनाहि नित्यच असली पाहिजे. कल्पना अनित्य ठरविली तर कर्ताहि अनित्य होईल. न पाहिलेल्या व न ऐकलेल्या पदार्थांविषयीं स्वप्न कधींहि पडत नाहीं. जागृत् अवस्थेमध्यें जगांतील सत्य पदार्थ पाहून जे संस्कार आत्म्यावर होतात व त्यांमुळें ज्या वासना बनतात, त्यांचेंच स्वप्नांमध्यें प्रत्यक्ष दर्शन होतें. एकाला सुषुप्ति अवस्था प्राप्त झाली असतां त्याला त्या वेळीं जरी बाह्य पदार्थांचें ज्ञान नसलें तरी त्यावेळीं बाह्य पदार्थांचा अभाव असतो असें म्हणतां येणार नाहीं; त्यावेळीं बाह्य पदार्थ असतातच. त्याचप्रमाणें वर्तमानकालीं दृश्यरूपानें सर्व पदार्थ आहेत व प्रलयकालीं कारणरूपानें ते

सर्व पदार्थ असतात. जर संस्कारावांचून स्वप्न होत असतें तर जन्मांधाला रूपाचें स्वप्न पडलें असतें, पण तसें होत नाहीं. कारण त्याच्या आत्म्यावर रूपाचे संस्कार झालेले नसतात. स्वप्नामध्यें संस्कार व वासना यांचाच काय तो संबंध असतो बाहेरचे पदार्थ नेहेमीं असतातच. (प्र०) ज्याप्रमाणें जागृतींतील पदार्थ स्वप्नामध्यें व या दोनहि स्थितींतील पदार्थ सुषुप्तिमध्यें अनित्य* होतात, त्याचप्रमाणें जागृतींतील पदार्थहि स्वप्नवत् कां मानूं नये? (उ०) असें मानतां येत नाहीं, कारण स्वप्न व सुषुप्ति यांमध्यें बाह्य पदार्थांविषयीं ज्ञान नसतें, पण त्यामुळें बाह्य पदार्थांचा अभाव असतो असें नाहीं. किंवा एकाच्या पाठीमागचे पदार्थ त्याला दिसत नसतात; म्हणून ते नाहींत असें म्हणतां येत नाहीं. तद्वतच स्वप्न व सुषुप्तिविषयीं जाणावें. तात्पर्य ब्रह्म, जीव व प्रकृति (जगाचें उपादान कारण) हे तीन पदार्थ अनादि व नित्य आहेत हेंच खरें आहे.

(६) सर्वं नित्यं पञ्चभूतनित्यत्वात् ॥ न्या० ४।१।२९॥

(प्र०) सहावा नास्तिक म्हणतो कीं, पंचभूतें नित्य असल्यामुळें सर्व जगहि नित्य आहे. (उ०) हें सत्य नाहीं कारण ज्या पदार्थांच्या उत्पत्तीचें व विनाशाचें कारण पाहतों, ते जर नित्य म्हटले तर सर्व स्थूल जगत् व शरीर आणि घटपटादि पदार्थ, यांनां उत्पन्न व नाश होतांना पहातों; तरी सुद्धां नित्य म्हणावें लागेल पण वास्तविक तसें नाहीं, त्यांना कार्यस्थितींत नित्य मानतां यावयाचें नाहीं. अर्थात् ते अनित्य (बदलत जाणारे) आहेत.

(७) सर्वं पृथक् भावलक्षणपृथक्त्वात् ॥ न्या० ४।१।३४॥

(प्र०) सातवा नास्तिक म्हणतो कीं, सर्व पदार्थ पृथक् पृथक् आहेत. ज्या ज्या पदार्थाला आपण पाहतों त्यांत दुसरा पदार्थ कोणताहि नाहीं. (उ०) अवयवांमध्यें अवयवी, वर्तमानकाल, आकाश, परमात्मा आणि जाति पृथक् पृथक् पदार्थसमूहांमध्यें एक एक आहेत. यांपासून कोणताच पदार्थ पृथक् राहूं शकत नाहीं; यासाठीं सर्व पदार्थ पृथक् नाहींत पण स्वरूपानें पृथक् आहेत व पृथक् पृथक् पदार्थांमध्यें एक पदार्थहि आहे.

(८) सर्वमभावो भावेष्वितरेतराभावसिद्धेः ॥ न्या० ४।१।३७॥

---

* वेदांतांत मिथ्या हा शब्द अभाव या अर्थी वापरण्यांत येतो; पण अनित्य याचा अर्थ तसा नाहीं; हा भेद लक्षांत घेतला असतां " मिथ्या व अनित्य " या शब्दांच्या अर्थांचा घोंटाळा होणार नाहीं.

(प्र०) आठवा नास्तिक म्हणतो कीं, सर्व पदार्थांमध्यें इतरेतर पदार्थांचा अभाव सिद्ध होत असल्यामुळें सर्वच अभावमय आहे. गाईमध्यें घोडेपणा नाहीं व घोड्यामध्यें गायपणा नाहीं म्हणून दोघेहि नाहींत. (उ०) हें तर्कशास्त्र खोटें आहे. अहो, सर्व पदार्थांमध्यें इतरेतरभाव जरी असला तरी त्यांत स्वस्वभाव आहेच. गाईमध्यें जरी घोडेपणा नसला तरी गाईंत गायपणा व घोड्यांत घोडेपणा आहेच. तात्पर्य सर्व पदार्थांतील स्वस्वभावामुळें सर्व पदार्थ आहेतच. जर पदार्थांचा अभाव नसेल तर त्यांमध्यें इतरेतरभाव तरी कसा संभवणार ? नववा नास्तिक म्हणतो कीं, (प्र०) स्वभावामुळें जगाची उत्पत्ति झाली आहे. पाणी व अन्न एकत्र कुजूं लागलें म्हणजे त्यांत किडे उत्पन्न होतात. बीज, पृथिवी व जल यांच्या संयोगानें तृण वृक्षादि व पाषाणादि उत्पन्न होतात. समुद्रावर वायूच्या योगानें लाटा व लाटांमुळें समुद्रफेण उत्पन्न होतो. हळद, चुना व लिंबाचा रस एकत्र मिळाल्यानें लालरंग उत्पन्न होतो. याचप्रमाणें हें जग सर्व तत्वांच्या स्वाभाविक गुणांमुळेंच उत्पन्न होतें; त्याला बनविणारा कोणीहि नाहीं. (उ०) जर केवळ स्वभावाच्या योगानेंच जगाची उत्पत्ति होईल तर केव्हांहि त्याचा विनाश होणार नाहीं किंवा विनाश जर स्वभावानेंच होत असेल तर उत्पत्तिहि होणार नाहीं. जर उत्पत्ति व विनाश हे दोनहि स्वभाव सर्व पदार्थांत आहेत असें मानलें तर उत्पत्तिविनाशांची व्यवस्था कधींहि होणार नाहीं; म्हणजे उत्पत्ति व विनाश होणार नाहींत. जर दुसऱ्या निमित्तानें उत्पत्ति व विनाश होतात असें मानलें तर हें निमित्त त्या पदार्थांहून निराळें मानावें लागेल; जर स्वभावामुळेंच उत्पत्ति व विनाश होतात तर विशिष्ट समयींच विशिष्ट पदार्थांची उत्पत्ति व विनाश कसा होईल? यांची व्यवस्था करणारें तत्व कोणतें ? जर स्वभावामुळें आपोआप सर्व होतें तर या पृथिवीजवळ दुसरे चंद्रसूर्यादि गोल कां उत्पन्न होत नाहींत ? तात्पर्य या पदार्थांच्या स्वभावांचें नियमन करणारा कोणीतरी असलाच पाहिजे. ज्याच्यायोगानें जें जें उत्पन्न होतें तें सर्व ईश्वरानें उत्पन्न केल्यामुळेंच होय. बीज, अन्न, जल, पृथिवी यांच्या संयोगानें गवत, वृक्ष, कृमि वगैरे उत्पन्न होतात. हे ईश्वरनिर्मित पदार्थ नसते तर झाले नसते. हळद, चुना, व लिंबाचा रस निरनिराळ्या ठिकाणाहून येऊन आपोआप एकत्र होत नाहींत; ते कोणीतरी एकत्र करावे लागतात. ते यथायोग्य प्रमाणांमध्यें एकमेकांत मिसळले तरच लाल रंग होतो, प्रमाणांत कमजास्त झाल्यानें होत नाहीं; त्याचप्रमाणें प्रकृति परमाणूंचें ज्ञान व युक्ति यांनां परमेश्वरानें मिळविल्यावांचून जड पदार्थ स्वतः कोणत्याच कार्याच्या सिद्धीकारतां विशेष पदार्थ बनवूं शकत नाहींत, एवढ्याकरितां स्वभावादिकांनीं सृष्टि होत नसून परमेश्वराच्या रचनेनेंच होते. (प्र०) या सृष्टीचा कोणीहि कर्ता नव्हता, नाहीं व असणारहि नाहीं, कारण ती अनादि कालापासून अशीच आहे. ही केव्हांहि उत्पन्न झाली नाहीं व हिचा विनाशहि केव्हां होणार नाहीं. (उ०)

कर्त्यावांचून कोणतीहि क्रिया किंवा कोणताहि पदार्थ उत्पन्न होऊं शकत नाहीं. पृथिव्यादि पदार्थांमध्यें संयोगविशेषाच्या योगानें जी विशेष रचना दिसते ती केव्हांहि अनादि होणार नाहीं, शिवाय जें संयोगापासून बनतें तें संयोग होण्यापूर्वी असूं शकत नाहीं व वियोग झाल्यावरहि राहूं शकणार नाहीं; जर तुम्ही हें अप्रमाण मानीत असाल तर प्रत्यक्ष अनुभव घेऊन पहा. पाषाण, हिरा किंवा पोलाद यांचे तुकडे तुकडे केले, वितळविलें किंवा भस्म केलें, तर आपणास असें आढळून येईल कीं हे पदार्थ बारीकबारीक परमाणु एकत्र होऊन झाले आहेत; ज्या अर्थी हे पृथक् पृथक् परमाणु मिळून झालेले आहेत; त्याअर्थी ते कालान्तरानें अवश्य सुटे झाले पाहिजेत. अर्थात् अणूंच्या संयोगानें यांची उत्पत्ति व वियोगानें त्यांचा नाश होणारा आहे. तात्पर्य अशी संयोगापासून उत्पन्न होणारी सृष्टि याच स्थितींत अनादि कशी असूं शकेल? (प्र०) आपलें म्हणणें खरें मानलें तरी अनादि ईश्वर मानण्याची आवश्यकता राहत नाहीं, कारण योगाभ्यासानें अणिमादि ऐश्वर्य ज्याला प्राप्त झालें आहे व जो सर्वज्ञत्वादि गुणयुक्त केवल ज्ञानी झाला आहे त्या जीवालाच ईश्वर म्हणतात. (उ०) जर अनादि ईश्वर जगाचा स्रष्टा नसेल तर साधनांच्या योगानें अभ्यास करून सिद्ध होणाऱ्या जीवाला आधार जीवनरूप जगत् व शरीर, इंद्रियें व त्यांचे गोलक हीं साधनें कशीं प्राप्त झालीं असतीं? यावांचून जीव आपलें साधन करूं शकत नाहीं; जर हीं साधनें त्याला प्राप्त झालीं नसतीं तर तो सिद्ध तरी कसा झाला असता? जीव पाहिजे तसें साधन करून सिद्ध झाला तरी पण अनेक सिद्धियुक्त जी परमेश्वराची अनादि सनातन स्वयंसिद्धि आहे, ती सारखी सिद्धि जीव कधींहि प्राप्त करूं शकणार नाहीं, कारण जीवाचें परमावधिपर्यंत सामर्थ्य वाढलें तरीहि तें ज्ञान व सामर्थ्य परिमितच असणार? तें परमेश्वराच्या अनंत ज्ञान व सामर्थ्याइतकें कसें होईल? पहा आजपर्यंत परमेश्वरीय सृष्टिक्रमाला बदलणारा कोणी झाला नाहीं व पुढें होणारहि नाहीं. उदाहरणार्थ अनादि सिद्ध परमेश्वरानें नेत्र व कान यांच्या ठिकाणीं पाहणें व ऐकणें यांचा निर्बंध केला आहे. त्यांचा व्यतिक्रम आजपर्यंत कोणीहि योगी करूं शकला नाहीं. तात्पर्य योग्याचें सामर्थ्य ईश्वराइतकें होऊं शकत नाहीं. (प्र०) कल्पकल्पान्तरीं ईश्वर सृष्टि निरनिराळी व विलक्षण बनवितो कीं सर्वदा एकसारखीच? (उ०) जशी ही सध्यां आहे तशीच पूर्वीच्या कल्पांत होती व पुढच्यांतहि तशीच होईल. पहा—

सूर्याचंद्रमसौ धाता यथापूर्वमकल्पयत्॥ दिवं च पृथिवीं चान्तरिक्षमथो स्वः॥ ऋ० मं. १०।१९०।३॥

" परमेश्वरानें ज्याप्रमाणें पूर्वीच्या कल्पांत सूर्य, चंद्र, विद्युत्, पृथिवी, अंतरिक्षादि पदार्थ बनविले होते तसेच यामध्येंहि त्यानें बनविलेले आहेत व पुढच्यांतहि असेच करील." परमेश्वराचें काम प्रमादरहित असल्यामुळें नेहेमीं एकसारखेंच असतें. जो अल्पज्ञ असतो व ज्याच्या ज्ञानामध्यें क्षय व वृद्धि होतात त्याच्या कामांमध्यें चूकभूल होत असते. परमेश्वर सर्वज्ञ असल्यामुळें त्याच्या कामांत चूक होत नाहीं. (प्र०) सृष्टीच्या उत्पत्तीविषयीं वेदादिशास्त्रांमध्यें परस्परविरोध आहे तो पहाः—

तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः संभूतः । आकाशाद्वायुः । वायोरग्निः । अग्नेरापः । अद्भ्यः पृथिवी । पृथिव्या ओषधयः । ओषधीभ्योऽन्नम् । अन्नाद्रेतः । रेतसः पुरुषः। स वा एष पुरुषोऽन्नरसमयः ॥ तैत्तिरीयो० ब्रह्मा० अ० १ ॥

"त्या परमेश्वर व प्रकृतीपासून आकाश अवकाश उत्पन्न झाला, (अर्थात् जें कारणरूप द्रव्य सर्वत्र पसरलेलें होतें त्याला एकत्र केलें असतां अवकाश उत्पन्न झाला असें म्हणतात, कारण आकाश हें वास्तविक उत्पन्न झालेलें नाहीं. प्रकृति व परमाणु राहण्याची जागा तेंच आकाश होय). आकाशानंतर वायु, वायूनंतर अग्नि, अग्नीनंतर पाणी, पाण्यानंतर पृथिवी, पृथिवीपासून ओषधि, ओषधींपासून अन्न, अन्नापासून वीर्य व वीर्यापासून पुरुष अर्थात् शरीर उत्पन्न होतें. याठिकाणीं आकाशादिक्रमापासून, छांदोग्यामध्यें अग्नीपासून, ऐतरेयामध्यें जलापासून, वेदांमध्यें कोठें पुरुषापासून, कोठें हिरण्यगर्भापासून, मीमांसेमध्यें कर्मापासून, वैशेषिकामध्यें कालापासून, न्यायामध्यें परमाणूंपासून, योगामध्यें पुरुषार्थापासून, सांख्यामध्यें प्रकृतीपासून, वेदान्तामध्यें ब्रह्मापासून सृष्टि उत्पन्न झाली असें सांगितलें आहे; यांपैकीं कोणतें विधान खरें व कोणतें खोटें आहे बरें ? (उ०) हीं सर्व विधानें खरीं आहेत; यांत असत्य कोणतेंहि नाहीं. जो यांत विपरीतपणा पाहतो तोच असत्य आहे. परमेश्वर हें निमित्तकारण व प्रकृति हें जगाचें उपादानकारण आहे. महाप्रलय झाल्यानंतर जेव्हां जेव्हां सृष्टीची उत्पत्ति होते तेव्हां ती आकाशादि क्रमानें होते. जेव्हां आकाश व वायु यांचा प्रलय होत नाहीं व अग्न्यादिकांचा होतो तेव्हां अग्न्यादिक्रमानें व विद्युदग्नीचाहि नाश होत नाहीं तेव्हां जलाच्या क्रमानें सृष्टीची उत्पत्ति होते. सारांश, ज्या ज्या प्रलयामध्यें जेवढ्यापर्यंत प्रलय होतो तेथून सृष्टीची उत्पत्ति पुढें होते. आतां पुरुष व हिरण्यगर्भ यांपासून सृष्टि झाली असें विधान केलें तर त्यांत कांहींच विसंगतपणा नाहीं; कारण तीं दोन्हीं नांवें परमेश्वराचींच आहेत. (पहा. प्रथम

समुल्लास पृ. ७ पृ. १९) आतां सहा शास्त्रांमध्यें विरोध आहे असें जें आपलें म्हणणें आहे तेंहि अयोग्य आहे कारण एका कार्यांत एकाच ठिकाणीं विरुद्धवाद असेल तर त्याला विरोध असें म्हणतां येईल तसा विरोध या सहा शास्त्रांत नाहीं, कसा तो पहा. (१) मीमांसेमध्यें " असें कोणतेंहि जगांत कार्य नाहीं कीं तें कर्म केल्याशिवाय बनेल;" (२) वैशेषिकामध्यें " वेळावांचून कांहीं होत नाहीं;" (३) न्यायामध्यें " उपादान कारणाच्या अस्तित्वावांचून कांहीं होत नाहीं;" (४) योगामध्यें " विद्या ज्ञान विचार केल्याशिवाय कांहीं होत नाहीं;" (५) सांख्यामध्यें " तत्वांचा मिलाफ झाला नाहीं तर कांहीं होत नाहीं;" व (६) वेदान्तामध्यें " बनविणाऱ्यानें बनविलें नाहीं तर कोणताहि पदार्थ उत्पन्न होऊं शकत नाहीं, असें सांगितलें आहे; या सहा कारणांनीं सृष्टि बनते, यांपैकीं एक एकाची व्याख्या एक एका शास्त्रांत केली आहे, म्हणून त्यांत विरोध मुळींच नाहीं; जसें सहा पुरुषांनीं एक छप्पर उचलून भिंतीवर ठेवावें त्याप्रमाणें सहा शास्त्रकारांनीं मिळून सृष्टिरूप कार्याची व्याख्या पुरी केली आहे, शास्त्रांत विरोध मानणारे अंधपरंपरेनें चालणारांपैकीं आहेत. पांच आंधळे व एक मंद दृष्टि यांनां एकानें हत्ती दाखविला, अर्थात् त्यांपैकीं प्रत्येकाला हत्तीचा एक एक अवयव समजाविला; व जेव्हां हत्ती कसा आहे म्हणून प्रत्येकाला विचारलें तेव्हां-त्यांपैकीं एक एक म्हणाला कीं, खांब, सूप, मुसळ, केरसुणी, चबुतरा व चार खांबांवर म्हशीसारखा असा हत्ती आहे. या आंधळ्यांप्रमाणें सध्यांच्या पढिकांची स्थिति आहे. नवीन भेदजनक कुकल्पनांनीं भरलेले टीकायुक्त अनार्य ग्रंथ पाठ करून व प्राकृत भाषावाल्यांनीं ऋषिप्रणीत ग्रंथांचें अध्ययन करण्याचें सोडून, नवीन क्षुद्रबुद्धिकल्पित संस्कृत व इतर भाषांचे ग्रंथ शिकून, ते एकमेकांची निंदा करण्यास तत्पर झाले आहेत; व त्यांमींच हा खोटा कलह माजविला आहे. या पंडितंमन्यांचें म्हणणें बुद्धिवानांनीं किंवा सामान्य बुद्धीच्या लोकांनींहि मानणें योग्य नाहीं. त्याचप्रमाणें सध्यांच्या अल्पविद्यायुक्त, स्वार्थी, इंद्रियाराम व आपणास धर्माभिमानी म्हणावें; म्हणून अनेक ढोंगें करणाऱ्या लोकांच्या योगानें दिवसें दिवस मनुष्य मात्राची फारच शोचनीय स्थिति होत चाललेली आहे. (प्र०) अहो ! जर कारणावांचून कार्य होत नाहीं, तर तें कारण तरी कोणत्या कारणापासून उत्पन्न झालें? (उ०) अहो भोळे लोकांनों! तुम्ही हें समजण्याकरतां आपल्या बुद्धीचा कां उपयोग करीत नाहीं? पहा या संसारामध्यें कारण व कार्य असे दोनच पदार्थ आहेत. कारणापासून कार्य होतें. जें कारण असतें तें कोणाचेंहि कार्य नसतें व जें ज्या वेळीं कार्य असतें तें त्याचवेळीं कारण नसतें; जोंपर्यंत मनुष्य सृष्टीला यथावत् जाणत नाहीं तोंपर्यंत त्याला यथावत् ज्ञान प्राप्त होत नाहीं.—

नित्यायाः सत्वरजस्तमसां साम्यावस्थायाः प्रकृतेरुत्पन्नानां परमसूक्ष्माणां पृथग्पृथग्वर्तमानानां तत्त्वपरमाणूनां प्रथमः संयोगारंभः संयोगविशेषादवस्थान्तरस्य स्थूलाकारप्राप्तिः सृष्टिरुच्यते ॥

" अनादि नित्य स्वरूप व सत्व, रज, तम या तीन गुणांच्या एकावस्थारूप प्रकृतीपासून परमसूक्ष्म उत्पन्न झालेले पृथक् पृथक् तत्वावयव विद्यमान आहेत, त्यांचा प्रथमच जो संयोगारंभ आहे; त्या संयोग विशेषाच्या योगानें अवस्थान्तर होत होत दुसऱ्या अवस्थेंत सूक्ष्म स्थूल बनत व बनवीत चाललेली अशी हीं विचित्र रूपानें बनलेली आहे, म्हणूनच हा संसर्ग होत असल्यामुळें हिला सृष्टि असें म्हणतात." जो प्रथम संयोगामध्यें मिळणारा व मिळविणारा पदार्थ आहे. जो संयोगाचा आदि व वियोगाचा अंत म्हणजे ज्याचा विभाग होऊं शकत नाहीं त्याला कारण असें म्हणतात. जें संयोगानंतर बनतें व वियोगानंतर तसें राहत नाहीं त्याला कार्य असें म्हणतात. या कारणाचें कारण, कार्याचें कार्य, कर्त्याचा कर्ता, साधनाचें साधन, व साध्याचें साध्य याप्रमाणें वाद करणारे पहात असून आंधळे व ऐकत असून बहिरे आहेत व जाणत असून मूढ आहेत असें समजावें. ढोळ्याचा ढोळा, दिव्याचा दिवा व सूर्याचा सूर्य होऊं शकतो काय ? जें उत्पन्न झालें तें कार्य व ज्यापासून उत्पन्न झालें तें कारण होय व जो कारणाला कार्य रूप बनवितो तो त्याचा कर्ता होय.

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ॥
उभयोरपि दृष्टोन्तस्त्वनयोस्तत्वदर्शिभिः ॥ गीता. २।१६॥

" असताचा भाव-वर्तमानता व सताचा अभाव-अवर्तमानता कधींहि होत नाहीं हें तत्वदर्शी लोकांनीं निश्चयपूर्वक जाणलें आहे." हा सिद्धांत अन्य पक्षपाती, आग्रही, मलीनात्मा व अविद्वान् लोकांना सहज समजत नाहीं व ते अभावापासून उत्पत्ति होते असें समजतात. जो मनुष्य विद्वान् व सत्संगी नसतो व पुरा विचारहि करीत नाहीं तो सदैव भ्रमजालामध्यें पडलेला असतो. जे पुरुष विद्यांचे सिद्धांताला जाणतात व जाणण्याची खटपट करतात, व इतरांनां निष्कपटीपणानें समजावितात ते पुरुष धन्य होत. अर्थात् जे कारणांवांचून सृष्टीची उत्पत्ति मानतात ते कांहीं जाणत नाहींत. जेव्हां सृष्टि उत्पत्तिचा समय येतो तेव्हां परमेश्वर त्या सूक्ष्म पदार्थांला एकत्र करतो, त्या प्रथमावस्थेंत जें परम-

सूक्ष्म प्रकृतिरूप कारणापासून जें थोडेंसें स्थूल बनतें तें **महत्तत्व** होय नंतर त्यापेक्षां आणखी थोडें स्थूल होतें त्याला अहंकार असें म्हणतात. या अहंकारापासून भिन्न भिन्न पांच सूक्ष्म भूतें, श्रोत्र, त्वचा, नेत्र, जिव्हा, घ्राण हीं पांच ज्ञानेंद्रियें, वाक्, हस्त, पाद, उपस्थ व गुदा हीं पंच कर्मेंद्रियें व अकरावें मन हीं कांहीं स्थूल अशीं उत्पन्न होतात; आणि त्या पंचतन्मात्रापासून अनेक स्थूल अवस्थान्तराला प्राप्त होत होत क्रमानें पंच स्थूल भूतें उत्पन्न होतात; ज्यांनां आम्ही प्रत्यक्ष पाहत आहों; त्यांपासून नाना प्रकारच्या औषधि, वृक्ष आदि; त्यांपासून अन्न, अन्नापासून वीर्य व वीर्यापासून शरीर होतें. सृष्टीच्या प्रारंभीं मैथुनी सृष्टि नव्हती; जेव्हां परमेश्वरानें स्त्रीपुरुषांचीं शरीरें उत्पन्न करून त्यांत जीवांचा संयोग केला त्यानंतर मैथुनी सृष्टि उत्पन्न झाली व तेव्हांपासून ती तशीच आतां चाललेली आहे. पहा. परमेश्वरानें या शरीरामध्यें कशी ज्ञानपूर्वक रचना केली आहे, ज्याला विद्वान् लोक पाहून आश्चर्य चकित होतात. आंत हाडांचे सांधे, त्यांनां नाड्यांचें बंधन, त्यांवर मांसाचें वेष्टन, चामडीचें झांकण, प्लीहा, यकृत्, फुप्फुस, हृदय, पंखा व कला यांची योजना, जीवाचा संयोग, डोक्यांतील अद्भुत मेंदूची रचना, लोमनखादिकांची उत्पत्ति, डोळ्यांची व्यवस्था, इंद्रियांचे मार्गाचा प्रकाश, जीवाच्या जागृत्, स्वप्न, सुषुप्ति या अवस्था व त्या भोगण्यासाठीं स्थानविशेषांची योजना, सर्व धातूंचें वर्गीकरण, इत्यादि कलाकौशल्य स्थापनादि अद्भुत सृष्टीला परमेश्वरावांचून कोण बनवूं शकणार बरें? याशिवाय नाना प्रकारचीं रत्नें व अनेक खनिज द्रव्यें व धातु यांनीं मिश्रित झालेली जमीन, विविध प्रकारच्या वटवृक्षादिकांच्या बीजांमधील अतिसूक्ष्मरचना, असंख्य हरित, श्वेत, पीत, कृष्ण, वर्णयुक्त व चित्रविचित्र पत्रें, पुष्पें, फळें, मूळें निर्माण करून मिष्ट क्षार, तिक्त, कटु, कषाय, अम्लादि विविधरस, सुगंधादि युक्त पत्र, पुष्प, फल, अन्न, कंद, मूलादिकांची विलक्षण रचना, नानाप्रकारच्या कोडों भूगोल व सूर्यचंद्रादि लोक यांची घटना, त्यांचें धारण, भ्रमण व त्यांनां नियमांत ठेवणें, इत्यादि प्रकारची अद्भुत सृष्टि परमेश्वराशिवाय कोण बरें करणार? जेव्हां कोणी मनुष्य या सृष्टिगत पदार्थांकडे पाहतो, तेव्हां त्याला दोन प्रकारचें ज्ञान होतें. एक त्या पदार्थाविषयीं, व दुसरें त्याची रचना पाहून त्याच्या उत्पादकाविषयीं, जर कोणी एकानें सुंदर दागिना अरण्यांत पडलेला पाहिला तर प्रथमतः तो सुवर्णाचा आहे असें ज्ञान झाल्यानंतर तो ज्या बुद्धिमान् कारागिरानें बनविला असेल त्याच्या, त्यांतील नकशी कामावरून त्याची योग्यता कळून येईल; त्याचप्रमाणें या जगांतील नानाप्रकारच्या पदार्थांची रचना विचार करणाऱ्यांनां सृष्टिकर्त्या परमेश्वराची सिद्धता करून देत आहे.—(प्र०) प्रथमतः पृथिव्यादि सृष्टि झाली, कीं मनुष्यादि झाले? (उ०) आधीं पृथिव्यादि सृष्टि झाली; कारण पृथिव्यादिकांशिवाय मनुष्यांची स्थिति व पालन झालें नसतें.

(प्र०) सृष्टीच्या प्रारंभीं एकच मनुष्य उत्पन्न केला होता कीं अनेक ? (उ०) आरंभीं अनेक मनुष्यें उत्पन्न झालीं होतीं, ज्या जीवांचीं कर्में ईश्वरीय सृष्टीमध्यें उत्पन्न होण्यासारखीं होतीं त्यांनांच सृष्टीच्या आरंभीं परमेश्वर जन्म देतो.

" मनुष्या ऋषयश्च ये । ततो मनुष्या अजायन्त ॥" इत्यादि यजुर्वेदीय मंत्रांवरून निश्चित होतें कीं, सृष्टीच्या प्रारंभीं अनेक अर्थात् हजारों मनुष्यें झालीं होतीं ? सृष्टिरचनेकडे पाहूनहि आपणास असेंच वाटतें कीं मनुष्यें हीं अनेक आईबापांचीं लेंकरें आहेत. (प्र०) प्रारंभीं जे मनुष्य झाले ते बाल्य, तरुण व वृद्ध अवस्थांपैकीं कोणत्या अवस्थेमध्यें झाले ? कीं तीनहि अवस्थेमध्यें ? (उ०) युवावस्थेमध्यें* उत्पन्न झाले. बालक झाले असते तर त्यांचें पालन करण्यास दुसऱ्या माणसांची गरज लागली असती व वृद्धावस्थेंत झाले असते तर मैथुनी सृष्टि सुरू झालीं नसती. (प्र०) सृष्टीचा प्रारंभ कधीं झालेला आहे कीं नाहीं ? (उ०) ज्याप्रमाणें दिवसाच्या पूर्वी रात्र व रात्रीच्या पूर्वी दिवस हा क्रम सारखा चाललेला आहे, त्याचप्रमाणें सृष्टीच्यापूर्वी प्रलय व प्रलयाच्यापूर्वी सृष्टि, तसेंच सृष्टीनंतर प्रलय व प्रलयानंतर सृष्टि असें हें अनादि कालापासून चक्र चालत आलें आहे, त्याचा आदि किंवा अंत नाहीं; पण जसा दिवस रात्रीचा आरंभ व अंत नजरेस पडतो त्याचप्रमाणें सृष्टीचा व प्रलयाचा आदि व अंत होत असतो. कारण कीं, जसे परमात्मा, जीव व जगताचें कारण हे तीन पदार्थ स्वरूपतः अनादि आहेत, त्याचप्रमाणें जगताची उत्पत्ति, स्थिति व प्रलय हींहि

---

* हा कल्प सुरू झाल्यावर १९०६४००० इतकीं वर्षें गेल्यानंतर रवि, चंद्र, मंगळ, इत्यादि ग्रह, सर्व अश्विनी नक्षत्राचे आरंभीं होते, तेव्हां या चालू सृष्टीस आरंभ झाला असें म्हटलें आहे; वास्तविक सृष्टीचा आरंभ होऊन १९७२९४९००५ इतकीं वर्षें झालीं (पहा वैदिक धर्मस्वरूप पृ. १३) तथापि सृष्टीची युवावस्था म्हणजे सुव्यवस्थित सृष्टिव्यवहार १७०६४००० इतकीं वर्षें लोटल्यानंतर सुरू झालेला आहे; व तो गणितशास्त्रानें बिनचुक सिद्ध करून दाखविता येतो; त्याचप्रमाणें स्त्रीपुरुष शक्तीनीं मनुष्य बीजें बनवून रजाच्या आवरणांत मनुष्य शरीरें उत्पन्न होऊन त्यामध्येंच तीं युवावस्थेपर्यंत समाधि दशेंत राहून नंतर सृष्टींत व्यवहार करूं लागलीं म्हणून सृष्टि युवावस्थेंत झाली-असें म्हटलें आहे. पहा—

ये देवा साध्या ऋषयश्च यमयतो जातं तम्—

" सर्ववित् व हस्तकमलवत् सृष्टि रचनेच्या तत्वाला जाणणारे व वेदमंत्रांचा ज्यांना साक्षात्कार झालेला आहे, अशीं मनुष्यें पूर्व सृष्टींत झालीं " या प्रकारच्या स्थितीला पावलेलीं मनुष्यें बाल्यावस्थेंत होणें असंभवनीय होय पूर्व सृष्टींत परमात्म्याव्यांतून गुरु नाहीं व परमात्म गुरूकडून ज्ञान घेणें हें समाधि दशेंतच संभवनीय आहे; म्हणून जेव्हां ज्ञान व शरीर यांनीं समाधि लावण्यास योग्य अशींच माणसें झालीं; तेव्हांपासून मनुष्यव्यवहार या सृष्टींत होऊं लागला; याच अर्थानें वर यौवनदशेंत मनुष्यें झालीं असें म्हटलें आहे.

प्रवाहरूपानें अनादि आहेत. नदीचा प्रवाह जसा केव्हां सुकून जातो, केव्हां दिसत नाहीं, वृष्टिकालामध्यें दिसतो, उन्हाळ्यांत दिसत नाहीं; त्याचप्रमाणें या व्यवहाराला प्रवाहरूप असें समजावें. ज्याप्रमाणें परमेश्वराचे गुण कर्म स्वभाव अनादि आहेत त्याप्रमाणें जगाची उत्पत्ति, स्थिति व प्रलय करणें हेंहि अनादिच आहे. ज्याप्रमाणें ईश्वराच्या गुणकर्मस्वभावांचा प्रारंभ व अंत नाहीं, त्याचप्रमाणें त्याच्या कर्तव्यांचाहि प्रारंभ व अंत नाहीं. (प्र०) ईश्वरानें कांहीं जीवांला मनुष्य, कांहींनां सिंहव्याघ्रादि क्रूर प्राणी, कांहींनां हरिण, गाय वगैरे पशु, कांहींला वृक्षादि व कांहींला कीट पतंगादि जन्म दिले आहेत; यामुळें परमात्म्यामध्यें पक्षपातीपणा येत आहे, नाहीं काय? (उ०) पक्षपात येत नाहीं. कारण कीं, त्या जीवांनीं पूर्वसृष्टीमध्यें केलेल्या कर्मानुसार व्यवस्था करून त्यांनां योग्य ते जन्म दिले. जर कर्मावांचून जन्म देता तर पक्षपात झाला असता. (प्र०) मनुष्यांची सृष्टि प्रथमतः कोठें झाली? (उ०) त्रिविष्टप* (तिब्बत्) नामक देशामध्यें प्रथमतः

---

* " त्रिविष्टप " यालाच सध्यां "तिब्बत् किंवा तिबेट" असें म्हणतात, या वरील वाक्याचा अर्थ वाचकांच्या नीट ध्यानांत येणार नाहीं, यासाठीं त्याचें थोडेंसें स्पष्टीकरण करणें इष्ट आहे. सध्यां हिमालयाच्या वरच्या भागाला तिबेट म्हणतात व तो तिबेट शब्द मूळच्या "त्रिविष्टप" शब्दाचा अपभ्रंश आहे हें खरें; पण मूळचा त्रिविष्टप शब्द सध्यांच्या हिमालयाच्या वरच्या सपाटीचा बोधक नव्हे. "विष्टप, त्रिविष्टप, स्वर्ग, मेरु, सुमेरु, त्र्यावास" हे शब्द एका सुखविशेष स्थानाचे वाचक आहेत. सध्यां त्रिविष्टप, स्वर्गकपाट, सुमेरु हे संज्ञा वाचक बनलेले शब्द हिमालयांतील व त्याच्यावरील विवक्षित स्थलाला लावतात हें खरें आहे; तथापि फार प्राचीनकाळीं ते निराळ्या स्थानांचे वाचक होते; असें शब्दाचे अर्थ, त्यांची सत्ता व इतिहास यांचें निरीक्षण करतां आपणास आढळून येतें. " त्रिविष्टप, स्वर्ग व मेरु " हे पर्याय शब्द आहेत यांत कोणचाहि मत भेद नाहीं, हे तीनहि एका विशेष स्थानांचा बोध करतात असें आपणांस आढळेल, पण तें पाहण्यास आपणास शब्दार्थ, त्यांची सत्ता व इतिहास यांचें निरीक्षण करणें आवश्यक आहे. "मेरु" चें महाभारतांत जें वर्णन दिलें आहे, त्यांत असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, "**एनं त्वहरहर्मेरुं सूर्याचंद्रमसौ ध्रुवम् ॥ प्रदक्षिणमुपावृत्य कुरुतः कुरुनन्दन ॥ ज्योतींषि चाप्यशेषेण सर्वाण्यनघ सर्वतः ॥ परियांति महाराज गिरिराजं प्रदक्षिणम् ॥** या मेरु पर्वताला दररोज सूर्य, चंद्र व इतर नक्षत्रें प्रदक्षिणा घालित असतात " (महाभा० वनपर्व अ० १६३) या वर्णनावरून मेरु पर्वत म्हणजे उत्तरध्रुव असें स्पष्ट म्हणावें लागतें, कारण ज्या स्थानामोंवतीं सूर्य चंद्र व नक्षत्रें फिरत आहेत असें भासतें, अशा स्थितिचा जर या भूमंडळावर कोठें संभव असला तर तो ध्रुवाजवळच आहे इतर कोठेंच नाहीं हें उघड आहे. दुसरें असें कीं "**मिनोति प्रक्षिपतीति मेरुः ॥** उणा० ४।१०१ ॥ " जो प्रकाशादि पदार्थांला व गतिविशेषाला फेंकतो तो मेरु होय. हा अर्थ जरी सर्व साधारण पर्वतांला लागत असला तथापि तो विशेषेंकरून उत्तरध्रुवालाच लागतो, कारण तेथून असाधारण विद्युत् तेज सारखें बाहेर पडत असतें, म्हणून महाभारतांत म्हटलें आहे कीं "**स्वतेजसा तस्य नगोत्तमस्य० ॥** महाभा० वन० १६४ ॥" त्या मेरु पर्वताच्या आंगच्या तेजानें जेथें रात्रींहि दिवसाप्रमाणें प्रकाश

मनुष्यें उत्पन्न झालीं. (प्र०) आदिसृष्टीमध्यें मनुष्यांच्या किती जाती होत्या ? (उ०) एकच मनुष्य जाति. नंतर " **विजानीह्यार्यान्ये च दस्यवः ।** " या ऋग्वेदवचनांत

पडतो." हें महाभारतांत वर्णिलेलें तेज उत्तरध्रुवाकडे रात्रीच्या वेळीं पडतें असें उत्तरध्रुवाकडे जाणाऱ्या धाडशी प्रवाशांनीं आपल्या प्रवासवृत्तांत म्हटलें आहे. त्याला ते " आओरा बोरियालिस् " असें म्हणतात; यावरून उघड होतें कीं, मेरु हें प्राचीनकालीं उत्तरध्रुवालाच नांव होतें; त्यालाच "**स्वर्ग**" असेंहि नांव आहे, **स्वर्गगुंफा** असेंहि त्यालाच म्हणतात हें महाभारत भीष्मपर्व ६ । ४ । २१ याठिकाणीं वाचकांनीं पहावें, स्वर्गाचें दुसरें ग्रंथांतरीं लक्षण हें दिलें आहे कीं जेथें सहा महिन्यांचा एक दिवस व सहामहिन्याची एक रात्र होते तो स्वर्ग प्रदेश होय. ही स्थितिहि मेरु पर्वताच्या अर्थात् उत्तरध्रुवाच्याच ठिकाणीं शक्य आहे महाभारतांत मेरु पर्वतावर अशी स्थिति आहे; असें स्पष्ट म्हटलें आहे. पहा–"**बभूव रात्रिर्दिवसश्च तेषां संवत्सरेणैव समानरूपः ॥** महा० वनप० १६४ ॥ मेरु पर्वतावर राहणाऱ्यांची आपल्या एका वर्षा एवढी एक अहोरात्र असते" या महाभारतांतील उताऱ्यावरून स्वर्गीतील देवांचा दिवस व मेरु पर्वतावरील दिवस हे एकच होत हें सिद्ध होत आहे. हाच अर्थ " **एकं वा यदेवानामहः यत्संवत्सरम् ।** " या तैत्तिरीय ब्राह्मणांतील विधानांत दिला आहे, देवांची सहामहिन्यांची रात्र व सहा महिन्यांचा दिवस जर कोठें असेल तर तो ध्रुवाजवळच आहे हें आतां सर्वांला माहित झालेलें आहे; तेव्हां महाभारतांतील इतिहासाच्या पुराव्यावरून व शब्दांच्या अर्थावरून मेरु व स्वर्ग हे दोन शब्द मूळचे उत्तरध्रुवाचे वाचक आहेत असें सिद्ध होतें; आतां स्वर्गवाचक "**त्रिविष्टप**" शब्दाचा अर्थ पहावयाचा, ज्या अर्थीं स्वर्ग व मेरु यांचा त्रिविष्टप हा पर्याय शब्द आहे; त्याअर्थीं तोहि उत्तरध्रुवाचाच बोधक असला पाहिजे असें उघड दिसतें, त्याचा धात्वर्थ "**विशन्ति यत्रेति विष्टपं भुवनं वा** (उणा. २।१४५) **विष्टपमेव त्रिविष्टपम् ।** " ज्या ठिकाणीं प्रवेश करतात अर्थात् ज्या भुवनामध्यें शरीरद्वारा आत्मे प्रथमतः प्रकट होतात, त्या भुवनाला **विष्टप** किंवा **त्रिविष्टप** असें म्हणतात; अमरकोशामध्येंहि **स्वर्ग** व **त्रिविष्टप** हे एका अर्थानेंच दिले आहेत. या पदव्या विवेचनावरून **स्वर्ग, त्रिविष्टप** व **मेरु** हे शब्द उत्तरध्रुवाचे वाचक ठरतात, कारण (१) त्या ठिकाणीं प्रथमतः मनुष्यें उत्पन्न झालीं, (२) त्या ठिकाणीं सहा महिन्याचा दिवस व तेवढीच रात्र आहे, (३) त्या ठिकाणाच्या भोंवतीं सूर्य, चंद्र व नक्षत्रें फिरत असतात असें दिसतें, या गोष्टी स्वर्ग, त्रिविष्टप व मेरु यां संबंधाच्या वर्णनामध्यें ब्राह्मण व इतिहास ग्रंथांत आलेल्या आहेत व त्या सर्व उत्तर ध्रुवाजवळच प्रत्ययास येतात, म्हणून वरील नांवेंहि उत्तरध्रुवाचींच वाचक होत. हाच निरुक्तामध्येंहि अर्थ दिलेला आहे. पहा—"**विष्टवादित्यो भवति आविष्टो रसान् आविष्टो भासं ज्योतिषाम् आविष्टो भासेति वाऽथ द्यौराविष्टा ज्योतिर्भिः पुण्यकृद्भिश्च ॥** निरु. २।१४॥" (१) जें स्थान पुण्यकृत्यें करणारांनीं प्रथमतः युक्त होतें, (२) ज्या ठिकाणीं प्रकाश भरलेल असतो व (३) जें स्थान तेजस्वी गोलांच्या प्रकाशांनीं युक्त असतें व (४) जें जलामध्यें प्रविष्ट झालेलें असतें, त्याला **द्यौ, आदित्य** किंवा **विष्टप** या संज्ञा होतात; या निरुक्ताच्या म्हणण्याप्रमाणेंहि विष्टप ही संज्ञा ध्रुवालाच अन्वर्थक होते; कारण तेथें प्रथमतः आदिसृष्टींतील अयोनिज पुण्यात्मे मनुष्य उत्पन्न झाले, तें स्थान तेजस्वी गोलांच्या प्रकाशानें युक्त असतें व पृथिवीच्या इतर भागावर पाणी होतें, तेव्हां ध्रुवाजवळचा भाग प्राण्यांची वस्ती होण्यास योग्य झालेला होता; म्हणून निरुक्ताच्या निरुक्तीनेंहि **विष्टप** शब्द उत्तरध्रुवालाच अनुकूल दिसतो

सांगितल्याप्रमाणें श्रेष्ठांचें आर्य, विद्वान् व देव असें नांव पडलें व मूर्ख, चोर, डाकू व दुष्ट लोकांनां दस्यु असें नांव पडलें म्हणजे आर्य व दस्यु या दोन नांवानें दोन भेद झाले. "उत

शतपथामध्येंहि मेरुसंबंधानें असेंच म्हटलें आहे. पहाः—(१) " **पवित्रवति संवपति०** " (२) "**अथान्तर्वेद्युपविशति०**," (३) " **अथ संयौति०** " (४) "**सोऽभिवासयति । अत मेरुर्यज्ञोऽत मेरुर्यजमानस्य प्रजा भूयादिति नेदेतदुभयज्ञो वा यजमानो वा ताभ्याद्यदिदमभिवासयामीति । तस्मादेवमभिवासयति ॥**" शत. कां. १ । २ । ६ । १७ ॥ पवित्रपर्णे बीजांत आणतो, अंतर्वेदीमध्यें प्रवेश करवितो; व जन्मास येण्यास लावतो हे तीन आवास होत. हे अयोनिज देव, सिद्ध व ऋषि यांनां होतात म्हणून त्यांनां **त्रयावासी** म्हणतात व ज्याठिकाणीं ते प्रथमतः उत्पन्न होतात त्या स्थानाला **त्रयावास** असें म्हणतात. हा जो प्रथमतः पुण्यात्मे जन्मास आणण्याचा यज्ञ आहे तो मेरुयज्ञ होय असें वरील शतपथाच्या उतार्‍यांत वर्णिलें आहे; हें पाहिलें म्हणजे वर लिहिलेला समजच दृढ होतो हें निराळें सांगणें नको; याप्रमाणें स्वर्ग, देवलोक, त्रिविष्टप हे सर्व शब्द उत्तरध्रुवाचे वाचक ठरले व तेथेंच प्रथमतः मनुष्य उत्पन्न झाले असेंहि त्यांच्या अर्थावरून व इतर वर्णनावरूनहि ठरलें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे इतकेंच कीं देव ऋषि पितर उत्तरध्रुवाजवळ प्रथमतः जन्मास आले ते आर्य म्हणजे सर्व गुणांनीं श्रेष्ठ असे होते; त्यामुळें ते ज्या स्थानांत राहिले त्याचें आर्यावर्त असें नांव पडलें; या आर्यांचे ऋषि परम्परेनें (वेदविहित) आचार पाळणारे मनुष्यहि देव किंवा आर्य या नांवानें प्रसिद्धीस येत गेले व याच्या विरुद्ध आचार करणारांनां दस्यु दानव राक्षसादि भावानें ओळखूं लागले, दानवांची केवळ प्राकृतिक पदार्थांच्या भोगाकडे प्रवृत्ति असल्यामुळें त्यांनां जगांत जेथें जेथें अनुकूल स्थळें मिळून गेलीं तेथें वसाहत करून राहूं लागले; परंतु मूळ आर्य निवास जेव्हां आर्यांना सोडावा लागला तेव्हां मूळ आर्यनिवाससदृश स्थान शोधून काढण्याकडे त्यांची साहजिक प्रवृत्ति होती, त्याप्रमाणें त्यांनां योग्य स्थळेंहि आढळून आलीं. पूर्व पश्चिम समुद्रांमध्यें असणारा व सरस्वती, दृषद्वती व देवनदी या नद्यांमधील देशाला आर्यावर्त असें जें म्हटलेलें ग्रंथांतरीं आढळतें तेंहि उत्तरध्रुवाच्या आसपासच्या प्रदेशालाच म्हटलेलें होय. तेथून जेव्हां आर्यलोक दक्षिणेकडे उतरले तेव्हां त्या तोडीच्या हिमालयांतील आसमन्ताच्या भागांत कायम वास करून त्या जमिनीला त्यांनीं आर्यावर्त हें नांव दिलें, कारण नद्यांची वगैरे परिस्थिति उत्तरेकडील प्रदेशाप्रमाणेंच येथें त्यांनां जवळ जवळ आढळली. देवलोक, मेरुवर्ष हा मूळचा आर्यांचा निवास व मृत्युलोक भारतवर्ष हल्लींचा हिमालय, हा नंतरचा आर्यांचा निवास होय. उत्तरेच्या मेरुकडील भागाची रमणीयता व त्याठिकाणचें सुख इतरत्र नाहीं म्हणून त्या भागाला उत्तरकुरु (स्वर्गलोक) व इतर ठिकाणाला दक्षिणकुरु (मृत्युलोक) असें त्यांनीं म्हटलें. मूळचीं उत्तरेच्या नद्यांचीं नांवें दृषद्वती, शरावती व देवनदी हीं होतीं. तीं आर्य येथें आल्यानंतर अनुक्रमें ब्रह्मपुत्रा, सिंधु व गंगा या नद्यांला देण्यांत आलीं. या मध्यकालांतहि विंध्याद्रीपर्वताच्या खालीं आर्यावर्ताची मर्यादा मानली जात नसे पुढें अगस्ति ऋषीनें विंध्याद्रीपर्वत ओलांडून दक्षिणेंत आर्यलोकांचा प्रवेश केला व होतां होतां अगदीं दक्षिणसमुद्रापर्यंत अर्यावर्ताची मर्यादा विस्तारण्यांत आली; जेव्हां उत्तरध्रुवाकडील आर्यावर्त सोडून आर्य दक्षिणेकडे आले व त्यांनीं भारतवर्षांत आर्यावर्त नवीन वसविला तेव्हां मेरूच्या ऐवजीं हिमालयाला स्वर्गद्वार कल्पून त्याच्या आसमन्ताच्या श्रेष्ठ भागाला त्रिविष्टप असें त्यांनीं मानिलें त्याचाच अपभ्रंश **तिबेट** असा संस्कृत शब्द झाला आहे; यावरून मूळचा त्रिविष्टप (तिबेट) कोणता होता व मूळचीं प्राण्यांची वस्ती कोठें झाली हें सहज ध्यानांत येईल.

शूद्रे उतार्ये " या अथर्ववेदीय मंत्रांत सांगितल्याप्रमाणें आर्यांमध्यें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार भेद झाले. द्विजविद्वानांला आर्य व मूर्खांनां (अनार्य-अडाणी) असें नांव पडलें. (प्र०) नंतर ते येथें कसे आले? (उ०) जेव्हां आर्य व दस्यु म्हणजे देव (विद्वान्) व असुर (अविद्वान्) यांमध्यें वारंवार तंटे उत्पन्न होऊं लागले व जेव्हां त्यांच्यापासून पुष्कळ उपद्रव होऊं लागला, तेव्हां आर्यांनीं सर्व पृथिवीवरील देशांतील उत्तम अशा या भरतखंडामध्यें आगमन केलें; म्हणून याला " आर्यावर्त " असें नांव पडलें. (प्र०) आर्यावर्ताची मर्यादा कोणती ? (उ०)

आसमुद्रात्तु वै पूर्वादासमुद्रात्तु पश्चिमात् ।
तयोरेवान्तरं गिर्योरार्यावर्तं विदुर्बुधाः ॥ २२ ॥
सरस्वतीदृषद्वत्योर्देवनद्योर्यदन्तरम् ।
तं देवनिर्मितं देशमार्यावर्तं प्रचक्षते ॥ २७ ॥ मनु० २॥

" उत्तरेच्या बाजूला हिमालय, दक्षिणेच्या बाजूला विंध्याद्री आणि पूर्व व पश्चिमेच्या बाजूला समुद्र यांच्या मधील प्रदेशाला आर्यावर्त असें म्हणतात व पश्चिमेच्या बाजूला सरस्वती (अटक) नदी, पूर्वेच्या बाजूला दृषद्वती (ब्रह्मपुत्रा) व हिमालय आणि रामेश्वरापासून विंध्याद्रीपर्यंतचा सर्वप्रदेश. याला आर्यावर्त असें म्हणतात. हा देश विद्वानांनीं वसविला आहे व हेंच आर्यांचें निवासस्थान असल्यामुळें त्याला आर्यावर्त असें म्हणतात. (प्र०) प्रथमतः या देशाचें नांव काय होतें व येथें कोण राहत असत ? (उ०) या देशांत पूर्वी कोणी राहत नव्हतें म्हणूनच याचें पूर्वीचें नांवहि कांहीं नव्हतें; सृष्टि उत्पत्तीचा कांहीं काल लोटल्यानंतर त्रिविष्टपांतून नीट आर्यावर्तांतच आर्य लोक आले. (प्र०) कोणी म्हणतात कीं हे लोक प्रथमतः इराणांतून इकडे आले, म्हणून यांचें नांव आर्य झालें हे लोक येथें येण्यापूर्वी या देशांत जंगली लोक राहत असत, त्यांनां हे आर्य असुर म्हणूं लागले आर्य लोक आपणास देव म्हणत या दोन लोकांमधील लढाईला देवासुरसंग्राम असें अनेक ग्रंथांत म्हटलें आहे तें खरें काय ? (उ०) हें सर्व खोटें आहे. पहा—

विजानीह्यार्यान्ये च दस्यवो बर्हिष्मते रन्धया
शासदव्रतान् ॥ ऋ० मं० १ । ५१ । ८ ॥
उत शूद्रे उतार्ये ॥ अथर्व० १९ । ६२ ॥

पूर्वी लिहिलें आहे कीं, धार्मिक, विद्वान् व आप्तपुरुषांनां आर्य असें म्हणतात व याच्या विपरीत आचरण करणारे डाकू, दुष्ट, अविद्वान्, अधार्मिक अशा लोकांनां दस्यु असें म्हणतात. ब्राम्हण, क्षत्रिय, व वैश्य या द्विजांनां आर्य व शूद्रांनां अनार्य (अडाणी) असें म्हणतात. वेदामध्यें जर अशी व्याख्या केली आहे तर विदेशी-यांच्या कपोल कल्पित गप्पानां बुद्धिमान् लोक कधीं मान देणार नाहींत. आर्यावर्तांतील अर्जुनादिकांनीं व दशरथादि महाराजांनीं हिमालयावर निवास करणाऱ्या आर्यांनां सहाय्य करण्यासाठीं म्लेंच्छ, दस्यु आदि असुरांशीं जीं युद्धें केलीं त्यांस देवासुरसंग्राम असें म्हणतात. यांमध्यें असुरांचा पराजय व आर्यांचा जय झालेला आहे या ऐतिहासिक गोष्टीवरून असें सिद्ध होतें कीं, आर्यावर्ताच्या बाहेर चारहि दिशांनां जे लोक राहत होते त्यांना असुर असें म्हणत असत. जेव्हां हे असुर हिमालयनिवासी आर्यांवर स्वारी करीत तेव्हां आर्यावर्तांतील अनेक राजे त्यांच्या मदतीला जात व त्या असुरांचा पराभव करीत; व जीं दक्षिणेंत रामरावणांमध्यें युद्धें झालीं त्यांनां देवासुर संग्राम म्हणत नाहीं, त्यांनां रामरावण युद्ध किंवा आर्यराक्षस युद्ध असें म्हणतात. आर्य लोक इराणांतून येथें आले व येथील जंगली लोकां बरोबर लढून त्यांचा पराजय करून येथील राजे बनले; अशा बद्दल संस्कृत वाङ्मयांत मुळींच प्रमाण नाहीं; असें असतां या विदेशीयांच्या कल्पना तरंगाची माननीयता कोठवर राहणार; तसेंच—

म्लेच्छवाचश्चार्यवाचः सर्वे ते दस्यवः स्मृताः ॥ मनु० १०। ४५॥
म्लेच्छदेशस्त्वतः परः ॥ मनु० २ । २३ ॥

"आर्यावर्ताशिवाय इतर देशामध्यें दस्यु, म्लेंच्छ लोक राहतात" या वरूनहि हेंच ठरतें कीं, आर्यावर्ताशिवाय पूर्व, पश्चिम, उत्तर, वायव्य, व ईशान्य या बाजूच्या सर्वदेशांमधील राहणारांना दस्यु, म्लेंच्छ, असुर असें म्हणत व नैर्ऋत्य, दक्षिण व आग्नेय या दिशांमध्यें (आर्यावर्ताशिवाय इतर देशांत) राहणाऱ्या लोकांस राक्षस असें म्हणत, अजूनहि शिद्दी वगैरे लोक—ग्रंथांतरांतील राक्षसांच्या वर्णना प्रमाणेंच—भयंकर दिसतात. आर्यावर्ताच्या बरोबर खालच्या बाजूला राहणाऱ्या लोकांना नाग असें म्हणत व त्या देशाला पाताल असें नांव असे. आर्यलोकांचें ज्या बाजूला "पादतल" आहे त्या बाजूला जो देश आहे तो "पाताल" हल्लीं ज्यास अमेरिका म्हणतात, तो होय. या ठिकाणीं नाग नामक लोक राज्य करीत असत. त्यांच्यांतील एका राजाची उलुपी नामक राजकन्या होती तिचा अर्जुनाशीं विवाह झाला होता. इक्ष्वाकु राजापासून पांडवांच्या अवधीपर्यंत पृथिवीवर चोहोंकडे आर्यांचें बरेंच राज्य पसरत होतें व वैदिक धर्माचा प्रसारहि आर्यावर्ताशिवाय इतर देशांत सुद्धां होत होता. याला प्रमाण पहावयाचें असल्यास ब्रह्मयाचा पुत्र विराट्, विराटाचा मनु,

मनूचे मरीच्यादि दहा पुत्र, त्यांपासून स्वायंभुवादि सात राजे यांचे व यांच्या संतानाचे राज्य विभाग ग्रंथांतरीं पाहिले असतां सहज आढळून येईल या वंशांत उत्पन्न झालेला इक्ष्वाकु राजा हा आर्यावर्तीचा प्रथम राजा होय. यानेंच आर्यावर्त वसाविला. त्या वेळच्या आर्यांमधील पुरुषार्थ विलक्षण असे, पण सध्यांच्या त्यांच्याच वंशजांमध्यें आलस्य, प्रमाद, परस्पर विरोध या दुर्गुणांचें दुर्दैवानें प्राबल्य झाल्यामुळें, यांचें अन्य देशामध्यें राज्य होण्याची तर गोष्ट लांबच राहिली; पण स्वतःच्या आर्यावर्तामध्येंहि आर्यांचें अखंड, स्वतंत्र, स्वाधीन व निर्भय असें राज्य राहिलें नाहीं व जें कांहीं आहे तें सर्व विदेशीयांनीं पादाक्रांत केलेलें आहे. कांहीं थोडे राजे नांवाचे मात्र स्वतंत्र आहेत. हा नियमच आहे कीं जेव्हां दुर्दिन असतें तेव्हां देशांतील सर्वलोकांनां अनेक प्रकारचीं दुःखें भोगावीं लागतात. कोणी कांहीं म्हटलें तरी ही गोष्ट निर्विवाद आहे कीं, स्वदेशीय राज्य असणें ही गोष्ट सर्वांत श्रेष्ठ व उत्तम आहे व तेंच सुखदायक आहे, तसें मतमतांतरांचा आग्रह न धरणारे, पक्षपात रहित, प्रजेवर मातापित्यांप्रमाणें कृपा करणारे, न्याय व दया यांनीं युक्त अशा विदेशीयांचें राज्य असलें तरी तें सुखदायक होत नाहीं हा नियम सार्वत्रिक सर्व देशांनां सारखा लागू आहे भिन्न भाषा, भिन्न शिक्षण व भिन्न व्यवहार यांपासून होणारा विरोध सुटणेंच आधीं अत्यंत कठीण आहे; व हा विरोध सुटल्याशिवाय परस्परांवर उपकार करणें किंवा परस्परांचा अभिप्राय जाणणें हें फारच कठीण आहे; म्हणून जें कांहीं वेदादि शास्त्रामध्यें सांगितलें आहे व त्यावरून विधिनिषेधाची इतिहासांत जी व्यवस्था प्रतिपादिली आहे तीप्रमाणेंच सर्व भद्र पुरुषांनीं चालणें अत्यंत उत्तम आहे. (प्र०) वरें तें असो आतां हें सांगा कीं, जग उत्पन्न होऊन आजपर्यंत किती समय झाला ? (उ०) एक अब्ज सत्याण्णव कोटीहून जास्त वर्षें वेद व सृष्टि* उत्पन्न होऊन झालीं आहेत, ही सृष्टि परमाणूंपासून उत्पन्न झाली आहे. ज्याचा भाग होऊं शकत नाहीं त्याला परमाणु असें म्हणतात. साठ परमाणु एकत्र मिळाले असतां एक अणु होतो. दोन अणु मिळून एक द्व्यणुक होतो यालाच स्थूल वायु असें म्हणतात; तीन द्व्यणुक मिळून त्रसरेणु होतो, यालाच अग्नि असें म्हणतात, चार द्व्यणुक एकत्र झाले असतां जल होतें. पांच द्व्यणुक एकत्र झाले असतां पृथिवी होते. तीन द्व्यणुकांचा त्रसरेणु होतो व हे द्विगुणित झाले असतां पृथिव्यादि दृश्य पदार्थ होतात; याप्रमाणें परमाणूंची रचना करून परमेश्वरानें ही भूगोलांची रचना केली आहे व तिला पूर्वी सांगितलीं तितकीं वर्षे झालीं आहेत. (प्र०) या भूगोलादिकांचें धारण कोण करतो ? कोणाचा याला

* या विषयीं स्पष्ट खुलासा पहावयाचा असेल तर " वैदिक धर्मस्वरूप " नामक ग्रंथामध्यें वेदोत्पत्तीचा काळ " हें प्रकरण पहा. (पृ० ११ ते १४)

आधार आहे ? कोणी म्हणतात, सहस्र फणांचा सर्प पृथिवीचा आधार आहे, कोणी म्हणतो बैलाच्या शिंगावर पृथिवी आहे, कोणी म्हणतात, आधाराशिवाय आहे, कोणी म्हणतात, वायूच्या आधारानें आहे. कोणी म्हणतात, सूर्याच्या आकर्षणानें राहिली आहे, कोणी म्हणतात कीं, पृथिवी जड असल्यामुळें ती खालीं चालली आहे. इत्यादि अनेक प्रकारचीं विधानें ऐकण्यांत येतात त्यांपैकीं खरें कोणतें बरें ? (उ०) जे लोक शेष, सर्प, बैल, इत्यादिकांच्या आधारानें पृथिवी आहे असें म्हणतात त्यांनीं हें सांगावें कीं ते कोणाच्या आधारानें राहिले आहेत ? त्यांचा जन्म झाला तेव्हां त्यांचे आई बाप कोठें राहिले होते ? बैलावर पृथिवी आहे असें म्हणणारे मुसलमान तर बिचारे गप्प बसतील, पण सर्पावर पृथिवी आहे म्हणणारे पौराणिक लोक मात्र पृथिवी सर्पावर, सर्प कूर्मावर, कूर्म जलावर, जल अग्नीवर, अग्नि वायूवर व वायु आकाशांत राहतो; अशी परंपरा देतील ! हें सर्व कशावर आहे ? असा जर प्रश्न यांना केला तर ते म्हणतील कीं हें सर्व परमेश्वरावर आहे. शेष व बैल हे कोणाचे पुत्र आहेत? असें जर त्यांनां विचारलें तर ते सांगतील कीं कश्यप व कद्रू यांचे सर्प हे पुत्र व गाईचा बैल हा पुत्र आहे. आपणास पुराणें पाहिलीं असतां आढळून येतें कीं, मरीचीचा पुत्र कश्यप, मनूचा मरीचि, विराट्चा मनु व ब्रह्माचा विराट् अशी परंपरा आहे. ब्रह्मा हा आदिसृष्टीचा होय. कश्यपानंतर शेषाचा जन्म आहे व त्या पूर्वी पांच पिढ्या झाल्याचा पुरावा आहे. तेव्हां शेषाचा जन्म होईपर्यंत पांच पिढ्या झाल्या त्या काळांत पृथिवीला आश्रय कोणी दिला ? अर्थात् कश्यपाचा जन्म झाला तेव्हां पृथिवी कशावर होती ? यावर सर्पवाल्याजवळ कांहीं उत्तर नाहीं. वास्तविक पाहतां "शेष" हें नांव परमेश्वराचें आहे व त्याच्या आधारानें पृथिवी आहे हें खरें. "शेष" म्हणजे "शिल्लक असलेला" परमेश्वर हा सर्व जगांत व्यापून उत्पत्ति व प्रलय यांतून शेष राहिलेला आहे; म्हणून त्याला "शेष" असें म्हणतात व याच्या आधारानें पृथिवी आहे हें निर्विवाद आहे हा वेदविदित विचार करून कवींनीं "शेषाधार पृथिवी" या वचनानें त्याचें वर्णन केलें आहे, पण हा भाव लोकांनीं न समजून शेषाचा सर्प करून त्याला हजार फणाहि उत्पन्न केल्या ; शिवाय–

सत्येनोत्तभिता भूमिः ॥ अथर्व. कां. १४।१।१॥

" (सत्य) जो त्रिकालाबाधित आहे व ज्याचा कधीं नाश होत नाहीं अशा ईश्वरानें भूमि, आदित्य वगैरे सर्व लोक धारण केले आहेत. " तसेंच—

* उक्षा दाधार पृथिवीमुत द्याम् ॥

" (उक्षा) वृष्टि करून भूगोलावर पाण्याचें सिंचन करणाऱ्या सूर्यानें आपल्या आकर्षणानें (पृथिवीम्) पृथिवीला धारण केलें आहे." पण सूर्याला धारण करणारा परमेश्वराशिवाय दुसरा कोणीहि नाहीं, अर्थात् त्यानेंच या संपूर्ण गोलांचें धारण केलें आहे. या मंत्रांतील " **उक्षा** " या शब्दावरूनच कित्येक अज्ञानी लोकांनीं " बैल " हा पृथिवीचा धारणकर्ता आहे ही कल्पना बसविली असावी. पण पृथिवीला शिंगावर उचलून धरणारा बैल केवढा व कोठें असला पाहिजे याची कल्पना त्या विचाऱ्यांस नाहीं. (**प्र०**) एवढाल्या मोठमोठ्या गोलांनां परमेश्वर कसा धारण करतो बरें ? (**उ०**) ज्याप्रमाणें अनंत आकाशापुढें भूगोल म्हणजे कांहीं मोठा पदार्थ नाहीं, किंवा समुद्रापुढें पाण्याचा एक कण म्हणजे फार मोठा आहे असें नाहीं, तद्वतच त्या अनंत परमेश्वरापुढें हे असंख्य गोल एका परमाणु एवढे सुद्धां नाहींत. तो सर्वांच्या बाहेर सर्वांच्या आंत पूर्णपणें व्यापून राहिला आहे. " **विभु प्रजासु** " असें त्याचें यजुर्वेदांत वर्णन आहे; अर्थात् तो सर्वांमध्यें पूर्णपणें व्यापून राहिला आहे. जर तो ख्रिस्तियन, मुसलमान व पौराणिक लोकांच्या म्हणण्याप्रमाणें एकदेशीय असता तर मात्र सर्व सृष्टीला आधार देऊं शकला नसता. कारण सर्वत्र जो असेल तोच धारण करूं शकतो अन्य नाहीं. (**प्र०**) हे गोल परस्पर आकर्षणानें राहिले आहेत असें असतां परमेश्वरानें धारण केले आहेत असें तुम्ही कां म्हणतां ? (**उ०**) आधीं तुम्हीं हें सांगा कीं ही सृष्टि अनंत आहे कीं सान्त ? जर अनंत म्हणाल तर साकार वस्तु अनंत असूं शकत नाहीं हें तुम्हांला मान्य करावें लागेल; व जर सान्त म्हणाल तर ती जेथें संपली आहे, ज्याच्यापुढें कोणताच लोक नाहीं तेथें कोणी आकर्षणानें धरली आहे तें तुम्हांस सांगावें लागेल. कारण शेवटच्या गोलाला बाहेर ओढणारा कोणी पदार्थ नसल्यामुळें आंतल्या बाजूलाच तो खेंचला जाईल व अशा रीतीनें सर्व गोल आंत आंत खेंचले जाऊन जगताचा क्षणार्धांत नाश होईल; पण तसें होत नाहीं. समष्टि व व्यष्टिच्या द्वारें विचार केल्यानें याचा स्पष्ट उलगडा होणार आहे, जसें सर्व समुदायाचें नांव समष्टि आहे व एकेक वृक्षादिकाची भिन्न भिन्न गणना करणें याला व्यष्टि म्हणतात; तसेंच या समष्टिरूप जगाचा धारण व आकर्षणाचा कर्ता त्या एका परमेश्वरावांचून दुसरा कोणीहि संभवत नाहीं; हें यावरून उघड आहे. तसेंच पहा—

---

* अनड्वान् दाधार पृथिवीमुत द्यामनड्वान् दाधारोर्वन्तरिक्षम् ॥
अनड्वान् दाधार प्रदिशः षडुर्वीरनड्वान् विश्वं भुवनमाविवेश ॥

[अथर्व० कां० ४ सू० ११ म० १]

स दाधार पृथिवीं द्यामुतेमाम् ॥ यजु० १३।४॥

जो पृथिव्यादि प्रकाशरहित लोकलोकान्तरांची व सूर्यादिप्रकाश सहित लोकांची व इतर सर्व पदार्थांची परमेश्वरानेंच रचना व धारणा केलेली आहे तो सर्वत्र व्यापक असून सर्व जगाचा कर्ता व धर्ता आहे. (प्र०) पृथिवी वगैरे गोल स्थिर आहेत कीं फिरत आहेत. (उ०) फिरत आहेत. (प्र०) कित्येक लोक म्हणतात कीं, सूर्य फिरतो व पृथिवी स्थिर आहे व दुसरे म्हणतात कीं, सूर्य स्थिर *असून पृथिवी फिरते यांत खरें कोणतें ? (उ०) हीं दोनहि मतें अर्धी खोटीं आहेत कारण वेदामध्यें सांगितलें आहे कीं,—

आयं गौः पृश्निरक्रमीदसदन्मातरं पुरः ॥
पितरं च प्रयन्त्स्वः ॥ यजु० ३।६ ॥

(आयं गौः) पृथिवी, सूर्य, चंद्रादि गोल (पृश्निः) आकाशामधून (अक्रमीत्) आक्रमण करतात ; त्यांपैकीं पृथिवीहि आपल्या (मातरम्) जलपरमाणुरूप आकाशस्थ मातेला व अग्निमय अशा (स्वः) सूर्यरूपी (पितरम्) पित्याला (असदत्) प्रदक्षिणेनें प्राप्त होऊन (प्रयन्) पुनः पुनः जाते. वा मंत्रांत सूर्याच्या सभोंवतीं पृथिवी सारखी फिरत आहे असें सांगितलें असून सूर्यादि लोकहि आकाशांतून आपल्या नियमित मार्गानें फिरत आहेत असें सांगितलें आहे. तसेंच—

आकृष्णेन रजसा वर्तमानो निवेशयन्नमृतं मर्त्यं च ॥ हिरण्ययेन सविता रथेना देवो याति भुवनानि पश्यन् ॥

यजु० ३३।४३॥

(सविता) सूर्य (रजसा) सर्व गोलांशीं (आकृष्णेन) आकर्षणानें (वर्तमानः) संबंध ठेवणारा आहे. सूर्य हा (हिरण्ययेन) ज्योतिर्मय अशा (रथेन) रममाण करणाऱ्या तेजानें युक्त आहे. तो (मर्त्यम्) प्राण्यांनां (अमृतम्) अमृतरूपी किरणसमूहद्वारा (निवेशयन्) अमृतांत प्रवेश करवितो आणि पृथिव्यादि सर्व मूर्तिमान् द्रव्यांनां दाखवितो असा हा (देवः) सूर्य (भुवनानि) सर्व

* आपण ज्या सूर्य मंडलांत आहों त्याचा मध्यभाग सूर्य आहे, अशीं असंख्यात सूर्य मंडलें ज्याच्या भोंवतीं फिरतात तो सर्व भूगोलाचा सूर्य होय; म्हणून परमात्म्याशिवाय जगांत स्थिर असें कांहींच नाहीं.

लोकांचे बरोबर आकर्षण गुणांनीं संबंध ठेवून (पश्यन्) सर्वांनां जगांतील पदार्थांचें स्वरूप दाखवीत दाखवीत (याति) आपल्या परिधीमध्यें फिरत असतो. या मंत्रांत सूर्य आपल्या कक्षे भोंवतीं फिरतो असें सांगितलें असून तो प्रकाश देणारा व सृष्टीला कारण आहे असेंहि सांगितलें आहे. सूर्य दुसऱ्या कोणत्याहि गोलाच्या सभोंवतीं फिरत नाहीं. सूर्यमालेंतील इतर गोल याच्या भोंवतीं फिरत असतात; याप्रमाणें एकेक सूर्यमालिकेमध्यें सूर्य हा प्रकाश देणारा असून इतर गोल त्याच्या प्रकाशानें प्रकाशित होणारे आहेत. तसेंच–

दिवि सोमो अधिश्रितः ॥ अथर्व० १४।१।१॥

"जसा हा चंद्र लोक सूर्याच्या प्रकाशानें प्रकाशित होत आहे" त्याचप्रमाणें पृथिव्यादि लोकहि सूर्य प्रकाशानें प्रकाशित होत आहेत, इतर पृथिव्यादि गोल आपापल्या आंसा भोंवतीं फिरत असल्यामुळें जो भाग सूर्यासमोर येतो तेथें दिवस होतो व जो भाग सूर्यासमोर नसतो तेथें रात्र असते. अर्थात् दिवस व रात्र हें चक्र सर्वदा चाललेलें आहेच, त्याचप्रमाणें उदयास्त, संध्या, मध्याह्न व मध्यरात्र हे कलावयव देशदेशान्तरामध्यें सदैव असतात, जेव्हां आर्यावर्तांत सूर्योदय होतो तेव्हां पाताल (अमेरिकेंत) सूर्यास्त होतो; व जेव्हां आर्यावर्तास सूर्यास्त होतो तेव्हां पातालांत सूर्योदय होतो. तसेंच जेव्हां आर्यावर्तांत मध्यान्ह असतो तेव्हां पातालांत मध्यरात्र असते व जेव्हां येथें मध्यरात्र होते तेव्हां तेथें मध्यान्ह होतो. जे लोक असें समजतात कीं, सूर्य फिरतो व पृथिवी स्थिर आहे ते अज्ञानी आहेत असें समजावें, सूर्य फिरत असता तर हजारों वर्षांचा दिवस व तेवढीच रात्र झाली असती; कारण असें कीं सूर्य हा पृथिवीहून लाखोंपट मोठा आहे (म्हणूनच त्याला वेदांमध्यें "ब्रध्नः" असें म्हटलें आहे.) व कोट्यावधि मैल दूर आहे. ज्याप्रमाणें मोहरीच्या पुढें डोंगर असावा तसा पृथिवीच्या पुढें सूर्य आहे. मोहरीला आपल्या भोंवतीं फिरण्यास फार वेळ लागणार नाहीं पण पहाडाला मात्र मोहरी भोंवतीं फिरावयास जास्त वेळ लागेल; त्याचप्रमाणें पृथिवी आपल्या आंसा भोंवतीं फिरून ज्या मानानें दिवस रात्र होऊं शकतात त्यापेक्षां सूर्य पृथिवी सभोंवतीं फिरत असता तर दिवस रात्रीचें प्रमाण फारच मोठें झालें असतें; सूर्य फिरत नाहीं असें म्हणणारे ही चूक करीत असतात जर तो फिरत नसता तर एका राशिस्थानावरून दुसऱ्या राशिस्थानाला जाणें अशक्य झालें असतें शिवाय गुरुपदार्थ फिरल्या वांचून आकाशांत राहूं शकत नाहीं हा अटल नियम आहे, त्यालाहि बाध आला असता; जैनी लोक असें समजतात कीं, पृथिवी फिरत नाहीं पण खालीं खालीं जात आहे व

नंबुद्वीपाला दोन सूर्य व दोन चंद्र आहेत. हा सर्व त्यांच्या ज्योतिःशास्त्राच्या अज्ञानाचा प्रकार आहे जर पृथिवी खालीं खालीं चालली असती तर चारहि बाजूंची वायूची-सध्यां सुरू आहे त्या तऱ्हेची गति बंद झाली असती चारी बाजूंनीं वायुचक्र न बनल्यामुळें पृथिवी छिन्न भिन्न झाली असती, निम्न स्थलांमध्यें राहणाऱ्या लोकांनां वायूचा स्पर्शहि झाला नसता, खालीं राहणाऱ्यांनां अधिक झाला असता, व एका प्रकारची वायूची गति झाली असती. दोन सूर्य व दोन चंद्र असते तर रात्र व कृष्णपक्षादि होणें असंभवनीय होतें. असो. याप्रमाणें हें जैनी लोकांचें मत भ्रममूलक आहे, वास्तविक पाहतां पृथिवीसभोंवतीं फिरणारा एकच चंद्र आहे व सूर्यमालिकेला एकच सूर्य आहे. (प्र०) सूर्य, चंद्र व तारे हे काय पदार्थ आहेत व यांवर मनुष्यवस्ती आहे कीं काय ? (उ०) हे सर्व भूगोल लोक आहेत व यामध्यें मनुष्यादि प्रजांची वस्ती पण आहे. पहा–

एतेषु हीद ँसर्वं वसुहितमेते हीद ँवासयन्ते तद्यदिद ँसर्वं वासयन्ते तस्माद्वसव इति ॥ शतपथ १४।६।७।४॥

"पृथिवी, जल, अग्नि, वायु, आकाश, चंद्र, नक्षत्रें, व सूर्य यांनां **वसु** असें म्हणतात; कारण यांच्यावर सर्व प्रकारचे पदार्थ व प्रजा वास करितात किंवा यांच्या योगानेंच सर्व प्रजांचें वास्तव्य होतें ज्या अर्थी हे निवासाचे हेतु आहेत त्या अर्थी त्यांना **वसु**, असें नांव आहे." पृथिवीप्रमाणेंच इतर गोल हि वसु आहेत तेव्हां त्यावर प्रजा राहूं शकेल यांत काय संदेह ? परमेश्वराच्या अनंत विश्वांतील हा पृथिवी नामक एक लहानसा गोल मनुष्यादि प्राण्यांनीं भरलेला आहे तर बाकीचे सर्व अगदीं रिकामे कसे असतील ? परमेश्वराचें कोणतेंहि कृत्य निष्प्रयोजन असूं शकत नाहीं, मग जर या असंख्य गोलांवर मनुष्यादि प्राणी नसले तर त्यांचें प्रयोजन तरी काय ? त्यांचें साफल्य तरी कशामध्यें आहे ? तात्पर्य याचा विचार करतां असें आढळून येतें या सर्व गोलांवर सर्वत्र मनुष्यादि प्राण्यांची वस्ती आहे. (प्र०) जशी या पृथिवीवरील मनुष्यांची आकृति आहे तशीच इतर गोलांवरील मनुष्यांची आहे कीं काय ? (उ०) या पृथिवीवरील चीनी, हबसी, आर्यावर्त युरोपादि देशांतिल लोकांचे अवयव व रंग, रूप व आकृति या मध्यें जसा थोडा थोडा भेद आहे तसाच लोकलोकान्तरामध्यें पण भेद असणारच; परंतु ज्या *जातीची सृष्टि या लोकांमध्यें आहे त्याच

---

* आकृतिर्ज्जाति लिंगाख्या, समानप्रसवात्मिका जातिः (न्याय. अ. २ आ. २ सू ७०,७१).

जातीची तशीच सृष्टि अन्य लोकांमध्यें आहे म्हणजे ज्या ज्या शरीराच्या भागीं नेत्रादि अंग आहेत त्याच जागीं लोकलोकान्तरांतील त्या जातीचे अवयवहि तसेच होत असतात. कारण पहा–

सूर्याचन्द्रमसौ धाता यथापूर्वमकल्पयत् ॥
दिवं च पृथिवीं चान्तरिक्षमथो स्वः ॥

ऋ. मं. १०।१९०॥

"परमेश्वरानें ज्याप्रमाणें सूर्य, चंद्र, द्यौः, भूमि, अंतरिक्ष व तत्रस्थ सुखविशेषदायक पदार्थ जसे पूर्वीच्या कल्पांत रचिले होते तसेच ते या सृष्टींतहि रचिले आहेत व सर्व लोकलोकान्तरामध्येंहि तसेच एकसारखे बनविले आहेत; त्यांत भेद मुळींच नाहीं." (प्र०) ज्या वेदांचा याठिकाणीं प्रकाश आहे, तेच वेद तेथेंहि आहेत कीं दुसरे? (उ०) हेच वेद असेच सर्वत्र आहेत. जशी एका राजाची नीति त्याच्या राज्यांत सर्वत्र सारखी असते तद्वतच एका परमेश्वराच्या राज्यांत वेदोक्त नीति ही एकसारखीच आहे. (प्र०) अहो जर जीव व प्रकृतिस्थ तत्वें हीं अनादि आहेत व तीं ईश्वरानें बनविलीं नाहींत, तर त्यांवर ईश्वराचा अधिकार तरी कां चालावा? कारण तीं स्वतंत्र आहेत (उ०) ज्याप्रमाणें राजा व प्रजा समकालींच असतात व राजाच्या आधीन प्रजा असते; त्याचप्रमाणें परमेश्वराच्या आधीन जीव व सर्व जड पदार्थ आहेत, जर परमेश्वर सर्व सृष्टिरचना करणारा आहे, तर तो जीवांला यथायोग्य कर्मीचीं फलें देतो, सर्वांचें यथायोग्य रक्षण करतो व जर तो अनंत सामर्थ्यवान् आहे, तर मग अल्पसामर्थ्यवान् जीव व सर्व जड त्याच्या आधीन कां नसावे? या करितांच जीव हा कर्म करण्यास स्वतंत्रच आहे; पण केलेल्या कर्मांचें फल भोगण्यास ईश्वराच्या व्यवस्थेनें तो परतंत्र आहे परमेश्वर सर्व शक्तिमान् असल्यामुळें स्वतंत्र असून तो सर्व विश्वांचें पालन व सृष्टीचा संहार करतो.

याप्रमाणें सृष्टिविद्येविषयीं संक्षेपानें लिहिलें, आतां पुढच्या समुल्लासांत विद्या, अविद्या, बंध, मोक्ष वगैरे विषयीं लिहिण्यांत येईल.

इति सुभाषाविभूषितः सृष्ट्युत्पत्तिस्थितिप्रलयविषयो नाम अष्टमसमुल्लासः संपूर्णः ॥ ८ ॥

अथ नवमसमुल्लासः ।

अथ विद्याऽविद्याबंधमोक्षविषयान् व्याख्यास्यामः ।

विद्यां चाऽविद्यां च यस्तद्वेदोभयꣳ सह ।
अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते ॥

यजु. ४०।१४॥

"जो मनुष्य (विद्या) यथार्थज्ञान व (अविद्या) कर्मोपासना यांनां, परस्पर एक दुसऱ्याबरोबर एकदम जाणतो, तो कर्मोपासनेच्या योगानें मृत्यूला तरून जाऊन (विद्या) यथार्थज्ञानाच्या योगानें मोक्षाला प्राप्त होतो." अर्थात् कर्म व ज्ञान यांची मोक्षप्राप्तीला आवश्यकता आहे.

(१) अविद्येचें लक्षण.

अनित्याशुचिदुःखानात्मसु नित्यशुचिसुखात्मख्यातिरविद्या ॥

योग० सा०

(१) हा संसार व देहादि पदार्थ हे अनित्य असतांहि नित्य वाटणें, जें कार्यजगत् प्रतीत होत आहे तें सदैव आहेच व नेहेमीं असेंच राहील, योगबलाच्या योगानें देवांचें हेंच शरीर सदैव राहतें अशी विपरीत बुद्धि होणें हा अविद्येचा प्रथम भाग आहे. (२) अशुचि अर्थात् मलयुक्त पदार्थ, कामादि विषय, चोरी, मिथ्या भाषण इत्यादि अपवित्र गोष्टी पवित्र आहेत असें मानणें हा दुसरा भाग आहे. (३) अनित्य विषयसेवनरूप दुःखांमध्यें सुख मानणें हा तिसरा भाग आहे. (४) अनात्म पदार्थांमध्यें आत्मबुद्धि करणें हा चवथा भाग आहे. या चार प्रकारच्या विपरीत ज्ञानाला अविद्या असें म्हणतात; याहून जी विपरीत आहे ती विद्या होय. जसें अनित्याला अनित्य व नित्याला नित्य, अपवित्राला अपवित्र व पवित्राला पवित्र, दुःखाला दुःख व सुखाला सुख, अनात्म्याला अनात्मा व आत्म्याला आत्मा समजणें ही विद्या व हेंच सत्य ज्ञान होय. "**वेत्ति यथावत् तत्त्वपदार्थस्वरूपं यया सा विद्या। यया तत्त्वस्वरूपं न जानाति भ्रमादन्यस्मिन्नन्यन्निश्चिनोति सा अविद्या ।**" "जिच्या योगानें पदार्थांच्या यथास्वरूपाचा बोध होतो तिला विद्या व जिच्या योगानें तत्त्वज्ञान होत नाहीं; भ्रमानें अन्याच्या ठिकाणीं अन्याची कल्पना होते तिला अविद्या असें म्हण-

तात." कर्म व उपासना यांला अविद्या असें म्हणतात, याचें कारण असें कीं, हे दोनहि प्रकार बाह्य व आंतरिक क्रियाविशेषाचे आहेत ज्ञानविशेषाचे नाहींत; म्हणूनच वरील मंत्रांत सांगितलें आहे कीं, शुद्ध कर्म व परमेश्वराची उपासना यांच्याच योगानें मृत्यु व दुःख यांतून पार होतां येतें." अर्थात् पवित्र कर्म, पवित्र उपासना व पवित्र ज्ञान यांच्या योगानेंच मुक्ति मिळते व मिथ्याभाषणादि अपवित्र कर्म, पाषाणमूर्त्यादिकांची उपासना, *(प्रतीकोपासना) व मिथ्याज्ञान यांच्या योगानें बंध होतो कोणीहि क्षणमात्रसुद्धां कर्म उपासना व ज्ञान यांनीं रहित असा असूं शकत नाहीं; म्हणून धर्मयुक्त सत्यभाषणादि कर्में करावींत व मिथ्याभाषणादि अधर्मयुक्त कर्में सोडावींत, हेंच मुक्तीचें खरें साधन आहे, यांत तिलप्राय शंका नाहीं.

(२) बंधमोक्षाची नित्यनैमित्तिकता.

(प्र०) मुक्ति कोणाला प्राप्त होत नाहीं? (उ०) जो बद्ध आहे त्याला मुक्ति प्राप्त होत नाहीं. (प्र०) बद्ध कोण आहे? (उ०) जो अधर्म व अज्ञान यांत फसलेला असा जीव आहे तो बद्ध होय, (प्र०) बंध व मोक्ष हे स्वाभाविक आहेत कीं नैमित्तिक? (उ०) नैमित्तिक आहेत, कारण जर ते स्वाभाविक असते तर त्यांची निवृत्ति झालीच नसती. (प्र०)

न निरोधो न चोत्पत्तिर्न बद्धो न च साधकः ॥
न मुमुक्षुर्न वै मुक्त इत्येषा परमार्थता ॥

गौडपादीय कारिका. प्र. २ का. ३२ ॥

ही मांडूक्योपनिषदावरील कारिका आहे. "जीव ब्रह्मच असल्यामुळें तो कधीं आवरणांत येत नाहीं, जन्म घेत नाहीं, बंधामध्यें पडत नाहीं, तो साधक नव्हे व तो साधनहि करीत नाहीं, हा कधीं बंधांतहि पडला नाहीं व कधीं मुक्तहि

---

* "न प्रतीके न हि सः । अ. ४-१-४" प्रतीकोपासनेचा या वेदान्त सूत्रांत निषेध आहे; कारण ज्याची उपासना करावयाची आहे, ज्याचें सान्निध्य करावयाचें आहे तें प्रतीक ब्रह्म नाहीं; उपासना ब्रह्माची करावयाची आहे ती ब्रह्मदृष्टीनें सिद्ध होवूं शकणारी आहे, प्रतीक प्राकृतिक पदार्थांचें असतें मनहि प्राकृतिक तत्वाच्या संमेलनानें बनलेलें महत्तत्व आहे त्याला एक ठिकाणीं स्थिर करून तदाकार करण्याकरितां प्राकृतिक साधनाची आवश्यकता आहे तरी पण तें वस्तुतः ब्रह्माचें प्रतीक म्हणतां यावयाचें नाहीं; पण आत्म्याची उपासना आत्म्याच्या ठिकाणीं करावयाची असते तेथें कोणतेंच प्रतीक उपयोगीं पडत नाहीं; सर्व प्राकृतिक वृत्तींचा पण तेथें निरोध झाला पाहिजे व सांख्यकार सांगतात; त्याप्रमाणें ध्यान साधलें पाहिजे ते ध्यान शब्दाची व्याख्या कशा करतात तें पहा.

"ध्यानं निर्विषयं मनः" मन विषयरहित करून आत्म्यानें परमात्म्याच्या सान्निध्यानें आनन्दाचा अनुभव घेणें त्याला उपासना म्हणतात जिचा गाढ निद्रेच्या द्वारा परमात्मा सर्व जीवांनां अनुभव देत असतो.

होत नाहीं. अर्थात् हा नेहेमींच मुक्त आहे." या कारिकेवरून जीव हा स्वाभाविक मुक्त आहे असें ठरत नाहीं काय? (उ०) हें म्हणणें बरोबर नाहीं, कारण जीवाचें स्वरूप अल्प असल्यानें तो आवरणांत येतो, शरीरासह प्रगट होत असल्यामुळें जन्म घेतो, कर्मफलाचा भोग घेऊन बंधामध्यें फसतो, बंधांतून सुटण्यासाठीं साधन करतो, दुःखत्यागाची इच्छा करतो, व शेवटीं परमेश्वराची प्राप्ति करून घेऊन सर्व दुःखांचा लय करून मुक्तिहि प्राप्त करून घेतो. (प्र०) अहो! हे तर देहाचे व अंतःकरणाचे धर्म आहेत, जीव हा पापपुण्यरहित साक्षिमात्र आहे, शीतोष्णादि हे शरीराचे धर्म असून आत्मा निर्लेप आहे. (उ०) देह व अंतःकरणें जड असल्यानें त्यांना शीतोष्णादि भोग होऊं शकत नाहींत. जो चेतन मनुष्यादि प्राणि आहे त्यालाच शीतोष्णादि भोग होऊं शकतात. प्राणहि जड आहेत त्यांला क्षुधापिपासा होऊं शकत नाहींत, पण प्राणयुक्त जीवाला क्षुधा तृष्णा लागतात. मनहि जड असल्यानें त्याला हर्षशोक होऊं शकत नाहींत, पण मनाच्या सहाय्यानें जीव हर्ष, शोक, दुःख, सुख यांचा उपभोग करूं शकतो; ज्याप्रमाणें चांगलें किंवा वाईट शब्दादि विषयांचें ग्रहण बहिष्करण जीं श्रोत्रादि इंद्रियें आहेत त्यांच्या द्वारें करून घेऊन जीव सुखी किंवा दुःखी होतो; त्याचप्रमाणें अन्तःकरण अर्थात् मन, बुद्धि, चित्त व अहंकार, यांच्या योगानें संकल्प, विकल्प, निश्चय, स्मरण व अभिमान हे जीव करित असल्यानें तो दंड व मान्यता याचा भागी होतो; ज्याप्रमाणें तरवारीनें मारणारा दंडनीय ठरतो, तरवारीला शिक्षा कोणी करीत नाहीं, त्याचप्रमाणें देहेंद्रिय, अंतःकरण व प्राण या साधनांच्या योगानें चांगलीं वाईट कामें करणाऱ्या जीवालाच सुख दुःख भोगावें लागतें; अर्थात् जीव हा साक्षी नसून कर्ता व भोक्ता आहे. कर्माचा साक्षी तो एकच अद्वितीय परमेश्वर आहे. जीव हा कर्में करणारा असून तो त्यांत लिप्त होतो, तो ईश्वरहि नव्हे व साक्षीहि नव्हे. (प्र०) ब्रह्माच्या अंतःकरणांत पडलेल्या प्रतिबिंबालाच जीव असें म्हणतात. जसा आरसा फुटल्यानें बिंबाची कोणत्याहि प्रकारची हानि होत नाहीं; त्याचप्रमाणें जोंपर्यंत अंतःकरण असेल तोंपर्यंत ब्रह्माचें प्रतिबिंब त्यांत राहतें व त्यालाच जीव असें म्हणतात, पण जेव्हां अंतःकरणोपाधि नष्ट होते तेव्हां जीव मुक्त होतो. (उ०) हें म्हणणें बालकोक्तीप्रमाणें निराधार आहे; कारण साकार व पृथक् अशा पदार्थांचें प्रतिबिंब साकारांत पडूं शकतें, तसें तें निराकार व एकमेकांत व्यापून असणाऱ्या पदार्थांचें प्रतिबिंब पडूं शकत नाहीं. तोंड साकार असतें व आरसा साकार असतो व ते पृथक् असतात; म्हणून तोंडाचें प्रतिबिंब आरशांत पडूं शकतें. ब्रह्म निराकार, सर्वव्यापक व कोणाहूनहि पृथक् नसल्यामुळें त्याचें प्रतिबिंबच पडूं शकत नाहीं. (प्र०) पहा! ज्याप्रमाणें गंभीर व

स्वच्छ अशा जलामध्यें निराकार व व्यापक आकाशाचें प्रतिबिंब पडतें; त्याचप्रमाण स्वच्छ अंतःकरणामध्यें परमात्म्याचा आभास पडतो; म्हणूनच त्याला "चिदाभास" असें म्हणतात. (उ०) आकाशापेक्षां जो स्थूल वायु आहे त्याचेंहि डोळ्यांनीं दर्शन होत नाहीं, अर्थात् आकाशाचें डोळ्यांला दर्शन होणेंच असंभवनीय होय, मग आकाशाच्या प्रतिबिंबाचें दर्शन तरं लांबच. (प्र०) अहो! हें जें वर नीळें व अंधुक कांहीं दिसतें तें आकाश नव्हे तर तें काय आहे? (उ०) पृथिवी, जल व अग्नि यांचे त्रसरेणु त्या ठिकाणीं आहेत ते निळे दिसतात. जलाच्या अंशामुळें निळेपणा दिसतो, पृथिवीच्या अंशामुळें अंधुक धुळीसारखा भास होतो व अग्नीच्या अंशामुळें त्या सर्वाला दृश्यपणा आलेला आहे. त्याचें जें पाण्यामध्यें प्रतिबिंब दिसतें तें आकाशाचें आहे असें समजणें चुकीचें आहे, (प्र०) अहो! ज्याप्रमाणें आकाशाचे घटाकाश, मठाकाश, मेघाकाश व महदाकाश असे भेद होतात, त्याचप्रमाणें ब्रह्माचेहि ब्रह्मांड व अंतःकरण या दोन उपाधींमुळें ईश्वर व जीव असे दोन भेद झाले असें कां समजूं नये? जेव्हां घटादि पदार्थ नष्ट होतील तेव्हां जसें महदाकाशच अवशिष्ट राहतें, त्याप्रमाणें अंतःकरणादि उपाधि नष्ट झाल्यानें सर्व ब्रह्मच अवशिष्ट राहील? (उ०) आकाशामध्यें घागर किंवा घर यांच्या योगामें कांहींच फेरबदल होत नाहीं. व्यवहारामध्येंहि "घागर घेऊन या" असें म्हणतात, "घागरींतील आकाश घेऊन या" असें म्हणत नाहींत; तात्पर्य ही आपली उपपत्ति ठीक नाहीं. (प्र०) ज्याप्रमाणें समुद्रांत मासे व इतर प्राणी फिरतात व हवेमध्यें पक्षी फिरतात त्याचप्रमाणें चिदाकाशरूप ब्रह्मामध्यें अंतःकरणें फिरत असतात, तीं स्वतः जड आहेत खरीं, पण सर्व व्यापक परमेश्वराच्या सत्तेनें–अग्नीच्या सान्निध्यानें लोखंड उष्ण होतें, त्याप्रमाणेंच–अन्तःकरणें चेतनाप्रमाणें काम करतात. निश्चल आकाशामध्यें पक्ष्यादि प्राणी जसे फिरतात, त्याचप्रमाणें निश्चल परब्रह्मामध्यें जीव फिरत असतात, असें असतां जीवाला ब्रह्म मानण्यामध्यें दोष कोणता? (उ०) जर सर्व व्यापक ब्रह्म अंतःकरणामध्यें प्रकाशमान् होऊन जीवरूप बनतें तर त्यामध्यें ब्रह्माचे सर्वज्ञत्वादि-गुण कांबरें येत नाहींत? जर आवरण झाल्यामुळें त्याचे ते गुण प्रकाशित होत नाहींत असें म्हणाल तर ब्रह्म खंडित व आवृत होतें असें म्हणावें लागेल; जर ब्रह्माला अखंडित आपण मानाल तर त्यामध्यें अंतःकरणांच्या पडद्यांनीं भेद उत्पन्न होऊं शकणार नाहीं; जर असा पडदा पडत नाहीं तर त्याची सर्वज्ञता कां दिसत नाहीं; जर तें आपल्या स्वरूपाला विसरून अंतःकरणासहित इतस्ततः चलन पावतेंसें दिसतें पण स्वरूपतः तें स्थिर आहे असें मानाल तर अंतःकरण जेथें जेथें जातें तेथील ब्रह्म भ्रांतियुक्त व अज्ञानी होतें व जेथून अंतःकरण निघून जातें तेथील ब्रह्म ज्ञानी, पवित्र व मुक्त होतें असें म्हणावें लागेल, कारण अंतःकरणाच्या योगा-

नेंच ब्रह्मामध्यें विकार होतो असें तुम्ही मानतां; पण असें मानल्यानें ब्रह्मामध्यें अंतःकरणांच्या योगानें कोठें केव्हां विघाड होईल हें सांगतां येणार नाहीं व बंध व मुक्ति क्षणिक होईल! तुम्ही म्हटल्याप्रमाणें जर वास्तविक स्थिति असती तर जीवाला पूर्वी पाहिलेल्या गोष्टींचें स्मरण राहिलें नसतें, कारण ज्या ब्रह्मानें अंतःकरणासहित होऊन जी वस्तु पाहिली, तें ब्रह्म–किंवा तो ब्रह्माचा अंश दुसऱ्या जागीं नसल्यामुळें, दुसऱ्या जागीं व दुसऱ्या काळीं पूर्वी पाहिलेल्या गोष्टींचें स्मरण राहूं शकणार नाहीं. तात्पर्य हेंच कीं, जीव व ब्रह्म हे भिन्न भिन्न आहेत एक नाहींत. नवीन वेदान्ती म्हणतात, आमच्या मतें हा सर्व अध्यारोप आहे. एका पदार्थावर दुसऱ्या पदार्थाचा आरोप करणें याला अध्यारोप असें म्हणतात; येथें ब्रह्माच्या ठिकाणीं सर्व जगाचा व सर्व व्यवहारांचा अध्यारोप करून जिज्ञासूला पूर्ण ब्रह्माची ओळख करून देणें हा हेतु आहे. वास्तविक पाहतां सर्वच ब्रह्म आहे. (**ऋषि०**) अध्यारोप करणारा कोण आहे? (**नवीन वे०**) जीव. (**प्र०**) जीव कोणाला म्हणतात? (**उ०**) अंतःकरणावच्छिन्न चेतनाला जीव असें म्हणतात. (**प्र०**) अंतःकरणावच्छिन्न चेतन दुसरा आहे कीं तोहि ब्रह्मच आहे? (**उ०**) तो ब्रह्मच आहे. (**प्र०**) तर मग काय ब्रह्मानेंच आपल्या ठिकाणीं खोटी कल्पना केली? (**उ०**) हो! यांत ब्रह्माची काय हानि? (**प्र०**) मिथ्या कल्पना करणाराला खोटा–असत्य–असें म्हणत नाहीं काय? (**उ०**) नाहीं, जें मन व वाणी यांच्या योगानें कल्पित किंवा कथित असतें त्याला असत्य असें म्हणतात. (**प्र०**) बरें, मन व वाणी यांच्या योगानें मिथ्या कल्पना करणारें व खोटें बोलणारें ब्रह्म मिथ्या कल्पित आणि वादी होणार नाहीं काय? (नवीन वेदान्ती म्हणतात) हो. आम्हांला इष्टापत्ति आहे. ऋषि म्हणतात, धन्य आहे तुम्हां नवीन वेदान्त्यांची! तुम्ही सत्यसंकल्प, सत्यस्वरूप व सत्यकाम परमेश्वराळाहि मिथ्या कल्पना करणारा वनविलात ,चोरानें कोतवालाला दण्ड करावा, या प्रकारची ही गोष्ट होय. तुम्ही मिथ्यावादी व असत्य संकल्पी आहांत व असें असतांहि तुम्ही आपला दोष ब्रह्मांमध्यें लावूं पाहतां काय? ब्रह्म वास्तविक एकरस, अखंड, सत्यसंकल्प, सत्यज्ञानी व सत्यकारी आहे, असत्यपणा हा तुमचा दोष असून त्याच्याशीं ब्रह्माचा मुळींच संबंध नाहीं. जिला तुम्ही विद्या म्हणतां ती शुद्ध अविद्या आहे व आध्यारोपहि मिथ्याच आहे. तुम्ही स्वतःला ब्रह्म समजतां व ब्रह्माला जीव समजतां यापेक्षां आणखी अज्ञान तें कोणतें असणार? जो सर्वज्ञ व सर्वव्यापक आहे तो परिच्छिन्न व बंधनयुक्त कधींहि होऊं शकत नाहीं. अज्ञान परिच्छिन्न, एकदेशी, अल्प, अल्पज्ञ, असा जीव आहे व त्याहून ब्रह्म निराळें आहे.

३ मुक्ति व बंध यांचें वर्णन.

(प्र०) मुक्ति कशाला म्हणतात? (उ०) "मुञ्चन्ति पृथग्भवन्ति भूतानि यस्यां सा मुक्तिः" जिच्यामुळें सुटका होते तिला मुक्ति असें म्हणतात. (प्र०) कशापासून सुटणें? (उ०) ज्यापासून सुटावें अशी इच्छा सर्व जीव करीत असतात त्यापासून. (प्र०) जीव कशापासून सुटण्याची इच्छा करतात! (उ०) दुःखापासून सुटावें अशी सर्व जीव इच्छा करतात. (प्र०) दुःखापासून सुटून काय प्राप्त करून घेतात व कोठें राहतात? (उ०) सुख प्राप्त करून घेतात व ब्रह्मांत राहतात. (प्र०) मुक्ति व बंध कशा कशा पासून होतो. (उ०) परमेश्वराची आज्ञा पालन करणें; अधर्म, अविद्या, कुसंग, कुसंस्कार इत्यादिकांपासून दूर राहणें; सत्यभाषण, परोपकार, विद्या, पक्षपातरहित न्याय व धर्म यांची वृद्धि करणें; पूर्वोक्त प्रकारानें परमेश्वराची स्तुति, प्रार्थना व उपासना करणें; योगाभ्यास करणें; विद्या शिकणें व शिकविणें; धर्मपूर्वक पुरुषार्थ करून ज्ञानाची उन्नति करणें; सर्वांत उत्तम साधनांचें सहाय्य घेणें व जें कांहीं करावयाचें असेल तें पक्षपातरहित न्यायधर्मानुसार करणें या साधनांच्या योगानें मुक्ति मिळते, व याहून विपरीत-ईश्वराज्ञाभंग वगैरे-कर्मांच्या योगानें बंध होतो. (प्र०) मुक्तिमध्यें जीवाचा लय होतो कीं तो विद्यमान असतो? (उ०) मुक्तिमध्यें जीव विद्यमान असतो व तो ब्रह्मामध्यें राहतो, (प्र०) ब्रह्म कोठें आहे? व तो मुक्त जीव एका ठिकाणीं राहतो कीं, स्वेच्छेनें पाहिजे तेथें संचार करतो? (उ०) ब्रह्म सर्वत्र पूर्ण आहे. त्याच्या आधारानें जीव सर्वत्र अव्याहत गति होऊन व विज्ञानानंदानें मुक्त होऊन स्वतंत्रपणानें संचार करतो; त्याला कोणताहि अडथळा होत नाहीं. (प्र०) मुक्त जीवाला स्थूल शरीर असतें कीं काय? (उ०) नाहीं. (प्र०) मग तो सुखाचा उपभोग कशानें घेतो? (उ०) त्याचें भौतिक शरीर नाश पावतें पण त्याचे सत्यसंकल्पादि स्वाभाविक गुण व सामर्थ्य हीं सर्व राहतात; त्यांच्या योगानें तो सर्व आनंदाचा भोग घेतो. पहा—

शृण्वन् श्रोत्रं भवति, स्पर्शयन् त्वग्भवति, पश्यन् चक्षुर्भवति, रसयन् रसना भवति, जिघ्रन् घ्राणं भवति, मन्वानो मनो भवति, बोधयन् बुद्धिर्भवति, चेतयंश्चित्तं भवति, अहङ्कुर्वाणोऽहंकारो भवति ॥ शतपथ ब्रा. १४ ॥

मुक्तिमध्यें भौतिक शरीर अथवा इंद्रियांचे गोलक वगैरे साधनें जीवात्म्याच्या बरोबर राहत नाहींत; पण त्याच्या बरोबर आपले स्वाभाविक शुद्ध गुण राहतात;

जेव्हां ऐकण्याची इच्छा करतो तेव्हां श्रोत्र, स्पर्श करूं इच्छितो तेव्हां त्वक्, पाहण्याची इच्छा करतो तेव्हां चक्षु, स्वाद घेऊं इच्छितो तेव्हां रसना, वास घेऊं इच्छितो तेव्हां नासिका, संकल्प विकल्प करण्याच्या वेळीं मन, निश्चय करण्याच्या वेळीं बुद्धि, स्मरण करावयाच्या वेळीं चित्त, व अहंकाराच्या वेळीं अहंकाररूप आपल्या स्वशक्तीनें जीवात्मा मुक्तांच्या अवस्थेमध्यें होतो. मुक्तिमध्यें त्याचें संकल्प मात्र शरीर होतें; ज्याप्रमाणें ह्या भौतिक शरीराच्या आधारानें असतांनां इंद्रियगोलकांच्या द्वारानें जीव आपलें कार्य करतो, त्याचप्रमाणें हें शरीर नसतांनाहि मुक्तिमध्यें आपल्या शक्तिनें तो सर्व आनंद भोग भोगतो. (प्र०) त्याची शक्ति किती प्रकाराची व केवढी आहे (उ०) मुख्य शक्ति एकच प्रकारची आहे, पण बल, पराक्रम, आकर्षण, प्रेरणा, गति, भीषण, विवेचन, क्रिया, उत्साह, स्मरण, निश्चय; इच्छा, प्रेम, द्वेष, संयोग, विभाग, संयोजक, विभाजक, श्रवण, स्पर्शन, दर्शन, स्वादन, गंधग्रहण व ज्ञान या चौवीस प्रकारच्या सामर्थ्यांनीं जीव युक्त आहे, यांच्या योगानेंच मुक्तीमध्येंहि तो आनंदाचा उपभोग घेतो; जर मुक्तिमध्यें जीवाचा लय झाला असता तर त्या सुखाचा उपभोग तरी कोणी घेतला असता ? जीवाच्या नाशाला मुक्ति असें म्हणणें व मुक्तिमध्यें जीवाचा नाश होतो असें म्हणणें हें अविचाराचें आहे. सर्व दुःखांतून सुटून, आनंदस्वरूप सर्वव्यापक अनंत परमेश्वरामध्यें आनंदानें राहणें, ही जीवाची मुक्ति होय. वदाः-

अभावं बादरिराह ह्येवम् ॥ वेदान्तद. ४।४।१०॥

बादरि हा व्यासाचा पिता होय. मुक्तीमध्यें जीव असतो व त्यासह मन असतें असें तो मानतो; अर्थात् मनाचा व जीवाचा मुक्तीमध्यें लय होतो असें पराशरमुनि मानत नाहींत. तसेंच—

भावं नैमिनिर्विकल्पामननात् ॥ वेदा. ४।४।११॥

जैमिनि आचार्य मुक्त पुरुषाबरोबर मना सारखें सूक्ष्म शरीर, इंद्रियें व प्राणादिक हीं विद्यमान असतात असें मानतात; अर्थात् यांचा अभाव* मानीत नाहींत. तसेंच—

---

*व्यवहारदशेंत सृष्टि असतांनां अन्तःकरणाचा अर्थात् लिंगदेहाचा अभाव होणें असंभव आहे. लिङ्गशरीराच्या उत्पत्तीचा हेतुच आत्मा आहे; त्याचा जर अत्यन्त अभाव होत नाहीं, तर लिंगदेहाचाहि अत्यन्त अभाव होत नाहीं; मात्र मुक्तींत जीव विवेकानें या प्राकृतिक लिङ्गशरीराचा अभिमानी होत नाहीं, म्हणून त्या शरीरानें व्यवहार करीत नाहीं.

द्वादशाहवदुभयविधं बादरायणोऽतः ॥ वेदा. ४।४।१२

व्यास मुनि मुक्तिमध्यें पूर्वोक्त साधनांचा भाव व अभाव हे दोन्ही असतात असें मानतात; अर्थात् शुद्ध सामर्थ्य युक्त जीव मुक्तिमध्यें* असतो व अपवित्रता, पापाचरण, दुःख व अज्ञानादिक हे नसतात असें व्यासांचें मत आहे. तसेंच—

यदा पञ्चावतिष्ठन्ते ज्ञानानि मनसा सह ॥
बुद्धिश्च न विचेष्टते तामाहुः परमां गतिम् ॥ कठो. २।६।१०॥

" जेव्हां शुद्ध मनयुक्त पंचज्ञानेंद्रियें जीवासह राहतात व बुद्धीचा निश्चय स्थिर होतो, तेव्हां त्या स्थितीला परमगति किंवा मोक्ष असें म्हणतात." तसेंच—

य आत्मा अपहतपाप्मा विजरो विमृत्युर्विशोकोऽविजि
घत्सोऽपिपासः सत्यकामः सत्यसङ्कल्पः सोऽन्वेष्टव्यः
स विजिज्ञासितव्यः स सर्वांश्च लोकानाप्नोति सर्वांश्च
कामान् यस्तमात्मानमनुविद्य विजानातीति ॥

छांदो. ८।७।१॥

स वा एष एतेन दैवेन चक्षुषा मनसैतान् कामान् पश्यन्
रमते॥ य एते ब्रह्मलोके तं वा एतं देवा आत्मानमुपासते
तस्मात्तेषा ँसर्वे च लोका आत्ताःसर्वे च कामाःस सर्वांश्च
लोकानाप्नोति सर्वांश्च कामान्यस्तमात्मानमनुविद्य
विजानातीति ॥ छांदोग्य ८ । १२ । मं० ५ । ६ ॥
मघवन्मर्त्यं वा इद ँ शरीरमात्तं मृत्युना तदस्याऽमृतस्या
शरीरस्यात्मनोधिष्ठानमात्तो वै सशरीरः प्रियाप्रियाभ्यां
न वै सशरीरस्य सतः प्रियाप्रिययोरपहतिरस्त्यशरीरं
वाव सन्तं न प्रियाप्रिये स्पृशतः ॥ छां. ८।१२।१॥

"परमात्म्यामध्यें पाप, जरा, मृत्यु, शोक, क्षुधा, तृषा हे गुण नाहींत, तो सत्यकाम व सत्यसंकल्प आहे, त्याला शोधावा व त्यालाच जाणण्याची इच्छा धरावी. पर-

* जीवाच्या स्वशक्तीचा भाव व दुःखरूपी सत्ता ज्यांत आहे अशा शरीराबरोबर विवेकानें भिन्न राहिल्यामुळें दुःखाचा अभाव ही मुक्त स्थिति होय. तसेंच, दुःखातून दूर होणें याला जीवाची मुक्तदशा म्हणतात; जीवाचा किंवा लिंगशरीराचा अत्यन्त अभाव यांचें नांव मुक्तिहोऊं शकत नाहीं; कारण ज्याचा भाव आहे त्याचा अत्यन्त अभाव होणेंच असंभव आहे.

मात्म्याच्या आश्रयानें मुक्त जीव सर्व लोकलोकांतरांला प्राप्त होऊन त्यांच्या सर्व इच्छा तृप्त होतात. जो परमात्मज्ञान प्राप्त करून घेऊन, मोक्षाचें साधन करणें व आपली शुद्धि करणें या दोन गोष्टी जाणतो, तो जीव मुक्तीला प्राप्त होऊन शुद्ध मन व दिव्य नेत्रांच्या योगानें सर्व कामनांला प्राप्त होत होत अत्यंत रममाण होतो. ज्या ब्रह्मलोकामध्यें अर्थात् दर्शनीय परमात्म्यामध्यें स्थित होऊन मोक्षसुखाचा उपभोग घेतात, त्या सर्वांतर्यामी परमात्म्याचीच मुमुक्षु लोक उपासना करतात; या उपासनेच्या योगानें त्यांनां सर्व लोक व सर्व कामना प्राप्त होतात, ते उपासक जे जे संकल्प करतात ते ते लोक त्यांना प्राप्त होऊन त्यांनीं इच्छिलेल्या सर्व कामना पूर्ण होतात; ते मुक्त जीव स्थूल शरीर सोडून संकल्पमय शरीराचा आश्रय करून परमेश्वरामध्यें सर्वत्र संचार करतात. कां कीं, जे शरीरानें युक्त असतात ते सांसारिक दुःखांतून सुटूं शकत नाहींत. जसें एक वेळ इंद्राला प्रजापतीनें सांगितलें कीं, "हे परमपूज्य धनयुक्त पुरुषा ! हें स्थूल शरीर मरणधर्मयुक्त आहे, व ज्याप्रमाणें सिंहाच्या तोंडांत बकरी असते; त्याप्रमाणें हें मृत्युच्या मुखांत पडलेलें आहे तें हें शरीर मृत्यु व शरीररहित जीवाचें निवासस्थान आहे; व म्हणूनच हा शरीरधारी जीव सुखदुःखांनीं सदोदित ग्रस्त झालेला असतो. संसारामध्यें असणाऱ्या शरीरासहित जीवाची सांसारिक प्रसन्नतेची निवृत्तिहि होत असते खरी, तरी तो सदैव आनंदांत नसतो; पण मुक्तावस्थेंतील शरीररहित जीव सदोदित ब्रह्मामध्येंच राहत असल्यामुळें, त्याला सांसारिक सुख दुःखांचा स्पर्श होत नाहीं, व त्यामुळें तो सदैव शुद्ध आनंदामध्येंच रममाण असतो".

(४) मुक्तींतून पुनरावृत्ति.

(प्र०) जीवाला मुक्ति मिळाल्यानंतर केव्हां तरी तो जन्ममरणरूपी दुःखांमध्यें पुनः येतो कीं नाहीं ? कारण:—

***न च पुनरावर्तते न च पुनरावर्तते इति ॥ छां. ८।१५॥**
अनावृत्तिः शब्दादनावृत्तिः शब्दात् ॥ वेदान्तद. ४।४।२३॥
यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ॥ गीता. ॥

इत्यादि वचनांवरून असें दिसतें कीं एकदां मुक्ति प्राप्त झाल्यावर पुनः त्याला संसारांत यावें लागत नाहीं. (उ०) मुक्ति झाल्यावरहि पुनरावृत्ति होते, कारण तसें वेदामध्यें लिहिलें आहे, पहा:—

---

* छान्दोग्य उपनिषदांतील पुरापाठ असा आहे कीं,

स खलु एवं वर्तयन्यावदायुषं ब्रम्हलोकमभिसंपद्यते न च पुनरावर्तते न च पुनरावर्तते

[छां० प्र० ८ खण्ड १५]

मुक्त जीव ब्रह्मायुष आहे तोंपर्यंत जन्ममरणरूपी दुःखांत येत नाहीं.

कस्य नूनं कतमस्यामृतानां मनामहे चारु देवस्य नाम ॥ को नो मह्या अदितये पुनर्दात् पितरं च दृशेयं मातरं च ॥ १ ॥ अग्नेर्वयं प्रथमस्यामृतानां मनामहे चारु देवस्य नाम ॥ सनो मह्या अदितये पुनर्दात् पितरं च दृशेयं मातरं च ॥ २ ॥

ऋ. मं. १।२४॥

" आम्ही कोणाचें नांव पवित्र आहे असें समजावें ? कोणता देव नाशरहित पदार्थांमध्यें मुख्य असून सदा प्रकाशस्वरूप आहे ? कोण आम्हांला मुक्तीच्या सुखाचा उपभोग करवून देऊन पुनः आम्हांला या संसारांत जन्म देऊन मातापित्यांचें दर्शन करून देतो ?" या प्रश्नांस उत्तरें—" आम्ही स्वप्रकाशस्वरूप, अनादि, सदामुक्त अशा परमात्म्याचेंच नांव पवित्र आहे असें समजावें; जो आम्हांला मुक्तिमध्यें आनंद प्राप्त करून देतो, व पुनः पृथिवीवर मातापित्यांशीं संबंध जोडून जन्म देतो, तोच मुक्तीची व्यवस्था करतो व तोच सर्वांचा स्वामी आहे." तसेंच—

इदानीमिव सर्वत्र नात्यन्तोच्छेदः ॥ सांख्य. १।१९९ ॥

"ज्या प्रमाणें सध्यां कांहीं जीव बद्ध आहेत व कांहीं मुक्त आहेत त्याच प्रमाणें सर्वदा स्थिति राहते. बंध व मुक्ति यांचा अत्यंत विच्छेद केव्हांहि होत नाहीं" तात्पर्य बन्ध जसा कायमचा नसतो त्याचप्रमाणें मुक्तिहि कायमची नसते. (प्र०)—

तदत्यन्तविमोक्षोऽपवर्गः ॥ न्यायद. १।२२

दुःखजन्मप्रवृत्तिदोषमिथ्याज्ञानानामुत्तरोत्तरापाये तदनन्तरापायादपवर्गः ॥ न्यायद. १।२॥

"दुःखाच्या अत्यंत—पूर्ण—विच्छेदालाच मुक्ति असें म्हणतात." "जेव्हां मिथ्या ज्ञान, अविद्या, लोभादि दोष, विषयादि दुष्ट व्यसनांमध्यें प्रवृत्ति, जन्म व दुःख यांची उत्तरोत्तर निवृत्ति झाल्यानें पाठीमागच्यांचा नाश होतो व याप्रमाणें शेवटीं दुःखांचा पूर्ण नाश झाल्यानें जो मोक्ष होतो तो सदोदित राहतो वारंवार बदलत नाहीं असें

असतां मुक्तींतून पुनरावृत्ति कशी होते ? (उ०) " अत्यन्तम् " हा शब्द " अत्यन्ताभाव " असा अर्थ दाखवीत नाहीं. " अत्यन्तं दुःखं अत्यन्तं सुखं चास्य वर्तते ।" या वाक्यांत "या मनुष्याला पुष्कळ दुःख व पुष्कळ सुख होतें" असा अर्थ आहे. तात्पर्य "अत्यन्तम्" शब्दाचा "पुष्कळ" असाच अर्थ होतो व हाच अर्थ "**तदत्यन्तविमोक्षो०**" या ठिकाणींहि घेतला पाहिजे; हा अर्थ ध्यानांत आणला असतां या वाक्यावरून मुक्तींतून पुनरावृत्ति होत नाहीं असें ठरत नाहीं. (प्र०) बरें, जर मुक्तींतूनहि जीव परत येतो, तर मग तो मुक्तावस्थेमध्यें तरी किति दिवस राहतो ? (उ०)—

ते ब्रह्मलोकेषु परान्तकाले परामृताः परिमुच्यन्ति सर्वे ॥

मुंडक. ३।२।६॥

' ज्यांनां मुक्ति प्राप्त होते ते जीव एक महाकल्पपर्यंत ब्रह्मामध्यें आनंदानें राहून, नंतर पुनः संसारामध्यें येतात." त्रेचाळीस लक्ष वीस सहस्र वर्षांची एक चतुर्युगी, दोन हजार चतुर्युगींची एक अहोरात्र, तीस अहोरात्रींचा एक महिना, बारामहिन्याचें एक वर्ष, व शंभर वर्षांचा एक **परान्तकाल** होतो; याप्रमाणें गणित करून मुक्तीचें सुख भोगण्याचीं किती वर्षें होतात तें जाणावें. (प्र०) पण सर्व लोक असेंच मानतात कीं मुक्तीमधून पुनः संसारांत जीव येत नाहींत तें सर्व खोटेंच काय ? (उ०) मुक्तिमधून पुनरावृत्ति होणारच, कारण जीवाचें सामर्थ्य, शरीरादि साधनें व त्याचे उपाय हे सर्व परिमितच आहेत, मग अशा परिमित साधनांच्या योगानें मिळविलेली मुक्ति अपरिमित कशी असूं शकेल? अनंत आनंद, अनंत कालपर्यंत भोगण्याचें सामर्थ्य, कर्म व साधन जीवांमध्यें नाहीं; म्हणून ते अनंत सुखाचा उपभोग घेऊं शकत नाहींत; ज्यांचें साधन अनित्य आहे त्यांचें फलहि अनित्यच असणार; शिवाय जर मुक्तीमधून जीव परत येत नसते तर या जगाचा उच्छेद झाला असता; कारण मुक्त होऊन एक एक जीव संसारांतून नाहींसा झाला असता. पण तसें होत नाहीं व पुनः पुनः ते पूर्वी सांगितलेल्या वर्षसंख्येनंतर संसारांत येत असल्यामुळें हा संसार प्रवाहरूपानें अनादि व अनंत असा चालला आहे. (प्र०) जितके जीव मुक्त होतात तितके जीव परमेश्वर नवीन बनवितो व त्यांनां संसारांत पाठवितो असें मानलें म्हणजे हा संसार प्रवाह अनादि होईल ? (उ०) असें मानलें तर जीवांला अनित्य मानावें लागेल, जे उत्पन्न होतात त्यांचा नाश अवश्य झालाच पाहिजे; तुमच्या मतानें त्यांनां मुक्ति मिळाली असतांहि त्यांचा नाश होऊं लागेल; व त्यामुळें मुक्ति अनित्य होईल; शिवाय मुक्तींच्या ठिकाणीं नेहेमीं भरतीच होत असल्यामुळें फार गर्दी होईल; कारण तेथें गेलेले तुमच्यामतें परत येत

नाहींत; तसेंच तेथें एकाच सुखाचा त्यांनां अनादिकालापर्यंत अनुभव येणार असल्यामुळें त्यांत त्यांनां सुख तरी काय वाटणार ? दुःखाच्या अनुभवावांचून सुखाची मातब्बरी ती काय ? अनेक रस आहेत म्हणून मधुर रसाला महत्त्व आहे; जर एखादा मनुष्य गोडच खाऊं लागला व दुसऱ्या कोणत्याहि रसाचा आस्वाद घेतला नाहीं तर त्यास पुढें गोडी समजणारहि नाहीं व अनेक कटु आदि रस खाऊन मग गोड खाल्लें असतां जशी त्याला त्याची मधुरता समजते, तशी ती एकाच मधुर रसाचें सेवन करणाराला समजत नाहीं; त्याचप्रमाणें संसारांतील दुःखांचा अनुभव घेतल्यानंतर मिळणाऱ्या मुक्तिसुखापासून खरा आनंद होतो; पण तेंच जर न संपणारें असलें तर त्यांत पुढें आनंद नाहींसा होईल, म्हणून पुनरावृत्तीची आवश्यकता आहे. मुक्त झालेला मनुष्य एक परान्तकालपर्यंत मुक्तिसुखाचा अनुभव घेतो व नंतर येथें फिरून येतो व पुनः साधन करून मुक्ति मिळवितो; अशी ही वस्तुस्थिति आहे, शिवाय परमेश्वर न्यायी असल्यानें तो नियमित कर्माचें अनियमित फल कसें देईल ? असें केलें असतां त्याचा न्यायीपणा कमी होतो. जितकी ज्याच्यामध्यें शक्ति असेल तितका भार त्यावर देणें हेंच समंजसपणाचें आहे, एक मण वजन उचलण्याची ज्याला शक्ति आहे त्याला जर दहा मण बोजा दिला तर त्याची निंदा होते; त्याचप्रमाणें अल्पज्ञ व अल्पसामर्थ्यवान् जीवावर अनंत सुखाचा भार घालणें हें ईश्वराला कधींहि योग्य होणार नाहीं. असो. परमेश्वर नवीन जीव उत्पन्न करतो हें म्हणणेंहि निर्मूल आहे व असें झाल्यानें सृष्टीचा प्रवाह केव्हांहि सारखा चालणार नाहीं, कारण ज्या कारणापासून जीव हें कार्य परमेश्वर करतो; त्यांत भर मुळींच पडत नसल्यामुळें त्याचा केव्हांना केव्हां तरी नाश होणारच व मग जीव उत्पन्न होणें बंद होऊन सृष्टीचा उच्छेद होईल; कारण तें जीव उत्पन्न होण्याचें कारण केवढेंहि मोठें असलें तरी त्यांतून खर्च मात्र होत आहे व भर मुळींच पडत नाहीं. पहा एखाद्या जवळ अत्यंत भरलेला जरी खजिना असला व तो त्यांत कांहीं भर न घालतां केवळ खर्च करूं लागला तर तो त्याचा खजिना केव्हांना केव्हां तरी रिकामा होणारच त्याच प्रमाणें जीवांच्या उत्पत्तिचें कारण समजावें. तात्पर्य हें संसारचक्र अव्याहत चालण्यास मुक्ति व पुनरावृत्ति यांची आवश्यकता आहेच. कांहीं दिवस कारागृहवास भोगण्यापेक्षां जन्म ठेप कोण पसंत करील ? मुक्तींतून पुनः परत न येणें ही एक प्रकारची कैदच आहे, भेद इतकाच कीं, त्यांत सक्त मजुरी नाहीं; तसेंच जीवाचा ब्रह्मामध्यें लय होणें हें समुद्रांत बुडून मरण्यासारखें आहे, तेव्हां तेंहि श्रेयस्कर नाहीं. (प्र०) अहो, जसा परमेश्वर नित्यमुक्त व पूर्ण सुखी आहे, त्याच प्रमाणें जीवहि मुक्त झाल्यानंतर नित्यमुक्त व पूर्ण सुखी राहील, असें असावयाला काय हरकत आहे ?

(उ०) परमेश्वराचें अनन्त स्वरूप, सामर्थ्य, गुण, कर्म, स्वभाव, हीं सर्व अनंत आहेत म्हणून तो अविद्या व दुःख यांत केव्हांहि पडत नाहीं. जीव मुक्त झाल्यावरहि तो शुद्ध स्वरूप, अल्पज्ञ व परिमित गुणकर्म स्वभाव युक्तच असतो, तो परमेश्वराप्रमाणें अनंत सामर्थ्य युक्त कधींहि होत नाहीं. (प्र०) मग ही मुक्तिहि जन्ममरणाप्रमाणेंच झाली मग हिच्या साठीं खटपट करून काय लाभ ? (उ०) मुक्ति जन्ममरणाप्रमाणें नाहीं, कारण छत्तीस हजार वेळां सृष्टीची उत्पत्ति व प्रलय होण्याला जेवढा समय लागतो, तितका वेळ जीव आनंदाचा उपभोग घेत असतो व त्याला त्या वेळामध्यें दुःखाचा लेशहि होत नाहीं ही काय लहान गोष्ट आहे ? आज भोजन केलें असतां पुनः उद्यां भूक लागते असें असूनहि तुम्ही क्षुधा निवारण्याचा उपाय करतां व एक कल्पान्तपर्यंत आनंद मिळत असतां त्याच्यासाठीं प्रयत्न करणें व्यर्थ समजतां हें महान् आश्चर्य होय. क्षुधा, तृषा, धन, राज्य, प्रतिष्ठा, स्त्री, संतान यांसाठीं जर प्रयत्न करणें आवश्यक आहे, तर मग मुक्तिसाठीं कां करूं नये ? जसें मनुष्य मरणार हें ठरलेलें असतांहि जगण्याचा उपाय मनुष्यें करतात, त्याचप्रमाणें मुक्तींतून पुनरावृत्ति असतांहि ती प्राप्त होण्याचे उपाय करणें आवश्यक आहे. (प्र०) मुक्तीचें साधन कोणतें.? (उ०) मुक्तीचीं साधनें पूर्वी सांगितलेलीं आहेत. आतां कांहीं विशेष साधनांविषयीं थोडेंसें सांगतों; ज्याला मुक्ति प्राप्त करून घेण्याची इच्छा असेल त्यानें दुःख उत्पन्न करणाऱ्या मिथ्याभाषणादि पापकर्मांचा त्याग करावा, व सुख देणाऱ्या सत्यभाषणादि धर्माचरणांचा स्वीकार करावा. जो कोणी दुःखाचा त्याग व सुखाची प्राप्ति यांची इच्छा करील त्यानें अधर्म सोडून धर्माचा आश्रय करावा; कारण दुःखाचें मूल पापाचरण व सुखाचें मूल धर्माचरण हें आहे. सत्पुरुषांच्या संगतीनें सत्यासत्य, धर्माधर्म, कर्तव्याकर्तव्य यांविषयीं विवेक करावा व त्यांतील भेद जाणावा; शरीर व पंचकोश यांसंबंधानें विवेक करावा. एक "**अन्नमयकोश**" हा त्वचेपासून अस्थिपर्यंत असणाऱ्या पदार्थांचा समुदाय, हा पृथिवीतत्त्वाचा बनलेला आहे. दुसरा "**प्राणमयकोश**" हा पंचप्राणांचा बनलेला आहे, जो बाहेरून आंत येतो तो "प्राण," आंतून बाहेर वायु जातो तो "अपान," जो नाभीमध्यें राहून सर्व शरीरांत रस पोंचवितो तो "समान," जो कंठांमध्यें राहून अन्नपानादि व्यवहार चालवितो व बलपराक्रम वाढवितो तो "उदान," व ज्याच्या योगानें सर्व शरीरांतील हालचाल व इतर चेष्टा जीवाच्या इच्छेनुरूप सहज होतात त्याला व्यान असें म्हणतात. या पांचहि प्राणांचा प्राणमयकोश बनलेला आहे. तिसरा "**मनोमयकोश**" या मध्यें मनासह अहंकार. वाक्, पाद, पाणि, पायु, उपस्थ या पांच कर्मेंद्रियांचा समावेश होतो. चवथा "**विज्ञानमयकोश**" यामध्यें बुद्धि, चित्त, श्रोत्र,त्वचा, नेत्र,

जिव्हा व नासिका या पंचज्ञानेंद्रियांचा समावेश होतो; यांच्याच योगानें जीव ज्ञानग्रहण वगैरे ज्ञानसंबंधी व्यवहार करतो. पांचवा "**आनंदमयकोश**" याच्या योगानें प्रीति, प्रसन्नता, न्यूनाधिक आनंद हीं होतात व कारणरूप प्रकृति या कोशाला आधार आहे. या पांचकोशांच्या योगानें जीव सर्वप्रकारचें कर्म उपासना व ज्ञान वगैरे व्यवहार करतो. या कोशांप्रमाणेंच जागृति, स्वप्न व सुषुप्ति अशा तीन अवस्था आहेत; तसेंच या जीवाला तीन शरीरें आहेत. जें आपल्याला दिसतें तें "स्थूल शरीर"; पंचप्राण, पंचज्ञानेंद्रियें, पंच सूक्ष्मभूतें, मन व बुद्धि या सतरा तत्त्वांच्या समुदायाला "सूक्ष्मशरीर" असें म्हणतात. हें सूक्ष्मशरीर जन्ममरणादि अवस्थांमध्यें जीवाबरोबर राहतें; याचे दोन भेद आहेत, एक भौतिक व दुसरें स्वाभाविक. सूक्ष्मभूतांच्या अंशानें बनलेल्याला भौतिक सूक्ष्मशरीर असें म्हणतात व दुसरें जीवाच्या स्वाभाविक गुणरूपानें बनलेलें असतें त्याला स्वाभाविक सूक्ष्मशरीर असें म्हणतात, हीं दोनहि सूक्ष्मशरीरें मुक्तीमध्येंहि जीवाला राहतात व यांच्या योगानेंच जीव तेथील आनंदाचा उपभोग घेतो; तिसरें कारणशरीर हें मूलप्रकृतीचें बनलेलें असल्यामुळें सर्वत्र विभु व सर्व जीवांला मिळून एक आहे; या शरीराच्या योगानें जीवांनां गाढ निद्रेचा अनुभव येतो. चवथें तुरीयशरीर, या शरीरामध्यें जीव जाऊन आनंदस्वरूप परमात्म्यामध्यें मग्न होतो. या समाधिसंस्कारजन्य शुद्ध शरीरापासून होणारा आनंद मुक्तीमध्येंहि तसाच होतो. या सर्व कोशावस्था व शरीरादिक यांहून जीव पृथक् आहे, कारण जेव्हां मनुष्य मरतो तेव्हां सर्व म्हणतात कीं, "या शरीरांतून जीव गेला." हाच जीव प्रेरक, कर्ता, धर्ता, साक्षी व भोक्ता असा आहे. जो मनुष्य जीव हा कर्ता भोक्ता नाहीं असें समजतो तो अज्ञानी आहे असें समजावें; कारण हे जे शरीरादिक जड पदार्थ आहेत, त्यांमध्यें सुखदुःखाचा भोग व पापपुण्याचें कर्तृत्व संभवतच नाहीं. हां, ही गोष्ट खरी आहे कीं, यांच्या सहाय्यानें जीव पापपुण्य करतो व त्यांचें फलहि भोगतो; जेव्हां इंद्रियें विषयांमध्यें, मन इंद्रियांमध्यें, आत्मा मनामध्यें संयुक्त होऊन प्राणांला प्रेरणा करतो, व वरीं वाईट कामें करण्यास लावतो तेव्हांच तो बहिर्मुख होतो, यावेळीं आंतून त्याला चांगलीं कामें करण्याविषयीं आनंद, उत्साह, निर्भयता व वाईट कामें करतांना भय, शंका, व लज्जा हीं उत्पन्न होतात, हेंच परमात्म्याचें शिक्षण आहे. **जो या शिक्षणाप्रमाणें वागतो त्याला मुक्तिजन्य सुखांचा लाभ होतो व** जो विपरीत आचरण करतो त्याला बंधजन्य दुःख भोगावें लागतें. हें एक साधन झालें. दुसरें साधन "वैराग्य" हें आहे. ज्या सत्यासत्याविषयीं आपली खात्री झाली असेल, त्यांतील सत्याचें ग्रहण करून असत्याचा त्याग करणें या निस्पृह आचरणाला विवेक असें

म्हणतात. वैराग्यामध्यें या विवेकाचेंच प्राधान्य असतें; तसेंच पृथिवीपासून परमेश्वरापर्यंत असणाऱ्या सर्व पदार्थांचें ज्ञान करून घेऊन-त्यांचे गुणकर्म स्वभाव जाणून-परमेश्वराची आज्ञा पालन करणें व त्याच्याच उपासनेमध्यें तत्पर राहणें, त्याच्या विरुद्ध आचरण न करणें, सृष्टीपासून उपकार करून घेणें, इत्यादि प्रकाराला विवेक असें म्हणतात; हें मुक्तीचें दुसरें साधन होय. शमदमादि " षट् संपत्ति " हें तिसरें साधन. यामध्यें सहा प्रकारचीं कर्में करावीं लागतात, तीं हीं:- (१) आपल्या आत्म्याला व अंतःकरणाला अधर्माचरणापासून सोडवून धर्माचरणांत तत्पर करणें याला " शम " असें म्हणतात. (२) श्रोत्रादि इंद्रियें व शरीर यांना व्यभिचारादि कुकर्मापासून निवृत्त करून जितेंद्रियत्वादि शुभकर्मांमध्यें प्रवृत्त करणें याला " दम " असें म्हणतात. (३) दुष्टकर्में करणाऱ्या पुरुषांपासून सदैव दूर राहण्याची इच्छा करणें याला " उपरति " असें म्हणतात. (४) निंदा, स्तुति, हानि, लाभ कांहीं झालें तरी आरंभलेलें मुक्तीचें साधन न सोडणें व हर्षशोकांत न फसणें याला " तितिक्षा " असें म्हणतात. (५) वेदादि सत्यशास्त्रांवर व त्यांतील ज्ञानानें प्रबुद्ध झालेल्या सत्योपदेशक आप्तपुरुषांवर विश्वास ठेवणें याला " श्रद्धा " असें म्हणतात. (६) चित्ताची एकाग्रता ठेवणें याला " समाधान " असें म्हणतात; ही षट्संपत्ति मिळून मुक्तीचें तिसरें साधन होतें. " मुमुक्षुत्व " हें चवथें साधन आहे; ज्याप्रमाणें क्षुधा व तृषा यांनीं आतुर झालेल्या माणसाला अन्न व जल यांशिवाय कांहीं सुचत नाहीं, त्याचप्रमाणें मुक्ति व मुक्तीचीं साधनें यांशिवाय ज्याची कशावरहि प्रीति नसते त्याला "मुमुक्षु" असें म्हणतात या चार साधनानीं युक्त जो पुरुष तोच मोक्षाचा " अधिकारी " समजावा. ब्रह्मप्राप्ति रूप मुक्ति हा प्रतिपाद्यविषय व वेदशास्त्रें हीं प्रतिपादक या दोहोंचें यथायोग्य ज्ञान होणें याला " संबंध " असें म्हणतात. सर्वशास्त्रांनीं प्रतिपादन केलेला ब्रह्मप्राप्तिरूप विषय ज्याचा आहे तो " विषयी " होय. सर्व दुःखांची निवृत्ति होऊन परमानंदाची प्राप्ति होणें हें " प्रयोजन " आहे. अधिकारी, संबंध, विषयी व प्रयोजन यांना अनुबंधचतुष्टय असें म्हणतात. यानंतर " श्रवणचतुष्टय " आहे व तेंहि मुक्तीला आवश्यक आहे. तें हें (१) कोणी विद्वान् उपदेशक जो उपदेश करील तो ध्यान देऊन ऐकणें, विशेषतः ब्रह्मविद्येचा उपदेश एकाग्रतेनें ऐकणें याला " श्रवण " असें म्हणतात. (२) जें ऐकलें असेल त्याविषयीं एकान्तामध्यें बसून विचार करणें, शंका येईल तीविषयीं ज्ञात्याकडून समाधान करून घेणें, वक्ता व श्रोता यांच्या सवडीप्रमाणें प्रश्नोत्तरें करून समाधान करून घेणें याला " मनन " असें म्हणतात. (३) जेव्हां ऐकण्यानें व मननानें एखाद्या गोष्टीविषयीं निःसंदेह खात्री होईल, तेव्हां ध्यानयोगानें समाधिस्थ होऊन, जी गोष्ट ऐकली

होती व विचारानें ठरविली होती ती तशीच आहे कीं नाहीं तें पाहणें याला " निदिध्यास " असें म्हणतात. (४) जसे पदार्थांचे गुणकर्मस्वभाव व स्वरूप असेल त्याप्रमाणें विनचुक जाणणें याला " साक्षात्कार " असें म्हणतात. याला श्रवणचतुष्टय असें म्हणतात; हें केल्यावर क्रोध, मलीनता, आलस्य, प्रमाद आदि तमोगुण, ईर्ष्या, द्वेष, काम, अभिमान, विक्षेप इत्यादि रजोगुण या दोनहि गुणाचा त्याग करावा व शांति, पवित्रता, विद्या, विचार इत्यादि सत्त्वगुणांचा स्वीकार करावा; त्याच प्रमाणें मुमुक्षुनें (मैत्री) सुखी जनांशीं मैत्री, (करुणा) दुःखी जनांवर दया, (मुदिता) पुण्यात्म्यांला पाहून हर्षित होणें, व (उपेक्षा) दुष्ट जनांशीं प्रेम किंवा वैर कांहीं न करतां त्यांची उपेक्षा करणें या रीतीनें लोकांशीं त्यानें आचरण ठेवावें. मुमुक्षूनें दररोज कमींत कमी दोन तासपर्यंत ध्यान करीत जावें, या ध्यानाच्या योगानें त्याला मन आदि आंतारिक तत्त्वांचा साक्षात्कार होईल. आपण चेतन स्वरूप व ज्ञानरूप असून मनाचा साक्षी आहे, जेव्हां मन शांत चंचल, आनंदित व विषाद युक्त होतें तेव्हां तें तसेंच आत्म्याला समजतें; यावरून, आत्मा हा साक्षी आहे असें ठरतें, तसेंच तो इंद्रियांदिकांचा व प्राणांचा ज्ञाता, पूर्वी पाहिलेल्या गोष्टींचा स्मरण कर्ता, एकाकालीं अनेक पदार्थांला जाणणारा, धारण व आकर्षण कर्ता, व सर्वांहून पृथक् असा आहे; जर तो पृथक् नसता तर तो स्वतंत्र कर्ता, प्रेरक व अधिष्ठाता कधींहि झाला नसता.

अविद्याऽस्मितारागद्वेषाभिनिवेशाः पञ्चक्लेशाः ॥ योगद. २।३॥

अविद्या, अस्मिता, राग, द्वेष व अभिनिवेश या पांच क्लेशांपैकीं अविद्येविषयीं मागें सांगितलेंच आहे. आत्म्याहून पृथक् असलेल्या बुद्धीला आत्मा समजणें याला "अस्मिता" असें म्हणतात. सुख देणाऱ्या पदार्थांवर प्रीति करणें याला "राग" असें म्हणतात. दुःखदायक पदार्थांवर अप्रीति करणें याला द्वेष असें म्हणतात. मी याच शरीरांत सदैव रहावें मरूं नये असें वाटणें याला "अभिनिवेश" असें म्हणतात. या पांच क्लेशांपासून योगाभ्यासजन्य विज्ञानानें सुटून ब्रह्मप्राप्ति करून घ्यावी व मुक्तीच्या आनंदाचा उपभोग घ्यावा. (प्र०) या भूमंडलावर अनेक मत-मतांतरें आहेत व ते प्रत्येक निरनिराळ्या स्थानप्राप्तीला मुक्ति असें समजतात; जैनी लोक एक शिळेला मोक्ष म्हणतात; ख्रिस्ती लोकांच्या मतें चवथें आकाश कीं जेथें विवाह, वाजा, वाजंत्रें व वस्त्रादिक उपभोगाच्या साधनांनीं सुख मिळतें, असें समजतात ती जागा; मुसलमान लोक सातव्या आकाशाला; वाममार्गी श्रीपुराला, शैव कैलासाला, वैष्णव वैकुंठाला, गोकुल गोसांवी गोलोकाला जाऊन तेथें उत्तम स्त्री अन्नपान वस्त्रपान प्राप्त करून घेऊन आनंदांत राहणें याला मुक्ति असें समजतात.

पौराणिक लोक (सालोक्य) ईश्वराच्या लोकामध्यें निवास, (सानुज्य) लहान भावाप्रमाणें ईश्वरासह राहणें, (सारूप्य) उपासनीय देवाच्या आकृतीप्रमाणें आपली आकृति बनणें, (सामीप्य) सेवकाप्रमाणें ईश्वराजवळ नेहेमीं राहणें, (सायुज्य) ईश्वरामध्यें मिळून जाणें या प्रकारच्या अनेक दर्ज्याच्या मुक्ति मानतात. वेदान्ती लोक ब्रह्मामध्यें लय होण्याला मुक्ति असें म्हणतात, या अनेक मतांमध्यें खरें काय आहे वरें ? (उ०) जैनी, ख्रिस्ती व मुसलमान यांच्या मतांसंबंधानें पुढें सविस्तर वर्णन करण्यांत येईल, त्यावेळीं त्यांच्या मुक्तीच्या कल्पनां संबंधानेंहि सांगूं. वाममार्गी लोक श्रीपुरांत जाऊन तेथें लक्ष्मीसदृश स्त्रियांशीं संग करणें, मद्यमांस वगैरे खाणें व रंगराग करणें याला मुक्ति असें मानतात, पण तो प्रकार येथील दुष्ट आचरणापेक्षां कांहीं विशेष नाहीं. शैव व वैष्णवलोक त्यांच्या त्यांच्या लोकाला जाऊन तेथें पार्वति व लक्ष्मी सारख्या स्त्रियांशीं सदैव राहणें व आपली आकृति शिव व विष्णू प्रमाणें बनविणें या गोष्टीहि वरप्रमाणेंच आहेत. या लोकांतील व्यसनी धनाढ्य पुरुषांच्या लीलांपेक्षां त्यांत काय जास्त आहे ? तेथें रोग होत नाहींत व सदैव तारुण्य राहतें हाच कायतो तेथें विशेष आहे असें ते सांगतात, पण विषयीपणा शिवाय या सर्वांत काय जास्त आहे ? वास्तविक पाहतां जेथें भोग तेथें रोग व जेथें रोग तेथें वृद्धावस्था ही परंपरा असणारच. पौराणिकांच्या चतुर्विध मुक्ति तर सर्व कीटपतंगादि प्राण्यांत सदैव असतातच, त्यांत ज्यास्त तें काय ? पहा:—ईश्वर सर्वत्र आहे व सर्व प्राणि ईश्वरांत आहेत; यावरून सर्वांना " सालोक्य " मुक्ति अनायासानें प्राप्त आहे. तो सर्वत्र असल्यानें " सामीप्य " मुक्तिहि सर्वांना आहेच. जीव हा ईश्वराहून लहान व ईश्वराप्रमाणें चेतन असस्यामुळें बंधूप्रमाणेंच आहे, अर्थात् " सानुज्य " मुक्ति स्वत: सिद्ध आहेच. परमेश्वर व्यापक व जीव व्याप्य असल्यामुळें " सायुज्य" मुक्तिहि सदैव जीवांला आहे. या मुक्ति सर्वांला सदैव मिळणाऱ्या असल्यानें यांचें कांहींच महत्त्व नाहीं. नास्तिक लोक मनुष्य मेल्यानंतर त्याचें शरीर पंचतत्त्वांमध्यें मिसळतें यालाच मुक्ति असें म्हणतात; ही अनायासानें कावळ्याकुत्र्यांलाहि मिळत असल्यानें विचारार्ह नाहीं. तात्पर्य, शिवपुर, गोलोक, शिला, चवथें आकाश, सातवें आकाश, श्रीपुर, कैलास, वैकुंठ, अशा प्रकारचें विशेष स्थान ही मुक्ति होऊं शकत नाहीं; कारण त्या स्थानांतून बाहेर गेल्यानें त्यांनां मुक्ति मिळणार नाहीं, विशेष स्थानीं राहणें व अमूक ठिकाणीं न जाणें ही स्थिति मुक्तीची नाहीं. मुक्तीमध्यें मुक्त जीवाची अव्याहत गति असली पाहिजे, तो पाहिजे तेथें अडथळ्यावांचून जाऊं शकेल; भय, शंका, दु:ख हीं त्याला होणार नाहींत; अशा आनंदमय अवस्थेला मुक्ति असें म्हणतात. पूर्वोक्त स्थानविशेष या मतमतांतरांनीं उभारलेल्या अनेक कल्पना होत; त्यांत कोणीहि फसूं नये.

(५) पुनर्जन्म.

(प्र०) जीवाला एकच जन्म घ्यावा लागतो कीं अनेक ? (उ०) अनेक. (प्र०) जर अनेक जन्म जीव घेतो तर पूर्वजन्म व मृत्यु यांचें स्मरण मनुष्याला कसें नाहीं ? (उ०) जीव हा अल्पज्ञ असून त्रिकालदर्शी नाहीं, म्हणून त्याला स्मरण राहत नाहीं; व ज्या मनाच्या योगानें त्याला ज्ञान प्राप्त होतें तेंहि एकाच कालीं दोन गोष्टींचीं ज्ञानें घेऊं शकत नाहीं, पूर्वजन्माचीं जर गोष्ट लांब राहो; पण याच जन्मांतील गर्भावस्थेंतील व जन्मल्यानंतर पांचवर्षापर्यंतची हकीगत याला आठवत नसते; जागृति व स्वप्न या दोन अवस्थेंत झालेल्या अनेक व्यवहारांचें त्याला सुषुप्तीमध्यें मुळींच भान नसतें. शिवाय " तुम्ही आपल्या वाराव्या वर्षी पांचव्या महिन्याच्या नवव्या दिवशीं दहावाजतां काय केलें होतें" असा जर कोणी कोणाला प्रश्न केला तर त्याला तो काय उत्तर देणार ? तात्पर्य या शरीरांतील तरी सर्व स्मरण जीवाला कोठें आहे ? जर या जन्मांतील आपणास स्मरण नाहीं तर तें मागच्या जन्मांतिल कसें असणार ? व मागच्या जन्मांतील स्मरण होत नाहीं ही एक चांगली गोष्ट आहे कारण मागचीं सर्व दुःखें आठवलीं असतीं तर जीवाला अतोनात दुःख झालें असतें; म्हणूनच परमेश्वरानें तें सर्व गुप्त ठेवलें आहे. जीवाला मागच्या व पुढच्या जन्मांतील ज्ञान, तो अल्पज्ञ असल्यामुळें, होऊं शकत नाहीं तें सदैव परमेश्वराला असतें. (प्र०) जर जीवाला पूर्वकर्मांचें स्मरण नाहीं, तर त्याला परमेश्वराकडून होणाऱ्या शिक्षांनीं त्याची सुधारणा कशी होणार ? जर त्याला अमुक अपराधासाठीं ही शिक्षा आहे असें समजलें तरच त्याची सुधारणा होईल. (उ०) ज्ञान जसें प्रत्यक्षानें होतें तसें तें अनुमानादिकांनींहि होतें. या जन्मांतील आयुष्यक्रमांमध्यें अनेक समयीं प्राप्त होणाऱ्या राज्य, धन, बुद्धि, विद्या, दारिद्र्य, निर्बुद्धता, मूर्खत्व, सुख, दुःख इत्यादि गोष्टींवरून पूर्वजन्माची कल्पना सहज करतां येते; जसें एखाद्याला एक रोग झाला असतां, जर तो वैद्य असेल तर त्याला त्याचें कारण बरोबर समजतें व वैद्य नसेल तर समजत नाहीं, तथापि दोघांनांहि इतकें समजतें कीं, आपणाकडून कांहीं तरी कुपथ्य झालेलें आहे व त्या कुपथ्यानें हा रोग झालेला आहे; त्याचप्रमाणें जगांतील सुखदुःखांची विचित्र घटना पाहून तीवरून पूर्वजन्माचेंहि अनुमान होऊं शकतें. कित्येकांनां जन्मतः दुःख व दुसऱ्या कित्येकांनां जन्मतः सुख होत असलेलें आपण पाहतों, जर त्याचा पूर्वजन्मांतील पापपुण्याशीं संबंध नसेल तर मग परमेश्वराच्या राज्यांत अन्याय आहे अशें म्हणावें लागेल; नाहींतर एक धनाढ्य व एक दरिद्री याची उपपत्ति बरोबर लागणार नाहीं; तात्पर्य विचारा अंतीं असें वाटेल कीं पूर्वजन्माच्या पापपुण्यानुसारच सुखदुःखांची व्यवस्था होते व त्यामु-

ळेंच परमेश्वरहि न्यायी आहे असें ठरतें. (प्र०) एकच जन्म मानला तरीहि परमात्मा न्यायकारी होऊ शकता कारण राजा आपल्या राज्यांत जो न्याय करील तोच तेथें रास्त न्याय आहे असें समजतात. माळी आपल्या बागेंत कांहीं लहान व कांहीं मोठीं झाडें लावतो, कांहीं कापून टाकतो व कांहींना उपटून फेंकतो. ज्याची जी वस्तु असते तिला तो पाहिजे तसा ठेवतो, त्याला दुसरा कोण विचारणार ? व ज्या अर्थी ईश्वरच सर्व सृष्टींत मोठा आहे व त्याच्यावर दुसरा कोणीहि नाहीं तेव्हां; तो जें करील तेंच न्याय्य असें समजणें भाग आहे हें न्याय्य व अन्याय्य म्हणण्याचा आम्हांस काय अधिकार ?(उ०) परमेश्वर न्याय करतो व अन्याय करीत नाहीं; म्हणूनच तो पूजनीय व श्रेष्ठ समजला जातो; जर तो वाटेल तें करील तर त्याला पूज्य कोण मानणार ? परमेश्वराच्या राज्यांत नियमाविरुद्ध व अन्यायाची गोष्ट परमेश्वराकडून होत नाहीं; म्हणूनच तो उपास्य आहे, जर एखादा माळी अयोग्य रीतीनें झाडें लावील किंवा तोडील तर त्याला कोणीहि कुशल समजणार नाहीं, तो विशिष्ट नियमांनीं आपलें काम करतो; म्हणूनच त्याला मान आहे,याचप्रमाणें सृष्टीविषयीं समजावें. परमेश्वर स्वभावतः पवित्र व न्यायकारी असल्यानें तो न्याय्य तेंच करतो, तो उन्मत्त मनुष्याप्रमाणें कांहींतरी करीत नाहीं. उत्तम काम करणाराची प्रतिष्ठा व दुष्टकाम करणाराची निंदा सर्व लोक करतात हा सार्वत्रिक अनुभव आहे. ज्याअर्थी ईश्वराची सर्व लोक स्तुति करतात व आजपर्यंत सर्व विद्वान् लोक त्याची स्तुति करीत आले आहेत, त्याअर्थी तो कधींहि अन्याय करीत नाहीं असें ठरतें. तात्पर्य, तो अन्यायहि करीत नाहीं व केव्हांहि न्याय करण्याला भीत नाहीं. (प्र०) अहो ! परमेश्वर जितकें ज्याला देऊं इच्छील तितकें त्याला देत असेल व जें काम करूं इच्छील तितकें करीत असेल ? (उ०) जीवांच्या कर्मानुसार तो ठरवितो, आपल्या इच्छेनें ठरवीत नाहीं. (प्र०) लहान मोठ्यांला त्यांच्या मानानें सुखदुःख होत असतें. मोठ्यांना सुखाप्रमाणें दुःखहि जास्तच असतें; एखाद्या सावकाराचा खटला राजाच्या कचेरींत असला तर सावकार पालखींत बसून कचेरीस जातो व भोई लोक त्याची पालखी उन्हांतून उघड्या पायांनीं नेत असतात हें पाहून लोकांनां वाटतें कीं, हा सावकार पुण्यात्मा असून ते भोई पापी आहेत; पण हा सर्व भ्रम होय; पालखी जस जशी कचेरी जवळ येते तसतशी सावकाराची चिंता वाढते, मी जिंकेन कीं नाहीं; यावद्दल त्याला शंका होऊन मोठी काळजी लागते, मी प्राड्विवाका (वकील) जवळ जाऊं, कीं शिरस्तेदाराजवळ जाऊं, कीं काय करूं, असें त्याला होऊन जातें; खटल्यांत जय झाला तर आनंद होतो पण जर पराजय झाला तर मात्र त्याच्या दुःखाला पारावार नाहींसा होतो; पण भोयांजवळ पाहिलें असतां, ते खुशाल आनंदानें तंबाकू पीत बसलेले दिसतात, त्यांनां कशाचीहि काळजी नसते; तसेंच श्रीमंतांना काळजीमुळें मऊ बिछान्यावरहि झोंप येत

नाहीं, पण त्यांनां उघड्या दगडावरहि झोंप येते, या तऱ्हेनें विचार केला असतां सुखी कोण ? याचा तेव्हांच निकाल लागतो. (उ०) सर्वांना सुख सारखें असतें तर एकाची स्थिति दुसऱ्याला पसंत पडली असती; सावकाराला भोई होण्यास सांगितलें तर तो कबूल होणार नाहीं, पण भोयांनां जर सावकाराच्या जागेवर बसविलें तर ते खुष होतील, त्याअर्थी भोयांच्या स्थितीपेक्षां सावकाराची स्थिति सुखदायक आहे, हें निःसंशय खरें आहे; उच्च दर्जाचा मनुष्य खालच्या दर्ज्यांत येऊं इच्छित नाहीं, कारण तेथें सुखापेक्षां दुःख जास्त असतें, पण खालच्या वर्गातील मनुष्य वरच्या वर्गात जाऊं इच्छितो, कारण तेथें दुःखापेक्षां सुख जास्त असतें; या अनुभवावरून सर्वांच्या स्थितींत सर्वांना सुख आहे असें होत नाहीं. पहा एक जीव विद्वान्, पुण्यात्मा, श्रीमान्, राजा अशांच्या घरीं जन्माला येतो व आजन्म सुख भोगतो; व दुसरा जीव अगदीं दरिद्र्याच्या घरीं जन्मास येतो व मरेपर्यंत दुःख भोगतो. एक जीव जन्मतः उत्तम घरांत राहून सुगंधियुक्त जलादिकांनीं स्नान करून चैन करतो, दूध पिण्याच्या वेळीं त्याला मिश्रीमिश्रित दूध मिळतें, त्याच्या सेवेला नोकर चाकर पुष्कळ असतात, खेळण्याला नानाप्रकारचे खेळ असतात, बाहेर जाण्याच्या वेळीं सुंदर गाडी घोडे असतात; पण दुसरा जीव जंगलांत उत्पन्न होतो, त्याला स्नानाला पाणी मिळत नाहीं, प्यावयाला दूध नसतें, खावयाला मागूं लागला असतां थप्पड मिळते, किंवा कोंडा खावयास मिळतो, व्याकूळ होऊन रडूं लागला तरी कोणीहि त्याला विचारीत नाहीं हा जो भेद आहे तो त्याच्या पूर्वजन्माच्या पापपुण्याईमुळेंच होतो; जर कर्में केल्याशिवाय परमेश्वर अशीं सुखदुःखें देऊं लागला तर मग स्वर्ग व नरक यांची योग्यता नाहींशी होईल, कारण तेहि पाहिजे त्याला कर्में न करतांहि मिळूं लागतील. अशा अव्यवस्थेनें अधर्माचें प्रस्थ माजेल व कोणालाहि कोणी विचारणार नाहीं. धर्माचें फल सुख हें मिळेलच अशी कोणाला जर खात्री राहिली नाहीं, तर मग धर्माचरण कोण करील ? पण परमेश्वराच्या राज्यांत कृतकर्मानुसार कर्त्याला फल मिळतें; म्हणूनच लोकांमध्यें धर्म कमीअधिक राहिला आहे. तात्पर्य, पूर्वकर्मानुसार कांहीं सुख दुःखें मिळतात व या आयुष्यांतील वर्त्यावाईट कर्मानुसार पुढच्या जन्मांत सुख किंवा दुःख मिळेल; अर्थात् पूर्वजन्म व पुनर्जन्म–हे आहेत. (प्र०) मनुष्य व पश्वादिक यांच्या शरीरांत जीव भिन्नभिन्न तऱ्हेचे आहेत कीं एकाच प्रकारचे ? (उ०) एकाच प्रकारचे, पण पापपुण्याप्रमाणें ते मलिन अथवा पवित्र असतात. (प्र०) मनुष्यांतील जीव पशूंमध्यें व पशूंमधील मनुष्यामध्यें जातो काय ? तसेंच स्त्रीमधील जीव पुरुषामध्यें व पुरुषामधील स्त्रीमध्यें जातो कीं काय ? (उ०) जेव्हां पाप जास्त होतें व पुण्य कमी होतें तेव्हां जीव पश्वादिकांमध्यें जातो, व जेव्हां पुण्य जास्त होतें व पाप कमी होतें तेव्हां जीवाला (देव) विद्वांनांचें शरीर मिळतें, व जेव्हा

पापपुण्य बरोबर असतें तेव्हां त्याला साधारण मनुष्यांचें शरीर मिळतें; यांतहि पुण्य-पापाच्या उत्तम, मध्यम कनिष्ठतेमुळें शरीरेंहि उत्तम, मध्यम व कनिष्ठ मिळतात. पश्वादिकांच्या शरीरांमध्यें पापांचा भोग झाल्यावर जेव्हां पापपुण्याची बरोबरी होते, तेव्हां तो पुनः मनुष्याच्या जन्मास येतो; व पुढें जसजशीं कर्में करील तसतशी त्याची परिस्थिति सुखदायक किंवा दुःखदायक होते. जीवाचा शरीराशीं संयोग झाला म्हणजे त्याला "जन्म" असें म्हणतात व वियोग झाला म्हणजे त्याला "मृत्यु" असें म्हणतात. जेव्हां जीव शरीर सोडतो तेव्हां तो (यमालय) आकाशस्थ वायूमध्यें राहतो (आकाशांतील वायूला "यम" अशी संज्ञा आहे. "**यमेन वायुना**" असें वेदामध्यें म्हटलेलें आहे. गरुडपुराणांतील कल्पित गोष्टी या सर्व असत्य आहेत.) नंतर धर्मराजाच्या (परमेश्वराच्या) नियमानुसार पाप-पुण्याच्या अनुरोधानें त्याला पुढचा जन्म मिळतो. वायु, जल, अन्न, शरीरछिद्रें यांच्या द्वारानें तो दुसऱ्याशरीरांत प्रवेश करतो, तेथें परमेश्वराच्या प्रेरणेनें जाऊन क्रमानें वीर्यामध्यें जाऊन, गर्भामध्यें राहून, शरीरधारण करून तो बाहेर येतो; जर त्याचीं कर्में स्त्रीचें शरीर धारण करण्यास योग्य असलीं तर स्त्रीचें, पुरुषांच्या शरीराला योग्य कर्में असलीं तर पुरुषाचें व नाहींतर नपूंसकाचें शरीर मिळतें. स्त्रीपुरुषांच्या संबंधाच्या वेळीं वीर्याधिक्यानें पुरुष, रजाधिक्यानें स्त्री व दोहोंच्या समत्वानें नपूंसक अशी प्रजा उत्पन्न होते. जों पर्यंत उत्तम कर्में, उपासना व ज्ञान मिळवून मुक्ति मिळवीत नाहीं; तोंपर्यंत जीव जन्ममरणाच्या फेऱ्यांत पडलेला असतो. जो जीव मुक्ति प्राप्त करून घेतो तो महाकल्पपर्यंत जन्म मरण दुःखांनीं रहित असा होतो. (प्र०) मुक्ति एकाच जन्मांत मिळते कीं, अनेक जन्मांत ? (उ०) अनेक जन्मांमध्यें, कारण–

भिद्यते हृदयग्रंथिश्छिद्यन्ते सर्वसंशयाः ॥
क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे ॥ मुंड. २।२।८॥

" जेव्हां जीवाच्या हृदयांतील अविद्या अज्ञानरूपी ग्रंथिका तुटून जाते, सर्व संशय दूर होतात, व जेव्हां दुष्ट कर्मांचा क्षय होतो तेव्हांच तो आंत व बाहेर व्यापून असणाऱ्या परमेश्वरांमध्यें निवास करतो. अर्थात् मुक्ति मिळवितो." (प्र०) मुक्तिमध्यें जीव परमेश्वरांत मिळून जातो कीं पृथक् राहतो ? (उ०) पृथक् राहतो; कारण जर तो परमेश्वरांत मिळून गेला तर मुक्तिचें सुख कोण भोगणार ? मुक्तीचीं अनेक साधनें करून जर तो त्यांच्या फलाचा उपभोग घेण्यास राहिला नाहीं तर त्यांचा उपयोग तरी काय ? परमेश्वरांत जीवाचा लय होणें ही त्याला मुक्ति नसून तो त्याचा प्रलयच होय. जीवाचा असा प्रलय होत नाहीं व तो मुक्तीच्या अवस्थेंतहि पृथक् राहतो व

मुक्तीचें सुख भोगतो. जेव्हां जीव परमेश्वराची आज्ञा पालन करतो, सत्संग करून उत्तम कर्में करतो, व योगाभ्यास करून पूर्वोक्त साधनें करतो तेव्हां त्याला मुक्ति मिळते. पहा—

सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म । यो वेद निहितं गुहायां परमेव्योमन् ॥
सोऽश्नुते सर्वान् कामान्सह । ब्रह्मणा विपश्चितेति ॥

तैत्ति. आनंद० १ ।

"जो जीवात्मा आपल्या बुद्धि व आत्म्यामध्यें असणाऱ्या सत्य, ज्ञान व अनंत आनंदयुक्त परमात्म्याला जाणतो, तो त्या सर्वव्यापक ब्रह्मामध्यें स्थिर होऊन, त्या (विपश्चित) अनंत विद्यायुक्त ब्रह्मासह सर्व कामनांची प्राप्ति करून घेतो; अर्थात् ज्या ज्या आनंदाच्या कामना त्याला होतात त्या त्या त्याला अडथळ्यावांचून प्राप्त होणें, याला मुक्ति असें म्हणतात." (प्र०) ज्याप्रमाणें शरीरावांचून जीवाला सांसारिक सुखें भोगतां येत नाहींत, त्याचप्रमाणें मुक्तिसुखाचाहि त्याला शरीराशिवाय उपभोग घेतां येणार नाहीं काय ? (उ०) याचें उत्तर पूर्वी दिलें आहे. त्यांत विशेष इतकाच आहे कीं, ज्याप्रमाणें शरीराच्या आधारानें सांसारिक सुखें भोगलीं जातात; त्याचप्रमाणें परमेश्वराच्या आधारानें मुक्तिसुख भोगलें जातें. मुक्त जीव अनंत व व्यापक ब्रह्मामध्यें पाहिजे तेथें फिरतो, शुद्ध ज्ञानानें सर्व सृष्टि पाहतो, अन्य मुक्तजीवांशीं मिळतो, सृष्टिविद्येला क्रमानें जाणतो, सर्व लोकलोकांतरांमध्यें यथेच्छ फिरतो, जे गोल दिसतात व जे दिसत नाहींत त्यांवरहि जातो, तो सर्व पदार्थांला जाणतो, अज्ञेय गूढाचें त्याला आकलन होतें, व ज्ञानाधिक्यानें त्याला आनंदहि अधिकाधिकच प्राप्त होतो. मुक्तिमध्यें जीवात्मा निर्मल होत असल्यामुळें, पूर्ण ज्ञानी बनतो व तो सर्व सन्निहित पदार्थांला योग्य रीतीनें जाणतो; यालाच सुखविशेष स्वर्ग असें म्हणतात. विषयतृष्णेमध्यें फसून दुःखें भोगणें हा नरक होय. **"स्वः सुखं गच्छति यस्मिन् स स्वर्गः ।" "अतो विपरीतो दुःखभोगो नरक इति।"** स्वर्गामध्यें दोन भेद आहेत. या संसारामध्यें जें सुख होतें त्याला सामान्य स्वर्ग असें म्हणतात व परमेश्वर प्राप्तीनें जें मुक्तिसुख मिळतें त्याला विशेष स्वर्ग असें म्हणतात, सर्व जीव स्वभावतः सुख मिळावें व दुःख मिळूं नये असें इच्छितात खरें, पण जों पर्यंत ते अधर्म सोडून धर्माचें अवलंबन करीत नसतात तों पर्यंत त्यांनां तें प्राप्त होत नसतें. पहा—**"छिन्ने मूले वृक्षो नश्यति तथा पापे क्षीणे दुःखं नश्यति ।"** जसें मूळ कापल्यानंतर वृक्षाचा नाश होतो; त्याचप्रमाणें पाप संपल्या-

नंतर दुःखाचा नाश होतो. मनुस्मृतीमध्यें पापपुण्याची पुष्कळ प्रकारें गति लिहिली आहे ती पहाः—

(६) पाप व शिक्षा.

मानसं मनसैवायमुपभुङ्क्ते शुभाशुभम् ॥
वाचा वाचा कृतं कर्म कायेनैव च कायिकम् ॥ ८ ॥
शरीरजैः कर्मदोषैर्याति स्थावरतां नरः ॥
वाचिकैः पक्षिमृगतां मानसैरन्त्यजातिताम् ॥९॥ मनु० १२ ॥

"हा जीव मनानें केलेल्या शुभाशुभ कर्मांचें फल मनानें भोगतो, वाणीनें केलेल्याचें वाणीनें भोगतो व शरीरानें केलेल्याचें शरीरानें भोगतो." "जो मनुष्य चोरी, परस्त्रीगमन, श्रेष्ठांला मारणें इत्यादि शारीरिक दुष्कर्में करतो त्याला स्थावर जन्म प्राप्त होतो;अर्थात तो वृक्षादिक होऊन राहतो. जो वाणीनें पाप करतो त्याला पक्षी व मृग यांचा जन्म मिळतो व जो मनानें दुष्ट कर्में करतो त्याला चांडालादिक योनींत जन्मावें लागतें."

(७) सत्व, रज व तम.

यो यदैषां गुणो देहे साकल्येनातिरिच्यते ॥
स तदा तद्गुणप्रायं तं करोति शरीरिणम् ॥ २५ ॥
सत्त्वं ज्ञानं तमोऽज्ञानं रागद्वेषौ रजः स्मृतम् ॥
एतद्व्याप्तिमदेतेषां सर्वभूताश्रितं वपुः ॥ २६ ॥ मनु० १२ ॥

"या जीवांच्या देहामध्यें जो गुण जास्त होतो, तो गुण त्या जीवाला त्या वेळीं आपल्या सारखा करतो." "जेव्हां आत्म्यामध्यें ज्ञान वाढतें, तेव्हां सत्त्वगुण; अज्ञान वाढतें तेव्हां तमोगुण व रागद्वेष वाढतात तेव्हां रजोगुण शरीरामध्यें वाढला आहे असें जाणावें. हे प्रकृतीतील तीन गुण सर्वत्र सर्वपदार्थांमध्यें व्यापलेले आहेत."

तत्र यत्प्रीतिसंयुक्तं किञ्चिदात्मनि लक्षयेत् ॥
प्रशान्तमिव शुद्धाभं सत्त्वं तदुपधारयेत् ॥ २७ ॥
यत्तु दुःखसमायुक्तमप्रीतिकरमात्मनः ॥
तद्रजोऽप्रतिपं विद्यात्सततं हारि देहिनाम् ॥ २८ ॥

यत्तु स्यान्मोहसंयुक्तमव्यक्तं विषयात्मकम् ॥
अप्रतर्क्यमविज्ञेयं तमस्तदुपधारयेत् ॥ २९ ॥ मनु. १२ ॥

" जेव्हां आत्म्यामध्यें प्रीति, शांति व शुद्धि वाढलेली दिसेल तेव्हां जाणावें कीं, सत्त्व गुण वाढला असून रज व तमोगुण कमीप्रमाणानें आहेत." "जेव्हा आत्मा व मन दुःखी, अप्रसन्न व विषयांमधून इकडे तिकडे गमन करीत आहे असें दिसेल तेव्हां जाणावें कीं रजो गुण वाढला असून सत्त्व व तम हे दबले आहेत." "जेव्हां आत्मा, व मन मोहानें युक्त होऊन सांसारिक पदार्थांमध्यें फसतात, अविवेकी होऊन विषयांत आसक्त होतात व जेव्हां ते तर्कवितर्करहित होतात तेव्हां समजावें कीं तमोगुण वाढला असून सत्त्व व रज हे कमी झाले आहेत."

त्रयाणामपि चैतेषां गुणानां यः फलोदयः ॥
अग्र्यो मध्यो जघन्यश्च तं प्रवक्ष्याम्यशेषतः ॥ ३० ॥
वेदाभ्यासस्तपो ज्ञानं शौचमिंद्रियनिग्रहः ॥
धर्मक्रियात्मचिन्ता च सात्त्विकं गुणलक्षणम् ॥३१ ॥
आरंभरुचिताऽधैर्यमसत्कार्यपरिग्रहः ॥
विषयोपसेवा चाजस्रं राजसं गुणलक्षणम् ॥ ३२ ॥
लोभः स्वप्नोऽधृतिः क्रौर्यं नास्तिक्यं भिन्नवृत्तिता ॥
याचिष्णुता प्रमादश्च तामसं गुणलक्षणम् ॥ ३३ ॥ मनु.१२॥

"आतां या तीन गुणांपासून जें उत्तम, मध्यम व कनिष्ठ फल मिळतें तें सांगतों." "वेदांचा अभ्यास, धर्मानुष्ठान, ज्ञानाची वृद्धि, पवित्रता, इंद्रियनिग्रह, धर्मक्रिया व आत्मचिंतन करण्याची इच्छा होणें हें सत्वगुणाचें लक्षण आहे." "जेव्हां रजोगुणाची वाढ होते तेव्हां आरंभशूरत्व, धैर्यत्याग, असत्कर्मे करण्याची आवड व निरंतर विषय सेवन, हे गुण दिसूं लागतात" व "जेव्हां तमोगुण वाढतो तेव्हां लोभ, आळस, निद्रा, भीरुत्व, क्रूरता, नास्तिक्य (वेद व ईश्वर यांवर अश्रद्धा), चित्ताची व्यग्रता, प्रमाद होणें, व व्यसनांत फसणें हे गुण दिसतात; यांतील लोभ हा सर्व पापांचें उगमस्थान आहे."

यत्कर्म कृत्वा कुर्वंश्च करिष्यंश्चैव लज्जति ॥
तज्ज्ञेयं विदुषा सर्वं तामसं गुणलक्षणम् ॥ २९ ॥

येनास्मिन्कर्मणा लोके ख्यातिमिच्छति पुष्कलाम् ॥
न च शोचत्यसंपत्तौ तद्विज्ञेयं तु राजसम् ॥ ३६ ॥
यत्सर्वेणेच्छति ज्ञातुं यन्न लज्जति चाचरन् ॥
येन तुष्यति चात्माऽस्य तत्सत्त्वगुणलक्षणम् ॥ ३७ ॥
तमसो लक्षणं कामो रजसस्त्वर्थ उच्यते ॥
सत्वस्य लक्षणं धर्मः श्रैष्ठ्यमेषां यथोत्तरम् ॥३८॥ मनु. १२॥

" जें कर्म केल्यानंतर, करीत असतां व करण्याची इच्छा झाली असतां करणाराला लज्जा, भय व शंका प्राप्त होते तें कर्म तामस आहे असें जाणावें." " ज्या कर्माच्या योगानें लोकांमध्यें आपली पुष्कळ ख्याति होईल असें इच्छितो, संपत्ति नसतांहि चारण भाटादिकांला देऊन आपले स्तुतिपाठ करवितो, तेव्हां त्यामध्यें रजोगुण वाढला असें जाणावें. " जेव्हां आत्मा सर्वांकडून ज्ञान ग्रहण करावें असें इच्छील, गुणग्रहण करीत जाईल, सत्कर्में करण्याला लाजणार नाहीं व धर्माचरणांत रुचि धरील तेव्हां समजावें कीं, त्यामध्यें सत्वगुण वाढला आहे. " " तमोगुणाचें काम हें लक्षण, रजोगुणाचें अर्थसंग्रह व सत्वगुणाचें धर्म हें लक्षण आहे. तमोगुणापेक्षां रजोगुण व रजोगुणापेक्षां सत्वगुण श्रेष्ठ आहे. " याप्रमाणें विचार करून मनुष्यांनीं आपणामध्यें जे जे कनिष्ठ गुण व स्वभाव असतील त्यांचा त्याग करून जे जे श्रेष्ठ गुण आत्मोन्नति कारक असतील त्यांचा स्वीकार करावा; आतां ज्या ज्या गुणाच्या योगानें जीवाला जी जी गति प्राप्त होते ती विषयीं पुढें सांगितलें आहेः—

(८) त्रिविधगति.

देवत्वं सात्त्विका यान्ति मनुष्यत्वं च राजसाः ॥
तिर्यक्त्वं तामसा नित्यमित्येषा त्रिविधा गतिः ॥ ४० ॥
स्थावराः कृमिकीटाश्च मत्स्याः सर्पाश्च कच्छपाः ॥
पशवश्च मृगाश्चैव जघन्या तामसी गतिः ॥ ४२ ॥
हस्तिनश्च तुरङ्गाश्च शूद्रा म्लेच्छाश्च गर्हिताः॥
सिंहा व्याघ्रा वराहाश्च मध्यमा तामसी गतिः ॥ ४३ ॥
चारणाश्च सुपर्णाश्च पुरुषाश्चैव दाम्भिकाः ॥
रक्षांसि च पिशाचाश्च तामसीषूत्तमा गतिः॥४४॥ मनु. १२॥

"सात्त्विक मनुष्यांना देवत्व–अर्थात् विद्वत्व, राजसिकांना मनुष्यत्व व तमोगुणी लोकांना नीचगतित्व प्राप्त होतें." "जे अत्यंत तमोगुणी असतात ते वृक्षादि स्थावर, कृमि, कीट, मत्स्य, सर्प, पशु, कच्छप, मृग यांच्या जन्माला पावतात." "जे मध्यम तमोगुणी असतात त्यांनां हत्ती, घोडा, शूद्र, म्लेच्छ, निंदित कर्म करणारे सिंह, व्याघ्र वराह यांचा जन्म मिळतो." "जे तमोगुणी लोकांमध्यें उत्तम असतात त्यांना चारण (कवितेच्या द्वारानें मनुष्यांची स्तुति करणारे) सुंदरपक्षी, दांभिक पुरुष (आपल्या सुखासाठीं आपली प्रशंसा करणारे), राक्षस (हिंसा करणारे), पिशाच (अनाचारी, मद्यादि सेवन करणारे, मलीन राहणारे) यांचा जन्म प्राप्त होतो."

भल्ला मल्ला नटाश्चैव पुरुषाः शस्त्रवृत्तयः ॥
द्यूतपानप्रसक्ताश्च जघन्या राजसी गतिः ॥ ४५ ॥
राजानः क्षत्रियाश्चैव राज्ञां चैव पुरोहिताः ॥
वादयुद्धप्रधानाश्च मध्यमा राजसी गतिः ॥ ४६ ॥
गन्धर्वा गुह्यका यक्षा विबुधानुचराश्च ये ॥
तथैवाप्सरसः सर्वा राजसीपूत्तमा गतिः ॥४७॥ मनु. १२ ॥

" जे कनिष्ठ रजोगुणी असतात ते (भल्ल) तलवार वगैरे हत्यारानें मारणारे व कुदळीनें खणणारे (मल्ल) नौका वगैरे चालविणारे व मल्ल (नट) जे नाड्यावरून कसरतीचीं कामें करतात, शस्त्रधारी, भृत्य, मद्यप्राशन करणारे यांच्या जन्माला जातात. " " जे मध्यम रजोगुणी असतात ते राजे, क्षत्रिय, क्षत्रियवर्णस्थ राजांचे पुरोहित, वादविवाद करणारे, दूत, प्राड्विवाक् (वकील, ब्यॅरिष्टर) युद्धविभागावरील अध्यक्ष यांच्या जन्माला जातात. " जे उत्तम रजोगुणी असतात ते (गंधर्व) गाणारे, (गुह्यक) वाद्यें वाजविणारे, (यक्ष) धनाढ्य, विद्वानांचे सेवक, उत्तम स्वरूपवान् स्त्रिया यांच्या जन्माला जातात. "

तापसा यतयो विप्रा ये च वैमानिका गणाः ॥
नक्षत्राणि च दैत्याश्च प्रथमा सात्त्विकी गतिः ॥ ४८ ॥
यज्वान ऋषयो देवा वेदा ज्योतींषि वत्सराः ॥
पितरश्चैव साध्याश्च द्वितीया सात्त्विकी गतिः ॥ ४९ ॥
ब्रह्मा विश्वसृजो धर्मो महानव्यक्तमेव च ॥
उत्तमां सात्त्विकीमेतां गतिमाहुर्मनीषिणः ॥ ५० ॥
इंद्रियाणां प्रसङ्गेन धर्मस्यासेवनेन च ॥
पापान् संयान्ति संसारानविद्वांसो नराधमाः ॥५२॥मनु.१२॥

" जे साधारण सत्त्वगुणी असतात, ते तपस्वी, यति, संन्यासी, वेदपाठी, विमान चालविणारे, ज्योतिषी व (दैत्य) देहपोषक असे होतात. " " जे मध्यम सत्वगुणी असतात ते यज्ञकर्ते, वेदाचा अर्थ जाणणारे, विद्वान्, वेदज्ञ, विद्युत् व कालविद्या यांना जाणणारे, रक्षक, ज्ञानी, व (साध्याः) कार्यसिद्धीसाठीं ज्यांची मदत होते असे अध्यापक यांच्या जन्माला येतात." "जे उत्तम सत्वगुणी असून उत्तम कर्मे करतात, ते (ब्रह्मा) सर्व वेद जाणणारा, (विश्वसृजः) सर्व सृष्टिविद्येला जाणून विमानादि विविध कला व यानें करणारे, धार्मिक, सर्वोत्तम बुद्धियुक्त-अव्यक्त, प्रकृतिवशित्व यांची सिद्धि मिळविलेले असे होतात." "जे इंद्रियांना वश होऊन विषयी बनतात, धर्म सोडून अधर्मीप्रमाणें वागतात, त्या अविद्वानांला मनुष्यांतील नीचस्थितिमध्यें जन्म प्राप्त होतो व ते अनंत दुःखें भोगित असतात." याप्रमाणें सत्व, रज व तम या तीन गुणांच्या सहाय्यानें जीव जीं जीं बरीं वाईट कामें करतो, त्या कामांचीं बरीं वाईट फलें त्याला प्राप्त होतात. जे मुक्त होतात त्यांना "गुणातीत" असें म्हणतात, कारण ते कोणत्याहि गुणामध्यें फसत नाहींत; म्हणून सर्वांनीं मुक्तीचें साधन करावें:-

(९) साधनांतील तत्त्व.

योगश्चित्तवृत्तिनिरोधः ॥ २ ॥

तदा द्रष्टुः स्वरूपेऽवस्थानम् ॥ ३ ॥ योगदर्शन पाद १

"मनुष्यानें रजोगुण व तमोगुण यांनीं युक्त असलेल्या कर्मापासून आपल्या मनाला निवृत्त करून, सत्वगुणयुक्त कर्मापासूनहि मनाला मागें हटवून केवल शुद्धसत्वगुणयुक्त व्हावें; नंतर त्याचाहि निरोध करून एकाग्र व्हावें—अर्थात् एक परमात्मा व धार्मिक कर्मे यांच्या अग्रभागीं मनाची स्थिरता करून बाकीच्या सर्व ठिकाणांपासून मनाला मागें हटवावें." "जेव्हां चित्ताची एकाग्रता व विरुद्धावस्था होते, तेव्हां सर्वद्रष्ट्या परमेश्वर स्वरूपामध्यें जीवात्म्याची स्थिति होते." इत्यादि मुक्तीचीं साधनें आहेत, व-

अथ त्रिविधदुःखात्यन्तनिवृत्तिरत्यन्तपुरुषार्थः ॥ सांख्य. १।१॥

(आध्यात्मिक) शारीरिक दुःखें (आधिभौतिक) दुसऱ्या प्राण्यांपासून उत्पन्न होणारीं दुःखें व (अधिदैविक) अतिवृष्टि, अतिताप, अतिशीत, अनावृष्टि, मनादि इंद्रियांची चञ्चलता इत्यादिकांपासून होणारीं दुःखें, या तीनहि प्रकारच्या दुःखांपासून सुटून मुक्ति मिळविणें हा अत्यंत पुरुषार्थ आहे.

याच्या पुढील विभागांत आचार व अनाचार, भक्ष्य व अभक्ष्य यांविषयीं लिहि लें जाईल

इति सुभाषाविभूषित विद्याऽविद्याबंधमोक्षविषयो
नाम नवमसमुल्लासः संपूर्णः ॥ ९ ॥

अथ दशमसमुल्लासः ।

अथाऽऽचाराऽनाचारभक्ष्याभक्ष्यविषयान् व्याख्यास्यामः ॥

(१) आचार व अनाचार.

धर्मयुक्त कर्मांचें आचरण, सुशीलता, सत्पुरुषांची संगति व सद्विद्येचें ग्रहण करण्यांत आनंद वाटणें, इत्यादिकांला आचार असें म्हणतात व याहून विपरीत जें वर्तन असतें; त्याला अनाचार असें म्हणतात, पहा—

विद्वद्भिः सेवितः सद्भिर्नित्यमद्वेषरागिभिः ॥
हृदयेनाभ्यनुज्ञातो यो धर्मस्तन्निबोधत ॥ १ ॥
कामात्मता न प्रशस्ता न चैवेहास्त्यकामता ॥
काम्यो हि वेदाधिगमः कर्मयोगश्च वैदिकः ॥ २ ॥
संकल्पमूलः कामो वै यज्ञाः संकल्पसंभवाः ॥
व्रता नियमधर्माश्च सर्वे संकल्पजास्स्मृताः ॥ ३ ॥
अकामस्य क्रिया काचिद् दृश्यते नेह कर्हिचित् ॥
यद्यद्धि कुरुते किंचित्तत्तत्कामस्य चेष्टितम् ॥४॥ मनु० २ ॥

"ज्याचें रागद्वेषरहित विद्वान् लोक नित्य सेवन करतात, हृदय व आत्मा यांनां जें सत्य कर्तव्य आहे असें वाटतें, तोच खरा धर्म आहे असें समजावें; व त्याचें आचरण सर्वांनीं करावें. तो धर्म हा आहेः"—"या संसारामध्यें अत्यंत कामात्मता व अत्यंत निष्कामता ही श्रेष्ठ गणली जात नाहीं; वेदार्थज्ञान व वेदोक्त कर्म हीं सर्व कामनेनेच सिद्ध होतात." "मी निरिच्छ व निष्काम होईन, असें कोणी म्हटलें तर तें असत्य आहे असें जाणावें; कारण सर्व यज्ञ, सत्यभाषणादि व्रतें, यमनियम व सर्व धर्माचरणें संकल्पापासूनच होत आहेत." "जी हस्त, पाद, नेत्र, मन इत्यादिकांची हालचाल होते, ती संकल्पानेंच होते; जर इच्छा मुळींच झाली नाहीं, तर मुळींच हालचाल होणार नाहीं. " तसेंच—

वेदोऽखिलो धर्ममूलं स्मृतिशीले च तद्विदाम् ॥
आचारश्चैव साधूनामात्मनस्तुष्टिरेव च ॥ ६ ॥

सर्वन्तु समवेक्ष्येदं निखिलं ज्ञानचक्षुषा ॥
श्रुतिप्रामाण्यतो विद्वान् स्वधर्मे निविशेत वै ॥ ८ ॥
श्रुतिस्मृत्युदितं धर्ममनुतिष्ठन् हि मानवः ॥
इह कीर्तिमवाप्नोति प्रेत्य चानुत्तमं सुखम् ॥ ९ ॥
योऽवमन्येत ते मूले हेतुशास्त्राश्रयाद् द्विजः ॥
स साधुभिर्बहिष्कार्यो नास्तिको वेदनिंदकः ॥११॥ मनु० २॥

" संपूर्ण वेद, मनुस्मृति व ऋषिप्रणीत इतर शास्त्रें, सत्पुरुषांचा आचार व ज्याच्या योगानें आपला आत्मा प्रसन्न होतो तीं कर्में–अर्थात् जीं करीत असतां मनाला भय, शंका व लज्जा हीं होत नाहींत–त्यांचें सेवन करणें हें सर्वांला उचित आहे. पहा ! जेव्हां कोणी मनुष्य चोरी करूं लागतो तेव्हां त्याच्या मनांत भय, शंका लज्जा हीं उत्पन्न होतात, म्हणून तें काम अधर्मयुक्त आहे असें समजून टाकावें. " " मनुष्यांनीं सर्व शास्त्रें, वेद, सत्पुरुषांचें आचरण व आत्मतुष्टि या चार प्रकारांनीं धर्माचा विचार करून, ज्ञाननेत्रांनीं धर्माचें निरीक्षण करून, त्याचें अवलंबन करावें. " " जो मनुष्य वेदोक्त धर्म व वेदार्थी विरुद्ध नसलेला स्मृत्युक्त धर्म, यांचें अनुष्ठान करतो; त्याला यालोकीं कीर्ति व मरणानंतर उत्तम सुख हीं प्राप्त होतात. " " वेदाला श्रुति व धर्मशास्त्राला स्मृति असें म्हणतात, यांच्या योगानें सर्वांनीं कर्तव्याकर्तव्याचा निश्चय करावा, जर कोणी वेदाचा व वेदानुकूल असणाऱ्या अन्य ग्रंथांचा अपमान करील, तर त्याला सर्व श्रेष्ठ लोकांनीं जातिबाह्य करावें; कारण जो वेदांची निंदा करतो त्याला नास्तिक असें समजावें."

(२) धर्माचें लक्षण.

वेदः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः ॥
एतच्चतुर्विधं ज्ञेयं साक्षाद्धर्मस्य लक्षणम् ॥ १२ ॥
अर्थकामेष्वसक्तानां धर्मज्ञानं विधीयते ॥
धर्मं जिज्ञासमानानां प्रमाणं परमं श्रुतिः ॥ १३ ॥

" वेद, स्मृति, सत्पुरुषांचा आचार व स्वतःच्या आत्म्याला ज्यांत आनंद होतो तें, हीं चार धर्माचीं लक्षणें आहेत–अर्थात् यांच्या सहाय्यानें सर्वांनीं धर्म कोणता व अधर्म कोणता हें जाणावें." " जे लोक (अर्थ) द्रव्य व विषय यांत फसलेले नाहींत त्यांनांच धर्माचें ज्ञान होतें व जे धर्म जाणण्याची इच्छा करतात, त्यांनां वेद हेंच एक मुख्य प्रमाण आहे. "

वैदिकैः कर्मभिः पुण्यैर्निषेकादिर्द्विजन्मनाम् ॥
कार्यः शरीरसंस्कारः पावनः प्रेत्य चेह च ॥ २६ ॥
केशान्तः षोडशे वर्षे ब्राह्मणस्य विधीयते ॥
राजन्यबंधोर्द्वाविंशे वैश्यस्य द्व्यधिके ततः ॥६५॥ मनु० २ ॥

" ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांनीं आपल्या संतानांचे निषेकादि संस्कार वेदोक्त कर्मपद्धतीनें करावे. या संस्कारांच्या योगानें इह जन्मीं व परजन्मीं पवित्रता प्राप्त होते. " " ब्राह्मणाचें सोळाव्या वर्षी, क्षत्रियाचें बावीसाव्या वर्षी, व वैश्याचें चव्वीसाव्या वर्षी केशान्तकर्म करावें. क्षौर (मुंडन) विधीला केशान्तसंस्कार असें म्हणतात." हा संस्कार केल्यावर केवळ शिखा तेवढीच वाढूं देऊन दाढी मिशा वगैरे सर्व केशांची हजामत वारंवार करीत जावें. शीतप्रधान देश असेल तर इच्छेप्रमाणें केश वाढवावे; व जर उष्णप्रधान देश असेल तर शिखेसहित मुंडन इष्ट असल्यास करावें; कारण जर उष्ण प्रदेशामध्यें डोक्यावर केंस जास्त वाढले तर डोक्यांत उष्णता जास्त वाढून बुद्धि मंद होते. दाढी, मिशा मोठ्या वाढूं दिल्यानें जेवते वेळीं त्रास होतो व त्यांत उष्टें अडकून राहतें, याकरितां सर्वांनीं आपल्या सोईप्रमाणें मुंडन करून इतर कर्में यथोचित करावीं.

(३) आत्मसंयमन.

इंद्रियाणां विचरतां विषयेष्वपहारिषु ॥
संयमे यत्नमातिष्ठेत् विद्वान् यन्तेव वाजिनाम् ॥ ८८ ॥
इंद्रियाणां प्रसङ्गेन दोषमृच्छत्यसंशयम् ॥
सन्नियम्य तु तान्येव ततः सिद्धिं नियच्छति ॥ ९३ ॥
न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति ॥
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्द्धते ॥ ९४ ॥ मनु. २ ॥

" ज्याप्रमाणें सारथी घोड्यांनां आवरून धरून सरळ मार्गानें त्यांनां घेऊन जातो, त्याचप्रमाणें विद्वानानें आत्मसंयमन करून, विषयांमध्यें मनाला गुरफटून टाकणाऱ्या इंद्रियांला आपल्या ताब्यांत ठेवावें. " " इंद्रियांला विषयासक्ति व अधर्म यांत चालविल्यानें खात्रीनें मनुष्याला दोष लागतो; पण जर त्यानें आपल्या इंद्रियांनां स्वाधीन ठेवून धर्ममार्गानें नेलें तर त्याला अभीष्ट सिद्धि मिळते." "ज्याप्रमाणें विस्तवामध्यें लांकडें व तूप घालीत गेल्यानें विस्तव विझत नाहीं, त्याचप्रमाणें विषयांचा उपभोग घेण्यानें कामेच्छा कमी होत नाहीं, इतकेंच नव्हें तर ती वाढते म्हणून मनुष्यांनीं विषयासक्त होऊं नये. "

वेदास्त्यागश्च यज्ञाश्च नियमाश्च तपांसि च ॥
न विप्रदुष्टभावस्य सिद्धिं गच्छन्ति कर्हिचित् ॥ ९७ ॥
वशे कृत्वेन्द्रियग्रामं संयम्य च मनस्तथा ॥
सर्वान्संसाधयेदर्थान् अक्षिण्वन् योगतस्तनुम् ॥ १०० ॥
श्रुत्वा स्पृष्ट्वा च दृष्ट्वा च भुक्त्वा घ्रात्वा च यो नरः ॥
न हृष्यति ग्लायति वा स विज्ञेयो जितेन्द्रियः॥९८॥ मनु० २॥

" जो पुरुष जितेंद्रिय नसतो त्याला वि-प्रदुष्ट असें म्हणतात, अशा मनुष्याकडून वेदार्थज्ञान, दान, यज्ञ, नियम किंवा धर्माचरण कांहीं एक होत नाहीं; पण जो जितेंद्रिय असतो त्याच्याकडून हे सर्व प्रकार होतात. " " म्हणून पांच कर्मेंद्रियें, पांच ज्ञानेंद्रियें व मन यांनां आपल्या ताब्यांत ठेवून, युक्ताहार विहार करून, शरीराचें रक्षण करून सर्व पुरुषार्थांची सिद्धि करून घ्यावी. " " ज्याला स्तुतीनें हर्ष होत नाहीं व निंदेनें शोक होत नाहीं, चांगल्या स्पर्शानें सुख व दुष्टस्पर्शानें ज्याला दुःख होत नाहीं, ज्याला उत्तम भोजनानें आनंद व निकृष्ट भोजनानें दुःख होत नाहीं, सुगंध व दुर्गंध यांवर जो रुचि किंवा अरुचि ठेवित नाहीं, त्याला जितेंद्रिय असें म्हणतात."

नापृष्टः कस्यचिद् ब्रूयान्न चान्यायेन पृच्छतः ॥
जानन्नपि हि मेधावी जडवल्लोक आचरेत् ॥ ११० ॥
वित्तं बंधुर्वयः कर्म विद्या भवति पञ्चमी ॥
एतानि मान्यस्थानानि गरीयो यद्यदुत्तरम् ॥ १३६ ॥

" कोणी प्रश्न विचारला नसतां किंवा कपटानें अथवा अन्यायानें विचारीत असतां, त्याला उत्तर देऊं नये. अशा कपटी लोकांच्या पुढें विद्वान् मनुष्यानें अज्ञानी मनुष्याप्रमाणें रहावें. जो निष्कपटी व जिज्ञासु असेल त्यानें विचारलें नसतांहि त्याला उपदेश करावा. " " धन, बंधु, वय, कर्म व विद्या हीं पांच मान्यता वाढविणारीं स्थानें आहेत. यांत धनापेक्षां बंधु श्रेष्ठ, बंधुपेक्षां वय श्रेष्ठ, वयापेक्षां कर्म श्रेष्ठ व कर्मापेक्षां पवित्र विद्या श्रेष्ठ आहे असें समजावें. "

(४) थोरपणा.

अज्ञो भवति वै बालः पिता भवति मन्त्रदः ॥
अज्ञं हि बालमित्याहुः पितेत्येव तु मन्त्रदम् ॥ १५३ ॥

न हायनैर्न पलितैर्न वित्तेन न बंधुभिः ॥
ऋषयश्चक्रिरे धर्मं योऽनूचानः स नो महान् ॥ १५४ ॥
विप्राणां ज्ञानतो ज्यैष्ठ्यं क्षत्रियाणां तु वीर्यतः ॥
वैश्यानां धान्यधनतः शूद्राणामेव जन्मतः ॥१५५॥ मनु. २ ॥

" शरीराचें वय केवढेंहि जरी असलें तथापि ज्याला विद्या व ज्ञान नसतें त्याला बालक असें म्हणतात व विद्या–विज्ञानाचा जो लोकांनां उपदेश करतो तो कितीहि जरी लहान असला तरी त्याला वृद्ध असें समजावें; कारण सर्व शास्त्रांनुसार व विद्वानांच्या मतानुसार अज्ञानी हा बाल असून ज्ञानी हा पिता होय. " " वय अधिक असल्यानें, केंस पांढरे झाल्यानें, किंवा कुटुंब मोठें असल्यानें मनुष्याला वृद्धत्व येत नसतें, पण जो विद्वान् असतो त्यालाच सर्व ऋषि व महात्मे लोक मोठा वृद्ध असें म्हणतात. " " ब्राह्मण ज्ञानानें, क्षत्रिय बलानें, वैश्य धनधान्यानें व शूद्र जन्मानें— अर्थात् वयानें—वृद्ध समजला जातो. "

न तेन वृद्धो भवति येनास्य पलितं शिरः ॥
यो वै युवाप्यधीयानस्तं देवाः स्थविरं विदुः ॥ १५६ ॥
यथा काष्ठमयो हस्ती यथा चर्ममयो मृगः ॥
यश्च विप्रोऽनधीयानस्त्रयस्ते नाम बिभ्रति ॥ १५७ ॥
अहिंसयैव भूतानां कार्यं श्रेयोऽनुशासनम् ॥
वाक् चैव मधुरा श्लक्ष्णा प्रयोज्या धर्ममिच्छता॥१५९॥मनु.२॥

" डोक्याचे केश पांढरे झाल्यानें मनुष्य वृद्ध होत नसतो, पण जो तरुण असतांहि मोठा विद्वान् असतो त्याला विद्वान् लोक वृद्ध असें म्हणतात." " जो मनुष्य व विशेषतः विप्र अध्ययन करीत नाहीं त्याची योग्यता लांकडाच्या हत्तीप्रमाणें किंवा चामड्याच्या मृगाप्रमाणें जाणावी. अविद्वानाला जगामध्यें नाममात्रानें मनुष्य म्हणतात, इतकेंच." "म्हणून विद्या शिकावी, विद्वान् व्हावें व वैरभाव सोडून सर्व प्राण्यांच्या कल्याणाचा उपदेश करावा; उपदेशाच्या वेळीं मधुर व कोमल वाणीचा प्रयोग करावा. जे पुरुष सत्य उपदेशाच्या योगानें धर्मवृद्धि व अधर्माचा नाश करतात ते धन्य होत. "

(५) स्वच्छता.

नित्य स्नान करावें, व आपलें वस्त्र, अन्न, पान, स्थान व सर्व इतर वस्तुमात्र स्वच्छ ठेवावें, कारण हे पदार्थ स्वच्छ असले तरच चित्त शुद्धि होऊन आरोग्य वाढतें व पुरुषार्थ करण्याचें सामर्थ्यहि वाढतें. मल व दुर्गंध यांचा पूर्ण नाश होईल अशी सर्वत्र स्वच्छता ठेवावी.

आचारः परमो धर्मः श्रुत्युक्तः स्मार्त एव च ॥ मनु० १।१०८॥

" सत्यभाषणादि कर्मांचें आचरण करणें हाच वेद व स्मृति यांत सांगितलेला आचार होय. "

(६) वडिलांशीं करावयाचें वर्तन.

मा नो वधीः पितरं मोत मातरम् ॥ यजु० १६।१५ ॥

आचार्यो ब्रह्मचर्येण ब्रह्मचारिणमिच्छते ॥

अथर्व० ११।१५।१७॥

मातृदेवो भव । पितृदेवो भव । आचार्यदेवो भव । अतिथि देवो भव ॥ तैत्तिरीयारण्यके ७।११॥

" माता, पिता, आचार्य व अतिथि यांची सेवा करणें याला देवपूजा असें म्हणतात. " ज्या ज्या कर्मापासून जगतावर उपकार होईल तें तें कर्म करणें व हानिकारक कर्म सोडून देणें हेंच मनुष्यमात्राचें मुख्य कर्तव्य आहे. नास्तिक, लोभी, विषयलंपट, विश्वासघातकी, असत्यवादी, स्वार्थी, कपटी, छळी वगैरे प्रकारच्या दुष्ट मनुष्यांची कधींहि संगति धरूं नये; पण जे परोपकारी, सत्यवचनी, धार्मिक असतील त्यांची संगति अवश्य धरावी हाच श्रेष्ठाचार आहे.

(७) परदेशगमन.

(प्र०) आर्यावर्तातील लोक इतर देशांत गेले असतां त्यांचा धर्म बुडतो व आचारभ्रष्ट होतो असें म्हणतात हें खरें काय ? (उ०) अन्यदेशांत गेल्यानें धर्मभ्रष्टता होत नाहीं, पण आचरण सोडल्यानें धर्मभ्रष्टता येते. बाह्याभ्यंतर शुद्धि, सत्यभाषणादि व इतर आचार जोंपर्यंत सोडले नाहींत तोंपर्यंत धर्मभ्रष्टता होण्याची भीति नको; शिवाय आर्यावर्तांत राहून जो दुष्टाचार करील तोहि धर्मभ्रष्ट होतो, तात्पर्य आचरण चांगलें राहिलें तर धर्म पाळला जातो; हा सिद्धांत मनांत धरूनच प्राचीनकाळचे लोक द्वीपद्वीपांतरीं जात असत. पहा—

मेरोर्हरेश्च द्वे वर्षे वर्षं हैमवतं ततः ॥
क्रमेणैव व्यतिक्रम्य भारतं वर्षमासदत् ॥
सदेशान् विविधान् पश्यन् चीनहूणनिषेवितान् ॥

—महाभारत. शांतिप. अ. ३२७॥

" एका वेळीं व्यास महर्षि शुकासह व सर्व शिष्यांसह पाताळ देशामध्यें—ज्या देशाला सध्यां अमेरिका असें म्हणतात त्या देशांत-गेले होते; तेथें त्यांचा बराच

काळपर्यंत निवास झाल्यानंतर शुकाचार्यांनें त्यांनां असा प्रश्न विचारला कीं, आत्म-विद्या इतकीच आहे कीं जास्त आहे ? व्यासांनीं आपल्या मुलाची मानसिक स्थिति जाणून त्याला कांहीं उत्तर दिलें नाहीं, कारण त्यांनीं एकदां आत्मविद्येचा त्याला उपदेश केला होता; आतां त्याला दुसऱ्याच्या साक्षीची आवश्यकता आहे असें जाणून त्याला ते म्हणाले कीं, हे शुका ! तूं मिथिला नगरीमध्यें जाऊन हाच प्रश्न राजा जनकाला कर; तो राजा या प्रश्नाचें योग्य उत्तर देईल, असें पित्याचें वचन ऐकून शुकाचार्य मिथिला नगरीस जाण्यासाठीं निघाला तो प्रथम **मेरुवर्ष**—उत्तरध्रुवाच्या आसमन्ताद्भागीं जो हिममय प्रदेश आहे त्याप्रदेशांतून हरिवर्षांमध्यें आला. ईशान्य, उत्तर, व वायव्य कोनांत जे देश आहेत त्यांचें हरिवर्ष हें नांव होतें. वानरांनां हरि म्हणतात; म्हणून ज्या देशांतील मनुष्यें रक्तमुखी व वानरांप्रमाणें भूरे नेत्रवान आहेत; त्यांनां संस्कृतांत हरिवर्ष म्हणत असत; ह्याच प्रदेशाला हल्लीं युरोप हें नांव आहे. मेरुवर्ष, हरिवर्ष, हें भरतवर्ष किंवा भारतवर्ष या देशांनां पहात पहात **हूण** (यहुदी लोकांच्या) देशांत प्रवास करून **चीन** देशांत आला. चीनांतून हिमालयाच्या बाजूनें मिथिला नगरींत त्यानें प्रवेश केला." तसेंच " श्रीकृष्ण व अर्जुन हे (अश्व-तरी) अग्नियान अथवा अग्निनौका नामक जलयानांत बसून पातालामध्यें गेले होते व तेथून युधिष्ठिरानें आरंभलेल्या यज्ञासाठीं उद्दालक ऋषीला घेऊन आले. " " धृतराष्ट्राचा विवाह **गांधार** (कंदाहार) देशांतील राजकन्येबरोबर झाला होता. " " पांडुराजाची स्त्री माद्री ही इराणच्या राजाची कन्या होती. " " अर्जुनाचा विवाह पाताल (अमेरिका) देशांतील उलूपी नामक राजकन्येबरोबर झाला होता." इत्यादि ऐतिहासिक कथांवरूनहि आपणास आढळेल कीं, प्राचीनकाळचे लोक देशदेशांतरीं व द्वीपद्वीपांतरीं जात येत असत व त्यांचा धर्म कायम राहत असे. मनुस्मृतीमध्यें नौकायानांवर कर घ्यावा असें सांगितलें आहे; त्यावरूनहि वरील गोष्ट सिद्ध होते. जेव्हां युधिष्ठिरानें राजसूययज्ञ केला होता; तेव्हां सर्व भूगोलावरील राजांनां निमन्त्रण पाठविण्यासाठीं भीम, अर्जुन, नकुल व सहदेव यांनां चार दिशांनां पाठविलें होतें; जर अशा रीतीनें परदेशगमनांत दोष असता तर ते कधींहि गेले नसते. तात्पर्य प्राचीन काळचे आर्यावर्तीतील लोक राजकार्य, व्यापार व देशदर्शन यांसाठीं सर्व देशांत प्रवास करीत असत. आजकालची स्पृष्टास्पृष्टतेची व परदेशगमनानें धर्मभ्रष्ट होतो ही कल्पना मूर्ख लोकांच्या अज्ञानांतून निघालेली आहे. जे मनुष्य देशदेशांतरामध्यें व द्वीपद्वीपांतरामध्यें जाण्याला भीत नाहींत, ते अन्य देशांत जाऊन तेथील अनेक विद्वानांशीं समागम करून, त्यांच्या रीति भाति पाहून, आपलें राज्य व व्यापार वाढवून, निर्भय शूरवीर होतात व दुसऱ्यांतील सद्व्यवहारांचा स्वीकार करून आपणामधील असद्व्यवहाराचा त्याग करतात व त्यामुळें मोठें ऐश्वर्य प्राप्त करून घेऊन सुखी होतात. ज्या मनुष्यांला परदेश-

गमनानें आपला धर्म बुडेल असें वाटतें, त्यांनां महाभ्रष्ट म्लेच्छकुलोत्पन्न वेश्यासमागमानें आचारभ्रष्टता येते असें वाटत नाहीं हें अत्यंत आश्चर्य नव्हे काय ? हां, ही गोष्ट खरी आहे कीं, मांसभक्षण व मद्यपान करणाऱ्यांच्या शरीराला व वीर्यादिकांनां जास्त दुर्गंधि येते व जर अशा लोकांशीं शुद्ध मनुष्य संगति करूं लागले तर त्या दुर्गंधाचा परिणाम यांच्याहि वर होऊं शकतो, म्हणून त्यांची संगति सोडावी; यावरून त्यांच्याशीं अगदीं लगटून राहणें चांगलें नव्हे एवढेंच ठरेल, पण त्यांच्याशीं इतर व्यवहार करणें, त्यांच्यांतील विद्या व इतर गुण यांचें ग्रहण करणें यांत कांहींच दोष नसल्यानें, मद्यपानादि दोष सोडून विद्यादि गुणांचें ग्रहण करण्यांत कांहींच हानि नाहीं. मूर्ख लोकांची मजल एथपर्यंत पोंचली आहे कीं, त्यांना पाहणें हें सुद्धां पाप आहे असें ते समजतात व म्हणूनच त्यांच्याशीं ते युद्धादि व्यवहार करूं शकत नाहींत, कारण युद्ध करावयाचें असतांनां त्यांनां प्रथम पहावें लागतें. धर्म हा आपल्या आत्म्याशीं संलग्न आहे. राग, द्वेष, अन्याय, व मिथ्या भाषणादि दोष सोडून देऊन निर्वैरता, प्रीति, परोपकार, सज्जनता इत्यादि गुण ग्रहण करणें हा सदाचार व हाच धर्माचार आहे. एवढें सर्वांनीं लक्ष्यांत ठेवावें कीं, जोंपर्यंत आम्ही उत्तम कामें करीत आहों तोंपर्यंत आम्ही कोणत्याहि देशांत अथवा द्वीपांत असलों म्हणून हरकत नाहीं, आह्मांला दोष लागणार नाहीं व जर आर्यावर्तात राहून पापाचरण केलें तर येथेंहि आमची आचारभ्रष्टता व धर्मभ्रष्टता होईल. तात्पर्य आचाराचा नाश झाल्यानें धर्माचा नाश होतो, परदेशगमनानें होत नाहीं. परदेशांत गेल्यानें तेथील लोक आपल्या मतांमध्यें आपणाला ओढून नेतील अशी कोणाला भीति वाटण्याचा संभव आहे पण त्याला उपाय असा आहे कीं, परदेशांत जाणाराला वैदिकधर्माचें ज्ञान असावें व पाखंडमताचें खंडण करण्याची शक्ति अवश्य असावी. देशदेशांतरीं व द्वीपद्वीपान्तरीं गेल्यावांचून व्यापार व राज्य यांची उन्नति व बढती कधींतरी होऊं शकेल काय ? जेव्हां आपल्या देशांत आपलेच व्यापारी व्यापार करतात, तेव्हां देशाची संपत्ति वाढणें शक्य नसतें; पण जेव्हां आपल्या देशांतील लोक बाहेर जात नाहींत व बाहेरच्या देशांतील लोक आपल्या देशांत येऊन व्यापार व राज्य करतात तेव्हां तेथें दारिद्र्य व दुःख यांशिवाय आणखी काय प्राप्त होणार ? पाखंडी लोक आपली प्रतिष्ठा व बडेजाव कायम ठेवण्यासाठीं इतर लोकांनां अज्ञानी ठेवतात, भोजनाच्छादनामध्यें स्पृष्टास्पृष्टतेचा बखेडा माजवितात व इतर लोक देशदेशांतरीं जाऊन शहाणे झाले तर ते आपणावर खरमरीत टीका करतील, या भीतीनें ते परदेशगमनाचे मार्ग बंद करण्यास मागें पुढें पाहत नाहींत. परदेशांत राहून मांसमद्यादि निषिद्ध पदार्थांचें सेवन केलें नाहीं म्हणजे झालें.

(८) स्पर्शास्पर्श.

या स्पृष्टास्पृष्टतेच्या अतिरेकानें एथपर्यंत मजल आली आहे कीं, प्रत्येकानें आप-आपली रोटी वनवून खावी; पण याचा परिणाम युद्धाच्या वेळीं पराजय हाच होतो. आपल्या हातानें करून खाण्यांत शक्तीचा अपव्यय होतो, युद्धाकडे तेवढें लक्ष्य कमी जातें, मध्येंच कोणी स्पर्श केला असतां उपाशीं रहावें लागतें व त्यामुळें नेटानें काम होत नाहीं. वास्तविक क्षत्रियांनीं एका हातांत रोटी व दुसऱ्या हातांत तलवार घेऊन स्पर्शाचा विचार न करतां शत्रूवर चढाई केली पाहिजे व विजय संपादन केला पाहिजे. हाच त्यांचा आचार होय व पराजित होणें हा अनाचार होय; या प्रकारच्या स्पर्शास्पर्शाच्या गोष्टींचा आर्यावर्तातील लोकांनीं वाजवीपेक्षां फाजिल पाल्हाळ माजवून, आपआपसांमध्यें मोठमोठे विरोध माजविले व स्वातंत्र्य, आनंद, धन, राज्य, विद्या व पुरुषार्थ यांनां पारखे होऊन, आतां डोक्यावर हात धरून बसले आहेत. आतां इच्छा करतात कीं, थोडेंसें आम्हांला कांहींतरी मिळावें, पण मिळत आहे कोठें ? अशा रीतीनें सर्व आर्यावर्ताचा नाश झाला आहे. चौका करूं नये किंवा स्वच्छता करूं नये असें आमचें म्हणणें मुळींच नाहीं, तीं अवश्य पाहिजे, झाडणें, सारवणें या गोष्टी अवश्य झाल्या पाहिजेत व खरकट्याचाहि वंदोबस्त नीट केला पाहिजे. ख्रिस्तियन् मुसलमानांप्रमाणें अस्वच्छता व भ्रष्टता कोणीहि करूं नये, पण त्यावरोवर आपआपसांत वैर वाढेल अशा तऱ्हेचेहि स्पृष्टास्पृष्टतेचे प्रकार व छूतछातीचे आचार वंद झाले पाहिजेत ? (प्र०) निर्लेप म्हणजे काय ? (उ०) जें अन्न दुधांत केलें जातें किंवा तुपानें भाजलें जातें तें निर्लेप म्हणतात व जें पाण्यांत शिजवितात त्याला निर्लेप म्हणत नाहींत; पण या सर्व गोष्टी धूर्त लोकांनीं चालविलेल्या पाखंडपैकींच आहेत. दुधांत भिजवणें व पाण्यांत भिजवणें एकच, पण दूध तूप ज्यांत ज्यास्त असेल ते पदार्थ स्वादिष्ट व शरीराला चांगले असल्यामुळें त्यांनां हे पाखंडी दोष मानीत नाहींत, पाहिजे त्याच्याकडून खातात, पण पाण्यांत तयार केलेले निःसत्व असल्यामुळें खात नाहींत ! याचप्रमाणें "कच्ची रोटी व पक्की रोटी" याविषयीं जाणावें. वास्तविक पाहतां अग्नीच्या सहाय्यानें पुरें परिपक्व झालेलें जें अन्न तें पक्कें व इतर कच्चें होय; पण दूध तूप ज्यांत विशेष आहे तेच पदार्थ हे लोक पक्के असे समजतात व हीन जातीकडूनहि घेऊन खातात. आतां कोणी म्हणेल कीं, पक्केच पदार्थ खावे, पण तेंहि ठीक दिसत नाहीं, चणे वगैरे कांहीं पदार्थ कच्चेहि खाल्ले जातात, तात्पर्य या पाखंडी लोकांचे निर्बंध त्यांच्या स्वतःच्या सोईपुरते आहेत. (प्र०) ब्राह्मणानें आपल्या हातानें अन्न शिजवून खावें कीं, शूद्रादिकांनां नोकरीला ठेवून त्यांच्याकडून अन्न शिजवून तें खावें ? (उ०) शूद्रांनीं शिजवलेलें अन्न खाण्यासहि हरकत नाहीं. पहा, ब्राह्मण विद्याव्यासंगांत,

क्षत्रिय राज्य पालन करण्यांत व वैश्य शेती व्यापार व पशुपालन करण्यांत तत्पर असतात, म्हणून त्यांच्या येथील सर्व परिचर्या–अन्न शिजवण्यापासून तों घर झाडून साफ करण्यापर्यंत–शूद्रांला करावयाची असते, मात्र शूद्रांच्या घरीं शूद्रांनीं शिजवलेलें अन्न आपत्कालाशिवाय द्विजांनीं खावूं नये, जेव्हां द्विजांच्या घरीं पाकादि संस्कार करण्यासाठीं शूद्र नेमले जातील तेव्हां त्यांवर द्विजांनीं देखरेख करावी. पहा—

आर्याधिष्ठिता वा शूद्राः संस्कर्तारः स्युः ॥

आपस्तंबधर्मसूत्र । प्रपाठक २। पटल २। खंड २। सूत्र ४ ॥

"आर्यांच्या–अर्थात् ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांच्या–देखरेखीखालीं शूद्रांनीं द्विजांच्या घरीं पाकादि संस्कार करावे." आर्यांच्या घरांमध्यें शूद्र अर्थात् मूर्ख स्त्रीपुरुष यांनीं पाकादिक करून त्या तीन वर्णांची सेवा करावी. हीं कामें करतेवेळीं त्यांनीं आपलें शरीर व वास्त्रादि पदार्थ उत्तम स्वच्छ ठेवावे. आर्यांच्या घरीं जेव्हा शूद्र अन्न तयार करण्यास येतील तेव्हां त्यांनीं तें काम करतेवेळीं तोंड बांधावें, नाहींतर त्यांच्या तोंडांतील उच्छिष्ट पदार्थ, लाळ किंवा त्यांचा श्वास अन्नांत पडून तें अन्न बिघडेल. त्यांनीं प्रतिदिन उत्तम स्नान करावें व प्रत्येक आठ दिवसांनीं हजामत करून नखें वगैरे साफ काढून चांगलें स्नान करावें व नंतर पाक करावा. द्विजांनां वाढून नंतर मग आपण जेवावें. (प्र०) अहो, शूद्र अन्नाला शिवला असतां तें दूषित झालें असें समजतात मग ते शूद्रांच्या हातचें कसें खाऊं शकतील ? (उ०) शूद्रांनीं शिवलेलें अन्न खात नाहींत हें म्हणणें आर्धी खोटें आहे, कारण दूध, तूप, साखर, गुळ, शाक, फळ, मूल, धान्य या पदार्थांला शूद्रच नव्हे तर धेड, चांभार, मुसलमान, ख्रिस्तियन् लोकहि स्पर्श करतात, शेतांत कामें करून ते पदार्थ उत्पन्न करतात, हेच लोक शेत कापतात, धान्य चाळतात, उंसाचा रस काढून गुळ व साखर करतात, शेतांमध्यें असतांनां तेथेंच मलमूत्रांचा उत्सर्ग करतात व अस्वच्छ हातांनीं सर्व धान्यांला स्पर्श करतात, गुळ करते वेळीं त्याच हातांनीं रस पितात व त्याच हातांनीं गुळाच्या ढेपी बनवितात, चिनी तयार करावयाच्या वेळीं वहाणाच्या पायांनींच ती चेंचतात मग त्या वहाणांला काय काय लागलेलें असतें तें ते पहातहि नाहींत त्या वहाणा चामड्याच्या असतात हें तर निराळें सांगावयाला नकोच, दुधामध्यें तर पाहिजे त्या भांड्यांतून पाणी घालतात व तें दूध सर्व लोक घेतात, याच प्रमाणें बाजारांत मिळणाऱ्या इतर पदार्थांविषयीं आहे; जर हे पदार्थ स्वच्छ आहेत असें समजून चालतात तर सर्वांनीं स्पर्श केलेले पदार्थ खाल्याशिवाय नाहींका होत ? मग आपस्तंब धर्म सूत्रकारांनीं सांगितल्याप्रमाणें शूद्रांकडून अन्न शिजवून घेऊन तें खाण्यास काय हरकत आहे ? (प्र०) मूल, फल, कंद व धान्य यांनां साक्षात्

स्पर्श केलेला नसतो म्हणून कांहीं दोष नाहीं, पण आपल्या डोळ्यांपुढें शूद्रानें तयार केलेलें अन्न कसें खावें ? (उ०) साक्षात् व परंपरेनें असा भेद आपण केला नसता तर तुम्हांला खावयाला कांहींच मिळालें नसतें. गुळ, साखर, खजूर गोड लागतो, दूध तूप पौष्टिक आहे, मीठाशिवाय चालत नाहीं व धान्य तर धुवून घेतां येतें या सबबीवर विशेषतः आपमतलबावर आपले धर्माचे सिंधु रचले गेले आहेत ! जर अदृष्टामध्यें दोष नाहीं असें म्हणतां तर तुमच्या दृष्टीच्या आड भंगी किंवा मुसलमान यांनीं शिजवून तें अन्न आणून ठेवलें तर तें तुम्ही खाल काय ? नाहीं, मग न पाहिल्यानें दोषाची निवृत्ति होते या म्हणण्यांत काय अर्थ आहे ? हां, मुसलमान व ख्रिस्ति मद्यमांसाचें सेवन करतात, त्यांच्या हातचें खाण्यानें मद्यमांसाशीं परंपरेनें संबंध घडतो, म्हणून त्यांच्या हातचें न खाणें उत्तम हें खरें, पण आर्यांमध्यें परस्पर रोटीव्यवहार होण्याला दोष कोणता ? जोंपर्यंत एक मत, एक हानिलाभ, एक सुखदुःख परस्परांमध्यें होणार नाहीं, तोंपर्यंत उन्नति होणें अशक्य आहे आतां केवळ खाणेंपिणें एकत्र केल्यानेंच सर्व उन्नति होणार नाहीं ही गोष्ट खरी आहे, पण असें झाल्यानें उन्नतीला अडथळे उत्पन्न होणार नाहींत. उन्नति इच्छिणारांनीं नेहेमीं वाईट गोष्टी सोडून उत्तम गोष्टींची आपल्यांत वाढ केली पाहिजे, असें जोंपर्यंत होणार नाहीं तोंपर्यंत अवनतिच होत जाईल यांत शंका नको. आपसांत फूट, मतभेद, ब्रह्मचर्याचा अभाव, विद्या न शिकणें व न शिकविणें, बालविवाह, अस्वयंवर, विषयासक्ति, मिथ्याभाषणादि कुलक्षणें, वेदविद्येच्या प्रसाराची बंदी इत्यादि कारणांमुळें आर्यावर्तातील लोकांचें राज्य गेलें व तेथें विदेशीयांचें राज्य झालें. जेव्हां आपसांत भाऊबंध झगडतात तेव्हांच विदेशी मध्यें पडून पंच बनतो. लोक हो ! काय तुम्ही पांच हजार वर्षांपूर्वी घडलेल्या महाभारतांतील गोष्टी विसरलांत ? भारतीय युद्ध चाललें असतां लढणारे वीर आपल्या वाहनांवर बसूनच खाणें पिणें हे व्यवहार करित होते. आपसांतील दुहीमुळेंच कौरव, पांडव व यादव यांचा नाश झाला व तोच रोग अजूनपर्यंत आर्यावर्ताच्या पाठीमागें लागलेला आहे; यापासून आणखी आर्यांचें किती नुकसान होणार हें कांहीं समजत नाहीं; त्याच स्वगोत्राचें हवन करणाऱ्या व स्वदेशाचा नाश करणाऱ्या दुर्योधनाच्या पद्धतीप्रमाणेंच आर्यलोक सध्यांहि चालत आहेत व दुःख भोगित आहेत हें केवढें आश्चर्य वरें ! परमेश्वरानें आतां आर्यावर्तावर कृपा करावी व या रोगाला दूर करावें !

(९) भक्ष्याभक्ष्य.

भक्ष्याभक्ष्य दोन प्रकारचें आहे एक धर्मशास्त्रोक्त व दुसरें वैद्यशास्त्रोक्त. पहा—

अभक्ष्याणि द्विजातीनाममेध्यप्रभवाणि च ॥ मनु० ५।५॥

" ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांनीं विष्टामूत्रादि मलिन पदार्थांच्या संसर्गापासून उत्पन्न झालेल्या कंद-मूल-शाक-फलांचें भक्षण करूं नये. " तसेंच—

वर्जयेन्मधु मांसं च ॥ मनु० २।१७७॥

" मद्य व मांस यांचेंहि सेवन करूं नये." मद्य, गांजा, भांग, अफू वगैरे सर्व मादक पदार्थ व तंबाकु वगैरे शरीरनाशक पदार्थ हे सर्व बुद्धीला मांद्य आणतात, पहा—

बुद्धिं लुम्पति यद्द्रव्यं मदकारि तदुच्यते ॥ शार्ङ्गधर४।२१॥

"ज्या ज्या द्रव्याच्या योगानें बुद्धीचा नाश होतो, त्या मादक द्रव्यांचें सेवन करूं नये." त्याचप्रमाणें जें अन्न कूजून, व बिघडून व दुर्गंधानें दुषित झालेलें असेल, जें उत्तम प्रकारें तयार केलें नसेल, जें मद्य व मांस खाणाऱ्या लोकांनीं तयार केलेलें असेल तें अन्न खाऊं नये. आपल्या अन्नासाठीं कोणाचीहि हिंसा करूं नये, व त्यांत सर्वांवर उपकार करणाऱ्या गाई सारख्या जनावराला मारणें हें तर फारच वाईट आहे. एका गाईपासून दूध, तूप, दहीं, ताक वगैरे पुष्टि देणारे पदार्थ उत्पन्न होतात, बैल उत्पन्न होऊन आमचें शेत नांगरतात, एकटी गाय आपल्या एका पिढीमध्यें चार लक्ष पंचाहात्तर हजार साहाशें मनुष्यांनां सुखी करते, म्हणून अशा उपयुक्त पशूला स्वतः मारूं नये व दुसरा मारीत असेल तर आपणाकडून होण्यासारखा जेवढा प्रयत्न असेल तेवढा करावा व त्याला मारूं देऊं नये. पहा, कित्येक गाई वीस शेर दूध देतात व कित्येक दोन शेर देतात; पण चांगल्या पद्धतशीर रीतीनें पाळलेल्या गाई सरासरी मानानें अकरा शेर दूध देतात असें म्हणण्यास हरकत नाहीं. तसेंच कित्येक गाई अठरा महिने पर्यंत दूध देतात व कित्येक सहा महिन्यांनीं आटतात, तेव्हां सरासरी मानानें एक वर्षपर्यंत गाय दूध देते असें म्हणण्यास हरकत नाहीं; या हिशेबानें पाहतां गाईच्या एका जन्मांतील दुधानें (२४९६०) चव्वीस हजार नऊशें साठ मनुष्यांची तृप्ति एक वेळ होऊं शकते. बहुधा प्रत्येक गाईला दहा किंवा बारा वासरें होतात, त्यांतून पांच बैल व पांच गाई झाल्या असें मानलें तरी त्याच गाईच्या जन्मामध्यें त्या (१२४८००) एक लक्ष चव्वीस हजार आठशें माणसांची एक वेळ तृप्ति करूं शकतील. व पांच बैल आपल्या आयुष्यांत (५०००) पांच हजार मण धान्य कमींत कमी उत्पन्न करूं शकतील या अन्नानें, प्रत्येकाला पाऊणशेर या प्रमाणानें, अडीच लक्ष मनुष्यांची तृप्ति होऊं शकते. अर्थात् दूध व अन्न मिळून (३७४८००) तीन लक्ष चवऱ्याहात्तर हजार आठशें मनुष्यांची एकवेळ तृप्ति होऊं शकते. तात्पर्य एका गाईच्या एका पिढीमध्यें—गाईचें दूध, तिच्यापासून उत्पन्न झालेल्या गाईचें दूध व बैलांनीं उत्पन्न केलेलें धान्य या

सर्वांनीं मिळून–(४७५६००) चार लक्ष पंचाहात्तर हजार सहाशें मनुष्यें एकवेळ तृप्त होतात; व पुढच्या त्यांच्यापासून उत्पन्न होणाऱ्या संततीचा हिशोब केला तर त्यांपासून असंख्यात मनुष्यांचें पालन होऊं शकतें असें आपणास आढळेल; या शिवाय बैलांची गाडी वगैरे वाहनें ओढण्याच्या कामीं मनुष्यांनां उपयोग होतो तो निराळाच. गाईप्रमाणेंच म्हैस ही दुधाचा पुरवठा करते व लोकांच्या उपयोगीं पडते, पण गाईच्या दुधातुपापासून जशी मनुष्यांच्या बुद्धीची वाढ होते तशी म्हशीच्या दुधातुपानें होत नाहीं; म्हणून सर्व आर्यांनीं गाईचें रक्षण व वर्धन करावें. सर्व विद्वानांचें या बाबतींत ऐकमत्य आहे. गाईप्रमाणें बकरीच्या एका पिढींतील दुधापासून (२५९२०) पंचवीस हजार नऊशें वीस मनुष्यांचें एकवेळ पोषण होतें. व त्याचप्रमाणें म्हैस, रेडे, घोडे, उंट, हत्ती, गाढव इत्यादि पशूंपासून पुष्कळ प्रकारें मनुष्यांनां सहाय्य मिळतें. अर्थात् या पशूंनां मारणारा किती लोकांनां दुःख देतो याचा यावरून विचार करतां येईल; शिवाय याचाहि येथें विचार करावा कीं एका पशूला मारून त्याच्या मांसापासून किती मनुष्यांची एका वेळची तृप्ति होईल व पशूंचें संरक्षण करून त्यांच्या दुधापासून किती मनुष्यांची एका वेळची तृप्ति होईल, हें पाहिलें असतां पशूंपासून मांस भक्षण करण्यांत कसा व किती तोटा आहे हें सहज समजेल; जेव्हां या देशांत आर्यांचें राज्य होतें तेव्हां गौ आदिक पशूंचें सर्वत्र रक्षण होत होतें, व त्यामुळें या भूमंडलावर सर्व लोक आनंदानें राहत असत; कारण त्यावेळीं गाई पुष्कळ असल्यानें दूध तूप विपुल मिळत असे व धान्य उत्पन्न करण्यास बैल विपुल असत, त्यामुळें धान्य पुष्कळ व स्वस्त मिळत होतें; पण सध्यां जेव्हांपासून विदेशी मांसाहारी लोक या देशांत येऊन राहूं लागले, तेव्हांपासून गौ आदि पशूला मारून खाणारे व मद्यपान करणारे राज्याधिकारी झाले व क्रमानें संसारोपयोगीं पशूंची संख्या दिवसानुदिवस कमी कमी होत गेल्यानें धान्य व दूधदुभत्याची महर्गता होऊन आर्यलोक दिवसानुदिवस जास्त जास्त दुःखी होऊं लागले आहेत. कारण म्हटलें आहे कीं " **नष्टे मूले नैव फलं न पुष्पम् ।** वृद्धचाणक्य अ० १०।१३॥ " वृक्षाच्या मूलाचा नाश झाला असतां त्याला फुलें व फळें हीं मिळत नाहींत अशी स्थिति होते; तद्वतच गाईचा नाश झाला असतां दूध, तूप, जमीन नागरण्यांस बैल तरी कसे व कोठून मिळणार ? (प्र०) अहो ! जर सर्वच मनुष्य हिंसा न करणारे झाले तर मग व्याघ्रादि हिंस्र पशू इतके वाढतील कीं, तेच गाय वगैरे सर्वोपयोगीं पशूंला खाऊन टाकतील ? (उ०) व्याघ्रादि हिंस्र पशूंला मारून व तसेंच जे दुष्ट मनुष्यादि प्राणि असतील त्यांना दंड देऊन इतरांचें रक्षण करणें हें राजपुरुषांचें अवश्य कर्तव्य आहे. (प्र०) मग त्या मारलेल्या प्राण्यांचें मांस काय टाकून द्यावें ? (उ०) पाहिजे तर फेंकून द्यावें, पाहिजे तर कुत्रे वगैरे मांसा-

हारी पशू आहेत त्यांना खाऊं द्यावें, किंवा जाळून टाकावें, किंवा कोणी मांसाहारी मनुष्य खात असेल तर त्याला द्यावें. मांसाहारानें मनुष्यांचा स्वभावहि हिंसक व दुष्ट बनतो; म्हणून कोणीहि मांसाहार करूं नये. हिंसा, चोरी, विश्वासघात, छळ व कपटादि करून जें प्राप्त होतें तें अभक्ष्य होय व अहिंसा, धार्मिककृत्यें यांच्यापासून जें प्राप्त होतें तें भक्ष्य आहे असें समजावें; त्याचप्रमाणें ज्या पदार्थापासून स्वास्थ्य, रोगनाश, बुद्धिबल, पराक्रम यांची वृद्धि व आयुष्याची वृद्धि होते अशा तांदूळ, गहूं, फळ, मूल, कंद, दूध, तूप, मिष्टान्नादि पदार्थांचें सेवन करावें. हे सर्व पदार्थ भक्ष्य समजावे. जे पदार्थ आपल्या प्रकृतीमध्यें विकार करतात, ते सोडावे; व जे जे ज्या ज्या कालीं हितकारक असतील त्यांचें त्या त्या कालीं सेवन करणें हें उत्तम होय

(१०) उच्छिष्टान्नभक्षणनिषेध.

(प्र०) एका पानांत अनेकांनीं जेवण्यांत कांहीं दोष आहे काय ? (उ० होय फार दोष आहे. एकाचे कुष्ठादि रोग दुसऱ्याला लागतात. प्रत्येकाची प्रकृति भिन्न-भिन्न असल्यामुळें एका पात्रांत सर्वांनीं अन्न सेवन केल्यानें त्यांनां निरनिराळे व्याधी होण्याचा व त्यांचें रक्त दूषित होण्याचा संभव असतो; याचप्रमाणें दुसऱ्याचें उच्छिष्ट खाण्यानेंहि अनेक दोष उत्पन्न होण्याचा संभव असतो. पहा—

नोच्छिष्टं कस्यचिद्दद्यात् नाद्याच्चैव तथान्तरा ॥

न चैवात्यशनं कुर्यात् न चोच्छिष्टः क्वचिद्व्रजेत् ॥मनु.२।५६॥

" आपलें उच्छिष्ट कोणाला देऊं नये व दुसऱ्या कोणाचें उच्छिष्ट आपण खाऊं नये. अधिक भोजन कधींहि करूं नये व हात आणि तोंड धुतल्याशिवाय इकडे तिकडे हिंडूं नये. " (प्र०) " **गुरोरुच्छिष्टभोजनम् ।** " याचा अर्थ काय बरें ? (उ०) याचा अर्थ गुरूचें उच्छिष्ट खावें असा नसून " गुरूचें जेवण झाल्यानंतर जें अन्न शिल्लक राहिलें असेल तें भक्षण करावें—अर्थात् गुरूला आधीं जेऊं घालावें व नंतर आपण जेवावें. " असा आहे. (प्र०) जर कोणाचेंहि उच्छिष्ट खाऊं नये असें आहे तर मधमांशांचें उच्छिष्ट मध, वांसरांचें उच्छिष्ट दूध व आपण एक घांस घेतल्यानंतर आपलेंच उच्छिष्ट आपण कसें खावें ? (उ०) मध हा मधमाशांचें उच्छिष्ट नाहीं तो अनेक औषधींचा सार आहे व त्याचें एकीकरण करण्यांत मधमाशांचें

सहाय्य होतें इतकेंच. वासरें हीं स्तनांतून बाहेर येणाऱ्या दुधाचें पान करतात त्या योगानें आंतील दूध उच्छिष्ट होत नाहीं. वासराचें दूध पिऊन झाल्यावर स्तनाला पाण्यानें धुवून स्वच्छ भांड्यांत धार काढावी म्हणजे झालें. आपलें उच्छिष्ट आपणालाच अपायकारक नसल्यानें त्या संबंधानें विशेष लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. स्वाभाविक रीतीनें पाहिलें तरी आपल्या उच्छिष्टाचा आपल्याला वीट येत नाहीं, पण दुसऱ्याच्या उच्छिष्टाचा येतो. मुख, नाक, कान, डोळे, उपस्थ व गुह्येंद्रिय या आपल्या इंद्रियांतून निघणाऱ्या मलाला स्पर्श करण्यास आपणास घृणा उत्पन्न होत नाहीं; पण त्याच दुसऱ्याच्या इंद्रियांतील मलाला स्पर्श करणें कंटाळवाणें वाटतें, याचप्रमाणें उच्छिष्टा विषयीं जाणावें; म्हणून कोणाचेंहि उच्छिष्ट दुसऱ्या कोणीहि खाऊं नये हें उत्तम व हेंच सृष्टिनियमांस अनुकूलहि आहे. (प्र०) स्त्रीपुरुषांनींहि परस्पर एकमेकांचें उच्छिष्ट खाऊं नये कीं काय ? (उ०) स्त्रीपुरुषांनीं सुद्धां एकमेकांचें उच्छिष्ट खाऊं नये, कारण त्यांच्या शरीरांचा स्वभावहि भिन्न असतो.

(११) अभक्ष्य अन्न.

(प्र०) अहो ! सर्वांचीं शरीरें सारखींच हाडामांसाचीं आहेत व सर्वांच्या शरीरांत एकसारखेंच रक्त खेळत आहे, मग पाहिजे त्याच्या हातचें अन्न खावयाला काय हरकत आहे? (उ०) पाहिजे त्याच्या हातचें खाण्यांत पुष्कळ दोष आहे. पहा, चांगले चांगले सात्विक पदार्थ खाऊन जशीं ब्राह्मण व ब्राह्मणी यांचीं शरीरें सात्विक व निर्दोष जशीं बनलेलीं असतात तशीं तीं चांडालादिकांचीं नसतात. चांडालाच्या शरीरांतील परमाणू दुर्गंधानें भरलेले असतात तसे द्विजांचे नसतात, कारण त्यांच्या खाण्याच्या पदार्थांतच तसा भेद असतो; म्हणून ब्राह्मणादि उत्तम वर्णांच्या हातचें अन्न खावें व धेड, भंगी, चांडाल, चांभार इत्यादि नीच व अमंगल मनुष्यांच्या हातचें अन्न खाऊं नये. ब्राह्मणाचें व चांडालाचें शरीर जरी हाडामांसाचेंच असलें तरीहि त्यांत आणखी पुष्कळ भेद असतात. आई, सासु, कन्या, बहीण, मुलाची मुलगी इत्यादि स्त्रियांचीं शरीरें सारखींच हाडामांसाचीं असतात, तथापि त्या सर्वांशीं सारखें आचरण करावयाचें नसतें, कारण त्यामध्यें आणखी इतर पुष्कळ दृष्टीनें भेद आहे. मुखानें प्रत्येक पदार्थ खातां येतो हें खरें पण लोक अन्न खातात व मल खात नाहींत. तात्पर्य विचारानेंच सर्व गोष्टी केल्या पाहिजेत व ज्या अर्थीं चांडालादिकांचीं शरीरें अमंगल असतात त्या अर्थीं त्यांनीं तयार केलेलें अन्न उच्च वर्णांनीं खाण्यास योग्य नसतें.

(१२) गाईचें शेण.

(प्र०) गाईच्या शेणानें सारवतात तसें दुसऱ्या प्राण्यांच्या शेणानें सारवण्यास काय हरकत आहे ? (उ०) गाईच्या शेणाला घाण येत नाहीं, तें हवा शुद्ध करतें, तें चिकट असल्यानें जमीन लवकर उखळली जात नाहीं, सारवलेल्या जमिनी वाळल्याव र स्वच्छ दिसतात व त्यांवर कपडा ठेवला तर त्याला मळ लागत नाहीं. जशी माती वस्त्रादिकांला लागते तसें वाळलेलें शेण लागत नाहीं. मनुष्यादि इतर प्राण्यांची विष्टा दुर्गंध उत्पन्न करणारी व हवा बिघडिवणारी असते. गाईच्या शेणानें सारवलेली जमीन स्वच्छ व साफ दिसते, जेवणाखाण्याच्या ठिकाणीं दूध तूपादि पदार्थ पडतात व ते तसेच राहूं दिले तर तेथें माशा जमतात व दुर्गंध उत्पन्न होतो, पण जर ती जागा शेणानें स्वच्छ सारवली तर ती सुंदर व स्वच्छ होते; जर चुने गच्चीचें घर असेल तर पाण्यानें धुवून स्वच्छ ठेवतां येतें पण जर जमीनच असली तर शेणानें स्वच्छ सारवण्याची अत्यंत आवश्यकता आहे, मांसाहारी म्लेच्छ लोकांच्या बवर्जीखान्यामध्यें व त्याच्या आस-पास कोठें हाडें तर कोठें मांसाचे तुकडे, कोठें जळकीं लांकडें तर कोठें राख व इतर पदार्थ इकडे तिकडे पडलेले असतात व तेथें माशा अशा घूं घूं करीत असतात कीं, त्याचें वर्णन करतां येत नाहीं, अशा दुर्गंध युक्त स्थानीं जर चांगला मनुष्य गेला तर त्याला वांतीच होईल; पण ब्राह्मणादि निर्मांसहारी लोकांचें स्वयंपाक घर तसें नसतें, तें झाडून सारवून स्वच्छ व नीटनेटकें केलेलें असतें. असो. तात्पर्य इतकेंच कीं गोमयानें सारवल्यानें स्वच्छता वाढते म्हणून तसें करणें उत्तम आहे.

(१३) चौका.

(प्र०) पुरभय्यां प्रमाणें चौका करून त्यांत बसून खाणें चांगलें कीं काय ? (उ०) जी जागा स्वच्छ व रमणीय असेल व जेथें दुर्गंधादि येत नसतील तेथें बसून जेवावें; पण या गोष्टी वेळावर अवलंबून आहेत. युद्धाच्या प्रसंगीं चौका करीत बसण्यास वेळ नसतो तेव्हां घोड्यावर किंवा रथांत बसून खाण्यास हरकत नाहीं, पण जेव्हां घरीं व्यवस्था होण्यासारखी असते तेव्हां वरील सर्व प्रकारांचा विचार करून भोजनादि व्यवहार करावे. (प्र०) आपल्या हातानीं आपण करून खावें कीं, दुसऱ्यांच्या हातचें जेवावें ? (उ०) जर सर्व आर्य शुद्ध धार्मिक पद्धतीनें वागत असले तर सर्व आर्यांच्या हातचें आर्यांनीं खाण्यास कोणताच प्रत्यवाय नाहीं; कारण ब्राह्मणादि तीन वर्णांचीं स्त्रीपुरुषें चौका करणें, भांडीं घांसणें हीं कामें करूं लागलीं तर विद्यावृद्धि व ज्ञानप्रसार करणार कोण ? पूर्वी युधिष्ठिराच्या राजसूययज्ञामध्यें सर्व

भूमंडळावरील राजे महाराजे, ऋषी महर्षी अनेक आलेले होते व ते राजाच्या एकाच पाकशाळेंतील अन्नाचें सेवन करीत असत; जेव्हांपासून ख्रिस्ति व मुसलमान वगैरे मतमतांतरें निघून, वैर वाढलें व मद्यगोमांसादिकांचा प्रचार सुरू झाला तेव्हांपासून भोजनामध्यें स्पर्शास्पर्शाचा बखेडा सुरू झाला आहे. पहा. प्राचीनकाळीं काबुल, कंदाहार, इराण, अमेरिका, युरोप इत्यादि ठिकाणच्या राजांच्या गांधारि, माद्री, उलूपी वगैरे मुली आर्यावर्तातील राजांनी केल्या होत्या; व भोजनादि व्यवहार यांचे व त्यांचे होत असत. शकुनि वगैरे तद्देशीय राजपुरुषांचा खानपानादि व्यवहार कौरवपांडवांशीं विनबोभाट होत असे; त्यांच्यांत मुळींच विरोध नव्हता, कारण त्यावेळीं सर्वभूमंडळावर एकच वैदिकमत होतें; या वैदिकधर्मावरच सर्व लोक निष्ठा ठेवित असत, लोकांचा आपल्याप्रमाणें काळजी घेत व त्यांच्या सुखदुःखाविषयीं जपत असत, म्हणूनच त्यावेळीं आर्यावर्तात फार सुख होतें, पण आतां अनेक मतमतांतरें झाल्यापासून अनेक दुःखें उत्पन्न झालीं आहेत; या सर्व दुःखांच्या मूलाचें निवारण करणें बुद्धिमान् पुरुषांचें अवश्य कर्तव्य आहे. परमेश्वरानें सर्वांच्या मनांत सत्यमताचा असा अंकुर घालावा कीं, त्या योगानें असत्य मतमतांतरांचा शीघ्रच प्रलय होईल व सर्वत्र ऐक्य भाव नांदूं लागेल; करितां सर्व विद्वान् लोकांनी या दृष्टीनें विचार करून सर्व प्रकारचा विरोधभाव टाकावा व सर्वांनी आनंदाचें भागी व्हावें.

(याप्रमाणें आचार व अनाचार, भक्ष्य व अभक्ष्य यांविषयीं थोडेंसें दिग्दर्शन झालें; येथें दहावा समुल्लास पुरा होऊन सत्यार्थप्रकाशाचा पूर्वार्धहि पूर्ण झाला. या पूर्वार्धामध्यें खंडनमंडनाचा भाग विशेष दिला नाहीं, याचें कारण असें कीं, प्रथमतः धर्म व अधर्म यांचा विचार करण्याचें सामर्थ्य मनुष्यांमध्यें आल्यानंतरच खंडनमंडनांतील सूक्ष्मभेद लक्ष्यांत येऊं शकतात; याकरितां पहिल्या दहा समुल्लासांमध्यें सत्य धर्माचा उपदेश करून पुढील चार समुल्लासांमध्यें मतमतांतरांचें खंडनमंडन करण्यांत येणार आहे. अकराव्या समुल्लासामध्यें आर्यावतीय मतमतांतरांचें, बाराव्यामध्यें जैनधर्माचें, तेराव्यामध्यें ख्रिस्तियन् धर्माचें व चवदाव्यामध्यें मुसलमान धर्माचें खंडनमंडन करून त्या त्या मतांचें खरें स्वरूप काय आहे तें दाखविण्यांत येईल; व चवदाव्या समुल्लासांच्या शेवटीं स्वमतहि दिलें जाईल. जे मनुष्य निःपक्षपात बुद्धीनें या ग्रंथाचें विचारपूर्वक परिशीलन करतील त्यांना खरें धर्माचें स्वरूप कळेल, पण जे दुराभिमानानें विचार करणार नाहींत, त्यांना अविचाराला जें योग्य फल मिळावयाचें तें मिळेल. सर्व काळीं विद्वानांचें हें काम आहे कीं, त्यांनी सर्व गोष्टींचा नीट विचार करून सत्य कोणतें व असत्य काय आहे याचा निश्चय करावा व सदोदित जें खरें असेल त्याचा

स्वीकार करून असत्याचा त्याग करावा. अशा रीतीनें गुणग्राह्य म्हणजे धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चारहि पुरुषार्थांची त्यांना आनंदित व प्रसन्न होतील यांत शंका नाहीं.)

इति श्रीसुभाषाविभूषित आचारानाचारमक्ष्यामक्ष्यविषयं दशमसमुल्लासः संपूर्णः ॥ १० ॥

॥ समाप्तोऽयं पूर्वार्धः ॥

॥ ओ३म् शम् ॥